## धुळे महानगरपालिका धुळे
## स्थायी समिती
## सभा क्रं.१ दिनांक ०६/०२/२०१४ चे कार्यवृत्त

धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा आज गुरुवार दिनांक ०६/०२/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां धुळे महानगरपालिकेच्या सभागृहात मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे प्रतिनिधी मा. श्री. प्रकाश महाजन साो,जिल्हाधिकारी धुळे तथा पिठासीन अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आली. या सभेचे कार्यवृत्त.

सदर सभेस खालील प्रमाणे मा.सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सदस्य |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री.साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ७ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ८ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ९ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| १० | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ११ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १२ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १३ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १४ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| | **उपस्थित अधिकारी गण** | |
| १ | श्री. प्रकाश महाजन | पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी धुळे |
| २ | श्री. केव्ही. धनाड | आयुक्त |
| ३ | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त |
| ४ | डॉ. श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव |
| ६ | श्रीमती पल्लवी अ. शिरसाठ | जिल्हा प्रकल्प अधिकारी |

विषय क्रमांकः- १ — स्थायी समिती सभापती यांची निवड करणे.

मुंबई प्रांतिक मनपा(स्थायी समिती सभापती यांची निवडणूक घेणे) सन २००७ ची महाराष्ट्र शासन अधिसुचना १७ फेब्रुवारी २००७ चे नियम क्रंमाक ५ (१) अन्वये दिनांक ०६/०२/२०१४ रोजी स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी दाखल झालेले नामनिर्देशन पत्र मा.पिठासीन अधिकारी यांचेकडेस सुपुर्द करीत आहे.

म. पिठासीन अधिकारी — दिनांक०५/०२/२०१४ रोजी पावेतो नगरसचिव मनपा धुळे यांचेकडेस प्राप्त झालेले १ उमेदवारांचे २ नामनिर्देशन पत्र वाचून दाखवतो.

| अ. | उमेदवारांचे संपूर्ण नांव | उमेदवाराचा टपालाचा | उमेदवार हा नगरसेवक | सुचकाचे संपूर्ण नांव | अनुमोदक संपूर्ण |
|---|---|---|---|---|---|

| नं. | | संपूर्ण पत्ता | म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचे/ पॅनलचे नांव/ क्रमांक | | नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | चंद्रवेल,मधुबन कॉलनी, वाडीभोकररोड, देवपूर, धुळे | प्र.क्रं. ५ ब रामनगर पाण्याची टाकी परिसर | शेख फिरोज बशीर | साखला गोविंद तुळशिराम |
| २ | केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | चंद्रवेल,मधुबन कॉलनी, वाडीभोकररोड,देवपूर, धुळे | प्र.क्रं. ५ ब रामनगर पाण्याची टाकी परिसर | बोरसे कल्पना सुरेश | अजळकर माधुरी नंदलाल |

स्थायी समिती सभापती पदासाठी प्राप्त एकाच उमेदवारांचे २ नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत येत आहे.

छाननी अंती सभापती पदासाठी प्राप्त नामनिर्देशन पत्र वैध असल्याने मंजूर करण्यांत येत आहे.

धुळे महानगरपालिकेच्या सभापती स्थायी समिती पदासाठी श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका)या एकाच उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र प्राप्त असून ते वैध असल्याने महाराष्ट्र शासन १७ फेब्रुवारी २००७ चे अधिसुचनेतील नियम ६ (१) नुसार अन्वये श्री. केले चंद्रकांत काशिनाथ हे स्थायी समिती सभापती पदी बिनविरोध निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

सभेचे कामकाज शांततेने पार पाडणेस उपस्थितांनी सहकार्य केल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर करीत आहे.

सही /- x x x

**(प्रकाश महाजन)**
**पिठासीन अधिकारी**
**धुळे मनपा स्थायी समिती सभापती निवडणूक सभा,**
**तथा**
**जिल्हाधिकारी,धुळे**

**स्थळ :- धुळे मनपा सभागृह, धुळे**
**दिनांक :- दि.०६/०२/२०१४**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक १३ फेब्रुवारी २०१४**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार१३/२/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा. श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री.साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ७ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| १० | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ११ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १२ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १३ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.व्ही. धनाड | आयुक्त |
| २. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | डॉ. श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त (कर) |
| ४. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ६. | श्री. एस.बी.विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.एन. कुटे | मु.लेखाधिकारी |
| ९. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| १०. | डॉ. श्री. महेश मोरे | वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. के.जी. सुडके | एल.बी.टी अधिक्षक |
| १२. | श्री. एस.व्ही. बर्गे | आस्थापना प्रमुख |
| १३. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४. | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| १५. | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| १६ | श्री.राजू माईनकर | भांडार लिपीक |
| १७ | श्री.आर.एस.बोरसे | अभिलेखापाल |

**म. सभापती** सन्मा.सदस्यअधिकारी गण, पत्रकार बांधव यांचे स्वागत करतो. सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

**म. नगरसचिव** वंदे मारतम या राष्ट्र वंदनेसाठी सर्वांनी उभे रहावे.

**म. सभापती** सभेस उपस्थित राहणेस मला थोडा उशिर झाला त्याबद्दल मी प्रथम आपली दिलगिरी व्यक्त करतो. मी वेळेच्या बाबतीत शिस्त प्रिय आहे. त्यामुळे मी देखील यापुढे वेळेवर येईल व सर्व अधिका-यांनी देखील यापुढे वेळेवर उपस्थित राहिले पाहिजे.आज पहिला सभा असल्यामुळे जे अधिकारी उपस्थित नाही त्या आज माफी देण्यांत येत आहे मात्र यापुढे अशा बाबी खपवून घेतल्या जाणार नाही यांची त्यांना समज देण्यांत येत आहे.नगरसचिव यांनी विषय पत्रिकेवरील विषयास सुरुवात करावी.

**विषय क्रमांक:- १** स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषय व टिपणीचे वाचन केले.

म. सभापती माझ्या मते सभेचा वार गुरुवार असावा.या विषयाच्या संदर्भात सन्मा.सदस्यांच्या काही सुचना असतील तर त्यांनी त्या मांडाव्यात.

म. नरेंद्र परदेशी सभेची सभागृहाची शिस्त असली पाहिजे यापुढे एकही अधिकारी सभेला उशिरा येणार नाही अथवा गैरहजर असणार नाही.याबाबत सर्वाना समज देण्यांत यावी. सन्मा.सभापती

|  |  |
|---|---|
|  | महोदय,स्थायी समितीची साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चिती बाबत विषय आला आहे. मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ मध्ये कलम ४४ नुसार प्रश्न विचारणाची तरतूद करण्यांत आलेली आहे.त्यासाठी अगोदर यादी पत्र देण्यांत येईल त्या प्रश्नाचा अगोदर विचार होईल नंतर अजेंडयावरील विषय होतील. तरी या गोष्टीचा विचार करणेत यावा ही विनंती आहे. |
| म. सभापती | अधिनियमात काय तरतूद आहे ते अगोदर बघणेत येईल. त्यानंतर विचार करणेत येईल. आपण जर अगोदर प्रश्न उत्तराचा विषय ठेवला तर मुळ विषय बाजूला राहतो आणि सभागृहाचा वेळ जातो. सभेचा वार गुरुवार ठेवावा सभेची वेळ सकाळी ११-०० किंवा ११-१५ ची ठेवावी. |
| म. फिरोज शेख | सभेचा वार ठरविणेबाबतचा विषय आहे शुक्रवार सोडून कोणताही वार ठेवावा शहरात अनेक अडचणी समस्या आहेत त्या विषयाचे संबंधित अधिकारी आहेत त्यांनीच सभेमध्ये उत्तर द्यावे. जे कोणी आरोग्याधिकारी असतील. नगररचनाचे अधिकारी असतील विभागाच्या संबंधित अधिक-यानेच उत्तर दिले पाहिजें. बजेटच्या सभेमध्ये चर्चा होणार आहे नगररचनाच्या विषयात अनेकचुका झालेल्या आहेत त्यांचेकडून आपल्याल खुलासा पाहिजे. |
| म. सभापती | मिटींग स्थायी समितीची असो अथवा महासभेची असो सर्व अधिका-यांची मला यादी द्यावी त्यांची हजेरी घ्यावी. स्थायी समितीची सभा दर गुरुवारी ११-०० वाजता ठेवणेत येईल तसेच बजेटची मिटींग सोमवारी होत आहे. यासाठी सर्व अधिका-यांनी आपल्या विषयाची तयारी करुन यावे.आपल्याकडे विकास कामासाठी निधी नाही आपल्याला उत्पन्न कसे वाढविता येईल याचा विचार करावा. सदस्यांनी आपली मते मांडावी चर्चा अपूर्ण राहिली तर दुस-या दिवशी चर्चा करु.आपल्या सुचनांचा विचार करुन कामकाज करणार आहोत |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १ दिनांक १३/०२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे स्थायी समितीच्या साप्ताहीक सभेचा वार व वेळ ठरविणेसंदर्भातील विषयावर उपस्थित सदस्यांनी चर्चा करुन चर्चेअंती स्थायी समितीच्या साप्ताहिक सभा गुरुवारी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच मा.सभापती स्थायी समिती यांना आवश्यक वाटल्यास इतर वेळी देखील स्थायी समिती सभा घेण्यांचे अधिकार मा.सभापती यांना देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक २० फेब्रुवारी २०१४**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची दिनांक १७/२/२०१४ रोजी तहकूब करण्यांत आलेली विशेष सभा आज गुरुवार २०/२/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती,स्थायी समिती,धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात पुन्हा सुरु करण्यांत आली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री.साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ७ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ८ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ९ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| १० | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ११ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १२ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १३ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १४ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १५ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १६ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.व्ही. धनाड | आयुक्त |
| २. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | श्री.त्र्यंबक कांबळे | सहा.आयुक्त |
| ४. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ५. | श्री. एस.बी.विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.एन. कुटे | मु.लेखाधिकारी |
| ८. | डॉ. श्री. महेश मोरे | वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. के.जी. सुडके | एल.बी.टी अधिक्षक |
| ११. | श्री. एस.व्ही. बर्गे | आस्थापना प्रमुख |
| १२. | श्री. बी. एस. रनाळकर | वसुली अधिक्षक |
| १३. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री.एस.एस. देवरे | पा.पु. अभियंता |
| १६ | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| १८ | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १९ | श्री.एम. एस. जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| २० | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २१ | श्री.आर.एस.बोरसे | अभिलेखापाल |
| २२ | श्री. रमजान अन्सारी | प्रभाग अधिकारी प्र.कं. १ |

**विषय क्रमांक:- ०२** म. आयुक्त सो. महानगरपालिका धुळे यांनी सन २०१३-२०१४ चे सुधारीत व सन २०१४-२०१५चे जे अंदाज सादर केले आहेत.त्यानुसार स्थायी समितीने अर्थसंकल्प अंदाज तयार करुन त्यास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २ दिनांक २०/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे म.आयुक्तांनी सादर केलेल्या सन २०१३-१४ च्या सुधारीत अर्थसंकल्प व सन २०१४-१५ चे सादर केलेले अंदाज यामध्ये स्थायी समितीने अधिका-यांना सुचना देऊन अधिका-याकडून मागविलेल्या माहितीनुसार तयार करण्यांत

आलेल्या खालील तक्तात नमूद केलेल्या तरतूदीनुसार सादर केलेल्याअर्थसंकल्पास एकमताने मंजूर करणेत येत आहे.

| जमा | | | खर्च | | |
|---|---|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **तपशिल** | **रक्कम** | **अ.क्र.** | **तपशिल** | **रक्कम** |
| १ | मनपा क्षेत्रात विकास कामांसाठी विशेष निधी | २०००००००० | १ | मनपा क्षेत्रात विकास कामांसाठी विशेष निधी | २०००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | २०००००००० |
| २ | मनपा क्षेत्रात विकास कामांसाठी विशेष निधी | ४०००००००० | २ | मनपा क्षेत्रात विकास कामांसाठी विशेष निधी | ४०००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | ४०००००००० |
| ३ | अल्पसंख्याक निधीअंतर्गत जलकुंभ उभारणे | २०००००००० | ३ | अल्पसंख्याक निधीअंतर्गत जलकुंभ उभारणे | २०००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | ५९०००००० |
| ४ | IHSDP अंतर्गत घरकुल योजना | ७३०००००० | ४ | IHSDP अंतर्गत घरकुल योजना | १९३०००००० |
| | | | | मनपा हिस्सा | १९३०००००० |
| ५ | मनपा क्षेत्रात परिवहनसेवा | २२००००००० | ५ | मनपा क्षेत्रात परिवहन सेवा | २२००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | २२०००००० |
| ६ | मनपा क्षेत्रात एल.ई.डी. लाईट बसविणे | ८०००००००० | ६ | मनपा क्षेत्रात एल.ई.डी. लाईट बसविणे | ८०००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | ८०००००० |
| ७ | ॲम्युझमेंट पार्क | २०००००००० | ७ | ॲम्युझमेंट पार्क | २०००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | १०००००००० |
| ८ | विशेष अनुदान - दवाखाने व रस्ते | २००००००००० | ८ | विशेष अनुदान -दवाखाने व रस्ते | २००००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | २०००००००० |
| ९ | पाणीपुरवठा योजना (एकूण १२४ कोटी) | ६१३३५०००० | ९ | पाणीपुरवठा योजना (एकूण १२४ कोटी) | ६१३३५०००० |
| | | | | मनपा हिस्सा | ६८१५०००० |
| १० | राजीवगांधी आवास योजना | २००००००००० | १० | राजीवगांधी आवास योजना | २००००००००० |
| | | | | मनपा हिस्सा | २०००००००० |
| ११ | स्लॉटर हाऊस | ५३०००००० | ११ | स्लॉटर हाऊस | ५३०००००० |
| | | | | मनपा हिस्सा | ० |
| १२ | नगरोत्थान योजना | २१६८००००० | १२ | नगरोत्थान योजना | २१६८००००० |
| | | | | मनपा हिस्सा | २१६८००००० |
| १३ | वसुली कडील ९०% प्रमाणे उत्पन्न (नविन बांधकामे राहत्या घरात व्यवसायकरणा-यांना व्यावसायिक मालमत्ता कर लावणे ,अवैध -नळ कनेक्शन पासून मिळणारे उत्पन्न | १४३१५२००० | १३ | सन २००८-०९ ते २०१३-१४ विकास कामांकरीता | १५०००००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | १४ | नोंदणीकृत व्यायाम शाळांकरीता | १००००००० |
| १४ | पारगमन शुल्क २०० रूझाल्यास होणारी वाढ रूपये १०० ऐवजी २०० केल्यास होणारी वाढ ३९.७० कोटी त्यात धुळे शहरात राहणा-या वाहन धारकास पारगमा शुल्कातून सूट दिल्यास २ कोटीने कमी ३७.७० कोटी | ३७७०००००० | १५ | नोंदणीकृत वाचनालयांसाठी | ५०००००० |
| | | | १६ | वाग्देवता मंदीर नुतनी करण | ५०००००० |
| १५ | स्थानिक संस्था करापासून वाढीव अपेक्षित उत्पन्न | ६००००००० | १७ | विविध क्रिडा स्पर्धाकरीता | १२५००००० |
| | | | १८ | महापौर चषक | १५०००००० |
| १६ | अनाधिकृत मोबाईल टॉवर अधिकृत केल्यास त्यापासून मिळणारे उत्पन्न | १३०००००० | १९ | धुळे फेस्टीवल | २०००००००० |
| | | | २० | राम रहीम उत्सव | ५०००००० |
| १७ | बांधकाम पुर्णत्व दाखल्या पासून ज्या मालमत्ता धारकांनी बांधकाम परवानगी न घेता मालमत्ता उभारल्यास तसेच ज्यांनी परवानगी घेतला आहे परंतू परवानगी व्यतिरीक्त बांधकाम केल्यास अशामालमत्ता धारकांवर दंडात्मक कारवाई केल्यास मिळणारे उत्पन्न | २८००००००० | २१ | स्टेडीयम दुरूस्ती | २५०००००० |
| | | | २२ | पर्यटन स्थळ विकसीत करणे | ३०००००००० |
| १८ | नवीन नळ कने. मीटर व फिटींग चार्जेस - धुळे शहरातील नवीन पाणी पुरवठा योजनेत नळ कनेक्शना व मिटर फिटींग चार्जेस बाबत मिळणारे उत्पन्न | २६०००००००० | २३ | महापुरूष जयंती उत्सव | १०००००० |
| १९ | बीओटी पासून मिळणारे उत्पन्न | २२५००००० | २४ | विशेष निधी मनपा हिस्सा | १५००००००० |
| २० | विविध नकलांपासून मिळणारे उत्पन्न - जन्म / मृत्यू दाखला रू ५ वरुन रू.५० केल्यास , विवाह -नोंदणी फी रू २५० ऐवजी रू ५०० केल्यास | ४४००००० | २५ | वलवाडी शिवार स.न.७३ मध्ये भाजीपाला मार्केट उभारणे | २००००००० |
| २१ | शॉपिंग सेंटर पासून मिळणारे उत्पन्न | १००००००० | २६ | खाद्य पदार्थ कचरा व्यवस्थापन | ५०००००० |
| | | | २७ | आरोग्य शिबीर | ५०००००० |
| | | | २८ | पर्यावरण वाचवा मोहीम | ५००००० |
| | | | २९ | बालसंस्कार केंद्र | ५००००० |
| | | | ३० | नगरसेवक निधी - १० लाख X ७५ सदस्य | ७५०००००० |
| | | | ३१ | १३ वा वित्त आयोग अंतर्गत खर्च | ८५०००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | ३२ | पाणीपुरवठा कडील पंपींग स्टेशन करिता दुरुस्ती कामे व पंप | ३००००००० |
| | | | ३३ | इतर अनुषंगिक अत्यावश्यक तरतुदी | ५७९०२००० |
| २२ | १३ वित्त आयोग अनुदान | ८५०००००० | | | |
| | | **३०११२०२०००** | | | **३०११२०२०००** |

**सर्वानुमते मंजुर,**
सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी २०१४**
**वेळ:- सकाळी १०-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज शुक्रवार २८/२/२०१४ रोजी सकाळी १०-०० वाजतां मा. श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ६ | श्री.साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ७ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ८ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ९ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| १० | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ११ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १२ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १३ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १४ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १५ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १६ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.व्ही. धनाड | आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त |
| २. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त ( कर) |
| ४. | श्री. बी.एम. नेरकर | मुख्य लेखा परीक्षक |
| ५. | सौ. हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ६. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा.आयुक्त |
| ७. | श्री. एस.बी.विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ८. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ९. | डॉ. श्री. महेश मोरे | वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. एन.पी. सोनार | प्र. जकात अधिक्षक |
| १२. | श्री. एस.व्ही. बर्गे | आस्थापना प्रमुख |
| १३. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १६ | श्री.एस.एस. देवरे | पा.पु. अभियंता |
| १७ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १८ | श्री.आर.एस.बोरसे | अभिलेखापाल |
| १९ | श्री. तुषार वासुदेव ढाके | सहा. अग्नीशमन अधिकारी |

**विषय क्रमांकः- ३** मा.महापौर सो.यांच्या सुचनेनुसार आरोग्य विभागासाठी २ नवीन जे.सी.बी. मशिन खरेदी करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३ दिनांक २८/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा.महापौर सो.यांनी आरोग्य विभागाची आढावा बैठक दि.१८/१/१४ रोजी घेतली सदर आढावा बैठकीत आरोग्य विभागासाठी एक नवीन जे. सी. बी. मशिन घेणेबाबत सूचिवले तसेच दि.२०/१/१४ भांडारकडे पत्र सादर केले सदर पत्रानुसार जे.सी.बी. चे अधिकृत डिलर सुयान इन्फोट्रक्चर प्रा.लि. धुळे यांचे कडील कोटेशन दरानुसार रु.२४,९५,०००/- मात्र दर आहे.सदर नवीन जे.सी.बी. मशिन खरेदी बाबत सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकात तरतूद नव्हती. परंतु आता सन२०१३-१४ उर्वरीत ४ महिन्याच्या सुधारीत अंदाजपत्रकात ५०लाख तरतूद मा.आयुक्त सो.यांनी सूचविली असून त्यास अद्याप मंजुरी मिळाली नाही.तरी सदर सुधारीत अंदाजित पत्रकात मंजुरी मिळेल याअपेक्षेने सदर जे.सी.बी.

मशिन नग २ खरेदीस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच ई - टेंडर पध्दतीने निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक:- ४** मा.उपमहापौर यांच्या पत्रानुसार नविन व्हॅक्युम गाडी घेणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४ दिनांक २८/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा.उपमहापौर यांनी लेखी पत्र देऊन नवीन व्हॅक्युम गाडी घेणेबाबत सूचित केले आहे उक्त पत्रावर खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यांत येत आहे.

सद्यस्थितीत मनपा मालकीची एक ट्रॅक्टर गलीमॅन व एक मोठी व्हॅक्युम गाडी कार्यरत आहे.मोठी गाडी याची कामाची मुदत संपली असुन कामाच्या आवश्यकतेमुळे दोन वेळा लिलावात काढुनही लीलाव रद्द करुन गाडी सुरु ठेवण्यात आली आहे. सदर गाडी सुरु ठेवणे हे अत्यावश्यक असुन उक्त गाडीची मुदत संपल्यामुळे सदर गाडी केव्हाही बंद पडु शकते. खाजगी सेफ्टी टँक उपसणेकामी ठेकेदार नेमलेला असुन त्यांची एक छोटी गलीमॅन ट्रॅक्टर कार्यरत असुन ते काम केव्हाही बंद करतात किंवा गाडी नादुरुस्त होत असते. त्यामुळे नागरीकांचे कामे प्रलंबीत राहिल्यामुळे नागरी कार्यालयात तक्रारी करीत असतात. त्यामुळे नागरीकांमध्ये मनपा विषयी नाराजी व्यक्त होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी शहरात एकुण १३३ युनिट असुन मनपाचे जुने शौचालय सुध्दा आहे.त्यांच्या सेफ्टी टँक नियमीत साफ करणे आवश्यक असते. तसेच ड्रेनेज कामासाठी सुध्दा वेळोवेळी व्हॅक्युम गाडीची आवश्यकता असते. त्यामुळे सदर मनपाच्या गाड्यांद्वारे उक्त काम करण्यास खुपच अडचण निर्माण होत असते. त्यामुळे शौचालयाबाबत खाजगी व सार्व.तक्रारी वाढत असतात.

आरोग्याधिकारी यांच्या आलेल्या अहवालानुसार एक मोठी व्हॅक्युम गाडी व एक लहान गलीमॅन ट्रॅक्टर व्हॅक्युम गाडी नविन घेणेसाठी सन २०१४-२०१५ च्या अंदाजपत्रकात रु.१ कोटी रुपयांची तरतूद प्रस्तावित करुन सदर वाहने खरेदी करणेसाठी अंदाजे ६० लाख रुपये खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत असून वाहने खरेदीबाबतची कार्यवाही स्टोअर विभागामार्फत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक :- ५** अग्नीशमन विभागासाठी दोन नवीन अद्ययावत अग्नीशमन वाहने,अग्नीशमन साहित्य सामुग्री खरेदी करणेसाठी रुपये ७३,१२६४८/-मात्रचा निधी अग्निशमन सेवांचे बळकटीकरण करणे तथा महाराष्ट्र अग्नीसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) योजनेअंतर्गत मिळणेसाठी म. जिल्हाधिकारी सो. धुळे यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५ दिनांक २८/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपा अग्निशमन विभागाकडे सद्यास्थितीत एकुण 4 अग्निशमन वाहने असुन त्यापैकी दोन वाहने नवीन व दोन वाहने जुनी आहेत. धुळे शहराचा वाढता विस्तार व लोकसंख्या पहाता अथवा लक्षात घेता अग्निशमन विभागासाठी दोन नवीन अद्यावयात अग्निशमन वाहने, अग्निशमन साहित्य सामुग्री खरेदी करणे आवश्यक आहे.

सदर दोन अद्यावयात अग्निशमन वाहने तयार करुन घेणेसाठी डायरेक्टर ऑफ महाराष्ट्र फायर सर्व्हिसेस सांताक्रुस (ईस्ट) मुंबई 98 दि. 31 मे 2013 च्या पत्रानुसार DGS

& D नवी दिल्ली यांनी M/s. Tata Motor Ltd, Mumbai. यांचेकडे चेसीस खरेदी करण्यासाठी Heavy & medium chasis /Am-2/RC 15030000/ 072012/ 2012-2012/COAB/TATA/638 दि. 07/05/2013 अन्वये TATA MODEL LPT1613/42 WHEEL BASE TRUCK CHASIS WITH COWL 697 ENGINE BS III शासन दर करार करण्यात आला असुन, सदर चेचीस वर अद्यावत वाहन बांधणी करिता. मे.विजय फायर व्हेहिकल्स् ॲण्ड पंम्प लि. मुंबई व देवी फायर सव्हिसेस सोलापुर 6 यांचेशी दर करार करण्यात आला आहे.दोन अद्यावत अग्निशमन वाहनसाठी चेचीस खरेदी करणे व वाहन बांधणीसाठी ५७,२८,६४८.९० खर्च येणार आहे.

| अ.नं. | तपशील | शासन दर करारनुसार प्रती नग किंमत | नग | एकुण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | TATA MODEL LPT १६१३/४२ चेचीस खरेदी | ११,४९,३२४.४५ | २ | २२,९८,६४८.९० |
| 2 | अद्यावत वॉटर टेंडर बांधणी | १७,१५,०००.०० | २ | ३४,३०,०००.०० |
| | | एकूण | | ५७,२८,६४८.९० |

तसेच शहरात किंवा शहराबाहेर काही दुर्घटना झाल्यास त्या ठिकाणी जीवसंरक्षक काम करणेसाठी अग्निशमन साहित्य खरेदी करणेकामी एकुण १५,८४,०००/- रुपये खर्च येणार आहे. असे एकूण७३,१२,६४८/- खर्च येणार आहे.

| अ.नं. | तपशील | प्रति नग किंमत | नग | एकूण किंमत |
|---|---|---|---|---|
| 1 | फोम ब्रँच FB 10 X | १२,५००/- | २ | २५,०००/- |
| 2 | फ्लोटींग पंम्प | १,४५,०००/- | २ | २,९०,०००/- |
| 3 | पोर्टेबल फायर पंप | १,६०,०००/- | ३ | ४,८०,०००/- |
| 4 | गॅस कटींग मशीन | १९,५००/- | २ | ३९,०००/- |
| 5 | होजपाईप 63 m.m. | २५९.८२ | १९९७.५ मि. | ५,१९,०००/- |
| 6 | होज कप्लींग | १,५४०/- | १५० | २,३१,०००/- |
| | | | एकूण | १५,८४,०००/- |

तरी सदर २अग्निशमन वॉटर टेंडर वाहने व अग्निशमन साहित्य सामुग्री खरेदी करणेकरीता अग्निशमन सेवांचे बळकटी करण करणे तथा महाराष्ट्र अग्निसुरक्षा अभियान (जिल्हास्तर) योजने अंतर्गत ७३,१२,६४८/- रु. मात्रचा निधी मिळणेसाठी म.जिल्हाधिकारी सो.धुळे यांचेकडील प्रस्ताव पाठविणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक:- ६** मा.आयुक्त श्री.पठाण साो.यांनी अतिरिक्त आयुक्त श्री.के.व्ही.धनाड यांना प्रत्यावर्तीत केलेल्या अधिकारांना कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६ दिनांक २८/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा.आयुक्त श्री.पठाण साो.यांनी अतिरिक्त आयुक्त श्री.के.व्ही.धनाड यांना प्रत्यावर्तीत केलेल्या अधिकारांना कार्योत्तर मंजुरी देणेबाबतचा प्रस्ताव सभागृहासमोर आला असता उपस्थित सदस्यांनी त्यावर चर्चा केली चर्चेअंती अतिरिक्त आयुक्त श्री.धनाड साो. यांचेकडेस प्रत्यावर्तीत केलेल्या अधिकारांतर्गत संबंधित विभागातील

करण्यांत आलेल्या कामांबाबत संपूर्ण माहिती स्थायी समितीच्या सभेत देण्यांत यावी. तोपावेतो म.आयुक्त यांना प्रत्यावर्तीत केलेल्या अधिकारांना कार्योत्तर मंजुरी देणेबाबत अधिकार देणेचा विषय पुढील मिटींग पर्यत तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**शुक्रवार दिनांक २८ फेब्रुवारी २०१४**
**वेळः- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज शुक्रवार २८/२/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केलेकाका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री.साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ७ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ८ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ९ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| १० | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ११ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १२ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १३ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १४ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १५ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १६ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.व्ही. धनाड | आयुक्त तथा अतिरिक्त आयुक्त |
| २. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त ( कर) |
| ४. | श्री. बी.एम. नेरकर | मुख्य लेखा परीक्षक |
| ५. | सौ. हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ६. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा.आयुक्त |
| ७. | श्री. एस.बी.विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ८. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ९. | डॉ. श्री. महेश मोरे | वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. एन.पी. सोनार | प्र. जकात अधिक्षक |
| १२. | श्री.के.जी.सुडके | एल.बी. टी. अधिक्षक |
| १३. | श्री. एस.व्ही. बर्गे | आस्थापना प्रमुख |
| १४. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १५. | श्री. बी. एस. रनाळकर | वसुली अधिक्षक |
| १६. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १७. | श्री. सी. एम.उगले | ओव्हरसिअर |
| १८. | श्री.एस.एस. देवरे | पा.पु.अभियंता |
| १९. | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| २०. | श्री.एम. एस. जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| २१. | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २२. | श्री.आर.एस.बोरसे | अभिलेखापाल |
| २३. | श्री. तुषार वासुदेव ढाके | सहा.अग्नीशमन अधिकारी |

**विषय क्रमांक:- ०७** विशेष निधी अंतर्गत मंजूर अनुदानात ८० फूटी रस्ता डांबरीकरण,मजबूतीकरण करणे कामा ऐवजी ८० फूटी रस्ता येथे भूमिगत केबलसह दुतर्फा पथदिवे पोल उभारणी करुन LED पथदिवे बसविणे या कामाच्या स्वरुपातील बदलास मान्यता देणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७ दिनांक २८/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहरातील सुभाष पुतळा चौक ते रेल्वे स्टेशन पर्यतचा (८० फूटी रस्ता ) रस्त्याचे डांबरीकरण व मजबूतीकरण करणे या अंदाजपत्रकीय रक्कम रु.२ कोटी कामाचा प्रस्ताव शासनाकडे विशेष निधी अंतर्गत मंजुरीसाठी सादर होता.

उक्त प्रस्तावानुसार शासनाकडील शासन निर्णय क्रं.जीईएन-२०१३/प्र.क्रं.२९५/ नवि - १६ मंत्रालय मुंबई दि.२/१/२०१४ नुसार रक्कम रुपये ८१ लाख मात्र करिता मंजुरी प्राप्त आहे.

तथापि यापूर्वी प्रस्तावित अंदाजपत्रकात तांत्रिक फेरबदलामुळे वाढ झाली असून सदरचा खर्च प्रस्ताव रु.५कोटी आहे.व सदरचे काम नव्याने अन्य विशेष निधी अंतर्गत करण्यांत येत आहे.

यामुळे उक्त मंजुरीप्रमाणे रक्कम रुपये ८१ लाख मध्ये यापूर्वी प्रस्तावित केलेले ८० फूटी रस्ता डांबरीकरण व मजबूतीकरण करणेचे काम होणे शक्य नसल्याने या ऐवजी ८० फूटी रस्त्यावर नवीन पोलसह LED पथदिवे बसविणे (दुतर्फा) च्या कामाचा प्रस्ताव या निधी अंतर्गत प्रस्तावित करणेत येत आहे. सदर कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रुपये १,२२,६९,५८५/- मात्र असून सदर रकमेतून मंजूर अनुदान रुपये ८१ लाख मात्र वजा जाता उर्वरीत रक्कम रुपये४१,६९,५८५/-मात्र रक्कम मनपा निधीतून खर्च करणेस मान्यता देण्यांत येत असून उक्त प्रमाणे प्रस्तावित काम ८० फूटी रस्ता येथे दुतर्फा भूमिगत केबलसह पोल उभारणी करुन LED पथदिवे बसविणेकामासाठी उक्त शासन निर्णयानुसार मंजूर अनुदानातून खर्च होणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक:- ०८** महाराष्ट्र नगरोत्थान योजने अंतर्गत शिल्लक निधी ३.१२ कोटी रुपये व मनपा हिस्सा ३.१२ कोटी रुपये अशा ६.२४ कोटी रुपये निधीतून कामे निश्चित करणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८ दिनांक २८/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका हद्दीत महत्वाचे रस्ते,गटारीचे कामे प्रलंबीत आहे.या अगोदर महानगरपालिकेमार्फत रु.२८८ लक्ष मात्रची कामे प्रशासकीय मंजुरीसाठी प्रस्ताव म.जिल्हाधिकारी साो.यांचेकडेस प्रशासकीय मंजुरीसाठी सादर केले आहे. प्रशासकीय मंजुरी अप्राप्त आहे.

धुळे शहराचा वाढता विस्तार लक्षांत घेता स्थायी समिती समोर सादर झालेल्या विषयानुसार नमूद रकमेत शहरातील मुख्य कामे होऊ शकणार नाही. त्यामुळे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत अनुदान मागणी बाबत प्रस्ताव शासनाकडेस सादर करणे आवश्यक आहे.

यापूर्वी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत यापूर्वी रु.२३,१४,४४,८६०/- मात्रची खालील १ ते १४ कामे शासनाकडेस मान्यतेसाठी सादर करण्यांत आलेली आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | सुभाषनगर जुने धुळे गांवठाण भागात भुमीगत गटार करणे. | ४००,००,०००/- |
| २ | वाडी भोकर रोड उत्तर मुखी मारुती मंदीर ते राम नगर म.न.पा हदद पावेतो रस्ता डांबरी करण करणे. | २,५८,८४,०३६/- |
| ३ | वाडीभोकर रोड पासुन डी. एस. अहिरे यांचे घरासमोरील रस्ता त्र्यंबकनगर पर्यंत रस्त्याचे दोन्ही बाजुस गटारी व रस्ता डांबरीकरण करणे. | ५४,०३,९६४/- |
| ४ | मुंबई आग्रा हायवे ते लक्ष्मी नगर पावेतो रस्ता WBM करणे. | २०५२६६७/- |
| ५ | श्री. हिरामण पाटील यांच्या घरापासुन ते डी. पी. रोड पावेतो साठ खोली भागातील रस्ता WBM करणे. | २१,४२,८३९/- |
| ६ | पारोळा रोड रामचंद्र नगर बोर्ड ते स्वामी नारायण सोसायटी पर्यंत रस्ता WBM करणे. | २९,५५,३०८/- |
| ७ | मालेगांव पाण्याची टाकी ते चाळीसगांव रोड पावेतो डी. पी. रस्ता डांबरीकरण करणे, | १,३९,८१,४२०/- |

| | | |
|---|---|---|
| | तसेच गटार व सी. डी. वर्क्स बांधणे. | |
| ८ | १०० फुटी रोड ने सुरत बायपास हायवे पावेता रस्ता डांबरीकरण व गटार करणे. | १,६७,३५,९५५/- |
| ९ | संतोषी माता मंदीर ते गणपती मंदीर पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे. | ४८,५१,९८०/- |
| १० | देवपुर भागात भरतनगर डी.पी. रोड ते गजानन बाबा मंदीर पावेतो डी. पी. रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करणे. | १,०१,२७,४६१/- |
| ११ | धुळे शहरांतील मुख्य रस्त्यावर (१ ते १६) एल.ई.डी. पथदिवे बसविणे. | ३,८१,८३,९८४/- |
| १२ | मालेगांव रोड ते चाळीसगांव रोड पावेतो रस्ता डांबरीकरण व गटार करणे. | १,५२,३०,७५९/- |
| १३ | चाळीसगांव रोड ते वडजाई रोड रस्ता डांबरीकरण व गटार करणे. | ४,३३,२४,५४२/- |
| १४ | मालेगांव पाण्याची टाकी ते बायपास हायवे पावेतो रस्ता डांबरीकरण व दोन्ही बाजुस गटार करणे. | १,०५,६९,९३९/ |
| | एकुण रक्कम रुपये | २३,१४,४४,८५४ |

उक्त १ ते १४ कामांव्यतिरिक्त खालील अ.नं.१ ते ४९ कामे शहराचा वाढता विस्तार लक्षांत घेता करणे आवश्यक आहे. यामध्ये धुळे शहरातील सर्व समावेशक कामे समाविष्ट करण्यांस व कामे निश्चिती बाबत मा.सभापती स्थायी समिती यांना अधिकार देण्यांत येत असून खालील कामे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत प्रस्तावित करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

| **अ.क्र.** | **कामाचे नांव** | **अंदाजपत्रकीय रक्कम** |
|---|---|---|
| १ | श्री. पवार ते पिंजारी यांचे घरापर्यत सर्व्हे नं.४०२ व ४०३ मध्ये रस्ता डांबरीकरण करणे व गटार करणे | रु.६३,१५,६०८/- |
| २ | शेलारवाडी ते राऊळवाडी रस्ता डांबरीकरण करणे | रु.२४,९३,२३५/- |
| ३ | जयभवानी चौक ते सप्तश्रृंगी माता मंदिर रस्ता डांबरीकरण करणे | रु.२४,७७,४९१/- |
| ४ | कोतवालनगर ते जयभवानी चौक रस्ता डांबरीकरण करणे | रु.२४,७७,४९१/- |
| ५ | बालाजीनगर ते कोतवालनगर रस्ता डांबरीकरण करणे | रु.२४,७७,४९१/- |
| ६ | राष्ट्रवादी भवन विशाल इस्टेट प्लॉट नं.१ ते १० पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत | रु.२४,७१,०३१/- |
| ७ | सप्तश्रृंगी माता मंदिर ते शाळा नं.२८ पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत | रु.२४,७७,४९१/- |
| ८ | भाईजीनगर, अण्णासाहेबनगर भागात पथदिवे उभारणे | रु.१९,५९,८३५/- |
| ९ | अण्णासाहेबनगर ते शाळा क्रं.२८ पावेतो पथदिवे उभारणे | रु,२२,०८,४०४/- |
| १० | निसर्गोपचार केंद्र ते पाटील टयुबलर पोल उभारणे | रु.१६,६९,४३६/- |
| ११ | प्र.क्र.५ डी.डी.सी.सी.बँक कॉलनी ते गणेशनगरपावेतो रस्ता डांबरीकरण करणे | रु.२४,९८,७८२/- |
| १२ | प्र.क्र.५ स.नं.७१/१ मधील खुल्या जागेत जॉगिंग ट्रॅक विकसीत करणे | रु.२१,७८,४६०/- |
| १३ | प्र.क्र.५ डी.डी.सी.सी.बँक कॉलनी ते गणेशनगर मख्य गटार पावेतो आरसीसी गटार बांधणे | रु.२४,७६,३००/- |
| १४ | प्र.क्र.६ सुयोग कॉलनी व क्षिरे कॉलनी गटारी बांधणे | रु.९,९४,९९५/- |
| १५ | प्र.क्र.६ मध्ये त्र्यंबकनगरमध्ये एम.एच.चौधरी ते श्री.पाटील व मयुर शाळेजवळ रस्ता डांबरीकरण करणे | रु.९,९६,८२८/- |
| १६ | राष्ट्रवादी भवन विशाल इस्टेट प्लॉट नं.२१ ते ३० पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२४,८३,७०३/- |
| १७ | प्र.क्र.६ मध्ये त्र्यंबकनगर मध्ये विविध ठिकाणी गटारी बांधणे. | रु.९,९६,८२८/- |
| १८ | प्र.क्र.६ मध्ये गितानगर स.नं. २०/१ मधील खुल्या जागेत वॉल कंपाऊंड बांधणे | रु.९,६७,९८७/- |
| १९ | स्वामी नारायण कॉलनी येथे ओपनस्पेसला पेव्हींग ब्लॉक बसविणे | रु.२४,३८,७४८/- |
| २० | स्वामीनारायण कॉलनी ओपनस्पेसमध्ये उद्यान विकसीत करणे | रु.१८,८५,०९९/- |
| २१ | राष्ट्रवादी भवन विशाल इस्टेट प्लॉट नं.३१ ते ४० पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२४,६४,६९५/- |
| २२ | वाखारकरनगर ओपनस्पेसला उद्यान विकसीत करणे | रु.१३,४१,८३२/- |

| | | |
|---|---|---|
| २३ | वाखारकरनगर भागातील ओपनस्पेला पेव्हींग ब्लॉक बसविणे | रु.२०,०६,८१७/- |
| २४ | राष्ट्रवादी भवन ते विशाल इस्टेटपावेतो गटार बांधणे | रु.२४,७७,६५५/- |
| २५ | नेहरुनगर भागात दवाखाना करणे | रु.६२,००,०००/- |
| २६ | विश्वकर्मानगर गणपतीमंदिर ओपनस्पेला वॉल कपाऊंड बांधणे | रु.१४,२७,३३५/- |
| २७ | माणिकनगर भागातील रस्ते डांबरीकरण करणे | रु.२४,९०,०३९/- |
| २८ | प्रभाग क्रं.२५नंदिरोड आझादनगर भागात रातराणी हॉटेलजवळ पेव्हिंग ब्लॉक बसविणे | रु.१०,००,०००/- |
| २९ | राष्ट्रवादी भवन विशाल इस्टेट प्लॉट नं.११ ते २० पावेतो रस्ता डांबरीकरण करणे. | रु.२४,७७,३६७/- |
| ३० | प्र.क्र.२५ गफुरनगर भागात रशिदभाई ते नाल्यापावेतो कॉंक्रीट रोड बनविणे | रु.९,९६,१५३/- |
| ३१ | प्र.क्र.२५ फिरदौसनगर मशिदजवळ पेव्हींग ब्लॉक बसविणे | रु.१०,००,०००/- |
| ३२ | प्र.क्र.२५ रज्जुभाई ते शेख यांचे घरापर्यंत रस्ता कॉंक्रीट करणे | रु.९,९६,१५३/- |
| ३३ | प्र.क्र.३२ स.नं.८३/२ अजबेनगर येथील बागेस वॉल कंपाऊंड करुन बगीचा करणे | रु.१०,७४,९१२/- |
| ३४ | प्र.क्र.३२ मधील जय मल्हारनगर भागात श्री.वाघ यांचे घरापासुन ते सोनवणे यांचे घरापावेतो एच.डी.पी.ई.पाईपलाईन टाकणे | रु.३,२२,६८५/- |
| ३५ | सुभाषनगर शनि मंदिराच्या वर वाचनालय बांधणे | रु. ९,९६,०७७/- |
| ३६ | पांझरा नदी किनारी संरक्षण भिंत बांधणे | रु.२४,७६,९३८/- |
| ३७ | चाळीसगांवरोड ते अपना बेकरी पावेतो कॉक्रीट गटार करणे | रु. १९,५१,७६३/- |
| ३८ | चाळीसगांवरोड ते अपना बेकरी पावेतो रस्ता डांबरीकरण करणे | रु. २४,७७,९४४/- |
| ३९ | जलगंगा सोसायटी भागात कॉक्रीट गटार करणे | रु. ६,२४,५६४/- |
| ४० | लिलाबाई चाळ भागात पाईप लाईन टाकणे | रु.५,२६,६२२/- |
| ४१ | वाडीभोकर रोड ते उत्तरमुखी मारोती मंदिराजवळ पुलाचे बांधकाम करणे | रु.१,१०,००,०००/- |
| ४२ | प्रभाग क्रं.२४ मध्ये गफूरनगर वडजाईरोड व हाजीनगर भागात स्लॅब कलर्व्हट बांधणे | रु.४५,६८,६८०/- |
| ४३ | सर्व्हे नं.१६२ मध्ये विरशैव लिंगायत समाज स्मशान भूमी येथे वॉचमन रुम व शेड बांधणे | रु.९,१९,४५१/- |
| ४४ | वॉर्ड क्रं.१२ गंगाधर बोडके ते प्रमोद पंचभाई यांचे घरापर्यत गटार व कॉक्रीट रोड करणे | रु. ९,३४,९१२/- |
| ४५ | शितल कॉलनी भागातील ओपन स्पेसला कपौंड वॉल व गार्डन करणे | रु. ६८,७४,९४७/- |
| ४६ | पारोळारोड ते अरिहंत भुवन पावेतो डी.पी.रोडला पथदिवे व्यवस्था करणे | रु. २४,९३,८९४/- |
| ४७ | हिरामण पाटील ते साईबाबा मंदिर पावेतो पथदिवे व्यवस्था करणे | रु. १४,९४,९१४/- |
| ४८ | स्वामी नारायण सोसायटी येथील गार्डनला विद्युतीकरण करणे | रु.१२,६५,०००/- |
| ४९ | चाळीसगांवरोड ते नॅशनल हायस्कूल पावेतो पथदिवे व्यवस्था करणे | रु. १३,५५,५३५/- |
| | एकुण रक्कम रुपये | ११,११,८२,१२७/- |

यापूर्वी शासनाकडेस मान्यतेसाठी सादर झालेली १ ते १४ कामे व नव्याने सादर करावयाचे १ ते ४९ कामे अशा एकुण ३४,२६,२६,९८१/- या रक्कमेचा प्रस्ताव महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत शासनाकडेस सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.यांत शासन निधी ५०% उपलब्ध होणार असून व मनपा हिस्सा तथा लोकवर्गणी ५० टक्के अदा करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**मा. आयुक्त सो. यांना असलेल्या अधिकारानुसार तांतडीने आलेला विषय**

**विषय क्रमांकः- ९ सुलभ शौचालय बाबत निर्णय घेणे.**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९ दिनांक २८/२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे शहरातील एकुण सुलभ शौचालय खालील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्या प्रमाणे एकुण युनिट साफ सफाई व देखभाल दुरुस्ती साठी खालील दराने देण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | सीट | साफसफाई | लाईट बिल | एकुण |
|---|---|---|---|---|
| १. | १० | ५५२० | १६८० | ७२००/- |
| २. | २० | ५६४० | ३३६० | ९०००/- |
| ३. | ३० | १०८६० | ५०४० | १५९००/- |

| अ.क्र. | संस्थेचे नांव | एकुण युनिट |
|---|---|---|
| १. | सेवा फाऊंडेशन, पुणे | ५४ |
| २. | जनकल्याण फाऊंडेशन, पुणे | ०३ |
| ३. | आस्था स्वयं.रोज. सेवा सह संस्था | २३ |
| ४. | आस्था स्वयं.महिला बचत गट | ०६ |
| ५. | मुस्लीम मेहतर एकता स.संस्था | १४ |
| ६. | अल्पसंख्यांक सफाई कामगार सेवा संस्था | ११ |
| ७. | उज्वल एज्यु.वेल्फेअर संस्था | ०४ |
| ८. | आदर्श अल्पसंख्यांक शैक्ष.सामा.संस्था | ०३ |
| ९. | स्व.गोपालजी बेरोजगार सह.संस्था | ०४ |
| १०. | लक्ष विकास बेरोजगार स्वयं.रोज.संस्था | ११ |
| | एकुण :- | १३३ |

या व्यतिरिक्तउक्त प्रभातनगर देवपुर येथे एक युनिट बांधुन तयार असुन वरिल पैकी दोन युनिट स्थानिक नागरिकांची तक्रार व दुरुस्ती मुळे बंद आहे.

सेवा फाऊंडेशन व जनकल्याण यांना २७ वर्षे कराराने देण्यात आलेले असुन त्यांचे काम पहाता चांगल्या प्रतीचे व त्यांच्या बाबत सन्मा.नगरसेवक व नागरीकांची तक्रारक्वचितच येत असते. तसेच सदर संस्था किरकोळ दुरुस्ती काही तांत्रिक अडचणी ते स्वतः करुन घेतात व ते सक्षम आहे.त्यामुळे त्यांना पुर्वी पासुन २७ वर्षे कराराने देण्यात आलेले आहे.उर्वरीत संस्था यांना सुरुवातीला एक वर्षे व कामाचे स्वरुप पाहुन ७ वर्षे कराराने देण्यात आलेले आहे.त्यांची मुदत संपण्यात आली आहे.

वरील संदर्भिय मिटींगमध्ये मा.महापौर सो.यांनी सुलभ शौचालय साफ सफाई व देखभाल दुरुस्तीसाठी टेंडर काढुन नविन ठेकेदार नेमणेबाबत निर्देश दिलेले आहे. या बाबत पुढील कार्यवाही करणेकामी सदर संस्थांना मे.स्थायी समिती यांच्या मान्यतेने काम देण्यात आले आहे.त्यांना देण्यात आलेला ठेका रद्द करुन नविन ठेकेदाराची नेमणुक करण्याची कार्यवाही करता येऊ शकते.सदरचा विषय हा धोरणात्मक असल्यामुळे सेवा फाऊंडेशन व जनकल्याण फाऊंडेशन यांचेकडे असलेले युनिट कायम ठेवुन उर्वरीत संस्थेकडे असलेले युनिटचा ठेका रद्द करुन नव्याने निविदा काढावी किंवा कसे काय याबाबत प्रस्ताव निर्णयासाठी आला असता त्यावर चर्चा होऊन ज्या प्रभागातील शौचालयांच्या देखभाल दुरुस्ती बाबत नागरीक/नगरसेवकांच्या ठेकेदारा विषयी तक्रारी असतील अशा संबंधित ठेकेदाराला सस्पेंड करुन नवीन ठेकेदारांची नेमणूक करण्यांसाठी नवीन टेंडर काढावे. तसेच संबंधित ठेकेदारांकडून चुका झालेल्या आहे.त्यांचे बिलामधून दंडात्मक रक्कम कपात करावी.

तसेच सन्मा.सदस्य श्री.फिरोज शेख यांच्या प्रभागातील सार्वजिक शौचालय देखभाल दुरुस्तीबाबत तक्रार असल्याने त्यांनी सदर शौचालय सेवा फाऊंडेशन यांना देखभाल दुरुस्तीसाठी देण्याबाबत मागणी केलेली आहे. याबाबत मा.आरोग्याधिकारी यांनी नियमाप्रमाणे सदर संस्थेस शौचालय देखभाल दुरुस्तीसाठी देण्याबाबत कार्यवाही करावी.

तसेच मनपा मार्फत देयके अदा करतांना आवश्यक तो अग्रक्रम ठरविणेसाठी त्रिसदस्यीय समिती गठीत करणेस मान्यता देण्यांत येत आहे.या समितीत मा. महापौर, स्थायी समिती सभापती व आयुक्त यांचा समावेश राहील. या समिती मार्फत मनपा देयकांबाबत निर्णय घेण्यांत येईल.

तसेच शहरातील अनाधिकृत होर्डीगज व बॅनर याबाबत कठोर कार्यवाही होणे आवश्यक असल्याने महासभेच्या ठरावानुसार व मे.उच्च न्यायालयांच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**मंगळवार दिनांक ६ मे, २०१४**
**वेळः- सकाळी १०-३० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज मंगळवार ६/५/२०१४ रोजी सकाळी १०-३० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती,स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ७ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ८ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ९ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १० | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ११ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १२ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १३ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १४ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त ( कर) |
| २. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | सौ. हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ४. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ५. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ६. | श्री. कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८. | डॉ. श्री. महेश मोरे | वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १०. | श्री.के.जी.सुडके | एल.बी. टी. अधिक्षक |
| ११. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १२. | श्री. बी. एस. रनाळकर | वसुली अधिक्षक |
| १३. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री.एस.एस. देवरे | पा.पु.अभियंता |
| १६. | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १७. | श्री.आर.एस.बोरसे | अभिलेखापाल |
| १८. | श्री. तुषार वासुदेव ढाके | सहा.अग्नीशमन अधिकारी |
| १९ | श्री. सी.एम. उगले | पा. पु. ओव्हरसिअर |

विषय क्रमांकः- १० शासनाच्या बीआरजीएफ योजनेअंतर्गत भाईजीनगर ते चितोडरोड अमरधाम पावेतोच्या नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे कामाच्या दरांस मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १० दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपा हद्दीत शासनाच्या बी.आर.जी.एफ. योजनेअंतर्गत भाईजीनगर ते चितोडरोड अमरधाम पावेतोच्या नाल्यावर संरक्षण भिंत बांधणे कामाचा खर्च रु.१,४५,१०,०७२/- मात्रला म.जिल्हाधिकारी सो. धुळे यांचे आदेश क्रं.१२/क /कक्ष/५/नपाप्र /कावि/१५८ दि.२१/२/२०१३ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आलेली असून त्यानुसार सदरचे काम करणे कामी दि. २/१०/२०१३ रोजीच्या दै. पथयात्री व गांवकरी या स्थनिक वृत्तपत्रात जाहिर ई निविदा प्रसिध्द केली असता मुदतीत दि. १२/११/२०१३ रोजी पावेतो खालील प्रमाणे निविदा प्राप्त झाले असून त्यांचे दर दर्शविलेले आहे.

१) मे. भूमी कन्स्ट्रक्शन कंपनी, तळोदा यांचे शे. ११.५२% कमीने

२) मे. राधेय कन्स्ट्रक्शन कंपनी धुळे यांचे शे. ११.२१% कमीने

३) श्री. एस.बी. देशमुख, धुळे यांचे शे. ११.११% कमीने

४) श्री. डी.बी. शेवाळे, मनमाड यांचे शे. ७.५० %कमीने

तरी वरील प्रमाणे १ ते ४ निविदा धारकांनी निविदेत भाग घेतला असून त्यात सर्वात कमी दर मे.भूमी कन्स्ट्रक्शन कंपनी, तळोदा यांचे शे.११.५२% कमीने हे आलेले आहे.

उक्त प्रमाणे अहवालानुसार सर्वात कमी आलेले मे.भूमी कन्स्ट्रक्शन, तळोदा यांचे शे. ११.५२% कमीने या दरांस मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ११ विशेष निधी अंतर्गत नटराज टॉकीज ते म्हसोबा मंदिरपावेतो रस्ता डांबरीकरण करणे बाबत ई-निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत नटराज टॉकीज ते म्हसोबा मंदिरपावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत म.विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग जा.क्रं. २९७८ दि. ४/३/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ४७,८५,१९४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत म.जी.पा. धुळे/ म.जि. प्रा. मंडळ जळगांव/ मा. शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्रंत्र ५७२ दि. १५/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ४७,८५,१९४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ईनिविदा/५६ अन्वये निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. समर्थ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | सुंदर माधव कन्स्ट्रक्शन | शे. ४ % जास्तीने | |
| ३ | श्री. व्ही.आर. पवार | शे.७ % जास्तीने | |

ठेकेदार श्री /मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार कंत्राटदार श्री./मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- १२ नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन२०१३-१४या वर्षात जुना वार्ड क्रं.३५येथील टी.व्ही. सेंटरचा पाठीमागील भागात रस्ता डांबरीकरण करणेबाबत ई निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन २०१३-१४या वर्षात जुना वार्ड क्रं. ३५ येथील टी. व्ही.सेंटरचा पाठीमागील भागात रस्ता डांबरीकरण करणेबाबत म.जिल्हाधिकारी धुळे कक्ष-५/ नपाप्र/कावि९१ दि.३/२/२०१४अन्वये उक्त

कामाबाबत रक्कम रुपये ४५,६२,५२२/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत /म.जि.प्रा मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं ५९१ दि. २८/१०/२०१३ अन्वये रक्कम रुपये ४५,६२,५२२/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ईनिविदा/५३ दिनांक १२/२/२०१४अन्वये दिनांक१३/२/२०१४रोजीचे दैनिक पथयात्री / देशदुत या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक२१/३/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कन्स्ट्रक्शन | शे.५% जास्तीने | |
| २ | मे. ईश्वरी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| ३ | मे. समीर एंटरप्राईजेस | शे.७% जास्तीने | |

ठेकेदार मे.ईश्वरी कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार कंत्राटदार मे.ईश्वरी कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-१३ नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन२०१३-१४ या वर्षात नारायण मास्तर चाळ अशोकनगर भागातील रस्ते डांबरीकरण करणेबाबत ई-निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात नारायण मास्तर चाळ अशोकनगर भागातील रस्ते डांबरीकरण करणेबाबत म.जिल्हाधिकारी धुळे कक्ष-५/ नपाप्र/ कावि१५ दि.२२/१/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये२४,९६,९६७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत म.शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्रं ४८ दि.११/१०/२०१३ अन्वये रक्कम रुपये२४,९६,९६७/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ईनिविदा / ५३ दिनांक १२/२/२०१४अन्वये दिनांक १३/२/२०१४ रोजीचे दैनिक पथयात्री/देशदुत या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक २१/३/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.समर्थ कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | मे.राधेय कन्स्ट्रक्शन | शे.४% जास्तीने | |
| ३ | श्री. एच.व्ही. पाटील | शे.२% जास्तीने | |

ठेकेदार मे.समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार कंत्राटदार मे.समर्थ कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- १४ नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात विद्यावर्धिनी कॉलेज ते मोतीनाला पावेतो रिटेनींग वॉल बांधणे ई-निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात विद्यावर्धिनी कॉलेज ते मोतीनाला पावेतो नाल्यास रिटेनींग वॉल बांधणे कामाबाबत म.जिल्हाधिकारी धुळे कक्ष-५/नपाप्र/कावि९१ दि.३/२/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ५४,००,०००/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत /म.जि.प्रा मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं ५८८ दि. २८/१०/२०१३ अन्वये रक्कम रुपये ५७,०४,५६३/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ईनिविदा/५३ दिनांक १२/२/२०१४ अन्वये दिनांक १३/२/२०१४ रोजीचे दैनिक पथयात्री / देशदुत या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक२१/३/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.समीर एंटरप्राईजेस | शे.७% जास्तीने | |
| २ | मे. गायत्री कन्स्ट्रक्शन | शे.५% जास्तीने | |
| ३ | मे. ईश्वरी कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |

ठेकेदार मे. ईश्वरी कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार मे. ईश्वरी कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-१५ नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन २०१३-१४ या वर्षात देवपूर रमाबाई आंबेडकर नगर मध्ये रस्ता डांबरीकरण करणेबाबत ई-निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नागरी दलित वस्ती योजने अंतर्गत सन२०१३-१४ या वर्षात देवपूर रमाबाई आंबेडकर नगर मध्ये रस्ता डांबरीकरण करणेबाबत रक्कम रुपये ११,२०,५६४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत /म. शहर अभियंता, मनपा धुळे यांचे पत्र क्रं ४७ दि.३१/१/२०१४ अन्वये रक्कम रुपये ११,२०,५६४/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ईनिविदा/५३ दिनांक १२/२/२०१४ अन्वये दिनांक१३/२/२०१४रोजीचे दैनिक पथयात्री / देशदुत या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक २१/३/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. कृष्णा एंटरप्राईजेस | अंदाजपत्रकीय दराने | |
| २ | मे.समीर एंटरपाईजेस | शे.७ % जास्तीने | |
| ३ | कमलेश पाटील | शे. ५% जास्तीने | |

ठेकेदार मे. कृष्णा एंटरप्राईजेस यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार मे.कृष्णा एंटरप्राईजेस यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- १६ विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा शाळा क्रं. १ येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधणेकामासाठी ई-निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा शाळा क्रं.१ येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधणे कामाबाबत धुळे मनपा ठराव क्रं.२१ दि.३१/१/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये१०,६७,२८,९१२/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत पी.डब्ल्यू विभाग नाशिक यांचे पत्र क्रं १७६० दि.२८/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये १०,८७,२८,९१०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ईनिविदा/५७ दिनांक २६/२/२०१४ अन्वये दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक ५/४/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. बाळासाहेब आर. भदाणे | शे. १२.१२% जास्तीने | |
| २ | श्री. अे.बी. वाघ | शे. ९.९० %जास्तीने | |
| | मे. हर्ष कन्स्ट्रशन | शे.१५.१५ % जास्तीने | |

ठेकेदार श्री.अे.बी.वाघ दर शेकडा ९.९०% जास्तीने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार श्री.अे.बी.वाघ यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.९० टक्के जास्तीने आलेले निविदा दराचे संदर्भात संबंधित ठेकेदार यांना निगोसिएशनसाठी बोलविणेत आले असता ठेकेदार श्री. अे. बी. वाघ यांनी वाटाघाटीत शेकडा ३ % जादा दराने काम करणेबाबत लेखी पत्र दिलेले आहे.

उक्त अहवालानुसार व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर कामासाठी निगोसिएशन अंती शेकडा ३% जादाने निविदा दर प्राप्त झालेले आहे. तथापि सदरचे दर हे जास्तीचे वाटत असल्याने याकामी संबंधित ठेकेदार यांना पुनश्च निगोसिएशनसाठी बोलविण्यांत यावे. व निगोसिएशन अंती सदर प्रस्ताव निर्णयासाठी मे. स्थायी समितीपुढे फेर सादर करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांकः-१७ | नगरोत्थान योजनेअंतर्गत जुना वॉर्ड क्रं.४५ मधील अरिहंत भुवन ते १०० फूटी जुना वडजाई रोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत ई निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे. |
| म. फिरोज शेख | नगरोत्थान अंतर्गत तिन्ही वॉर्डाचे एकच पत्र दिले होते.माजी सभापती श्री.खोपडे यांचे घराजवळून त्या कामामधून आम्हाला डावलणेत आले आहे. आम्ही अल्पसंख्याक आहे म्हणून आमचे काम घेण्यांत आले नाही. |
| म. अभियंता | मनपा ठरावानुसार कामे घेण्यांत येत असतात. |
| म. फिरोज शेख | २०११ ला पत्र दिले आहे तिघांचे काम आहे. १ कोटी ३६ लाखाचे काम ते सगळे एकत्र करायला पाहिजे होते. अल्पसंख्याक म्हणून डावलणेत आले आहे. १ कोटी ३६ लाखाचे एस्टीमेट होते. आणि ते न करता २ ,२५,००,००० रुपये एकाला का दिले आहे. तो कट केला आहे. |
| म. अभियंता | आपल्या कामाची म. जिल्हाधिकारी यांचेकडेस शिफारस केली आहे. |
| म. फिरोज शेख | कलेक्टर साहेबांची मंजुरी आहे मग का ते काम केले नाही. |
| म. सभापती | कामाचा प्रस्ताव फायनल मंजूरीला गेला आहे. |
| म. फिरोज शेख | त्यामध्ये हे काम घ्यायला पाहिजे होते अडचण काय आहे अल्पसंख्याक असल्याने आमच्या प्रभागावर अन्याय होत आहे.लोकांनी आम्हाला निवडून दिले आहे. आम्हाला आमच्या कामामधून वगळले आहे. बाजूच्या वाडात काम होते आमच्या वॉर्डात होत नाही. लोक आम्हाला बोलतात. सगळया कामाबरोबर आमच्या कामांची मंजुरी आहे. मग असे अचानक काम का वगळले आहे. |
| म. सभापती | आपले दोन कामे मंजूर झाली आहे. शासनाकडून मान्यता मिळाल्यानंतर काम होईल. |
| म. फिरोज शेख | आमचे काम कमी झाले आहे दुस-या बाजूला एकच नगरसेवकाला २.२५ कोटी रुपये काम देत आहे. |
| म. सभापती | माझ्या माहितीप्रमाणे तीन टप्पे झाले आहे. एकाच नगरसेवकाला सर्व काम दिले आहे असे आपले म्हणणे बरोबर नाही जे काम दिले आहे त्यामधून डी. पी. रोड चे काम होणार आहे. आणि ते शहराच्या दृष्टीने महत्वाचे आहे. कामे ही टप्याटप्याने होत आहे. |
| म. फिरोज शेख | सर्वाचे एस्टीमेट बरोबर केले आहे आणि आमचे काम वगळून टाकले आहे हा अन्याय आहे. |
| म. अभियंता | सभेमध्ये धोरणात्मक निर्णय घेण्यांत येतात कोणते काम करावयाचे कोणते नाही ठरावाच्या अनुषंगाने आम्ही त्यांची अंमलबजावणी करीत असतो. जिल्हा लेव्हलला त्यांची मंजुरी असेल राज्य लेव्हलला त्यांची मंजुरी असेल त्याप्रमाणे ठरावानुसार कार्यवाही करीत असतो. |
| म. सभापती | १ कोटी ५३ लाखामध्ये आपले काम घेतले आहे. नगरोत्थान मध्ये आपले काम आहे. हे स्थानिक कलेक्टर यांचे लेव्हल मध्ये विषय आला आहे तेथे लिमीट संपले आहे राज्य शासनाकडून मंजुरी मिळणे अपेक्षित आहे ते मंजूर झाल्यानंतर काम होईल. |
| म. फिरोज शेख | ५ कोटी रुपयांचा निधी शासनाकडून केव्हा येणार आहे. पुढे दोन महिन्यानंतर परत विधानसभेची आचारसंहिता लागणार आहे. मग हे काम केव्हा होणार आहे. सदर कामामध्ये |

| | |
|---|---|
| | कोणाचा दबाव आहे का? आमचे काम वगळले हे चूकीचे आहे २ कोटी रुपयांमध्ये २० नगरसेवकांचे वॉर्डातील कामे झाली असती. |
| म. सभापती | सदरचा डी.पी. रोड होता तो सर्वासाठी सोयीचा आहे. |
| म. फिरोज शेख | एस्टीमेट रेटपेक्षा कमीने काम देणेत यावे तो ठरावानुसार तिन्ही रोड एकत्र करावे आणि आम्ही दिलेल्या पत्रानुसार काम करावे. |
| म. सभापती | आपले म्हणणे नुसार जर काम केले तर आपले अनुदान परत जाईल. |
| म. फिरोज शेख | आपण एक समान का करीत नाही. |
| म. सभापती | आपले म्हणणे नुसार करावयाचे तर हा विषय तहकूब करावयाचा का? |
| म. फिरोज शेख | आमचा विषय वगळला आहे.आमच्यावर अन्याय होत आहे. एकाच वेळी विषय मंजूर आहे. |
| म. सभापती | मागे टीृएस.झालेले नसतांना त्या कामाची रिस्क घेतली आणि त्यामुळे पेपरबाजी झाली. सन्मा.सदस्यांच्या सहमतीने विषय पत्रिकेवरील सदर विषय मंजूर करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नगरोत्थान योजने अंतर्गत जुना वॉर्ड क्रं.४५ मधील अरिहंत भुवन ते १०० फूटी जुना वडजाईरोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठवराव ६६ दि.२४/९/२०१३ अन्वयें रक्कम रुपये १,००,००,०००/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत म.जि. प्रा मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं ३८१ दि. ३/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ९९,९३,१५५/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ई निविदा/६६ दिनांक ४/३ /२०१४ अन्वये दैनिक खान्देश खबर /आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक १७ /४/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. समर्थ कन्स्ट्रक्शन | शें. ३% जास्तीने | |
| २ | सुंदर माधव कन्स्ट्रक्शन | शे. ४ % जास्तीने | |
| ३ | श्री. व्ही.आर. पवार | शे.७ % जास्तीने | |

ठेकेदार मे. समर्थ कन्स्ट्रशन यांचे दर शेकडा ३% जास्तीने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

कंत्राटदार मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराप्रमाणे ३% जास्तीने आलेले निविदा दराचे संदर्भात संबंधित ठेकेदार यांना निगोसिएशन साठी बोलविणेतआले असता सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेकामी तयार असल्याचे मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांनी लेखीपत्र सादर केलेले आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार निगोसिएशन अंती कंत्राटदार मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराप्रमाणे आलेले दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| विषय क्रमांकः- १८ | नगरोत्थान योजने अंतर्गत जुना वॉर्ड क्रं.४५ मधील रामचंद्र नगर ते अरिहंत भुवन पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत ई निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नगरोत्थान योजने अंतर्गत जुना वॉर्ड क्रं.४५ मधील रामचंद्र नगर ते अरिहंत भुवन पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत धुळे मनपा स्थायी समिती ठवराव ६६ दि.२४/९/२०१३ अन्वयें रक्कम रुपये १,०४,३१,१३७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत म.जि. प्रा मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं ३८१ दि. ३/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये १,०४,३०,९९६/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ई निविदा/६६ दिनांक ४/३ /२०१४ अन्वये दैनिक खान्देश खबर / आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक १७/४/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. समर्थ कन्स्ट्रक्शन | शें. ३% जास्तीने | |
| २ | सुंदर माधव कन्स्ट्रक्शन | शे. ४ % जास्तीने | |
| ३ | श्री. व्ही.आर. पवार | शे.७ % जास्तीने | |

ठेकेदार मे. समर्थ कन्स्ट्रशन यांचे दर शेकडा ३% जास्तीने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

कंत्राटदार मे.समर्थ कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराप्रमाणा ३% जास्तीने आलेले निविदा दराचे संदर्भात संबंधित ठेकेदार यांना निगोसिएशन साठी बोलविणेतआले असता सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणेकामी तयार असल्याचे मे.समर्थ कन्स्ट्रक्शन यांनी लेखीपत्र सादर केलेले आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार निगोसिएशन अंती कंत्राटदार मे. समर्थ कन्स्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराप्रमाणे आलेले दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- १९ — विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा अंतर्गत देवपूर अमरधाम विकसीत करणेकामी ई निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नरेंद्र परदेशी — टिपणीमध्ये धुळे मनपा ठराव असा आहे की, त्यामध्ये तीन अमरधाम आहे देवपूर येथील अमरधामसाठी आता पर्यत जेवढा निधी मिळाला तो देवपूर अमरधाम आहे. देवपूर येथील अमरधामसाठी आतापर्यत जेवढा निधी मिळाला आहे तो देवपूर अमरधामसाठीच आहे आता त्यावर १ कोटी रुपये खर्च होत आहे. परंतु ५० वर्षापासून कुमारनगर भागातील अमरधामचे कुठलेही काम झालेले नाही. महासभेमध्ये झालेल्या ठरावाचा अवमान आहे असे का झाले आहे या विषयाला मान्यता देऊ नका. अधिका-यांना विचारणा करा. महासभेच्या ठरावाला किंमत नाही का?

म. कुमार डियालानी — देवपूर अमरधामसाठी ५० लाख रुपये खर्च होत आहे. कुमारनगर अमरधामचेही काम करणेत यावे.

म. नरेंद्र परदेशी — कुमारनगर अमरधामसाठी काहीही खर्च झाला नाही हा सार्वजनिक विषय आहे.

म. सभापती — कुमारनगर अमरधामचे ४४ लाखाचे एस्टीमेट आहे. पुढील मिटींग मध्ये विषय येईल. आपल्याला ११० टेंडर काढावयाचे आहे. आपण सर्व कामे एकत्र करायला गेलो तर पुढे

आचारसंहिता लागून जाईल.पुढील वेळी विभागाकडून विषय आल्यानंतर अजेंडयावर घेण्यांत येईल. अजेंडयावरील विषयांस कार्यालयीन अहवालानुसार मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा अंतर्गत देवपूरअमरधाम विकसीत करणेकामी धुळे मनपा ठराव क्रं.२१ दि.३१/१/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये १,४६,४१,१०३/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत पी.डब्ल्यू विभाग नाशिक यांचे पत्र क्रं ६१४ दि.१/३/२०१४ अन्वये रक्कम रुपये १,०५,२५,७८७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ईनिविदा५७ दिनांक २६/ २ /२०१४अन्वये दैनिक दिव्य मराठी या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक ५/४/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. सुंदर माधव कंन्स्टक्शन | शे. १२.०% जास्तीने | |
| २ | मे. गायत्री कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |
| | मे. समीर एंटरप्राईजेस | शे.७.० % जास्तीने | |

ठेकेदार मे. गायत्री कन्स्ट्रक्शनयांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार कंत्राटदार मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- २० धुळे मनपा मार्फत भाजी मंडईसाठी संपादन केलेल्या वलवाडी स.नं.७३/१ मध्ये बांधकामासाठी आर्किटेक्ट यांचेकडून स्पर्धात्मक दृष्टीकोनातून आराखडे मागविणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २० दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा. श्री. चंद्रकांत का. केले सभापती स्थायी समिती यांचे दिनांक ३०/४/२०१४ चे यादीनुसार धुळे मनपातर्फे मंजूर विकास योजनेतील नवीन आरक्षण क्रं.५०अन्वये स.नं. ७३/१ मधील सुमारे ४७ आर. जागा भाजी मंडईसाठी आरक्षित होती. सदर जागा धुळे मनपातर्फे संपादन करण्यांत आली आहे. जागा बखळ स्वरुपात पडलेली आहे.

उक्त जागा ही संपूर्ण रहिवास विभाग परिसरात असून आजूबाजूस सुमारे १०० ते १२५ कॉलन्या विकसीत झाल्या असून त्या परिसरात सुमारे ५०,००० लोकसंख्या आहे.

उक्त जागेवर मनपतर्फे भाजीपाला मंडई बाधल्यास मनपाच्या उत्पन्नात भर पडणार आहे. सदर भागातील विस्तार लक्षात घेता सुसज्ज अशा स्वरुपाची भाजी मंडई पार्कीग सुविधा, वातानुकुलीत भांडार तसेच अन्य कार्यालय व व्यापारी गाळयांसाठी जागा अशा इत्यादी बाबतचा समावेश करुन नाविन्यपूर्ण वास्तु उभारावयाची असल्याने व त्यापासून महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न उपलब्ध होणार असल्याने सदर जागेवर भाजी मंडई

बांधकामासाठी अद्ययावत नकाशे तयार करण्यासाठी वास्तुतज्ञ यांचेकडून स्पर्धात्मक स्वरुपात आराखडे मागविणेसाठी मंजुरी देण्यांत येत आहे. आलेल्या आराखडयामधून मनपाच्या हिताच्या दृष्टीने परिपूर्ण असलेल्या आराखडयास मान्यता देऊन त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.नगरसेवक श्री.नरेंद्र परदेशी यांनी मांडलेल्या उपसुचनेनुसार कुमारनगर येथील कब्रस्थान लगतच्या जागेबाबत प्रशासनामार्फत शहानिशा करुन त्याठिकाणी भाजी मंडईच्या प्रस्तावाबाबत कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-२१ डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्र येथील क्लोरीन टनर मधून गॅस लिकेज झाल्यामुळे चार शेतक-यांचे पिकाचे नुकसान झालेले आहे.त्याबाबत तालुका कृषी अधिकारी धुळे यांचे अहवालानुसार नुकसान ग्रस्त शेतक-यांना नुकसान भरपाई देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे दिनांक २०/३/२०१४ रोजी दुपारी ४-३० वाजता डेडरगांव जलशुध्दीकरण केंद्र येथील क्लोरीन गॅस टरनचा अचानक गळती होत असल्याचे एस.बी.चौधरी,गाळणी निरीक्षक यांनी सदर जलशुध्दीकरण केंद्रावरील विभागप्रमुख श्री.सी.सी.बागुल यांना फोनवरुन गळती झाल्याबाबतचा निरोप दिला.त्यानंतर केमीस्ट श्री.एस.टी.पाटील व शाखा अभियंता श्री.एस.एस.देवरे यांनाही फोनवरुन सदर गळतीबाबत कळविले.त्यानुसार श्री.देवरे व श्री.एस.टी.पाटील यांनी तातडीने फायर फायटर वाहन व आपतकालीन टिम घेवून सदर ठिकाणी जावून तातडीने सदरची गॅस गळती बंद केली.तसेच यदिनांक २१/३/२०४ रोजी क्रेन, फायर फायटर वाहन,जलपरी होस पाईप इ.घेवून होस पाईप लावून जलशुध्दीकरण केंद्र येथील लाईम टॅक पाण्याने भरुन क्रेन द्वारे सदरचे क्लोरीन टनर पाण्यात टाकून रिकामे करण्यात आले.सदरचे क्लोरीन टनर मध्ये साधारणतः६ ते ७ किलो क्लोरीनगॅस असल्याने तात्काळ गळती लागलेले क्लोरीतटनर पूर्णपणे रिकामे करण्यात आले. सदर घटनेने कुठलीही जिवितहानी झालेली नाही मात्र तेथील चार शेतक-यांचे पिण्याचे काही अंशी नुकसान झालेले पाहणीत निदर्शनास आले होते.

सदरच्या शेतक-यांनी नुकसान भरपाई तातडीने मिळावी याबाबत आग्रही भूमिका घेतल्याने दिनांक २२/३/२०१४ रोजी निवेदन दिल्यानुसार मा. आयुक्त साो.यांनी सदर जलशुध्दीकरण केंद्रावर झालेल्या घटनेची पाहणी करीत असतांना संबंधित शेतक-यांनी मा.आयुक्त साो.यांना भूटन वीस दिवसात नुकसान भरपाई मिळण्याबाबत आग्रही मागणी केल्याने व त्या ठिकाणी निर्माण झालेल्या वातावरणानुसार मा.प्रभारी आयुक्त साो.यांनी २० दिवसात नुकसान भरपाई देणेबाबत दिनांक २२/३/२०१४ रोजी नुकसानग्रस्त शेतक-यांना हमीपत्र दिलेले आहे.

त्यानतंर शेतक-यांशी झालेल्या चर्चेनुसार सदर झालेल्या नुकसानीचे तालुका कृषी अधिकारी,धुळे यांनी झालेल्या नुकसानीचा पंचनामा करुन अहवाल दिलेला आहे. सदर अहवालात त्यांनी सदर नुकसान ग्रस्त शेतक-यांच्या नावासमोर ( सोबतच्या तक्त्यात नमूद)

तपशिल देवून नुकसानीची रक्कम देखील नमूद केलेली आहे.शेतक-यांना नुकसान भरपाई देणेबाबत व तालुका कृषी अधिकारी, धुळे यांनी सादर केलेली एकूण रक्कम रु.४७३३७६/-मात्र नुकसान भरपाई देणे बाबतचा प्रस्ताव मंजुरीस आला असता सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार कृषी अधिका-यांकडून आलेल्या अहवालाबाबत संदिग्धता असून झालेले नुकसान व गळतीनंतरची परिस्थिती याबाबत वस्तुस्थिती पुर्नपडताळणी करणे

गरजेचे आहे. तथापि  शेतक-यांचे नुकसान होऊ नये म्हणून कृषि अधिकारी यांच्या आलेल्या अहवालानुसार सद्यस्थितीत नमूद केलेल्या नुकसान भरपाई पैकी  ५० टक्के रक्कम  संबंधित शेतक-यांनाअदा करणेस मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच याबाबतपुनश्च संबंधित  विभागाच्या तज्ञ व वरिष्ठ अधिका-यांमार्फत फेर चौकशी करुन त्यांचेकडून अहवाल मागविण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.व आलेल्या अहवालानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- २२ धुळे शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत तापी पाईप लाईन लिकेज झाल्याने तांातडीने करण्यांत आलेल्या कामाच्या देयकास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे पाणी पुरवठा योजना अंतर्गत तापी पाईप लाईनी आग्रारोड वरखेडी फाटयाजवळ श्री.सुभाष मुणोत यांच्या शेताजवळ पाईप लाईन लिकेज झालेली  होती. त्यामुळे मोठया प्रमाणात पाणी वाया जात असल्याने सदरची पाईप लाईनीची तांतडीने दुरस्ती करणे आवश्यक होते.

कारण की, त्या लिकेजमुळे ऑक्सीडेशन जलकुंभर बडगुजर जलकुंभ दसेरा मैदान मोहाडी चक्करबडी इ. जलकुंभाचा पाणीपुरवठा हा बंद झालेला होता म्हणजे जवळ पास २ ते २-५० लाख लोकसंख्येचे पाणी वितरणात अडचणी येणार होत्या.त्यामुळे सदरचे काम हे कामधेनु एन्टरप्राईजेस धुळे यांचेकडून त्वरीत करण्यांत येवून सदरील कामास येणारा खर्च रुपये १,६१,३१८/- मात्रस ७३ खंड ( क) नुसार आर्थिक व प्रशासकीय मंजुरी  घेण्यांत येवून सदरचे देयक अदा करणेत आले आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार सदरील कामासाठी रु.१,६१,३१८/- मात्र खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- २३ सन २०१४-१५ या वर्षासाठी धुळे मनपाचे १० ॲलोपॅथीक दवाखाने, एक सुतिकागृह, एक कुटुंब केंद्रासाठी लागणारी औषध खरेदीसाठी शासकीय दराप्रमाणे तसेच स्थानिक बाजार भावाप्रमाणे अंदाजित खर्च रुपये७०,१०,०२२/- मात्र येणार आहे.सन २०१४-१५चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तरतुदीनुसार रु. ५५,००,०००/- मात्र पर्यत खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी मिळणेबाबत तसेच शासकीय दरासोबत स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई निविदा काढणेस मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३ दिनांक ६/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका आरोग्य विभागाकडील १० ॲलोपॅथी दवाखाने, १ सुतिकागृह व १ कुटुंब कल्याण केंद्रासाठी सन २०१४-१५या वर्षासाठी लागणारी औषध भांडार विभागातुन पुरवठा होणेबाबत संबधीत दवाखान्यांचे वैद्यकिय अधिकारी यांनी मा.आरोग्य अधिकारी यांचे मार्फत भांडार विभागात रिपोर्ट सादर केला आहे.

शासकिय कंपनी, शासन अंगीकृत उपक्रम, शासकिय दरकरार, व अन्यबाबत यांचे कडेस उपलब्ध नसलेली औषधांचे स्थानिक बाजारभावानुसार सर्वात कमी असलेल्या दरांनुसार सर्व ॲलोपॅथी दवाखान्यांचे मागणी रिपोर्ट प्रमाणे १२४ प्रकारचे औषध खरेदीसाठी एकुण खर्च रु.७०,१०,०२२/-मात्र येणार आहे.

सन २०१४-१५ या वर्षासाठी अर्थसंकल्पीय अंदाज पत्रकात औषध खरेदीसाठी एकुण रु.६०,००,०००/-मात्रची तरतुद प्रस्तावित केलेली आहे.त्यापैकी आयुर्वेद पंचकर्म रुग्णालयासाठी लागणारी आर्युर्वेद औषधी खरेदीसाठी रु.५,००,०००/-मात्र शिल्लक ठेवल्यास ॲलोपॅथी औषध खरेदीसाठी रु.५५,००,०००/- शिल्लक राहात आहेत.

सन २०१४-१५ या वर्षासाठी औषधाची ई-निविदा तयार करुन वृत्तपत्रात प्रसिध्द केल्यास शासकिय कंपनीचे दर, शासकिय दरकरार, व ई-निविदा प्रणालीव्दारे प्राप्त झालेल्या खाजगी निविदाधारकांची औषधी तुलनात्मक सर्वात कमी दरांप्रमाणे खरेदी होतील, तसेच बाबवार गुणवत्ता व दर यानुसार अनुक्रमे उत्कृष्ट व कमी असलेल्या दरांप्रमाणे औषध खरेदी होतील व मनपाचा आर्थीक फायदा होउन रुग्णांसाठी चांगल्या प्रतिची औषधी उपलब्ध होतील. गुणवत्तेबाबत शंका राहु नये यासाठी पुरवठा केलेल्या औषधाचे ॲनालिसीस टेस्ट रिपोर्ट सादर करण्याबाबत पुरवठादारास बंधनकारक राहील.असे अहवालात नमुद आहे.

उक्त अहवालानुसार व झालेल्या चर्चेनुसार धुळे मनपा चे १० ॲलोपॅथी दवाखाने, १ सुतिकागृह, १ कुटुंब कल्याण केंद्र, यासाठी सन २०१४-१५ या वर्षासाठी लागणारी १२४ प्रकारचे औषध खरेदीसाठी शासकिय दरांप्रमाणे तसेच स्थानिक बाजारभावा प्रमाणे अंदाजीत खर्च रु.७०,१०,०२२/- मात्र येणार असल्याने, सन २०१३-१४ चे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार रु.६०,००,०००/- पैकी रु.५,००,०००/-मात्र आर्युर्वेद औषधी खरेदीसाठी शिल्लक ठेउन रु.५५,००,०००/-मात्र खर्चास आर्थीक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच शासकिय दरांसोबत स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळण्यासाठी ई-निविदा प्रणालीव्दारे निविदा काढणेस व फक्त जेनिरिक औषधी खरेदी करणेसाठी निविदा काढण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**सोमवार दिनांक १९ मे, २०१४**
**वेळः- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज सोमवार १९/५/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ७ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १० | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ११ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १२ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १३ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १४ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १५ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दौलत खान पठाण | आयुक्त |
| २. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त ( कर) |
| ४. | सौ. हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा.आयुक्त |
| ६. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.ना कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ९. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| १०. | डॉ. श्री. महेश मोरे | वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| ११. | श्री.के.जी.सुडके | एल.बी. टी. अधिक्षक |
| १२. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १३. | श्री. मनोज जोशी | वसुली लिपीक |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री. एस.एस. देवरे | पा. पु. अभियंता |
| १६. | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| १७. | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १८. | श्री. सी. बागुल | पा. पु. ओव्हरसिअर |
| १९. | श्री.एम. एस. जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| २०. | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २१. | श्री.आर.एस.बोरसे | अभिलेखापाल |

विषय क्रमांक :- २४ विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा शाळा क्रं.१ येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधणे कामासाठी निगोसिएशन अंती आलेल्या निविदा दराबाबत फेर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४ दिनांक १९/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६ दिनांक ६/५/२०१४ अन्वये विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा शाळा क्रं.१ येथे नवीन प्रशासकीय इमारत बांधणेकामासाठी आलेले शेकडा ३ % जास्तीने आलेल्या दराबाबत फेर निगोसिएशन करणे असल्याचे झालेल्या निर्णयानुसार ठेकेदार श्री. ए.बी. वाघ यांना जा.क्रं. पा.पु. वि/७८ दि. १३/५/२०१४ अन्वये फेर निगोसिएशनसाठी पत्र देऊन बोलविले असता श्री. वाघ यांनी दिनांक१६/५/२०१४ रोजी पत्र देऊन सदरचे काम शे. ३% दराने जास्त ऐवजी शेकडा २.९० % जास्त दराने काम करणेबाबत लेखी पत्र देऊन संमती दिली आहे.

सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे चर्चेसाठी आला असता प्रशासनास विचारणा केल्यानुसार व सद्यस्थितीतील शासकीय दरसूचीतील दराशी पडताळणी करुन व संमती ठेकेदार यांनी त्यांच्या पत्रात जादा दराबाबत दिलेले मुद्दे यांची पडताळणी करुन अभिप्राय त्वरीत सादर करणेबाबत आदेशित केले असता प्रशासनाने ठेकेदार यांनी सादर केलेले

२.९० टक्के जास्तीने  हे दर मंजुरीस हरकत नाही असा लेखी अभिप्राय सभागृहापुढे सादर केलेला आहे.सबब सदर अभिप्रायानुसार श्री.ए.बी. वाघ ठेकेदार यांनी फेर निगोसिएशन अंती दिलेले शेकडा २.९०% जास्तीचे दरास बहुमताने मंजुरी देण्यांत येत आहे.

सदर प्रस्तावास श्री.नरेंद्र परदेशी, सौ. वैभवी दुसाने व श्रीमती हिराबाई ठाकरे यानी लेखी विरोध दर्शविलेला असल्याने त्यांचा विरोध नोंदवून सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

**बहुमताने मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- २५ विशेष निधी अंतर्गत मुस्लीम कब्रस्तान वडजाईरोड येथे कुंपन भिंत बांधणे कामी ई निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५ दिनांक १९/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत मुस्लीम कब्रस्तान वडजाईरोड येथे कुंपन भिंत करणेकरिता म.विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक विभाग जा.क्रं. नपा/२/२/८६२४/२०१४ जा.कं.२९७८ दि.४/३/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत म.जी.पा. धुळे/ म.जि. प्रा मंडळ नाशिक यांनी रक्कम रुपये १,०५,२५,२४१/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ईनिविदा५७/१८८ दिनांक ७/४/२०१४ रोजी निविदा प्रसिध्द करणेत आली. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन | ५ % जास्तीने | |
| २ | मे. समीर एंटरप्राईजेस | शे. ७ % जास्तीने | |
| ३ | मे. ईश्वरी कंन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |

ठेकेदार मे. ईश्वरी कन्स्ट्रक्शन यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त अहवालानुसार कंत्राटदार मे.ईश्वरी कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- २६ धुळे शहरझोपडपट्टी मुक्त करणेसाठी राजीव आवास योजने अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापकाची प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी ई निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २६ दिनांक १९/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर झोपडपट्टी मुक्त करण्यांच्या शासनाच्या राजीव आवास योजने अंतर्गत प्रकल्प व्यवस्थापकाची सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणेसाठी नेमणूक करणेबाबत धुळे मनपा ठरावान्वये मान्यता देण्यांत आलेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/ ईनिविदा/ ६१ दिनांक ३/३/२०१४अन्वये दिनांक ४ /३ /२०१४ रोजीचे दैनिक राजरंग टाईम्स या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक ९/४/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. वॅपकॉस लि. गांधीनगर | ०.८९% | |
| २ | मे. एम.एस. सार्क ग्रुप जळगांव | ४.८५% | |
| ३ | श्री. कन्स्ट्रक्शन | २.०७ % | |
| ४ | श्री. रितेश आर. काकरिया, | २.२५% | |
| ५ | मे. लक्ष्मी कन्स्ट्रक्शन व इंजिनिअर्स | १,९९ % | |

ठेकेदार मे.वॅपकॉस लि. गांधीनगर यांचे दर०.८९ % तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त कामाबाबत यापूर्वी निविदा मागविली असता १% प्रमाणे (शासन दरानुसार) योजनेचा डी.पी.आर. तयार करणेबाबत दर आलेले होते.याकामी ई टेंडर नुसार आलेले दर ०.८९% मात्रला मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच सदर ठेकेदार हे पर राज्यातील असल्याने वेळोवैळी संपर्क होण्याच्या दृष्टीने त्यांनी धुळे शहरात स्वतंत्र संपर्क कार्यालय उघडणेबाबत प्रशासनामार्फत आदेशित करावे व त्याबाबत करारनामा अटी शर्तीत उक्त बाबत नोंद घेण्यांत यावी. यासंदर्भात ठेकेदाराकडून सकारात्मक प्रतिसाद न आल्यास व करारनामा अटी शर्तीप्रमाणे कार्यवाही न झाल्यास उक्त निविदा धारकाचे काम रद्द करुन त्यांच्या पेक्षा (व्दितीय) कमी दराने दर दिलेल्या निविदाधारकास प्रथम ठेकेदाराने दिलेल्या शेकडा ०.८९ या दराने काम देण्याबाबतची कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- २७ धुळे शहर तापी पाणीपुरवठा योजना व नकाणे, डेडरगांव तलाव जलशुध्दीकरण केंद्रासाठी सन २०१४-१५ या वर्षासाठी लागणारे रसायने खरेदी करणेसाठी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणे व निविदा प्रसिध्द करणेस मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २७ दिनांक १९/५/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर व तापी पाणीपुरवठा योजनेवर जलशुध्दीकरण केद्रासाठी लागणारे रसायने(ब्लिचींग पावडर, ॲलम, क्लोरीन गॅस टनर) सन २०१४-१५ या वर्षाकरिता एकुण खर्च हा खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | रसायनांचे नांव | परिणाम | सन २०१२-१३ एम.जे.पी. डी.एस.आर. | एकुण | सन २०१२-१३ मनपा मंजूर दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ॲलम | १८०० मे टन | ८,००० | १,४४,००,००० | रु.६४४१ प्रतिमे. टन | १,१५,९३,८०० |
| २ | ब्लिचींग पावडर | २५० मे.टन | २५,००० | ६२,५०,००० | रु. १४७५० | ३६,८७,५०० |
| ३ | क्लोरीन गॅस टनर | २५० नग | १३,२४३.५० | ३३,१०,८७५ | रु.१२७५० | ३१,८७,५०० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | प्रति नग | | | प्रति नग | |
| | | | | | |
| | सन २०१२-१३ चे एकुण रु. | | २,३९,६०,८७५.०० | एकुण रु. | १,८४,६८,८०० |
| | १०% | | २३,९६,०८७.०० | | |
| | वाढीव दर | | २,६३,५६,९६२.०० | १० टक्के | १८,४६,८८० |
| | एम.जी.पी. चे डी.एस.आर. | | | | |
| | सन २०१२-१३ चे एकुण खर्च | | | | २,०३,१५,६८० |
| | | | | १० % | २०,३१,५६८ |
| | एकुण खर्च रुपये | | | | २,२३,४७,२४८ |

उक्त रसायने खरेदी कामीच्या एम.जी.पी. सन २०१३-१४ नुसार रुपये २,६३,५६,९६२/-अपेक्षित आहे.तर महानगरपालिका धुळे यांचे सन २०१२-१३ च्या मंजूर दरानुसार रुपये २,२३,४७,२४८/- मात्र खर्च सन२०१४- १५ साठी अपेक्षित आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार रसायने खरेदीसाठी अंदाजे येणा-या रु.२,२३,४७,२४८/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच यासंदर्भात नियमानुसार ई- निविदा प्रसिध्द करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**सोमवार दिनांक २ जुन, २०१४**
**वेळः- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज सोमवार २/६/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ३ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ४ | श्री. साखला गोविंद तुळशीराम | सदस्य |
| ५ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ६ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ७ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ८ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ९ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १० | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| ११ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दौलत खान पठाण | आयुक्त |
| २. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त ( कर) |
| ४. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ५. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ६. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ७. | डॉ. श्री. महेश मोरे | वैद्यकिय आरोग्याधिकारी |
| ८. | श्री. एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक |
| ९. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १०. | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| ११. | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १२. | श्री.एम. एस. जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| १३. | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १४. | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १५. | श्री. पी.डी. नाईक | प्र. लेखापाल |

विषय क्रमांकः- २८ सन्मा.नगरसेवकांच्या मागणी पत्रानुसार त्यांच्या भागातील सुलभ शौचालय देखभाल दुरुस्तीसाठी श्रमिक स्वयं.सेवा सहकारी संस्था यांना देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २९ दिनांक २/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे वार्ड क्र.३० मधील सन्मा.नगरसेवक श्री. संदीप पाटोळे, श्रीमती.यमुनाबाई जाधव वार्ड क्रं.३१चे नगरसेवक मा.अमोल मासुळे,वार्ड क्रं.३२ चे नगरसेवक श्री.सुभाष दादा खताळ व वार्ड क्रं.१९ चे नगरसेवक सन्मा.श्री. संजय जाधव यांनी त्यांच्या वार्डात सद्यपरिस्थितीत खालील ठिकाणी सुरु असलेले सुलभ शौचालय त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या संस्थाकडुन काढुन श्रमिक स्वयं.सेवा सहकारी संस्था मर्या.यांना साफ सफाई व देखभाल दुरुस्तीसाठी देण्याबाबत कळविले आहे.

| अ.क्र. | शौचालयाचे ठिकाण | सीट संख्या | | कोणत्या संस्थेला दिले |
|---|---|---|---|---|
| १ | नारायण मास्तर चाळ | - | १० | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| २ | नारायण मास्तर चाळ | - | १० | आस्था स्वयं. संवा सह संस्था धुळे |
| ३ | नारायण मास्तर चाळ | १० | - | मुस्लीम मेहतर एकता स्वयं. |
| ४ | नवजीवन नगर | १० | १० | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| ५ | आण्णाभाऊ साठे नगर | १० | १० | अल्पसंख्यांक सेवाभावी संस्था |
| ६ | अहिल्यादेवी नगर | ०५ | ०५ | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| ७ | श्रीराम नगर | १० | २० | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| ८ | रासकर नगर | १० | १० | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| ९ | विखे नगर | - | १० | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| १० | रंगारीचाळ वार्ड क्र.५६ शाळा क्र. २ | ०५ | ०५ | अल्पसंख्यांक सेवाभावी संस्था |
| ११ | लिलाबाई चाळ | १० | १० | सेवा फाऊंडेशन, पुणे |
| १२ | हटकर वाडी | १० | १० | सेवा फाऊंडेशन, पुणे |

वरील सर्व शौचालय त्यांच्या नावासमोरील संस्थेला साफ सफाई व देखभाल दुरुस्तीसाठी मे.स्थायी समिती ठरावान्वये देण्यात आलेले आहे.

वरील शौचालयाची खालील प्रमाणे मुदत आहे.

| अ.क्र. | शौचालयाचे ठिकाण | संस्थेचे नांव | मुदत |
|---|---|---|---|
| १ | नारायण मास्तर चाळ | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| २ | नवजीवन नगर | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| ३ | अहिल्यादेवी नगर | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| ४ | श्रीराम नगर | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| ५ | रासकर नगर | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| ६ | विखे नगर | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| ७ | लिलाबाई चाळ | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| ८ | हटकर वाडी | सेवा फाऊंडेशन | २५ वर्षे |
| ९ | आण्णाभाऊ साठे नगर | अल्पसंख्यांक सेवाभावी संस्था | ७ वर्षे १६/७/२०१८ पर्यंत |
| १० | रंगारीचाळ वार्ड क्र. ५६ शाळा नं.२८ जवळ | अल्पसंख्यांक सेवाभावी संस्था | ७ वर्षे ८/१०/२०१९ पर्यंत |
| ११ | नारायण मास्तरची चाळ | मुस्लीममेहतर एकता स्वय. सेवा. सह. संस्था | ७ वर्षे ३/६/२०१५ पर्यंत |
| १२ | नारायण मास्तरची चाळ | आस्था स्वयं.सेवा भावी संस्था | ७ वर्षे ४/४/२०१८ पर्यंत |

वरील पैकी अ.नं.१ ते ८ शौचालय हे सेवा फाऊंडेशन, पुणे यांना देण्यात आले असुन त्यांच्याकडुन २५ वर्षाची मुदतीचा करारनामा करुन दिलेला आहे. त्यांचे काम पहाता चांगल्या प्रकारे असुन अ.नं.९ ते १२ यांच्याबाबत नेहमी तक्रारी असुन त्यांची मुदत वरील तक्त्यात नमुद केली आहे.तरी अ.नं. ९ ते १२ हे शौचालय उक्त संस्था श्रमिक स्वयं. सेवा. सह.संस्था यांना देण्यास कार्यालयीन टिपणीनुसार मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार संबंधित संस्थेकडून योग्य तो अटी शर्तीचा लेखी करारनामा करुन घेण्यांत यावा.तसेच प्रशासनाने यापुढे मनपा नियमानुसार कार्यवाही करावी. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-२९ विशेष निधी अंतर्गत रेल्वे स्टेशन ते वडजाईरोड ८० फूटी रोड डांबरीकरण करण्यांचे निविदा मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३० दिनांक २/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अतंर्गत ई निविदा सुचना क्रं.६८/२०४ रेल्वेस्टेशन ते वडजाई रोड ८० फूटी रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास मा. विभागीय आयुक्त नाशिक पत्र क्रं.८६२४/ २०१४/२९७८/४-३ कामाबाबत रक्कम रुपये २,४२,७६,१४३/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्रा. मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं. ६१० दि. १/३/२०१४ अन्वये रक्कम रुपये २,४२,३०,८२८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन धुळे | ३% जास्तीने | |
| २ | मे. समीर एंन्टरप्राईजेस, धुळे | ५% जास्तीने | |
| ३ | मे.क्रिश्ना एन्टरप्राईजेस धुळे | ८ % जास्तीने | |

ठेकेदार मे.गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे.गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे सर्वात कमी ३ टक्के जास्त दराने आलेले दर जास्त वाटत असल्याने मे. गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांना २८/५/२०१४ अन्वये निगोसिएशनसाठी बोलविले असता त्यांनी दि.२९/५/२०१४ रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.उक्त आलेल्या अहवालानुसार मे. गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांचे निगोसिएशन अंती आलेले अंदाजपत्रकीय दरांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-३० विशेष निधी अंतर्गत वडजाईरोड ते सुभाषपुतळया पावेतो८०फूटी रोड डांबरीकरण करण्यांचे निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३१ दिनांक २/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अतंर्गत ई निविदा सुचना क्रं.६८/२०४ वडजाई रोड ते सुभाष पुतळापावेतो ८० फूटी रस्ता डांबरीकरण करणे बाबतच्या कामास मा. विभागीय आयुक्त नाशिक पत्र क्रं. ८६२४/ २०१४/२९७८ दि.४/३/२०१४अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये १,४८,५७,५७९/-मात्र खर्चासआर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्रा. मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं. ६११ दि. १/३/२०१४ अन्वये रक्कम रुपये १,४८,५७,५७९/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन धुळे | ३%जास्तीने | |
| २ | मे. समीर एंन्टरप्राईजेस, धुळे | ५% जास्तीने | |
| ३ | मे.क्रिश्ना एन्टरप्राईजेस धुळे | ८ % जास्तीने | |

ठेकेदार मे. गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे सर्वात कमी ३ टक्के जास्त दराने आलेले दर जास्त वाटत असल्याने मे. गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांना २८/५/२०१४ अन्वये निगोसिएशनसाठी बोलविले असता त्यांनी दि.२९/५/२०१४ रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.

उक्त आलेल्या अहवालानुसार मे. गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांचे निगोसिएशन अंती आलेले अंदाजपत्रकीय दरांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ३१ विशेष निधी अंतर्गत ८० फूटीरोड लगत दोन्ही बाजूस आर.सी.सी. गटार बांधण्याच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३२ दिनांक २/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अतंर्गत ई निविदा सुचना क्रं.६८/२०४ ८० फूटी रोड लगत दोन्ही बाजूस आर.सी.सी. गटार बांधण बाबतच्या कामास मा. विभागीय आयुक्त नाशिक पत्र क्रं.८६२४/२०१४/२९७८ दि.४/३/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ९४,१२,६९७/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्रा. मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं. ५३१ दि. १३/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ५३,६८,३२०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन धुळे | ३%जास्तीने | |
| २ | मे. समीर एंन्टरप्राईजेस, धुळे | ५% जास्तीने | |
| ३ | मे.ईश्वरी कन्स्ट्रक्शन, धुळे | ८ % जास्तीने | |

ठेकेदार मे.गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार मे. गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे सर्वात कमी ३ टक्के् जास्त दराने आलेले दर जास्त वाटत असल्याने इकडील कार्या. पत्र क्रं. ८८ दि.२८/५/२०१४ नुसार मे. गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांना निगोसिएशनसाठी बोलविले असता त्यांनी दि.२९/५/२०१४ रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.

उक्त आलेल्या अहवालानुसार मे.गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांचे निगोसिएशन अंती आलेले अंदाजपत्रकीय दरांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ३२ विशेष निधी अंतर्गत ८०फूटी रोडवर डिव्हाईडर टाकण्यांच्या कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३ दिनांक २/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अतंर्गत ई निविदा सुचना क्रं.६८/२०४ ८० फूटी रोडवर कॉकीट डिव्हाईडर टाकणे बाबतच्या कामास मा.विभागीय आयुक्त नाशिक पत्र क्रं.८६२४/२०१४/२९७८ दि.४/३/२०१४अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ९४,१२,६९७/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्रा. मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं.५३३ दि. १३/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ३८,९२,८७८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. गायत्री कंन्स्ट्रक्शन धुळे | ३%जास्तीने | |
| २ | मे. समीर एंन्टरप्राईजेस, धुळे | ५% जास्तीने | |
| ३ | मे.ईश्वरी कन्स्ट्रक्शन, धुळे | ८ % जास्तीने | |

ठेकेदार मे.गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.सबब कंत्राटदार मे. गायत्री कन्ट्रक्शन धुळे यांचे सर्वात कमी ३ टक्के् जास्त दराने आलेले दर जास्त वाटत असल्याने इकडील कार्या.पत्र क्रं.८७दि.२८/५/२०१४ नुसार मे. गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांना निगोसिएशन साठी बोलविले असता त्यांनी दि.२९/५/२०१४ रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.उक्त आलेल्या अहवालानुसार मे. गायत्री कन्स्ट्रक्शन धुळे यांचे निगोसिएशन अंती आलेले अंदाजपत्रकीय दरांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ३३ म.अभियंता यांना मनपा कार्यालयीन कामकाजासाठी वाहन वापराबाबत शासन निर्णयानुसार वाहन प्रतिपूर्ती भत्ता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ दिनांक २/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा मुख्य कार्यालय अभियंता श्री. कैलास नरहर शिंदे यांनी मा.आयुक्त साो.यांचे नांव पत्र सादर करुन त्यात नमूद केले आहे की, मी २२ वर्षापासून कायम सेवेत असून अभियंता म्हणून मागील १० वर्षापासून कार्यरत आहे. माझ्याकडेस पाणीपुरवठा, बांधकाम विद्युत व भांडार विभाग असून मुख्यतः पाणी पुरवठा व बांधकामासाठी मला शहरात व तापी पाणीपुरवठा योजनेवर नेहमीच भेट देत पाहणीसाठी जावे लागते.मी स्वतःचे चार काही वाहन कार्यालयीन कामकाजासाठी वापरणार असून मला शासन निर्णयानुसार वाहन प्रतिपूर्ती भत्ता देणेसाठी मे.स्थायी समितीपुढे शिफारस करणेबाबत विनंती केली आहे.

शासन निर्णयानुसार मे. स्थायी समिती ठ.नं.८९ दि. १०/८/१२ ने वाहन भत्ता देणे बंद करुन भाडेतत्वावर वाहने लावणेबाबत निर्णय होऊन दि.९/१/२०१३ रोजी वाहने भाडेतत्वावर पुरविणेबाबत फेर जाहीर टेंडर नोटीस प्रसिध्द करणेत आली. परंतु सदर निविदेत आलेले निविदा दर जास्त असलेने व शासन निर्णयाप्रमाणेचे दर कमी असलेने सदर टिपणीस तत्कालीन आयुक्त साो. यांनी प्रतिमाह रु.१३८७५/- (मेटनन्स, चालक भत्ता, इंधन खर्च) सह मात्रला मंजुरी दिली आहे.दि.१९/५/२०१४ चे स्थायी समितीत आयतेवेळी मा.सभापती साो.यांचे परवानगीने आलेले विषयात अ.नं.२ मधील विषयात श्री. शिंदे यांना वाहन प्रतिपूर्ती भत्ता देणेबाबत सदर मागणी वाजवी असल्याने प्रशासनाने त्वरीत कार्यवाही करणेबाबत मंजुरी दिली आहे. तसेच श्री. शिंदे यांनी दिलेल्या पत्रावर मा.सभापती साो. यांनी सदर विषय स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत आदेशित केले आहे.तरी श्री. के.एन. शिंदे यांना त्यांचे खाजगी वाहन कार्यालयीन कामकाजासाठी शासन परिपत्रकातील नियम व अटीस अधीन वापरणेस मंजुरी देण्यात येत असून दरमहा वाहन प्रतिपूर्ती भत्ता रु.१३८७५/- (दरमहा) देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ३४ धुळे महानगरपालिकेच्या विकास कामांची अंदाजपत्रके (रस्ते,पाणीपुरवठा,ड्रेनेज,पुल, इमारती इत्यादी) तयार करणेसाठी सल्लागार नियुक्त करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३५ दिनांक २/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनानुसार धुळे महानगरपालिकेत फक्त ७ अभियंते (सिव्हील) कार्यरत आहेत. त्यांचेकडे रस्त्यांची (नवीन व देखभालीची) कामे तसेच पाणीपुरवठयाची व इतर कामे सोपवली आहेत. नवीन विकास कामांची अंदाजपत्रके पण तेच बनवितात हया अंदाजपत्रकातील तरतूदी मानकाप्रमाणे नसतात.घाई घाईत बनविलेली अदाजपत्रके परिपूर्ण नसतात.

त्यासाठी सर्वे करणे, लेव्हल घेणे,ट्रायल पीट घेणे,मातीची स्थिती पाहून क्रस्ट डिझाईन करणे ही कामे त्यांच्यावरील कार्यबाहुल्यामुळे करु शकत नाही गटारीची एस्टीमेटस् करणेसाठी लेव्हल करणे घेणे जरुरीचे असते.त्याशिवाय सांडपाणी कोठे सोडावयाचे हे ठरविता येत नाही. त्यामुळे पाण्याचा योग्य निचरा होत नाही कामे ते करु शकत नाहीत.

त्यासाठी सर्वे करुन,ट्रायलपीट घेऊन क्रष्ट डिझाईन करणे) माती परीक्षण केल्यावर) लेव्हल घेऊन गटारीची एस्टीमेट करणे जरुरीचे असते.तरच टिकाऊ रस्ते व लेव्हल प्रमाणे गटारी बांधता येतील हयासाठी सल्लागार नेमण्याची गरज आहे. (३ वर्ष कालावधीसाठी) त्यामुळे चांगली व परिपूर्ण अंदाजपत्रके तयार होतील. परिणामी दर्जेदार कामे होतील सल्लागार नेमणेसाठी शर्ती निर्धारीत करुन टेंडर्स बोलवावी लागतील. सल्लागाराची फी अंदाजपत्रकाच्या किंमतीवर आधारीत असेल इतर महापालिकेत, नगरपरिषदेत अशी अंदाजपत्रके तयार करणेसाठी व कामांची देखरेख करणेसाठी व बिले बनविणेसाठी सल्लागार नेमतात.सन्माननीय सदस्यांच्या चर्चेनुसार व कार्यालयीन निवेदनानुसार धुळे महानगरपालिकेत अंदाजपत्रके बनविण्यासाठी सल्लागार नियुक्त करण्यासाठी नियमाप्रमाणे जाहीर निविदा प्रसिध्द करणेस मान्यता देण्यात येत आहे.

तसेच कार्यालयाने सादर केलेल्या पुरक टिपणीनुसार शासन स्तरावरील सादर होणाऱ्या विकास कामांच्या प्रस्तावाचे योग्यरीत्या व शासन नियमानुसार सादरीकरण होण्यासाठी व्यावसायीक सल्लागार संस्था, व्यक्ती (कन्सलटंट) नियुक्त करणेबाबत नियमाप्रमाणे निविदा प्रसिध्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक ५ जुन, २०१४**
**वेळः- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार ५/६/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती,स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ५ | श्री. साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ७ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| १० | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ११ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १३ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १४ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १५ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.के.व्ही. धनाड | अति. आयुक्त |
| २. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त (स.प्र.) |
| ३. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ४. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ५. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ६. | श्री. एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक |
| ७. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| ८. | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| ९. | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १०. | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| ११. | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १२. | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |
| १३. | श्री. पी.डी. नाईक | प्र. लेखापाल |

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.**

यादी देण्यांत येते की, महाराष्ट्राचे झुंजार नेते केंद्रीय मंत्री गोपीनाथजी मुंडे यांचे दिनांक ३/६/२०१४ रोजी नवीदिल्ली येथे अपघातामुळे निधन झाले त्यांना आजच्या सभेत भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करणेत यावी.

सुचक :- श्री.चंद्रकांत काशिनाथ केले, सभापती स्थायी समिती, मनपा धुळे

अनुमोदक :- श्री.दिनेश लहु शार्दुल, सदस्य

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ दिनांक ५/६/२०१४**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार महाराष्ट्राचे झुंजार नेते केंद्रीय मंत्री गोपीनाथजी मुंडे यांचे दिनांक ३/६/२०१४ रोजी नवी दिल्ली येथे अपघातामुळे निधन झाल.

वरील मान्वराचे दुःखद निधनामुळे या सभेस आतीव दुःख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दुःखात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांकः- ३५** विशेष निधी अंतर्गत धुळे मनपाच्या मागील बाजुपासुन ते श्रीराम पेट्रोल पंपापर्यंत रस्ता डांबरीकरण करण्यांचे फेर ई निविदा मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३७ दिनांक ५/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे फेर ई निविदा धुळे मनपाच्या मागील बाजुपासुन ते श्रीराम पेट्रोल पंपापर्यंत रस्ता डांबरीकरण करणेच्या कामांस मा.विभागीय आयुक्त नाशिक पत्र क्रं. नपा/२/२/८६२४/२९ दिनांक ४/३/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये १,३५,१८,१८४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्रा. मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं. ६१३ दि.१/३/२०१४ अन्वये रक्कम रुपये १,३४,४२,५७०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. पी.एस.कोतकर | ६.३३%जास्तीने | |
| २ | श्री. मिलींद मुडावदकर | १७.००% जास्तीने | |

ठेकेदार श्री.पी.एस.कोतकर यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार श्री.पी. एस. कोतकर यांचे सर्वात कमी ६.३३ टक्के जास्त दराने आलेले दर जास्त वाटत असल्याने इकडील कार्या.पत्र दि.३१/५/२०१४ नुसार. श्री.पी. एस. कोतकर यांना निगोसिएशनसाठी बोलविले असता त्यांनी दि.३१/५/२०१४ रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.

उपरोक्त आलेल्या अहवालानुसार सदरचे काम श्री. पी. एस. कोतेकर यांना एस्टीमेट रेटने देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांकः-३६** विशेष निधी अंतर्गत आराधना रसवंती ते संजय झेरॉक्स ते हाग्रानाल्या पावेतो रस्ता डांबरीकरण करण्यांचे फेर ई निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३८ दिनांक ५/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे फेर ई निविदा धुळे मनपाच्या विशेष निधी अंतर्गत आराधना रसवंती ते संजय झेरॉक्स ते हाग्रानाल्यापावेतो रस्ता डांबरीकरण करणेच्या कामांस मा.विभागीय आयुक्त नाशिक पत्र क्रं.नपा/२/२/८६२४/जा.क्र.२९७८ दिनांक ४/३/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ५६,१३,४१६/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्रा. मंडळ जळगांव यांचे पत्र क्रं. ५१० दि. १३/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ५६,१५,९५०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. पी.एस.कोतकर | ११% जास्तीने | |
| २ | श्री. मिलींद मुडावदकर | ५.८८% जास्तीने | |

ठेकेदार श्री.मिलींद मुडावदकर यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार श्री. मिलींद मुडावदकर यांचे सर्वात कमी ५.८८ टक्के जास्त दराने आलेले दर जास्त वाटत असल्याने इकडील कार्या. पत्र दि.३१/५/२०१४ नुसार श्री.मिलींद मुडावदकर यांना निगोसिएशनसाठी बोलविले असता त्यांनी दि.३१/५/२०१४रोजी पत्र देवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.

उपरोक्त आलेल्या अहवालानुसार सदरचे काम श्री. मिलींद मुडावदकर यांना एस्टीमेट रेटने देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**सोमवार दिनांक ३० जुन, २०१४**
**वेळः-दुपारी ४-३० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज सोमवार ३०/६/२०१४ रोजी दुपारी ४-३० वाजतां मा. श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ५ | श्रीमती बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ७ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| १० | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ११ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| १२ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १३ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १४ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दौलतखा पठाण | आयुक्त |
| २. | श्री.के.व्ही. धनाड | अति. आयुक्त |
| ३. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त (स.प्र.) |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ६. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.ना. कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ९. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| १०. | डॉ. महेश मोरे | आरोंग्याधिकारी |
| ११. | श्री.रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १२. | श्री. एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक तथा जकात अधिक्षक |
| १३. | श्री. बी.एम. कुळकर्णी | लिपीक एल.बी.टी. विभाग |
| १४ | श्री.के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १५ | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १६ | श्री. यु. आर. भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| १७ | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| १८ | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १९ | श्री. बी. डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| २० | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| २१ | श्री. एम.एस. जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| २२ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २३ | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |

विषय क्रमांकः- ३७ धुळे शहरातील विकास कामांसाठी अंदाजपत्रके तयार करणे व अनुषंगिक कामांसाठी अंदाजपत्रकाच्या टक्केवारी बेसीसवर दर मागविणेत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४० दिनांक ३०/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर हद्दीतील इन्फ्रास्ट्रक्चर वर्क साठीचे कामे करण्यासाठी उदा.रस्ते,गटार, भुमीगत गटार,ओव्हरब्रिज बांधणे ,भुयारी मार्ग बांधणे,उंच जलकुंभ सम्प बांधणे,नविन उद्यान विकसीत करणे,इमारत /शाळा बांधणे ,हॉस्पीटल बिल्डींग बांधणे, स्कॉयवॉक बांधणे इ. सिव्हील मधील कामांचे २५ लक्ष रूपयेवरील कामे करणेसाठी प्रस्तावित कामाचे अंदापत्रक तयार करणे, तत्सम तांत्रिक मंजूरी घेणे शासनाची मंजूरी घेणे, शासनाला प्रेजेंटेशन करणे इ. कामे करणेसाठी अंदाजपत्रकाच्या टक्केवारी बेसीसवर दर मागविणेत येणेबाबतच्या कामाबाबतधुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रमांक ३५ दिनांक ०२ /०६ /२०१४ अन्वये उक्त कामाबाबत जाहिर निविदा प्रसिध्द करणेबाबत मान्यता देण्यात आली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिकाजा.क्र./धुमपा/बां.वि/२५/२०१४-२०१५ दिनांक ०४/०६/२०१४ अन्वये दिनांक ०५/०६/२०१४ रोजीचे दैनिक लोकमत व दै.वार्ता या

वृत्तपत्रात खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक१६/०६/२०१४ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत.प्राप्त कंत्राटदार /ठेकेदार यांनी निविदेबाबत रोखीणे बयाणा रक्कम भरून निविदा सादर केलेली आहेत.

| Sr No | Project Cost | ठेकेदाराचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| | | निसर्ग कंन्सल्टंसी, नाशिक | आर जे पाटील ॲण्ड असोसिएट, सांगवी | श्रीराम इंजिनिअर्स, नाशिक |
| १ | २५ ते ५० लक्ष | ३.००% | ३.५०% | ४.००% |
| २ | १ कोटी ते ३ कोटी | २.५०% | ३.५०% | ४.००% |
| ३ | ३ कोटीवरील | २.००% | ३.००% | ४.००% |

**Stage II Supervision**

| Sr No | Preparation of Details tenders document of above works supervision, measurement, recording Quality Control | ठेकेदाराचे नांव | | |
|---|---|---|---|---|
| | | निसर्ग कंन्सल्टंसी, नाशिक | आर जे पाटील ॲण्ड असोसिएट,सांगवी | श्रीराम इंजिनिअर्स, नाशिक |
| १ | २५ ते ५० लक्ष | ४.००% | ४.००% | ४.००% |
| २ | १ कोटी ते ३ कोटी | ३.५०% | ४.००% | ४.००% |
| ३ | ३ कोटीवरील | ३.००% | ३.५०% | ४.००% |

कंत्राटदार /ठेकेदार श्री /मे. निसर्ग कंन्सल्टंसी ,नाशिक यांचे दर तुलनेने सर्वात कमी /जास्त असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीणे बयाणा रक्कम भरलेली आहे

सबब कंत्राटदार श्री./मे.निसर्ग कंन्सल्टंसी , नाशिक यांची सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली असून उक्त ठेकेदारास निगोसिएशनसाठी जा.क्रं. धुमपा / बा.ंवि/१४१ दि. २५/६/२०१४ अन्वये बोलविले असता त्यांनी दिनांक २५/६/२०१४ रोजी पत्र देऊन खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

| Sr No | Project Cost | निसर्ग कंन्सल्टंसी ,नाशिक |
|---|---|---|
| १ | २५ ते १०० लक्ष | २.९०% |
| २ | १ कोटी ते ३ कोटी | २.४०% |
| ३ | ३ कोटीवरील | १.९०% |

**Stage II Supervision**

| Sr No | Preparation of Details tenders document of above works supervision , measurement, recording Quality Control | निसर्ग कंन्सल्टंसी ,नाशिक |
|---|---|---|
| १ | २५ ते १०० लक्ष | ३.९०% |
| २ | १ कोटी ते ३ कोटी | ३.४०% |
| ३ | ३ कोटीवरील | २.९०% |

यासंदर्भात सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार याकामी प्रोजेक्ट कॉस्टसाठी आलेले निसर्ग कंन्सटन्सी नाशिक यांचे दर जास्तीचे वाटत असल्याने संबंधित संस्थेस दर वाटाघाटीसाठी पुनश्च म.सभापती स्थायी समिती यांचेकडेस बोलविण्यांत यावे.सदर वाटाघाटीनुसार दर ठरविण्यांचे अधिकार म. सभापती स्थायी समिती यांना देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. मा. सभापती यांनी मनपा आर्थिक हिताच्या दृष्टीने दर निश्चित करुन त्यानुसार पुढील कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच याकामी असलेल्या सुपरव्हीजन या दुस-या टप्प्यासाठी आलेले दरही जास्त असून दोनही टप्प्यांसाठी एकच संस्था अथवा ठेकेदार ठेवणे हे तांत्रिक दृष्टया व मनपाच्या

हिताच्या दृष्टीने अयोग्य असल्याने सुपरव्हिजन या दुस-या टप्प्यासाठी मागविण्यांत आलेली निविदा रद्द करण्यांत येऊन सदर कामी नव्याने निविदा काढण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ३८ विशेष निधी अंतर्गत नटराज थिऐटर ते वरखेडी रस्ता येथे पोलसह पथदिवे सुविधा करणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४१ दिनांक ३०/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत विशेष निधी अंतर्गत नटराज थिऐटर ते वरखेडीरोड येथे पोलसह पथदिवे सुविधा करणे कामाबाबत विभागीय आयुक्त/ नासिक/क्रं.नपा/२/२/क/२९७९ दि.४/३/२०१४अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ४३,१३,३०४/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत पी. डब्ल्यू विभाग नाशिक यांचे पत्र क्रं ४९ दि.२०/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ३९,६९,६६७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.व म.रा.वि.कं./ कार्य. अभि/धुळे यांचेकडील मंजुरी रु.३,३२,९१५/- (एकुण रु. ४३०२५८२/-)

उक्त कामाकरिता प्रथम निविदा धुमपा/पापु/२१९७ दि. २४/२/२०१४ नुसार दै. देशदुत/ दै. आपला महाराष्ट्र या वर्तमान पत्रात प्रसिध्द करुन निविदा दर मागविले असता या निविदेत एकही निविदा प्राप्त नाही.

म्हणून उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका फेर निविदा जा.क्रं. धुमपा/ बां.वि. /६९ दिनांक १/५/२०१४ अन्वये दैनिक पुण्यनगरी धुळे या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक २७/५/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बिजासनी एंटरप्राईजेस धुळे | Reject | बायणा रक्कम नाही |
| २ | राजवर्धन इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रा कं. धुळे | अंदाजपत्रक दराने | दर तुलनेत कमी |
| ३ | पंडीत इलेक्ट्रीकल्स धुळे | ५% जास्त | |

ठेकेदार श्री. राजवर्धन इलेक्ट्रानिक्स कं. धुळे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

फेरनिविदेत प्राप्त निविदेमध्ये मे.राजवर्धन इलेक्ट्रीकल्स ॲण्ड इलेक्ट्रानिक कं. धुळे यांचे दर अंदाजपत्रकीय दराने तुलनेत कमी असल्याने त्यांचे दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच काम न मिळालेल्या ठेकेदाराची बयाणा रक्कम परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ३९ विशेष निधी अंतर्गत देवपूर अमरधाम येथील विद्युत व्यवस्था नुतनीकरण करणे व दशक्रिया विधी हॉल येथे विद्युतीकरण करणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४२ दिनांक ३०/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत विशेष निधी अंतर्गत देवपूर अमरधाम येथील अंतर्गत पथदिवे व्यवस्था नुतनीकरण करणे व दशक्रिया विधी हॉल येथे विद्युतीकरण करणे कामाबाबत विभागीय आयुक्त/नासिक/ क्रं.नपा/२/२/क/२९७८ दि.४/३/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये १,४६,४१,१०३/- (एकत्रित) मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत शहर अभियंता मनपा धुळे यांचे पत्र क्रं २२० व २२१ दि. २४/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये २४७५९५०/-+७४५०००/-+३२२०९५०/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त प्रमाणे कामाकरिता प्रथम निविदा धुमपा/पापु/२१९७ दि. २४/२/२०१४ नुसार ( दै. देशदुत / दै. पथयात्री) नुसार प्रसिध्द करण्यांत आली होती. सदर निविदेकरिता एकही निविदा प्राप्त नाही.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका फेर निविदा जा.क्रं. धुमपा/ बां.वि. /६९ दिनांक १/५/२०१४ अन्वये दैनिक पुण्यनगरी धुळे या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक२७/५/२०१४ रोजी पर्यत निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे -

| अ.क्रं. | निविदा धारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बिजासनी एंटरप्राईजेस धुळे | २% जास्त | |
| २ | पंडीत इलेक्ट्रीकल्स धुळे | अंदाजपत्रकीय दराने | दर कमी |

ठेकेदार श्री. पंडीत इलेक्ट्रीकल्स, धुळे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सदर कामी कंत्राटदार श्री. पंडीत इलेक्ट्रीकल्स, धुळे यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेल्या निविदास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाणा रक्कम परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४० धुळे महानगरपालिका थकित देयकाच्या अदायगीबाबत निश्चित धोरण ठरविणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४३ दिनांक ३०/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महानगरपालिकेस दरमहा करावा लागणारा अत्यावश्यक खर्च मनपाकडे थकित असलेल्या देयकाची रक्कम,महानगरपालिकेस प्राप्त होणारे उत्पन्न व थकित देयके अदा करण्याबाबतचे धोरण ठरविणे बाबत निर्णयासाठी सदर विषय सभागृहापुढे आला.

सद्यस्थितीत मनपाची आर्थिक स्थिती दोलायमान असून मनपाचा अत्यावश्यक खर्च व कर्मचा-यांचे वेतन व अनुषंगिक देयके मनपाच्या दरमहा ठरलेल्या उत्पन्नातून अदा करण्यांत येत आहे.त्यामुळे ठेकेदारांची तसेच कर्मचा-यांची देयके प्रलंबीत आहेत. तथापि मनपाने सुरु केलेल्या ११ कलम कार्यक्रमामुळे मनपाचे आर्थिक उत्पन्नात वाढ होणार आहे. सदर उत्पन्नातून ठेकेदारांची प्रलंबीत देयके अदा करण्याबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

सभागृहातील सदस्यांमध्ये ठेकेदारांच्या प्रलंबीत देयकांची क्रमनिश्चिती ठरविण्या बाबत मतभिन्नता असल्याने याबाबत सदस्यांकडून लेखी स्वरुपात सुचना घेऊन निर्णय घेण्यांत येईल तो पावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४१ मोफत अंत्यविधी साहित्य योजने बाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४४ दिनांक ३०/६/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे ठेकेदार श्री.सतिष वसंतराव उघडे यांना मे.स्थायी समिती ठराव नं.८० दि. ३०/१०/२०१३ अन्वये शहरातील देवपुर, कुमार नगर, मोहाडी, चितोड रोड येथे हिंदु धर्मदहनविधी साठी गरजु नागरीकांना मोफत साहित्य ७ मन कोरडे लाकुड रु.६६२/-, ३ लिटर डिझेल रु. १८०/-,गौरी ५० नग रु. ३०/-असे एकुण ८७२/-रु. या दराने पुरविणे बाबत जा.क्र./धुमपा/आरोग्य/८४८ दि.३/३/२०१४ अन्वये कार्यादेश देण्यात आला आहे. सदर ठेकेदार यांनी उक्त काम २५/३/२०१४ पासुन सुरु केले आहे. त्यांना कामाबाबत त्रास होत असुन ते कार्यालयात वेळोवेळी तक्रार करीत आहे.त्यांनी उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये दि.१३/६/२०१४ पासुन काम बंद करणे बाबत पत्र दिले आहे.

याबाबत सन२०११-१२ लेखा परिक्षण अर्धसमास व ज्ञापन क्र. अथवा मुळ परिच्छेद क्र.५८ अन्वये मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण क्र. ६ कलम ६३ (११) प्रेतासाठी विल्हेवाट लावण्यासाठी जागा ठेवणे त्यांचे नियमन करणे नविन जागेची तरतुद करणे व बेवारस प्रेताची विल्हेवाट लावणेकरीता मनपा ने वाजवी व पुरेशी तरतुद करण्याकरीता मनप कायदेशीर रित्या सक्षम असेल त्यानुसार महापालिकामध्ये तरतुद करावयाचे आवश्यक बाबींमध्ये केवळ जागेची तरतुद करणे व बेवारस प्रेताची विल्हेवाट लावणे बाबत कर्तव्य असतांना कोणत्याही निष्कर्षा शिवाय सर्व नागरीकांना मोफत अंत्यविधी साहीत्य पुरविण्याचे अधिनियमातील तरतुदीच्या मर्यादेचे स्पष्ट उल्लंघन आहे. पुढे प्रशासकीय त्रास होऊ नये म्हणून साहित्य पुरविणे योग्य होणार नाही असे प्रशासनाने मत दिलेले आहे.

तथापि सदर योजना सुरु करणेबाबत धुळे शहरातील अनेक नागरीक व संस्थांनी मागणी केलेली आहे.आर्थिक दुर्बल घटकातील कुटुंबाचा विचार करता सदर योजना ही महानगरपालिकेच्या कर्तव्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. तथापि सदर योजना ही सर्व धर्मातील आर्थिक दुर्बल घटकातील (बीपीएल) कुटुंबातील व्यक्ती मयत झाल्यास व केशरी शिधापत्रिका धारकाच्या विनंती नुसार त्यांना या योजनेचा लाभ देणे आवश्यक आहे. त्यासाठी लागू करणे आवश्यक आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६६ मधील नियम २५ व ३६ नुसार सदर योजना कार्यान्वीत होणे शक्य आहे.

सर्व धर्मातील दहन व दफन विधीसाठी आर्थिक दुर्बल घटकांना व केशरी शिधापत्रिका धारकांच्या विनंती अर्जानुसार त्यांना सानुग्रह अनुदान प्रत्येकी रुपये १०००/- मात्र देणे योग्य होईल.

सानुग्रह अनुदान देतेवेळी खालील कागदपत्र पुरविणे आवश्यक राहील.

१) शहरातील रहिवासी असल्याचा पुरावा. :- शिधापत्रिका व त्या भागातील सन्मा. नगरसेवकांचे पत्र

२) मयताच्या कुटुंबातील सदस्याचा मागणी अर्ज

सदर सानुग्रह अनुदान संबंधित कुटुंबाला तात्काळ मनपा मार्फत उपलब्ध करुन देणे तांत्रिक बाबी लक्षांत घेता शक्य होणार नाही त्यासाठी सेवाभावी संस्था तथा ट्रस्ट निर्माण करुन त्यांच्या मार्फत सदर सानुग्रह अनुदान उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यांत येत

आहे.संबंधित ट्रस्ट मार्फत आवश्यक कागद पत्राची पूर्तता करुन सानुग्रह अनुदानाची मागणी केल्यानंतर महानगरपालिकेमार्फत संबंधित ट्रस्टला अधिनियमातील तरतुदीनुसार अनुदान उपलब्ध करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

ट्रस्ट निर्मिती होऊन कार्यवाही होई पावेतो सर्व धर्मातील दहन व दफन विधीसाठी आर्थिक दुर्बल घटकांना व केशरी शिधापत्रिका धारकांच्या विनंती अर्जानुसार त्यांना सानुग्रह अनुदान प्रत्येकी रुपये १०००/- मात्र मनपा मार्फत देण्याची कार्यवाही करावी. तसेच ठरावाची अंमलबजावणी दि.१ जुलै २०१४ पासुन करण्यात यावी.

या ट्रस्टसाठी खालील प्रमाणे देणगी दात्यामार्फत देण्यांत येणार आहे.

१) श्री. चंद्रकांत काशिनाथ केले ( सभापती स्थायी समिती) १ लाख रुपये
२) श्री. राजवर्धनजी कदमबांडे ( मा. आमदार) १ लाख रुपये
३) श्री. संदीप दत्तात्रय महाले ( शिक्षण मंडळ सभापती) १ लाख रुपये
४) श्री. शितल मोहन नवले ५० हजार रुपये
५) श्री. बापूजी शेलार ५० हजार रुपये

तसेच सन्मा.सभापती यांनी त्यांना मनपा मार्फत त्यांचे कार्यकाळात मिळणारे मानधन व मिटींग भत्ता इत्यादी संपूर्ण मिळणारी रक्कम या कामासाठी ट्रस्ट मध्ये जमा करणेबाबत जाहीर केले आहे.

या योजनेच्या अंमलबजावणीसाठी अवलंबवायची कार्यप्रणाली निश्चित करण्यांचे अधिकार म.आयुक्त यांना देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**मंगळवार दिनांक २२ जुलै, २०१४**
**वेळ:-सकाळी ११-००वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज मंगळवार २२/७/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा. श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ४ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ५ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ६ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ७ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ८ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ९ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १० | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ११ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १२ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १३ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १४ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दौलतखा पठाण | आयुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त तथा सहा.आयुक्त |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | प्र.उपायुक्त तथा सहा.आयुक्त |
| ४. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता बांधकाम वि. |
| ५. | श्री. पी.आर. दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ६. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. एम.आर. सराई | मुख्य लेखा परीक्षक तथा प्र. मुख्य लेखाधिकारी |
| ९. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| १०. | डॉ. महेश मोरे | आरोंग्याधिकारी |
| ११. | श्री.रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १२. | श्री. एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक तथा जकात अधिक्षक |
| १३. | श्री. के.जी. सुडके | अधिक्षक एल.बी.टी. विभाग |
| १४ | श्री.के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १५ | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १६ | श्री. यु. आर. भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| १७ | श्री.पी. डी. चव्हाण | ओव्हर सिअर |
| १८ | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १९ | श्री. जी.व्ही. खरे | प्रकाश निरीक्षक |
| २० | श्री. एम.एस. जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| २१ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २२ | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |

विषय क्रमांकः- ४२ मा. सभापती सो. यांच्या पत्रानुसार महानगरपालिका थकित देयकाच्या अदायगीबाबत निश्चित धोरण ठरविणेबाबत तहकूब ठेवण्यांत आलेला प्रस्तावावर फेर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ दिनांक २२/०७/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महानगरपालिकेस दरमहा करावा लागणारा अत्यावश्यक खर्च मनपाकडे थकित असलेल्या देयकाची रक्कम, महानगरपालिकेस प्राप्त होणारे उत्पन्न व थकित देयके अदा करण्याबाबतचे धोरण ठरविणे बाबत निर्णयासाठी सदर विषय सभागृहापुढे आला.

सद्यस्थितीत मनपाची आर्थिक स्थिती दोलायमान असून मनपाचा अत्यावश्यक खर्च व कर्मचा-यांचे वेतन व अनुषंगिक देयके मनपाच्या दरमहा ठरलेल्या उत्पन्नातून अदा करण्यांत येत आहे. त्यामुळे ठेकेदारांची तसेच कर्मचा-यांची देयके प्रलंबीत आहेत. तसेच शासनाने १५ ऑगस्ट २०१४ पासून पारगमन शुल्क वसुली बंद करण्यांचा निर्णय घेतलेला आहे. अशा परिस्थितीत मनपाचे आर्थीक धोरण ठरविणे आवश्यक आहे. अत्यावश्यक खर्च वजा जाता मनपाच्या प्राप्त उत्पन्नातून ठेकेदारांची प्रलंबीत देयके अदा करण्याबाबत धोरण निश्चित करणे आवश्यक आहे.

सन्मा.उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अत्यावश्यक खर्च वजा जाता मनपाच्या प्राप्त ५०%उत्पन्नातून प्रलंबीत देयके क्रमवारीनुसार अदा करणेस तसेचउर्वरीत ५०% रक्कमेतून सद्य परिस्थितीतील देयके अदा करणेस्तव सन्मा. नगरसेवकांच्या मागणी

पत्रानुसार निश्चिती करणासाठी मा.आयुक्त साो. व मा. स्थायी समिती सभापती यांची समिती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४३ टॉवर गार्डन मध्ये प्रवेश शुल्क व मिनी ट्रेनचे दर ठरविणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४६ दिनांक २२/७/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सरदार पटेल उद्यान (टॉवर बाग) नागरीकांसाठी खुला करण्यांत आला आहे व मिनी ट्रेन ही सुरु करण्यांत आली आहे. त्यामुळे नागरीक व लहान मुले याची जास्त प्रमाणात गर्दी होत आहे.

सदर मिनी ट्रेन विना मुल्य असल्यामुळे नागरीक व लहान मुले दररोज येत आहे व तीन ते चार वेळा बसत आहे. तरी तिकीट दर लावणे गरजेचे असल्याने खालील प्रमाणे दर आकारणी करणेस मंजुरी देण्यांत येत आहे

| | | सुधारीत दर |
|---|---|---|
| १) | प्रवेश फी | २/- रु |
| २) | मिनी ट्रेन( लहान मुले) | ५/- रु. |
| ३) | प्रोढांसाठी | १०/- रु. (१५ वर्षापुढील) |

प्रवेश फी चे दर हे सहा महिन्याकरिता आकारण्यांत यावेत. तदनंतर त्याबाबत नवीन वाढीव सुधारीत दर लागू करणेबाबत निर्णय घेण्यांत येईल. सदर नवीन दर सुधारीत आकारणी १ ऑगस्ट २०१४ पासून करण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४४ महाराष्ट्र सुजल निर्मल अभियाना अंतर्गत सुधारणा कामातील अनियमिततांबाबत अनुपालन अहवाल स्थायी समिती पुढे निर्णयास्तव सादर

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४७ दिनांक २२/०७/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र शासन/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रं./ सुनिअ/२००३/प्र.क्र.१८०पापु-२२मंत्रालय मुंबई ३ दि.८ जुलै २००९ नुसार धुळे महानगरपालिकेस पाणीपुरवठा विभागातंर्गत सुधारणा कामे करणेसाठी उपरोक्त संदर्भानुसार १ ते १८ कामांत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली होती.उक्त प्रस्तावांचे एकुण ढोबळ किंमत ५,५३,३७,९०० अशी होती. त्यात खालील १ ते १८ कामो व सुधारणांचे कामे प्रस्तावित होती.उक्त प्रस्तावातंर्गत मनपास आतापर्यत रु.१९४ लक्ष एवढे अनुदान प्राप्त झाले आहे.

उक्त प्रस्तावातंर्गत पाणीपुरवठा योजनांसाठी ग्राहक सर्वेक्षण,बल्क फ्लो मिटर हायड्रोलिक मॉडेलींग,जी.आय.एस.बिलींग व वसुली इत्यादी सुधारणांसाठी रु. २००००००० /- मात्र मंजूर झाली होती. उक्त अंतर्गत योजनेचे अंदाजपत्रक रुपये १५७३०७००/- मात्र तयार करण्यात आले होते.

उक्त कामी प्रस्ताव मा. मुख्य लेखा परीक्षक धुळे मनपा धुळे यांचेकडे तपासणी झाली असता त्यांचे कार्यालयातील पत्र क्रं./धुमपा/लेप/सुजल निर्मल/१३१ दि. ३/८/११ नुसार प्रस्तावातील अनियमितता निदर्शनास आणल्या आहेत.

उक्त बाबतच्या विषय या पूर्वी स्थायी समिती ठराव नं.१३० दि.३१/१०/२०१२ नुसार उक्त १ ते ६ विषयाबाबत चौकशी समिती गठीत करण्याचा व विशेष लेखा परीक्षण करण्याचा आदेश पारीत झाला होता.

उक्त बाबत शेरे पुर्तता सदर प्रस्ताव कामातील अनियिमतता बाबत अनुपालन अहवाल मे. स्थायी समिती समोर निर्णयासाठी सादर झाला असता सदर प्रस्ताव हा अपूर्ण स्वरुपात असून अस्पष्ट व संदिग्ध आहे त्यामुळे यातील मुद्दे अनुत्तरीत स्वरुपात आहेत. याबाबत पुनश्च सविस्तर व मुद्दे सुद अहवाल सादर करावा. तसेच सदर अहवाल मुख्य लेखा परीक्षक यांचेकडून तपासून पुढील स्थायी समितीच्या बैठकीत निर्णयार्थ सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**मंगळवार दिनांक १२ऑगस्ट, २०१४**
**वेळः-सकाळी ११-००वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज मंगळवार १२/८/२०१४ रोजी सकाळी११-००वाजतां मा श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती,स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ७ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| १० | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ११ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १२ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १३ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १४ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. दौलतखा पठाण | आयुक्त |
| २. | श्री. के.व्ही. धनाड | अति. आयुक्त |
| ३. | श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ४. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त तथा सहा.आयुक्त (कर) |
| ५. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त |
| ६. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता बांधकाम वि. |
| ७. | श्री. पी.आर. दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ८. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ९. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| १०. | श्री. एम.आर. सराई | मुख्य लेखा परीक्षक |
| ११. | श्री. के.ना कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| १२. | डॉ. महेश मोरे | आरोंग्याधिकारी |
| १३. | श्री.रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १४ | श्री. एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक तथा जकात अधिक्षक |
| १५ | श्री. के. जी. सुडके | अधिक्षक एल. बी. टी. विभाग |
| १६ | श्री.के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १७ | श्री. सी. एम. उगले | ओव्हरसिअर |
| १८ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १९ | श्री.राजू माईनकर | भांडार लिपीक |
| २० | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |
| २१ | श्री. पी. डी.नाईक | प्र. लेखापाल |

विषय क्रमांकः-४५ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(१०/१०/२०१३, ३०/१०/२०१३,६/११/२०१३,१३/२/२०१४,(१७/२/२०१४अंदाजपत्रक बेठक) २८/२/२०१४, ६/५/२०१४, १९/५/२०१४)

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. सभापती इतिवृत्ताचे बंच सर्वाना विषय पत्रिकेसोबत देण्यांत आलेले आहे. त्यासंदर्भात कोणाचे काही म्हणणे असेल तर मांडावे.

म. फिरोज शेख इतिवृत्त कायम करण्यांत यावे.

म.सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त क्रमशःवाचून कायम करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४९ दिनांक १२/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा

१) स्थायी समिती ठराव नंबर ६९ ते ७६ दि. १०/१०/२०१३ अखेर
२) स्थायी समिती ठराव नंबर ७७ ते ८६ दि. ३०/१०/२०१३ अखेर
३) स्थायी समिती ठराव नंबर ८७ ते ९१ दि. ६/११/२०१३ अखेर
४) स्थायी समिती ठराव नंबर १ दि. १३/२/२०१४ अखेर
५) स्थायी समिती ठराव नंबर २ दि. १७/२/२०१४ अखेर
६) स्थायी समिती ठराव नंबर ३ ते ६ दि. २८/२/२०१४ अखेर
७) स्थायी समिती ठराव नंबर ७ ते ९ दि. २८/२/२०१४ अखेर
८) स्थायी समिती ठराव नंबर १० ते २३ दि. ६/५/२०१४ अखेर

९) स्थायी समिती ठराव नंबर २४ ते २७ दि. १९/५/२०१४ अखेर
वरील प्रमाणे ठराव क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-४६ सन २०१३-१४चे वार्षिक लेखे मे.स्थायी समितीकडे मंजूरीस्तव सादर.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५० दिनांक १२/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपाचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षाचे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम ९४ अ नुसार व लेखा संहिता १९७१ नियम ६० व नमुना २८ नुसार तयार केलेले असून उक्त लेख्यांा मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व सुचनेनुसार सेवा निवृत्त झालेल्या कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगानुसार फरकाची रक्कम देण्यासाठी आस्थापना विभागामार्फत सेवानिवृत्तीच्या दिनांकाप्रमाणे तयार असलेल्या यादीनुसार दरमहा १० सेवा निवृत्त कर्मचा-यांना फरकाच्या रकमा अदा करणेस मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-४७ विशेष निधी अंतर्गत अल्पसंख्याक समाजासाठी जामचा मळा भागात धुळे स.नं. ४६९,४७० या जागेत १० लक्ष लिटर क्षमतेची पिण्याच्या पाण्याची टाकी बांधणे व इतर अनुषंगिक कामे करणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५१ दिनांक १२/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका हद्दीतील अल्पसंख्याक समाजाची दाटवस्ती असलेल्या भागातील नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविणेसाठी पाण्याची नवीन टाकी बांधण्याकरिता महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्रं. पुरक २०१३/प्र.क्र.३०६/नवि -१६ मंत्रालय मुंबई ३२ दि. १० जानेवारी २०१४ रोजी रुपये २.०० कोटी अनुदान मंजूर केले असून प्रत्यक्ष देय अनुदान १.६० कोटी रुपये आहे.उक्त अनुदान हे विशेष अनुदान असल्याने उक्त बाबत मा.विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांची प्रशासकीय मान्यता घेणेबाबत आदेशित केले आहे.

विशेष अनुदानातील कामे करणेसाठी धुळे मनपा ठराव आवश्यक असल्याने धुळे मनपा ठराव नंबर ३०(ग) दि.१५/५/२०१४ अन्वये अल्पसंख्याक समाजाची दाट वस्ती असलेल्या जामचा मळा भागात धुळे स.नं. ४६९,४७० या अभिन्यासातील खुल्या जागेत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याकरिता १० लक्ष लिटर क्षमतेची टाकी बांधणेसाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये २०७९९८५७/- इतकी असून शासन अनुदान वजा जाता उर्वरीत रक्कम मनपा निधीतून खर्च करण्यांस मान्यता दिलेली आहे.

अल्पसंख्याक समाजासाठी जामचा मळा भागात नवीन १०लक्ष लिटर क्षमतेची जलकुंभ बांधणे,साठवण टाकी,गुरुत्व वाहिनी,लिडींग मेनची कामे करणे इ.साठी मा. अधिक्षक अभियंता,महाराष्ट्र जिवन प्राधिकरण नागरी व ग्रामीण योजना मंडळ नाशिक यांनी रुपये २.०७,९९,८५७/- मात्र किंमतीच्या अंदाजपत्रकास क्रं.८ दिनांक २१/५/२०१४ अन्वये

तांत्रिक मान्यता प्रदान केलेली आहे.उक्त कामास मा.विभागीय आयुक्त नाशिक त्यांचे कडील पत्र क्रं.नपा/२/२/ जा.क्रं.६५०३ दि.६/८/२०१४ अन्वये त्रिसदस्य समितीने रु.२,०७,९९,८५७/- मात्र खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे.

उक्त कामाची ई निविदा नंबर ६३ /२०१३-२०१४ दिनांक ३/३/२०१४ अन्वये दैनिक देशदूत मध्ये ई निविदा प्रसिध्द करण्यांत आली असता एकुण ३ निविदाधारकांनी निविदा प्रकियेत भाग घेतला आहे.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | सन राईज कंन्स्ट्रक्शन नाशिक | ४० टक्के जास्तीने |
| २ | पी.एल. आडके नाशिक | ४२ टक्के जास्तीने |
| ३ | एस.आर. ग्रुप नाशिक | ४५ टक्के जास्तीने |

उक्त निविदा धारकांपैकी सन राईज कंन्स्ट्रक्शन नाशिक यांची आलेले निविदा दर ४० टक्के जास्तीने सर्वात कमीने आलेली आहे.

त्यांना इकडील कार्यालयीन पत्र क्रं.बांधकाम विभाग/७९ दि.२७/५/२०१४ रोजी निगोसिएशनला बोलविले असता त्यांनी दिनांक २/७/२०१४ रोजी पत्र देऊन निविदेतील प्राकलन दरापेक्षा २८.०२ टक्के जादा दराने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे. म्हणजेच रुपये २,५०,५१,२५४/-इतक्या रकमेत काम करण्यांची तयारी दर्शविली आहे.

उक्त बाबत निविदेतील कामाची किंमत१,९५,६८,२३५/-असून सदरचे अंदाजपत्रक चालू दरसूचीनुसार आहे. परंतु कार्पोरेशन चार्जेस५ टक्के,लेबर सेल्स १ टक्का, एल.बी.टी.४ टक्के,इत्यादी बाबी गृहीत धरल्या असता कामाची किंमत२,०६,५०,८४४/- इतकी येत आहे. म्हणजे निविदा पेक्षा ५.५३ टक्के जास्तीने येत आहे. उक्त बाबतचा फरक ठेकेदारास देय आहे. त्यात ५.५३ टक्के जास्त दरापेक्षा अधिक दर ठेकेदारास देणे योग्य होणार नाही. असा कार्यालयीन अहवाल सादर झालेला आहे.

कार्यालयीन निवेदनाचा व सन्मा.सदस्यांच्या सुचनांचा विचार करता निविदेतील सर्वात कमी दर असलेल्या सन राईज कन्स्टक्शन कंपनी नाशिक यांना दर वाटाघाटीसाठी बोलविणेबाबत मा.आयुक्त यांना प्राधिकृत करण्यांत येत आहे.सदर संस्था ५.५३ टक्के जास्त दराने काम करण्यांस तयार झाल्यास सदरचे काम त्या संस्थेस देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. संबंधित संस्थेने दर कमी करण्यांस नकार दिल्यास प्रशासनाने सदर कामाचे त्वरीत फेर निविदा काढण्यांची कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिति,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-४८ धुळे शहरातील विविध भागातील १५जलकुंभाची साफसफाईचे काम तांतडीने मुस्लीम मेहत्तर एकता स्वयं.सेवा सह.संस्था यांचेकडून करुन घेण्यांत आले तदर्थ झालेला खर्च रु.१,७१,०५०/- मात्रला खर्चास व दरास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिति ठराव नंबर ५२ दिनांक १२/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा.महापौर मॅडम व स्थायी समिति सभापती सो.यांच्या दालनात चर्चा झाल्यानुसार जलकुंभांची साफसफाई करणे बाबत सूचित केल्याने मा. आयुक्त सो. यांच्या आदेशानुसार दि.१०/६/२०१४ पासून टप्याटप्याने जलकुंभाची साफ सफाई करण्यात आलेली आहे. दि.३/७/२०१४ पर्यत साफसफाई करण्यांत आलेले जलकुंभ खालील प्रमाणे

| अ.नं. | जलकुंभाचे नांव | क्षमता |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | मायक्रोव्हेव जलकुंभ | १४ लाख लिटर्स |
| २ | सिमेंट जलकुंभ | १२ लाख लिटर्स |
| ३ | कै. मधुबापू माळी जलकुंभ वरखेडीरोड | १० लाख लिटर्स |
| ४ | रामनगर जलकुंभ | १७ लाख लिटर्स |
| ५ | दसेरा मैदान जलकुंभ | १३ लाख लिटर्स |
| ६ | नेहरु नगर जलकुंभ | ४.५ लाख लिटर्स |
| ७ | मोहाडी जलकुंभ ( पिराची टेकडी) | १० लाख लिटर्स |

सदर जलकुंभाची साफसफाई यापूर्वी संस्कृती मल्टी सर्व्हीसेस यांचेकडून दि. १८/२/२०१२ ते २४/३/२०१२ पर्यत केलेले होते.

वरील ७जलकुंभाची साफसफाई करण्यांचे काम मुस्लीम महेत्तर एकता स्वयं. सेवा सहकारी संस्था यांचेकडून विना निविदा करुन घेतलेले आहे.सदर कामाकरिता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाच्या सन २०१३-१४ च्या मंजूर दर सूचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यांत आले असून अंदाजपत्रकीय खर्च रु.१,७१,०५०/- मात्र आहे.

सदरचे काम तांतडीने करणे पाणीपुरवठयाच्या दृष्टीकोनातून अति आवश्यक व गरजेचे असल्याने सदरचे काम मुस्लीम महेत्तर एकता स्वयं सेवा सहकारी यांचेकडून विना निविदा करुन केलेले असल्याने सदरच्या होणा-या खर्चास रु.१,७१,०५०/-मात्र व दरास मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड (क) च्या तरतुदी नुसार प्रकरण संविधा कलम २ (२) च्या परंतुकानुसार कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. तथापि सदर नियम म.आयुक्त यांनी तपासून घ्यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-४९ बांभळे जलशुध्दीकरण केंद्र येथील प्युअर वॉटर पंपींग स्टेशन येथील३५०एच.पी.पंप सेट क्रं. ३ची दुरुस्ती करणे तांतडीने मे.फ्रेडस इंजिनिअरींग यांचेकडून करुन घेण्यांत आले.तदर्थ झालेला खर्च रुपये१,१३,४९९/-मात्र खर्चास व दरास कार्योत्तर मंजुरीदेणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५३ दिनांक १२/०८/२०१**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे दिनांक ३०/६/२०१४ रोजी दुपारी ३-१५ वाजतां सदरचा पंप सुरळीत सुरु असतांना पंपात मोठया प्रमाणात आवाज झाल्याने पंप बंद करणे बाबत श्री.खैरनार व भट यांच्या भ्रमणध्वनी निरोपानुसार मेन्टनन्स इन्चार्ज व कर्मचा-यांना सदर ठिकाणी पाठवून त्यांनी मोटार व बेअरींग बॉक्स खोलून पाहिले असता सदरच्या बेअरींग बॉक्स मधील बेअरींग फुटल्याने ऑईल बाहेर फेकल्या गेल्याचे निदर्शनास आले. तसेच पंपाचे डिसचार्ज हेड खोलण्यांत येवून पाहिले असता पंपाच्या टॉप शॉप-टला गाळा पडल्याचे व ग्लाईड बॉक्स चे ब्रासचे बुच पूर्णपणे घासले गेल्याचे लक्षांत आले.

सद्यस्थितीत तापी पाणीपुरवठ ा बांभळे शुध्द पाणी पंपींग स्टेशन येथे एकुण ४ पंप कार्यान्वीत असून सदरचा सेट क्रं.३ साठी लागणा-या साहित्याचा पुरवठा व वर्कशॉपची कामे मे.फ्रेंडस इंजिनिअरींग वर्क्स यांच्या कडून करवून घेवून सदर पंपाच्या खोल फिटींगचे काम आपल्या महानगरपालिका पाणीपुरवठा विभागातील मेन्टनन्स कर्मचारी यांचेकडून करवून घेतलेले आहे. सदरच्या पंपाचे काम पाणीपूरवठा सुरळीत राहण्याच्या दृष्टीकोनातून विना निविदा मे.फ्रेडस इंजिनिअरींग यांचेमार्फत करण्यांत आलेले आहे.

सदरच्या कामासाठी बाजार भावाप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून अंदाजपत्रकीय खर्च रुपये १,१३,४९९/- मात्र आहे.सदरचे काम मे.फ्रेंडस इंजिनिअरींग

यांचेकडून तांतडीने विना निविदा करुन घेण्यांत आले असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड (क)च्या तरतुदीनुसार प्रकरण ५ संविधा कलम २ (२)च्या परंतुकानूसार खर्च रु.१,१३,४९९/- मात्र व दरास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. तथापि सदर नियम म.आयुक्त यांनी तपासून घ्यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-५० तापी पाणीपुरवठा योजनेवरील सुकवद रॉ वॉटर पंपींग स्टेशन ते दाभाडी फाटा पर्यम १००० एम.एम./डी.एस.सी पाईप लाईन लिकेजेस काढणेचे काम तांतडीने विना निविदा श्री.के.जी. शिंदे यांचेकडून करुन घेण्यांत आले.तदर्थ झालेला खर्च रुपये ३,१०,१२१/- मात्र खर्चास व दरास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५४ दिनांक १२/०८/२०१**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे तापी पाणीपुरवठा सुकवद रॉ वॉटर पंपींग स्टेशन ते दाभाडी फाटा पर्यत १००० मी.मी. ची पीएससी पाईप लाईन आहे व हया पीएससी १००० मी.मी.पाईप लाईनला ६ ठिकाणी दीड मिटरचे १००० मी.मी. /एम.एस. पाईप जोडलेला आहे. पूर्वी महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागामार्फत या ठिकाणी उक्त २ एअर व्हॉल्व होते. मात्र आपल्या महानगरपालिकेमार्फत सन २०१३ मध्ये ६ नग एअर व्हॉल्व बसविण्यांत आले असून वरील साधारणतः ३३ मिटर च्या परिसरात यापूर्वी पाईप लाईन एअर प्रेशरने फूटून संबंधित शेतक-याचे फार मोठया प्रमाणात पिंकाचे नुकसान झालेले होते.त्यामुळे सद्यस्थितीत वरील उल्लेख केलेल्या ३ ठिकाणी १०००एम.एम /एम.एस.पाईप लाईनला गळती लागलेली असून एका ठिकाणी पीएससी १००० मि.मी.पाईप लाईनला जॉईन्ट मधून गळती सुरु होती.

सदरचे ठिकाणचे शेतकरी वरील लिकेजेस बाबत आयुक्त साो.कड ेतक्रार केल्याने त्यांच्या आदेशानुसार पाणीपुरवठा एक दिवस बंद करुन लिकेज काढून गळती बंद करणे बाबत चर्चा केली मात्र दि.२१/६/२०१४ रोजी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचा विद्युत प्रवाह पुरवठा ६ तास बंद होत असल्याने आदल्या दिवशी दुरुस्ती बाबतचे सर्व नियोजन करुन वरील चार व वरखेडी रोड येथील एअर व्हॉल्वचे टेलपिस पूर्णपणे गंजून निकामी झाल्याने अचानक फार मोठया प्रमाणात गळती झाल्याने मा.अभियंता व ओव्हरसिअर चव्हाण यांच्या सुचनेनुसार सदरचे टेलपीस काढून वेल्डींग पॅचवर्क्स करुन लिकेज पूर्णपणे बंद करण्यांत आले.सदरच्या गळतीचे काम मे. के.जी.शिंदे (ठेकेदार) नरडाणा यांचेकडून विना निविदा करवून घेतलेले आहे. सदरचे काम तांतडीने व पाणीप ुरवठयाच्या दृष्टीकोनातून अति आवश्यक असल्याने मे.के.जी. शिंदे (ठेकेदार) यांचेकडून करवून घेतलेले असल्याने तसेच सदरच्या कामाकरिता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण विभागाच्या २०१२-१३ च्या मंजूर दरसूचिप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले असून अंदाजपत्रकीय खर्च ३,१०,१२१/- मात्र आहे.

सदरचे काम तांतडीने मे.के.जी.शिंदे (ठेकेदार) यांचेकडून विना निविदा करुन घेण्यात आले असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३खंड (क)च्या तरतुदीनुसार प्रकरण संविधा कलम २(२) च्या परंतुकानुसार खर्च रु.३,१०,१२१/- मात्र व दरास कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.तथापि सदर नियम म. आयुक्त यांनी तपासून घ्यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ५१ बी.आर.जी.एफ.योजनेअंतर्गत सुशीनाल्यास संरक्षण भिंत बांधणेचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५५ दिनांक १२/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे बी.आर.जी.एफ. योजनेअंतर्गत सुशीनाल्यास संरक्षण भिंत बांधणेचे कामाबाबत रक्कम रुपये १,३५,१५,९७७/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे. उक्त बाबत म.जि.प्र.नाशिक यांचे पत्र क्रं.०९ दि.९/६/२०१४अन्वये रक्कम रुपये १,३५,१५,९७७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र.बां.वि./२८/१४-१५ दि. १८/६/२०१४ अन्वये दिनांक १९/६/२०१४ रोजीचे दैनिक श्रमराज्य/लोकमत या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दि.२५/७/२०१४ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे. कृष्णा एंटरप्राईजेस धुळे | शे. ५% जास्तीने | |
| २ | मे. समीर एंटरप्राईजेस | शे. ३ % जास्तीने | |
| ३ | मे. गायत्री कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने | |

ठेकेदार मे.गायत्री कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.कंत्राटदारमे.गायत्री कन्ट्रक्शन यांचे सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराने आलेले दरास मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार संबंधितांकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-५२ मे.संमिक्षा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांची साफसफाई ठेक्याची मुदत संपल्याने त्याबाबत पुढील निर्णय घेणेसाठी आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५६ दिनांक १२/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे शहरातील घंटागाडीव्दारे घर स्तरावर कचरा गोळा करणेकामी व विविध भागातील घनकचरा उचलणेकामी समिक्षा कंन्स्ट्रक्शन कंपनी यांना मे. स्थायी समिती ठराव नंबर१८ दिनांक ३०/३/२०१३ अन्व्ये जा.क्र. धुमपा/आरोग्य /१२० दि. १४/५/२०१३अन्वये दि.१/६/२०१३पासून एक वर्ष(सुरुवातीला एक वर्ष व काम समाधान कारक असल्यास पुढील ४वर्षे) रु.७८०प्रति मे.टन प्रमाणे ठेका देण्यांत आला होता. त्यांची सदर एक वर्षाची मुदत संपल्याने त्यांच्या कामाबाबत सन्मा.नगरसेवक व पदाधिकारी यांच्या तक्रारी येत असल्याने त्यांना मुदतवाढ न देता व पुढील प्रशासकीय कामाच्या सोयीसाठी शहरातील प्रभागाचे ४ झोन तयार करुन४ प्रत्येक झोन साठी धर स्तरावर कचरा गोळा करणे शहरातील सर्व जागेवरील,रस्त्यावरील, रस्त्याच्या कडेवरील, गटारीतील गाळ व मलबा मार्केटमधील कचरा,मेलेली जनावरे इत्याद उचलणे कामी एकत्रित मासिक खर्च ठरवून येणा-या खर्चावर ४ झोन तयार करुन ४ ही झोन साठी ठेकेदार नेमणे कामी दर मागविण्यास व येणा-या संभाव्य खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.

तसेच संबंधित ठेकेदार नियुक्तीनंतर त्यांनी केलेल्या कामाबाबत भागातीले स्वच्छता निरीक्षक यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सन्मा.नगरसेवकांचे काम पूर्ततेबाबत लेखी पत्र घेऊनच ठेकेदारांच्या देयका बाबत कार्यवाही करावी.संबंधीतवार्डातील नगरसेवकांची संमती नसल्यास त्या प्रभागातील कामांची देयके अदा करणे बाबतची कार्यवाही काम पूर्ण

होई पावेतो स्थगित ठेवावे.याबाबत करारनाम्यातील अटी शर्ती मध्ये या बाबीचा समावेश करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**मंगळवार दिनांक १९ऑगस्ट,२०१४**
**वेळ:-सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज मंगळवार १९/८/२०१४ रोजी सकाळी ११-००वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्रीमती वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ३ | श्रीमती बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ४ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ५ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ६ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ७ | श्री. शेख फिरोज शेख बशीर | सदस्य |
| ८ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ९ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १० | श्री.परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ११ | श्रीमती ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १२ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| १३ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १४ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.दौलतखा पठाण | आयुक्त |
| २. | श्री.त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त तथा सहा.आयुक्त (कर) |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त |
| ४. | श्री.बी. बी. गिते | सहा.आयुक्त (अतिक्रमण) |
| ५. | श्री. डी.बी. देवरे | कार्यकारी अभियंता |
| ६. | श्री. एस.बी.विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए.वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री.के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| १०. | डॉ. महेश मोरे | आरोंग्याधिकारी |
| ११. | श्री.रत्नाकर माळी | सहा.आरोग्याधिकारी |
| १२. | श्री. के.जी. सुडके | अधिक्षक एल.बी.टी.विभाग |
| १३. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १४ | श्री.गणेश खोंडे | प्रकल्प अधिकारी |
| १५ | श्री. एस.एस. देवरे | शाखा अभियंता पा.पु. वि. |
| १६ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १८ | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १९ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २० | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |
| २१ | श्री. पी.डी. नाईक | प्र. लेखापाल |

**सभेच्या सुरुवाती सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.**

**विद्यमान नगरसेविका श्रीमती वालिबेन मंडोरे यांचे पती श्री.प्रकाशचंद्र रुपचंदजी मंडोरे यांचे आज सकाळी ८-०० वाजतां नाशिक येथे उपचार घेत असतांना निधन झाले आहे. त्यांना श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.**

**सुचक :- श्री. चंद्रकांत काशिनाथ केले,सभापती**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ दिनांक १९/०८/२०१४**

सन्मा.सभापती यांचे यादीनुसार धुळे महानगरपालिकेच्या सन्मा. नगरसेविका विरबालादेवी प्रकाशचंद्र मंडोरे (बालीबेन) यांचे पती व सरदार सोप प्रॉडक्टचे मालक सामाजिक कार्यकर्ते प्रकाशचंद्र मंडोरे यांचे आज सकाळी ८-०० वाजतां नाशिक येथे उपचार घेत असतांना निधन झाले आहे.

मान्यवरांचे दु:खद निधननिमित्त या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-५३ विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील पारोळारोड ते वरखेडीरोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व कॉक्रीट गटार करणे कामाचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म. नगरसचिव नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म. सभापती सर्व सन्मा.सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तवास कार्यालयीन टिपणीनुसार मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५९ दिनांक १९/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत धुळे मनपा हद्दीतील पारोळारोड ते वरखेडीरोड पावेतो रस्ता डांबरीकरण करणे व कॉक्रीट गटार करणे कामाबाबत धुळे मनपा ठराव क्रं.२१ दि. ३१/१/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ७४,२७,८६२/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्र.जळगांव यांचे पत्र क्रं. १००३दि.१३/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ७४,२७,८६२/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र. बां.वि./२६/१४-१५ दि. ११/६/२०१४ अन्वये दिनांक १२/६/२०१४ रोजीचे दैनिक देशोन्नती /आपल नवराज्य या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दि.२२/७/२०१४ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | मे. गायत्री कन्स्ट्रक्शन | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | मे. ईश्वरी कन्स्ट्रक्शन | शे. ५ %जास्तीने |
| ३ | मे. समर्थ कन्स्ट्रक्शन | शे ३% जास्तीने |

ठेकेदार मे.गायत्री कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त अहवालानुसार कंत्राटदार मे.गायत्री कन्ट्रक्शन यांचे अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमीने आलेल्या दरांस मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार संबंधितांकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-५४ विशेष निधी अंतर्गत संगमा चौक ते बायपास हायवे पर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६० दिनांक १९/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत संगमा चौक ते बायपास हायवे पर्यत रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे मनपा ठराव क्रं.दि.३१/१/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ५८,३९,३०८/-मात्र खर्चासआर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.

उक्त बाबत म.जि.प्र.जळगांव यांचे पत्र क्रं.१०२४ दि. १३/२/२०१४ अन्वये रक्कम रुपये ५८,३९,३०८/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र.बां.वि./२६/१४-१५ दि.११/६/२०१४अन्वये दिनांक१२/६/२०१४ रोजीचे दैनिक देशोन्नती /आपल नवराज्य या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा

प्रसिध्द करणेत येवून दि. २२/७/२०१४ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | श्री. पी.एस. कोतकर | शे. १ % जास्तीने |
| २ | मे. रामनंदिनी कन्स्ट्रक्शन | शे. २% जास्तीने |
| ३ | श्री. जे.व्ही. पाटील | अंदाजपत्रकीय दराने |

ठेकेदार श्री.जे.व्ही. पाटील यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्तप्रमाणे आलेल्याअहवालानुसार कंत्राटदार श्री.जे.व्ही. पाटील यांचे अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमीने आलेल्या दरांस मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार संबंधितांकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ५५ विशेष निधी अंतर्गत ६० खोली ते कापडणीस यांच्या घरापावेतो सिमेंट कॉक्रीट रोड बनविणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६१ दिनांक १९/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत ६० खोली ते कापडणीस यांच्या घरापावेतो सिमेंट कॉक्रीट रोड बनविणे कामाबाबत धुळे मनपा ठराव क्रं.२१दि.३१/१/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये ७४,९२,९००/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे. विभागीय आयुक्त नाशिक यांचे पत्र क्रं.२९२८१६ दि.४/३/२०१४ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

उक्त बाबत म.जि.प्र.जळगांव पत्र क्रं. १२७ दि.१९/६/२०१४ अन्वये रक्कम रुपये ७४,९२,९००/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र. पा.पृ./३१ /१४-१५ दि.२७/६/२०१४ अन्वये दिनांक २८/६/२०१४रोजीचे दैनिक लोकमत या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दि.२९/६/२०१४रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी निविदे बाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | श्री. ए.बी. वाघ | शे. १२ % जास्तीने |
| २ | श्री. बी.आर. भदाणे | शे. १५% जास्तीने |
| ३ | श्री. दिपक डी. अहिरे | शे. १० % जास्तीने |

ठेकेदार श्री.दिपक डी.अहिरे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

कत्राटदार श्री. दिपक डी. अहिरे यांचे दर शे. १० टक्के जास्तीने आले असून सदर दर खूपच जास्त आहेत. म्हणून ठेकेदार यांना इकडील. जा.क्र. ३७० दि. १३/८/२०१४अन्वये वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी दि. १४/८/२०१४ रोजी लेखी पत्र देऊन सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणे तयारी दर्शविली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्याअहवालानुसार कंत्राटदार श्री. दिपक अहिरे यांचे वाघाटीअंती अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमीने आलेल्यादरांस मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार संबंधितांकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५६ विशेष निधी अंतर्गत ६० खोली ते कापडणीस यांच्या घरापावेतो गटार बनविणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६२ दिनांक १९/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत ६० खोली ते कापडणीस यांच्या घरापावेतो गटार बनविणे कामाबाबत धुळे मनपा ठराव क्रं.२१ दि.३१/१/२०१४ अन्वये मा. आयुक्त धुळे महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दि.२६/६/२०१४ अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपय ६७,१५,७३०/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेत आली आहे.विभागीय आयुक्त नाशिक यांचे पत्र क्रं.२९७८१५ दि.४/३/२०१४अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

उक्त बाबत म.जि.प्र.जळगांव पत्र क्रं. १८४८ दि.१९/६/२०१४अन्वये रक्कम रुपये ६७,१५,७३०/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र.पा.पु./३१/१४-१५दि. २७/६/२०१४ अन्वये दिनांक२८/६/२०१४ रोजीचे दैनिक लोकमत या वृत्तपत्रामधून खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दि.२९/६/२०१४ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहेत.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | श्री. ए.बी. वाघ | शे. १२ % जास्तीने |
| २ | श्री.भाऊसाहेब रावण भदाणे | शे. १५% जास्तीने |
| ३ | श्री. दिपक डी. अहिरे | शे. १० % जास्तीने |

ठेकेदार श्री.दिपक डी.अहिरे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमा प्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

कत्राटदार श्री. दिपक डी.अहिरे यांचे दर शे. १० टक्के जास्तीने आले असून सदर दर खूपच जास्त आहेत.म्हणून ठेकेदार यांना दि.१३/८/२०१४अन्वये वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी दि.१४/८/२०१४ रोजी लेखी पत्र देऊन सदर काम अंदाजपत्रकीय दराने करणसे तयारी दर्शविली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्याअहवालानुसार कंत्राटदार श्री.दिपक अहिरे यांचे वाघाटीअंती अंदाजपत्रकीय दराने सर्वात कमीने आलेल्यादरांस मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार संबंधितांकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ५७ धुळे शहर पाणीपुरवठा योजनेअंतर्गत (UIDSSMT) P.M.C.नेमणूक करणेंसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६३ दिनांक १९/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिकाअंतर्गत (UIDSSMT) पाणी पुरवठा योजने मंजूर झालेली असून त्यासाठी तांत्रिक सल्लागार नेमणूकीकरिता ( P.M.C.करिता) फेर निविदा प्रसिध्द करण्यांत आली होती. त्यांची दिनांक ३१/७/२०१४

रोजी शेवटच्या दिवशी ३ निविदा धारकांनी निविदाप्राप्त झालेल्या होत्या. त्यानुसार सदरची निविदा उघडण्यात आल्या. दिनांक ७/८/२०१४ रोजी ५-०० वाजतां टेक्नीकल बोड व कमिशियल उघडण्यात आले.

त्यानुसार ऑन लाईन टैंडर उघडण्यात आले असता त्यात दोन निविदा धारकांनी निविदा डाऊन लोड केली त्यानुसार तयांचे भाव दर खालील प्रमाणे आहे.

**१)** वाप्फोस लिमिटेड गांधीनगर १.९९ %

**२)** प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर पुणे ०. ९५ %

तरी वरील प्रमाणे प्रायमुव्ह इन्फ्रास्ट्रक्चर पुणे यांचे दर ०.९५% हे कमी असल्याने त्याच्या दरास मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार संबंधितांकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ५८ धुळे शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत बडगुजर जलकुंभ येथे २५ लक्ष लिटर क्षमतेची नवीन उंच जलकुंभ बांधणेचे काम ठेकेदार श्री.एम.आर.जाधव धुळे यांना देण्यांत आले होते. ठेकेदार यांनी एम २५ ऐवजी एम ३० ग्रेडचे कॉक्रीट केलेले आहे. त्या फरकाची रक्कम मिळणे तसेच काम पूर्ण करणेस ३१ डिसेंबर २०१४ पर्यत मुदतवाढ मिळणे बाबत पत्र सादर केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६४ दिनांक १९/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत बडगुजर जलकुंभ येथे २५ लक्ष लिटर क्षमतेची नवीन उंच जलकुंभ बांधणेचे काम ठेकेदार श्री.एम.आर.जाधव धुळे यांना देण्यांत आले होते. ठेकेदार यांनी एम २५ ऐवजी एम ३० ग्रेडचे कॉक्रीट केलेले आहे.त्या फरकाची रक्कम रु.३३,८१,७३०/- मिळणे तसेच काम पूर्ण करणेस ३१ डिसेंबर २०१४ पर्यत मुदतवाढ मिळणे बाबतचा प्रस्ताव चर्चेस आला असता,उपस्थित सन्मा. सदस्यांनी चर्चा केल्यानुसार संबंधित ठेकेदाराने मुदतीत काम पूर्ण केलेले नाही.प्रशासनाने दिलेल्या कार्यालयीन अहवालात अस्पष्टता असून सदर विषय पुढील बैठकीत सादर करावा. तो पावेतो सदर विषय स्थगित करण्यांत मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ५९ मा.सभापती स्थायी समिती यांच्या दि.१४/८/२०१४ पत्रानुसार मनपा प्रशासकीय इमारतीसाठी निधी वर्ग करणे (एस्क्रो अकौंट उघडणे) बाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६५ दिनांक १९/०८/२०१४**

मा.श्री.चंद्रकांत काशिनाथ केले सभापती स्थायी समिती मनपा धुळे यांच्या दि.१४/८/२०१४च्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेमार्फत विशेष निधी अंतर्गत मनपा शाळा क्रं.१च्या आवारात प्रशासकीय इमारतीचे काम सुरु करण्यांत आलेले आहे.सदर इमारतीसाठी सुमारे ११ कोटी मात्र खर्च येणार आहे सदर इमारत ही महानगरपालिकेच्या कार्यकाळातील महत्वाची वास्तु असून धुळे शहराच्या सौदर्यात व विकासात भर घालणारी आहे. सदर प्रशासकीय इमारतीमुळे महापालिकेच्या कारभारातही सुधारणा होवून सर्व कार्यालय एकाच ठिकाणी आल्यामुळे कामकाज गतीमान होणार आहे.त्यामुळे सदर इमारतीचेकाम मुदतीत पूर्ण होणे तितकेच गरजेचे आहे. सदर इमारतीसाठी महानगरपालिकेला ५० टक्के हिस्सा म्हणजेच सुमारे ५.५० कोटी मात्र अदा करावा लागणार आहे.सदर हिश्याची रक्कम मोठया

स्वरुपात असल्याने एकाच वेळी सदर हिस्सा जमा करणे मनपाची आर्थिक स्थिती पाहता शक्य होणार नाही.व देयकांमुळे काम प्रलबीत राहण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यासाठी आतापासूनच सदर बाबतीत नियोजन करणे गरजेचे आहे.सबब महानगरपालिकेच्या दैनंदिन उत्पन्नातून सदर हिश्याची रक्कमेसाठी स्वतंत्र खाते उघडून (एस्प्रो अकौंट उघडणे) उक्त खात्यांत दररोज रु.१.५० लाख मात्र जमा करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. सदर खात्यात जमा होणारी रक्कम फक्त मनपा प्रशासकीय इमारतीच्या कामाच्या देयकांसाठीच वापरण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ६० धुळे मनपातील रोजंदारी कर्मचा-यांना रोजंदारी दरवाढ लागू करणेबाबत कर्मचारी संघटना यांची मागणी केली आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६६ दिनांक १९/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपातील रोजंदारी कर्मचा-यांना रोजंदारी दरवाढ लागू करणेबाबत कर्मचारी संघटना यांची मागणी केली आहे. त्यानुसार जा. क्र. धुमपा / आस्था/ २९७ दि.२४/६/२०१४ अन्वये सरकारी कामगार अधिकारी धुळे यांचेकडून रोजंदारी दर मागविणेत आले होते.त्यात त्यांनी खालीलप्रमाणे दर्शविलेले आहे.त्यातील अ.क्रं.२ परिमंडळ २ हा झोन सर्व नगरपालिकांसाठी असून परिमंडळ १ हा झोन सर्व महानगरपालिका झोनसाठी आहे.

| अ.क्रं. | वर्गवारी | परि-१ + महागाई भत्ता | एकुण |
|---|---|---|---|
| १ | कुशल | १०१००+ २८९८.७० | १२९९८.७० |
| २ | अकुशल | ९४००+ २८९८.७० | १२२९८.७० |
| ३ | अर्धकुशल | ८९००+२८९८.७० | ११७९८.७० |

सदर पत्रामध्ये मुळ वेतन + महागाई भत्ता एकुण वेतनाला २६ ने भगितल्यावर एक दिवसाचा पगार मिळतो.त्यानुसार खालील प्रमाणे एक दिवसाचे वेतन येते.

१.कुशल - १२९९८ / २६ = ४९९/-

२.अकुशल- १२२९८ / २६ = ४७३/-

३.अर्धकुशल ११७९८ / २६ = ४५३/-

वरील प्रमाणे एका दिवसाचे दर येतात.सद्यस्थितीत धुळे मनपाकडे कुशल कर्मचारी १७असून अकुशल कर्मचारी १३१ आहे.सद्यस्थितीत सदर कर्मचा-यांना खालील प्रमाणे रोजंदारी दर देण्यांत येत आहे.

१. कुशल = २८४ २.अकुशल = २८०

वरील कर्मचा-यांना नवीन रोजंदारी दर लागू केल्यास खालील प्रमाणे खर्चात वाढ होणार आहे.

१.कुशल २८४ नवीन दर ४९९ = २१५ वाढ

२.अकुशल २८० ४७३ = १९३ वाढ

सद्यस्थितीत आरोग्य विभाग व इतर विभागामध्ये रोजंदारी कर्मचारी कार्यरत आहे. मागील माहितीनुसार खालील प्रमाणे रोजंदारी खर्चात वाढ होईल.

१. कुशल १७ x २१५ = ३६५५ ३० =१,०९,६५०/-

२. अकुशल १३१ x १९३= २५२८३ ३० = ७,५८,४९०/-

वरील कुशल व अकुशल यांच्या वेतनावर एकत्रित एका महिन्यासाठी ८,६८,१४०/- आठ लक्ष अडुसष्ट हजार एकशे चाळीस) इतका खर्च तसेच ८,६८,१४० x १२ महिने

केल्यास १,०४,१७,६८०/- (एक कोटी चार लक्ष सतरा हजार सहाशे ऐंशी) इतका वार्षिक खर्च येण्याची शक्यता आहे.सद्यस्थितीत आस्थापना खर्च ४६ टक्के आहे.

यावर मा.आयुक्त सो.यांनी minimum wages Act प्रमाणे कार्यवाही करणे बंधनकारक आहे. असा अभिप्राय दिलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालाचा विचार करता व उपस्थित सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व त्यांच्या भावना लक्षांत घेता रोजंदारी कर्मचा-यांना minimum wages Act प्रमाणे रोजंदारी दर वाढ लागू करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.सदर ठरावाची अंमलबजावणी ठरावाच्या दिनांकापासून करण्यांत यावी.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह, धुळे**
**बुधवार दिनांक २७ ऑगस्ट,२०१४**
**वेळः-सकाळी ११-००वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज बुधवार २७/८/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ४ | श्री.साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ५ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ६ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ७ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ८ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ९ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १० | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ११ | श्रीमती.दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.दौलतखा पठाण | आयुक्त |
| २. | श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ३. | श्री.त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त तथा सहा.आयुक्त (कर) |
| ४. | श्री.बी. बी. गिते | सहा. आयुक्त (अतिक्रमण) |
| ५. | श्री.पी.आर.दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ६. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. एम.आर. सराई | मुख्य लेखा परीक्षक |
| ९. | श्री. के.ना कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| १०. | श्री.के.एन. शिंदे | अभियंता |
| ११. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| १२. | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १३. | श्री.रत्नाकर माळी | सहा.आरोग्याधिकारी |
| १४ | श्री.एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक तथा जकात अधिक्षक |
| १५ | श्री. के.जी. सुडके | अधिक्षक एल. बी. टी. विभाग |
| १६ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १८ | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १९ | श्री.एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| २० | श्री.महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं. |
| २१ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २२ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |
| २३ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |

विषय क्रमांक:-६१ धुळे मनपा सुतिकागृह दवाखाना येथे on call तत्त्वावर स्त्री रोगतज्ञ व बालरोगतज्ञ पॅनलची नियुक्ती करणे बाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६८ दिनांक २७/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका येथे सुतिकागृहात मोफत व प्रसुतीपुर्व व प्रसुतीपश्चात तपासणी करुन मोफत औषधी उपलब्ध करुन देण्याची सोय उपलब्ध आहे. या अंतर्गत धुळे मनपा सुतिकागृहात दरवर्षी साधारण १००० ते ११०० एवढया प्रसुती होत असतात. परंतु बऱ्याच वेळी प्रसूती होत असतांना गुंतागुंत निर्माण होते. अशा वेळी धुळे मनपाकडे तज्ञ डॉक्टर उपलब्ध नसल्याने सदर रुग्णाला तातडीने जिल्हा रुग्णालय धुळे येथे पाठवावे लागते. तसेच बऱ्याच वेळा माता प्रसुती झाल्यानंतर झालेल्या नवजात बालकाची तपासणी तज्ञ डॉक्टरांकडून करुन घेणे आवश्यक असते.परंतु धुळे मनपाकडे तज्ञ बालरोगतज्ञ देखील उपलब्ध नाही. सन्मा.नगरसेवक श्री.अमीन पटेल यांच्या दि. ५/८/१४ च्या पत्रानुसार On Call बेसीसवर स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ यांची पॅनल करुन नियुक्ती करणे बाबत सुचविले आहे.

यासाठी धुळे मनपा आरोग्य विभाग येथे प्रजनन व बाल आरोग्य (आरसीएच फेज) २) योजनेंतर्गत स्त्रीरोग तज्ञ व बालरोगतज्ञ यांना नागरी आरोग्य केंद्र प्रतिभेट रु.५००/- अदा करण्यात येत होते.अनुदान सध्या अप्राप्त आहे.मनपा सुतिकागृहात बऱ्याच वेळी गुंतागुंतीच्या प्रसुतीच्या माता व जोखमीच्या माता प्रसुती होणेसाठी दाखल झाल्यावर त्याठिकाणी तज्ञ डॉक्टर (स्त्रीरोगतज्ञ)उपलब्ध नसल्याने अत्यंत अडचणी निर्माण होऊन सदर सेवा देता येत नाही. व त्यामुळे सदर मातेला नाईलाजास्तव जिल्हा रुग्णालय धुळे येथे संदर्भीत करावे

लागते.याच प्रमाणे प्रसुतीनंतर झालेल्या नवजात अर्भकाची तपासणी तज्ञ डॉक्टर (बालरोगतज्ञ) धुळे मनपाकडे उपलब्ध नसल्याने अडचणी निर्माण होतात.

यासाठी धुळे मनपा निधीतून मनपा सुतिकागृहासाठी चार स्त्रीरोगतज्ञ व चार बालरोगजतज्ञ यांचे पॅनल करुन On Call रु.५००/- मोबदला या तत्त्वावर नियुक्ती केल्यास मनपा सुतिकागृहात उक्त सेवा देणेस सोयीचे होईल. या अंतर्गत मनपा सुतिकागृहातील वैद्यकीय अधिकारी ज्या वेळी गरज भासेल त्या वेळी उपरोक्त स्त्रीरोगतज्ञ व बालरोग तज्ञ यांच्यापैकी एकाला भेट देणेसाठी बोलविणे करतील त्याच दिवसाचा भेट दिल्या बाबतचा मोबदला रु.५००/- अदा करण्यात येईल.

तरी मनपा कार्यक्षेत्रातील जोखमीच्या गरोदर माता नवजात अर्भक यांना अडचणीचे वेळी सुविधा देणे करीता वरील प्रमाणे स्त्रीरोगतज्ञ व बालरोगतज्ञ याची सेवा उपलब्ध करुन घेता येईल.तसेच पुढील प्रक्रिया OnCall बेसिसवर स्त्रीरोगतज्ञ व बालरोग तज्ञ यांची नियुक्ती मनपा आस्थापना विभागामार्फत करणे व चार स्त्रीरोगतज्ञ व चार बालरोगतज्ञ यांचे पॅनल मनपा निधीतूनOn Call रु.५००/- या तत्त्वावर मोबदला देणेस व येणाऱ्या खर्चास मनपा निधीतून खर्च करणेस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच महानगरपालिकेच्या विविध दवाखान्यामध्ये तज्ञ वैद्यकीय अधिका-यांची आवश्यकता असल्याने व नागरीकांना आवश्यक त्या सुविधा तांतडीने उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नवीन वैद्यकीय पॅनल नेमण्यास मान्यता देण्यांत येत आहे.यात जनरल फिजीशन व हृदयरोग तज्ञ, जनरल सर्जन,दंतरोग तज्ञ, नेत्ररोग तज्ञ,कान नाक घसा तज्ञ, त्वचारोग तज्ञ व अनुषंगिक वैद्यकीय अधिका-च्यांचा विना मोबदला तत्वावर समावेश असणारे पॅनल नियुक्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. याकामी इंडियन मेडिकलअसोसिएशन या संस्थेशी आरोग्याधिकारी यांनी संपर्क करुन पुढील कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६२ धुळे शहर व तापी पाणीपुरवठा योजनेसाठी विविध जलकुंभ व जलशूध्दीकरण केंद्रासाठी कुशल व अकुशल कामगार लावणेसाठी येणा-या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६९ दिनांक २७/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर व तापी पाणीपुरवठा योजने अंतर्गत विविध जलकुंभ व जलशुध्दीकरण केंद्र तसेच पंपीग स्टेशन करिता कुशल व अकुशल कामगार लावणेसाठी रुपये ४० लक्ष मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी धुळे मनपा स्थायी समिती ठराव नं.५१ दि.७/८/२०१३ अन्वये दिलेली आहे.

उक्त कामासाठी जा.क्र.धुमपा/आस्था/७५५ दि.१८/९/२०१३ नुसार टेंडर नोटीस प्रसिध्द करण्यांत आली होती.सदरचे काम रक्कम रुपये४०,००,०००/- रकमेचे वार्षिक निविदा असल्याने मा.आयुक्त सो. यांनी ई टेडर काढणे बाबत आदेशित केल्याने व सदरचे काम ४० लाख किमतीचे असल्याने वर्ष २०१४-१५साठी स्थायी समितीची प्रशासकीय मान्यता आवश्यक असल्यामुळे सदर खर्चास व जाहीर ई- निविदा प्रसिध्द करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६३ महाराष्ट्र सुजल निर्मल अभियाना अंतर्गत सुधारणा कामातील अनियमितताबाबत अनुपालन अहवाल स्थायी समिती पुढे फेर निर्णयास्तव सादर

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७० दिनांक २७/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र शासन/पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्रं./सुनिअ/२००३/ प्र.क्र.१८०पापु-२२मंत्रालय मुंबई ३ दि. ८ जुलै२००९ नुसार धुळे महानगरपालिकेस पाणीपुरवठा विभागातंर्गत सुधारणा कामे करणेसाठी उपरोक्त संदर्भानुसार १ ते १८ कामांत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली होती.उक्त प्रस्तावांचे एकुण ढोबळ किंमत५,५३,३७,९०० अशी होती. त्यात खालील १ ते १८ कामो व सुधारणांचे कामे प्रस्तावित होती.

| अ.क्रं. | कामाचं नांव | एकुण किंमत |
|---|---|---|
| १ | सूकवद पंपींग स्टेशन येथील पंप बदलणे | ४१८४००० |
| २ | मालेगांवरोड पंपंग स्टेशन येथील पंप बदलणे | ३५३२२०० |
| ३ | सुकवद पंपींग स्टेशन येथील ट्रान्स्फार्मर दुरुस्त करणे | ४४३८१५ |
| ४ | सुकवद हेडवर्क्स येथील सब स्टेशनची देखभाल दुरुस्ती | ४८५००० |
| ५ | बाभळे पंपींग स्टेशन पंप दुरुस्ती करणे | ९०८७६२ |
| ६ | बाभळे पपींग स्टेशन टा्रन्स्फार्मर दुरुस्ती करणे | ४१७९१५ |
| ७ | तापी पा.पु. योजनेसाठी एअरव्हॉल्व पुरवठा करणे | ९७३००८ |
| ८ | मालेगांवरोड ते दसेरा मैदान पर्यत मृदु पोलादी पाईप लाईन टाकणे | १३३४९४९ |
| ९ | चाळीगसांव रोड ते माधवपुरा पर्यत एचडीपीई पाईप लाईन टाकणे | १७०२१०० |
| १० | बोरसे कॉलनी वडजईरोड एचडीपीई पाईप लाईन टाकणे | ३३१८००० |
| ११ | कबीरगंज भागात एचडीपीई पाईप लाईन टाकणे | १५८५००० |
| १२ | गरीबनवाज नगर ड्रायव्हर सोसायटी एचडीपीई पाईप लाईन टाकणे | ७३११०० |
| १३ | जामखॉ मोहल्ला एचडीपीई पाईप लाईन टाकणे | १५७८२०० |
| १४ | दुध डेअरी चौक ते विवेकनगर एचडीपीई पाईप लाईन टाकणे | २४१९१०० |
| १५ | अंबिकानगर संतजीनगर इ. एचडीपीई पाईप लाईन टाकणे | १२६३७०० |
| १६ | देवचंदनगर दक्षता सोसायटी एचडीपीई पाईप लाईन टाकणे | १५८८५०० |
| १७ | सेवादासनगर एचडीपीई पाईप लाईन टाकणे | ९३१००० |
| १८ | उंच जलकुंभ बांधणे | ८०४१५९२ |
| १९ | ग्राहक सर्वेक्षण, पाणी लेखा परीक्षण,ऊर्जा लेखा परीक्षण, बल्क मिटर हायड्रालिक मॉडेलिंग, जी.आय.एस. बिलींग व वसुली इ.सुधारणांची ढोबळ किंमत | २०००००० |
| | सुधारणांसह एकुण ढोबळ किंमत | ५५३३७९०० |

उक्त योजनेचा आकृती बंध खालील प्रमाणे होता.

| अ.क्रं. | नागरी संस्थेचे नांव व वर्ग | योजनेची किंमत | अनुज्ञेय अनुदान (७०%) | कर्ज (२०%) | नागरी संस्थेचा सहभाग (१०%) |
|---|---|---|---|---|---|
| १ | धुळे महानगरपालिका | ५५३३७९०० | ३८७३६५३० | ११०६७५८० | ५५३३७९० |

उक्त प्रस्तावातंर्गत मनपास आतापर्यत रु.१९४ लक्ष एवढे अनुदान प्राप्त झाले आहे.

उक्त प्रस्तावातंर्गत पाणीपुरवठा योजनांसाठी ग्राहक सर्वेक्षण,बल्क प-लो मिटर हायड्रोलिक मॉडेलींग, जी.आय.एस. बिलींग व वसुली इत्यादी सुधारणांसाठी रु.२००००००/-मात्र मंजूर झाली होती.उक्त अंतर्गत योजनेचे अंदाजपत्रक रुपये १५७३०७००/- मात्र तयार करण्यात आले होते.त्यात खालील प्रमाणे कामे होती.

| अ.क्रं. | कामाचं नांव | किंमत ( रु.) |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १ | ग्राहक सर्वेक्षण | १५५६४५१ |
| २ | बल्क प-लो मिटर | ७२३८३१६ |
| ३ | हायड्रोलिक मॉडेलिंग | २७००००० |
| ४ | जी.आय.एस. | २५००००० |
| ५ | बिलींग व वसुली | १७३५९३३ |
| | एकुण | १५७३०७०० |

उक्त रक्कमेच्या कामांना मा. शहर अभियंता यांनी नोंद क्रमांक १०१ दि. १३/७/२००९ नुसार तांत्रिक मान्यता प्रदान केली आहे.

त्यानुसार उक्त कामाचे जाहीर निविदा खुल्या वर्तमान पत्रात दि. / / रोजीच्या लोकमत दैनिकात प्रसिध्दीस देण्यांत आली होती.त्यानुसार निविदा प्रक्रिया पूर्ण होऊन सर्वात कमी दराचे निविदा मे.सिनर्जी इंजिनिअरींग अॅन्ड एनव्हायरनमेंटल सोलूशन्स प्रा.लि.ठाणे यांची १% कमी दराची निविदा धुळे मनपा ठराव नंबर १८५ दि.२५/६/२०१०नुसार मंजुरी प्रदान केली आहे.त्यानुसार इकडील कार्यादेश कं.धुमपा/बांवि/२०१०-२०११/२२ दि. २/८/२०१० देण्यांत आला आहे.

उक्त कामी प्रस्ताव मा.मुख्य लेखा परीक्षक धुळे मनपा धुळे यांचेकडे तपासणी झाली असता त्यांचे कार्यालयातील पत्र क्रं./धुमपा/लेप/सुजल निर्मल/१३१ दि.३/८/११ नुसार प्रस्तावातील अनियमितता निदर्शनास आणल्या होत्या.

उक्त बाबतच्या विषय या पूर्वी स्थायी समिती ठराव नं.१३० दि.३१/१०/२०१२ नुसार उक्त विषयाबाबत चौकशी समिती गठीत करण्याचा व विशेष लेखा परीक्षण करण्याचा आदेश पारीत झाला होता.

उक्त बाबत म. मुख्य लेखापरीक्षक यांनी लेखा परीक्षण अहवालातील अनियमितते बाबत तपासणी करुन पूर्तता तथा अनुपालन अहवाल खालील प्रमाणे सादर केलेला असून त्यांस मान्यता देण्यांत येत आहे.प्रशासनाने सदर प्रस्तावाबाबत पुढील उचित कार्यवाही नियमानुसार करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

| शेरे | उत्तर | मुख्य लेखपरिक्षक यांचा अहवाल |
|---|---|---|
| **धुळे महानगरपालिकेमार्फत कामाचे अंदाज पत्रकातील त्रुटी** | | |
| १)उक्त कामाचे अंदाजपत्रक धुळे महानगरपालिका हद्दीतील क्षेत्रफळ ५० स्के.कि.मी.अंदाजे धरुन अंदाजपत्रक तयार केले आहे. प्रत्यक्षात धुळे महानगरपालिका हद्दीचे क्षेत्र फळ नगररचना अभिलेख्याप्रमाणे ४६.४६ स्वे.चौ.मी. आहे. | उक्त कामाचे अंदाजपत्रक धुळे महापालिका हद्दीतील ५० चौ.कि.मी धरुन केले आहे.धुळे मनपा क्षेत्राचा आकार समप्रमाणात नसल्यामुळे सॅटेलाईट इमेज अचुक येत नाही. त्यामुळे अंदाजपत्रकात ५० चौ.कि.मी धरण्यात आला आहे. प्रत्यक्ष रक्कम अदा करते वेळी नगररचना अभिलेखानुसारच (४६.४६चौ.की) क्षेत्रफळ धरण्यात येईल. सदर आक्षेप वगळण्यात यावा ही विनंती. | सदर आक्षेप तत्कालीन मु.ले.प. यांनी मान्य केला आहे. |
| २)GIS Mapping चे रेट अॅनालिसीस मध्ये GIS Mapping Software (Arc view) ची किंमत ४४००००/- रु. दर्शविली आहे. प्रत्यक्षात हा सॉफ्टवेअर बाजारात १५७५ डॉलर्स म्हणजे प्रति | उक्त कामाचे एकत्रीत अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम मान्यता घेतलेली आहे. सदरहू अंदाजपत्रकातील दर हे तात्कालीन दरसूची नुसार घेतलेले आहेत. तथाही म.जी.प्रा. विभागाकडून त्याची | सदर आक्षेप तत्कालीन मु.ले.प. यांनी मान्य केला आहे. |

| | | |
|---|---|---|
| डॉलर रु.५०/- प्रमाणे रु. ७८७५०/- या किंमतीत उपलब्ध आहे. रेट ॲनालिस प्रमाणित करणारे संबंधित कनिष्ठ अभियंता व शहर अभियंता यांनी उक्त दर पृथ्थकरणाबाबत खुलासा करावा. | खातरजमा केल्यानंतर अंदाजपत्रकाची किंमत२,२२,६६,६११/- इतकी दर्शविली आहे. म्हणजेच म.न.पा. ने स्विकृत केलेल्या निविदेची किंमत रु.१,५७,३०,७००/- आहे. यामुळे महापालिकेची रु.६५,३५,९११/-एवढा बचत होते व मनपाचे कोणतेही आर्थिक नुकसान होत नाही. खुलासा मान्य करावा ही विनंती | |
| ३)याउपागांचे बाब क्रं.२अन्वये Procurement ofSatellite Image चा दर रु.२०००/-प्रति स्के.कि.मी. या दराने रु.१०००००/- पृथ्थकरण केला आहे. NRSA, Hydrabad चे Price List नुसार High Resolution Satellite Image चा प्रति स्के. कि.मी. जास्तीत जास्त दर हा रु. ७०/- प्रति स्के.कि.मी. आहे. प्रति Scane दर हा जास्तीत जास्त रु. १०००००/-किंमतीचे Satellite Image बाबत खात्री/ चौकशी होणे आवश्यक आहे. | सदर कामाची निकड व आवश्यकतेनुसार त्याचे स्पेशिफिकिशन व कामाची व्याप्ती गृहित धरुनच अंदाजपत्रक तयार केले जाते. प्रत्येक बाब निहाय दरपत्रक घेवून अंदापत्रक बनविण्यास कामाची गुणवत्ता मिळणार नाही. तसेच प्रत्येक एंजसी स्वतःचे दर ठरवितात. त्यामुळे असे दर स्विकारता येणार नाही. एकंदरीत वरील मुद्दा २ प्रमाणे महापालिकेची रु् ६५,३५,९११/- रु बचत होणार आहे. त्यामुळे चौकशीची गरज नाही कृपया आक्षेप वगळण्यात यावा ही विनती. | सदर आक्षेप तत्कालीन मु.ले. प. यांनी मान्य केला आहे. |
| ४) प्राप्त सॅटेलाईट इमेजचे डीजीटलायाझेशच चा दर प्रति स्के.कि.मी. पृथ्थकरण केला आहे. या दराने डिजीटलायझेशन करीता रु.४०००००/- चा दर अत्यंत अवास्तव व आकलनापलीकडे आहे. | सदरहू कामाची निविदा १% कमी दराने मंजूर आहे. सर्व कामे ८५% पूर्ण झालेली आहेत. एकंदरीत अंदाजपत्रकातील दराचे फरकाची तुलना एकत्रीत (मजीप्रा कडून) केल्यानंतर बचत होत आहे. त्यामुळे दर हे अवास्तव नाहीत. कृपया आक्षेप वगळण्यात यावा ही विनंती. | म.जि.पा.यांनी दिलेल्या फेर मुल्यांकना नुसार महापालिकेचे आर्थिक नुकसान होत नसल्याने मान्य |
| ५) या उपांगाचे बाब क्रं. ७ येथे Design & Development of Customised GIS Software Application करीता रु. २३५००००/- दर अंदाजीत केला आहे. परंतु बाब क्रं. १ येथे उक्त Software खरेदी केले नंतर पुन्हा त्या सॉफ्टवेअरचे Design & Development करीता तरतुद करणेचे प्रयोजन काय ? | G.I.S.Software व त्याची Design & Development of Customised GIS Software Application या दोन्ही बाबी भिन्न असून ग्राहक सर्वेक्षण, वॉटर नेटवर्क इत्यादीतून प्राप्त माहिती (Data) हा सदर Software मध्ये समाविष्ट करावा लागतो. सदर माहिती ही प्रत्येक शहरासाठी स्वातंत्र्य असते धुळे शहराची सॅटेलाईट इमेंज NRSC हैद्राबाद यांच्याकडून प्राप्त करुन त्यावर सदर माहिती टाकली जाते. म्हणून प्रत्येक शहरासाठी G.I.S. Software मध्ये विशेष पुर्ण असे Design & Development चे काम करावे लागते. स्विकृत निविदा ही सन २००९-१० या आर्थिक वर्षातील दरसुची नुसार उपलब्ध असलेल्या बाबी नुसार आहे.तथा मजीप्रा व्यवस्थान सेवा सल्लागार समितीने त्यांचे पत्रानुसार याच कामाचे मुल्यांकन रु. २,२२,६६,६११/- केलेले आहे. स्विकृत निविदेची तुलना केली असता रु.६५,३५,९११/- रु ची मनपाची बचत होते. हे पालिकेच्या आर्थिक हिताचे आहे कृपया आक्षेप स्विकृत व्हावा. | मान्य |

| | | |
|---|---|---|
| ६)Billing Software चा दर रु.७०००००/- दरपृथ्थकरणाअंती अंदाजित केला आहे.या दरास बाजार दराचा आधार नाही.संबंधित कनिष्ठ अभियंता यांना वरील सर्व दर पृथ्थकरणांचे मुळ बाजार दराबाबत विचारणा केली असता बाजार दराबाबत कोणतीही विचारणा केलेली नाही व संबंधित एजन्सी (सिनर्जी इंजिनीअरींग ॲण्ड इनव्हॉरमेंटन सोल्युअशन) यांनी जे दर सांगितले तेच घेतले असे सांगितले.म्हणजे निविदाकरिता केलेले दर पृथ्थकरणनियमबाह्य असून विश्वासार्ह नाही.संबंधित शहर अभियंता यांची जबाबदारी निश्चित करणे तथा निविदा कार्यान्वयाना बाबत योग्य निर्णय घेणे योग्य. | महा.शासनाची मान्यता दि.८ जुलै २००९ क्र.सु.नि अ/ २००३/प्र.क्र.०८ पापु २२ अन्वये आहे. अशा प्रकाराचे तयार Software बाजारात उपलब्ध नाहीत. आपल्या आवश्यकतेनुसार तथा कामानुसार Software बनविने आवश्यक असते. निविदा कार्यवाही विहित पध्दतीनुसार झालेली आहे. निविदेतील दराची म.जी. प्रा. मार्फत फेर मुल्यांकन केले असता या सर्व अंतर्भूत बाबींची एकूण किंमत रु.२,२२,६६,६११/- आहे. महापालिकेने स्विकृत केलेली निविदेची किंमत रु.१,५७,३०,७००/- एवढी आहे. त्यामुळे महापालिकेची बचत होते. | सदर अंदाजपत्रकास शासनाची मान्यता घणेत आली आहे मान्य |
| ७) Sub work ३ Hydraulic Modeling करीता Supply, Installation, Testing & Comissing & Water GMS Software, २००० नोडसचा दर रु.२७००००००/- दर्शविला आहे. डिलेव्हरी चलनानुसार सदर सॉफ्टवेअर १००००/- नोडस करीता आहे. बाजारदराप्रमाणे Benatly Water Gems Software २५० Pipes ची किंमत ४९९५.०० डॉलर्स म्हणजे भारतीय रु.२४९७५०/- होते. प्रत्यक्ष १००००० पाईपची बाजार किंमत उपलब्ध होवू शकली नाही. परंतु उपलब्ध करता येईल. | उपांग क्र. ३ ची एकूण किंमत म.जी.प्रा.ने. सन २००९-२०१० दरसुची नुसार ३५,८८,०००/- इतकी दर्शविली आहे. मंजूर अंदाजपत्रकात याच कामाची किंमत २७,००,०००/- इतकी आहे. निविदेतील दराची म.जी. प्रा. मार्फत फेर मुल्यांकन केले असता या सर्व अंतर्भूत बाबींची एकूण किंमत रु. २,२२,६६,६११/- आहे. महापालिकेने स्विकृत केलेली निविदेची किंमत रु. १,५७,३०,७००/- एवढी आहे. त्यामुळे महापालिकेची बचत होते. | मान्य |
| ८)या उपांगाचे बाब क्रं. २मध्ये Procurement of Hydraulic Design of existing Water Supply scheme करिता कोणतेही दर पृथ्थकरण न करता जॉब ॲटम करीता रु. ८६००००/- दर अंदाजित केला आहे. | सदरचे काम हे तांत्रिक काम असून Manually Design करावे लागते या कामाचे पृथ:करण करणे शक्य नाही. सदरची बाब मुद्दा क्र. ७ मध्ये अंतर्भू आहे. | मान्य |
| **२) निविदा प्रक्रियेतील त्रुटी** | | |
| १)निविदा संच तयार करतांना Schedule of paymentमध्ये Sub work No. १ Survey planning & I Card करीता २५% ५०% सर्व्हे पूर्ण केल्यानंतर व पुन्हा ३५% | उक्त बाबतीत आवश्यक तो बदल करण्यात येईल. तथा याबाबत मा. आयुक्त यांची मान्यता घेतल्यानंतरच संबंधीत ठेकेदाराला देयकाची अदायगी करण्यात येईल. | खुलासाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी |
| २)Sub work No.३Hydraulic Modeling अंतर्गत Water Gems Software & Providing & Installing करिता ८०% | वरिल प्रमाणे | खुलासाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी |
| ३)Sub work No.४ ङ Gis mapping providing & installing Arc view soft ४०% | वरिल प्रमाणे | खुलासा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी. |
| ४)Sub work No.५ Computerized Billing providing & Installing Billing Soft were ७०% वरील Schedule of | Schedule of Payment वर मनपा शहर अभियंता यांची स्वाक्षरी झाले नंतरच अदायगी करण्यात येईल. | खुलासा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी. |

| | | |
|---|---|---|
| Payment वर मनपा शहर अभियंता यांची स्वाक्षरी नाही. वरील प्रमाणे प्रदानाची कामाचे प्रगतीनुसार प्रारंभिक स्तरावरच कोणत्याही प्रकारे पुरवठा केलेल्या Software चा उपयोग सिध्दता होणेपूर्वी ७०-८० अदायगी नियमबाह्य आहे.<br>वरील प्रदानाचे Schedule तयार करतांना पालिकेच्या आर्थिक हिताचा कोणताच विचार करण्यात आलेला नाही. | | |
| **३) निविदा स्विकृती**<br>निविदा स्विकृत करतांना प्रस्ताविक काम पूर्ण केल्याचे पूर्व अनुभवाचे अटीकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे. | निविदेतील अटी व शर्तीनुसार निविदा उघडण्यात आल्या व निविदा विहित पध्दतीनुसार स्विकृत करण्यात आली. | सदर आक्षेप तत्कालीन मु.ले.प.यांनी मान्य केला आहे. |
| १) निविदाधारकाचे वर्गीकृत नोंदणीचे अट घातलेली नाही. तसेच पात्रता अट क्रं. ७ नुसार पाणीपट्टी देयके व वसुलीच्या कामाचे कमीत कमी ३ वर्ष यशस्वीरित्या पुर्ण केल्याची अटीकडे दुर्लक्ष करणेत आलेले आहे. | पाणी पुरवठा योजनेची अद्यावत तंत्रज्ञानाने सुधारणा करणे हे शासनाने नविनच धोरण स्विकारले तथा उक्त बाबत या कामाची वर्तमान पत्रात जाहिर निविदा मागवून प्रक्रिया पूर्ण करण्यात आली व कमी दराची निविदा स्विकृत आहे. | सदर आक्षेप तत्कालीन मु.ले.प.यांनी मान्यकेला आहे. |
| २) निविदेसोबत EMD रोख किंवा धनाकर्षाचे स्वरुपात घेणेबाबत अट असतांना EMD करीता मुदतठेव पावती स्विकारणे निविदा अटीचे विरुध्द ठरते. | उक्त बाबत सुधारणा करण्यात येईल. संबंधीताच्या पहिल्या देयकातून रोखीने कपात करुन घेण्यात येईल. | खुलासा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी |
| ३)निविदास्विकृत करतांना मे. सिनर्जी इंजिनिअरींग ॲण्ड सोल्युशन नवी मुंबई यांचे अंदाजपत्रकिय दराचे निविदाधारकास वाटाघाटीसाठी बोलविल्या नंतर संबंधिताने फॅक्सव्दारे१%दर कमी करणेबाबत कळविले.या दरास तत्कालीन उपायुक्त यांनी कमी केलेले दर हे अत्यंत अल्प असल्याने पुन्हा निगोसिएशन करणे योग्य वाटते असा शेरा नोंद केल्यानंतर सुध्दा तत्कालीन आयुक्त यांनी वरील दर प्रत्यक्षरित्या कोणत्याही वाटाघाटी न करता मान्य करुन स्थायी समितीकडे मान्यते साठी पाठविले ही कृती आक्षेपार्ह असून संबंधित एजन्सीची कोणतीही सिध्द पात्रता नसतांना वरील निविदा स्विकृती नियम संगत नाही. | निविदेतील दरांना मान्यतेचे अधिकार मा. आयुक्त यांना आहेत. मा. मुख्य लेखापरिक्षक यांनी दराबाबत घेतलेला आक्षेप ग्राह्य न धरता तत्कालीन मा.आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात सदरचे दर मान्य केले आहेत व त्यास महासभा ठराव क्र. १८५ दि. २५/०६/२०१० अन्वये मंजूरी घेतली आहे. | मान्य |
| ४) निविदा स्विकृती उपरांत २% सुरक्षा अनामत जमा पावती न घेतासंबंधितांस कार्यादेश देणे नियमबाह्य असुन निविदा अटीनुसार रु. ३१४६१४/-सुरक्षा अनामत म्हणून जमा करणे बंधनकारक आहे. | उक्त बाबत संबंधीत एजंसीकडून २% सुरक्षा अनामत रु.३१४६१४/- त्यांचे प्रथम देयकातून कपात करण्यात येईल. | तत्कालीन मु.ले.प. यांनी मान्य केला आहे |
| ५)ठेकेदाराने संदर्भ कामाचा विमा काढल्या शिवायकोणतीही अदायगी न करणेबाबत निविदा अट क्रं.६१५येथे अट असल्याने संबंधितांस विमाशिवाय कोणतेही देयक देय नाही. | संपूर्ण कामाचा विमा काढण्याची सुचना संबंधीतास देण्यात येईल.तथा ठेकेदाराने १% इसारा रक्कम भरलेली आहे.ती रक्कम विमा कंपनीकडे भरणेत येईल किंवा त्यांचे देयकातून १%रक्कम वळती करुन | खुलासा प्रमाणे कार्यवाही करणेत यावी |

| | | |
|---|---|---|
| | घेण्यात येईल. | |
| ६) वरील सर्व निविदा केवळ शहर अभियंता यांनी उघडल्या असुन निविदा उघडतांना निविदा दरावर कोणाचीही स्वाक्षरी नाही. | उक्त बाबत निविदा उघडतांना तात्कालीन शहर अभियंता श्री. बी.एस. अहिरे यांची स्वाक्षरी आहे. | मान्य |
| ७) या कामाचे करारपत्रावर मा. आयुक्त यांची स्वाक्षरी नाही. | याकामाचे करारपत्रावर तात्कालीन आयुक्त श्री.कासार सो.यांचे करारनाम्यावर स्वाक्षरी आहे. | मान्य |
| ८) ठेकेदाराने करार करतेवेळी कामाचा बारचार्ट सादर केलेला नाही. त्यामुळे तो कोणते काम केव्हा पुर्ण करणार याचे नियोजन नसून कार्यादेश दि. ०२/०८/२०१० ते मार्च ११ पर्यंत संबंधित ठेकेदाराने कोणतेही काम केलेले नाही. त्यामुळे तो कोणते काम केव्हा पुर्ण करणार याचे नियोजन नसून कार्यादेश दि.०२/०८/२०१०ते मार्च ११ पर्यंत संबंधित ठेकेदाराने कोणतेही काम केलेले नाही. | सदर कामाचे तांत्रिक नियोजन केले आहे तथा संबंधीत कामाचा आलेख तांत्रिकदृष्टया (Sequence) प्रमाणे आहे. काम ८५% पूर्ण झालेले आहे. यापुढील काम ठेकेदार कसे करणार आहेत त्याचे नियोजन मागविणेत येईल. | सदर आक्षेप तत्कालीन मु.ले.प. यांनी मान्य केला आहे. |
| ९)निविदा स्विकृतीनंतर अमान्य झालेल्या निविदा धारकांची EMDएकाच व्यक्तिने ताब्यात घेतली आहे.म्हणजे तिनही निविदा या एकाच व्यक्तिने सादर केल्याचे सिध्द होते. | निविदा स्विकृती नंतर, अमान्य झालेल्या निविदा धारकांची EMD परत करण्यात आली. याबाबत कोणतीही अमान्य झालेल्या निविदा धारकांची आक्षेप नोंदविला नाही. | मान्य |
| १०)कार्यादेशाच्या दिनांकापासून आजपर्यंत संबंधित ठेकेदाराने अट क्रं.२७ नुसार कामाचा दैनंदिन अहवाल,Staff Deployed महत्वाचे कामाचा साप्ताहीक अहवाल व महिना भरात केलेल्या कामाचा अहवाल पालिकेत सादर केलेला नाही. | संबंधीत ठेकेदाराकडून त्यांनी केलेल्या कामाचा वेळोवेळी अहवाल तथा Presentation या विभागास सादर करीत आहेत व ते समाधानकारक आहे. सोबत कामाचा प्रोग्रेस रिपोर्ट सादर करत आहे. | मान्य |

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :-६४ मा.सभापती स्थायी समिती यांचे पत्र तसेच सन्मा.सदस्य श्री.शरद एकनाथ वराडे व सन्मा. स्थायी समितीच्या ९ सदस्यांनी सादर केलेल्या पत्रानुसार बडगुजर जलकुंभाच्या कामास मान्यतेसाठी प्रस्ताव फेर विचारार्थ सादर.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७१ दिनांक २७/०८/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा.सभापती स्थायी समिती यांनी दिलेल्या पत्रानुसार सन्मा.नगरसेवक श्री.शरद एकनाथ वराडे व सन्मा. स्थायी समितीच्या ९ सदस्यांचे विषय घेणेबाबत मागणी पत्रानुसार दिनांक १९/०८/२०१४ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीतील विषय क्रं.५८ बडगुजर जलकुंभाच्या कामास मुदतवाढ देणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर झालेला आहे. सदर विषयाबाबत कार्यालयीन अहवालातील अपूर्णतेमुळे सदर विषयाबाबत उचित निर्णय झालेला नव्हता. सदर विषय हा पाणी पुरवठयाशी निगडीत असून भागातील नागरीकांच्या पाणीपुरवठयाच्या दृष्टीने महत्वपूर्ण आहे. यामुळे सदर विषयाबाबत नागरीकांच्या हिताच्या दृष्टीने निर्णय घेणे आवश्यक आहे. सदर जलकुंभावरुन सुमारे ४० ते ५० हजार नागरीकांना पाणीपुरवठा होतो. भागातील पाणी प्रश्नाची आवश्यकता लक्षांत घेऊन सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर प्रस्तावास मागील स्थायी समिती ठराव नं. २२४ दिनांक १०/४/२००८ अन्वये तांत्रीक मंजुरीत बदल झालेल्या बाबीस मान्यता दिलेली आहे.व

प्रशासनाने त्याप्रमाणे काम केल्याचे प्रमाणित केले आहे. याबाबीस अधिन राहून तसेच टेंडर अटी शर्तीनुसार नियम व शर्तीस अधिन राहून प्रशासनाने पुढील कार्यवाही करण्यास मान्यता देण्यांत येत आहे. तसेच प्रशासनाच्या अहवालानुसार नागरीकांचा पाण्याचा प्रश्न लक्षांत घेता सदर कामास दिनांक ३१/१२/२०१४ पर्यत मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**सोमवार दिनांक ८ सप्टेंबर २०१४**
**वेळ:-सकाळी ११-३०वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज सोमवार ०८/०९/२०१४रोजी सकाळी ११-३० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती,स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ४ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ५ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ६ | श्री.पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ७ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ८ | श्री.परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ९ | श्रीमती ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १० | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ११ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री के.व्ही. धनाड | अति. आयुक्त |
| २. | श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ३. | श्री.त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त तथा सहा.आयुक्त (कर) |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री.पी.आर.दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ६. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री.मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री.पी.डी. नाईक | प्र. लेखापाल |
| ९. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| १०. | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ११. | श्री.एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक तथा जकात अधिक्षक |
| १२. | श्री. के.जी. सुडके | अधिक्षक एल. बी. टी. विभाग |
| १३. | श्री. के.जी. खंदरकर | प्र. वसुली अधिक्षक |
| १४ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १६ | श्री. बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १७ | श्री.सी.सी. बागुल | ओव्हरसिअर |
| १८ | श्री. एस.एस.देवरे | शाख अभियंता |
| १९ | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| २० | श्री. जी.व्ही. खरे | प्रकाश निरीक्षक |
| २१ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २२ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |
| २३ | श्रीमती अपर्णा पाटील | जीव शास्त्रज्ञ |

विषय क्रमांक:-६५ मलेरिया विभागातंर्गत तांतडीच्या कामांसाठी स्वतंत्र तसलमात रक्कम रु.२००००/- मिळणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७३ दिनांक ८/९/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मलेरिया विभाग अंतर्गत मनपा क्षेत्रातील सदृश्य डेग्यु रुग्ण,हिवताप रुग्ण यांच्या घरात व आजूबाजूच्या ५० घरांमध्ये इनडोअर फॉगींग करण्यात येते.तसेच सन्मा.नगरसेवक व नागरीक यांच्या तक्रारीनुसार Adult Mosquito यावरही बाहेर परिसर (धुराळा) फॉग्रीग करण्यांत येते. सदरची फॉग्रींगसाठी पेट्रोल व डिझेल मनपा स्टोअर विभागामार्फत पुरवठा करण्यांत येत होता.परंतु मनपा लेखापरीक्षक यांचे आक्षेपामुळे सन२०१०-११ मधील इंधनाचा पुरवठा बंद केला आहे जेणे करुन उक्त कारवाईस अडथळा येत आहे.सद्यस्थिती पावसाळा सुरु झाल्याने शहरात सदृश्य डेग्यु रुग्ण, हिवताप रुग्ण समोर येत आहे. यावर आळा बसविणेकामी फॉग्रीग करणे गरजेचे असल्याने आरोग्य विभागातीहल तसलमात मधून १ किंवा दोन पंपासाठी लागणारा इंधन खर्च घेऊन उक्त कारवाई करण्यांत येत आहे.

धुळे शहराची लोकसंख्या४ लाखाचे वर आहे.आणि दररोज आजू बाजूच्या खेडे गांवातील लोक औषधोपचारासाठी शहरात येतात.यांच्या पासूनही रुग्णात वाढ होण्यास मदत मिळते.यामुळे फॉगींग करणे गरजेचे असते. याकरिता फक्त इनडोअर फॉगींगसाठी इंधन खर्च फॉगींग व स्प्रेपंप रिपेअरींग टपाल रजिस्टर खर्च झेरॉक्स व इ. कार्यालयीन खर्चासाठी मलेरिया विभागासाठी स्वतंत्र तसलमात रुपये १००००/- मिळणेबाबत जीवनशास्त्रज्ञ यांनी रिपोर्ट सादर केला आहे.

महाराष्ट्र नगरपालिका लेखा संहिता१९७१ मधील नियम १४०(१) अन्वये स्थायी अग्रीम देण्याबाबतचे अधिकार नगरपालिकेच्या मंजुरीने नमूद आहे.त्यानुसार आरोग्याधिकारी यांनी मागणी केल्याप्रमाणे सर्वानुमते मलेरिया विभागासाठी रुपये ५० हजार मात्र तसलमात रक्कम देणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६६ धुळे शहर व तापी पाणीपुरवठा योजने अंतर्गत विविध जलकुंभ व पंपीग स्टेशन करिता कुशल व अकुशल कामगार पुरविणे बाबतचे थकीत बील अदा करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७४ दिनांक ०८/०९/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर व तापी पाणीपुरवठा योजने अंतर्गत विविध जलकुंभ व पंपीग स्टेशन करिता कुशल व अकुशल कामगार पुरविणेसाठी निविदा दर मागविण्यांत आले होते.आलेल्या निविदा दरानुसार श्री. राजे संभाजी मजूर कामगार सहकारी संस्था,मर्या.देवपूर धुळे यांना इकडील जा.क्र. धुमपा/ पापुवि/९७दि.१६/२/२०१२ अन्वये धुळे शहर व तापी पाणीपुरवठा योजने अंतर्गत विविध जलकुंभ व पंपींग स्टेशन करिता कुशल व अकुशल कामगार पुरविणेसाठी कार्यादेश देण्यांत आलेले आहे.

धुळे शहर व तापी पाणीपुरवठा योजने अंतर्गत विविध जलकुंभ पंपींग स्टेशन जलशुध्दीकरण केंद्र व विविध भागात पाणीपुरवठा करण्याकरिता व्हॉलमन धुळे शहरातील उद्याने याकरिता वॉचमन तसेच कुशल व अकुशल कर्मचारी लावण्यास मा.आयुक्त साो.,मा.उपायुक्त साो.म.अभियंता साो. यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदर कार्यादेशानुसार श्री.राजे संभाजी मजूर कामगार सहकारी संस्था. मर्या. देवपूर धुळे यांनी माहे जून २०१४ मध्ये कामगार पुरविलेले आहे व त्यांनी पुरविलेले कामगार संबंधित ओव्हरसिअर यांनी संबंधित संस्थेने पुरविलेले कामागार यांनी काम केलेले आहे. त्याबाबतचे अहवाल सादर केलेला आहे.तो सोबत सादर करण्यात आला आहे. त्यांनी त्याबाबतचे बिल रु.४,८१,१३०/-(अक्षरी रु. चार लाख ऐक्यांऐंशी हजार एकशे तीस मात्र) चे बील सादर केलेले आहे.

एकुण तरतूद रु.६५१८८७०/-आहे.तरी रु.४८११३०/-खर्चास मंजुरी देणेस हरकत नसावी.असे अभिप्राय मुख्य लेखापरीक्षक यांनी दिले आहे.याबाबत कंत्राटदाराच्या करारनाम्याची मुदतीबाबत मा. आयुक्तानी विचारणा केली आहे.

त्यानुसारउक्त कामासाठी ठेकेदाराच्या करारनाम्याची मुदत दि.३१/३/२०१३ रोजी संपलेली होती. सदर कामगारांसाठी नव्याने निविदा काढणेबाबत कार्यालयीन टिपणी सादर करण्यांत येवून आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी सदरचे प्रकरण स्थायी समितीपुढे ठेवण्यासाठी आस्थापनाकडे देण्यांत आलेले आहे.तसेच उक्त ठेकेदाराला नवीन ठेकेदारांची नियुक्ती होईपर्यत मा.स्थायी समितीने दि.७/८/२०१३ रोजी ठराव नं.५१ अन्वये मंजुरी दिलेली आहे.

ठराव पारीत झाल्यावर१५ दिवसात निविदा प्रक्रिया राबवावयाची होती. त्याऐवजी एक वर्षाचा कालावधी का लागला?त्यापुढे कंत्राटदाराला मुदतवाढ देण्याबाबतचे आदेश दाखवा.असे आदेश मा.आयुक्त यांनी दिल्यानुसार कनिष्ठ अभियंता पा.पु. यांनी नमूद केले की, ठराव पारीत झाल्यानुसार सदरची निविदा प्रक्रिया आस्थापना विभागाकडून करणे बाबतचे ठरावातील आदेशानुसार सदरची नस्ती आस्थापनाकडे हस्तांतरीत करण्यांत आली. आस्थापना मार्फत निविदा टिपणी दि.१३/५/२०१४ रोजी सादर करण्यांत आली. आपण ४०

लाखाचे काम असल्याने वर्ष २०१४-१५ साठी स्थायी समितीची आर्थिक व प्रशासकीय मंजुरी साठी ठेवणेबाबत अभिप्राय दिल्याने सदर प्रस्ताव मान्यतेसाठी पुन्हा सादर केलेला होता.

त्यावर मा.आयुक्त सो. यांनी आस्थापना विभागाकडेस खुलासा मागितला असता सर्व बाबी तपासून निविदा प्रक्रिया सुरुआहे. निविदा तात्काळ काढण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे.मे.स्थायी समितीच्यामंजुरी नंतर निविदा काढण्यांत येईल. असा खुलासा दिलेला आहे.

सदर प्रस्ताव मान्यतेसाठी आला असता सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर बाब पाणीपुरवठयाशी निगडीत असून अत्यावश्यक बाब असल्याने सदर संस्थेचे देयके अदा करणेस नियम व अटी शर्तीच्या अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे. तथापि सदर कामाची निविदा प्रक्रिया राबविण्यास झालेल्या विलंबाबद्दल चौकशी करुन जबाबदार असणा-या अधिकारी तथा कर्मचा-यांवर तांतडीने नियमानुसार कारवाई करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच प्रशासनाच्या या विलंबामुळे देयकाबाबत लेखापरीक्षणात आक्षेप निघाल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे**

**महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६७ आयएचएसडीपी घरकुल योजनेअंतर्गत टप्पा क्रं.२ साठी पी.एस.सी. कार्यादेश देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७५ दिनांक ०८/०९/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे आयएचएसडीपी घरकुल योजनेअंतर्गत टप्पा क्रं. २ च्या योजनेची मंजूरी दि.२३/३/२०१२ रोजी मिळालेली असून यापूर्वी सुरु असलेल्या मोहाडी येथील टप्पा क्रं. १ येथे ९६६ घरकुल बांधकामासाठी पीएमसी म्हणून जा.क्रं. धुमपा/बावि/६४६ दि.३१/८/२००९ रोजी श्री.चेतन सोनार आर्किटेक यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे. तथापि टप्पा क्रं; १ चे काम पूर्णत्वास येत आहे.

उक्त बाबत वरील आयएचएसडीपी योजने अंतर्गत टप्पा क्रं.२ मध्ये १२०० घरकुल मंजूर झालेले असून त्यासाठी १) म्हाडाच्या बैठकीना उपस्थितीत राहणे २) मक्तेदारास इमारतीच्या कामाच्या अडचणी सोडविणे व वेळोवेळी मार्गदर्शन करणे.३) सदर कामाचा भौतिक व आर्थिक प्रगती अहवाल दर महिन्याला म्हाडाला सादर करणे इ. कामे करण्यासाठी पीएमसी मध्ये काम करण्यासाठी २ टक्के प्रमाणे श्री. चेतन सोनार यांना पत्र दिले आहे. तसेच श्री. चेतन सोनार यांचेकडील पत्र क्रं.१७/५/२०१४ अन्वये पीएमसी नेमणूकीबाबत कार्यादेश मिळणेबाबत पत्र देऊन कळविले आहे.

उक्त बाबत १२०० घरकुलासाठी टप्पा क्रं.२ पीएमसी मधून श्री.चेतन सोनार आर्किटेक यांना कार्यादेश देणेबाबत प्रस्तावासंदर्भात मा. आयुक्त सो. यांनी म. अभियंता यांच्याशी चर्चा केल्यानुसार यापूर्वी मंजूर टेंडर दराप्रमाणे त्याच योजनेचे कामअसल्याने कार्यादेश क्रं.२४६ दिनांक२५/८/२००९ अन्वये शेकडा २ टक्के दराने मंजुरीस मे.स्थायी समिती पुढे सादर असा अभिप्राय अभियंता यांनी दिलेला आहे.

सदर प्रस्ताव हा आयएचएसडीपी घरकुल योजनेअंतर्गत टप्पा क्रं.२साठी पी.एम.सी. नेमणेबाबतचा असून त्यापोटी त्यांना २ टक्केदर देणेबाबतचा आहे. याबाबत आयुक्त सो. यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार सदर कामाच्या रकमेचा परतावा शासनाकडून मिळत असतो. तथापि याबाबत अधिक माहिती घेणे आवश्यक आहे तसेच यापूर्वी मान्यता दिलेले २ टक्के दर हे जास्तीचे वाटत असल्याने मनपाच्या आर्थिक हितासाठी सदर कमी करणे

आवश्यक आहे.त्यामुळे यासंपूर्ण विषयाबाबत अधिक माहिती घेऊन त्याबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्याने तूर्त सदर विषय हा तहकूब ठेवण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.सदस्य श्री. नरेंद्र परदेशी व अमीन पटेल यांनी केलेल्या सुचनेनुसार नियुक्त पी.एम.सी.कडून त्यांचे भागाचा तांतडीने सर्व्हे करुन प्रकल्प अहवाल सादर करणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६८ नवरंग जलकुंभ जवळील स.नं.२८ च्या जागेवर फेरीवाल्यांसाठी पालिका बाजार बांधणेच्या कामास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७६ दिनांक ८/९/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धूळे मनपा मालकीची जागा स.नं.२८ देवपूर नवरंग जलकुंभ समोरील आग्रारोड व नवरंग कॉलनीकडे जाणारा रस्ता लगतच्या जागेवर धुळे शहर मंजूर विकास योजनेत शॉपींग सेंटरचे आरक्षण दर्शविले आहे.

सद्यस्थितीत शहरात छोटया स्वरुपातील भाजीपाला,फळे विक्रेते व इतर जिवनावश्यक वस्तु शहरातील मुख्य रस्त्यावर तसेच खुल्या जागावर इतरत्र विखरलेले असून त्यामुळे नागरीकांना/ शाळकरी विद्यार्थ्यांना रहदारीची समस्या मोठया प्रमाणात येते.

सद्यास्थितीत म.न.पा.ने स्थापन केलेल्या फेरीवाले समितीत चर्चा होवून वरील मनपा मालकीच्या जागेवर पालिका बाजार स्वरुपाचे मार्केट बांधावे अल्प उत्पन्न फेरीवाल्यासाठी शासकीय दरात अशा स्वरुपाचे बाजार उपलब्ध झाल्यास शहरातील फेरीवाले व नागरीकांचा रहदारी व इतर बाबींचा प्रश्न सुटणार आहे.

याकामी आर्किटेक्ट श्री. योगेश ठाकरे यांनी या कामाबाबत आराखडे तयार केले आहे.तसेच सन २०१४-१५ च्या मनपा अर्थसंकल्पात शॉपींग सेंटर बांधणेकामी तरतूद उपलब्ध आहे. उक्त कामी मनपा मालकीच्या शॉपींग सेटरसाठी आरक्षित जागेवर पालिका बाजार बांधणे मंजूर दरानुसार आर्किटेक्ट योगेश ठाकरे यांचे मार्फत सविस्तर अंदाजपत्रक / आराखडे तयार करणे तसेच त्यासाठी लागणा-या आवश्यक त्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.सदस्य श्री.नरेंद्र परदेशी यांनी सूचविलेल्या जागेची नगररचनाकार यांनी पहाणी करुन ८ दिवसांत अहवाल सादर करावा. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६९ दै.सकाळ पेपर आयोजित जलदिंडी अभियानासाठी सहप्रायोजकत्व स्विकारणेकामी येणा-या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७७ दिनांक ०८/०९/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सर व्यवस्थापक सकाळ पेपर्स यांचे दिनांक १८/८/२०१४ च्या पत्रान्वये जलदिडी अभियान या उपक्रमाचे आयोजन केले आहे.सदर आयोजन सकाळ तर्फे वॉटर लॅबच्या(सर्वासाठी पाणी)माध्यमातून समोर आलेले निष्कर्ष राज्यभरातील लोकांपर्यत पोहचविण्यासाठी सर्व जल अभियान या उपक्रमाचे आयोजन केलेले आहे.व गणेशोत्सवात आपण जलदिंडी आयोजन व दिनांक २९ व ३० ऑगस्ट२०१४ या कालावधीत

सांस्कृतिक कार्यक्रमासह लेझीन पथके,झांज पथके व पथनाटय कलावंत यात सहभागी होणार आहेत.या जलदिंडीत साधारणत:४ ते ५ लाख नागरीक सहभागी होणार आहेत.

उक्त अभियानातंर्गत सह प्रायोजकत्व आपण स्विकारावे अशी विनंती त्यांनी केलेली आहे. तरी सहप्रायोजकत्व स्विकारणेसाठी रु.५००००/-खर्च येणार असून यावर सन २०१४ मधील अंदाजपत्रकात जाहिरात या बाबीसाठी ४० लाखांची तरतूद आहे.

सदर बाबी मधून उपरोक्त खर्च करण्यांस हरकत नाही असा अभिप्राय मुख्य लेखाधिकारी यांनी सादर केलेला आहे.

उपरोक्त आलेल्या अभिप्रायानुसार उक्त अभियानातंर्गत सह प्रायोजकत्वासाठी झ ाालेल्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**शुक्रवार दिनांक ७ नोव्हेंबर २०१४**
**वेळ:-सकाळी १०-००वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज शूक्रवार७/११/२०१४ रोजी सकाळी १०-०० वाजतां मा.श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती,स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीदअहमद | सदस्य |
| ७ | श्री.जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| १० | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ११ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १२ | श्रीमती ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १३ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १४ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री के. व्ही. धनाड | अति. आयुक्त |

| | | |
|---|---|---|
| २. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त |
| ३. | श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ४. | श्री. बी.बी. गिते | सहा. आयुक्त ( अतिक्रमण) |
| ५. | श्री. म.रा.सराईत | मुख्य लेखा परीक्षक |
| ६. | श्री. के.एन. शिंदे | शहर अभियंता |
| ७. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ८. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ९. | श्री. पी.डी. नाईक | प्र. लेखापाल |
| १०. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| ११. | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १२. | श्री.आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १३. | श्री. के.जी. सुडके | अधिक्षक एल. बी. टी. विभाग |
| १४ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १६ | श्री. बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १८ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १९ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |
| २० | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |

म. सभापती सन्मा. सदस्य/सदस्या,अति.आयुक्त, उपायुक्त, अधिकारी, पत्रकार तथा छायाचित्रकार यांचे स्वागत करतो. सभेचे कामकाज चालविणेस आवश्यक ती गणपूर्ती झालेली असल्याने सभेच्या कामकाजास नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेल्या श्रध्दांजलीच्या यादया.**

१) तरुणांचे प्रेरणास्थान तसेच तत्कालीने नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष प्रदिप बाबुराव कंड्रे उर्फ बाळासाहेब यांचे दिनांक २२/१०/२०१४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे.त्यांना आजच्या स्थायी समितीत श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करणेत यावा.

सुचक :- सौ. माधुरी नंदलाल आजळकर

१) हिंदी व मराठी चित्रपट सृष्टीतील ख्यातअभिनेता नाम व सामाजिक बाधीलकी जोपासणारे व्यक्तीमत्व सदाशिव अमरापूरकर यांचे दु:खद निधन झाले आहे. त्यांना आजच्या स्थायी समितीत श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करणेत यावा.

सुचक :- श्री. दिनेश लहु शार्दुल

अनुमोदक :- श्री.अमोल ( बंटी) पावबा मासुळे

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांचे दु:खद निमित्त श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे सर्वानी मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७८ दिनांक ७/११/२०१४**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार तरुणांचे प्रेरणास्थान तसेच तत्कालीने नगरपालिकेचे उपनगराध्यक्ष प्रदिप बाबुराव कंड्रे उर्फ बाळासाहेब यांचे दिनांक २२/१०/२०१४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले आहे. तसेच हिंदी व मराठी चित्रपट सृष्टीतील ख्यातअभिनेता नाम व सामाजिक बाधीलकी जोपासणारे व्यक्तीमत्व सदाशिव अमरापूरकर यांचे दु:खद निधन झाले आहे. वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे यासभेस आतीव दु:ख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मान्यवरांचे निधनानिमित्त भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा.सदस्याकडून आलेला रजेचा अर्ज**

सन्मा.सदस्य श्री. गोविंद तुळशीराम साखला यांनी विनंती अर्ज देऊन अर्जात नमूद केलेल्या कारणानिमित्त सभेच उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७९ दिनांक ७/११/२०१४**

सन्मा.सदस्य श्री. गोविंद तुळशीराम साखला यांनी विनंती अर्ज देऊन अर्जात नमूद केलेल्या कारणानिमित्त सभेच उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहेसन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७० — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करणे.
(२/६/२०१४,५/६/२०१४,३०/६/२०१४,२२/७/२०१४,१२/८/२०१४,१९/८/२०१४, २७/८/२०१४)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८० दिनांक ७/११/२०१४**

मागील स्थायी समिती सभा

१) धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २८ ते ३५ दि. २/६/२०१४ चे ठराव व बैठकीत घेंतलेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

२) धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ ते ३८ दि. ५/६/२०१४ चे ठराव क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

३) धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३९ ते ४४ दि. ३०/६/२०१४ चे ठराव व बैठकीत घेंतलेले निर्णय क्रमशःवाचून कायम करण्यांत येत आहे.

४) धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ ते ४७ दि.२२/७/२०१४ चे ठराव व बैठकीत घेंतलेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

५) धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४८ ते ५६ दि. १२/८/२०१४ चे ठराव क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

६) धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ ते ६६ दि. १९/८/२०१४ चे ठराव क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

७) धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६७ ते ७१ दि. २७/८/२०१४ चे ठराव व बैठकीत घेंतलेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७१ — एकत्रीत मानधनावरील ३ सिव्हील ओव्हरसियर यांनी मुदतवाढ मिळणेबाबत विनंती अर्ज सादर केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म.नगरसचिव — नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

म. अमोल मासुळे — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. नरेंद्र परदेशी — विषय मंजूर करण्यांत यावा.

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने सदर प्रस्तावास मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८१ दिनांक ७/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे श्री.रणधीर अजय राजेंद्र व श्री आशीष श्रीधर शिंदे व श्री.भुषण मनोज ढवळे यांना धुळे महानगरपालिका ठराव नंबर १२ दिनांक१०/८/२०११ अन्वये एकत्रीत मानधनावर सिव्हील ओव्हरसियर भरणे मंजुरी नुसार मानधनावर (कंत्राटी ) पध्दतीने ६ महिन्यासाठी सिव्हील ओव्हरसियर भरण्याबाबतची दिनांक४/१/२०१४ रोजीच्या वृत्तपत्रातील प्रसिध्द जाहिराती नुसार सिव्हील ओव्हरसियर यापदासाठी अर्ज देवुन त्याबाबत दिनांक १४/२/२०१४ रोजी मुलाखती नुसार सदर पदासाठी अनुक्रमे जा.क्र. धुमपा/ आस्था /१३०८ दिनांक२८/२/२०१४ व जा.क्र धुमपा/आस्था/१३०९ दिनांक२८/२/२०१४अन्वये ६ महिन्यासाठी एकत्रीत मानधनावर कंत्राटी ओव्हर सियर या पदावर नेमणुक करण्यात आलेली आहे.

सदरच्या पदासाठीचा आदेशातील नमुद अटी शर्तीनुसार या पदाबाबतची मुदत दिनांक २८/८/२०१४ रोजी संपत आहे.

महाराष्ट्र महानगरपालिकाअधिनियम १९४९ मुंबई अधिनियम क्रं.५९) मधील नियम ५३ (३) अन्वये मा.आयुक्तास स्थायी समितीच्या पूर्व मंजूरी वाचून कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही (लिपीक या पदाशी समतुल्य असलेल्या किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या वेतनाएवढे अथवा त्याहून अधिक वेतन असलेल्या) कोणत्याही नेमणूकीचे उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही.सबब उक्त तिन्ही ओव्हरसिअर यांना मुदतवाढ देता येणार नाही. ओव्हरसिअर या कर्मचा-यांची गरज असल्यास नवीन भरती करावी असा मुख्य लेखापरीक्षक यांनी अभिप्राय दिलेला होता. याबाबत मा.आयुक्त सो.यांनी चर्चा करण्याबाबत आदेशित केलेले होते.

त्यानुसार मा.आयुक्त सो.यांच्याशी चर्चा केली असता म. लेखापरीक्षक यांच्या अभिप्रायानुसार सदरचा विषय कार्योत्तर मंजुरीसाठी ठेवण्याबाबत म. सभापती स्थायी समिती यांच्याशी चर्चा झाली आहे. तसेच उपरोक्त एकत्रित मानधनावरील कर्मचा-यांनी यापूर्वी ६ महिने काम केलेले आहे. त्यांची मुदत दि. २८/८/२०१४ रोजी संपलेली असून त्यांची सेवा खंडीत झालेंली आहे.तसेच सद्यस्थितीत आरोग्य विभाग, पाणीपुरवठा विभाग व बांधकाम विभागाकडील तांतडीच्या कामांसाठी ३ सिव्हील ओव्हरसिअर यांची आवश्यकता आहे.

शहराचा वाढता विस्तार व बांधकाम /पाणीपुरवठा व नगररचना विभागाकडील कामाचा व्याप लक्षात घेता तसेच तांत्रिक कर्मचा-यांची गरज लक्षात घेऊन उक्त आलेल्या कार्यालयीन अहवालात नमूद १ ते ३ ओव्हरसिअर यांना ६ महिन्यांसाठी पुर्ननियुक्ती देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ७२ — शासन निर्णयानुसार वाहन चालक व वर्ग ४ कर्मचा-यांना रु.३० ऐवजी रु.५०मात्र वाढीव धुलाई भत्ता लागु करण्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८२ दिनांक ७/११/२०१४**

कार्यालयीन निवेंदनाप्रमाणे शासकीय वाहन चालक संघटना मंत्रालय मुंबई शाखा धुळे यांनी शासन निर्णयानुसार वाहन चालकांना वाढीव धुलाई भत्ता वेतनात लागु करण्याबाबत निवेदन दिलेले आहे.

महाराष्ट्र शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक गणवेश ३४०३/प्र.क्र१२६/२००४/२९ दिनांक२६मार्च २००८मधील मुददा क्रमांक२(ब) नुसार सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्रमांक गधुभ/३५९४/प्र.क्र३१/९५/२९दिनांक ८/२/१९९६ अन्वये शासन चतुर्थ श्रेणी कर्मचारी व वाहनचालक यांना विहीत केलेल्या धुलाई भत्त्यात वाढ करुन हा भत्ता दरमहा रुपये ५०/-(रुपये पन्नास )करण्यात यावा असे नमुद केले आहे.

त्यानुसार सदरचा विषय निर्णयास्तव महासभेत ठेवण्यात आला होता.त्यानुसार धुळे महानगरपालिका ठराव क्रमांक २७ दिनांक १५/५/२०१४ अन्वये शासन निर्णय गणवेश ३४०३/ प्र.क्र१२६/२००४/२९ दिनांक २६ मार्च २००८ चे परिपत्रकानुसार व कार्यालयीन अहवालानुसार धुळे महानगरपालिकेतील कायम व म्यु.पल फंडातील कर्मचा-यांना शासनाच्या सुधारीत दराने धुलाई भत्ता लागु करणेसाठी महानगरपालिका उपविधीत दुरुस्ती करणेस व सदर प्रस्ताव शासनाच्या मान्यतेसाठी दिलेली आहे.सदर उपविधीस मान्यता मान्यता मिळाल्यापासुन वाढीव दराने धुलाई भत्ता लागु करण्यात यावा व गणवेश परिधान न करणाऱ्या कर्मचा-यांवर प्रशासनामार्फत कारवाई करण्यात यावी असा निर्णय झालेला आहे.

त्यानुसार जा.क्र धुमपा/आस्था/३५२ दिनांक ८/७/२०१४ अन्वये स्थानिक वर्तमान पत्रात जाहिर नोटीस देवुन सुधारीत दराने धुलाई भत्ता लागु करण्याबाबत ७ दिवसाच्या हरकती/सुचना मागविण्यात आलेले होती.तथापि उक्त मुदतीत एकही हरकती/सुचना प्राप्त झालेली नाही.त्यानुसार उपविधी मंजुरीबाबत पाठविण्याची कारवाई सुरु झालेले आहे.

शासन निर्णय क्र गणवेष ३५०३/ प्र.क्र१२६/२०१४/२९ दिनांक२६/३/२००८ अन्वये तसेच महासभेतील ठराव क्रमांक२७ दिनांक १५/५/२०१४ अन्वये महानगरपालिकेतील कायम व म्यु.पल फंडातील वाहनचालक व चतुर्थ श्रेणी कर्मचारी यांना रु.३० ऐवजी रु.५०/- सुधारीत दराने धुलाई भत्ता देणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७३ एल.बी.टी. विभागाकरिता नवीन Canon कंपनीचे झेरॉक्स मशिन रेट कॉन्ट्रक्ट नुसार खरेदी करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८३ दिनांक ७/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र शासनाचे आदेशानुसार दि.६/७/२०१३ पासून शहर हद्दीमध्ये उपभोग उपयोग वापर विक्री यासाठी आयात होणा-या मालावर जकात कराऐवजी स्थानिक संस्थाकर लागू करणेत आला आहे. त्यानुसार स्थानिक संस्था कर कार्यालयाकडेस ६५०० व्यापा-यांनी नोंदणी केली आहे. त्यापैकी बरेच व्यापारी एल.बी.टी. कर भरीत नाही. विवरण पत्र वेळेवर सादर करीत नाही. अशा वेळेस शासनाचे आदेश नोटीस, सुनावणी नोटीस, निर्धारण आदेश व इतर कार्यालयीन पत्रे व्यापा-यांना द्यावे लागतात. अशा प्रत्येक वेळी त्वरीत छपाई कामे करुन मिळत नाही. व छपाईचे दर जास्त आहे.तसेच कार्यालयीन कागदपत्राच्यांही झेरॉक्स करावे लागतात बाहेरुन झेरॉक्स केल्यास झेरॉक्स प्रती २ रुपये दर आहे. त्यामुळे बराच खर्च होतो. त्यासाठी सदर कार्यालयासाठी झेरॉक्स मशिन नवीन मिळणेबाबत अधिक्षक, स्थानिक संस्था कर यांनी मा.उपायुक्त, आयुक्त सो. यांचे मान्यतेने टिपणी स्टोअरकडेस सादर केलेली होती.

कॅनान कंपनीचे अधिकृत विक्रेते एस. ॲण्ड एस. एंटरप्राईजेस नाशिक हे आहेत. तसेच त्याचे DGS&D रेट कॉन्ट्रेक्ट DCMOM-EB/II-३/RC D १००००००/ ०६१४/ ८३०२५८९

/२०२० दिनांक २१ ऑक्टोबर१३ ते ३१ ऑक्टोबर २०१४ पावेतो मुदतीचे आहे त्या शासन दर करारनुसार Canon IR २५२५
२५(cam) paper size A ३/A ३Ram (MB) ६४,२५० Sheets, I cassettes,& ५३ D sheet/ cassette Zoom ; २५% To४०० % Bye Pass १०० sheet, category; Duplex ची किंमत रुपये १,२३,५७६/-
५% + CST /Vat ६,१७९/-

-------------

Total १,२९,७५५/-

वर नमूद केलेले शासन दर करारनुसार असून त्याची मुदत दि. ३१ ऑक्टोबर २०१४ अखेर होती. सदर मुदतवाढीबाबत सदर कंपनीने पत्र सादर केलेले आहे. तसेच अटी शर्ती १००% पेमेंट ॲडव्हान्स डिलीव्हरी अगेन्स डिलीव्हरी ८ ते १० दिवसात वारंटी ९० दिवसाची किंवा ५० हजार कॉपी पर्यत, व्हॅलीडीटी कोटेशन दिनांकापासून ३० दिवसापर्यत अशी आहे. सदर झेरॉक्स मशिन खरेदीसाठी स्टेशल बजेट तरतूद नाही. सदर खर्च सन २०१४-१५ चे सर्व सामान्य सादीक रु.५०,००,०००/-= बजेट हेड तरतुदीतून करावा लागेल.

उक्त आलेल्या अहवालानुसार सदर झेरॉक्स मशिन शासन दर करारानुसार घेणेस येणारा खर्च रुपये १,२९,७५५/- मात्रला तसेच मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड (क) प्रकरण २(२) च्या परंतुकानुसार विना निविदा खरेदीस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-७४ धुळे शहरातील १ ते ४ झोन मधील दैनंदिन घनकचरा उचलणेकामी ठेकेदार नियुक्ती बाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८४ दिनांक ७/११/२०१४**

धुळे शहरातील घनकचरा वाहतूक करणे कामी १ ते ४ झोन प्रमाणे एका महिन्याच्या लमसम एकत्रीत खर्चा प्रमाणे निविदा प्रसिध्द केली असता संदर्भान्वये खालील निविदा धारकांनी झोन प्रमाणे त्यात भाग घेतलेला आहे.

| झोन क्र. | अ.क्र. | निविदाधारकांचे नांव |
|---|---|---|
| १<br>३२१<br>देवपुर | १ | आस्था स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे |
| | २ | वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स, नाशिक |
| | ३ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई |
| २<br>३२२<br>सुभाष नगर पेठ परीसर | १ | वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स, नाशिक |
| | २ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई |
| ३<br>३२३<br>मौलवीगंज आझाद नगर, मोहाडी | १ | अल्पसंख्यांक मेहतर दुर्बल घटक बहु. स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे |
| | २ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई |
| ४ | १ | आस्था स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे |

| | | |
|---|---|---|
| ३२४<br>मोगलई<br>फाशीपुल | २ | वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स, नाशिक |
| | ३ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई |

मा.आयुक्त सो. यांच्या आदेशाने झोन क्र. १ व ४ मध्ये ३ निविदाधारक व झोन क्र. २ व ३ मध्ये २ निविदाधारक यांनी भाग घेतला असुन वरील चार ही झोनचे तांत्रीक व दरपत्रक उघडण्याबाबत आदेशीत केल्याप्रमाणे आस्था स्वयं. सेवा सह.संस्था,धुळे यांचेकडे कॉन्ट्रॅक्टर लेबर लायसंस नव्हते. परंतु त्यांनी शासनाच्या परिपत्रकाची प्रत जोडली आहे. तसेच ट्रॅक्टर बाबत स्वतःचे व ट्रॅक्टर मालकाचे हमीपत्र १००/-रु. च्या स्टॅम्प पेपरवर सादर केलेले नव्हते. परंतु त्यांचे स्वतःचे लेटरपॅडवर त्यांच्या नावावर निविदा मंजुर झाल्यास करुन देण्याबाबत पत्र सादर केले आहे.तसेच अल्पसंख्यांक मेहतर दुर्बल घटक बहु.स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे यांचे व्यवसाय कर नोंदणीप्रमाणपत्र, वाहन लावण्या बाबत स्वतःचे व वाहन मालकाचे हमीपत्र व आयकर विवरणपत्र सादर केलेले नाही.

उपस्थित वरिल निविदराधारकांचे प्रतिनीधी यांनी या बाबत कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही व तसे लेखी दिले आहे. मा.आयुक्त सो. यांच्या आदेशाने उक्त भाग घेतलेल्या सर्व निविदाधारकांचे दरपत्रक उघडण्यात आले त्यात खालील प्रमाणे दर प्राप्त झाले आहे. व त्यासमोर अंदाजपत्रकीय दर दर्शवीले आहे.

| झोन क्र. | अ.क्र. | निविदाधारकाचे नांव | प्रति महिना लमसम दर रु. | अंदाजपत्रकीय रक्कम रु. |
|---|---|---|---|---|
| १<br>३२१ | १ | आस्था स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे | ७,७२,०१२/- | ८,१९,०००/- |
| | २ | वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स, नाशिक | १३,५०,०००/- | |
| | ३ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई | ८,१९,७५०/- | |
| २<br>३२२ | १ | वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स, नाशिक | १३,५०,०००/- | ९,६५,२५०/- |
| | २ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई | ८,६६,६७०/- | |
| ३<br>३२४ | १ | अल्पसंख्यांक मेहतर दुर्बल घटक बहु. स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे | १०,००,०००/- | १०,९२,०००/- |
| | २ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई | ८,९९,९७०/- | |
| ४<br>३२४ | १ | आस्था स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे | ८,१२,०००/- | ८,३८,५००/- |
| | २ | वॉटर ग्रेस प्रॉडक्ट्स, नाशिक | १३,५०,०००/- | |
| | ३ | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई | ८,१९,७५०/- | |

वरील प्राप्त दरामध्ये खालील प्रमाणे झोननीहाय सर्वात कमी दर खालील निविदाधारकांचे प्राप्त झाले आहे.

| अ.क्र. | झोन क्र. | निविदाधारकाचे नांव | प्रति महिना लमसम दर | अंदाजपत्रकीय दर |
|---|---|---|---|---|
| १ | १ (३२१) | आस्था स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे | ७,७२,०१२/- | ८,१९,०००/- |
| २ | २(३२२) | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई | ८,६६,६७०/- | ९,६५,२५०/- |
| ३ | ३(३२३) | सिटी केअर गर्व्हं. रजि. कॉंट्रॅक्टर, मुंबई | ८,९९,९७०/- | १०,९२,०००/- |
| ४ | ४(३२४) | आस्था स्वयं. सेवा सह. संस्था, धुळे | ८,१२,०००/- | ८,३८,५००/- |

वरील झोन निहाय प्राप्त झालेले प्रति महिना लमसम दर हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी असुन सद्य स्थितीत कार्यरत असलेले ठेकेदार समिक्षा कं. कंपनी, ठाणे यांचे कामात दुर्लक्ष झाले असुन काम करुन घेण्याची मानसिकता राहिलेली नाही. त्यामुळे कचरा बाबत

तक्रारी वाढत आहे.वृत्तपत्रात तसे प्रसिध्द होऊन नागरीकांचे मनपा विषयी वाईट भावना निर्माण होत आहे. त्या अनुषंगाने आलेल्या सर्व निविदाधारकांची तांत्रीक व दरपत्रके उघडुन उक्त प्रमाणे सर्वात कमी दर वरील संस्थेचे झोन निहाय प्राप्त झाले आहे. अंदाजपत्रकातील दर हे सद्य परिस्थितीतील सुरु असलेल्या दरापेक्षा कमी असुन वरील दर हे अंदाजपत्रकातील दरापेक्षा कमी आहे.असा कार्यालयीन अहवाल मे.स्थायी समिती समोर मान्यतेसाठी सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावचर्चेसाठी आला असतासर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार यापूर्वी शहराचे ४ झोन करुन ४ ही विभागासाठी स्वतंत्र ठेकेदार नियुक्त करणेबाबत निर्णय घेण्यांत आलेला आहे.यापूर्वी समिक्षा कंस्ट्रक्शन कंपनी ठाणे व आस्था स्वयंरोजगार संस्था,धुळे या संस्था महानगरपालिकेत स्वच्छतेकामी कार्यरत होत्या. तथापि सदर संस्थेचा मागील अनुभव व कार्यपध्दती लक्षांत घेता सदर संस्थांचे काम अत्यंत असमाधानकारक असून कामाबाबत नागरीक व नगरसेवकांच्या अनेक तक्रारी आहेत.शहरातील सार्वजनिक स्वच्छतेची परिस्थिती संस्थेच्या अकार्यक्षमतेमुळे अत्यंत बिकट झालेली आहे. तसेच सदर निविदेमधील अटी शर्तीनुसार आस्था स्वयंरोजगार संस्था धुळे ही संस्था पात्र नाही.अशा परिस्थितीत पुनश्च त्यांना ठेका देणे उचित होणार नाही. तसेच उर्वरीत एकच संस्था निविदेमध्ये वरील बाबीमुळे पात्र ठरत आहे.तथापि स्वच्छतेचे काम गतीने व कार्यक्षमतेने होणे अपेक्षित असल्याने शहराच्या चारही भागासाठी स्वतंत्र चार ठेकेदार नियुक्त करणे हे गरजेचे व क्रमप्राप्त आहे. त्यासाठी या कामी पुनश्च फेर ई निविदा राज्य स्तरीय पातळीवर प्रसिध्दकरण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच तो पावेतो शहरातील सार्वजनिक स्वच्छतेचे काम धुळे मनपाच्या कर्मचा-यांमार्फत करण्यांत यावे.यासाठी आवश्यक ती साधन सामुग्री नियमाप्रमाणे उपलब्धतेसाठी मान्यता देण्यांत येत आहे.तसेच या कार्यवाहीसाठी अतिरिक्त आयुक्त,उपायुक्त,आरोग्याधिकारी, व सहा. आरोग्याधिकारी यांनी त्यांच्या नियंत्रणातील कर्मचा-यांमार्फत आवश्यक ती कार्यवाही तथा पूर्तता त्यांनी बैठकीत मान्य केल्याप्रमाणे तांतडीने करावी.

तसेच समिक्षा कंस्ट्रक्शन कंपनी ठाणे व आस्था स्वयंरोजगार संस्था,धुळे या संस्थांची कार्यपध्दती व निष्काळजीपणामुळे शहरात सार्वजनिक स्वच्छतेच्या तक्रारीत वाढ झालेली असून शहरातअनेक साथीच्या रोग्याचा प्रार्दुभाव निर्माण होण्यांस मदत झालेली आहे.त्यामुळे महानगरपालिकेस पर्यायाने नागरीकांना अनेक अडचणींना व समस्यांना सामोरे जावे लागले आहे. यामुळे सदर दोन्ही संस्थाचा काळया यादीत समावेश करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच सदर संस्थाची देयके सादर करतांना यापूर्वी झालेल्या ठरावाप्रमाणे प्रशासनाने कार्यवाही केलेली नाही; त्यामुळे सदर संस्थाची देयके अदा करण्यांत येऊ नये. व आरोग्य विभागाकडे सदर संस्थेची देयके प्रलंबीत असल्यास सदर देयके सादर करु नये.

सार्वजनिक स्वच्छतेकामी फेर निविदा प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही होत असल्याने तो पावेतो महानगरपालिकेमार्फत स्वच्छतेचे काम करण्यांत येणार आहे. त्यासाठी यापूर्वी झालेल्या ठरावाप्रमाणे नियुक्त सफाई कामगार हे प्रत्यक्षात कामावर न जाता अन्य कर्मचारी अथवा इसमामार्फत कामे करतात तसेच सफाई कामगार पदी नियुक्त असूनही अन्य विभागात काम करीत आहेत अशा सर्व कर्मचा-यांना सफाई कामी देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.व त्याबाबतचा अहवाल मे.स्थायी समिती समोर पुढील बैठकीत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-७५ मा.सभापती स्थायी समिती यांचे पत्रानुसार मनपा प्रशासकीय इमारतीच्या बांधकामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कन्संल्टन्ट नियुक्तीबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८५ दिनांक ७/११/२०१४**

मा. सभापती स्थायी समिती, मनपा धुळे यांचे दिनांक ३/११/२०१४ च्या पत्रानुसार धुळे महानगरपालिकेमार्फत विशेष निधी अंतर्गत शाळा क्रं.१ येथे प्रशासकीय इमारतीचे बांधकाम सुरु करण्यांत आलेले आहे.सदरचे काम हे शहराच्या व महानगरपालिकेच्या दृष्टीने अंत्यंत महत्वपूर्ण असल्याने सदर काम हे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार होणे आवश्यक आहे. मनपा अधिकारी यांचेकडील कामाचा व्याप व तांत्रिक क्षमता लक्षांत घेता कामावर देखरेख ठेवणे, काम स्पेसिफिकेशन प्रमाणे करणे इत्यादी साठी स्वतंत्र प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्लटंटची नियुक्ती करणे आवश्यक आहे. तरी सदर प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्स्लटंट ची नियुक्तीसाठी पुढील कार्यालयीन प्रक्रिया तथा निविदा प्रक्रिया करणेसाठी मा.सभापती सो. स्थायी समिती, मनपा धुळे यांच्या आदेशानुसार सदर प्रस्ताव विषय सूचीवर घेण्यांत आलेला होता.

उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर विषय नामंजूर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**दि. ७/११/२०१४ च्या स्थायी समिती सभेतील निर्णय**

१) सन्मा. नगरसेवक श्री. शेख फिरोज बशीर यांच्या सुचनेनुसार मागील स्थायी समिती सभा दिनांक १२/८/२०१४ रोजी झालेल्या बैठकीत ठराव क्रमांक ५० नुसार सेवानिवृत्त झालेल्या कर्मचा-यांना ६ व्या वेतन आयोगाच्या फरकाची रक्कम सेवानिवृत्तीच्या दिनांकाप्रमाणे असलेल्या यादीनुसार दरमहा १० सेवानिवृत्त कर्मचा-यांना फरकांच्या रकमा अदा करणेस मान्यता देण्यांत आलेली होती. परंतु आजतागायत सदर निर्णयाची अंमलबजावणी प्रशासनामार्फत करण्यांत आलेली नाही. ही बाब स्थायी समितीच्या निर्णयाचा अवमान करणारी आहे. तरी यास जबाबदार असणा-या लेखा विभागातील अधिका-यांविरुध्द तांतडीने कारवाई करण्यांत यावी. तसेच मनपाची आर्थिक स्थिती लक्षांत घेता दरमहा ५ लाख रुपयांपर्यतची रक्कम संबंधित सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या फरकासाठी यादीनुसार नोव्हेंबर महिन्यापासून देण्याबाबत कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

२) सन्मा. नगरसेवक श्री. दिनेश लहु शार्दुल यांच्या सुचनेनुसार मे. स्थायी समितीने दि. १२/८/२०१४ च्या सभेतील ठराव नंबर ५२,५३,५४ नुसार पाणीपुरवठा योजने वरील तांतडीच्या कामांना कार्योत्तर मान्यता देतेवेळी सदर कामाचे सविस्तर अंदाजपत्रक तथा केलेल्या कामाचा तपशील सर्व सदस्यांना देणेबाबत आदेशित केलेले होते. मात्र अद्याप पावेतो सदर अहवाल/ तपशील देण्यांत आलेला नाही. तरी याबाबत तांतडीने कार्यवाही करावी तसेच यापुढे अशा स्वरुपाची कामांना मान्यता देण्याबाबतचा प्रस्तावासोबत सदर अहवाल /तपशील सादर करुनच प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करावा.

३) सन्मा. नगरसेवक श्री. दिनेश लहु शार्दुल यांच्या सुचनेनुसारविद्युत विभागाकडील तक्रारी लक्षांत घेता विद्युत विभागाकडेस मानधनावर तांत्रिक कर्मचारी नियुक्ती बाबत आदेशित केलेले होते. याबाबतही अद्याप पावेतो कार्यवाही न झाल्याने विद्युत समस्येच्या तक्रारीत वाढ होत आहे. त्यामुळे याबाबत तांतडीने कार्यवाही करावी.

४) सन्मा.नगरसेवक श्री. नरेंद्र गोटु परदेशी यांच्या सुचनेनुसारमोगलाई येथील मुस्लीम कब्रस्तानाच्या जागेबाबत तांतडीने पहाणी तथा मोजणी करुन सदर कामाबाबत व जागा मालकी बाबत सविस्तर अहवाल पुढील स्थायी समितीच्या बैठकीत नगररचनाकार व अभियंता यांनी संयुक्तरित्या देणेबाबत कार्यवाही करावी.

५) सन्मा.नगरसेवक श्री.अमीन पटेल यांच्या सुचनेनुसारमोमीन कब्रस्तान येथील आवश्यक त्या सुधारणाबाबत तांतडीने पहाणी करुन उचित कार्यवाही करावी.

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**शुक्रवार दिनांक २८ नोव्हेंबर २०१४**
**वेळ:-सकाळी १०-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज शुक्रवार २८/११/२०१४ रोजी सकाळी १०-०० वाजतां मा. श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ७ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| १० | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ११ | श्रीमती. ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १२ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १३ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १४ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री के.व्ही. धनाड | अति.आयुक्त |
| २. | श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त |
| | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त (कर) |
| | श्री. म.रा.सराईत | मुख्य लेखा परीक्षक |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ४. | श्री.त्र्यंबक कांबळे | सहा.आयुक्त (कर) |
| ५. | श्री.पी.आर.दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ६. | श्री.मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री.पी.डी. नाईक | प्र.लेखापाल |
| ८. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| ९. | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. के.जी. सुडके | अधिक्षक एल. बी. टी. विभाग |
| १२. | श्री.एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक तथा जकात अधिक्षक |
| १३. | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १४ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १५ | श्री. बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १६ | श्री.सी.सी. बागुल | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |

| | | |
|---|---|---|
| १८ | श्री. एस.एस.देवरे | शाख अभियंता |
| १९ | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| २० | श्री.बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| २१ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २२ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |

म. सभापती — सन्मा. सदस्य/सदस्या,अति.आयुक्त,उपायुक्त,अधिकारी, पत्रकार तथा छायाचित्रकार यांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेस आवश्यक ती गणपूर्ती झालेली असल्याने सभेच्या कामकाजास नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मारत्मसाठी या राष्ट्र वंदेनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा.सदस्याकडून आलेला रजेचा अर्ज**

सन्मा.सदस्य श्रीमती माधुरी नंदलाल आजळकरव श्री. गोविंद तुळशीराम साखला, यांनी विनंती अर्ज देऊन अर्जात नमूद केलेल्या कारणानिमित्त सभेच उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८६ दिनांक २८/११/२०१४**

सन्मा.सदस्य श्रीमती माधुरी नंदलाल आजळकर व श्री.गोविंद तुळशीराम साखला, यांनी विनंती अर्ज देऊन अर्जात नमूद केलेल्या कारणानिमित्त सभेच उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

सन्मा.स्थायी समिती सभापती श्री.चंद्रकांत (काका) काशिनाथ केले यांनी दिलेल्या यादीनुसार दिनांक२६/११/२००८ रोजी महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांस आपल्या शौर्याने व पराक्रमाने महाराष्ट्र पोलीस दल व भारतीय सैन्य दलाने यशस्वी तोंड देऊन मुकाबला केला व महाराष्ट्रावर व देशावर आलेले संकट परतावून लावले.या हल्ल्यांत अनेक वीर जवान व पोलीस दलातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी शहीद झाले.त्यांच्या या अतुलनीय कामगीरी व शौर्याबद्दल त्यांना विनम्र अभिवादन करण्यांचा ठराव पारीत करण्यांत यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८७ दिनांक २८/११/२०१४**

सन्मा.स्थायी समिती सभापती श्री.चंद्रकांत (काका) काशिनाथ केले यांनी दिलेल्या यादीनुसार दिनांक२६/११/२००८रोजी महाराष्ट्राची राजधानी मुंबई येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यांस आपल्या शौर्याने व पराक्रमाने महाराष्ट्र पोलीस दल व भारतीय सैन्य दलाने यशस्वी तोंड देऊन मुकाबला केला व महाराष्ट्रावर व देशावर आलेले संकट परतावून लावले.या हल्ल्यांत अनेक वीर जवान व पोलीस दलातील कार्यरत अधिकारी व कर्मचारी शहीद झाले.त्यांच्या या अतुलनीय कामगीरी व शौर्याबद्दल त्यांना विनम्र अभिवादन करण्यांचा ठराव पारीत करण्यांत यावा.तसेच या हल्ल्यातील वीर शहीदाना विनम्र श्रध्दांजली आजच्या सभेत पारीत करण्यांत यावा.व याबाबत पोलीस अधिक्षक यांना ठरावाची प्रत व अभिवादनपर पुष्पगुच्छ पाठविण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/- x x x
**सभापती,**

**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-७६ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.०८/०९/२०१४)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८८ दिनांक २८/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक ८/९/२०१४ चे इतिवृत्त ठराव नंबर ७२ ते ७७ क्रमश: वाचून कायम करण्यात येत आहे.

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ७७ विशेष निधी अंतर्गत शहरातील राऊळवाडी व कुमारनगर अमरधामसाठी पेव्हींग ब्लॉक बसविणे कामाबाबत निविदा दर मागविणेत आले. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८९ दिनांक २८/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे विशेष निधी अंतर्गत शहरातील राऊळवाडी व कुमारनगर अमरधाम साठी पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामाबाबत धुळे महानगरपालिका ठराव क्रमांक २१ दि. ३१/१/२०१४ व म. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांचे दि. ४/३/२०१४ च्या पत्रान्वये प्रशासकीय मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत म.जि.प्रा. मंडळ नाशिक यांचेकडील पत्र क्रमांक मजिप्रामनाव आयोमंजप/तां.शा२/६१२/२०१४ दिनांक ११/०३/२०१४ अन्वये रक्कम रुपये ३८०९,८२२/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/पा.पु.३१५/२०१४-१५ दि. २/०८/२०१४(फेर ई निविदा सुचना क्रं.११ सन २०१४-१५) अन्वये दिनांक ३/८/२०१४ रोजीचे दैनिक या वत्तपत्रात खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक२७/०८/२०१४ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत. प्राप्त कंत्राटदार/ ठेकेदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा सादर केलेली आहेत.

| अ.क्रं. | कंत्राटदाराचे / ठेकेदारांचे नांव | दिलेले निविदा दर |
|---|---|---|
| १ | दिपक ए. चौधरी | अंदाजपत्रकीय दराने |
| २ | कमलेश पी. पाटील | ५ % जास्तीने |

कंत्राटदार/ठेकेदारश्री.दिपक ए.चौधरी यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालानुसार कंत्राटदार श्री. दिपक ए. चौधरी यांची अंदाजपत्रकीय कमी दराने आलेल्या निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे.नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा. **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ७८ धुळे शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षाकरिता जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ॲलम ब्लिचींग पावडर व क्लोरीन टनर गॅस रसायने पुरविणेकरिता निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९० दिनांक २८/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत सन २०१४-१५ या वर्षाकरिता जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे ॲलम ब्लिचींग पावडर व क्लोरीन टनर गॅस रसायने पुरविणेकरिता ई निविदा प्रसिध्द करण्यांत आलेली होती.त्यानुसार सदर फेर निविदाचे

दिनांक ३१/१०/२०१४रोजी व्यापारी बिड उघडण्यांत आले.त्यानुसार त्या ठेकेदाराचे संपूर्ण कागदपत्रे तपासणी करुन त्यांचे दर हे खालील प्रमाणे आहेत.

**अ) ॲलम :- टेंडर क्रं.३००** या निविदेत ३ ठेकेदारांनी भाग घेतलेला होता.

१) समर्थ एन्टरप्राईजेस रु. ५२३५/- प्रति टन

२) आसासाई केमिकल्स रु.५२४७/- प्रति टन

३) अल्मायटी केमिकल्स रु.५२५२/- प्रति टन

**ब)ब्लिचींग पावडर टेंडर क्रं. ३००:-**या निविदेत एकच निविदा धारक आल्याने त्यांचे व्यापारी बिड उघडले नाही.

**क)क्लोरीन टनर टेंडर क्रं. ३००:-**या निविदेत एकुण ५ निविदा धारकांनी भाग घेतलेला आहे.

१) दलाल & दलाल रु. १२९६०/- प्रति नग टनर

२) पार्श्वअसोसिएट रु. १२७५०/- प्रति नग टनर

३) जी.एस. कर्मोटमिल रु.११७००/- प्रति नग टनर

४) मधुमेम उद्याग रु.१२०६०/- प्रति नग टनर

५) आश्विनी ट्रेडर्स रु.१२३४५/- प्रति नगर टनर

तरी वरील प्रमाणे ॲलम व क्लोरीन गॅस टनर यांचे व्यापारी बिड उघडण्यांत येवून त्यांचे खालील प्रमाणे कमी दर आहेत

**अ) ॲलम:-**ॲलम मध्ये समर्थ एन्टरप्राईजेस यांचे सर्वात कमी दर रु. ५२३५/- प्रति टन असे आहेत.सदरचे दर हे सन २०१२-१३ च्या धुळे मनपा मंजूर दर रु.६४४१/-प्रति टन पेक्षा कमी आहेत. म्हणजेच मागील वर्षाच्या मंजूर दरापेक्षा रुपये १२०६/- प्रति टनाने कमी आलेले आहेत.

**क) क्लोरीन गॅस टनर:-** क्लोरीन गॅस टनर मध्ये सर्वात कमी दर हे जी.एस. कर्मिशिअल यांचे रुपये ११७००/- प्रति टनर नगाने आहेत व त्यांचे दर हे धुळे मनपाचे सन २०१२-१३ च्या रु. १२७५०/-प्रति नगापेक्षा रुपये १०५०/- प्रति नगाने कमी आहेत.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून ॲलमसाठी समर्थ एन्टरप्राईजेस यांचे सर्वात कमी दर रुपये ५२३५/- प्रति टन आलेले दरास मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच क्लोरीन गस टनरसाठी जी.एस. कर्मिशिअल यांचे सर्वात कमी आलेले दर रुपये ११७००/- प्रति टनर नगास मंजुरी देण्यांत येत आहे. उक्त दर हे सन २०१४-१५ या वित्तीय वर्षासाठी मागविण्यांत आलेले होते.परंतु सद्यस्थितीत नोव्हेंबर महिना सुरु असून सदरचे दर कार्यादेश दिल्यापासून पुढील एक वर्षासाठी ग्राहय धरण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच ब्लिचींग पावडरसाठी एकच निविदा प्राप्त झालेली असल्याने त्यासाठी फेर निविदा काढणेस कार्यालयीनअहवालास अधिन राहून मान्यता देण्यांत येत आहे.नियमानुसार संबंधित ठेकेदार यांचेकडून योग्य तो लेखी करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-७९ विशेष निधी अंतर्गत धुळे शहरातील स्टेशनरोड पासून सुरु होणा-या व सुभाष पुतळयापर्यत संपणा-या ८० फूटी रस्त्यावर भूमिगत केबलसह नवीन पोल एलईडी पथदिवे बसविणेचे कामासाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९१ दिनांक २८/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे म.विभागीय आयुक्त नाशिक यांचेकडील प्रशासकीय मंजुरी आदेश क्रं. नपा२/२ जा.क्रं.६५०२/२०१४ दि.६/८/२०१४ नुसार विशेष निधी अंतर्गत धुळे शहरातील स्टेशनरोड पासून सुरु होणा-या व सुभाष पुतळयापर्यत संपणा-या ८० फूटी रस्त्यावर भूमिगत केबलसह नवीन पोल एलईडी पथदिवे बसविणेचे कामासाठी रक्कम रुपये १,१४,३७,३४०/- करिता प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे.सदर प्रस्तावित कामास अधिक्षक

अभियंता,म.जि.प्रा.ठाणे यांचेकडील पत्र क्रं.म.जि.प्रा./अ/अ यात्रिकी/२४८ दिनांक २/५/२०१४ नुसार तांत्रिक मान्यता प्राप्त आहे.

उक्त प्रमाणे नमूद कामासाठी मनपा /वि./८७ दि.१६/८/२०१४ व ई निविदा सुचना क्रं.३४ नुसार ई निविदा व्दारे निविदा दर मागविण्यांत आले असता दिनांक २०/९/२०१४ च्या मुदतीमध्ये ४ निविदा धारक यांनी निविदा दर सादर करुन निविदा बयाणा रक्कम व निविदा फार्म शुल्क आवश्यक कागदपत्रासह सादर केले आहेत.प्राप्त निविदा पैकी मे.सोनु इलेक्ट्रीकल नागपूर यांनी बयाणा रक्कम राष्ट्रीयकृत बॅकेच्या एफडीआरव्दारे सादर केली म्हणून सदरच्या निविदेच्या पात्रतेबाबत मुख्य लेखापरीक्षक यांचा अभिप्राय घेण्यांत आला.

मुख्य लेखापरीक्षक यांनी सदरच्या निविदेकरिता डी.डी. व्दारे बयाणा रक्कम भरणे बंधनकारक आहे असे निविदेत अट असून तपशीलवार ई निविदेतील रकाना क्रं. १.८ पान क्रं.६ मध्ये बयाणा रक्कम एफडीआरव्दारे स्विकृतीस मान्यता आहे तरी निविदा स्पर्धात्मक होणेसाठी सोनु इलेक्ट्रीकल्स नागपूर यांची निविदा स्विकारणेसाठी मान्यता असावी असे अभिप्राय दिलेले आहे.

उपरोक्त आलेल्या कार्यालयीन अहवाल व त्यावरील उपस्थित सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेचा विचार करुन मे.सोनु इलेक्ट्रीकल नागपूर यांचे दर हे एस्टीमेट रेटपेक्षा शेकडा ७.२१ टक्के कमीने आलेले असल्याने त्यांचे आलेल्या दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून व श्री. नरेंद्र गोटु परदेशी यांचा या प्रस्तावास असलेला विरोध नोंदवून बहुमताने मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार संबंधित ठेकेदार यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा.

**बहुमताने मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-८० श्री.एस.बी. विसपुते, श्री.सी.एम. उगले, श्री.एन.के.बागुल, श्री.पी.डी. चव्हाण ओव्हरसिअर यांनी शाखा अभियंता पदाचा दर्जा व वेतनश्रेणी लागू होणेबाबत अर्ज सादर केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९२ दिनांक २८/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे श्री एस.बी विसपुते,श्री सि.एम उगले,श्री एन के बागुल व श्री पी.डी चव्हाण ओव्हरसियर यांनी दिनांक ३०/१०/२०१४अन्वये विनंती अर्ज देवुन नमुद केले की,आम्ही सर्व कनिष्ठ अभियंता यांनी सार्वजानिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय रापद /२०१२/प्र.क्र९०/आस्था-१/ दिनांक २५/३/२०१३अन्वये कनिष्ठ अभियंता पदावरील अभियंत्यांना शाखा अभियंता पदाचा दर्जा देणेबाबत निर्णय झालेला आहे त्यानुसार शाखा अभियंताची वेतनश्रेणी दिनांक १/१/२००६ पासुन लागु करण्याबाबत विनंती केली असून तसेच महानगरपालिकेत सेवेत कनिष्ठ अभियंता या पदावर कार्यरत असुन आमची सेवा सुमारे १५ ते २५ वर्षापर्यत झालेली आहे.परंतु अदयापी कनिष्ठ अभियंता या पदावर व वेतनश्रेणीवर काम करीत आहे.तरी उक्त शासन निर्णयानुसार शाखा अभियंता या पदासाठी वेतनश्रेणी रुपये ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० दिनांक १/१/२००६ पासुन लागु करण्याबाबत नमुद केलेले आहे.

त्यांनी त्याच्या अर्जासोबत सार्वजानिक बांधकाम विभाग शासन निर्णय रापद/२०१२ /प्र.क्र ९०/आस्था-१/ दिनांक २५/३/२०१३ जोडलेला आहे.सदर शासन निर्णयात शाखा अभियंता या पदासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारीत वेतन ) २००९ अनुसार दिनांक १ जानेवारी २००६ पासुन रुपये ९३००-३४८०० ग्रेड पे ३४०० ही वेतनश्रेणी लागु झालेली

आहे.असे नमुद केलेले आहे.उक्त विनंती अर्जावर मा.आयुक्त सो। यांनी स्थायी सामती ठेवा व सेवा प्रवेश नियमावलीत समाविष्ट करा असे आदेशीत केलेले आहे.

तसेच पाटबंधारे विभाग यांच्याकडील शासन निर्णय क्रमांक नियुक्ती /१२९९/(१४/९९) आ(शा.अ) दिनाक ९ फेब्रुवारी २००० मध्ये शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्याबाबतची सेवाकाळबाबत माहिती दिलेली आहे.

सदर तांत्रीक कर्मचा-यांना खालील प्रमाणे पदनाम व वेतनश्रेण्या आहेत.

| अ.क्र | कर्मचा-यांचे नाव | पदनाम | ६ व्या वेतन आयोगनुसार वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | श्री.पी.डी चव्हाण | ओव्हरसियर | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० |
| २ | श्री सी.एम उगले | ओव्हरसियर | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० |
| ३ | श्री एस.बी विसपुते | ओव्हरसियर | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० |
| ४ | श्री एन.के बागुल | ओव्हरसियर (पाणी पुरवठा) | ५२००-२०२०० ग्रेड पे २८०० |

त्यांनी त्याच्या अर्जासोबत सार्वजानिक बांधकाम विभागाकडील शासन निर्णय क्रमांक रापद-२०१२/प्र.क्र९०/आस्था १ दिनांक २५/३/२०१३अवये सार्वजानिक बांधकाम विभागांतर्गत पदवीधर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) यांना शाखा अभियंता या पदाचा दर्जा देण्याबाबत नमुद केलेले आहे.

उक्त शासन निर्णयानुसार सार्वजानिक बांधकाम विभागाकडील एकुण ३२ अपदवीधर कनिष्ठ अभियंता (स्थापत्य ) यांना दिनांक १ जानेवारी २००६ पासुन रुपये ९३००-३४८००( ग्रेड पे ४४०० ग्रेड पे सह ) लागु करण्यात आलेला आहे.

तसेच पाटबंधारे विभाग शासन निर्णय क्रमांक नियुक्ती /१२९९/(१४/९९)आ (शा.अ) दिांक ९ फेब्रुवारी २००० शासन निर्णय दिनांक १६/४/१९८४ व दिनांक २८/९/१९८४ प्रमाणे कनिष्ठ अभियतांना शाखा अभियंतांचा दर्जा देण्यासाठी विहीत करण्यात आलेल्या शैक्षाणीक अर्हता,सेवा कालवधी व गोपनीय अहवालाचे निकष या मध्ये खालील प्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कनिष्ठ अभियंताची वर्गवारी | राजपत्रित दर्जा मिळण्यासाठी लागणारा आवश्यक सेवाकाळ |
|---|---|---|
| अ | ३ वर्षाची पदविका वा त्याहुन उच्च अर्हता धारण केलेले सरळ सेवाप्रविष्ठ कनिष्ठ अभियंते | ५ वर्ष |
| ब | २ वर्षाची पदविका किंवा तत्सम अर्हता धारा केलेले सरळसेवा प्रविष्ठ कीष्ठ अभियंता | ७ वर्ष |
| क | वरील अ व ब येथे न मोडणारे इतर अर्हतारहित कनिष्ठ अभियंते | १० वर्ष |

दिनांक १/४/१९९८ व तदनंतर शाखा अभियंता पदावर नियुक्ती देण्यासाठी विहीत सेवा कालवधी पुर्ण करणाऱ्या कनिष्ठ अभियंताना शाखा अभियंता पदाचा दर्जा देण्यासाठी मागील पाच वर्षाचे गोपनीय अहवाल विचारात घेण्यात येतील व पात्रतेसाठी गोपनीय अहवालाची सरासरी प्रतवारी चांगला पेक्षा कमी नाही.असा निकष राहील.

उपरोक्त वरील दोन्ही शासन निर्णय त्याच्या खात्याअंतर्गत कर्मचा-यांच्या पदोन्नती संदर्भात शासनाने काढलेले आहेत.

सदर शासन निर्णय नगरविकास विभागाचा नसुन सार्वजानिक बांधकाम विभागाचा आहे तसेच धुळे महानगरपालिकेकडे शाखा अभियंता हे पद अस्तित्वात नाही. तसेच धुळे महागरपालिकेची सेवा प्रवेश नियमावली शासनाकडे मान्यतेसाठी प्रलंबीत आहे. तसेच उपरोक्त सर्व कर्मचा-यांचे पदनाम सारखे आहेत.

तसेच त्यांनी अर्जासोबत शैक्षाणीक पात्रतेचे कागदपत्रे व गोपनीय अहवाल सादर केलेले नाहीत.उक्त बाबत म.मुख्य लेखापरीक्षक यांचा अभिप्राय घेणेबाबत म.सहा.आयुक्त यांनी आदेशित केलेले आहे.

त्यावर शासन निर्णय/सार्व.बांधकाम/ रापद-२०१२/प्र.क्र.९०/आस्था १/ दिनांक २५/३/२०१३ च्या शासन परिपत्रकानुसार कनिष्ठ अभियंत्यांना शाखा अभियंता पदाचा दर्जा देणेबाबत मान्यता आहे. मात्र या मनपामध्ये शाखा अभियंता हे पद अस्तित्वात नसल्यामुळे सदर परिपत्रकानुसार शाखा अभियंता पदाचा दर्जा देणेबाबत प्रस्ताव शासनाकडे पाठविणे उचित होईल. अर्जदार १ ते ४ कनिष्ठ अभियंता यांना शाखा अभियंता पदाचा दर्जा देणे व सदर पदाची वेतनश्रेणी लागू करणे याबाबत मे.स्थायी समितीकडील मान्यता घेणे उचित राहील असा अभिप्राय म. मुख्य लेखापरीक्षक यांनी दिलेला आहे.

सदर प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे निर्णयासाठी आला असता झालेल्या चर्चेअंती उक्त चारही ओव्हरसिअर हे धुळे मनपाच्या सेवेत २० ते ३० वर्षापासून कार्यरत आहेत. त्यांना पदोन्नतीची संधी नाही. सद्यस्थितीत ओव्हरसिअर हे पद इतर शासकीय विभागात नाही. त्यामुळे उपरोक्त नमूद शासन निर्णयानुसार उक्त ४ ही ओव्हरसिअर यांना शाखा अभियंता या पदाची वेतनश्रेणी व दर्जा लागू करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.प्रशासनाने सदर बाबत कार्यवाही करुन सदर प्रस्ताव शासनाकडेस कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच इमारत निरीक्षक श्री. बी.डी. जगदाळे यांनीही पदोन्नती तथा शाखा अभियंता पदाचा दर्जा व वेतनश्रेणी लागू करणे बाबत मागणी केलेली आहे.त्यांच्या प्रस्तावा बाबतही तांतडीने कार्यवाही करुन सदर प्रस्ताव शासनाकडेस कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच धुळे महानगरपालिकेत लिपीकांकडे वरिष्ठ पदाची जबाबदारी सोपविण्यांत आलेली आहे.ते त्या पदावर समाधानकारक काम करीत आहेत. यांत प्र.नगरसचिव श्री. मनोज अरविंद वाघ, प्र.वसुली अधिक्षक श्री. काशिनाथ जी. खंदरकर, प्र.स्थानिक संस्था कर अधिक्षक श्री.किशोर जी.सुडके,प्र.लेखापाल श्री.प्रदीप डी.नाईक, प्र.वरिष्ठ सहाय्यक श्री. बळवंत एस.रनाळकर यांचा समावेश आहे. उक्त कर्मचा-यांनाही त्यांच्या कामाप्रमाणे सद्य स्थितीत काम करीत असलेल्या पदावर पदोन्नती देणे आवश्यक आहे. प्रशासनाकडे उक्त कर्मचा-यांपैकी ज्यांचा पदोन्नतीचा प्रस्ताव तयार आहे त्यांना तात्काळ पदोन्नती देणेस मान्यता देण्यांत येत आहे. व तसेच ज्यांचे प्रस्ताव अपूर्ण तथा प्रलंबीत असतील त्यांचे प्रस्ताव तात्काळ तयार करुन त्यांनाही पदोन्नती देणेस मान्यता देण्यांत येत आहे. याबाबत तातंडीने कार्यवाही करुन सदर प्रस्ताव शासनाकडेस कार्योत्तर मंजुरीसाठी सादर करण्यास मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-८१ श्री.पी.जी.वाणी लिपीक जकात विभाग यांनी निलंबीत प्रकरणी चौकशी अंती झालेली शास्ती माफ होणेबाबत अपील अर्ज सादर केलेला आहे.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९३ दिनांक २८/११/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे म.सभापती,स्थायी समिती महानगरपालिका धुळे यांच्याकडे श्री.पी.जी. वाणी लिपीक यांनी निलंबीत प्रकरणी चौकशी अंती झालेली शास्ती माफ होणेबाबत अपील अर्ज सादर केलेले आहे.सदर कर्मचा-यांचे अपील अर्ज मा. सभापती स्थायी समिती यांच्याकडून इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहेत.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नांव | हुदद‍ा | विभाग | दंडाचे स्वरुप | दंड केल्याचा आदेश क्रमांक व दिनांक | सभापती स्थायी समिती कडेअर्जसादर केल्याचा दिनांक | दंड केल्यानंतर अर्ज सादर केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. पी.जी. वाणी | लिपीक | जकात | एक वेतनवाढ | जा.क्र. धुमपा | १६/११/२०१३ | ०८ दिवस |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एक वर्षासाठी रोखून ठेवली | आस्था /९२६ दिनांक८/११/२०१३ | | |

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार कर्मचा-यांस शास्ती केल्यानंतर त्यावर अपीलाची खालील मुदत आहे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(४) नुसार कोणत्याही शास्तीविरुध्द अपील करण्याची मुदत ३० दिवस ( एक महिना) आहे.

२) महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ शिस्त व अपील नियम क्रं.१९ नुसार ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यांत आले असेल त्या आदेशाची प्रत अपीलकर्त्यालना मिळाल्याच्या तारखेपासून ४५ दिवसांच्या कालावधीत असे अपील केले नाही तर या भागामध्ये करण्यांत आलेले कोणतेही अपील विचारात घेतले जाणार नाही असे नमूद आहे.

तरी श्री. पी.जी. वाणी लिपीक यांच्या मुदतीत अपील अर्ज सादर केलेला आहे. श्री. वाणी यांनी मुदतीत अपील दाखल केलेले आहे.तरी उक्त प्रकरणी श्री. वाणी यांना रु. १०००/- मात्र दंडाची शास्ती करणे योग्य होईल.असा अहवाल सादर केलेला आहे. सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदरची दंडाची शास्ती ही जास्त होत असल्याने श्री. वाणी यांना २०० रुपये मात्र दंडाची शास्ती करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**<br>**सही/-x x x**<br>**सभापती,**<br>**स्थायी समिती,**<br>**धुळे महानगरपालिका,धुळे**

**दिनांक २८/११/२०१४ रोजीच्या स्थायी समिती सभेतील चर्चेनुसार झालेले निर्णय**

१) शासनाच्या ई गर्व्हनरर्स प्रणाली राबविण्यांच्या आदेशानुसार दिनांक १ जानेवारी २०१४ पासून मे. स्थायी समितीचे झालेले ठराव (इतिवृत्त मंजूरी) धुळे मनपाच्या बेव साईटवर प्रसिध्द करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

२) सन्मा. सदस्य श्री. अमिन पटेल यांनी शहरात डेग्युची साथ सुरु असून जिल्हा रुग्णालयात याबाबत पुरेशी व्यवस्था तसेच सुविधा नसल्यामुळे धुळे महानगरपालिके मार्फत तपासणी कक्ष सुरु करण्यांत यावा. तसेच म. अधिष्ठाता, जिल्हा रुग्णालय, धुळे यांना तात्काळ कळविण्यांत यावे. अशी सुचना केलेली आहे. त्यानुसार प्रशासनाने आवश्यक ती कार्यवाही त्वरीत करावी.

३) सन्मा.सदस्य श्री.कुमार डियालानी यांनी यशवंतनगर येथील मनपाचा दवाखाना इमारत खराब झाल्याने सदर दवाखाना कुमारनगर येथे स्थलांतर करणेबाबत सूचीत केलेले आहे. याबाबत म.आरोग्याधिकारी यांनी पहाणी करुन त्याबाबतचा अहवाल मे.स्थायी समितीपुढे मान्यतेसाठी सादर करावा.

४) सन्मा. सदस्य श्री.अमोल मासुळे यांनी वॉर्ड क्रं.२८ येथील दवाखान्यातील मानद वैद्यकीय अधिकारी संपदा कुळकर्णी हया दवाखान्यात वेळेत उपस्थित रहात नसल्याबाबत तक्रार केलेली आहे. याबाबत म. आरोग्याधिकारी यांनी समक्ष चौकशी करुन पुढील उचित कार्यवाही करावी. व कार्यवाहीचा अहवाल स्थायी समितीकडेस सादर करावा.

५) सन्मा. सदस्य अमोळ मासुळे यांनी शहरातील पेठ भागातील आग्रारोड ग.ंन ४,५ या भागातील व्यापा-यांनी आपल्या राहत्या घरात व्यवसाय सुरु करुन दुकाने टाकलेली आहे. तथापि त्यांना घरगुती दराप्रमाणे घरपट्टी आकारणी करण्यांत येत आहे.अशा घरांचा सर्व्हे करुन त्यांना व्यावसायीक घरपट्टी आकारणी करणेबाबत सूचित केले आहे. याबाबत सहाय्यक आयुक्त (कर) यांनी याबाबत आढावा घेऊन तांतडीने कार्यवाही करावी.

६) सन्मा.सभापती श्री. चंद्रकांत काका केले यांनी दिनांक२७/११/२०१४ रोजी दै. लोकमत या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या वृक्ष तोडीबाबत विचार केली. तथापि याबाबत तक्रार आली नसल्याचे

प्रशासनामार्फत सांगण्यांत आले. तथापि वृत्तपत्रात आलेल्या वृत्तानुसार चौकशी करण्यांची आवश्यकता प्रशासनामार्फत करण्यांत आलेली नाही.त्यामुळे याबाबत तांतडीने चौकशी करुन नियमानुसार कार्यवाही करावी.

७) सन्मा.सदस्य फिरोज शेख यांनी मनपाच्या आर्थिक स्थिती विषयी सुचित करुन उत्पन्न वाढीच्या दृष्टीने विचार विनिमय होणे आवश्यक असल्याचे सूचित केले. याबाबत म. सभापती यांनी प्रशासनामार्फत राबविण्यांत येणा-या ११ कलमी कार्यक्रमाची अंमलबजावणी व कार्यवाही ठोस पध्दतीने करणे आवश्यक असून प्रथमतःसर्व सन्मा. नगरसेवकांनी आपली घरपट्टी भरणे आवश्यक आहे. तसेच ११ कलमी कार्यक्रमाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नगरसेवकांचे व कर्मचा-यांचे सहकार्य व प्रयत्न अपेक्षित आहे. पाणीपट्टी, एल.बी.टी. तसेच घरपट्टी वसुलीसाठी कर्मचारी व अधिका-यांची विशेष बैठक आयोजित करण्यांत येणार असल्याचे जाहीर केले.

**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिति,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**शनिवार दिनांक २९ नोव्हेंबर २०१४**
**वेळः-सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज शनिवार २९/११/२०१४ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा. श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. साखला गोविंद तुळशीराम | सदस्य |
| ७ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ८ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ९ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| १० | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ११ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १२ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १३ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १४ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १५ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री के.व्ही. धनाड | अति.आयुक्त |
| २. | श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ३. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त (कर) |
| ४. | श्री. म.रा.सराईत | मुख्य लेखा परीक्षक |
| ५. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ६. | श्री.पी.आर.दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ७. | श्री.एस.बी. विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ८. | श्री.मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ९. | श्री. के.ना कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| १०. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| ११. | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १२. | श्री. आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १३. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १६ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १८ | श्री.सी.सी. बागुल | ओव्हरसिअर |

| | | |
|---|---|---|
| १९ | श्री. पी.डी. नाईक | प्र. लेखापाल |
| २० | श्री.बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| २१ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २२ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |
| २३ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |

म. सभापती — सन्मा.सदस्य/सदस्या,अति.आयुक्त,उपायुक्त, अधिकारी, पत्रकार तथा छायाचित्रकार यांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेस आवश्यक ती गणपूर्ती झालेली असल्याने सभेच्या कामकाजास नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मारत्मसाठी या राष्ट्र वंदेनेसाठी सर्वानी उभे रहावे.

विषय क्रमांक ८२ — धुळे शहर पाणीपुरवठा योजना (UIDSSMT) अंतर्गत होणा-या कामासंदर्भात ई निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

म.नगरसचिव — म.नगरसचिव यांनी विषयाचे वाचन केले.

म.सभापती — कार्यकारी अभियंता यांनी विषयाच्या टिपणीचे वाचन करावे आणि विस्तृतपणे स्पष्टीकरण करावे.

म.कार्यकारी अभियंता — थोडक्यात आपल्याला योजनेची पार्श्वभूमी समजून घेतली पाहिजे. जुन्या योजनेला ही पुरक योजना जोडावयाची आहे नविन वार्ड, नविन कॉलन्या वाढल्या आहे आपण ज्या जुन्या पाईपलाईनी खराब झाल्या आहेत,सडल्या आहेत त्या ठिकाणी नविन पाईपलाईनी टाकणार आहोत. तसेच जुन्या टाक्या आहेत त्या ठिकाणी नविन टाक्या होणार आहेत आपल्याला जुनी पार्श्वभूमी द्यावी लागेल. १.१० कोटी रुपयाचे विज बील भरतो. धुळे शहराचा विस्तार पाहता जुन्यामध्ये वाढवून नवीन योजना तयार केली आहे. सदरची योजना केंन्द्र सरकारने मंजूर केली आहे कार्यालयीन टिपणीत उहापोह केला आहे. जर कुठली तरी पाईपलाईन फुटली तर तात्काळ पाणीपुरवठा बंद करावा लागतो ती पाईपलाईन जोडलीही जाते परंतु ते वारंवार होते या गोष्टी दरवर्षी होत असतात यासाठी आपण कामाचे डिव्हायडेशन केले आहे. या गोष्टी वारंवार होत असतांना आपल्याला एकत्रित पणे वारंवार दुरुस्त कराव्या लागतात. आपण पाण्यासाठी पंप बसविले आहे पाणी येत नाही म्हणून जास्त  एच.पी ची मोटार लावा अशी मागणी होते यामुळे पंपीग स्टेशनवर खर्च होतो. मागील योजनेत या गोष्टी झालेल्या नाहीत या सगळया गोष्टी नवीन योजनेत कराव्या लागणार आहे. मागील त्रुट्या आहेत त्या या योजनेत दूर होणार आहेत प्रेशरने जर पाणी दिले तर आणि त्याची उलट बाजू अशी आहे आणि पाण्यासाठी ते करावे लागते पाईप लाईन मधून पाणी आदळत जायला नको पाणी आदळत जात असेल तर पाईपलाईन फूटण्याचा धोका असतो पाणी हे स्मुथली चालले पाहिजे. म्हणजे त्यामुळे पाईपलाईन फूटत नाही. या सगळया गोष्टी या योजनेत मिनिमाईज कराव्या लागणार आहेत शहरातील नवीन प्रॉपर्टी धारकांना नवीन पाईपलाईन द्यावयाची आहे या साठी वेगवेगळे टाईपचे त्या त्या प्रेशरचे पाईपलाईन आहेत. साधारणता तीन-तीन किलोमीटर पर्यंत पाईपलाईन करावयाची आहे आपल्याकडे शहरात सहा पाण्याच्या टाक्या आहेत त्या ठिकाणी बंद पडलेले सर्व व्हॉल्व्ह आहेत सबस्टेशन आहेत एम.जी.पी कडून प्रस्ताव सादर केल्यानंतर शासनाकडून त्याचा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे. ही योजना राबवित असतांना काही गोष्टींना सामोरे जावे लागणार आहे. शहरातील काही ठिकाणी भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी आहे. कुठे चढ आहे तर कुठे उतार आहे यामुळे कमीअधिक प्रेशरने पाणी द्यावे लागणार आहे. या योजनेत सुरुवातीला जे टेंडर काढले होते सर्व प्रथम या कामासाठी पात्र ठेकेदारांची निवड करण्यासाठी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली  त्यात सहा कंत्राटदारांनी सहभाग घेतला त्यांची तांत्रिक छाननी करण्यात येऊन तीन कंत्राटदार पात्र झाले. परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे तसेच निविदेत स्पर्धा होण्याच्या हेतुने त्यास मुदत वाढ देण्यात आली होती.

परंतु या वाढीव मुदतीत एकही निविदा प्राप्त झाली नाही. दुसरी निविदा प्रसिध्द करण्यात आली त्यात मुदतीत मे.आर.बी कृष्णानी, पुणे यांची एकमेव निविदा प्राप्त झाली. एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे तिसरी निविदा दिनांक २०/०८/२०१४ ते २२/०८/२०१४ चे मुदतीत काढण्यात आली परंतू कोणतीही निविदा प्राप्त झाली नाही. त्यानंतर चौथ्यांदा निविदा प्रसिध्द करण्यात आली त्यात ६ लोकांनी भाग घेतला. त्यात मे.पी.ए आडके यांनी सादर केलेल्या कागदपत्रात त्रुटी आढळल्याने त्यांची निविदा अपात्र ठरविण्यात आली. उर्वरीत ३ठेकेदार क्वालिफाईड झाले. त्यात १) मे.ईगल इन्फ्रा इंडीया लि. पुणे -४७.२५% जादा दराने२) मे.आर.बी कृष्णानी,पुणे यांचे ३५%जादा दराने ३) मे.आर.ए. घुले, पालघर यांचे २६.९९% जादा दराने निविदा प्राप्त झाल्या आहेत. निविदा दर जास्तीने आल्यामुळे संबंधीतांकडून स्पष्टीकरण मागविण्यात आले कागदपत्रांचा पुरावा मागविण्यात आला त्यानुसार निविदेतील दराचा स.न १३-१४ च्या दर सुचीतील दराचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला आहे दरसुचीमुळे निविदेच्या दरात येणारी तफावत लक्षात घेता म.जी.प्रा.चे दरसुची नुसार वाहतुक भाडे तपासून घेण्यात आले आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचे डी.आय. पाईप क्र.७ चे सुधारित दर पत्रकानुसार दर देण्यात आले आहे. तसेच ९० मी.मी एच.डी.पी.ई. पाईपचे दर एक्साईज डयुटीसह ग्राह्य धरण्यात आले आहे.एम.जी.पी कडून तांत्रिक गोष्टींचा अभ्यास करुन घेतला आहे. तसेच पी.डब्लू.डी यांचे कडून रेट तपासून घेतले आहे. या योजनेत ३० हजार नळ धारकांना वॉटर मिटर बसवून घेणार आहोत मग या प्रकल्पाची किंमत १५१ कोटी झाली आहे. १३-१४ चे दर सुचीनुसार टेंडर किंमत १५४ कोटी रु. झाली आहे. सदर योजनेत लेबर वर्क केले जाते शासन निर्णया नुसार १% कामगार कल्याण उपकर विचारात घेतला आहे. आपली ५० कि.मि ची तापी योजना आहे त्यामध्ये तापी योजनेचे ॲटम या योजनेत रिझर्वेशन करुन घेतले आहे अशा प्रकारे १३२ कोटी रुपयाची ही योजना १५१ कोटी रु. झाली आहे. अशा प्रकारे पारदर्शी कारवाई पुर्ण केलेली आहे आणि ती सादर केली आहे.

म.सभापती — यावर सदस्यांचे काय म्हणणे आहे ते सादर करावे.

म.नरेंद्र परदेशी — मागील बॉडीमध्ये सर्व काही झाले आहे सगळे आपले सारवासारव करुन वातावरण तयार करावयाचा प्रकार आहे नागरी सुविधा देणे ही आपली जबाबदारी आहे सध्या शहरात डेंग्यूची साथ चालू आह तेथे कोणीही जात नाही कोणालाही भान नाही डेंग्यू वाढला आहे आणि त्यांनी काय कारवाई केली ते सांगावे ही योजना चांगली आहे पाणी मिळाले पाहिजे या योजनेच्या मागे अधिकारी, पदाधिकारी आहेत. कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले १३२ कोटीची योजना आहे मग टी.एस किती किंमतीचे आहे.

म.कार्यकारी अभियंता — १२४ कोटीचे टी.एस आहेत.

म.नरेंद्र परदेशी — १२४ कोटी रुपयांची योजना १३६ कोटी रुपयाची कशी झाली आहे याचे स्पष्टीकरण द्यावे.

म.कार्यकारी अभियंता — १३६.३८ कोटी रुपयास प्रशासकीय मान्यता दिली आहे. तर यामध्ये ॲटम ॲड केले आहेत त्यामुळे १३६ झाले आहेत.

म.नरेंद्र परदेशी — १२४ कोटी रुपयांचे टी.एस असतांना १३२ कोटी रुपयांचे टेंडर प्लॅश केले आहे ते कोणत्या कायद्याने केले आहे.

म.कार्यकारी अभियंता — १३६ कोटी रुपयाला केंद्र शासनाची मंजूरी आहे.

म.नरेंद्र परदेशी — मूळ निविदा ही १३२ कोटी रुपयाला आर्थिक प्रशासकीय मान्यता आहे. आपण किती टक्के दराने जास्तीने देऊ शकतो. पी.डब्ल्यू.डी ला २०/०९/९७ चा कायदा आहे. त्यामध्ये ५ टक्के पेक्षा जास्तीने देता येत नाही.निविदा ही किती टक्के जास्तीने आली आहे.

म.कार्यकारी अभियंता — ही निविदा सन २०१३-१४ चे डी.एस.आर प्रमाणे २६ टक्के जास्त दराची आलेली आहे.

म.नरेंद्र परदेशी — कायदा असा आहे आज निविदा उघडली आजचे रेट लागू होतील मुद्दा असा आहे ही योजना आहे, कामाला विरोध नाही. यामध्ये भ्रष्टाचार आहे या योजनेला केंद्र शासनाने

१३६ कोटी रुपये मंजूर केले आहे. त्यात २० कोटी रुपये जास्तीचे द्यावे लागणार आहे यामध्ये १ ते १४ मुद्दे आहेत. यासंदर्भात मागील आयुक्त यांनी १ ते १४ मुद्दयांबाबत पत्र देवून कळविले आहे. त्यात हा अतिशय बेकायदेशीर विषय आहे.त्यात ५ टक्के पेक्षा जास्तीच्या दराने निविदा देता येत नाही.आपण जर मंजूर करीत असाल तर मी हायकोर्टात दाद मागणार आहे २६ कोटी रुपये जास्त दिले जात आहे आपण माझे बोलणे लक्षात घेऊ नका हे सर्व हे सगळे आयुक्त यांनी म्हटले आहे. जास्तीच्या दराने देता येणार नाही. तिसरे असे की, शहरात पाईपलाईन वाढविले आहेत म्हणून रेट वाढविले आहेत हे आयुक्तांनी लिहिले आहे ह्या नोटवर आयुक्तांनी सहीच केलेली नाही. उलट ठेकेदारास जादा दराची मागणी मंजूर करता येत नाही,असे पत्राने लेखी कळविले आहे. म्हणून ते रजेवर गेले आहेत. तसेच वाहतूक खर्चाचे रनिंग रेट पाहिजे तसेच खोदकामाचे दर सुध्दा नामंजूर केले आहेत लेबर वर्कची तरतूद एस्टिमेटध्ये आहे.ते दर वाढवून आले आहे, हे सुध्दा आयुक्तांनी अमान्य केले आहे. तो ठेकेदार स.न २०१४-१५ चे दरसुची नुसार रेट द्यावे अशी मागणी करीत आहे.ते सुध्दा देऊ शकत नाही.आपण निविदेमध्ये म्हटले आहे वाढीव दर देता येत नाही तरीही वाढीव दर दिले आहेत निविदेच्या २७ टक्के वाढीव दर म्हणजे ३६ कोटी रुपये महानगरपालिकेला जास्तीचे द्यावे लागणार आहे.त्याला जर मंजूरी द्यावयाची असेल तर त्याचे आपण बजेट मध्ये तरतूद केली आहे का?आज आपल्याला या विषयाला मंजूरी द्यावयाची आहे.

| | |
|---|---|
| म.सभापती | आपल्याला ९.९९ टक्के ने जास्त दराने निविदा देऊ शकतो का? आणि कुठल्या आधारे याबाबत अभियंता यांनी खुलासा करावा. |
| म.कार्यकारी अभियंता | कामाला एक्स्टेंशन झाले तर क्लॉज आहे. |
| म.सभापती | तशी काही नियमात प्रोव्हिजन असेल तर दाखवावी. |
| म.नरेंद्र परदेशी | १३६ कोटी रुपयांवर १० टक्के जास्त द्यावे लागणार आहे. |
| म.सुभाष जगताप | ९.९९ टक्के जास्त दराने द्यावयाचे जर क्लॉज मध्ये असेल तर मंजूर करणेस हरकत नाही. |
| म.नरेंद्र परदेशी | आपण माहिती मिळविली पाहिजे रेट वाढले म्हणजे वाढवून द्यावेत असे होऊ शकते का हा जो विषय आणला आहे,२७ टक्के जास्तीने देत आहेत तर आपण ३० कोटी जास्त देत आहोत. त्यामध्ये शहरातील इतर कामेही होऊ शकतात. तेवढे म.न.पा कडे पैसे आहेत का? आपण जर ठराव पास केला तर शहराचे आमदार म्हणतील म.न.पा चे नुकसान केले आहे. आपल्याला जास्तीच्या दराने द्यावयाचे असेल तर कायदा आहे त्याप्रमाणे द्यावेत ३० कोटी आणणार कोठून ते सांगावे. |
| म.सुभाष जगताप | टी.एस.आर ज्या वर्षी टेंडर ओपन केले आहे त्यावर्षीचे टी.एस.आर प्रमाणे जो फरक असतो तो देता येतो. |
| म.सभापती | ४.९९ टक्के देऊ शकतो का याचा लेखापरीक्षक यांनी खुलासा करावा. |
| म.मुख्य लेखापरीक्षक | काम एक्सेस झाले तर देता येते. |
| म.सभापती | निविदेचे तुम्ही ९.९९ टक्के जास्तीने शिफारस केली आहे. |
| म.कुमार डियालानी | आपले अधिकारी दिशाभूल करीत आहे. ते ९.९९ टक्के बाबत बरोबर उत्तर देऊ शकत नाही. हे चुकीचे होत असल्याने आयुक्त श्री. पठाण साहेबांची त्यावर सही नाही. ते रजेवर गेले आहेत ३६ कोटी रुपये आपल्याला जास्तीचे द्यावे लागणार आहे. यासाठी माझा विषयाला विरोध आहे. |
| म.फिरोज शेख | कामाला १३६ कोटी रुपयाची प्रशासकीय मंजूरी आहे.दिनांक २०/१२/२०१२ मंजूर झाले आहे आणि त्यांनी ही निविदा ०३/०३/२०१४ रोजी प्रसिध्द केली आहे. म्हणजे जवळ जवळ दोन वर्ष उशीर झाला आहे. त्यावेळी स.न २०१२-१३चे डी.एस.आर रेट लावला आहे काय कारण आहे एवढा उशीर का लावला आहे.अधिका-यांना कायद्याची माहिती नाही का? १५२ कोटीची योजना झाली आहे म.न.पा ची परिस्थिती आहे का? दोन ते तीन महिन्या |

पासून कर्मचा-यांचे पगार नाहीत पाच टक्के पेक्षा जास्तीचे दराने निविदा देता येत नाही. तुम्ही जर ९.९९ टक्के जास्तीच्या दराने निविदा मंजूर केली तर आणि उद्या कोणी कोर्टात गेले तर याला जबाबदार कोण राहणार आहे. प्रस्तावावर आयुक्त यांची सही नाही आमचेही म्हणणे आहे की, शहराचा विकास व्हावा परंतु ५ टक्के पेक्षा जास्तीच्या दराने देता येत नाही आणि आपण १० टक्के जास्तीने देत आहोत रेट पहावे माझ्या भागातील एक विषय होता अल्पसंख्यांस योजनेअंतर्गत दिनांक १२/०८/२०१३ चे सभेत विषय आला होता २ कोटी रुपयाच्या पाण्याच्या टाकीचा विषय होता त्यांनी त्यात लिहिले होते ५ टक्के पेक्षा जास्तीने देता येत नाही. म्हणून तो विषय तहकूब केला मग तो विषय का मंजूर करण्यात आला नाही. तुम्ही त्याबाबत मला लेखी दिले आहे. सदर भागामध्ये आठ-आठ दहा-दहा दिवस पाणी येत नाही म्हणून तो विषय सभेमध्ये आला होता आणि तुम्ही या ठिकाणी १२४ कोटी रुपयास तांत्रिक मंजूरी आहे. आणि १३६ कोटी रुपये आर्थिक प्रशासकिय मंजूरी आहे आपण जर १० टक्के जास्तीने द्यावयाचे झाल्यास २० कोटी रुपये जास्तीने द्यावे लागणारआहे आपण त्याची बजेट मध्ये तरतूद केली आहे का? ही निविदा चुकीची काढलेली आहे तुम्हाला कोणत्या दरसुची नुसार निविदा द्यावयाची आहे निविदा काढल्यानंतर ठेकेदाराची जबाबदारी असते त्याने जर उशिरा काम केले तर जास्तीच्या दराने देण्याचा संबंध नाही ठेकेदाराने दोन-चार वर्ष काम केले नाही तर तो नवीन डी.एस.आर प्रमाणे रेटची मागणी करीन जर त्याने एक वर्षात काम केले नाही तर आपण परत वाढवून देणार का तर यासाठी असे करा की, जर ठेकेदाराने एक वर्षात काम केले नाही तर जास्तीच्या दराने देणार नाही असा आपण ठराव करु. कोणतेही काम असो मुदतीच्या आत काम करण्याची जबाबदारी ठेकेदाराची आहे नवीन डी.एस.आर प्रमाणे देता येणार नाही. ५ कि.मी प्रारंभिक वाहतूक धरण्यात आली आहे त्यात त्यावेळेचे डिझेलचे रेट लावले आहे आता ७ रुपये लिटर मागे कमी झाले आहे आपण ९.९९ टक्के जास्तीने देत आहात त्यात हे पैसे कमी होते आजचा डी.एस.आर रेट लावत आहेत तर त्यात २ कोटी रु. कमी होणार आहे. आपण जास्तीच्या दराची निविदा मंजूर केल्यास हा सर्व भुर्दंड म.न.पा वर पडणार आहे म्हणून आपल्याला ३० कोटी रु. जास्तीचे देता येणार नाही. सभापती महोदय, ही सर्व आपली जबाबदारी आहे. मी आपल्याला लेखी पत्र सादर करणार आहे २ वर्ष टेंडर उशिरा निघाले आहे यामध्ये तफावत आहे हा विषय तहकूब करावा ९.९९ टक्के प्रमाणे देता येत नाही. ५ टक्के जास्तीच्या दराने आपल्याला देता येईल आपण जर १० टक्के पेक्षा जास्तीच्या दराने देत असाल तर माझा या विषयाला विरोध आहे. हा विषय नामंजूर करण्यात यावा.

म.अमिन पटेल — १३६ कोटी रुपयाची योजना १५५ कोटी रुपयाची झाली आहे. आपण ९.९९ टक्के जास्तीच्या दराने देणे कायदेशिर असेल तर मंजूरी द्यावी. शहराचा सर्व्हे झाला आहे, वार्डाची संख्या वाढली आहे या योजनेत यांचा समावेश करण्यात यावा.

म.नरेंद्र परदेशी — हा विषय बेकायदेशिरपणे पुढे आला आहे या कामामध्ये खोदकाम राहणार आहे, रस्ते, पाईपलाईनीचे कामे अशी चार कामे वेगवेगळी केली तर आपण चार भागामध्ये निविदा काढून काम देऊ शकतो आज आपण ठेकेदारांना पाच-पाच वर्ष बिल देउ शकत नाही तरी ते आपले काम करीत असतात आपण जर चार भागामध्ये कामे केली तर त्या लोकांना रोजगार उपलब्ध होईल. तरी हा विषय नामंजूर करावा तसे मी लेखी पत्र देत आहे.

म.सुभाष जगताप — योजनेला १३६ कोटी रुपयाची प्रशासकीय मंजूरी आहे रेट त्याचे २०१२-१३ चे दर सुची नुसार आहे आणि आज २०१३-१४ हे वर्ष चालू आहे दोघांची तफावत धरुन ठेकेदार टेंडर भरतो ९.९९ टक्के जास्तीच्या दराने निविदा देता येईल का याचे प्रशासनाने उत्तर दिले नाही. ९.९९ टक्के दराने देता येत असेल तर प्रशासनाच्या जबाबदारीवर देण्यात यावे. असे माझे मत आहे.

| | |
|---|---|
| म.सभापती | विषय नाजूक आहे आपण कोणताही निर्णय घेतला विषय नामंजूर केला तर पुन्हा टेंडर काढावे लागेल सरकारने नविन कायदा केला आहे मार्च महिन्याच्या आत योजनेचा खर्च झाला पाहिजे. आपण जर यावर निर्णय घेतला नाही तर आपले ५५ कोटी रुपये योजनेला मिळाले आहे ते परत जातील. आज केले नाही तर उद्याही होणार नाही हे तांत्रिक दृष्ट्या कसे मंजूर केले पाहिजे. हा महत्त्वाचा मुद्दा आहे आपण डी.एस.आर रेट प्रमाणे ४.९९ टक्के दराने देऊ शकतो प्रशासनाने ९.९९ टक्के जास्तीच्या दराने देणे बाबत मुख्य लेखापरिक्षक यांचा अभिप्राय आहे. मग आपण टिपणीवर का लिहिले आहे. |
| म.सुभाष जगताप | या तांत्रिक गोष्टीला प्रशासन जबाबदार असेल. |
| म.कार्यकारी अभियंता | १३६ कोटी रुपयाला प्रशासकिय मंजूरी आहे. |
| म.सभापती | याबाबत प्रशासन जबाबदारी घ्यावयास तयार आहे का ही टिपणी खालून वर पर्यंत ज्यांनी सह्या केल्या आहेत ते सर्व जबाबदार राहणार आहेत. |
| म.कुमार डियालानी | अधिका-यांना कायद्याची माहिती नाही.ते सभागृहाची दिशा भूल करीत आहे. १२४ कोटी रुपयाचे टी.एस असतांना १३२ कोटी रुपयाची निविदा काढली आहे. माझा या विषयाला विरोध आहे. |
| म.फिरोज शेख | २०१३-१४ प्रमाणे डी.एस.आर देत आहे त्यात त्रुटी आहेत ४-५ मुद्दे दुरुस्त करुन घ्यावे. ही सभा आपण नंतरही घेऊ शकतो कायदेशिररित्या होऊ द्यावे.आम्ही विकासाबरोबर आहे. कायदेशीररित्या टिपणी करुन घ्यावी नाही तर आमचा विरोध आहे. |
| म.सभापती | या विषयाबाबत प्रशासनाच्या अहवालात व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेतील मुद्दयामध्ये तफावत निर्माण होत आहे त्यामुळे या विषयाबाबत प्रशासनाने स्वयंस्पष्ट अहवाल तांतडीने सादर करावा तोपावेतो सदर विषय तहकूब ठेवण्यांत येत आहे. |

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**मंगळवार दिनांक २ डिसेंबर २०१४**
**वेळ:-सकाळी १०-०० वाजतां**

धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष तहकूब सभा आज मंगळवार २/१२/२०१४ रोजी सकाळी १०-०० वाजतां मा.श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. साखला गाविंद तुळशीराम | सदस्य |
| ७ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ८ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ९ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| १० | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ११ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १२ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १३ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १४ | श्रीमती ठाकरे हिरा प्रभुदास | सदस्या |
| १५ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री के.व्ही. धनाड | अति.आयुक्त |
| २. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त (कर) |
| ३. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त (कर) |
| ४. | श्री.पी.आर.दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ५. | श्री.मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ६. | श्री. के.ना कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| ८. | डॉ. अविनाश पाटील | प्र.आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. आर.डी. माळी | सहा.आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ११. | श्री. के.जी. सुडके | एल.बी.टी.अधिक्षक |
| १२. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १३. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १४ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १६ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १८ | श्री.सी.सी. बागुल | ओव्हरसिअर |

| | | |
|---|---|---|
| १९ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| २० | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |

म. सभापती — सन्मा. सदस्य/सदस्या,अति.आयुक्त,उपायुक्त, अधिकारी, पत्रकार तथा छायाचित्रकार यांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेस आवश्यक ती गणपूर्ती झालेली असल्याने सभेच्या कामकाजास नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मारत्मसाठी या राष्ट्र वंदेनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा.सदस्याकडून आलेला रजेचा अर्ज**

सन्मा.सदस्य श्री. कुमार नरोत्तम डियालानी यांनी विनंती अर्ज देऊन अर्जात नमूद केलेल्या कारणानिमित्त सभेच उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९४ दिनांक २/१२/२०१४**

सन्मा.सदस्य श्री. कुमार नरोत्तम डियालानी यांनी विनंती अर्ज देऊन अर्जात नमूद केलेल्या कारणानिमित्त सभेच उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८२ — धुळे शहर पाणीपुरवठा योजना (UIDSSMT) अंतर्गत होणा-या कामांसंदर्भात ई निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९५ दिनांक २/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाण धुळे शहरासाठी UIDSSMT या योजने अंतर्गत केंद्र शासनाने पाणी पुरवठा योजनेसाठी दिनांक २०/१२/२०१२ रोजी ढोबळ किंमत रुपये १३६.३६ कोटीस मंजुरी दिली आहे.

या योजनेसाठी शासनाकडुन मे २०१४ मध्ये रुपये ५५.८५ कोटी एवढे अनुदान प्राप्त झाले आहे.

धुळे शहर पाणी पुरवठा योजनेचे काम सुरु करणेसाठी वेळोवेळी ई-निविदा रु.१३२.३८ कोटीची प्रसिध्दी करण्यात आली तथापी या कामी करिता धुळे महानगरपालिका प्रशासनाकडुन खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली.

१) सर्व प्रथम या कामासाठी पात्र ठेकेदारांची निवड करणसाठी ई-निविदा क्र. ०३/०३/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात आली विहित मुदतीत सहा कंत्राटदारांनी सहभाग घेतला त्यांची तांत्रिकछाननी दि.२१/०३/२०१४ रोजी करण्यात येवुन (३) तीन कंत्राटदार पात्र झाले.

२) या योजनेच्या स्थापत्य कामाची ई-निविदा (प्रथम) क्र. १४ काढण्यात आली व त्याची प्रक्रियेची मुदत दि. ३०/०६/२०१४ ते ३१/०७/२०१४ पर्यंत होती, परंतु काही तांत्रिक अडचणींमुळे तसेच निविदेत स्पर्धा होण्याचे हेतुने त्यास निविदा क्र. २४० नुसार दि.०७/०८/२०१४ पर्यंत मुदतवाढ देण्यांत आली परंतु या वाढीव मुदतीत एकही निविदा प्राप्त झाली नाही.

३) दुसरी निविदा क्र. ३० दि. १३/०८/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यांत आली. ही निविदा भरण्याची अंतीम दिनांक १९/०८/२०१४ होती. या कालावधीत मे. आर. बी. कुष्णनी, पुणे. यांची एकमेव निविदा प्राप्त झली. एकच निविदा प्राप्त झाल्यामुळे

तीसरी ई निविदा क्र. ३६, दि.२०/०८/२०१४ ते २२/०८/२०१४ पर्यंत होती. या मुदतीतही कोणतीही निविदा प्राप्त झाली नाही.

वारंवार निविदा प्रसिध्द करुनही त्याला पुरेसा प्रतिसाद न मिळाल्यामुळे निविदेतील काही अटी व शर्तीमध्ये बदल करुन फेर ई निविदा क्र. ४० दि. २७/०८/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यांत आली. या निविदेनुसार निविदा प्रक्रियेचा कालावधी दि.२७/०८/२०१४ ते दि.२६/०९/२०१४ पर्यंत होता.

प्रसिध्दझालेल्या निविदा कार्यक्रमानुसार दि.०१/१०/२०१४ रोजी महानगरपालिकेच्या संगणक कक्षात ऑनलाईन निविदा उघडण्याचे काम दुपारी ०१.३० वाजेच्या सुमारास मा.अति. आयुक्त साो, मनपा धुळे. उपायुक्त, मनपा धुळे, कार्यकारी अभियंता, मनपा धुळे तसेच योजनेसाठी नियुक्त केलेले प्रकल्प व्यवस्थापक सल्लागार, तसेच निविदाधारक व त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

वरील पैकी मे. पी. ए.आडके, यांनी सादर केलेल्या कागदपत्रात तृटी आढळल्याने त्यांची निविदा अपात्र ठरवुन त्यांचे कमर्शिअल बीड उघडण्यात आले नाही. उर्वरित ३ पात्र ठेकेदाराचे कमर्शिअल बीड उघडण्यात आले. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) मे. ईगल इन्फ्रा इंडीया लि. पुणे | - | ४७.२५% जादा दराने |
| २) मे. आर. बी. कृष्णानी, पुणे | - | ३५% जादा दराने |
| ३) मे. आर. ए. घुले, पालघर | - | २६.९९% जादा दराने |

वरील उघडण्यांत आलेल्या पात्र निविदाधारकांपैकी मे. आर.ए. घुले यांची सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली असल्यामुळे त्यांनी भरलेल्या निविदेतील कामाचे दराचे पृथ:करण सादर करणेबाबत पत्र क्र. २९, दि. २१/१०/२०१४ रोजी संबंधीतांना देण्यांत आले.

दि. १/११/२०१४ रोजी श्री. आर. ए. घुले यांनी त्यांचे निविदेचा देकार सादर केलेला आहे. त्यानुसार निविदेतील दराचा सन १३-१४ च्या दरसूचीतील दराचा तुलनात्मक अभ्यास करण्यात आलेला असुन सदर चे मुल्यांकन महापालीकेने या कामासाठी नियुक्त केलेले प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC)) यांनी तपासणी केली आहे.

निविदेच्या दराबाबत कंत्राटदाराने सादर केलेल्या दराच्या अनुषंगाने संबंधीतांना या कार्यालयाचे पत्र क्र. ४८ दि. १३/११/२०१४ नुसार वाटाघाटी करणेसाठी पत्र देण्यात आले.

दरसुचीमुळे निविदेच्या दरात येणारी तफावत लक्षात घेता तथा म.जी.प्रा. च्या दरसुची मध्ये वाळु, खडी इ. साठी प्रारंभीक वाहतुक ५ कि.मी. धरण्यात आली आहे. निविदेमधील उंच पाण्याची टाकीचे परिमाण हे घनतारुप धरले असल्यामुळे टाकीसाठी लागणारे वाळु, खडी, इत्यादीचे वाहतुक भाडे अमान्य करण्यात आले.

मुळ निविदेनुसार रस्ता पुर्न:बांधणी साठी रु.७३०/- चौ.मी. दराची तरतूद आहे. आता सन २०१३-१४ च्या सार्व.बांधकाम विभाग, धुळे यांचेकडून दर पृथ:करण करुन घेण्यात आले असून त्याचा दर रु. ८६०/- चौ. मीटर आहे. या मध्ये खडी व मुरुम साठी वाहतुक भाडे ग्राह्य धरण्यात आले आहे.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मुंबई यांचे डी.आय. पाईप क. ७ चे सुधारित दर पत्रकानुसार दर देण्यात आले आहेत. तसेच ९० मी.मी. एच.डी.पी.ई. पाईपचे दर एक्साईज ड्युटीसह चे ग्राह्य धरण्यात आले आहेत.

सदर योजनेच्या ज्या उपांगामध्ये मजूरामार्फत कामे केली जातात. त्याच कामासाठी शासन निर्णय क्रडीएसआर १०९०/सीआर६४५३/पीएलएन-३ दि. १४/७/१९९३ अन्वये १% लेबर ॲमेनिटीजसाठीची तरतूद ठेवली आहे.तसेच शासन निर्णय बीसीए - २००९ /प्र.क्र.१०८/कामगार-७अ, दि. १७/६/२०१० अन्वये १% कामगार कल्याण उपकर विचारात घेण्यात आला आहे.

सन २०१३-१४ च्या दरसूची नुसार निविदेची किंमत काढणेसाठी खालील प्रमाणे दरसूची संदर्भासाठी विचारात घेण्यात आली.

१) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - स्थापत्य विभाग
२) महाराष्ट्र जीवन प्राधिकरण - यांत्रिकी विभाग
३) सार्व. बांधकाम विभाग, धुळे - स्थापत्य विभाग
४) सार्व. बांधकाम विभाग - विद्युत विभाग

उपरोक्त दरसूची नुसार येणारी तफावत / किंमत खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | तपशिल | किंमत | टक्केवारी | जादा/कमी |
|---|---|---|---|---|
| १) | इ. निविदा किंमत | रु. १,३२,३८,०८,५०७.०० | -- | -- |
| २) | सन २०१३-१४ च्या चालू दरसूचीनुसार येणारी निव्वळ किंमत | रु. १,४९,५०,४१,६३५.३७ | १२.९३% | जादा |
| ३) | शासन निर्णयानुसार तरतुद<br>i) १% कामगार कल्याण उपकर<br>ii) १% लेबर ॲमिनीटीज<br>(साहित्य वगळून) | रु. १,५१,७३,५५,९४०.३७ | १४.६२% | जादा |
| ४) | कंत्रटदाराने भरलेली निविदा २६.९९% जादा त्याची किंमत | रु. १,६८,११,०४,४२३.०४ | १०.७९% | जादा |
| ५) | चालू दरसूची नुसार कंत्राटदाराची येणारी निविदा (स्थायी समितीचे अधिकारानुसार) | रु. १,६६,८९,३९,७९८.८१ | ९.९९% | जादा |

आपले असेही निदर्शनास आणुन देण्यांत येते की, म.जि.प्रा.व सार्व. बांधकाम विभागाचे सन २०१४-१५ साठीचे दर सुची कोणत्याही वेळी प्रसिध्द होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नविन दरसुची प्रसिध्द होण्यापुर्वी निविदा प्रक्रिया सक्षम मान्यतेने मंजुर करुन संबंधीत ठेकेदारास कार्यारंभ आदेश देणे आवश्यक आहे.अन्यथा सन २०१४-१५ चे दरसुचीनुसार निविदेची तुलना करावी लागेल व वाढीव रक्कमेचा अतिरीक्त आर्थिक भार महापालिकेस सोसावा लागेल.

सबब, श्री. आर. ए. घुले यांनी सादर केलेल्या देकार पुष्ठ्यर्थ दर पृथ:करणासाठी कागदोपत्री पुरावा जोडलेला आहे. त्यामुळे त्यांनी सादर केलेल्या मुळ निविदेच्या किंमतीच्या २६.०७% जादा देकार तथा चालु दरसुची नुसार येणाऱ्या निविदा किंमतीच्या ९.९९ % जादा (अक्षरी रुएकशे सहासष्ट कोटी एकोण नव्वद लक्ष एकोणचाळीस हजार सातशे अठ्ठावन्न मात्र) देकारास मा.स्थायी समितीच्या अवलोकनार्थ तथा निर्णयासाठी सादर करण्यांत आलेला आहे.यावर म. मुख्य लेखापरीक्षक यांनी उक्त बाबत मे. स्थायी समितीने उचित निर्णय घ्यावा तथा मनपाची आर्थिक परिस्थिती खराब असल्याने दरसूचीमुळे येणा-या वाढीव खर्चाचा विचार होणे आवश्यक आहे असा अभिप्राय दिलेला आहे.

उक्त प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे दि. २९/११/२२०१४ रोजी चर्चेसाठी व निर्णयासाठी आला असता प्रस्तावातील तांत्रिक बाबीबाबत सन्मा.सदस्यांचे समाधान न झाल्याने व प्रशासनाने याबाबत सविस्तर स्पष्टीकरण सादर न केल्याने सदर प्रस्तावावर प्रशासनामार्फत सविस्तर माहितीसह सादर करणेसाठी आदेशित करुन निर्णय तहकूब ठेवण्यांत आलेला होता.

या संदर्भात प्रशासनाकडून पुरक टिपणी दिनांक १/१२/२०१४ रोजी मे.स्थायी समिती समोर म.कार्यकारी अभियंता यांनी सादर केलेली आहे.सदर प्रस्तावास तांत्रिक मान्यता रुपये १२४.१२ कोटीची असून त्यात ८० एम.एम. सी.आय पाईप लाईन ऐवजी १०० एम.एस.डी. आय.के.७ पाईप इत्यादी सुधारीत तांत्रिक बदल करण्यांत आला असून या

तांत्रिक बदलाच्या सुधारीत मुल्यांकनास (Technical appraisal) नागरी विकास मंत्रालय भारत सरकार यांनी दिनांक २८/११/२०१३ अन्वये रु.१३६.३६ कोटी मात्रला मंजुरी दिली आहे.यामध्ये १३२.२८ कोटी रुपये ही निव्वळ कामाची किंमत असल्यामुळे याच किंमतीची निविदा प्रसिध्द करण्यांत आली.असा अभिप्राय सादर केलेला आहे.

तसेच या कामाची निविदा रक्कम ही सन २०१२-१३ च्या दरसूचीवर आधारीत होती सन २०१३-१४ च्या दरसूचीनुसार याच कामाची सुधारीत मुल्यांकित रक्कम १५१.७३ कोटी म्हणजेच (१४.६२%) जादा येते.कंत्राटदाराने सुधारीत मूल्यांकित किंमतीच्या ९.९९% जादा म्हणजेच रु.१६६.८९ कोटी इतक्या रकमेस काम करण्यांस लेखी अनुमती दिलेली आहे. ठेकेदाराचा मुळ देकार १६८.११ कोटी इतका आहे. मुल्यांकन व ठेकेदाराची संमत्ती यामध्ये १.२२ कोटी रुपयांची बचत होत आहे. महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता १९७१ चे नियम क्रमांक १६२ कलम १ व २ नुसार प्राथमिक मंजुरीपेक्षा १० टक्क्यांनी अथवा त्या पेक्षा अधिक बांधकामास अंतिम मंजुरी देण्याबाबत नमूद आहे. प्रसिध्द केलेल्या निविदेतील दराचे पुनर्मूल्यांकन तांत्रिकदृष्ट्र्या परिपूर्ण असून तांत्रिक सल्लागार प्रायमूह इंफ्रा लि. यांचे सहमतीने तथा तांत्रिक छाननीनुसारकाटेकोरपणे करण्यांत आलेले आहेत. चालू दरसूचीनुसार मुल्यांकन केलेली रक्कम रु.१५१.७३ कोटी इतकी असून संबंधित कंत्राटदाराने त्यांचे दर कमी करुन रु.१६६.८९ कोटी रक्कमेस काम करण्यांचे मान्य केले आहे.ही रक्कम मुल्यांकित रकमेच्या ९.९९% जादा आहे. असा लेखी अभिप्राय म. कार्यकारी अभियंता यांनी मे. स्थायी समितीसमोर सादर केलेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर निविदा यापूर्वी ३ वेळा प्रसिध्द करण्यांत येवूनही निविदेस योग्य तो प्रतिसाद मिळालेला नाही. त्यामुळे ४ थ्यांदा निविदा प्रसिध्द करण्यांत आलेली आहे.सदर प्रस्तावासाठी केंद्र व राज्य शासनाने निधीची उपलब्धता केलेली आहे. व त्याचा हप्ताही महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदर निधीचा वापर मुदतीत न झाल्यास निधी परत जाण्याची तथा व्यपगत होण्याची शक्यता आहे. यापूर्वीही मुदतीत निधीचा वापर न झाल्याने महानगरपालिका व नगरपालिकाचा निधी परत गेल्याची उदाहरणे आहेत.तसेच विद्यमान राज्य सरकारने मार्च महिन्यांत जास्तीत जास्त १५% निधी वापरण्यांचे धोरण निश्चित केलेले आहे.तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाची सन २०१४-१५ ची दरसूची प्रसिध्द झालेली असून येत्या ८ ते १० दिवसात महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाची दरसूची प्रसिध्द होणार आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव तांतडीने मंजूर न झाल्यास सुधारीत दरसूचीनुसार १५ ते १६ टक्के म्हणजे अंदाजे २१ ते २३ कोटी रुपयांनी या प्रस्तावाची किंमत वाढू शकते. व सदरचा आर्थिक बोजा महानगरपालिकेवर पडू शकतो. तसेच सदर योजना ही धुळे शहरासाठी अत्यंत गरजेची असून नागरीकांसाठी अत्यंत जिव्हाळयाची व महत्वपूर्ण आहे.महानगरपालिकेच्या आर्थिक हिताचा व धुळे शहराच्या संभाव्य पाणी प्रश्नाचा विचार करता व उक्त वस्तुस्थितीचा विचार करता सदर प्रस्तावास तांतडीने मान्यता देणे क्रमप्राप्त आहे.

तसेच सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार तांत्रिक सल्लागार (PMC) प्रायमुव्ह इन्फा लि.यांचे तांत्रिक छाननीनुसार चालू दरसूची सन २०१३-१४ च्या मुल्याकंनानुसार केलेंली रक्कम रुपये सुमारे १५१.७३ कोटी इतकी येत असल्याबाबत संबंधित एजन्सीने दिनांक१७/११/२०१४अन्वये लेखी पत्राव्दारे कळविलेले आहे.तसेच प्रशासनाच्या अहवालानुसार व संबंधित ठेकेदारांच्या आलेल्या पत्र व मागणीनुसार सदर काम हे शहरात असल्यामुळे मजूराचा अभाव व खोदकामास येणारा अडथळा इत्यादी सर्व बाबीचा विचार करता त्यांनी वाढीव दराची कारणे नमूद करुन मागणी केलेली आहे.यात तांत्रिक मुद्दयाबाबत स्थायी समितीचे सदस्य अनभिज्ञ आहेत.

तांत्रिक सल्लागार समितीने दिनांक १७/११/२०१४अन्वये सादर केलेल्या लेखी अहवालानुसार नमूद केल्याप्रमाणे चालू दरसूची २०१३-१४ नुसार १५१,७३,५५,९४० रुपये (मुळ देयकाच्या१४.६२टक्के दराने) शिफारस करुन प्रस्तावित केलेली आहे.त्यास प्रशासनाने दिनांक २६/११/२०१४ रोजी दिलेल्या टिपणीनुसार मान्यता दिलेली आहे. प्रशासन व तांत्रिक सल्लागार समितीने मान्यता दिलेल्या रकमेवर महानगरपालिका हद्दीत काम करतांना येणा-या अडचणीचा विचार करुन स्थायी समिती १.९८ टक्के जास्तीच्या दराने (म्हणजेच सन २०१२-१३ च्या मुळ देकारच्या १६.८९ टक्के दराने ) मान्यता देत आहे.

याबाबत म.कार्यकारी अभियंता यांनी आपल्या मुद्दयाबाबत लेखी अभिप्राय व खुलासा सादर केलेला आहे.आलेल्या अभिप्रायानुसार व सन्मा.सदस्यांच्या झालेल्या चर्चेनुसार कार्यालयीन अहवाल व सुधारीत अभिप्रायाच्या अधीन राहून व तांत्रिक सल्लागार (PMC) प्रायमुव्ह इन्फा लि.यांचे तांत्रिक छाननीनुसार उक्त वस्तुस्थितीचा सर्वकष विचार करुन श्री. आर.ए. घुले यांना सदर काम सन२०१३-१४ च्या दरसूचीनुसार १.९८% जास्त दराने (म्हणजेच सन २०१२-२०१३ च्या दरसूचीनुसार १६.८९% टक्के जास्त दराने) देण्याच्या प्रस्तावास श्री.नरेंद्र गोटू परदेशी व श्री. फिरोज बशीर शेख यांनी विरोध नोंदविलेला आहे त्यांची नोंद घेऊन सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

संबंधित ठेकेदार यांचेकडून नियमानुसार योग्य तो करारनामा ८ दिवसांच्या आंत करुन घेण्यांत यावा. संबंधित काम तांतडीने युध्द पातळीवर सुरु करण्यांत यावे.प्रस्तावातील कामे दर्जेदार व गुणवत्ता पूर्ण होतील यासाठी संबंधित अधिकारी व ठेकेदार यांनी काळजीपूर्वक दक्षता घेऊन अंमलबजावणी करावी. **बहुमताने मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक १८ डिसेंबर २०१४**
**वेळ:-सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज गुरुवार १८/१२/२०१४ रोजी सकाळी १०-०० वाजतां मा. श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा. सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ३ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ४ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ५ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ६ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ७ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ८ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ९ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १० | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| ११ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १२ | श्रीमती. दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त (कर) |
| २. | श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ४. | श्री.पी.आर.दरेवार | कार्यकारी अभियंता पा.पु. वि. |
| ५. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ६. | श्री.मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.एन. कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ८. | श्री.के. एन. शिंदे | अभियंता |
| ९. | श्री.एन.पी.सोनार | कार्यालयीन अधिक्षक तथा जकात अधिक्षक |
| १०. | श्री.एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| ११. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १२ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १३ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |

म. सभापती — सन्मा. सदस्य / सदस्या, उपायुक्त, अधिकारी, पत्रकार तथा छायाचित्रकार यांचे स्वागत करतो. सभेचे कामकाज चालविणेस आवश्यक ती गणपूर्ती झालेली असल्याने सभेच्या कामकाजास नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

म. नगरसचिव — वंदे मारत्मसाठी या राष्ट्र वंदेनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**हरकतीच्या मुद्दयावर घेण्यांत आलेला स्थायी समितीचा निर्णय**

म.नरेंद्र परदेशी — सभेच्या सुरुवातीस माझा हरकतीचा मुद्दा आहे. आपण मागील स्थायी समिती सभेत काही निर्णय घेतलेले आहेत त्यात आरोग्य विभागाचा विषय होता. यात स्वच्छता ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याचा ठराव करणेत आला होता. त्यात ठेकेदारांचे पेमेंट करावयाचे

नाही असेही ठरले होते स्थायी समितीने जे ठरवले त्याची अंमलबजावणी प्रशासनाने केली पाहिजे. म. न. पा. ची सध्याची परिस्थिती हालाखीची आहे.आणि स्थायी समितीचा ठराव डावलून व ठरावाचा अवमान करुन अतिरीक्त आयुक्त श्री.धनाड यांनी आस्था कंपनीचे बिले काढली आहेत.यामुळे आजच्या सभेतील विषय सुरु होण्यापूर्वी अतिरीक्त आयुक्त श्री. धनाड साहेबांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश करावे.आणि शासनाकडेस त्यांच्या चोकशीचा प्रस्ताव पाठवावा.

| | |
|---|---|
| म.सभापती | स्थायी समितीने आरोग्य विभागाच्या शहरातील कचरा उचलण्याचा ठेका देण्या बाबतचा विषय आला असतांना ठेकेदारांना ब्लॅकलिस्ट मध्ये टाकण्याचा ठराव केला होता. मागे स्थायी समितीने समितीचे चेअरमन व आयुक्त यांनी ठरविल्या नंतर अग्रक्रमाने ठेकेदारांचे पेमेंट करणे बाबत निर्णय घेण्यात आला होता. परंतू दुर्दैवाने सभापती यांना विचारात घेऊन पेमेंट काढले नाही. मला या पासून लांब ठेवण्यात आले आहे. |
| म.नरेंद्र परदेशी | श्री.धनाड साहेबांविरुध्द असा ठराव करण्यात यावा की, त्यांच्या कडून पेमेंट झालेले पैसे वसूल करण्यात यावेत कारण की, त्यांनी स्थायी समितीचा ठराव झालेला असतांना ठरावाला किंमत न देता आरोग्याच्या कच-याच्या ठेकेदारांचे पेमेंट करावायचे नसतांना पेमेंट केले आहे. त्यामुळे ठरावाचा हक्कभंग झाला आहे.त्यांच्यावर कारवाई झाली पाहिजे. |
| म.सभापती | आपण आयुक्त यांच्यावर कारवाई न करता त्यांच्या बाबत खाते निहाय चौकशी करु. त्यांच्याकडेस आयुक्त पदाचा चार्ज आहे. |
| म.नरेंद्र परदेशी | श्री.धनाड साहेब हे इनचार्ज अधिकारी आहेत त्यांनी स्थायी समितीचा ठराव डावलला आहे. |
| म.सभापती | जरी ते इनचार्ज अधिकारी असले तरी ते आयुक्त म्हणून आहेत. ते आयुक्त म्हणून सहया करतात. त्यांच्या कडे आयुक्त म्हणून पदभार आहे त्यांची भूमिका ॲक्टीव आयुक्त म्हणून आहे. |
| म.नरेंद्र परदेशी | श्री.धनाड साहेबांविरुध्द खाते निहाय चौकशी आपल्या कडे होणार नाही. |
| म.सभापती | आपण शासनामार्फत खाते निहाय चौकशी करुन त्यांच्या अहवालानुसार त्यांच्या विरुध्द कारवाई करु. |
| म.फारुख शेख | आरोग्याच्या ठेकेदारांविरुध्द ब्लॅकलिस्टमध्ये टाकण्याचा ठराव झालेला आहे आणि अकांऊंट विभागाच्या रजिस्टर मध्ये सदरहू ठेकेदारांचे पेमेंट अदा करण्यात येऊ नये असे लिहिलेले असतांना सदर ठेकेदारांचे पेमेंट काढण्यात आले आहे.त्यांनी त्यांच्या अधिकारात पेमेंट काढले आहे. तरी त्यांच्या विरुध्द कारवाई झाली पाहिजे. |
| म.सभापती | श्री.धनाड साहेबांची शासनाकडून खाते निहाय चौकशी करुन पुढील कारवाई स्थायी समिती करील. |
| म.फिरोज शेख | आयुक्त श्री.पठाण साहेब हे रजेवर असतांना ५ दिवस श्री.धनाड साहेबांकडे आयुक्त पदाचा चार्ज होता. पुढील चार्ज त्यांना देण्यात आले आहे का? किंवा त्यासंदर्भात शासनाचा काही आदेश आहे का? श्री.धनाड हे एकतर्फी आयुक्तांचा पदभार सांभाळीत आहे त्यांना याबाबत कोणतेही आदेश नाही. |
| म.उपायुक्त | श्री.पठाण साहेब यांच्या रजेच्या पिरेडमध्ये आयुक्त पदाचा चार्ज दिला होता.पठाण साहेब हजर न झाल्यामुळे पुढे ते पदभार सांभाळत आहे. तसे शासनाचे आदेश नाही . |
| म.सभापती | आपण शासनाकडून खाते निहाय चौकशी करणारच आहोत त्याच बरोबर त्यांना रेग्यूलर आयुक्त पदाची मान्यता आहेका याबाबत ही चौकशी करण्यात येईल. श्री.धनाड यांनी स्थायी समितीच्या ठरावाविरुध्द कार्यवाही केल्याने त्यांच्या विरुध्द वरीष्ठ स्तरावरुन चौकशी करण्या बाबत निर्णय घेण्यात येत आहे. तसेच याबाबत शासनास तातडीने अहवाल पाठवून चौकशी बाबत कार्यवाही करणेस मान्यता देण्यात येत आहे. |

**सही/- x x x**

**सभापती**

**स्थायी समिती**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८३ धुळे महानगरपालिका स्थायी समिती सदस्यांची दिनांक १/१/२०१५ रोजी एक वर्षाची मुदत पूर्ण होत असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २० (४) अन्वये निम्मे ( आठ) सदस्य चिठ्ठी टाकून निवृत्त करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९६ दिनांक १८/१२/२०१४**

धुळे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणूकीनंतर पहिली सभा दिनांक २८/१/२०१४ रोजी झालेली होती.सदर सभेतील धुळे मनपा ठराव नंबर२ दिनांक२८/०१/२०१४अन्वये स्थायी समितीवर१६ सदस्यांची कलम २०(२) नुसार नेमणूक करण्यांत आलेली होती.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०(३) मध्ये खालील प्रमाणे तरतूद आहे.

"स्थायी समितीच्या सदस्यापैकी निम्मे सदस्य पुढील प्रत्येक वर्षी पोट कलम (२) मध्ये उल्लेख केलेली महानगरपालिकेची पहिली सभा ज्या महिन्यात भरेल त्या महिन्याच्या पहिल्या तारखेस दुपारी निवृत्त होतील."

"तसेच पोटकलम २०(४) प्रमाणे पोट कलम (२) अन्वये निवडून आल्यानंतर एक वर्षाने पोट कलम (२) अन्वये कोणते सदस्य निवृत्त होतील ते पोटकलम (३) मध्ये विनिदिष्ट केलेल्या त्यांच्या निवृत्तीच्या तारखेपूर्वी स्थायी समितीच्या सभापती ठरवील अशा वेळी व अशा रितीने चिठ्ठया टाकून ठरविण्यांत येईल आणि त्यानंतर पुढील वर्षी स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या पदावर जास्तीत जास्त काळपर्यत असतील ते निवृत्त होतील " याप्रमाणे तरतूद आहे.

उक्त तरतूदीनुसार सर्व सन्मा.सदस्यांच्या उपस्थितीत आवश्यक त्या प्रक्रियेव्दारे आठ सदस्यांच्या नांवाची चिठ्ठी निघाल्यामुळे खालील प्रमाणे सदस्य स्थायी समिती मधून दिनांक १/१/२०१५ रोजी निवृत्त होत आहेत.

१) श्री.शेख फिरोज बशीर
२) श्रीमती दुसाणे वैभवी अमित
३) श्री. पाटील सदाशिव उत्तमराव
४) श्री.जगताप सुभाष सुकलाल
५) श्रीमती वाघ इंदुबाई प्रकाश
६) श्रीमती बोरसे कल्पना सुरेश
७) श्रीमती ठाकरे हिरा प्रभुदास
८) श्री. शार्दुल दिनेश लहू

उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रगितानंतर सभा समाप्त करण्यांत आली.

सही/- x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**बुधवार दिनांक २४ डिसेंबर २०१४**
**वेळ:-दुपारी ४-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज बुधवार २४/१२/२०१४ रोजी दुपारी ४-०० वाजतां मा.श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्याअध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ७ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ८ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| ९ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| १० | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ११ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १२ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १३ | श्री..डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १४ | श्रीमती.दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त (कर) |
| २. | श्री.प्रदीप पठारे | उपायुक्त ( स.प्र.) |
| ३. | श्री.त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त ( कर) |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. एस.बी. विसपुते | नगररचनाकार |
| ६. | श्री.मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.ना कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ८. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| ९. | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. के.एन. शिंदे | शहर अभियंता |
| १२. | श्री. के.जी. सुडके | एल.बी.टी. अधिक्षक |
| १३. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १४ | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १५ | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १६ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १७ | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शि.मं.धुळे |
| १८ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १९ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |

| | | |
|---|---|---|
| २० | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |

म.सभापती — सन्मा.सदस्य/ सदस्या, उपायुक्त, अधिकारी, पत्रकार तथा छायाचित्रकार यांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेस आवश्यक ती गणपूर्ती झालेली असल्याने सभेच्या कामकाजास नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

म.नगरसचिव — वंदे मारत्मसाठी या राष्ट्र वंदेनेसाठी सर्वानी उभे रहावे.

मा.सभापती — महाराष्ट्रातील मातृहृदयी व्यक्तीमत्व व खान्देशातील थोर साहित्यीक स्व.साने गुरुजी यांची आज जयंती असल्याने त्यांच्या पवित्र स्मृतीस आजच्या स्थायी समिती सभेत अभिवादन करण्यांचा ठराव पारीत करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९७ दिनांक २४/१२/२०१४**

महाराष्ट्रातील मातृहृदयी व्यक्तीमत्व व खान्देशातील थोर साहित्यीक स्व.साने गुरुजी यांची जयंती निमित्त त्यांच्या पवित्र स्मृतीसअभिवादन करण्यांचा ठराव एकमताने मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८४ — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
(दि.७/११/२०१४, २८/११/२०१४, २९/११/१४ (तहकूब) २/१२/२०१४, १८/१२/२०१४)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९८ दिनांक २४/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभेतील -

१) दिनांक ७/११/२०१४ रोजीच्या सभेतील ठराव नंबर ७८ ते ८५ अखेर व सभेतील चर्चेनुसार झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.
२) दिनांक२८/११/२०१४ रोजीच्या सभेतील ठराव नंबर ८६ ते ९३ अखेर व सभेतील चर्चेनुसार झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.
३) दिनांक २९/११/२०१४ चे प्रोसीडींग वाचून कायम करण्यांत येत आहे.
४) दिनांक २/१२/२०१४ रोजीच्या सभेतील इतिवृत्तांत कायम करीत असतांना विषय क्रमांक ८२ चे संदर्भात सन्मा.सदस्य श्री.फिरोज बशीर शेख व श्री. कुमार नरोत्तम डियालानी यांनी विरोध नोंदविलेला असून सदर विरोधाची नोंद घेऊन इतिवृत्त क्रमशःवाचून कायम करण्यांत येत आहे.
**५)** दिनांक १८/१२/२०१४ रोजीच्या सभेतील ठराव क्रमांक ९६ व चर्चेनुसार झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८५ — प्रभाग क्रं.३० मधील क्रांती चौक ते लेनिन चौक पावेतो रस्ता डांबरीकरणाचे काम व दुतर्फा गटारी करण्यांचे काम नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत घेणेबाबत श्री.संजय जाधव विरोधी पक्ष नेते यांनी यादी सादर केली आहे.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९९ दिनांक २४/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे प्रभाग क्रं.३० मधील क्रांती चौक ही लेनिन चौक पावेतो रस्ता डांबरीकरणाचे काम करणेसाठी तसेच रस्त्याच्या दुतर्फा गटारी करणेसाठी नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत घेणेबाबत श्री. संजय जाधव विरोधी पक्ष नेते यांनी यादी सादर

केली आहे.सदर डांबरीकरण व गटार कामासाठी साधारणतः रु.५५ लक्ष खर्च मात्र अपेक्षित आहे.

तरी उक्त काम नागरी दलित वस्ती सुधार योजनेतून करणेसाठी स्थायी समितीच्या ठरावाची आवश्यकता असल्याने सदर प्रस्तावास कार्यालयीन अहवालास अधिन राहून सदर कामाचा दलित वस्ती योजने अंतर्गत समावेश करुन म.जिल्हाधिकारी साो. यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.सदस्यांच्या मागणीनूसार उमंग डेअरी फाशी पुल ते क्रांती चौक पावेतोचा रस्ता अत्यंत खराब असल्याने याही रस्त्याचा समावेश दलित वस्ती योजने अंतर्गत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

प्रभाग क्रं.२५ मधील रस्ते, गटारी व विद्युत पथदिवे बसविण्यांचे अंदाजपत्रक तयार करुन सदर प्रस्ताव अल्पसंख्याक निधी अंतर्गत समावेश करणेस व शासनाकडेस मान्यतेसाठी पाठविणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ८६ आय.एच.एस.डी.पी. घरकुल योजनेअंतर्गत टप्पा क्रं.२ साठी नियुक्त पी.एम.सी.ला कार्यादेश देणेबाबत आलेल्या फेर कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०० दिनांक २४/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे आय.एच.एस.डी.पी. घरकुल योजनेअंतर्गत टप्पा क्रं. २ साठी पी.एम.सी. नेमणेसाठी सदरचा विषय मे. स्थायी समितीपुढे दिनांक ८/९/२०१४ रोजी ठेवण्यात आला असता मे. स्थायी समिती ठराव नं. ७५ दिनांक ८/९/२०१४ अन्वये यापूर्वी मान्यता दिलेले २ टक्के दर हे जास्तीचे वाटत असल्याने मनपाच्या आर्थिक हितासाठी सदर दर कमी करणे आवश्यक आहे.व उक्त विषयाबाबत अधिक माहिती घेवून त्याबाबत निर्णय घेणे आवश्यक असल्याने तूर्त सदर विषय हा तहकूब ठेवण्यास मान्यता देण्यांत येत आहे. असा निर्णय झालेला होता.

उक्त कामी श्री.चेतन सोनार आर्किटेक्ट अमळनेर यांनी यापूर्वीचा मंजूर दराप्रमाणे काम प्रत्यक्ष सुरु केले असल्याने व शासन स्तरावर कार्यालयीन अहवाल, उपयोगिता प्रमाणपत्र, मासिक अहवाल व इर अनुषंगिक कामाबाबत राज्य व केंद्र शासनाकडे कामकाज केलेले आहे व करीत आहे. कार्यालयीन अहवालास अधिन राहून श्री. चेतन सोनार याना पूर्वी प्रमाणे शेकडा २ टक्क् दराने आय.एच.एस.डी.पी. घरकुल योजनेअंतर्गत टप्पा क्रं. २ साठी पी.एम.सी.नियुक्त करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ८७ हजार खोली मनपा दवाखाना जवळच्या संस्थेच्या बांधकाम केलेल्या जागेत स्थलांतर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०१ दिनांक २४/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा हजार खोली दवाखान्याची इमारतीची जागा फारच कमी असल्याने येणा-या रग्णांना सेवा देतांना जागेअभावी अडचण निर्माण होते.व सदर इमारत जीर्ण झाली असून भिंतीं नाही तडे गेलेले आहेत.सद्यस्थितीत पावसाळयाचे दिवस असल्याने पावसाच्या पाण्याचे गळती लागते. त्यामुळे येणा-या रुग्णांना बसण्यासाठी पुरेशी जागा नाही. तरी हजार खोली मनपा दवाखाना हे शेजारच्या संस्थेच्या बांधकाम केलेल्या

जागेत स्थलांतर केल्यास रुग्णांना चांगली आरोग्य सेवा देता येईल. तसेच मा.कामगार सह.गृह. संस्थ लि. कामगार नगर धुळे यांचे पत्र व ठरावाची प्रत जोडलेली आहे.

मा.आयुक्त साो. यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार व आदेशानुसार सदर संस्थेशी १०० रुपयांच्या स्टॅम्पवर करारनामा करण्यांत आलेला आहे.

कार्यालयीन अहवालाच्या अधिन राहून मनपा हजार खोली दवाखाना जवळील संस्थेच्या बांधकाम झालेल्या जागेत स्थलांतर करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ८८ यशवंतनगर मनपा दवाखाना सिंधी पंचायत भवन येथे स्थलांतरीत करणे बाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०२ दिनांक २४/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे यशवंतनगर दवाखाना सिंधी भवनात स्थलांतर करणे बाबत दिनांक २६/९/२०१४ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यांत आली होती. यशवंतनगर मनपा दवाखाना हे खाजगी जागेतअसून त्यांचे दरमहा भाडे रु.४७०/- एवढे मनपाकडून देण्यांत येते. मनपा यशवंतनगर दवाखाना सिंधी पंचायत भवनमध्ये स्थलांतर करणे बाबत म. नगररचना विभाग यांचे अभिप्राय मागविले असता त्यांनीही सादर केलेल्या अभिप्रायामध्ये नमूद नुसार मनपा यशवंतनगर दवाखाना सिंधी पंचायत भवनामध्ये स्थलांतरीत करण्यास हरकत नसल्याचे नमूद केले आहे.

मा.आयुक्त साो. यांच्याशी झालेल्या चर्चेनुसार व आदेशानुसार सदर संस्थेशी १०० रुपयांच्या स्टॅम्पवर करारनामा करण्यांत आलेला आहे.

कार्यालयीन अहवालाच्या अधिन राहून यशवंतनगर मनपा दवाखाना सिंधी पंचायत भवन येथे स्थलांतरीत करणेस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ८९ ग्रामपंचायत तिखी ता.जि. धुळे यांनी तिखी (गोपालनगर) ता.जि. धुळे येथे राष्ट्रीय पेयजल योजना अंतर्गत मंजूर पाणीपुरवठा योजनेकरिता मनपा हद्दीतील डेडरगांव तलावाच्या शेजारी विहिरीचे खोदकामास परवानगी मागितलेली आहे.त्याबाबतआलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०३ दिनांक २४/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे डेडरगांव तलावा शेजारी तिखी (गोपाळनगर) या भागात राष्ट्रीय पेयजल योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजना ग्रामपंचायत तिखी येथे मंजूर झालेली असून त्यांना धुळे मनपा मालकीच्या डेडरगांव तलावाशेजारी मनपा हद्दीत विहिरीचे खोदकाम करावयाचे आहे असे त्यांनी त्यांचे पत्राव्दारे कळविले आहे.

तसेच त्यांनी तिखी ग्रामपंचायत यांनी म.जिल्हाधिकारी साो. यांच्याकडेस प्रस्ताव पाठविलेला असून सदरची जमीन भूसंपादनासाठीचा प्रस्ताव हा तिखी ग्रामपंचायत मार्फत दाखल करणार आहे व धुळे मनपाच्या अटी शर्तीनुसार ते येणा-या शासकीय मुल्यांकनानुसार योग्य ती रक्कम भरण्यास तयार आहे असे त्यांनी कळविलेले आहे.

उक्त प्रस्ताव चर्चेसाठी आला असता सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव हा धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने मे.स्थायी समितीच्या शिफारसीसह सदर प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

## दिनांक २४/१२/२०१४ रोजीच्या स्थायी समिती मधील निर्णय

१) सन्मा. सदस्य श्री.अमीन पटेल यांनी त्याच्या भागात कच-या वाहतूकीसाठी टॅक्टर व वहाने अपूर्ण असल्याने सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाल्याची तक्रार केलेली आहे. तसेच सन्मा. सदस्य श्री. अमोल मासुळे यांनीही भागात सार्वजनिक स्वच्छतेसाठी अपूर्ण वाहनामुळे कच-याबाबत मुद्दा उपस्थित केलेला आहे.सन्मा. सदस्या सौ. वैभवी दुसाने यांनीही स्वच्छतेच्या कामाबाबत नाराजी व्यक्त करुन याबाबत तांतडीने कार्यवाही करण्यांबाबत मागणी केलेली आहे. तसेच सन्मा. सदस्या सौ. कल्पना बोरसे व सुभाष जगताप यांनीही यासंदर्भाची तक्रार दाखल केलेली आहे.
यावर मा. सभापती यांनी शहरात सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न अतिशय गंभीर झालेला असून स्थायी समितीने यापूर्वी शहराच्या ४ भागासाठी तांतडीने ४ ठेकेदार नियुक्त करणेबाबत फेर निविदा प्रसिध्द करण्यांचा निर्णय झालेला असून देखील अद्याप पावेतो यावर कार्यवाही झालेली नाही. सदर बाब अतिशय खेदजनक असून लेखा विभाग तसेच आरोग्य विभाग व संगणक विभाग यांनी याकामी तांतडीने पूर्तता करुन तीन दिवसांच्या आंत सदर टेंडर प्रसिध्द करण्याबाबत कार्यवाही करावी. म. उपायुक्त यांनी याकामी लक्ष देऊन पूर्तता करावी. तसेच तो पोवेतो मनपा मार्फत स्वच्छतेचे काम होणार असल्याने याकामी आवश्यक ते वाहने तसेच कर्मचारी व अन्य साधन सामुग्री उपलब्ध करुन तांतडीने स्वच्छतेच्या कामाबाबत गंभीरतेने कार्यवाही करावी. असे आदेशित केलेले आहे.

२) सन्मा. सदस्या सौ. वैभवी दुसाणे यांनी त्यांच्या भागातल्या शौचालय दुरुस्तीबाबत अद्याप कार्यवाही झाली नसल्याची तक्रार केल्यानुसार बांधकाम विभागामार्फत तांतडीने याबाबत कार्यवाही करुन स्थायी समितीकडेस अहवाल सादर करण्याबाबत मा. सभापती यांनी आदेशित केलेले आहे.

३) सन्मा. सदस्य श्री. अमोल मासुळे यांनी प्रबोधनकार ठाकरे संकुलात अनाधिकृत रित्या बेकायदेशीरपणे ७ ते ८ गाळांचे बांधकाम करण्यांत आल्याबाबत तक्रार केलेली आहे. यावर म. सहाय्यक आयुक्त कर यांनी तांतडीने याबाबत पहाणी करुन कायदेशीर कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल मे. स्थायी समितीपुढे सादर करण्यांचे आदेश मा. सभापती यांनी दिले आहेत.

४) सन्मा. सदस्य श्री. फिरोज शेख यांनी मागील स्थायी समिती सभेत झालेल्या ठरावाप्रमाणे आस्था स्वयंरोजगार संस्था यांना काळया यादीत टाकण्याबाबत प्रशासनामार्फत कार्यवाही झालेली नसल्याबाबत तसेच सदर संस्थेला आयुक्त यांनी त्यांचे अधिकारात देयके अदा केली असून संबंधित संस्थेबाबत मे. न्यायालयांचे आदेश असल्याचे सांगण्यांत आलेले आहे. याबाबत प्रशासनाने खुलासा करावा व त्यावर कार्यवाही करण्यांची मागणी केली. याबाबत म.आरोग्याधिकारी यांनी कायदेशीर बाबीबाबत आपला सविस्तर अहवाल पुढील स्थायी समितीपुढे सादर करण्याबाबत मा. सभापती यांनी आदेशित केले आहे.

५) सन्मा. सदस्य श्री. नरेंद्र परदेशी यांनी मागील स्थायी समितीच्या सभेत मनपा ओव्हरिअर यांनी शाखा अभियंता या पदाचा दर्जा देणेबाबत व अन्य कर्मचा-यांना पदोन्नती देणेबाबत कार्यवाही करुन तदनंतर कार्योतर मंजुरी शासनाकडे घेणेबाबत ठराव पारीत झालेला असून यावर प्रशासनाने कोणती ही कार्यवाही अद्याप पावेतो केलेली नाही. स्थायी समितीच्या निर्णयाचा हा अवमान असून प्रशासनाने याबाबत तांतडीने कार्यवाही करावी अशी मागणी केलेली आहे.यावर मा. सभापती यांनी प्रशासनाने स्थायी समितीच्या निर्णयाबाबत कार्यवाही न केल्याबद्दल खेद व्यक्त करुन यावर तांतडीने कार्यवाही करण्यांचे आदेशित केलेले आहे.

६) सन्मा.सदस्य श्री. दिनेश लहू शार्दुल व सुभाष सुकलाल जगताप यांनी उपस्थित केलेल्या मुद्दयानुसार सद्यस्थितीत मनपा आर्थिक उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असलेल्या एल.बी.टी. व वसुली या दोन्ही बाबीकडे प्रभावीपणे कार्यवाही होणे आवश्यक असल्याने सक्षम अधिकारी नियुक्त करणे गरजेचे आहे. यापूर्वी

उपायुक्त श्री. पठारे यांनी जकात विभागात प्रभावीपणे काम केलेले असल्याने मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने एल.बी.टी. व वसुली विभागाचा पदभार उपायुक्त श्री. प्रदीप पठारे यांचेकडेस देणेबाबत तसेच त्यांचेकडील पदभार उपायुक्त श्री. एच.पी. कवठळकर यांचेकडेस देणेबाबत तसेच सहाय्यक आयुक्त श्रीमती हेमलता डगळे यांचेकडेस वसुली विभागाचा व सहाय्यक आयुक्त श्री. त्र्यंबक कांबळे यांचेकडेस सामान्य प्रशासन विभागाचा पदभार देणेबाबत व त्याबाबतचा अहवाल मे.स्थायी समितीपुढे सादर करणेबाबत मा. सभापती यांनी प्रशासनास आदेशित केलेले आहे.

**७)** मा. सभापती यांनी सदर बैठकीत शहरातील व्यापा-यांना आवाहन केले की, एप्रिल २०१५ पासून एल.बी.टी. कर बंद करण्यांचे शासनाने संकेत दिलेले आहे. एल.बी.टी. कर बंद झाल्यावर धुळे महानगरपालिकेस सदर करापोटी शासनामार्फत भरपाई अनुदान उपलब्ध करुन दिले जाईल. त्यामुळे आगामी काळात एल.बी.टी. बाबत जास्तीत जास्त उत्पन्न मिळाल्यास त्याप्रमाणात धुळे महानगरपालिकेस अनुदान मिळणार आहे. शहरातील नागरीकांना जास्तीत जास्त सोयी व सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी मनपाचे आर्थिक स्त्रोतही सक्षम होणे आवश्यक आहे. त्यामुळे व्यापा-यांनी एल.बी.टी. कराचा भरणा नियमानुसार व वेळेवर भरुन धुळे महानगरपालिकेस सहकार्य करावे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**बुधवार दिनांक ३१ डिसेंबर २०१४**
**वेळ:-सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज बुधवार ३१/१२/२०१४ रोजी सकाळी११-०० वाजतां मा. श्री. केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा,धुळे यांच्याअध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सभापती |
| २ | श्री.शार्दुल दिनेश लहु | सदस्य |
| ३ | श्रीमती.वाघ इंदुबाई प्रकाश | सदस्या |
| ४ | श्रीमती. बोरसे कल्पना सुरेश | सदस्या |
| ५ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ६ | श्री. साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ७ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ८ | श्री. जगताप सुभाष सुकलाल | सदस्य |
| ९ | श्री. शेख फिरोज बशीर | सदस्य |
| १० | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ११ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| १२ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| १३ | श्री.पाटील सदाशिव उत्तमराव | सदस्य |
| १४ | श्री.डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| १५ | श्रीमती.दुसाणे वैभवी अमित | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त (कर) |
| २. | श्री. के.ना कुटे | प्र. मुख्य लेखापरीक्षक तथा मुख्य लेखाधिकारी |
| ३. | श्री.त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त ( कर) |
| ४. | श्री.पी.आर. दरेवार | कार्यकारी अभियंता |
| ५. | श्री. एस.बी. विसपुते | नगररचनाकार |
| ६. | श्री.मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री.यु.आर.भोई | उपअभियंता पा.पु. विभाग |
| ८. | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. आर.डी. माळी | सहा.आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. के. जी. सुडके | एल.बी.टी. अधिक्षक |
| ११. | श्री. के. जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १२. | श्री. गणेश खोंडे | प्रकल्पअधिकारी |
| १३. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| १५ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १६ | श्री. पी.डी. नाईक | प्र. लेखापाल |
| १७ | श्री.एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १८ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |

म.सभापती — सन्मा. सदस्य/ सदस्या, उपायुक्त, अधिकारी, पत्रकार तथा छायाचित्रकार यांचे स्वागत करतो. सभेचे कामकाज चालविणेस आवश्यक ती गणपूर्ती झालेली असल्याने सभेच्या कामकाजास नगरसचिव यांनी सुरुवात करावी.

म.नगरसचिव — वंदे मारत्मसाठी या राष्ट्र वंदेनेसाठी सर्वानी उभे रहावे.

विषय क्रमांक :- ९० — मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.२४/१२/२०१४)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंब १०४ दिनांक ३१/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक २४/१२/२०१४चे ठराव नंबर ९७ ते १०३ तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक :- ९१ — मनपा क्षेत्रातील पथदिव्यांची दैनंदिन निगा व दुरुस्ती, देखभाल करणे यासाठी आलेल्या कार्यालयीन निवेंदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०५ दिनांक ३१/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सद्यस्थितीत धुळे मनपा क्षेत्रात पथदिव्यांची दैंनदिन दुरुस्ती व देखभाल करणेचे काम कंत्राट पध्दीतीने करण्यात येत असून सदरचे काम १ वर्ष मुदतीकरीता देण्यात आलेले होते.सदरचे कंत्राटदार ओम श्री मंगलमूर्ती इलेक्ट्रिकल्स नाशिक यांचे कामाची मुदत दिनांक २/१०/२०१४ रोजी पूर्ण झालेली आहे.सदरचे कामाकरीता नवीन नियुक्ती करण्यासाठी प्रथम निविदा दिनांक ९/८/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यात येवून सदर कामी एकही निविदा प्राप्त न झाल्याने दिनांक २३/९/२०१४ रोजी पुन्हा फेरनिविदा प्रसिध्द करण्यात आलेली आहे तथापि सदरच्या फेरनिविदा करताही प्रतिसाद मिळालेला नाही.

मागील वर्षी सन २०१३ मध्ये सदरील कामाकरीता सुमारे ५ वेळा निविदा प्रसिध्द करुन अंतिमतःओम श्री. मंगलमूर्ती इलेक्ट्रिकल्स नाशिक यांनी सदर काम देण्यात आले होते.सदर कामी कंत्राटदार यांचे दर रु.४९३/- प्रति पथदिवा प्रतिवर्ष याप्रमाणे एकूण १२८८० पथदिव्यांकरीता सन २०१३-१४ चा खर्च रु.६१,५९,६८४/- मात्र आहे.

शहरातील पथदिव्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| ४० वॅट टयुबसेट | -- ३३६३ |
| सोडीयम व्हेपर १५०/२५० वॅट | -- ४८७४ |
| मेटल हेलाईड २५०/४०० वॅट | -- २०८९ |
| सीएफएल ४५/६५/८५ वॅट | -- १६८ |
| एकूण | -- १२८१४ |

या व्यतिरिक्त मनपा कार्यालय/दवाखाने/उद्याने/ओपनस्पेस मधील कंपौड लाईट/पाणी पुरवठा केंद्र/अमरधाम/सुकवद व बाभळे पाणी पुरवठा केंद्र/डेडरगांव या सर्व मनपा जागेतील दिवे/पथदिवे ९२४ असे एकत्रित १३७३८ दिव्यांची संख्या आहे.

शहरातील वार्षिक पध्दतीने पथदिवे देखभाल दुरुस्ती करणेचे काम सन २००० पासून सुरु असून याकाळापासून मापामार्फत कुठल्याही प्रकारची साहित्य खरेदी करण्यात आलेली नाही तथा मनपाकडेस सद्यस्थितीत पथदिवे देखभाल दुरुस्तीसाठी कर्मचारी उपलब्ध नाही.विशेषतःअन्य मनपाच्या विद्युत कार्यालयाकडील अभियंता/प्रकाश निरीक्षक यांच्या संख्येनुसार आपल्या मनपाकडेस अत्यल्प स्टॉफ आहे.सदरच्या कामाच्या दैंनदिन व प्रत्यक्ष पर्यवेक्षणाकरीता खालीलप्रमाणे पर्यवेक्षीय स्टॉफ असावा असे मत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | कनिष्ठ अभियंता | ३ |
| २) | प्रकाश निरीक्षक | ४ |

३) रात्र निरीक्षक(सुपरवायझर) ६

उक्त प्रमाणे शहरातील पथदिवे व त्याअनुषंगाने मनपाकडील सद्यस्थितीतील कर्मचारी याबाबतचा अहवाल सादर आहे.

उक्त अहवालाप्रमाणे मा. विरोधी पक्षनेते यांच्या पत्रानुसार मनपा विद्युत विभागाकडे दैंनदिन पथदिवे देखभाल दुरुस्तीसाठी कुठली पध्दत अवंलबवावी याबाबत निर्णयाकरीता मा.आयुक्त सो.यांचेकडील दिनांक १८/१०/२०१४ रोजीच्या कार्यालयीन टिपणी मंजुरीनुसार मे.स्थायी समितीकडेस सादर करण्यात आलेला होता.तथापी मा.सभापती सो.स्थायी समिती यांनी दिनांक२८/११/२०१४ च्या पत्रानुसार व समक्ष चर्चा करुन सदरील कामाकरीता वस्तुनिष्ठ खर्चाचा अहवाल देणे तसेच मनपामार्फत काम करावयाचे असल्यास आवश्यक कर्मचारी यांचा दरमहाचा खर्च,साहित्य खर्च इ.बाबत फेर तपासून फेर प्रस्ताव सादर करणेबाबत आदेशित केले. त्याअनुषंगाने शासन दरसुचीनुसार धुळे शहरातील पथदिवे दुरुस्तीसाठी लागणारे आवश्यक किमान साहित्य व त्यानुसार येणारा खर्च याची तपशिलवार माहिती कार्यालयीन टिपणीत नमूद केलेली आहे.मनपामार्फत काम करावयाचे असल्यास सदरचा खर्च व याची बाजारभावाप्रमाणे सुध्दा दर पडताळणी करुनही खर्च रक्कम रुपये २,२२,६२,६३०/- आहे.तथापी पथदिव्यांचे आयुष्यमान टयुब लाईट व सीएफएल दिवे वगळता सोडीयम व्हेपर व मेटल हेडलाईट साठी १ वर्ष कालावधीपेक्षा जास्त असल्याने या पथदिव्यांना पूर्ण साहित्य लागणार नाही.सदरचा खर्च ४० टक्के मर्यादेत अपेक्षित असून याप्रमाणे सदर खर्च हा रक्कम रुपये १,१९,०९,९२८/- अपेक्षित आहे.सदरच्या खर्चामध्ये कंत्राटदारा मार्फत मजुरी खर्च २० टक्के गृहीत आहे.या व्यतिरिक्त दैंनदिन ऑन ऑफ साठी स्वतंत्र मनुष्यबळसाठी सुमारे रक्कम रुपये १,५०,०००/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरील कामासाठी मनपामार्फत कर्मचारी उपलब्ध केल्यास किती खर्च येईल याबाबत मुख्य लेखापरिक्षक आस्थापना विभागाकडून माहिती घेणेबाबत सूचित केले. कार्यालयीन अधिक्षक यांनी रोजंदारी कुशल कर्मचारी यांना रु.४९९/- व अकुशल कर्मचारी यांना रु.४७३/- मात्र रोजंदारी दर आहे असा अहवाल दिलेला आहे.

उपरोक्त प्रमाणे रोजंदारी दरांचा विचार केला असता कुशल तांत्रिक कर्मचारी १५ व अकुशल मदतनीस कर्मचारी १५ साठी वार्षिक खर्च सुमारे ५३,२१,७००/- मात्र कर्मचारी वेतनासाठी लागणार आहे.परंतु सदरील कर्मचा-यांकडून काम करावयाचे असल्यास खालील बाबींचा विचार करणे आवश्यक आहे.

१. तार्त्रिक कर्मचा-यांचा पोलवर काम करतेवेळी जोखीम,अपघात याची जबाबदारी मनपाची असेल.
२. शासकिय नियमानुसार या कर्मचा-यांचा विमा काढावा लागेल.
३. असे कर्मचारी दिर्घ काळ मनपा सेवेत काम करतील का. याबाबत विचार होणे आवश्यक आहे.
४. मनपाकरीता बांबू शिडी व इतर हायड्रोलीक उंच शिडी खरेदी करीता रु.११,००,०००/- खर्च अपेक्षित आहे.

यानुसार इलेक्ट्रिक साहित्यसाठीशासन दरसुचीनुसार किमान खर्च रु.९५,२७,९४३/- मात्र आहे.बाजार भाव दर व शासन दर सुचि यामध्ये काही प्रमाणात तफावत असली तरीही सदरचे दर टॅक्सेशनसह रु.८० लक्ष मर्यादेत येतील परंतु मनपाकडून काम करावयाचे झाल्यास मनपाने नेमलेले कर्मचारी काम करु शकतील याबाबत तांत्रिक अडचणी येवू शकतात. कारण विद्युत कंपनीच्या पोलवर मराविकंपनीचा कर्मचारी किंवा विद्युत अनुज्ञाप्ती मंडळाकडील नोंदणीकृत विद्युत ठेकेदाराचे परवानाधारक कर्मचारी हे पोलवर काम करण्यास पात्र असतात.यापूर्वी नमूद केल्याप्रमाणे रोंजदारीने नेमलेल्या कर्मचा-यांची अशा तांत्रिक अडचणी पूर्णतः जबाबदारी मनपाची असणार आहे.

उक्त अहवालाप्रमाणे मनपाकडून काम करावयाचे असल्यास येणा-या तांत्रिक अडचणी, कर्मचारी सख्ंया,रोजंदारी दरानुसार अपेक्षित खर्च व इलेक्ट्रिक साहित्य खर्च एकत्रितपणे सुमारे रु.१.४४ कोटी प्रतिवर्ष येईल असा अंदाज आहे.तसेच वरील अहवालानुसार कंत्राटदाराकडून निविदा मागवून काम करावयाचे असल्यास सदर कामाचे अंदाजपत्रकिय मूल्य रु.१.१९ कोटी प्रतिवर्ष अपेक्षित आहे.तथापी कंत्राटदाराकडील कर्मचा-यांचे वेतन व कंत्राटदाराकडून इलेक्ट्रिक साहित्याची खुल्या बाजारातून खरेदीचे दर हे तुलनेत कमी असतात.यामुळे कंत्राटदार वरील नमूद रकमेच्या तुलनेत सुमारे २५ टक्के कमी खर्चात सुमारे रु.९० लक्ष मर्यादेत पूर्ण गुणवत्तेसह काम करु शकेल असे मत आहे.

उक्तअहवालानुसार तुलनात्मक खर्चाचे अवलोकन होवून निर्णय घेण्याबाबत म. मुख्य लेखापरीक्षक यांनी दिनांक २०/१२/२०१४ नुसार नमूद केलेले आहे.मा.आयुक्त साो. यांनी दिनांक२४/१२/२०१४ च्या निर्देशानुसार रु.९० लक्ष खर्च अपेक्षित याप्रमाणे ई निविदा काढणेस व खर्चास मंजुरी घेण्यासाठी प्रस्ताव सादर केला असता उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार एक वर्षासाठी कंत्राटदार हा पहिले ८ -१० महिने काम चांगले करतो नंतर मुदत संपावयास येत असल्यामुळे नंतर काम व्यवस्थित करीत नाही. त्यासाठी कामाची गुणवत्ता राहणेसाठी तसेच नागरीकांच्या पथदिव्याच्या तक्रारीचे निराकरण करणेसाठी सदर पथदिव्याची दैनंदिन देखभाल दुरुस्ती करणेसाठी रु.९० लक्ष मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येवून सदर कामाचे ई निविदा ३ वर्ष मुदतीसाठी काढण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

विद्युत विभागासाठी ३ सुपरवायझर व १ अभियंता मानधनावर नियुक्ती करणेबाबतचा प्रस्तावाबाबत आस्थापना विभागाने तांतडीने कार्यवाही करावी. व कार्यपूर्तीचा अहवाल स्थायी समितीकडे सादर करावा. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ९२ म.आरोग्याधिकारी यांच्या अहवालानुसार शहरातील सार्वजनिक स्वच्छतेकामी मनपा मार्फत अवलंबवयाच्या कार्यवाहीबाबत पुढील निर्णय घेणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०६ दिनांक ३१/१२/२०१४**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मे.स्थायी समिती ठराव क्र.८४ दि.७/११/२०१४ ठरावान्वये समिक्षा कं.कंपनी, ठाणे व आस्था स्वयं.सेवा सह.संस्था यांना काळया यादीत टाकण्याचे मंजुर करण्यात आले आहे. शहराचे ४ झोनप्रमाणे लवकरात लवकर निविदा प्रसिध्द करुन उक्त कामात आवश्यकती साधन सामुग्रीस नियमाप्रमाणे उपलब्धतेसाठी मान्यता देण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने दि.२८/११/१४ रोजी झालेल्या मे.स्थायी समिती मध्ये समिक्षा कं.कंपनी यांचे काम बंद करण्याचे आदेशीत झाल्याप्रमाणे त्यांचे दि.१/१२/१४ पासुन काम बंद केले आहे.त्यानंतर त्यांची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असुन २ दिवस प्रशासकीय सुट्टी होती. त्यांची पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक असल्याने नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील परिपत्रक क्र.नपप्रस/१३/पणन सहाय्य/२००४/ प्र.क्र. १०९७ दिनांक २१ डिसेंबर २००४ अन्वये सुवर्ण जयंती योजना अंतर्गत बचत गटांना मनपातील आरोग्य विभागासाठी घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कामे देवु शकतात तसेच महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांच्याकडील नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम२००० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी करावयाच्या उपाययोजना बाबतच्या शासन निर्णय क्रमांक घकव्य १००६ / प्र.क्र.५३ / नवि-१६ ऑक्टोबर २००६ परिपत्रकान्वये कृती मुद्दा क्र.३ मधील २३ प्रमाणे दारिद्रय रेषेखालील स्वयंसहायता गटाला अशी कंत्राटे विना

निविदा देण्याचे अधिकार सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेअंतर्गत नागरी संस्थेला आहेत. तसेच महिला गटांना असे कंत्राट कामधेनु योजने अंतर्गत देता येते. त्या अनुषंगाने दिवस व वेळ कामी असल्याने उक्त कार्यवाही सुरु ठेवणे (घनकचरा उचलण्याची) आवश्यक असल्याने तसेच भांडवली खर्च जास्त असल्याने बचत गटांकडुन दर मागवुन व शासकीय दर सुचि तपासुन ४ झोन प्रमाणे ४ बचत गटांना खालील प्रमाणे कामे देण्यात आलेले आहे. व त्यांनी सदर काम दि.१/१२/१४ पासुन सुरु केलेले आहे.

तसेच आस्था स्वयं.सेवा सह.संस्था यांच्याकडुन मलेरीया व आरोग्य विभागासाठी कामगार पुरवित होते. व त्यांचा दर प्रति कामगार प्रति दिवस रु.१७१.१२/- आहे. त्यांनी दि.१/१२/१४ पासुन काम बंद केल्याचे पत्र सादर केले व काम बंद केले होते. सदर दरात कचरा उचलणेकामी कामगार उपलब्ध होत नाही. मागील समिक्षा कं.कंपनी कामगारांना प्रति कामगार प्रति दिवस रु.२५०/- प्रमाणे दर देत होते. तसच बाजारभाव पहाता उक्त दरात सदर काम करण्यास कोणीही कामगार मिळत नाही. म.न.पा.कडे एकुण पुरुष कामगार ३९७ व स्त्री कामगार ३७९ आहे असे एकुण ७७६ कामगार आहे. सदर कामगारांना प्रभागनिहाय मा.महापौर सो. यांच्या आदेशाने जानेवारी - २०१४ पासुन नेमुन तसे सन्मा.नगसेवक यांना माहितीसाठी पत्र दिलेले आहे. सोबत तक्ता जोडला आहे. उक्त ठरावात नमुद केल्याप्रमाणे नियुक्त सफाई कामगार हे प्रत्यक्षात कामावर न जाता अन्य कर्मचारी अथवा इसमामार्फत कामे करतात तसेच सफाई कामगार पदि नियुक्त असुनही अन्य विभागात काम करीत आहे. अशा सर्व कर्मचाऱ्यांना सफाई कामी देणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी बाबत सुचित केल्यानुसार स्व.निरीक्षक यांचा अहवाल घेतला असता उक्त कामगारांपैकी एकुण २३ कामगारइतर ठिकाणी काम करीत आहे. उदा.मोकाट जनावरे पकडणे, दवाखाना व कोंडवाडा वॉचमेन, मलेरीया विभागाकडे तांत्रीक किटक समहारक म्हणुन कामाल आहे. सदर काम करवुन घेणे हे आवश्यक आहे. सदर कामगारांना काढल्यास ते काम बदं होऊ शकते.

शासकीय दर सुचीप्रमाणे प्रति ट्रॅक्टर प्रति दिवस डिझेल खर्च सोडुन ९८०/- रु. दर आहे.तसेच मा.सरकारी कामगार अधिकारी यांनी सुधारीत दिलेल्या दरानुसार कुशल कामगारांना ४९९/- रु. व अकुशल कामगारांना ४७३/- रु. दर असुन सद्यस्थितीत मनपा मार्फत त्यांना उक्त दरानुसार वेतन अदा करण्यात येत आहे. उक्त दर पहाता शहराचे ४ झोन पाडुन ४ बचत गटांना प्रति ट्रॅक्टर ९७०/- प्रति दिवस डिझेल, ड्रायव्हर व दुरुस्तीसह व त्यावर प्रत्येकी ४ कामगाराप्रमाणे तसेच प्रति कामगार प्रति दिवस २५०/- प्रमाणे मनपा वाहन १० घंटागाडी, २ डंपर, २ डंपर प्लेसर, २ सुविधा रीक्षा यावर कामगार पुरविण्याचे काम सोपविलेले आहे.सद्यस्थितीत खालीलप्रमाणे काम करुन घेण्यात येत आहे.

**सद्यस्थितीत शहरातील घनकचरा उचलणेकामी कार्यरत**

| **बचत गटाचे नावं** | **झोन क्र.** | **वार्ड** | **प्रभाग** | **एकुण लावलेले ट्रॅक्टर** | **एकुण लावलेले कामगार** | **मनपाचे घंटागाड्या ४०७ (मनपा मार्फत काम करण्यात येत आहे.)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **अल्पसंख्यांक महिला बचत गट ९७६५२७५६२८** | १ | अे/अ | १५,१६,१७,१८ | ३ | १२ | १ |
| | | अे/ब | १९,३०,३१,३२,३३ | ३ | १२ | २ |
| **जय जोगेश्वरी महिला बचत गट ९९२३७६९४४४** | २ | बी वार्ड | २०,२१,२९ | ३ | १२ | १ |
| | | सी-१ | २२,२३,२४ | २ | ८ | १ |
| | | सी-२ | २५,२७,२८,३५ | ४ | १६ | १ |
| **आदर्श अल्पसंख्यांक महिला बचत गट ९८२३२५६६४५** | ३ | डी वार्ड | ११,१३,१४ | २ | ८ | १ |
| | | सु.नगर | १०,१२,२६ | २ | ८ | १ |
| **आदीत्य महिला बचत गट** | ४ | मोहाडी | ३४ | १ | ४ | |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८००७२९२४६४ | | देवपुर-१ | १,२,३,४,९ | २ | ८ | १ |
| | | देवपुर-२ | ५,६,७,८ | ३ | १२ | १ |

**मनपाचे डंपर एकुण :- २ :-** १ डंपर पेठ भागात १ डंपर बंद
**मनपाचे डंपर प्लेसर :- २**
**(झुलागाडी)** :- १ सुरु (शहरातील कचरा बॉक्स उचलणेकामी )
१ बंद
**सुविधा रिक्षा :- २** :- १ मेलेले जनावरे उचलणेकामी, १ बंद

उक्त यंत्रणेस मासिक खर्च अंदाजे १८,३६,६००/- अपेक्षीत आहे. परंतु यात मनपाच्या घंटागाड्याद्वारे नियोजन करुन १,२,३ दिवसाआड काम करुन घेण्यात येत आहे. दररोज भागात घंटागाडीसाठी अंदाजे सी वार्डात १, सु.नगरमध्ये १, देवपुर-२ मध्ये २ व देवपुर-१ मध्ये २, मोहाडी १, अे/अ भागात १, अे/ब भागात १ असे एकुण ११ घंटागाडीची आवश्यकता भासत आहे. सदर गाड्या लावल्यास खर्च वाढु शकतो. सद्यस्थितीत मनपाचे एक डंपर प्लेसर,एक डंपर, एक सुविधा रिक्षा नादुरुस्त असुन त्यांचे दुरुस्तीचे काम सुरु आहे.तसेच मनपाच्या वाहनांच्या दुरुस्तीबाबत मनपा मॅकेनिकल यांच्या अहवालानुसार एकुण खर्च रु.१८,००,०००/- अपेक्षीत आहे.सदर खर्च समिक्षा कं.कंपनी यांच्या देय बिलातुन वसुल करण्याची प्रशासकीय कार्यवाही सुरु असुन ते वसुल करण्यांत येईल. तसेच नविन ४ झ ोनसाठी निविदा प्रक्रिया सुरु आहे.

कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार नवीन निविदा प्रक्रिया होऊन नवीन ठेकेदाराची नियुक्ती होई पावेतो उक्त कार्यालयीन अहवालात नमूद बचत गटामार्फत शहरातील घनकचरा उचलणेकामी होणारी कार्यवाही करण्यांस व तदर्थ येणा-या संभाव्य खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सदर बचत गटांची आर्थिक परिस्थिती पाहता त्यांना दर १५ दिवसांत त्यांच्या झालेल्या कामाचे देयके अदा करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.तसेच सन्मा. सदस्य श्री. अमिन पटेल यांच्या मागणीनुसार प्रभाग क्रं.२७,२८ या प्रभागाचे स्वच्छतेचे कामी शाम महिला बचत गट यांना मंजूर दराप्रमाणेकाम देण्यांस व शहरातील घनकचरा उचलणेकामी टॅक्ट्रर व घंटागाडयाची आवश्यकता असल्याने आवश्यकतेनुसार जादा टॅक्टर व घंटागाडी लावण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच टॅक्टर व घंटागाडी वॉर्डात नियुक्ती केल्यानंतर संबंधित टॅक्ट्ररला नंबर,वाहन चालक व सुपरवायझरचे नांव व मोबाईल क्रंमांक संबंधित प्रभागातील सन्मा.नगरसेवक/ नगरसेविकांना देण्याबाबत कार्यवाही करावी.

तसेच मागील स्थायी समिती सभेत स्वच्छतेचे काम करणारे ठेकेदार यांना काळया यादीत टाकण्याबाबत ठराव पारीत करण्यांत आलेला आहे.तथापि ठरावानुसार कार्यवाही करणेबाबत मनपा वकील श्री.समीर पंडीत यांचा कायदेशीर अभिप्राय मागविण्यांत आलेला असून याबाबत सभागृहास अवगत करण्यांत आलेले आहे.याबाबत प्रशासनाने कायदेशीर अभिप्राय व कार्यालयीन अहवालासह प्रस्ताव पुढील बैठकीत नियमानुसार सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ९३ मा.सभापती, स्थायी समिती, मनपा धुळे यांचे पत्रानुसार नकाणे रोड ते वाडीभोकर रोड पर्यत असणा-या ५० फूटी डी.पी. रस्त्यावरील पाईप लाईन स्थलांतरीत करणेचे काम मजिप्रा ऐवजी मनपा मार्फत करण्याबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०७ दिनांक ३१/१२/२०१४**

मा.सभापती स्थायी समिती मनपा धुळे यांनी पत्र देवून प्रभाग क्रमांक ५ मधून नकाणे रोड ते वाडीभोकर रोड पर्यत ५० फूटी डी.पी. रस्ता असून सदर रस्त्याच्या नुतनीकरण व डांबरीकरण करण्यांचे काम मंजूर असून सदर कामाचा कार्यादेश देण्यांत आलेला आहे. सदर रस्त्याच्या मधोमध मेन राईझर पाण्याची पाईप लाईन असून सर्व्हे नं. ७३ भाजी मार्केट तसेच काही खाजगी प्लॉट मधून सदर पाईप लाईन जात आहे. सदर पाईप लाईन रस्त्याच्या कडेला असलेल्या जागेतून स्थलांतरीत करावी लागणार आहे. रस्त्याचे काम झाल्यावर सदर पाईप लाईन स्थलांतरीत झाल्यास रस्त्याचे नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्त्याचे काम सुरु होण्याच्या अगोदरच सदर पाईप लाईन स्थलांतरीत करणे अत्यंत आवश्यक आहे. याकामी सदर पाईप लाईन स्थलांतरीत करणेसाठी यापूर्वी महाराष्ट्र जिवन प्राधिकरणाकडेस त्यांच्या मागणीनुसार आवश्यक ती रक्कम भरण्यांत आलेली होती. परंतु रक्कम भरुनही मजिप्रा मंडळाने दोन वेळा जादा रकमेची मागणी केलेली आहे. सदर काम हे अत्यंत आवश्यक असल्याने याकामी म.कार्यकारी अभियंता यांच्याशी चर्चा केल्यानुसार सदर काम मनपा मार्फत तांतडीने करणे शक्य आहे. त्यामुळे सदर काम मजिप्रा ऐवजी महानगरपालिकेमार्फत करण्यांसाठी व मजिप्रास आदा केलेली रक्कम परत घेणेसाठी सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीच्या विषय सूचीवर घेणेबाबत मागणी केलेली आहे.

उक्त कामाचे अंदाजपत्रक मजिप्रा चे पत्र जा.क्र.मजिप्रा/नावजाग्रा यो.वि.ज/चिशा तांम /९५७ सन २०१४ दिनांक १९/३/२०१४ रोजी सादर केलेले आहे. त्यानुसार जा.क्रं. धुमपा/ बांवि/१७/२०१४ दि.२०/५/२०१४ रोजी प्रसिध्द करण्यांत आली.तथापि उक्त कामी एकही निविदा प्राप्त झाली नाही त्यामुळे काम मजिप्रा मार्फत करणे बाबत दि.२/८/२०१४ रोजी टिपणी मंजूर करण्यांत आली. त्यानुसार उक्त काम करणेसाठी ॲडव्हान्स रक्कम रु.२५,००,०००/-मात्रचा धनादेश मजिप्रा विभागास दि.१४/८/२०१४ रोजी वर्ग करण्यांत आला मजिप्रा विभागाने त्यांचे पत्र जा.क्रं./ता.शा/ मनपा धुळे/७३७/१४ दि.५/९/२०१४ उक्त अंदाजपत्रक सुधारीत दर सुचीनुसार सुधारीत करुन अंदाजपत्रक उपविभागाने किंमत रु.२९,६५,७६५/- चा कार्यालयास कळविण्यात आली. त्यानुसार रु.२९,६५,७६५- २५००००० = रु.४,६५,७६५/- येवढी रक्कम जमा करणेबाबत सुचित करण्यांत आले.तशी कार्यालयीन टिपणी दि.१९/९/२०१४ रोजी मनपाने रु.४,६५,७६५/-चा वाढीव धनादेश मजिप्रा विभागाला पारीत करणे बाबत ठेवण्यांत आली. परंतु दि.२८/१०/२०१४ला पुन्हा म. कार्यकारी अभियंता यांचे पत्र जा.क्रं. त्रिशा/३३२६/१४ दि.२८/१०/२०१४रोजी त्याच कामाची तांत्रिक मंजुरी देऊन किंमत रु.३९,१६,४००/-दर्शविण्यांत आली.व १४,१६,४००/- चा भरणा करणे बाबत महापालिकेस कळविले आहे. म.जि.प्रा.विभागानेपहिल्यांदा सादर केलेल्या अंदाजपत्रकात अस्तित्वातील CI Pipe ऐवजी ४५० मी.मी.DI K-g pipe वापरला व अस्तिततील ४५० मी. मी. व्यासाच्या DSC पाईप ऐवजी४५० मी.मी DIK७ पाईप वापरला नंतर दि. २८/१०/२०१४ रोजी सादर केलेल्या अंदाजपत्रकात एम.एस पाईप वापरला त्यामुळे पाईप बदलाचे कोणत्याही प्रकारचे डिझाईन सादर न करता पाईपचा प्रकार बदलण्यात आला आहे. त्यामुळे अंदाजपत्रकीय रक्कम रु.३९,१६,४००/- एवढी झाली आहे.सदर बाब ही तांत्रिकदृष्टया योग्य वाटत नाही. त्यामुळे मजिप्राकडे देण्यांत आलेली रक्कम परत घेण्यांत यावी.तोपावेतो सदर काम मनपा मार्फत करणेबाबत नियमाप्रमाणे कायदेशीर कार्यवाही करुन सदरची पाईप लाईन सत्वर स्थलांतरीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**दिनांक ३१/१२/२०१४ रोजीच्या स्थायी समिती सभेतील चर्चेनुसार झालेले निर्णय**

१) सन्मा.सदस्या सौ.माधुरी नंदलाल अजळकर यांच्या प्रभागात रस्ते व गटारी बाबत असलेल्या समस्या बाबत संबंधित ओव्हरसिअर व विभागाकडे वारंवार तक्रारी करुनही कामाबाबत कार्यवाही न झाल्याने नागरीकांच्या रोषास आम्हास सामोरे जावे लागत असल्याबाबत तक्रार केलेली आहे.

संबंधित सन्मा.सदस्यांच्या कामाबाबत विभागाचे ओव्हरसिअर श्री.पी.डी.चव्हाण यांनी २ दिवसांत सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करुन संबंधित सदस्या व सभापती यांच्या निदर्शनास आणून पुढील कार्यवाही तांतडीने करण्याबाबत म. सभापती यांनी आदेशित केले आहे.

२) सन्मा.सदस्य श्री.सुभाष जगताप व अमोल पावबा मासुळे यांनी सुभाषनगर येथील स्व. न्हानु सोनार (पहेलवान) दवाखान्याचे काम तसेच सदर दवाखान्यासाठी आवश्यक ती यंत्र सामुग्री साहित्य घेण्याचे काम प्रलंबीत असून याकामी दोन वेळा निविदा काढूनही मनपाच्या आर्थिक स्थितीमुळे ठेकेदार व पुरवठादार यांनी निविदा न भरल्याने काम प्रलंबीत आहे.सदर रुग्णालय तांतडीने सुरु होणे आवश्यक असल्याने त्यासाठी मनपा मार्फत निधी उपलब्ध झाल्यास ठेकेदार तथा पुरवठादार काम करण्यांस तयार होतील. यासाठी मनपाच्या दैनंदिन भरण्यातून सदर कामासाठी दैनंदिन रु.५००००/- स्वतंत्र खात्यात जमा करणेबाबत मागणी केलेली आहे.

याबाबत प्रशासनाने याकामी मनपाच्या दैनंदिन भरण्यातून सदर इमारतीचे काम व यंत्र सामुग्री साहित्य घेणेसाठी दैनंदिन रु.५००००/-स्वतंत्र खात्यात जमा करणेबाबत दिनांक १/१/२०१५ पासून कार्यवाही करण्याबाबत म.सभापती यांनी आदेशित केले आहे.

३) मा.सभापती स्थायी समिती यांनी शहरात अनाधिकृत नळ कनेक्शनची संख्या जवळपास ३० हजाराचे जवळ आहे. कायदेशीर नळ कनेक्शन घेण्यांस येणा-या नागरीकांना कार्यालयामार्फत अडचणी येवून नाहक त्रास निर्माण केला जातो.आणि शहरात सररासपणे अनधिकृत नळ कनेक्शन दिले जात आहेत. त्यामुळे महापालिकेच्या आर्थिक उत्पन्नावर त्याचा परिणाम होत आहे.पाणीपुरवठा विभागातील फिटर व ओव्हरसिअर याबाबत कोणीतीही कार्यवाही करीत नाही. वास्तविक त्यांच्या भागातील नळ कनेक्शन बाबत त्यांना संपूर्ण माहिती असणे गरजेचे आहे. यासंदर्भात सर्व ओव्हरसिअर व फिटर यांनी दररोज त्यांच्या भागात पहाणी करुन ५ अनधिकृत नळ कनेक्शन धारकांवर फौजदारी गुन्हे दाखल करावे व तसा अहवाल स्थायी समितीकडेस सादर करण्याचे आदेश मा. सभापती यांनी दिले आहे.

४) सन्मा.सदस्य श्री. अमोल पावबा मासुळे यांनी मागील स्थायी समिती बैठकीत प्रबोधनकार ठाकरे संकुलातील अनाधिकृत व्यापारी गाळयांबाबत प्रश्न उपस्थित करुन कार्यवाही करण्यांची मागणी केली होती. व त्याबाबत कार्यवाही करुन अहवाल देणेबाबत आदेशित केलेले होते. तथापि त्याबाबत वसुली विभागामार्फत कोणतीही कार्यवाही करण्यांत आलेली नाही. तरी याबाबत सहा. आयुक्त (कर) व वसुली विभागामार्फत तांतडीने व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांचे मा. सभापती यांनी आदेशित केले.

५) सन्मा. सदस्य श्री.फिरोज बशीर शेख यांनी मनपातील सेवानिवृत्त कर्मचा-यांचा फरक देणेसाठी दरमहा ५ लाख रुपये तरतूद करुन त्यांना दरमहा रक्कम अदा करणेबाबत मागील स्थायी समिती सभेत निर्णय घेण्यांत आलेला होता. तथापि याबाबत कोणतीही कार्यवाही प्रशासनामार्फत झालेली नसल्याचे विदीत केले. यावर म.सभापती यांनी दरमहा सेवानिवृत्त कर्मचा-यांना रक्कम अदा करणेबाबत कार्यवाही करण्यांचे आदेशित केले आहे.

६) धुळे मनपाच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने ११ कलमी कार्यक्रमाचे नियोजन करण्यांत आलेले होते. सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात याबाबत स्थायी समितीने वाढ सुचविलेली होती. सदर वाढ सुचवितांना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांच्याकडूनच लेखी अहवाल घेवून संभाव्य उत्पन्न वाढीबाबत तरतूद करण्यांत आलेली होती. यात कुठेही अवास्तवता नसून संबंधित अधिका-यांशी चर्चा व लेखी घेवूनच सदर अंदाजपत्रकात तरतूद करण्यांत आलेली होती. तथापि प्रशासनामार्फत

याबाबत कोणतीही ठोस उपाय योजना राबविल्याचे दिसून येत नाही.तसेच अंदाजपत्रकात सुचवल्यानुसार उत्पन्न वाढीच्या दृष्टीने कोणताही नियोजन बध्द कार्यक्रम तथा कार्यवाही झालेली नाही. महानगरपालिकेची आजची आर्थिक स्थिती लक्षात घेता सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी त्यांनीच दिलेल्या अहवालानुसार कार्यवाही केली असती तर आज मनपाच्या आर्थिक उत्पन्नात मोलाची भर होण्यास मदत झाली असती. परंतु प्रशासनाच्या या दिरंगाई व अकार्यक्षमतेबद्दल मा.सभापती यांनी खेद व्यक्त करुन त्याबाबत कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

धुळे महानगरपालिका धुळे
स्थायी समिती
सभा क्रं.१ दिनांक २३/०१/२०१५ चे इतिवृत्त

धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा आज शुक्रवार दिनांक २३/०१/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां धुळे महानगरपालिकेच्या सभागृहात मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे प्रतिनिधी मा.जिल्हाधिकारी साो. धुळे तथा पिठासीन अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आली. या सभेचे इतिवृत्त.

सदर सभेस खालील प्रमाणे मा.सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सदस्य |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री.साखला गोविंद तुळशिराम | सदस्य |
| ४ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ५ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ६ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ७ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ८ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ९ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| १० | श्री. शरद एकनाथ वराडे | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| १२ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सदस्य |
| १३ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १४ | श्री. पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

उपस्थितीबाबत स्वाक्ष-या स्वतंत्र रजिष्टरमध्ये घेण्यात आल्या.

खालील सदस्य अनुपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| २ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अण्णासाहेब मिसाळ | पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी धुळे |
| २ | श्री. विठ्ठल सोनवणे | प्रांतअधिकारी, धुळे |
| ३ | श्री. केव्ही. धनाड | आयुक्त , मनपा धुळे |

| | | |
|---|---|---|
| ४ | डॉ. श्री. प्रदीप पठारे | उपायुक्त , मनपा धुळे |
| ५ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव, मनपा धुळे |
| ६ | श्री.बी.बी. गिते | सहा.आयुक्त ( अति.), मनपा धुळे |
| ७ | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त (स.प्र), मनपा धुळे |
| ८ | श्री.त्र्यंबक कांबळें | सहा. आयुक्त ( कर), मनपा धुळे |
| ९ | श्री. के.एन. शिंदे | अभियंता, मनपा धुळे |
| १० | श्री. जे.आर. वळवी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी ( जि.का.) |
| ११ | श्री. पी.जी.कुलकर्णी | नायब तहसिलदार ( जि.का.) |
| १२ | श्री.यु.आर. भोई | उपअभियंता पा.पु., मनपा धुळे |
| १३ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता, मनपा धुळे |
| १४ | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी, मनपा धुळे |
| १५ | श्री. जी.एस. खोडे | प्रकल्प अधिकारी, मनपा धुळे |

म. नगरसचिव — सभेच्या सुरुवातीस वंदे मातरमसाठी सर्वांनी उभे रहावे.
तदनंतर वंदे मातरमचे गायन झाले.

म. नगरसचिव — मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग यांचेकडील क्रं.नपा-२ /२ /जा. क्रं.१५११/२०१५/९७५ दिनांक १६/०१/२०१५ च्या आदेशानुसार मा. जिल्हाधिकारी, धुळे यांची आजच्या स्थायी समिती सभापती निवडणूकीसाठी पिठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे. त्यानुसार ते सभेचे कामकाज पार पाडणेसाठी उपस्थित आहेत. त्यांचे महानगरपालिकेच्या वतीने स्वागत करणेत येते.

विषय क्रमांक:-१ — स्थायी समिती सभापती महानगरपालिका धुळे यांची निवड करणे.

म. नगरसचिव — मुंबई प्रांतिक मनपा (स्थायी समिती ,परिवहन समिती, प्रभाग समित्या व इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे)सन २००७ ची महाराष्ट्र शासन अधिसुचना १७ फेब्रुवारी २००७ चे नियम क्रमांक ५ (१)अन्वये दिनांक २३/०१/२०१५ रोजी स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी दाखल झालेले नामनिर्देशन पत्र मा.पिठासीन अधिकारी यांचेकडेस सुपुर्द करीत आहे.

म.पिठासीन अधिकारी — दिनांक २२/०१/२०१५ रोजी पावेतो नगरसचिव मनपा धुळे यांचेकडेस विहीत वेळेत स्थायी समिती सभापती पदासाठी एकाच उमेदवाराचे चारनामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेले आहे.त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | उमेदवारांचे संपूर्ण नांव | उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता | उमेदवार हा नगरसेवक म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचे/ पॅनलचे | सुचकाचे संपूर्ण नांव | अनुमोदक संपूर्ण नांव |
|---|---|---|---|---|---|

| | | | नांव/ क्रमांक | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | सोनार चंद्रकांत बापू | ग.नं ९ घर क्र ११६२ सुभाष नगर जुने धुळे | प्रभाग क्रं. १२ ब | केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | साखला गोविंद तुळशिराम |
| २ | सोनार चंद्रकांत बापू | ग.नं ९ घर क्र ११६२ सुभाष नगर जुने धुळे | प्रभाग क्रं. १२ ब | वराडे शरद एकनाथ | बोरसे रमेश महादू |
| ३ | श्री.चंद्रकांत बापु सोनार | ग.नं ९ घर क्र ११६२ सुभाष नगर जुने धुळे | प्रभाग क्रं. १२ ब | अन्सारी अकील अहमद महमद सादीक | पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम |
| ४ | चंद्रकांत बापु सोनार | ग.नं. ९ घर क्र ११६२ सुभाष नगर जुने धुळे | प्रभाग क्रं. १२ ब | पाटोळे संदीप सुरेश | शिंदे सोनल दिलीप |

म.पिठासीन अधिकारी : स्थायी समिती सभापती पदासाठी विहीत मुदतीत प्राप्त एका (१) उमेदवाराची ४ नामनिर्देशन पत्र प्राप्त आहेत.नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत येत आहे.

म.पिठासीन अधिकारी : स्थायी समिती धुळे महानगरपालिकेच्या सदस्यांना नामनिर्देशन पत्र पाहण्यासाठी उपलब्ध आहे. कोणाही सदस्यांस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी लेखी / तोंडी हरकत पुराव्यासह दाखल करावी.

कोणत्याही सदस्यांने नामनिर्देशन पत्रावर हरकत घेतली नाही.

म.पिठासीन अधिकारी : छाननी अंती सभापती पदासाठी श्री. चंद्रकांत बापू सोनार यांचे प्राप्त नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे घोषित करण्यांत येत आहे.

म.पिठासीन अधिकारी : महाराष्ट्र शासन १७ फेब्रुवारी २००७ चे अधिसुचनेतील नियम ५ (३) नुसार वैधरित्या नामनिर्दिष्ठ उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्यांनी ठिक ११-३० वाजेपावेतो माझ्याकडेस माघारीचा अर्ज सुपुर्द करावा.

विहीत मुदतीत श्री.चंद्रकांत बापु सोनार यांनी माघारीसाठी अर्ज सादर केला नाही.

म.पिठासीन अधिकारी : धुळे महानगरपालिकेच्या सभापती स्थायी समिती पदासाठी श्री चंद्रकांत बापु सोनार या एकाच उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र प्राप्त असून ते वैध असल्याने महाराष्ट्र शासन १७ फेब्रुवारी २००७ चे अधिसुचनेतील नियम ६ (१) नुसार श्री.चंद्रकांत बापु सोनार हे स्थायी समिती सभापती पदी रितसर निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

सभेचे कामकाज शांततेने पार पाडणेस उपस्थितांनी सहकार्य केल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानून सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सही/-x x x

दिनांक :- २३ /०१/२०१५

पिठासीन अधिकारी
धुळे मनपा स्थायी समिती सभापती निवडणूक सभा,
तथा
जिल्हाधिकारी,धुळे

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**शनिवार दिनांक ३१जानेवारी २०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज शनिवार दिनांक ३१/०१/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा. श्री.चंद्रकांत बापु सोनार, सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सदस्य |
| ३ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ४ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ५ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ६ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ७ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ८ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ९ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| १० | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ११ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १२ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| १३ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.व्ही. धनाड | प्र,आयुक्त तथा अति. आयुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा. आयुक्त |
| ३. | श्री. एम.आर. सरईत | मुख्य लेखापरीक्षक |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त (स.प्र.) |
| ५. | श्री.बी.बी. गिते | सहा. आयुक्त (अति.) |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.एन. कुटे | मु.लेखाधिकारी |
| ८. | श्री. यु.आर. भोई | उा अभियंता पा.पु. |
| ९. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| १०. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| ११. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १२. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १३. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४. | श्री. सुनिल श्रीधर देवरे | पा.पु. अभियंता |
| १५. | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| १६ | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| १७ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |

**म. सभापती** — सन्मा. सदस्य अधिकारी गण,पत्रकार बांधव यांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव — वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म. नगरसचिव — धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापती मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार यांची बिनविरोध निवड झाली असून त्यांची आज प्रथम सभा आहे.प्रशासनाच्या वतीने मा.आयुक्त साो. यांचे हस्ते पुष्पबुके देऊन त्यांचे स्वागत करण्यांत येत आहे.

**सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज**

सन्मा. सदस्य श्री. कुमार नरोत्तम डियालानी यांनी लेखी अर्ज देऊन आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्याच्या विनंती अर्जानुसार रजा मंजुर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०१ दिनांक ३१/०१/२०१५**

सन्मा. सदस्य श्री. कुमार नरोत्तम डियालानी यांनी लेखी अर्ज देऊन आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजुर करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांकः- ०१** — **स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.**

म. नगरसचिव — म. नगरसचिव यांनी विषय व कार्यालयीन टिपणीचे वाचन केले.

म.अमीन पटेल — मा.सभापती साो.शुक्रवारी मुस्लीम बांधवांचा पवित्र दिवस असल्याने कृपया त्यादिवशी बैठकीचे आयोजन करु नये ही विनंती. सदर बैठक गुरुवारी सकाळी ११ वाजतां आयोजना बाबत विनंती आहे.

म. विश्वनाथ खरात — मागील स्थायी समितीच्या कार्यकाळात फक्त २२ बैठका घेण्यांत आलेल्या आहेत.सुमारे ४० बैठका होणे क्रमप्राप्त होते.

म. चंद्रकांत केले — स्थायी समितीच्या बैठका हया प्रशासनाकडून येणारे प्रस्ताव तसेच विषयांवर अवलंबून असतात.जर विषयच नसतील तर बैठका होऊ शकत नाही. मागील स्थायी समितीच्या कार्यकाळात स्थायी समितीच्या मान्यतेसाठी एकही विषय प्रलंबीत नाही.

म. सभापती — स्थायी समितीच्या बेठका हया विषयावर अवलंबून बसतात.तसेच मागील स्थायी समितीच्या कार्यकाळात लोकसभा व विधान सभा निवडणूकाच्या आचार संहितेचा कालावधीही होता. यापुढे विषयानुसार स्थायी समितीची बैठक दर गुरुवारी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०२ दिनांक ३१/०१/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे स्थायी समितीच्या साप्ताहीक सभेचा वार व वेळ ठरविणे संदर्भातील विषयावर उपस्थित सदस्यांनी चर्चा करुन चर्चेअंती स्थायी समितीच्या साप्ताहिक सभा गुरुवारी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच मा.सभापती स्थायी समिती यांना आवश्यक वाटल्यास इतर वेळी देखील स्थायी समिती सभा घेण्यांचे अधिकार मा.सभापती यांना देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक ५ फेब्रुवारी २०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवारदिनांक ०५/०२/२०१५रोजी सकाळी ११-००वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार, सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सदस्य |
| ३ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ४ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ५ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ६ | श्रीमती.आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ७ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ८ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ९ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| १० | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ११ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| १२ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १३ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| १४ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १५ | श्री. पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. श्री . प्रदीप पठारे | उपायुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा. आयुक्त |
| ३. | श्री. एम.आर. सरईत | मुख्य लेखापरीक्षक |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त (स.प्र.) |
| ५. | श्री.बी.बी. गिते | सहा. आयुक्त (अति.) |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७ | श्री. पी.आर. दरेवार | कार्यकारी अभियंता |
| ८ | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. के.एन. कुटे | मु.लेखाधिकारी |
| ८. | श्री. यु.आर. भोई | उप अभियंता पा.पु. |
| ९. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| १० | डॉ. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १२. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १३. | श्री. के.जी. सुडके | एल.बी.टी अधिक्षक |
| १४. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १५. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १६ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १७ | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर |

| | | |
|---|---|---|
| १८ | श्री.बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १९ | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| २० | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| २१ | श्री. पी.डी नाईक | प्र. लेखापाल |
| २२ | श्री. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ, |
| २३ | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| २४ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| २५ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |

म. सभापती सन्मा.सदस्य अधिकारी गण, पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो. सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.**

यादी देण्यांत येते की,भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा जेष्ठ नेते श्री. विनोद काका मोराणकर यांचे वडील कृष्णाजी विश्वनाथ मोराणकर तथा बाबाजी मोराणकर यांचे दि.१/२/२०१५ रविवार रोजी दुखःद निधन झाले आहे.ते माजी नगरसेवक व जनसंघाचे माजी जिल्हाध्यक्ष होते. तसेच भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्री. संभाजी बापू पगारे यांच्या मातोश्री श्रीमती मुक्ताबाई यशवंत पगारे यांचे दि.२१/१/२०१५ रोजी बुधवार रोजी दुःखद निधन झाले.तसेच शिवसेनेचे देवपूर उपविभाग प्रमुख श्री.भटू अप्पा गवळी यांच्या मातोश्री गं.भा. मालुबाई धर्माजी गवळी (घुगरे) यांचे दि. ३/२/१५ रोजी मंगळवार रोजी दुःखद निधन झाले आहे. तसेच धुळे जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष तथा धुळे मनपाची नागरी समिती ( सिटिजन समितीचे) सदस्य ॲड.श्री. जितेंद्र निळे यांच्या मातोश्री श्रीमती लिलावती अशोक निळे यांचे दि.१४/१/२०१५ बुधवार रोजी दुःखद निधन झाले. या सामाजिक कार्यात सदैव साहभागी असत.वरील सर्व मान्यवरांना आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, नगरसेविका, मनपा धुळे

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दांजली सर्मपित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३ दिनांक ०५/०२/२०१५**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार

१) भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा जेष्ठ नेते श्री. विनोद काका मोराणकर यांचे वडील कृष्णाजी विश्वनाथ मोराणकर तथा बाबाजी मोराणकर यांचे दि. १/२/२०१५ रविवार रोजी दुखःद निधन झ ाले आहे.ते माजी नगरसेवक व जनसंघाचे माजी जिल्हाध्यक्ष होते.

२) भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य श्री. संभाजी बापू पगारे यांच्या मातोश्री श्रीमती मुक्ताबाई यशवंत पगारे यांचे दि. २१/१/२०१५ रोजी बुधवार रोजी दुःखद निधन झाले.

३) तसेच शिवसेनेचे देवपूर उपविभाग प्रमुख श्री.भटू अप्पा गवळी यांच्या मातोश्री गं.भा. मालुबाई धर्माजी गवळी (घुगरे) यांचे दि.३/२/१५ रोजी मंगळवार रोजी दुःखद निधन झाले आहे. तसेच धुळे जिल्हा वकील संघाचे उपाध्यक्ष तथा धुळे मनपाची नागरी समिती (सिटिजन समितीचे) सदस्य ॲड.श्री. जितेंद्र निळे यांच्या मातोश्री श्रीमती लिलावती अशोक निळे यांचे दि.१४/१/२०१५ बुधवार रोजी दुःखद निधन झाले. त्या सामाजिक कार्यात सदैव साहभागी असत.

वरील सर्व मान्यवरांचे दुःखद निधनानिमित्त या सभेस आतिव दुःख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दुःखात सहभागी असून मान्यवरांचे दुःखद निधनानिमित्त दोन मिनिटे मौन उभे राहून त्यांना भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ०२ श्री. मोहनीश दिलीप पाटील, श्री.अन्सारी असद अबुकलाम व श्री. शिवकुमार दिलीप सोनार एकत्रित मानधनावर ओव्हरसिअर यांना ६ महिने मुदवाढ देण्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४ दिनांक ५/२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे १) पाटील भुषण मनोज २) श्री. मोहशील दिलीप पाटील ३) श्री.अन्सारी असद अबुलकालम ४) श्री.शिवकुमार दिलीप सोनार५)श्री.संदीप सुभाष पाटील यांची जा.क्र.धुमपा /आस्था /२४४ दि.११/६/२०१४अन्वये ६ महिनेसाठी कंत्राटी मानधनावर ओव्हरसिअर म्हणून नियुक्ती करण्यांत आलेली आहे.

सदर बाबत दि.४/१/२०१४रोजी जाहिरात देवून पात्र उमेदवारांची दिनांक १४/२/२०१४ रोजी तोंडी मुलाखत घेवून दि.१४/२/२०१४ रोजी तोंडी मुलाखतीत निवड समितीने निवड केलेल्या पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यांत आलेली आहे. तरी अर्जदार यांच्या विनंती अर्जानुसार ६ महिने मुदतवाढ देण्यांस मंजुरी देण्याबाबत कार्यालयीन टिपणी सादर केलेली होती.

त्यावर म.आयुक्त सो. यांनी नवीन भरती प्रक्रिया करण्यासाठी कार्यवाही करावी तथापि कर्मचा-यांची आवश्यकता आहे काय याबद्दल संबंधित विभाग प्रमुखांचे अभिप्राय घ्यावा.असे आदेशित केलेले होते.

त्यानुसार प्रभारी नगररचनाकार यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.उक्त तिनही अभियंता हे नगररचना विभागात कार्यरत असून ११ कलमी कार्यक्रमासाठी कार्यरत आहेत.त्यापैकी १ अभियंता हे बी.ओ.टी.च्या प्रस्तावासाठी काम पहात आहे.तीनही अभियंता यांची आवश्यकताअसल्याचे त्यांना पुढील कालावधीसाठी नियुक्ती होणेस आवश्यकता आहे. असे नमूद केलेले आहे

कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार श्री. मोहनीश दिलीप पाटील, श्री. अन्सारी असद अबुकलाम व श्री. शिवकुमार दिलीप सोनार एकत्रित मानधनावर ओव्हरसिअर यांना ६ महिने मुदतवाढ देण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच बऱ्याच वर्षापासून शाखा अभियंता पद रिक्त आहे यासाठी नावे आली आहेत आता आपणाकडे जे ओव्हरसियर आहेत नगरपालिकेची महानगरपालिका झाली आहे अधिकाऱ्यांचा भार वाढला आहे चार ते पाच ओव्हरसियर वाढले आहे आणि त्यांना शाखा अभिंयंता म्हणून देणे गरजेचे आहे. आपल्याला अधिकार आहे आपल्याकडे पद रिक्त नसल्याने अडचणी येत आहे कामाच्या सोयीसाठी सेवा पाहता त्यांना पदोन्नती देण्यात यावी आणि शासनाच्या मंजूरीवर अधिन राहून त्यांना पदोन्नती देण्यास मंजुरी देण्यांत येत आहे तसेच मनपामध्ये प्रभारी पदभार सांभाळणा-या कर्मचा-यांना त्यापदावर शासन मान्यतेच्या अधिन राहून पदोन्नती देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सद्यस्थितीत वसूली विभागामार्फत नवीन घरांची आकारणी तसेच मोजमाप करण्यासाठी अजून ओव्हरसियर लोकांची गरज आहे आज शहरात ८५,०००/- मालमत्ता धारक आहेत यासाठी दोन ओव्हरसियर यांची मानधनावर नेमणूक करणेबाबत आस्थापना विभागाने तांतडीने कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-०३ ई गर्व्हनर्न्स प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वीत राहणेसाठी Post Implementation Support देण्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५ दिनांक ५/२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे म. शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. पीएमसी/ १००७/ ५४/ प्र.क्र.-२/नवि ३३, दि.२८ जुलै २००९ अन्वये,कल्याण डोंबीवली महानगरपालिकेने विकसीत केलेली संगणक प्रणाली राज्यातील सर्व ड वर्ग महानगरपालिका व नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये करणेबाबत निर्णय घेतलेला आहे.

सदर प्रकल्प कार्यान्वीत करणेकामी शासनाने कल्याण डोंबीवली महानगरपालिकेस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्त केले आहे व कल्याण डोंबीवली महानगरपालिकेने Price Water house coopers Ltd. यांना program Manager म्हणुन नियुक्त केले आहे.

कल्याण डोंबीवली महानगरपालिका, मे.Price Water house coopers Ltd. व ABM knowledge were Ltd.(कल्याणडोंबिवली महानगरपालिका यांचे Software Implementation Partner)]यांचे सहयोगाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने विकसीत केलेली संगणक प्रणाली धुळे महानगरपालिकेमार्फत राबविणेत येत आहे.

शासन निर्णय दि.२८ जुलै २००९ अन्वये, ड वर्ग महानगरपालिकेकरिता संभाव्य खर्च रु.१२३.८९ लक्ष असुन, शासनाचे अनुदान रु.९८.८९ लक्ष असुन, स्था. संस्थांचे अंशदान रु. २५ लक्ष आहे.

उक्त रक्कमेतुन शासनाकडुन सर्व्हर्स, रॅक, नेटवर्क डिव्हायसेस पीसीजी, प्रिंटर्स, ओरॅकल, विंडोज, संगणक अज्ञावली,अन्टीव्हायरस,अज्ञावलीचे प्रशिक्षण**,** (मालमत्ता कर, लेखा, पाणीपुरवठा, अन्न परवाना, बाजार परवाना, नगररचना, जन्म मृत्यू नोंद, तक्रार नोंदणी, आवक जावक,संकेत स्थळ, नागरी सुविधा केंद्र,) अज्ञावली धुळे महानगरपालिकेस देण्यांत आलेल्या आहेत.

स्थानिक संस्थेच्या अंशदानातुन (धुळे मनपाने) नागरी सुविधा केंद्र बांधणे व त्यातील फर्निचरची व्यवस्था करणे, जनरेटरची व युपीएस ची व्यवस्था करणे, सर्व्हर्ससाठी खोली बांधणे व त्यातील विद्यूतीकरण व्यवस्था करणे, सर्व्हेर्सची खोली आग प्रतिबंधक करणे, नेटवर्कसाठील लागणारे वायरींग करुन करुन घेणे, डाटा एन्ट्री करणे, संगणकाचे मुलभुत प्रशिक्षण देणे.इ. कामे केलेली आहे. यासाठी महानगरपालिकेच्या सन २०१०-११ चे अंदाजपत्रकात उक्त तक्त्यानुसार संगणकीकरणा-करिता रु.१२३.०० लक्ष तरतुद करण्यांत आली होती.

म.आयुक्त तथा संचालक,नगरपालिका प्रशासन संचालनालय,मुंबई यांचेकडील पत्र क्र. नपप्रसं/संगणकीकरण/PIS/प्र.क्र.२१/का.८,नगरपालिका प्रशासन संचालनालय, दि.२५/०८/ २०१४.चे पत्रान्वये,

ईगर्व्हनन्स प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वीत राहण्यासाठी नगरपरिषदांनाPost Implementation Support देण्याबाबत सर्व ड वर्ग महानगरपालिका व नगरपरिषदांना खालीलप्रमाणे कळविण्यांत आले आहे.

प्रस्तुत ई गर्व्हनन्स प्रकल्प सुरळीतपणे कार्यान्वीत राहण्याकरिता प्रकल्पामध्ये विहीत केलेले मोडयुल्स कार्यान्वीत केल्यानंतर सहा महिन्यांच्या Inbuilt सपोर्टनंतर सलगपणे ५ वर्षाकरिता प्रत्येक ड वर्ग महानगरपालिकांनी आणि नगरपरिषदांनी Post Implementation Support पाच वर्षाकरिता घेणे बंधनकारक आहे.

संबंधीत मनपा/नपांनी तसे हमीपत्र (Confirmation) नगरपरिषद प्रशासन संचालनालयास आणि आयुक्त, कडोंमपा यांना या पत्राच्या तारखेपासुन १५ दिवसांत सादर करणे आवश्यक आहे.

सदर Post Implementation Support च्या पाच वर्षाच्या कालावधीमधुन सुमारे एक वर्षापेक्षा अधिकचा सपोर्ट कालावधी संपलेला आहे. त्यामुळे सदर प्रकल्पातील

ज्या मनपा/ नपांना inbuilt सहा महिन्यांचा सपोर्ट नंतर दि.३१/०८/२०१४ पर्यंत सपोर्ट देण्यांत आलेला आहे. अशा मनपा/नपांना दिलेल्या सपोर्टवरील खर्चाची रक्कम त्यांनी खाली दिलेल्या तक्यातमधील प्रतिमहा दरांनुसार अदा करावयाची आहे.

| वर्ग | आर्थिक वर्ष २०१०-११ रक्कम रुपये | आर्थिक वर्ष २०११-१२ रक्कम रुपये | आर्थिक वर्ष २०१२-१३ रक्कम रुपये | आर्थिक वर्ष २०१३-१४ रक्कम रुपये | आर्थिक वर्ष २०१४-१५ रक्कम रुपये |
|---|---|---|---|---|---|
| **ड वर्ग मनपा** | ४९०४२ | ५३९४७ | ५९३४१ | **६५२७५** | **७१८०३** |

वरील सर्व दरांवर सध्या लागू असलेला सेवा कर अतिरिक्त देय असेल. सदरहु देयकाची रक्कम मे. एबीएम नॉलेजवेअर लि. यांचेकडुन संबंधीत मनपा/ नपांना कळविण्यांत आल्यानंतर सदर रक्कम मे. एबीएम नॉलेजवेअर लि. यांना दि. ३०/०९/२०१४ पर्यंत RTGS/ NEFT मार्फतच थेट अदा करावयाची आहे.

सपोर्टची रक्कम मे.एबीएम यांनादि. ३०/०९/२०१४ पर्यंत अदा न केल्यास व तसेच मे.एबीएम यांनी नगरपालिका प्रशासन संचालनालयास कळविल्यस सदर रक्कम संबंधीत मनपा/ नपांना देय असलेल्या वित्त आयोगाच्या अनुदानातुन कपात करुन मे. एबीएम यांना संचालनालयाकडुन अदा करण्यांत येईल.

कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार मे.एबीएम नॉलेजवेअर लि. १५महिन्यांचे बिल रु.११,३६,८१९/- मात्रची रक्कम अदा करण्यांस तसेच दि.०१/०९/२०१४ पासुन पुढील support करिता प्रतिवर्षी रु. १५,४६,०७१/- व Taxes, duties, levies etc. तदनंतर दि.०१/०४/२०१५ पासुन पुढील प्रत्येक वर्षी १०% वाढतील अशा खर्चास मंजुरी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच धुळे मनपामार्फत हमीपत्र (Confirmation) देणेस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच यापूर्वी प्रशिक्षण दिलेल्या कर्मचा-यांकडून संगणकीय प्रणालीचे कामकाज सुरु करावे. तसेच आवश्यकता असल्यास नव्याने तांतडीने संबंधिताना प्रशिक्षण देणेबाबत कार्यवाही करावी. याबाबत कर्मचा-यांनी मुदतीत प्रशिक्षण घेऊन संगणकीय प्रणालीव्दारे कामकाज सुरु न केल्यास प्रशासनामार्फत त्यांचे वेतन तथा वेतनवाढ बंद करण्याबाबत कडक कार्यवाही करावी. मनपाकडेस सद्यस्थितीत उपलब्ध असलेल्या संगणकाची माहिती पुढील बैठकीत सादर करणेबाबत कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-०४ कलम ४१ (२) अ,जल (प्रदुषण व नियंत्रण) अधिनियम १९७४ व कलम १५ पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ या बरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम २००० प्रमाणे निर्देश भांडवली खर्चामधुन २५% तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६ दिनांक ५/२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे कलम ४१(२)अ,जल (प्रदुषण व नियंत्रण) अधिनियम १९७४ व कलम १५पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ याबरोबर नागरी घनकचरा (व्यवस्थापन व हाताळणी)नियम २००० प्रमाणे निर्देश भांडवली खर्चामधुन२५% तरतुद नागरी घनकचरा व्यवस्थापनासाठी व सांडपाणी प्रकल्पासाठी करणेबाबत.महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ यांचेकडील क्र.मप्रनि/सहसंचालक (जप्रनि) १७२ दि.२६/१२/१४ अन्वयेची नोटीस प्राप्त झाली आहे.

ज्याअर्थी जल (प्रदुषण, प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम १९७४ अंतर्गत प्रत्येक स्थानिक स्वराज्य संस्थांवर त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये निर्माण होणारे घरगुती सांडपाणी गोळा करुन मगच त्यांची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे, योग्य ते संमतीपत्र जल व हवा (प्रदुषण,प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियमाप्रमाणे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडुन घेवुन त्यातील अटी व शर्तीची पुर्तता कालबध्द रितीने करणे बंधनकारक आहे.

तसेच संदर्भीय पत्रातील संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये कळविण्यात आले होते की, सदर पत्र आपल्या मनपा स्थायी समिती व सर्वसाधारणसभेच्या निदर्शनास आणुन द्यावे. व त्यांच्या मंजुरीने पुर्तता अहवाल ३० दिवसाच्या आत म.प्र.नि. मंडळास सादर करावा. असे कळविले आहे.

याबाबत बांधकाम विभागामार्फत शहरातील भुयारी गटारी बाबत रु.१४५.८७ कोटींचा प्रस्ताव तयार केला असुन त्यास धुळे मनपा ठराव क्र.४६ दि.२/७/२००९ रोजी मान्यता मिळाली आहे.त्या अनुषंगाने म.प्र.नि.म.यांच्या मार्फत तपासुन त्यांनी NO.MJP /CE (CP)/TACELL/UIDSSMT/४८१/ दि.८/५/१४ पत्रान्वये शासनाडे १९२, ०४, ६७,८००.००/-रु. चा प्रस्ताव शासनाकडे पाठविला आहे.

घनकचरा व्यवस्थापना बाबत कार्यवाहीसाठी मनपा अंदाजपत्रकात पुरेशी तरतुद करण्यात येवुन घनकचरा व्यवस्थापन नियम २००० अन्वये कार्यवाही सुरु आहे. मनपाची आर्थिक परिस्थिती पहाता आवश्यक पुरेशी साधनसामुग्रीसाठी शहर स्वच्छता आराखडा अंतर्गत १३.२० कोटींचा प्रस्ताव तयार करुन त्यास धुळे महानगरपालिका ठराव क्र.३२३ दि.२०/६/२०११ अन्वये मान्यता घेवुन शासनाकडे पाठविण्यात आला आहे.

मनपाची आर्थीक परिस्थिती बिकट असुन उत्पन्नाचे साधन पुरेसे नसल्याने उक्त लागणारा खर्च मनपा मार्फत करु शकत नसल्याने शासनस्तरावर अनुदानाची मागणी केली आहे. अनुदान प्राप्त होताच कामे हाती घेण्यात येईल.

मनपाच्या एकुण अंदाजपत्रकाच्या २५% रक्कम मनपा कार्यक्षेत्रातील सांडपाणी एकत्र करुन त्यावर योग्य ती परिपुर्ण प्रक्रिया करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया सहयंत्रणा बसवुन शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे तसेच मनपा कार्यक्षेत्रातील निर्माण होणारा कचऱ्यासाठी स्वतंत्र वर्गीकरण करुन त्याची विल्हेवाट लावण्यासाठी तसेच भुभराव जागासाठी तरतुद करण्याबाबतचा प्रस्ताव स्थायी समितीपुढे चर्चेसाठी आला असता सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव हा धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने सदर विषय मे. महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-०५ प्रभाग क्रं.२३ मौलवीगंज येथील सुलभ शौचालय देखभाल दुरुस्तीसाठी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७ दिनांक ५/२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे प्रभाग क्र.२३ मौलवीगंज येथील १० सीट पुरुष व २० सीट स्त्रिया असलेले शौचालय मनपा मार्फत बांधण्यात आलेले आहे. सदर शौचालय ३ वर्षापासुन तेथील रहिवासी श्री.शकील शहा नुर शहा हे साफ सफाई देखभालीचे काम करीत आहे.सदर काम करतांना ते मनपा कडुन कोणत्याही प्रकारचा मेहनताना घेत नाही. परिसरातील सर्व नागरीकांनी त्यांच्या संमतीनेच सदर शौचालय श्री.शकील शहा यांना साफसफाई करण्यासाठी दिलेले असुन आज पर्यंत श्री.शहा सदर शौचालय व्यवस्थित चांगल्या प्रकारे साफसफाई व देखभालीचे काम करीत आहे.याबाबत आजपर्यंत कोणत्याही प्रकारची तक्रार कार्यालयात किंवा वरिष्ठांकडे आलेली नाही. परंतु आता श्री.शहा यांनी

त्यांची परिस्थिती गरीबीची असल्यामुळे व एखाद्या वर्षाचा कामाचा अनुभव पहाता मासिक मेहनताना मिळणे बाबत विनंती केली आहे. तसेच सदर भागातील सन्मा.नगरसेवक व मा.उपमहापौर सो. यांनी सुध्दा पत्र देऊन सदर नागरीक श्री.शहा हे उक्त शौचालय व्यवस्थित व चांगल्याप्रकारे साफ सफाई करीत असुन त्यांचा कामाचा अनुभव व तक्रारी नसल्यामुळे मेहनताना देणे बाबत विनंती केली आहे.

मनपा हद्दीतील इतर सुलभ शौचालय मे.स्थायी समिती ठराव क्र.४ दि. २०/१२/२००७ व ठराव क्र.२२१ दि.१०/४/२००८ अन्वये खालील दराप्रमाणे साफ सफाई देखभाल दुरुस्तीसाठी विविध संस्थेंना देण्यात आलेले आहे.

१) १० सिट साठी :- ३५००/-
२) २० सीट साठी :- ५५००/-
३) ३० सीट साठी :- ७५००/-

तसेच लाईट बिलासाठी १० सीटचे एका युनिटसाठी रु.१२००/- प्रमाणे दर निश्चीत केले आहे.

सद्यपरिस्थितीत वरिल प्रमाणे विविध संस्थांना दर लागु असुन सदर शौचालयाचे वरील दरानुसार खालील प्रमाणे खर्च अपेक्षीत आहे.

| **सिट संख्या** | **साफसफाई खर्च** | **लाईटबिलखर्च** | **एकुण** |
|---|---|---|---|
| १० | ३५०० | १२०० | ४७०० |
| २० | ५५०० | १२०० | ६७०० |
| **एकुण :-** | | | ११४०० |

वरील प्रमाणे प्रति महिना एकुण रु.११४००/- खर्च अपेक्षीत असुन सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी व उक्त शौचालय संदर्भीय सन्मा.नगरसेवक व मा.उपमहापौर यांच्या पत्रानुसार श्री.शहा यांना साफसफाई व देखभाल दुरुस्तीसाठी प्रशासनाने नियमांची सांगड घालून सुरुवातीला १ वर्षासाठी देणेस मंजुरी देण्यांत येत आहे.

बचत गटांना स्वच्छतेचा ठेका दिलेल्या कार्यवाहीचा संपूर्ण सविस्तर अहवाल पुढील बैठकीत सादर करण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

## दिनांक ५/२/२०१५ रोजीच्या सभेत मे.स्थायी समितीने घेतलेले निर्णय

१) सन्मा. नगरसेवक श्री.शरद एकनाथ वराडे व श्री.अमिन पटेल यांनी कत्तनखान्याच्या दुरावस्थेबाबत प्रश्न उपस्थित करुन सदर कत्तलखान्यातून येणा-या सांडपाण्यामुळे भागातील नागरीकांच्या आरोग्यास धोका निर्माण झालेला असून याबाबत आरोग्य विभागाने कार्यवाही करणेबाबत सूचित केलेले आहे. तसेच कत्तलखान्याच्या ठिकाणी फिल्टेशन प्लॅट निर्माण केल्यास हा प्रश्न निकाली निघू शकतो. त्यासाठी २० लाख रुपये मनपामार्फत अदा करावयाचे आहे.याबाबत तांतडीने कार्यवाही करण्यासाठी सूचित केले. यावर म.सभापती यांनी सदर फिल्टर प्लॅट साठी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल आरोग्य विभागाने तांतडीने सादर करण्यांबाबत आदेशित केले.

२) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी आजतागायत मनपामार्फत अदा झालेल्या देयकांबाबत माहिती देण्यासाठी लेखा विभागाकडे पत्र दिले असता सदर माहिती अद्याप पावेतो मिळाली नसल्याचे नमूद केले. यावर म. सभापती यांनी लेखा विभागाने याबाबतची माहिती तयार करुन माझ्याकडेस सादर करण्याबाबत आदेशित केलेलें आहे.

३) सन्मा. सदस्य श्री. शरद एकनाथ वराडे यांनी नटराज टॉकीज ते वरखेडीरोड येथील रस्त्याच्या प्रलंबीत कामाबाबत तसेच श्री. अमोल मासुळे यांनी फाशी चितोडरोड येथील रस्त्यांचे खड्डे बुजविण्यांच्या प्रलंबीत कामाबाबत सूचित केले. यावर म. सभापती यांनी सदर कामाबाबत बांधकाम विभागाने तांतडीने कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले.

४) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी वसुली विभागाकडील थकीत घरपट्टी बाबत मुद्दा उपस्थित करुन एक लाखावरील थकीत घरपट्टी धारकांची यादी सादर करणेबाबत सूचित केले. यावर म.सभापती यांनी यासंदर्भातील यादया तांतडीने तयार करुन देणेबाबत आदेशित केले. तसेच सदर यादया वर्तमानपत्रात प्रसिध्द करणेपूर्वी वत्तपत्रातून याबाबत जाहीर सूचना प्रसिध्द करुन अंतिम संधी देणेबाबत तांतडीने कार्यवाही करण्यांचे आदेशित केलेले आहे.

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी २०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक १२/०२/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार,सभापती,स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री.केले चंद्रकांत काशिनाथ (केले काका) | सदस्य |
| ३ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ४ | श्री. साखला गोविंद तुळशीराम | सदस्य |
| ५ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ६ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ७ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ८ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ९ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| १० | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ११ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १२ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| १३ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १४ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा. आयुक्त |
| २. | श्री. एम.आर. सरईत | मुख्य लेखापरीक्षक |
| ३. | श्री.बी.बी. गिते | सहा. आयुक्त (अति.) |
| ४. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ५. | श्री. पी.आर. दरेवार | कार्यकारी अभियंता |
| ६. | श्री. यु.आर. भोई | उा अभियंता पा.पु. |
| ७. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ८. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| ९. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १०. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी्र अधिक्षक |
| ११. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १२. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३. | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १४. | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| १५. | श्री.बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १६ | श्री. सुनिल श्रीधर देवरे | पा.पु. अभियंता |
| १७ | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| १८ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १९ | श्री.पी.डी. नाईक | प्र.लेखापाल |

| | | |
|---|---|---|
| २० | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म. सभापती सन्मा.सदस्य अधिकारी गण, पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो. सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज.**

सन्मा. सदस्या सौ. माधुरी नंदलाल आजळकर यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८ दिनांक १२/०२/२०१५**

सन्मा.सदस्या सौ. माधुरी नंदलाल आजळकर यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांनी आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. ( दि.३१/१२/२०१४)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ०९ दिनांक १२/०२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक ३१/१२/२०१४चे ठराव नंबर १०४ ते १०७ तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७ धुळे शहरातील मालमत्तेंवर आकारण्यांत येणा-या करयोग्य मुल्यांवर आकारण्यात येणा-या करात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १० दिनांक १२/०२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे तत्कालीन धुळे नगरपालिका ठराव क्र.५२४ दिनांक १५/१२/१९९८ अन्वये दिनांक १/४/१९९९ पासुन करयोग्य मुल्यावर २४% वरुन २६% प्रमाणे मालमत्ता कराची दरवाढ करण्यात आली होती.

त्यानंतर दिनांक १७/६/२००२ रोजी करयोग्य मुल्यावर २६% वरुन २८% मालमत्ता करामध्ये वाढ करण्यासाठी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली असता त्यावर तत्कालीन म. नगराध्यक्ष, धुळे नगरपालिका यांनी २६% वरुन २८% दरवाढ लागु करणेचा प्रस्ताव विशेष सर्व साधारण सभेपुढे सादर करणेस्तव निर्देश दिले होते.तथापी शासनाने तत्कालीन धुळे नगरपालिकेचे दि.३०/०६/२००३ रोजी महानगरपालिकेत रुपांतर केले. मात्र त्यानंतर सदर विषय महासभेपुढे घेण्यात आलेला नाही.व तेव्हापासुन आजतागायत करयोग्य मुल्यावर कुठल्याही प्रकारची दरवाढ लागु करण्यात आलेली नाही.सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेचा वाढता विस्तार पाहता करयोग्य मुल्याच्या २६% दरामध्ये वाढ होणे अपेक्षीत आहे.

तरी करयोग्य मुल्यावर २६ % दरामध्ये सन १९९८ पासुन दरवाढ झालेली नाही. मात्र महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२९ (२) चे स्पष्टीकरणामध्ये महानगरपालिकेने भांडवली मुल्य हा आधार समजुन, मालमत्ता कर बसविण्याचा स्विकार केल्यानंतर,**करयोग्य इमारतीच्या संबंधातील मालमत्ता करामध्ये,** प्रत्येक पाच वर्षानंतर

सुधारणा करण्यात येईल आणि अश्याप्रत्येक सुधारणेनंतर, अशी मालमत्ता कराची रक्कम, कोणत्याही बाबतीत सुधारणा केल्याच्या वर्षाच्या लगतपुर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या व देय असलेल्या मालमत्ताकराच्या रकमेच्या चाळीस टक्क्याहुन अधिक असणार नाही. असे अधिनियमात नमुद आहे.

त्यानुसार दर पाच वर्षानंतर मालमत्ता करात वाढ करणे आवश्यक होते. तरी सन १९९८-९९ ते सन २०१४-१५या १६ वर्षात ५% वाढीप्रमाणे किमान १५% वाढीनुसार ४१% वाढ होणे आवश्यक आहे.परंतु तसे न झाल्याने दिनांक. १ एप्रील २०१५ पासुन करयोग्य मुल्यावर २६% वरुन ४१ % कर आकारणी करणे बाबतचा प्रस्ताव मे.स्थायी समिती पुढे ठेवणेसाठी दि. ११/१/२०१५ रोजी टिपणी सादर करण्यातआली होती.त्यावर म.प्र.आयुक्त सो.यांनी सदर टिपणीवर निर्देश दिले की, अधिनियमानुसार प्रत्येक ५ वर्षात ४०% पेक्षा जास्त आकारणी करु नये म्हणजे १/४/१९९९ पासुन वाढ केलेली नाही. ती तिनवेळेस करावयास पाहीजे होती. परंतु ती केली नाही. प्रत्येक वेळेस ३५% प्रमाणे तीन वेळेस १०५% वाढ होणे आवश्यक आहे. म्हणजे २६% च्या दुप्पट वाढ करणे योग्य होईल. त्यामुळे २६% वरुन५२% कर आकारणी करणेबाबतचा प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी ठेवण्यांत आला होता.

यावर उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेअंती करयोग्य मुल्यावर २६% मध्ये सन १९९८ पासून दरवाढ झालेली नाही.तथापि सद्यस्थितीत म.आयुक्त यांनी शिफारस केल्या प्रमाणे एकत्रित दरवाढ करणे हे नागरीकांच्या दृष्टीने अन्यायकारक व अवास्तव ठरणार आहे. तसेच अधिनियमाच्या दृष्टीने अशा प्रकारे करण्यांत आलेली वाढही बेकायदेशीर ठरु शकते.प्रशासनामार्फत नियमानुसार टप्प्याटप्प्याने वाढ सुचविणे आवश्यक होते. परंतु प्रशासनाने याबाबत कार्यवाही केलेली नाही. प्रशासनाच्या या प्रलबीत कार्यवाहीचा भुर्दंड नागरीकांवर एकत्रित रित्या करणे योग्य होणार नाही. तथापि मनपाच्या आर्थिक स्थितीचा विचार करता मालमत्ता कराची दरवाढ करणे हे क्रमप्राप्त तथा आवश्यक आहे. त्यामुळे नागरीकांच्या दृष्टीने विचार करता मनपा अधिनियम कलम १२९ नुसार लगतच्या वर्षापूर्वी जास्तीत जास्त ४० टक्के पेक्षा जास्त वाढ करणे योग्य होणार नाही. त्यामुळे कर योग्य मुल्यांवर २६ % वरुन ३६% मालमत्ता करात वाढ करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८ धुळे शहरातील सन १९९२-९३ पासून पुर्नमूल्यांकन न झालेल्या जुन्या मालमत्तांवर आकारण्यांत येणारे करात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ दिनांक १२/०२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सन २००७-०८ या वर्षात शासन निर्णयानुसार शहरातील सन १९९२-९३ पासुन पुर्नमुल्यांकन न झालेल्या पुर्वीच्या सर्व जुन्या मालमत्तांवर ४०% वाढ करुन मालमत्ताधारकांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे तरतुदीनुसार कार्यवाही पुर्ण करुन मागणी देयक देणेत आलेले होते.

सन १९९२-९३ पासुन शहरातील संपुर्ण मालमत्तांचे फेर आकारणीची कार्यवाही करणेत आलेली नाही. सन १९९६-९७ व सन २००१-०२ या वर्षात संपुर्ण शहरातील फेर आकारणीचे काम हाती घेणेत आले असता तत्कालीन प्राधिकृत मुल्य निर्धारण अधिकारी उपलब्ध न झाल्याने फक्त नविन मालमत्तांचे कर आकारणीची कार्यवाही करणेत आलेली आहे. तसेच सन २००४-०५ या वर्षात फक्त नविन मालमत्तांचे कर निर्धारणाचे काम करणेत आलेले आहे.

तथापि दर चार वर्षांनी करावयाची कार्यवाही, कर्मचा-यांची अपुर्ण संख्या, सन २००१-०२ चे संदर्भात शासन स्तरावरुन लांबलेली कार्यवाही यामुळे पुर्ण झालेली नाही. धुळे शहरात सद्यस्थितीत जवळ-जवळ १० ते १२हजार नविन मालमत्तांची वाढ झालेली असुन त्यांचेवर कर आकारणी केल्याचे दिसुन येत नाही.

तसेच सन २००७-०८ या वर्षात सन १९९२-९३ नंतरच्या व २००१-०२ पुर्वीच्या मालमत्तांचे पुर्नमुल्यांकन करणेत येवुन४०% कर आकारणीत वाढ करणेत आलेली आहे. तथापि धुळे शहरातील ब-याच जुन्या मालमत्तांवर नव्याने वाढीव बांधकाम करणेत आले आहे व येत आहे. त्यावर ११ कलमी कार्यक्रमांतर्गत प्रचलीत दराने सद्यस्थितीत आकारणी करणेचे काम चालु आहे.

परंतु सन १९९२-९३ पुर्वीचे जुने बांधकामांवर सन २००७-०८ या वर्षात४०% वाढ केली होती. त्यानुसार या कार्यालयामार्फत वसुलीचे काम करण्यात येत आहे. परंतु आता सन १९९२-९३ व २००१-०२ संपुर्ण जुन्या मालमत्तांवर५०% कर वाढ करणेत आल्यास महानगरपालिकेचे उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.

तसेच सन २००१ नंतरच्या मालमत्तांना प्रचलीत दराने कर आकारणी करीत असतांना जुन्या व नवीन बांधकाम कर आकारणीत मोठी तफावत असल्याने जर सन २००१ पुर्वीच्या मालमत्तांवरही ५०% वाढ केल्यास कर आकारणीतील तफावत कमी होण्यास मदत होईल व नागरिकांमध्ये नाराजी व असंदिग्धता राहणार नाही.

तरी सन.२००१ नंतरच्या मालमत्तांना प्रचलीत दराने कर आकारणी करित असतांना जुन्या व नवीन बांधकाम कर आकारणीत मोठी तफावत असल्याने सन २००१ पुर्वीच्या जुन्या मालमत्तांवर ५०% वाढ करणे बाबतचा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर करणेसाठी दिनांक २३/१/२०१५ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर म.प्र.आयुक्त सो. यांनी सदर टिपणीवर निर्देश दिले की,सन १९९२-९३ ते २००१-०२ मधील संपुर्ण जुन्या मालमत्तांवर १००% कर वाढ प्रस्तावित करणेबाबतचा प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी ठेवण्यांत आला आहे.

यावर उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेअंती मा.आयुक्त यांनी जुन्या मालमत्तावर १०० टक्के करवाढ करणेबाबत प्रस्तावित केलेले आहे.सदर बाब ही नागरीकांच्या दृष्टीने अवास्तव व अन्यायकारक ठरणार आहे. तथापि सन १९९२-९३ पासून शहरातील संपूर्ण मालमत्तांची फेर आकारणीची कार्यवाही झालेली नाही.त्यामुळे सन २००१ नंतरच्या मालमत्तांना प्रचलीत दराने कर आकारणी करीत असतांना जुन्या वर नवीन बांधकाम कर आकारणीत मोठी तफावत असल्याने सन २००१ पूर्वीच्या जुन्या मालमत्तावरील पुर्नमूल्यांकनात आकारण्यांत येणा-या करात एकदम वाढ करणे हे नागरीकांच्या दृष्टीने अन्यायाचे व अवास्तव ठरणार आहे. तथापि मनपाची आर्थिक स्थिती लक्षांत घेता सन १९९२-९३ ते २००१ - २००२ मधील संपूर्ण जुन्या मालमत्तावरील पुर्नमुल्यांकनात ५०% वाढ करण्यांस मंजुरी देण्यांत येत आहे. सदर निर्णयाबाबत सन्मा. सदस्य श्री . नरेंद्र परदेशी व सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी विरोध नोदविला आहे. त्यांचा विरोध नोदवून सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

**बहुमताने मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-९ शहरातील नवीन बांधकाम व वाढीव बांधकामांना कर आकारणी करताना यापूर्वी मंजूर केलेल्या झोननुसार असलेल्या दरात वाढ करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक १२/०२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहरातील नवीन बांधकाम व वाढीव बांधकाम जागांचे शोध घेऊन सन २०१४-१५ या वर्षात सुमारे ५००० चे वर मालमत्ता आढळुन आल्या आहेत.

यापुर्वी सुमारे ११७३७ पर्यंत अशा मालमत्ता आढळुन आल्या होत्या. तसेच सन २००७ मध्ये धुळे शहराचे तीन झोन पाडण्यात येऊन त्या-त्या झोन प्रमाणे खालीलप्रमाणे दर निश्चित करण्यात आले असुन त्या-त्या भागातील खालीलप्रमाणे दर मनपा ठराव क्र.१२५दि.११/११/२००५अन्वये ठरविण्यात आले असुन शासनाने शासन पत्र मनपा-१०२००४ /प्रक्र/१७७/नवि-२०दिनांक ५/४/२००७ अन्वये मंजुरी दिलेली आहे.सदर दर हे खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | झोन नं. | आर.सी.सी. रुपये प्रती चौ. मी. | लोडबेरींग रुपये प्रती चौ.मी. | पत्र्याचे घर रुपये प्रती चौ.मी. | झोपडपट्टी रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १६ रु. | १२ रु. | ०८ रु. | ०६ रु. |
| २ | २ | १४ रु. | १० रु. | ०७ रु. | ०४ रु. |
| ३ | ३ | १२ रु. | ०८ रु. | ०६ रु. | ०४ रु. |

उक्त दरानुसार मे. स्थायी समितीने ठरवुन दिलेल्या दरानुसार सन २०१२-१३ व २०१३-१४ या वर्षात धुळे शहरातील नवीन बांधकाम व वाढीव बांधकामांवर कर आकारणी करण्यात येत होती. परंतु नगररचनाकार यांनी सन २००९-१० ते २०१२-१३ या वर्षी ठरवुन दिलेल्या दरांमध्ये दरवर्षी ५% दरवाढ केल्यास महानगर पालिकेच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे. तरी दरवर्षानुसार ५% दरवाढ केल्यास सन २०१५-१६ या वर्षात खालील तक्त्याप्रमाणे दरवाढ दिसुन येते.

**सन- २०१५.१६ करिता**

| अ.नं. | झोन नं. | आर.सी.सी. रुपये प्रती चौ.मी. | लोडबेरींग रुपये प्रती चौ.मी. | पत्र्याचे घर रुपये प्रती चौ.मी. | झोपडपट्टी रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | २३.६२ | १७.७० | ११.८१ | ०८.८२ |
| २ | २ | २०.६६ | १४.८६ | १०.३० | ०५.८९ |
| ३ | ३ | १७.७० | ११.८१ | ०८.८२ | ०५.८९ |

तरी उक्तप्रमाणे सन २०१५-१६ पावेतो सदर दरांमध्ये दरवर्षी ५% दरवाढ करणेस मे.स्थायी समितीपुढे सदरचा प्रस्ताव सादर करणेसाठी दिनांक १३/१/२०१५ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करण्यात आली होती. त्यावर म. प्र.आयुक्त सो. यांनी सदर टिपणीवर खालीलप्रमाणे वाढ प्रस्तावित केली आहे.

| अ.नं. | झोन नं. | आर.सी.सी. रुपये प्रती चौ.मी. | लोड बेरींग रुपये प्रती चौ.मी. | पत्र्याचे घर रुपये प्रती चौ.मी. | झोपडपट्टी रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | २४ | १८ | १२ | ९ |
| २ | २ | २१ | १५ | १० | ६ |
| ३ | ३ | १८ | १२ | ९ | ६ |

याप्रमाणे वाढ प्रस्तावित करणेबाबतचा प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे निर्णयासाठी ठेवण्यांत आला आहे.

उपस्थित सदस्यांनी त्यावर विस्तृत चर्चा करुन चर्चेअंती सन २००७-०८ मध्ये मान्यता दिलेल्या दरांत वर्षनिहाय वाढ न करता खालील प्रमाणे एकत्रितरित्या ४० % वाढ करण्यास मंजुरी देण्यांत येत आहे.

| अ.नं. | झोन नं. | आर.सी.सी. रुपये प्रती चौ.मी. | लोड बेरींग रुपये प्रती चौ.मी. | पत्र्याचे घर रुपये प्रती चौ.मी. | झोपडपट्टी रुपये प्रती चौ.मी. |
|---|---|---|---|---|---|

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | १ | २२.४० | १६.८० | ११.२० | ८.४० |
| २ | २ | १९.६० | १४.०० | ९.८० | ५.६० |
| ३ | ३ | १६.८० | ११.२० | ८.४० | ५.६० |

तसेच यापूर्वी म. नगररचनाकार यांनी पूर्वीच्या रेडिरेकनर नुसार शहराचे अ,ब,क असे झोन निश्चित केलेले होते. तथापि सद्यस्थिती लक्षांत घेऊन नव्याने झोन निश्चित करणे आवश्यक आहे.त्यामुळे याबाबत तांतडीने म.नगररचनाकार यांचेकडून त्याबाबत अहवाल घेऊन मे. स्थायी समितीपुढे स्वतंत्र रित्या याबाबत प्रस्ताव सादर करण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**दिनांक १२/०२/२०१५ रोजीच्या स्थायी समितीतील झालेले निर्णय**

१) सन्मा. सदस्य श्री. अमोल मासुळे यांनी सद्यस्थितीत धुळे महानगरपालिकेमार्फत उत्पन्न वाढीच्या दृष्टीने शहरातील सर्व व्यावसायीक मालमत्तांची मोजणी करुन त्यांना व्यावसायीक मालमत्ता कर लागू करणेबाबत व्यापक स्वरुपात मोहिम मा. सभापती यांच्या माध्यमातून हाती घेण्यांत आलेली आहे. सदर मोहिमेसाठी कर्मचारी अपूर्ण पडत असल्याने मनपाच्या विविध विभागातील अतिरिक्त असलेल्या कर्मचा-यांना वसुली विभागाकडेस वर्ग करणेची मागणी केली.

सदर मोहिमेसाठी सात पथकांची नियुक्ती करण्यांत आलेली आहे.तथापि मोहिमेचे व्यापक स्वरुप व व्याप्ती लक्षांत घेता यासाठी अतिरिक्त मनुष्यबळाची आवश्यकता आहे.सदर मोहिमेत होणा-या कार्यवाहीमुळे मनपाच्या उत्पन्नात लक्षणीय वाढ होणार आहे. मनपाची आजची आर्थिक स्थिती लक्षांत घेता सदर मोहिम सक्रीय करणे आवश्यक आहे.त्यामुळे मनपाच्या विविध विभागातील कार्यरत असणा-या आवश्यक कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त अन्य अधिकारी तथा कर्मचारी यांना या मोहिमेसाठी वसुली विभागाकडेस वर्ग करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. यासंदर्भात आस्थापना विभागाने तांतडीने याबाबत संबंधित विभाग प्रमुखांकडून अहवाल घेऊन कर्मचारी वर्ग करणेसंदर्भात कार्यवाही करावी. तसेच वर्ग करण्यांत आलेल्या कर्मचा-यांना कामावर तांतडीने हजर होणेबाबत नियुक्ती आदेशात मुदत देण्यांत यावी. मुदतीनंतर हजर न झालेल्या कर्मचा-यांवर तात्काळ नियमानुसार कायदेशीर कार्यवाही करण्यांत यावी.

२) सन्मा.सदस्या सौ.प्रतिभाताई चौधरी यांनी मागील सभेत संगणकाबाबत संपूर्ण माहिती पुढील बैठकीत सादर करण्याबाबत झालेल्या निर्णयानुसार आजच्या बैठकीत माहिती उपलब्ध झालेली नाही. यासंदर्भात संगणक विभागाने पुढील बैठकीत सविस्तर संपूर्ण माहिती स्थायी समितीपुढे सादर करण्यांचे मा. सभापती यांनी आदेशित केले आहे. तसेच वसुली विभागामार्फत सद्यस्थितीत सुरु असलेल्या मोजमापाची माहिती संगणकांत संकलीत करणेबाबत आदेशित केले आहे.

३) सन्मा सदस्य श्री.रमेश बोरसे यांनी वाडीभोकर रस्त्यावरील खड्डे अद्याप पावेतो बुजले गेले नसल्याबाबत सुचना मांडली.त्यावर बांधकाम विभागाने तांतडीने त्यांचे अंदाजपत्रक तयार करुन उचित कार्यवाही करण्याबाबत मा.सभापती सो. यांनी आदेश दिलेत.

४) सन्मा.सदस्य श्री.अमोल मासुळे यांनी विद्युत विभागातील कर्मचारी श्री. महादू गोरख जाधव यांना वायरमन पदाची वेतनश्रेणी लागू करणेबाबत यापूर्वी ठराव पारीत करण्यांत आलेला होता. तथापि याबाबत कोणतीही कार्यवाही प्रशासनामार्फत करण्यांत आलेली नसल्याचे सूचित केले. यासंदर्भात आस्थापना विभागाने तांतडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत मा. सभापती सो. यांनी आदेश दिलेत.

**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**बुधवार दिनांक ४ मार्च, २०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज बुधवार दिनांक ०४/०३/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार, सभापती, स्थायी समिती,धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्रीमती अजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ६ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ७ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ८ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ९ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| १० | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ११ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १२ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १३ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा.आयुक्त |
| ३. | श्री. एम.आर. सरईत | मुख्य लेखापरीक्षक |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री.बी.बी. गिते | सहा. आयुक्त (अति.) |
| ६. | श्री. पी.आर. दरेवार | कार्यकारी अभियंता |
| ७. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ९. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| १०. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ११. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १२. | श्री. आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १३. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १४. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १५. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी अधिक्षक |
| १६ | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १७ | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १८ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १९ | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| २० | श्री.बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| २१ | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |

| | | |
|---|---|---|
| २२ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| २३ | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म. सभापती सन्मा.सदस्य अधिकारी गण, पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो. सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दाजलीची यादी

१) धुळे मनपाचे उपायुक्त श्री.एच.पी. कवठळकर सो यांच्या मातोश्री श्रीमती शांताबाई पितांबर कवठळकर वय ८५ यांचे दि. ३/३/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे.

२) धुळे मनपाचे जेष्ठ नगरसेवक श्री. फिरोज बशीर शेख यांचे पिताश्री श्री. बशीर अब्दुल्ला शेख निवृत्त पोलिस जमादार यांचे दि. ९/२/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे.

३) धुळे मनपा महापौरांचे स्वीय सहाय्यक श्री. महेद्र शिरपूरकर यांच्या मातोश्री श्रीमती सरस्वतीबाई बाबुराव शिंपी यांचे दि. २६/२/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे. वरील मान्यवरांचा आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, नगरसेविका, मनपा धुळे

४) धुळे मनपाचे उपायुक्त श्री.एच.पी.कवठळकर सो.हयांच्या मातोश्री तसेच तत्कालीन नगरपालिका शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शांताबाई पिंताबर कवळकर हयांचे नुकतेच दु:खद निधन झाले. तसेच मनपा स्विय सहाय्यक श्री.महेद्र शिरपूरकर यांच्या मातोश्री श्रीमती सरस्वतीबाई बाबुराव शिंपी यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे. वरील मान्यवरांचा आजच्या सभेत श्रध्दांजली अर्पण करुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

सुचक :- श्री. शरद एकनाथ वराडे, सदस्य, मनपा, धुळे

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३ दिनांक०४/०३/२०१५**

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार धुळे मनपाचे उपायुक्त श्री.एच.पी. कवठळकर सो यांच्या मातोश्री तसेच तत्कालीन नगरपालिका शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती शांताबाई पितांबर कवठळकर वय ८५ यांचे दि. ३/३/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे. तसेच धुळे मनपाचे जेष्ठ नगरसेवक श्री. फिरोज बशीर शेख यांचे पिताश्री श्री. बशीर अब्दुल्ला शेख निवृत्त पोलिस जमादार यांचे दि.९/२/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे. धुळे मनपा महापौरांचे स्वीय सहाय्यक श्री.महेद्र शिरपूरकर यांच्या मातोश्री श्रीमती सरस्वतीबाई बाबुराव शिंपी यांचे दि. २६/२/२०१५ रोजी दु:खद निधन झाले आहे.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत ही सभा त्यांचे कुटुबिंयांचे दु:खात सहभागी असून मृत आत्मांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज.**

सन्मा. सदस्य श्री. गोविंद तुळशीराम साखला यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १४ दिनांक ०४/०३/२०१५**

सन्मा.सदस्य श्री. गोविंद तुळशीराम साखला यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांनी आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांकडून आलेला अभिनंदनाचा ठराव**

**१)** हिंदू धर्मात गायीला माता आणि संस्कृतिचे प्रतिक मानून तिची पुजा केली जाते. तसेच गायीची पुजाही केली जाते. त्यामुळे सरकारने महाराष्ट्र पशु संरक्षण (सुधारणा) कायदा १९९५केला. त्यात केंद्र सरकारने सुधारणा करुन मंगळवार पासून राज्यात गोवंश हत्याबंदीचा निर्णय लागु करण्यांत आला.

सरकारच्या या महत्वपूर्ण निर्णय घेतल्याबाबत केद्राचा आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये अभिनंदनाचा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे, नगरसेवक, मनपा धुळे

म. सभापती — सन्मा. सदस्य श्री. बन्टीभाऊ मासुळे यांनी चांगला प्रस्ताव मांडला आहे. हिंदू धर्मात गायीला माता आणि संस्कृतिचे प्रतिक मानून तिची पुजा केली जाते. तसेच गायीची पुजाही केली जाते. महाराष्ट्र सरकारने पशु संरक्षण ( सुधारणा) कायदयात सुधारणा करुन राज्यात गोवंश हत्याबंदीचा निर्णय घेतल्याबद्दल महाराष्ट्र व केंद्र शासनाचा अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजुर करण्यात येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १५ दिनांक ०४/०३/२०१५**

हिंदू धर्मात गायीला माता आणि संस्कृतिचे प्रतिक मानून तिची पुजा केली जाते. तसेच गायीची पुजाही केली जाते. त्यामुळे सरकारने महाराष्ट्र पशु संरक्षण (सुधारणा) कायदा १९९५केला. त्यात केंद्र सरकारने सुधारणा करुन मंगळवार पासून राज्यात गोवंश हत्याबंदीचा निर्णय लागु करण्यांत आला.

सरकारच्या या महत्वपूर्ण निर्णय घेतल्याबाबत केद्र शासनाचा अभिनंदनाचा ठराव एकमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे ुळे**

**२)** धुळे शहरासाठी नगरोत्थान योजनेअंतर्गत शहरातील प्रमुख्य डी.पी. रस्त्यांच्या नुतनीकरणासाठी सुमारे ४४ कोटींचा प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यांत आलेला होता.सदर प्रस्तावाच्या मान्यतेसाठी शहराचे माजी आमदार श्री. राजवर्धनजी कदमबांडे तसेच मा.महापौर सौ.जयश्रीताई अहिरराव व आयुक्त श्री.धनाड साो. यांनी शासनाकडेस वांरवांर पाठपुरावा केला आहे. त्याबद्दल त्यांचे अभिनंदनाचा ठराव करण्यांत यावा.

**सुचक :- मा. श्री. चंद्रकांत बापू सोनार, सभापती स्थायी समिती, मनपा धुळे**

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १६ दिनांक ०४/०३/२०१५**

धुळे शहरासाठी नगरोत्थान योजनेअंतर्गत शहरातील प्रमुख्य डी.पी.रस्त्यांच्या नुतनीकरणासाठी सुमारे ४४ कोटींचा प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यांत आलेला होता. सदर प्रस्तावाच्या मान्यतेसाठी शहराचे माजी आमदार श्री. राजवर्धनजी कदमबांडे तसेच मा. महापौर सौ. जयश्रीताई अहिरराव व आयुक्त श्री. धनाड साो. यांनी शासनाकडेस वांरवांर पाठपुरावा करुन सदर विषयाच्या मान्यतेसाठी प्रयत्न केलेले आहे. नुकत्याच मुंबई मंत्रालय येथे झालेल्या शासन स्तरावरील बैठकीत या प्रस्तावास मान्यता मिळालेली आहे. शहराच्या

दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण असणा-या या प्रस्तावाच्या यशस्वीतेसाठी शहराचे माजी आमदार श्री. राजवर्धनजी कदमबांडे तसेच मा. महापौर सौ. जयश्रीताई अहिरराव व आयुक्त श्री. धनाड सो.यांचे अभिनंदन आजच्या बैठकीत करण्यांत येत असून तसा ठराव पारीत करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- १० मागील स्थायी समितीचे सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
( दि.३१/१/२०१५,५/२/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १७ दिनांक ०४/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समितीचे सभा

१) दिनांक ३१/१/२०१५ रोजीच्या सभेतील ठराव नंबर १ ते २ तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

२) दिनांक ५/२/२०१५ रोजीच्या सभेतील ठराव नंबर ३ ते ७ तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ११ श्री.एस.जी.खरात शिपाई जकात विभाग यांना जा.क्रं. धुमपा आस्था/९९१ दि.१५/१२/२०१२ अन्वयेच्या आदेशात नमूद कारणास्तव मनपा सेवेतून निलंबीत करण्यांत आले होते. तदनंतर निलंबीत प्रकरणी चौकशी अंती श्री.एस.जी. खरात शिपाई यांची एक वेतनवाढ दोन वर्षासाठी रोखून ठेवणेबाबत जा.क्रं.धुमपा/आस्था/७४४दि.१/१०/२०१४अन्वये शास्ती करण्यांत आली होती.त्यावर श्री.खरात शिपाई यांनी दि.२/२/२०१५ रोंजी अर्ज देऊन शास्ती माफ करण्या बाबत विनंती केली आहे. त्यावर आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १८ दिनांक ०४/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे म. सभापती स्थायी समिती,धुळे यांच्याकडेस श्री. सुनिल गोविंद खरात यांनी निलंबीत प्रकरणी चौकशी अंती झालेली शास्ती माफ होणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.सदर कर्मचा-यांचे अपील अर्ज म.सभापती स्थायी यांच्याकडून इकडील कार्यालयास प्राप्त झालेले आहे.

| अ.क्रं. | कर्मचा-यांचे नांव | हुद्दा | विभाग | दंडाचे स्वरुप | दंड केल्याचा क्रमांक दिनांक | सभापती स्थायी समिती यांचेकडेस अर्ज सादर केल्याचा दिनांक | दंड केल्यानंतर अर्ज सादर केल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. सुनिल गोविद खरात | शिपाई | जकात | एक वेतनवाढ दोन वर्षासाठी रोखून ठेवली | जा.क्रंआस्था ७४४दि. १/१०/२०१४ | २/२/२०१५ | ९२ दिवस |

मुंबई प्रांतिक मनपा अधिनियमानुसार कर्मचा-यांस शास्ती केल्यानंतर त्यावर अपीलाची खालील प्रमाणे मुदत आहे.

१)मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९चे कलम ५६(४) नुसार कोणत्याही शास्तीविरुध्द अपील करण्याची मुदत ३० दिवस आहे.

२)महाराष्ट्र नागरी सेवा नियम १९७९ शिस्त व अपिल नियम क्रं.१९ नुसार ज्या आदेशाविरुध्द अपील करण्यांत आले असेल त्या आदेशाची प्रत अपीलकर्त्याला मिळालेल्या तारखेपासून

४५दिवसांच्या कालावधीत असे अपील केले नाही तर या भागामध्ये करण्यांत आलेले कोणतेही अपील विचारात घेतले जाणार नाही.

उक्त नुसार श्री. सुनिल गोविंद खरात शिपाई यांचा विनंती अर्ज वरील नियमानुसार मुदत बाहय आहे.

तथापि श्री.खरात यांनी सदर अपीलाबाबत विलंब माफी बाबतचा अर्ज सादर केला असल्याने त्यांची एक वेतनवाढ दोन वर्षासाठी राखून ठेवणेबाबतची शास्ती माफ करण्या बाबतचा विषय म.स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत कार्यालय अधिक्षक यांनी सादर केला असता त्यावर म.उपायुक्त साो.यांनी मुदत बाहय अपील आहे. तरी स्थायी समितीच्या निर्णयार्थ सादर असा अहवाल प्रशासनामार्फत सादर करण्यांत आलेला होता.

यावर झालेल्या चर्चेनुसार श्री.खरात यांनी मुदतीत अपील दाखल केलेले नाही. तथापि त्यांच्या दिर्घकालीन सेवेचा विचार करता व त्यांची ही प्रथमच चुक असल्याने प्रशासनामार्फत प्रस्तावित केलेली शास्ती रद्द करुन त्याऐवजी रुपये ५००/- दंड करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-१२ धुळे शहर भुयारी गटार योजना तसेच अक्कलपाडा धरणातून पुरक पाणीपूरवठा योजना जलदगतीने मंजुरी घेऊन राबविणे यासाठी सक्षम प्रकल्प व्यवस्थापन (पीएमसी)ची इ. निविदेव्दारे नव्याने नेमणूक करणेसाठी आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १९ दिनांक ०४/०३/२०१५**

धुळे शहरासाठी UIDSSMTअंतर्गत भुयारी गटार योजना राबविणे मे. स्थापत्य कन्स्टलटंट सर्व्हीसेस धुळे यांना जा.क्र २००७-०८ ११६/दिनांक१६/६/२००८ अन्वये कार्यादेश देण्यांत आला होता.त्यानुसार त्यांनी धुळे शहराचा भुयारी गटार प्रस्ताव अंदाजपत्रकीय रक्कम रु.१४५.८७ कोटीचा तयार केला होता.उक्त प्रस्तावास धुळे मनपा ठराव नं ४६ दि. २/७/२००९ अन्वये आर्थिक व प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्यांत आली आहे.उक्त प्रस्तावास मा.मुख्य अभियंता महाराष्ट्र जिवन प्राधिकरण यांनी जा.क्र. ८९१ दिनांक १०/३/२०१० अन्वये रु. १३१.३७ कोटी रु.तात्रिक मान्यता दिली आहे. त्यानुसार प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी डायरेक्टर म्युनिसपल ॲडमिनिटेशन वरळी मुंबई यांचेकडेस पुढील मंजुरीसाठी पाठविण्यांत आला होता. त्यानुसार दि.२६ मार्च २०१० च्या SLSR च्या बैठकीत मान्यता मिळवून प्रस्ताव दि.१३/४/२०१० रोजी The Advisor] CPHEEO यांचेकडेस ( नविदिल्ली) पाठविण्यांत आला होता. परंतु त्यांनी प्रस्तावास मंजुरी प्रदान केलेली नाही.

उक्त बाबत प्रस्तावास पुन्हा सन २०१३-१४ च्या मजिप्रा दरसूची नुसार प्रस्ताव रु. २०१.७५कोटी रु.झाला.उक्त प्रस्तावास मा.मुख्य अभियंता, म.जि.प्रा.मुंबई यांनी त्यांचे कडील पत्र क्रं. UIDSSMT/४८१/दि.८/५/२०१४ रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे. त्यानुसार प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी दि.८/५/२०१४रोजी मे.डायरेक्टर म्युनिसिपल ॲडमिनीस्टेशन मुंबई यांचेकडेस SLSR च्या बैठकीत घेणेसाठी पाठविण्यांत आलेला आहे. परंतु उक्त बाबतमा.श्री.अनिल मुठे उप संचालक नगरपरिषद संचालनालय मुंबई यांनी त्यांचेकडील पत्र क्रं नपाप्रस/२०१४ UIDSSMT/धुळे/संक्र.३७५८/का १३ दि.४ जून २०१४ रोजी धुळे शहराचा भुयारी गटार योजनचा प्रस्ताव इतर योजना अथवा अभियाना अंतर्गत घेण्यांत यावा असे कळविले आहे. उक्त प्रस्तावास अजून मंजुरी दिलेली नाही.

उक्त बाबत प्रस्तावास गती मिळत नसल्याने प्रस्ताव प्रलंबीत आहे.

उपरोक्त संदर्भानुसार कन्सलंट श्री. अविनाश पाटील हे आवश्यक तेवढा वेळ व पाठपुरावा करत नसल्याबाबत मा. सभापती स्थायी समिती यांनी दि.२३/२/२०१५ रोजी पत्र दिलेले आहे.व प्रस्तावास नवीन कन्सलटंट नेमण्याची मागणी केलेली आहे.

त्यानुसार प्रस्ताव निणयार्थ स्थायी समितीपुढे आलेला आहे त्यासंदर्भात झालेल्या चर्चेनुसार सदर योजना ही शहरासाठी अत्यंत महत्वपूर्ण योजना असून भविष्याच्या दृष्टीने आवश्यक आहे व त्यासाठी सदर योजनेची कार्यवाही तथा मान्यता जलदगतीने होणे आवश्यक आहे.यापूर्वी नियुक्त प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांनी याकामी आवश्यक तो पाठपुरावा तथा प्रयत्न केलेला नसल्याने योजनेच्या कालावधी व प्रकल्प खर्चात वाढ झालेली आहे.सदर योजनेची अंमलबजावणी व कार्यवाही जलदगतीने व्हावी यादृष्टीने या योजनेसाठी उक्त प्रस्तावास मा.मुख्य अभियंता, म.जि.प्रा.मुंबई यांनी त्यांचे कडील पत्र क्रं. UIDSSMT /४८१/दि.८/५/२०१४ रोजी तांत्रिक मान्यता दिलेली आहे.त्यानुसार प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी दि.८/५/२०१४ रोजी मे.डायरेक्टर म्युनिसिपल ॲडमिनीस्टेशन मुंबई यांचेकडेस SLSR च्या बैठकीत घेणेसाठी पाठविण्यांत आलेला आहे.प्रस्तावास पुढील आवश्यक त्या मंजु-या घेणे व योजनचे पुढील कामकाजाचे देखरेख करणेसाठी नवीन तांत्रिक सल्लागार( पी.एम.सी.) नेमणूक करण्यांस व त्यादृष्टीने प्रशासनामार्फत आवश्यक ती नियमानुसार पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच यापूर्वी नियुक्त मे. स्थापत्य कन्स्टलटंट सर्व्हीसेस धुळे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांची नियुक्ती रदद करण्यांत येत आहे.

तसेच धुळे शहर वाढीव पाणी पुरवठा योजना अंतर्गत अक्कलपाडा धरणातून थेट हनुमान टेकडी पर्यत पाईप लाईन टाकणे प्रस्तावित आहे. सदर योजना ही शहराच्या दृष्टीने अंत्यत महत्वपूर्ण व आवश्यक असल्याने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणेस व त्यादृष्टीने प्रशासनामार्फत आवश्यक ती नियमानुसार पुढील कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**दिनांक ४/०३/२०१५ रोजीच्या मे. स्थायी समितीच्या बैठकीत घेण्यांत आलेले निर्णय.**

१) सन्मा.सदस्य श्री. नरेंद्र गोटू परदशी नगरसेवक यांच्या पत्रानुसार चर्चेसाठी ठेवण्यांत आलेला प्रस्ताव मनपा हद्दीतील इले. पोल डी.पी.सब स्टेशन व अनुषंगिक बाबीमुळे व्यापलेल्या जागेला मालमत्ता कर आकारणी करणे व भाडेपट्टा आकारणे याबाबत विचार करणे.

म.नगरसचिव — यासंदर्भात प्रशासनामार्फत वसूली व नगररचना विभागामार्फत सादर झालेल्या कार्यालयीन अहवालाचे वाचन करण्यांत आले.

म. नरेंद्र परदेशी — म. सभापती यांनी मनपाच्या उत्पन्न वाढीसाठी वसुली विभागामार्फत जो काही उपक्रम राबविला आहे. त्याचे मी सर्व प्रथमअभिनंदन करतो. मनपाच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने मी हा प्रस्ताव सादर केलेला आहे. मनपाची परिस्थिती हलाखीची असतांना इतर सरकारी कार्यालयाचे आपण देणे लागतो पाणी पट्टीचा विषय स्थायी समिती मध्ये आला असता शहराला वेठीस धरले जाते आठ दिवसातून विज मंडळाच्या अधिकाऱ्यांनी पाण्याची विज लाईन कट करुन टाकली ते कुठल्याही प्रकारे विचार करीत नाही आपली तर होलसेल ॲथॉरीटी आहे पालिकेचे काय धोरण करावयाचे ते नियम आपण तयार करतो त्यादृष्टीने हा जो विषय आहे विज मंडळ एक लक्ष स्क्वेअर मिटर जागा आपली वापरत आहे. टेलिफोन वाल्यांचे पण तसेच आहे ते एक लाख चौरस मिटर जागा विना परवानगीने वापरत असतांना भाडेपट्टीने जागा मनपा नियमा नुसार देऊ शकतो. त्यांच्यावर याप्रमाणे कारवाई करावी.शासनाचे राजपत्रातील निर्देश व नियम आहेत.त्या नियमानुसार २० जानेवारी २००६ कलम ५ पाचवा भाग मी वाचून दाखवितो ते अनुषंगिक आहे ती जागा भाडेपट्टीने देता येईल त्या जागेला कर जागा भाडे लावावे असा ठराव करणे गरजेचे आहे आपण बखळ जागेचा ठराव केला आहे आणि जे दर त्या दरा नुसार

भाडे ठरवावयाचे आहे आणि मनपाचे उत्पन्न वाढवावयाचे आहे. मनपा शहर हद्दीतील असलेल्या विद्युत पोल, तसेच डी.पी. तसेच सबस्टेशन व अनूषंगिक बाबीमुळे व्यापलेल्या जागेवर मालमत्ता कर आकारणी तसेच वाजार भावानुसार भाडेपट्टा आकारणी करणे बाबत आजच्या बैठकीत निर्णय घेऊन त्यानुसार प्रशासनाने कार्यवाही करावी. विद्युत कंपनी ही व्यावसाईक कंपनी आहे. नागरीकांना त्यांच्या नियमानुसार विजेचे दर लावून विद्युत आकारणी सदर कंपनी मार्फत केली जाते. भाडेपट्टया लावणे व मालमत्ता कर वसूल करणे ही मनपाच्या आर्थिक स्त्रोताच्या निगडीत बाब असून मनपाच्या उत्पन्नात निश्चित वाढ होणार आहे. याकामी तांतडीने निर्णय घेण्यांत यावा.

म. सभापती श्री.नरेंद्र परदेशी यांनी अतिशय चांगला विषय सभागृहासमोर आणलेला आहे. यापूर्वी मी सभापती झाल्यानंतर घेतलेल्या बैठकीत विद्युत कंपनी मार्फत नागरीकांसाठी पुरविण्यांत येणारी वीज ही बाहेरुन आयात केली जाते. त्यावर एल.बी.टी. लावणेच्या पर्यायाचाही विचार करुन त्याअनुषंगाने कार्यवाही करणेबाबत आदेशित केलेले होते. मनपा उत्पन्न वाढीच्या दृष्टीने अशा प्रकारचे निर्णय होणे आवश्यक आहे. मनपा हद्दीतील इलेक्ट्रीक पोल, डी.पी. सबस्टेशन, व अनुषंगिक बाबीमुळे व्यापलेल्या जागेवर मालमत्ता आकारणी करणे तसेच शहरातील बाजार भावानुसार सदर जागेचा भाडेपट्टा दर ठरवून त्यानुसार आकारणी करणे याबाबत प्रशासनाने नियमांची खात्री करुन त्यानुसार तांतडीने कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे. तसेच विद्युत कंपनीकडून एल.बी.टी. वसूल करता येईल किंवा कसे याबाबतही नियमानुसार कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

२) सन्मा. सदस्य श्री. अमोल पावबा मासुळे यांनी विद्युत विभागाकडील वायरमन श्री. महादू गोरख जाधव यांना वायरमन पदाची वेतनश्रेणी लागू करणेबाबत यापूर्वी ठराव पारीत करण्यांत आलेला होता. याबाबत आस्थापना विभागामार्फत अद्याप पावेतो कोणतीही कार्यवाही झालेली नसल्याचे सूचित केले. यासंदर्भात आस्थापना विभागाने तांतडीने आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत मा. सभापती सो. यांनी आदेश दिलेत

३) मा.सभापती यांनी त्यांच्या प्रभागातील विस्कळीत व अनियमित पाणीपुरवठयासंदर्भात भागातील व्हॉलमन श्री. हंसराज माळी (गणपत) यांच्या मनमानी कारभारामुळे नागरीकांना मोठयाप्रमाणावर त्रास सहन करावा लागत असून याबाबत वृत्तपत्रातही वृत्त प्रसिध्द झाल्याचे सूचित करुन त्यांच्यावर कारवाई करण्यांचे आदेशित केले. त्यानुसार प्रशासनाने त्याबाबत तांतडीने संबंधितांवर कार्यवाही करण्याबाबत मा.सभापती यांनी आदेशित केलेले आहे.

**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक१९ मार्च, २०१५**
**वेळः- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक १९/०३/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार,सभापती, स्थायी समिती,धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्रीमती अजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ६ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ७ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ८ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ९ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| १० | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ११ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १२ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.व्ही. धनाड | प्र. आयुक्त तथा अति.आयुक्त |
| २. | श्री. डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ३. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा.आयुक्त |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त |
| ५. | श्री.बी.बी. गिते | सहा.आयुक्त (अति.) |
| ६. | श्री. पी.आर. दरेवार | कार्यकारी अभियंता |
| ७. | श्री.एस.बी. विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ८. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ९. | श्री. के.ना. कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| १०. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ११. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १२. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १३. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी्र अधिक्षक |
| १४. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १५. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. यु.आर. भोई | उपअभियंता |
| १७ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १८ | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| १९ | श्री.सी.सी.बागुल | ओव्हरसिअर |
| २० | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| २१ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| २२ | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

| | | |
|---|---|---|
| २३ | श्री.तुषार ढाके | अग्नीशमन विभाग |

म. सभापती:-सन्मा.सदस्य अधिकारी गण,पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव :-वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**दिनांक १९/३/२०१५ रोजीच्या स्थायी समिती सभेत झालेली चर्चा व त्यावरील निर्णय.**

**१) युडीआयएसएसएमटी योजनेतील अनियमितता व गैरव्यवहाराबाबत सन्मा. सदस्यांनी केलेली चर्चा.**

म. अमीन पटेल — धुळे शहरासाठी १३६ कोटी रुपयांची पाणी पुरवठा योजना मंजूर झालेली आहे. सदर योजनेचे सुमारे ७ कोटी रुपयांचे बिले संबंधित ठेकेदाराला अदा करण्यांत आले आहे. संबंधित बिलावर कोणत्याही ओव्हरसिअरची स्वाक्षरी नाही.कामात भ्रष्टाचार झालेला आहे असे आमचे मत आहे. पाईप लाईनच्या कामात गुणवत्ता नाही.

म. अमोल मासुळे — सदर काम निकृष्ठ दर्जाचे झालेले आहे. सदर कामाची एम.बी. रेकॉर्ड केलेंली नाही. सदर बिल कसे काढण्यांत आलेले आहे. याकामी जी पी.एम.सी.नियुक्त केलेली आहे. त्या पी.एम.सी.मार्फत जे इंजिनिअर नियुक्त केलेले आहे.ते चूकीच्या मार्गाने काम करीत आहेत. सदर पीएमसी चे धुळे शहरात मध्यवर्ती कार्यालय असणे आवश्यक आहे. सदर पी.एम.सी.कडे तांत्रिक कर्मचारी नाही. सदर ठेकेदाराने पाईप लाईन खोदकाम करतांना आवश्यक त्या खोली नुसार खोदकाम केलेले नाही. तसेच पाईप टाकण्याअगोदर पाईपच्या खाली नियमाप्रमाणे मुरुमाचे बेड करणे आवश्यक होते. तीही कार्यवाही ठेकेदाराने केलेली नाही.

म.प्रतिभाताई चौधरी — संबंधित ठेकेदार आरेरावी व मनमानी पध्दतीने काम करीत आहे. नगरसेवकांना कामाची काही एक माहिती दिली जात नाही. कामात गुणवत्ता नाही ठेकेदार ाने अटी शर्तीप्रमाणे काम करीत नाही. संबंधित ठेकेदाराने सादर केलेल्या बिलाप्रमाणे काम केलेले नाही.संबंधित ठेकेदाराला ७ कोटी रुपये अदा करण्यांत आले.यामध्ये काय काय काम केले याचा खुलासा करावा.तसेच संबंधित बिलावर ओव्हरसिअर यांची स्वाक्षरी नाही याबाबतही खुलासा करावा. तसेच आमच्या भागात अद्याप पावेतो पाईप लाईन टाकण्यांचे काम सुरु झालेले नाही. याबाबतही खुलासा करावा.

मृकार्य. अभियंता — सदर योजनेचे पाईप थर्ड पार्टीकडून इन्स्पेक्शन करुन घेण्यांत आलेले आहेत. नियमात तसा उल्लेख असल्याने त्यांच्या नियमानुसार पाईप घेण्यांत आलेले आहेत.

म.सी.सी. बागुल — सदर कामाच्या देयकांवर माझ्या स्वाक्ष-या नाहीत.

म. उपअभियंता भोई — सदर कालावधीत मी रजेवर असल्याने सदर देयके माझ्याकडेस सादर झालेली नाहीत. त्यावर माझी सही नाही.

म.कुमार डियालानी — कामात भ्रष्ट्राचार आहे. ठेकेदाराला प्रथम १५ कोटी रुपये दिले. नंतर ७ कोटी रुपये दिले. सदर कामाची एम.बी.रेकॉर्ड नाही.ओव्हरसिअर यांची सही नाही. या प्रकरणाची सी.बी.आय. चौकशी करण्यांत यावी.

म.सभापती — प्रभागात काम करतांना कामावर ओव्हरसिअर यांचे नियंत्रण असते. कामाचे लाईन आऊट हे ओव्हरसिअर यांच्या मार्फत दिली जात असते. सदर बाबतीत ओव्हरसिअर यांच्या मार्फत कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसत नाही. सदर बाब अतिशय संशयास्पद आहे. याबाबत संबंधित संस्थेचा व पी.एम.सी.चा करारनामा तपासून संबंधित देयके कशा पध्दतीने अदा झाली त्यावर ओव्हरसिअर यांची स्वाक्षरी का नाही. देयके अदा करतांना कोणते निकष लावण्यांत आले.एम.बी. रेकॉर्ड का झाली नाही. याबाबत उपायुक्त श्री. पठारे सो. यांची चौकशी कामी नियुक्ती करण्यांत येत आहे.त्यांनी समक्ष कामावर जावून रनिंग बील एस्टीमेट प्रमाणे व स्पेसिफिकेशन प्रमाणे झाले आहे किंवा नाही याबाबीची तपासणी करावी. श्री.पठारे यांनी याबाबत चौकशी करुन पुढील बैठकीत सविस्तर अहवाल सादर करावा. तसेच चौकशी

अहवालानंतर दोषी अधिकारी व कर्मचारी यांच्यावर नियमानुसार कार्यवाही होऊन त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा.

तसेच शहरात पाईप लाईनचे काम करण्याअगोदर शहरातील ७ जलकुंभ तसेच मुख्य एम.बी.आर. त्यावरील मुख्य वितरण वाहिन्या व जलशुध्दीकरण केंद्राचे काम आधी हाती घेणे आवश्यक होते. आलेले अनुदान फक्त पाईप लाईनवर खर्च केले तर भविष्यात मुख्य कामांना अडचण येऊ शकते.त्यासाठी शहरातील ७ जलकुंभ तसेच मुख्य एम. बी. आर. त्यावरील मुख्य वितरण वाहिन्या व जलशुध्दीकरण केंद्राचे काम अगोदर सुरु करण्यांत यावे.त्यासाठी आवश्यक असणारा निधी राखीव ठेवावा. सदर निधी इतर कोणत्याही कामासाठी खर्च करण्यांत येऊ नये. जलकुंभाची जागा हस्तांतर करणेबाबत मा. आयुक्त सो. यांनी तांतडीने कार्यवाही करावी.

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- १३ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.१२/०२/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २० दिनांक १९/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक १२/२/२०१५ चे ठराव नंबर८ ते १२ अखेर तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशःवाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- १४ श्री.निखील अ. टकले, श्री. प्रणव किशोर शिंदे व श्रीमती पुनम वासुदेव गुजर कंत्राटी मानधनावरील ओव्हरसिअर यांनी १२/१/२०१५ रोजी विनंती अर्जानुसार जा.क्रं.धुमपा/ आस्था / १२७१ दि.७/३/२०१५ स्थायी समितीच्या कार्योत्तर मुंजरीच्या अधिन राहून मुदतवाढ दिलेली आहे. तरी सदर प्रस्ताव मे. स्थायी समितीपुढे कार्योत्तर मंजुरीस्तव सादर.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २१ दिनांक १९/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे श्री. निखील अ.टकले, श्री.प्रणव किशोर शिंदे व श्रीमती पुनम वासुदेव गुजर कंत्राटी मानधनावरील ओव्हरसिअर यांनी १२/१/२०१५ रोजी विनंती अर्ज देवून नमूद केलेले की, धुळे महानगरपालिका बांधकाम विभागात ओंव्हरसिअर या पदावर ६ महिने कंत्राटी पध्दतीने मानधनावर नियुक्ती करण्यांत आलेली आहे.उक्त नियुक्तीची मुदत ६ महिनेचा कालावधी दिनांक ३/३/२०१५ रोजी संपणार आहे. तरी उक्त तिन्ही उमेदवारांनी पुर्न नेमणूक (मुदतवाढ) मिळण्याबाबत मागणी केलेली आहे.

उक्त प्रस्तावास मा.आयुक्त सो. यांनी उक्त ओव्हरसिअर यांच्या कामाची आवश्यकता लक्षांत घेऊन मे. स्थायी समितीच्या मंजुरीस अधिन राहून मान्यता दिलेली आहे.

तरी सदर प्रस्तावास कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळ**

विषय क्रमांकः- १५ नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत प्र.क्रं.८ देवपूर भागात मोठापुल ते एकविरादेवी पुलापावेतो प्रस्तावित कॉक्रीट रस्ता करण्यांचे एस्टीमेट रु.७४,१४,७३६/- मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २२ दिनांक १९/३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा हददीतील प्रभाग क्रं.८ मध्ये देवपूर भागात नागरी दलित वस्ती अतर्गत मोठया पुलापासून ते एकविरा देवी पुलापावेतोचे प्रस्तावित सिमेंट

कॉक्रीट रस्त्यांचे कामास मा.कार्यकारी अभियंता, म.जि. प्रा.विभाग जळगांव यांनी जा.क्रं.पत्र ३८८ दि.४/२/२०१५ अन्वये तांत्रिक मंजुरी एकुण रक्कम रुपये ७४,१४,७३६/- मात्र खर्चास मंजुरी दिली आहे.

उक्त जागी सदरचे कॉक्रीट रस्त्याचे कामासंदर्भात मा.जिल्हा प्रशासन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय,धुळे यांचे कडील जा.पत्र क्रं.कक्ष/५/ नपाप्र/ कावि/ १६९/ २०१४ दि.१५/११/२०१४ तसेच धुळे मनपा कडील पत्र क्रं.बांवि/५२९ दि.१४/१/१५ व जा. क्रं. मनपा / बावि /५६३ दि.६/२/२०१५अन्वये प्रस्तावित केले आहे.

यापूर्वी उक्त जागी मोठापुल ते छोटापुल पोवतो पांझरा नदीस संरक्षण भिंत बांधणेचे कामास मनपा धुळे ठराव नं.३० ब दि.१५/५/२०१४ अन्वये प्रस्तावास मंजुरी देण्यांत आले प्रमाणे तांत्रिक मंजुरीसह मा.जिल्हाधिकारी धुळे यांचेकडे प्रस्ताव पाठविणेत आला होता. तथापि धुळे पाटबंधारे विभाग धुळे यांनी संरक्षण भिंत बांधणेचे कामास नाहरकत दाखला देणेस नापसंती दिले मुळे मा.जिल्हा प्रशासन अधिकारी, जिल्हाधिकारी धुळे यांनी सदरचे काम वगळून नवीन कामांचा प्रस्ताव पाठविणेबाबत संदर्भिय पत्र क्रं. १ अन्वये कळविणेत आले प्रमाणे प्रस्तावित कॉक्रीट रस्त्याचे अंदाजपत्रकीय रक्कम रु.७४,१४,७३६/-मात्र प्रस्ताव तांत्रिक मंजुरीसह मा.जिल्हा प्रशासन अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय धुळे यांचेकडेस प्रशासकीय मंजुरीस्तव पाठविणेत आलेला आहे. तरी मनपा हददीतील प्रभाग क्रं.८ मध्ये देवपूर भागात नागरी दलित वस्ती अतर्गत मोठया पुलापासून ते एकविरा देवी पुलापावेतोचे सिमेंट कॉक्रीट रस्त्यांचे अंदाजपत्रकीय खर्च रक्कम रु.७४,१४,७३६/- मात्रस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांकः- १६ बांभळे जलशुध्दीकरण केंद्र येथे तांतडीने संरक्षण भिंत बांधणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २३ दिनांक १९/३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे श्री.संजय सुधाकर जाधव विरोधीपक्ष नेते यांनी दि. २/२/२०१५ रोजी लक्षवेध पत्र दिलेले आहे. त्यानुसार शहर तापी पाणीपुरवठा योजनेच्या बांभळे जलशुध्दीकरण केंद्र येथे संरक्षण भिंतीचे बांधकाम करण्यांत आलेले होते. परंतु सदरील ठिकाणी धुळे ते पळसनेर येथील रस्ता चौपदरीकरणात सदरची संरक्षण भिंत तुटली त्यामुळे तेथे सुरक्षिततेच्या दृष्टीने संरक्षण भिंत बांधणे अत्यंत जरुरीचे आहे.

उक्त कामी यापूर्वी सदरील ठिकाणी संरक्षण भिंत बांधणेबाबत अंदाजपत्रकीय रक्कम रु.३८,०९,८७४/- मात्रचे कंत्राट इकडील कार्यादेश क्रं./बांवि/६७ दि.२८/३/२०१३ अन्वये ४ महिन्यांच्या मुदतीत मे.सानिका कन्स्ट्रक्शन थाळनेर यांना देण्यांत आले होते.परंतु त्यांनी काम केलेले नाही.संबंधित ठेकेदारांना देण्यांत आलेले काम रद्द करुन त्यांची अनामत रक्कम जप्त करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सदर कामाचे पुन्हा चालू दरसुचीनुसार अंदाजपत्रक रु.७०,२९,८७७/- मात्र असून उक्त बाबतचा खर्च सन २०१५-१६ च्या अंदाजपत्रकात तरतूद करुन सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका, धुळे**

विषय क्रमांकः- १७ मा.महापौर साो.यांच्या पत्रानुसार धुळे शहरासाठी विविध प्रकल्प व योजनांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २४ दिनांक १९/३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा.महापौर साो. यांच्या पत्रानुसार धुळे शहरासाठी पाणी व अपव्यय (सांडपाणी) पाणी व्यवस्थापन, पर्यावरण व्यवस्थापन,शहर विकास योजना विद्युत व्यवस्थापन, शैक्षणिक व्यवस्थापन व एकत्रित विकास योजना इ.साठी सल्लागार नियुक्त करणेची आवश्यकता असते.याबाबत मुंबई मंत्रालय येथे मा.प्रधान सचिव यांच्याकडेस झालेल्या बैठकीत मा.प्रधान सचिव यांनी याबाबत प्रकल्प व्यवस्थापन आराखडा तयार करुन शासनाकडेस पुढील कार्यवाहीसाठी पाठविणेबाबत सूचित तथा आदेशित केलेले होते.याकामी शासनाकडून विविध प्रकल्प तथा योजनांसाठी अनुदान प्राप्त होऊ शकते.शासनाच्या या योजनांचा लाभ घेणेसाठी आवश्यक त्या तांत्रिक बाबींसह सदर व्यवस्थापन आराखडा सादर करणे आवश्यक आहे. महानगरपालिकेकडेस सद्यस्थितीत सक्षम तांत्रिक कर्मचारी उपलब्ध नसल्याने व आवश्यक त्या नमुना तथा नियमानुसार आराखडा सादर करणे आवश्यक असल्याने याकामी सल्लागार अभियंता तथा प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नेमणेकामी आरोग्य, पाणीपुरवठा, नगररचना, बांधकाम व विद्युत विभाग यांच्यामार्फत अभिप्राय घेऊन प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्त करणेबाबत ई-निविदा पध्दतीने कार्यवाही करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका, धुळे**

**अन्य विषयबाबत झालेली चर्चा व निर्णय**

अ) सन्मा.सदस्य श्री. सोनल शिंदे यांनी शहरातील अत्यंत महत्वपूर्ण असलेल्या महात्माफुले पुतळा ते स्टेशन रोड या रस्त्याच्या झालेल्या दुरावस्थेबाबत लक्षवेधून सदर रस्त्यांची दुरुस्ती करण्यांची मागणी केली. यावर संबंधित रस्त्यांचे दुरुस्तीचे एस्टीमेट तयार असून निधी अभावी सदर काम प्रलंबीत असल्याचे ओव्हरसिअर श्री. उगले यांनी सांगितले. यावर मा. सभापती यांनी तांतडीने निधीबाबत पुर्तता करुन काम जलद गतीने पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्याचे आदेशित केले.

ब) सन्मा. सदस्य श्री.अमिन पटेल यांनी त्यांच्या प्रभागात गटारीचे पाणी येत असल्याबद्दल तक्रार करुन जनता सोसायटी दिलदार नगर येथे पाईप लाईनचे काम करणे आवश्यक असल्याची मागणी केली. यावर संबंधित ठिकाणी कार्यकारी अभियंता श्री.दरेवार यांनी पहाणी करुन कार्यवाही करण्यांचे सभापती यांनी आदेशित केले.

क) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी त्यांच्या भागातील नकाणेरोड,तुळशीराम नगर, आनंदनगर या भागात रामनगर जलकुंभावरुन पाणीपुरवठा होत असून कॉलन्यांचा विस्तार वाढल्याने पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याबाबत तक्रार केली व या भागासाठी नवीन जलकुंभ उभारण्याची मागणी केली. यावर पाणीपुरवठा योजना कार्यान्वीत झाल्यानंतर पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होईल याबाबत योजनेत कामांचा समावेश करण्यांत आल्याबाबत माहिती देण्यांत आली.

ड) सन्मा. सदस्य श्री. विश्वनाथ खरात यांनी शहराची सद्यस्थितीत हद्दवाढ करण्यांचा प्रस्ताव कार्यान्वीत असून पाणीपुरवठा योजनेचे काम करतांना याचाही विचार होणे आवश्यक असून त्याबाबत कार्यवाही करण्यांची मागणी केली. यावर म.सभापती यांनी याबाबत विचार करुन प्रस्तावीत योजनेत त्याप्रमाणे कार्यवाही करण्यांचे आदेशित केले.

इ) सन्मा.सदस्यां सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी डिझेल संदर्भातील भ्रष्ट्राचाराबाबत वाहन समिती नेमण्याची मागणी करुन यात सर्व पक्षीय नगरसेवकांचा समावेश करावा अशी सुचना केली. तसेच वाहनांवर नियंत्रण नसून डिझेल मध्ये भ्रष्ट्राचार होत आहे. तसेच वाहनांना डुप्लीकेट स्पेअरपार्ट लावून दुरुस्ती मध्ये गैरव्यवहार केला जात असल्यांची तक्रार केली.

तसेच सदर समितीमध्ये वाहनांबाबत माहिती असणा-या नगरसेवकांचा समावेश करण्या बाबत सुचना केली. यावर मा. सभापती यांनी डिझेलबाबत नियंत्रण ठेवणे आवश्यक असून डिझेल वाटप पुस्तकांवर फक्त खातेप्रमुख अभियंता, किंवा सहा. अभियंता यांच्या स्वाक्षरीने डिझेल देण्याबाबत स्वाक्षरी करावी. तसेच ओव्हरसिअर यांचा स्वाक्षरी करण्यांचा अधिकार काढण्यांत यावा. याबाबत उपायुक्त श्री. पठारे व सहा. आयुक्त श्रीमती डगळे यांनी चौकशी करुन अहवाल सादर करावा असे आदेशित केले.

ई) शहरातील घनकचरा व्यवस्थापनाचे काम ठरावीक बचतगटांना देण्यांत आलेले आहे.याबाबत आरोग्य विभागाचा वस्तुनिष्ठ अहवाल पुढील बैठकीपावेतो सादर करण्यांचे आदेश आरोग्याधिकारी यांना मा. सभापती यांनी दिलेत.

प) सन्मा. सदस्य श्री.अमोल मासुळे यांनी शहरातील मंगल कार्यालय व लॉन यांच्याकडून कार्यक्रमानंतर उरलेले शिळे व उश्ठे अन्न कार्यालयाबाहेर मोकळया जागेत टाकले जातात. त्यामुळे शहरातील नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो. तसेच सदर शिळे अन्न खालल्याने विषबाधा होऊन जनावरांचा मृत्यू झाल्यांची घटना शहरात झालेली आहे. यावर कडक कार्यवाही करण्यांची मागणी केली. यावर म. सभापती यांनी संबंधित मंगल कार्यालय व लॉन धारकांकडून कार्यालय बुकींगच्या तारखांची माहिती घेऊन त्यानुसार संबंधितांकडून प्रति दिवसाप्रमाणे रक्कम आकारणी करुन त्यांना घंटागाडी तथा अन्य सुविधा मनपाकडून उपलब्ध करुन दयाव्यात तसेच याबाबत हयगय व कार्यवाही न करणा-या मंगल कार्यालय व लॉन धारकांकडून दंडात्मक रक्कम वसूल करावी. याबाबतची कार्यवाही आरोग्याधिकारी यांनी संबंधित स्वच्छता निरीक्षकांकडून करुन घेण्यांत यावी.

फ) सन्मा. सदस्य श्री.अमिन पटेल यांनी मुस्लीम बांधवांचा वडजाईरोड परिसरात३ दिवसांचे धार्मिक संमेलन असल्याने सदर परिसरातील पथदिवे बंद असून सदर पथदिवे तांतडीने सुरु करण्यांची मागणी केली.यावर मा. सभापती यांनी विद्युत अभियंता श्री. बागुल यांनी तांतडीने उचित कार्यवाही करण्यांचे आदेशित केले.

**सही /- x x x**

**सभापती, स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**मंगळवार दिनांक२४ मार्च, २०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज मंगळवार दिनांक२४/०३/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार,सभापती, स्थायी समिती,धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्रीमती अजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ६ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ७ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ८ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ९ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| १० | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ११ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १२ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| १३ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १४ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के.व्ही. धनाड | प्र. आयुक्त तथा अति.आयुक्त |
| २. | श्री. डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ३. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा.आयुक्त |
| ४. | श्री.एम.आर. सरईत | मुख्य लेखापरीक्षक |
| ५. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त |
| ६. | श्री.बी.बी. गिते | सहा.आयुक्त (अति.) |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.ना. कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ९. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| १०. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १२. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी़ अधिक्षक |
| १३. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. जी.व्ही. खरे | विद्युत अभियंता करिता |
| १५. | श्री. प्रकाश सोनवणे | ओव्हरसिअर न.र. विभाग |
| १६ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १७ | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| १८ | श्री.सी.सी.बागुल | ओव्हरसिअर |
| १९ | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| २० | श्री. संजय गुजर | भांडारपाल ( आरोग्य विभाग ) |

| | | |
|---|---|---|
| २१ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| २२ | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |
| २३ | श्री. दिलीप कलाल | बाजार विभाग प्रमुख |

म. सभापती:- सन्मा.सदस्य अधिकारी गण,पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यककोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

धुळे मनपाचे नगरसेवक श्री. जगदीश अप्पाजी गायकवाड यांचे मोठे बंधु तसेच शिवाजी हायस्कूलचे मा. मुख्याध्यापक कै. दामोदर अप्पाजी गायकवाड यांचे नुकतेच दु:खद निधन झाले. त्यांना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहून तसा ठराव पारीत करण्यांत यावा.

**सुचक :- श्री.अमोल पावबा मासुळे,**

म. सभापती सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दाजली अर्पण करण्यांत यावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २५ दिनांक २४/०३/२०१५**

धुळे मनपाचे नगरसेवक श्री.जगदीश अप्पाजी गायकवाड यांचे मोठे बंधु तसेच शिवाजी हायस्कूलचे मा. मुख्याध्यापक कै.दामोदर अप्पाजी गायकवाड यांचे नुकतेच दु:खद निधन झाले आहे.

मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांकडून आलेला रजेचा अर्ज.**

सन्मा.सदस्य श्री.गोविंद तुळशीराम साखला यांनी आजच्या सभेत तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत यावी. अशी विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २६ दिनांक २४/०३/२०१५**

सन्मा.सदस्य श्री.गोविंद तुळशीराम साखला यांनी आजच्या सभेत तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत यावी. अशी विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार दि.२४/०३/२०१५ च्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**दिनांक-२४/०३/२०१५ रोजीच्या मे. स्थायी समिती सभेच्या बैठकी प्रारंभी झालेली चर्चा व त्यावरील निर्णय**

नरेंद्र परदेशी मागील स्थायी समिती सभेत पाणी पुरवठा योजनेसंबंधी पाईप लाईन व अतिक्रमणाचा विषय झाला होता. वर्तमान पत्रात वाचले आहे कार्यकारी अभियंता यांनी वर्तमान पत्रात माहिती देऊन दिशाभूल केली आहे. श्री.दरेवार सोा. आज रजेवर आहे. रजेवर जातांना आयुक्त यांची परवानगी घेतली आहे का? मी लेखी पत्र दिले आहे.

म.अमिन पटेल १३६ कोटीची पाणी पुरवठ्याची योजना आहे. सदर योजनेच्या ठेकेदाराला ७ कोटी रुपये कामाचे बिल अदा केले आहे. सदर बील नियमानुसार अदा केलेले नाही. याबाबत मागील बैठकीत श्री. दरेवार यांनी पुढील बैठकीत खुलासा सादर करणेबाबत आदेशित केलेले होते. परंतु आज ते अनुपस्थित आहेत. त्याबाबतचा खुलासा करावा.

| | |
|---|---|
| म.अमोल मासूळे | स्थायी समिती सभापती, यांनी कार्यकारी अभियंता श्री. दरेवार यांना सविस्तर अहवाल सादर करणे बाबत आदेशित केले आहे. त्यामुळे त्यांनी आजच्या सभेत जातीने हजर राहीले पाहिजे होते. त्यांनी वृत्तपत्रात दिलेला खुलासा हा दिशाभुल करणारा आहे. |
| म.नरेंद्र परदेशी | कार्यकारी अभियंता आजच्या सभेत उपस्थित नसल्याने त्यांच्यावर शास्ती लावणे बाबत ठराव करण्यात यावा.तसेच संबंधित अदा केलेल्या देयकांवर ओव्हरसिअर यांची स्वाक्षरी नाही. सदर बाब ही अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. |
| म.प्रतिभाताई चौधरी | उपायुक्त सो.पठारे यांची चौकशीसाठी नियुक्ती केली आहे त्यांना तसे आदेश दिले आहेत का? |
| म.नरेंद्र परदेशी | श्री.दरेवार साहेबांबद्दल हे जे मी बोलतो आहे त्यावेळी मी नव्हतो आजचे सभापती नव्हते आजच्या स्थायी समितीमधील बरेचसे सदस्य होते मी त्यावेळी पाणी पुरवठा योजने संबंधी हात जोडून सांगत होतो १३६ कोटीचे ढोबळ अंदाजपत्रक होते त्याला १२४ कोटी रुपयाची तांत्रिक मंजूरी आहे काही प्रश्न विचारले होते हे कायद्यानुसार होऊ शकत नाही असे टिपणी वर शेरे मारले आहे. कार्यकारी अभियंता श्री.दरेवार साहेब यांनी कायद्यानुसार न करता सभागृहाची दिशाभूल केली आहे. स्थायी समितीला १० टक्के जास्तीने निविदा मंजूर करणेचे अधिकार नाही.मनपा अधिनियम चे कलम १५२ वाचण्यात यावे या कलमा खाली ६००० हजार रुपया पर्यंतच मंजूरी देता येते.आणि ही योजनो १३६ कोटी रुपयाची आहे परवा स्थायी समितीच्या सभेत ते बोलले की, ओव्हरसियर यांना बिलावर सहीचे अधिकार नाही ते खोटे बोलत आहेत त्यांना उभे करावे कामाचे बिल भरावयाचे असतांना ओव्हरसियर अगोदर सही करतो याचा तात्काळ खुलासा करावा ते आपल्याला इतिवृत्तात घ्यावयाचे आहे. दिनोंक १९/०३/२०१५ रोजी झालेल्या सभेत चर्चा केली आहे. |
| म. सभापती | कार्य.अभियंता श्री.दरेवार रजेवर आहेत पाणी पुरवठा योजने संबंधी सर्व चर्चा मागिल मिटींग मध्ये करण्यात आलेली आहे. |
| म.नरेंद्र परदेश् | कार्य.अभियंता यांनी बिलावर ओव्हरसियर यांनी सही करावयाची गरज नाही असे म्हटले आहे. |
| म.सभापती | भागातील कामाबाबत ओव्हरसियर हा शंभर टक्के जबाबदार असतो असे मी मागील स्थायी समितीच्या सभेत सांगितले आहे. |
| म.कुमार डियालानी | वर्तमान पत्रात आले आहे ओव्हरसियर यांची सहीची गरज नाही असे कार्य.अभियंता यांनी म्हटले आहे. |
| म. रमेश बोरसे | सबंधित देयकांवर ओव्हरसिअर यांची स्वाक्षरी आवश्यक असते याबाबत इतिवृत्तांत नोंद घेण्यांत यावी. |
| म.नरेंद्र परदेशी | २२ नंबरच्या बिलावर ओव्हरसियर यांची सहीची गरज आहे किंवा नाही हे सांगावे.आम्ही जे आरोप केले आहे याची आयुक्तांनी काय दखल घेतली आहे ते सांगावे. श्री.दरेवार साहेब, आजच्या सभेत गैरहजर आहेत ते पाणीपुरवठा योजने संबंधी खुलासा व अहवाल देणार होते परंतू ते आजच्या सभेत उपस्थित नाही आपण याबाबत त्यांच्यावर शास्ती करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे ओव्हरसियर यांची देयकावर स्वाक्षरी आवश्यक असते किंवा कसे याबाबत अभियंता यांनी खुलासा करावा. |
| म. सभापती | याबाबत अभियंता यांनी सभागृहास माहिती द्यावी. |
| म. अभियंता | आपल्याकडे असलेले ओव्हरसिअर यांची सेवा सुमारे १५ ते २० वर्ष झालेली आहे. त्यांच्या भागातील कामाचे मोजमाप घेणे,कामावर देखरेख ठेवणे, त्यांची मोजमाप पुस्तकामध्ये नोंद घेणे याची जबाबदारी व अधिकार ओव्हरसिअर यांचे आहेत. व ती त्यांची जबाबदारी असते.ओव्हरसिअर यांच्या सही शिवाय बील ग्राहय धरता येणार नाही. ओव्हरसिअर यांच्या स्वाक्षरीनंतर वरिष्ठ अधिका-यांच्या सहया असतात. |

| | |
|---|---|
| म. सभापती | पाणी पुरवठा योजने संबंधी करण्यात आलेल्या तक्रारी बाबत चौकशी समिती नेमली आहे श्री. दरेवार साहेब परवानगी न घेता गैर हजर आहेत आयुक्त यांना सूचना करतो हा विषय असतांना जे आरोप मनपावर होत असतांना त्याचे निराकरण केले पाहिजे त्या आरोपाला सामोरे न जाता श्री.दरेवार साहेब गैरहजर आहेत त्यांच्यावर संशय निर्माण होतो त्यांच्यावर प्रशासना कडून योग्य ती कारवाई करण्यात येईल आणि त्यांचे सेवा पुस्तकात नोंद करुन शासनाला व त्यांच्या संबंधित विभागाला प्रशासनामार्फत लेखी पत्र व तक्रार करण्याबाबत कार्यवाही करावी. |
| म.नरेंद्र परदेशी | अधिकारी जर बेजबाबदार पणे वागत असतील तर त्यांना जास्तीत जास्त शास्ती करण्याचे अधिकार स्थायी समितीला आहे. कार्य.अभियंता यांची एक वेतन वाढ थांबविण्यात यावी. त्यांनी जे पत्रात नमूद केले आहे ते तुम्ही सांगू शकले असते पाणी पुरवठा योजनेचे ठेकेदाराला १५ कोटी रुपये अदा केले आहे तो जर काम अपूर्ण सोडून निघून गेला तर आपण काय करणार आहोत याचा खुलासा करावा आपण त्यांना कामाचे वर्क ऑर्डर दिली आहे त्यावेळी करारनाम्यात पाणी पुरवठा योजनेसाठी टाटा कंपनीचे आणि जिंदाल कंपनीचे पाईप वापरणे बाबत नमूद आहे ते वापरत असलेले पाईप कुठल्या कंपनीचे आहेत ते वेगळयाच कंपनीचे पाईप वापरत आहे. यामुळे करारनाम्याचा भंग झाला आहे ठेकेदाराने फसवणूक केली असल्याने त्यांच्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करण्यात यावा. |
| म. सभापती | आपण मागील सभेत उपस्थित नव्हते. याबाबत सविस्तर चर्चा झालेली असून देयकांच्या अदायगीबाबत चौकशी करणेकामी उपायुक्त श्री. पठारे यांना नियुक्त केलेले असून तसे लेखी पत्र त्यांना देण्यांत आलेले आहे. याकामी त्यांना आवश्यकता असल्यास तांत्रीक बाब तपासणे व चौकशीसाठी अभियंता व संबंधित ओव्हरसिअर यांना देणेबाबत कार्यवाही करणेत येईल. तसेच श्री.दरेवार यांच्या अनुपस्थितीबाबत संशय निर्माण होत असून त्यांच्या बाबत कार्यवाही करणेसंदर्भात आयुक्त यांना आदेशित करण्यांत येत असून त्यांच्या विभागाला त्याच्या विरुध्द कडक कार्यवाही करणेबाबत लेखी कळविणेबाबत कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. |
| म. प्रतिभाताई चौधरी | सदर चौकशी समितीत नगरसेवकांचा समावेश करण्यांत यावा. |
| म. सभापती | श्री. पठारे यांच्या चौकशी अहवालानंतर पुढील कार्यवाही करतांना आपल्या सुचनेचा विचार करण्यांत येईल. |

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १८ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.०४/०३/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २७ दिनांक २४/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक ०४/०३/२०१५ चे ठराव नंबर १३ ते १९ अखेर तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- १९ धुळे महानगरपालिका एलबीटी विभागात व्यावसायीकांनी दाखल केलेले सन २०१३-१४ चे एल.बी. टी. विवरण पत्र तपासणी करिता दि.९/३/२०१५ रोजी फेरनिविदा काढण्यांत आली. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २८ दिनांक २४/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे दिनांक ०६/०७/२०१३ पासुन धुळे महानगरपालिका क्षेत्रात उपभोग, उपयोग, किंवा विक्री यासाठी आयात होणाऱ्या मालावर स्थानिक संस्था कर (एलबीटी) वसुल करण्यात येत आहे.

सदर कर लेख्यावर आधारीत असल्याने स्थानिक संस्था कर विभागाकडे नोंदणीकृत व्यावसायीक/उदयोजक/व्यापारी यांनी जमा केलेले वार्षिक विवरणपत्र तपासणी करणे कामी फेर जाहीरात दैनिक आपला महारष्ट्र या वृत्तपत्र मध्ये देण्यात आली होती. अर्ज स्विकृती अंतीम दिनांक १६/०३/२०१५ अशी होती.

दिनांक१६/०३/२०१५अखेर बंद पाकिटा मध्ये तीन अर्ज प्राप्त झाले दि. १८/०३/२०१५मा.आयुक्त सो.यांचे मान्यतेने बंद पाकिटे उघडण्यात आले.ती खालील प्रमाणे.

| अ. क्र. | अर्जदाराचे नाव | शैक्षणिक पात्रता | कामाचा अनुभव | मानधन अपेक्षित |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीकांत रामचंद्र घुगे २२/१४४५, दत्ताधाम को. ऑप.हो. सो. अक्युदंय नगर काळाचौकी,मुंबई ४०००३३ | बॅचलर ऑफ आर्टस (अर्थशास्त्र) | अ)विक्री कर अधिकारी ३६ वर्षे कामाचा अनुभव ,<br>ब) कायदयाचे ज्ञानः- विक्रीकर कायदा, व्यावसाय कर, महाराष्ट्र सिव्हिल सर्विसेस रुल वर्कक्स कॉन्ट्रक्ट कायदा, महाराष्ट्र म्युनिसिपल कॉपोरेशन ॲक्ट १९४९ चे ज्ञान.<br>क) स्थानिक संस्था कर २०१० अंतर्गत विशेष कार्यकारी अधिकारी पदी ६ महिन्याचा अनुभव. | ३५,०००/- |
| २ | श्री.प्रकाश शृंगारपुरे | एस.एस.सी. पास (जुनी) | विक्री कर अधिकारी पदी साडेचार वर्ष | ४५,०००/- |
| ३ | श्री.शांताराम बाळकृष्ण कदम | बी.ए.पास | विक्री कर निरीक्षक अकरा वर्ष | ४०,०००/- |

वरील तीन अर्जदारा व्यतीरीक्त आज दि.१८/०३/२०१५ रोजी दुपारी १२:३० वाजता दोन अर्ज टपाल विभाग म.न.पा.धुळे कडून प्राप्त झाले ते पुढील प्रमाणे १.आर.बी.कोठावदे, यांचे पाकिट उघडून आणण्यात आले.२.बंद पाकिट मिळाले.मात्र सदर दोन अर्ज अंतिम फेर जाहिरात दिनांका नंतर प्राप्त झाले आहेत.

वरील तक्त्या नुसार श्री.श्रीकांत रामचंद्र घुगे, मुंबई यांचा कामाचा अनुभव जास्त असुन सर्वात कमी मासिक मानधन रु.३५,०००/-हजार मात्र वर काम करणेस ईच्छूक असल्याने श्री.श्रीकांत रामचंद्र घुगे यांची सन २०१३-१४ चे वार्षिक विवरणपत्र तपासणी कामी नेमणूक करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-२० धुळे महानगरपालिका प्रभाग क्रं.३४ मध्ये विविध १ ते ५ विकास कामांचा दलित वस्ती सुधारणा कार्यक्रमात समावेश करण्यांत आलेला आहे. त्याबाबतचे एस्टीमेट खर्चाना आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २९ दिनांक २४/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका धुळे मार्फत प्रभाग क्रं.३४ मध्ये विविध विकास कामांचे अंदाजपत्रक तयार केलेले असून सदर कामाचे समावेश हा दलित वस्ती सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत समावेश करण्यांत आलेला आहे.तरी त्या कामाचा तपशील पुढील प्रमाणे

| अ.नं. | कामाचे नांव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | मोहाडी प्रभाग क्रं.३४ रेल्वेगेट ते मातंग वस्ती पर्यत रिटेनींग वॉल बांधून पुल तयार करणे | २५,९३,८२१/- |
| २ | मोहाडी प्रभाग क्रं. ३४ टेकडी परिसर कटींग करुन पिंटे चौरे ते गौंड वस्ती पर्यत रस्ता डांबरीकरण करणे | २४,७८,४०५/- |
| ३ | प्रभाग क्रं.३४ मोहाडी येथे दलित वस्ती येथे सिमेंट कॉक्रीट रस्ता करणे. | २४,९५,८३५/- |
| ४ | प्रभाग क्रं.३४मोहाडी येथे दलित वस्ती निधी अंतर्गत टेकडी परिसरात २० सीट शौचालय बांधणे | २४,९७,६८१/- |
| ५ | प्रभाग क्रं.३४मध्ये दलित वस्ती सुधारणा अंतर्गत २० सीट शौचालय बांधणे | २४,९७,६८१/- |

वरील प्रमाणे १ ते ५ कामाचे प्रस्ताव तयार केले असून अंदाजपत्रक देखील केलेले असून त्यांस म.आयुक्त साो. यांनी आर्थिक व प्रशासकीय मंजुरी दिलेली आहे. तसेच सदर कामांना म. कार्यकारी अभियंता साो. यांनी देखील तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

उक्त १ ते ५ कामाचे एस्टीमेट खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-२१ धुळे महानगरपालिका एकविरादेवी यात्रोत्सावात लावण्यांत येणा-या स्टॉलसाठी असणा-या दरांत दरवाढ करणे व व्यावसायीकांना जागा निश्चित करून देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३० दिनांक २४/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिकेने स्थायी समिती ठराव नं.१४० दि.३०/१२/११अन्वये अनुक्रमांक ६ एकविरादेवी यात्रा स्टॉल करिता १० x १० जागेस दर दिवसाला १०० रू.प्रमाणे मंजुरी दिली होती. सदर ठरावास ४ वर्षांचा कालावधी पुर्ण झाला असुन दरवर्षी नैसर्गिक दरवाढ करण्यात आलेली नाही.महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्नवाढ होण्यासाठी धुळे मनपा मंजुर उपविधीत अस्तितवातअसलेल्या दरात अनुक्रमांक ६ एकविरादेवी यात्रा स्टॉलकरिता १० x १० जागेस नैसर्गिकरित्या ४०% वाढ करणे करिता प्रस्तावित दर मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ (अ) नुसार सादर करण्यात येत आहे.एकविरादेवी यात्रा स्टॉल करिता जागा वापराबाबत १५ दिवसाचे नविन दरानुसार भाडे घेण्यास तसेच नैसर्गिकरित्या४०% वाढ करणेस तसेच नियम व उपविधीत दुरूस्ती करून प्रस्तावीत दरवाढीस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-२२ धुळे शहर पाणीपुरवठा योजने अंतर्गत बडगुजर जलकुंभावरील नवीन पंपींग स्टेशन येथील पंपींग मशिन बसविणे कामाचे वाढीव खर्च रुपये २३,५५,११३/- मात्रला मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३१ दिनांक२४/०३/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहर पाणीपुरवठा अंतर्गत बडगुजर जलकुंभावरील नवीन पंपींग स्टेशन उभारण्यात आलेल्या सदरच्या स्थळी ESR चे काम गेल्या ६ ते ७ वर्षापासुन प्रलंबीत होते. सदरच्या जलकुंभाचे काम जलद गतीने पूर्णत्वास आलेले आहे.

मा. आयुक्त साो. उपायुक्त साो. मा. सभापती साो. व पदाधिकारी यांनी सदरच्या जलकुंभावर भेट देवून मला साईटवर येण्याच्या निरोपानुसार सदर ठिकाणी हजर होवून पंपीग मशिनरी तांतडीने फिटींग करणे बाबत सुचना दिल्यानुसार निविदातील पंपींग मशिनरीचा पार्ट तपासून पाहिला असता सदरच्या ठिकाणी २२ मिटर हेड व पंपाचा डिसचार्ज दर तासाला ५लाख लिटर्स याप्रमाणे टेंडरमधील सर्व बाबी तपासले असता मुळ टेंडर मध्ये ६०एच.पी.पंप व मोटार्स व ट्रान्सफार्मर १०० के.व्ही.ए. व त्यानुसार सर्व साहित्याचा समावेश आहे. मात्र सदरच्या ठिकाणी ७५एच.पी.पंप व मोटार तसेच २०० के.व्ही.ए. ट्रान्स्फार्मरची आवश्यकता असून त्यानुसार पॅनल बोर्ड मधील साहित्य घ्यावे लागेल. याकरिता२०१३-१४ च्या डी.एस.आर. नुसार लागणारे साहित्य यांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यांत आलेला आहे. तरी मुळ निविदेत स्टार्टर २ नग समावेश नाही. त्याकरिता तुलनात्मक तक्त्यानुसार टेंडर मध्ये गृहीत धरलेली किंमत रु.१०,०३,७९१/-आहे. तुलनात्मक तक्त्यानुसार मुळ निविदेतील किंमती व्यतिरिक्त रु.२३,५५,११३/-येणा-या अंदाजपत्रकीय वाढीव रकमेस मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

१) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी शहरात दिवसा हायमास्ट व पथदिवे सुरु राहतात व त्यांचा बिलाचा बोंझा नागरीकांवर पडतो. तसेच शहरातील बंद लाईट सुरु होणेबाबत कारवाई होत नाही. याबाबत कार्यवाही करण्यांची मागणी केली. यावर सभापती यांनी तात्काळ संबंधित विभागाला याबाबत कार्यवाही करण्यांचे आदेशित करुन संबंधित ठेकेदारावर दंड आकारण्याबाबत आदेशित केले आहे.

२) सन्मा. सदस्य श्री. संदीप पाटोळे यांनी मनपा दवाखान्यातील औषधाचा साठा संपलेला असून रुग्णानाऔषधी उपलब्ध होत नाही. शहरात साथीचे रोग वाढत आहेत.औषधांचे बिले प्रलंबीत आहेत. ४ वेळा निविदा काढूनही पुरवठादार देयकाअभावी निविदा भरत नाही. याबाबत तांतडीने दखल घेण्यांच मागणी केली यावर म. सभापती यांनी सदर बाब गंभीर स्वरुपाची असून म. आयुक्त यांनी याबाबत दखल घेऊन तांतडीने औषधी उपलब्ध करणेबाबत तसेच संबंधितांना देयके अदा करणेबाबत आदेशित केले.

३) सन्मा.सदस्य श्री.संदीप पाटोळे यांनी पाणीपुरवठा योजनेची चौकशी करतांना मनपा अधिाका-यावर कामाच्या असलेल्या व्यापामुळे यापूर्वी स्थापन केलेल्या त्रि-सदस्यीय समितीमार्फत कामाची पहाणी व चौकशी करावी. तसेच १० लाखाच्या वरील असलेल्या कामांच्या प्रगती बाबतचा अहवाल वेळोवेळी स्थायी समिती पुढे माहितीसाठी सादर करावा अशी मागणी केली.

४) सन्मा.सदस्य श्री. अमोल मासुळे यांनी मनपा दवाखान्यातील औषधी साठयाबाबत गंभीर परिस्थ्रिती असून त्याबाबत तांतडीने पूर्तता करणेची मागणी केली तसेच राऊळवाडी भागातील मानसेवी डॉक्टर संपदा कुळकणी हया कामाच्या वेळेत दवाखान्यात अनुपस्थितीत असल्याबाबत तक्रार करुन त्यांच्यावर कार्यवाही करणेची मागणी केली. तसेच औषधाच्या देयकांसाठी दैनंदिन भरण्यातून ठरावीक रक्कम राखीव ठेंवावी. किंवा तांतडीने रोखीने खुल्या बाजारातून औषधी घेण्यांत यावे. अशी मागणी केली. यावर म. सभापती यांनी म. आरोग्याधिकारी व श्री.आयुक्त यांनी याबाबत दखल घेऊन कारवाई करण्यांचे आदेशित केले.

५) सन्मा. सदस्य श्री. अमिन पटेल यांनी पाणीपुरवठा योजनेचे काम त्यांच्या प्रभागात सुरु नसल्याची तक्रार करुन शहराचे ४ झोन करावे व चारही झोन मध्ये एकाच वेळेस काम सुरु करावे अशी सुचना केली. तसेच मनपाची आर्थिक स्थिती लक्षांत घेता उत्पन्न वाढीच्या दृष्टीने जास्तीत जास्तीची घरपट्टीची वसुली व्हावी यासाठी नागरीकांना आकारण्यांत येणारी

शास्ती रद्द केल्यास मोठया प्रमाणावर घरपट्टी वसुल होऊ शकते. याबाबत भिवंडी महानगरपालिकेने केलेल्या कार्यवाही प्रमाणे अंमलबजावणी करण्यांची सुचना केली. तसेच मनपावर येणा-या विज बिलाच्या कपातीसाठी शहरात एलईडी लाईट बसविण्यांची कार्यवाही तांतडीने करण्याबाबत सूचित केले. यावर म. सभापती यांनी शास्ती माफ करणेबाबत प्रशासनाने नियम तपासून त्यानुसार उचित कार्यवाही करण्याबाबत आदेशित केले. तसेच एलईडी लाईट लावण्याबाबतचा प्रस्ताव तांतडीने करणेबाबत आयुक्त यांना आदेशित केले.

६) सन्मा. सदस्य श्री. रमेश महादू बोरसे यांनी पाणीपुरवठा योजनेअंतर्गत प्रथमःत जलशुध्दीकरण केंद्र व नवीन जलकुंभाची निर्मिती करण्यांचे काम प्रथम करणेबाबत कार्यवाही करणेची सुचना मांडली. सदर काम झाल्यास तापी योजनेचा भार कमी होऊन विद्युत बिलात बचत होऊ शकेल.

७) सन्मा. सदस्या सौ माधुरीताई आजळकर यांनी मागील स्थायी समिती सभेत निर्णय झ ााल्याप्रमाणे सेवानिवृत्त कर्मचा-यासाठी दरमहा ५ लाख रुपये त्यांच्या अनुषंगिक देयकांसाठी अदा करण्याबाबत कार्यवाही होत नसल्याने याबाबत अंमलबजावणी करण्यांची सुचना केली. यावर म. आयुक्त यांनी निधी बाबत शासनाकडेस प्रयत्न सुरु असून यापुढे यासंदर्भात कार्यवाही करण्यांचे आश्वासित केले.

८) सन्मा.सदस्या सौ. माधुरी ताई आजळकर यांनी त्यांच्या प्रभागातील प्रलंबीत कामांबाबत कार्यवाही होत नसून यात संभाप्पा कॉलनी मधील नाल्याचे काम तसेच अमरधाम मधील दुरुस्ती व शाळा नं. २८ मधील शौचालयांची दुरुस्ती याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करण्यांची मागणी केली.यावर संबंधित ओव्हरसिअर श्री. पी.ढी. चव्हाण यांनी याकामांबाबत विभागामार्फत कार्यवाही सुरु असून सदर कामे तांतडीने पूर्ण करणेबाबत कार्यवाही करणेत येईल असे विदीत केले

९) सन्मा. सदस्य श्री. रमेश महादू बोरसे यांनी वाडीभोकर रस्त्यावरील खड्डे दुरुस्तीबाबत तसेच सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी त्यांचे भागातील श्री. विनोद मोराणकर यांच्या घराजवळील व जयहिंद रस्त्यावरील खड्डे दुरुस्ती बाबत तसेच श्री. शरद वराडे यांनी वरखेडी रोड येथील प्रलंबीत कामाबाबत तक्रारी करुन त्याबाबत कार्यवाही करण्यांची मागणी केली. यावर म. सभापती यांनी अभियंता यांनी याबाबत दखल घेऊन सदर कामाबाबत तांतडीने कार्यवाही करण्यांचे आदेशित केले.

१०) सन्मा.सदस्य श्री. सोनल शिंदे यांनी भविष्यातील संभाव्य पाणी टंचाई लक्षांत घेऊन शहरातील जिवंत असलेल्या विहिरी अधिग्रहित करुन त्यातील दुरुस्ती व गाळ काढणे, तसेच शहरातील बंद असलेल्या बोअरवेल्स पुन्हा दुरुस्त करुन पुर्ववत सुरु करणे इत्यादी कामे केल्यास संभाव्य पाणी टंचाईवर मात करता येईल त्यासाठी याबाबत कार्यवाही करण्यांची मागणी केली. यावर म. सभापती यांनी तांतडीने याकामी कार्यवाही करण्यांचे आदेशित केले.

११) सन्मा. सदस्य सौ.प्रतिभाताई चौधरी यांनी त्यांच्या प्रभागात असलेल्या दलित वस्ती योजने अंतर्गत पाण्याच्या टाक्या असून त्यावर विद्युत मोटारीव्दारे पाणीपुरवठा होतो. परंतु सद्यस्थितीत विद्युत बिल भरले नसल्याने मोटारी बंद आहेत. किरकोळ बिल असून सदर बिल अदा झाल्यास भागातील नागरीकांना पाण्याची सोय होऊ शकते. त्यामुळे याबाबत त्वरीत कार्यवाही करण्यांची मागणी केली. यावर म. सभापती यांनी तांतडीने संबंधित विभागाने बिल भरणेबाबत कार्यवाही करुन विद्युत पुरवठा सुरु करण्यांचे आदेशित केले.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**मंगळवार दिनांक३१ मार्च, २०१५**
**वेळः- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची विशेष सभा आज मंगळवार दिनांक३१/०३/२०१५ रोजी सकाळी ११-००वाजतां मा. श्री. चंद्रकांत बापु सोनार, सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्रीमती अजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ६ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ७ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ८ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ९ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| १० | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| ११ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा.आयुक्त |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त |
| ४. | श्री.बी.बी. गिते | सहा.आयुक्त (अति.) |
| ५. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.ना. कुटे | मुख्य लेखाधिकारी |
| ८. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालय अधिक्षक |
| १२. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी. अधिक्षक |
| १३. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १४. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १५. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६. | श्री. प्रदीप नाईक | प्र. लेखापाल |
| १७ | श्री.सी.एम. उगले | ओव्हर सिअर |
| १८ | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| १९ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| २० | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म. सभापती**:-** सन्मा.सदस्यअधिकारी गण,पत्रकार बांधवयाचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिवः- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज**

सन्मा. सदस्य श्री.चंद्रकांत काशिनाथ केले,श्री.गोविंद तुळशीराम साखला, श्री.संदीप सुरेश पाटोळे यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केलेली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची रजा मंजुर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३२ दिनांक ३१/०३/२०१५**

सन्मा.सदस्य श्री.चंद्रकांत काशिनाथ केले,श्री.गोविंद तुळशीराम साखला, श्री.संदीप सुरेश पाटोळे यांनी अर्जात नमूद केलेल्या कारणास्तव आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केलेली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसारआजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-२३ म.आयुक्त सो.महानगरपालिका धुळे यांनी सन २०१४-२०१५ चे सुधारीत व सन २०१५-१६ चे अंदाजपत्रक सादर केले आहेत. त्यानुसार स्थायी समितीने अर्थसंकल्प अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३३ दिनांक ३१/०३/२०१५**

म. आयुक्त सो.महानगरपालिका धुळे यांनी सन २०१४-२०१५ चे सुधारीत व सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रक सादर केले आहेत.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना तसेच प्रशासनाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव याबाबत विचार केला असता सुचविण्यांत आलेल्या तरतूदी व मनपाचे उत्पन्न यांचा ताळमेळ घेणे अत्यंत आवश्यक आहे.तसेच सन्मा.नगरसेवकांच्या प्रभागात विकास कामांचीही आवश्यकता आहे.या सर्व बाबींचा विचार करुन प्रशासनामार्फत सुचविलेल्या काही तरतूदी खालील लेखा शिर्षाप्रमाणे कमी करण्यांत येत आहेत. तसेच आवश्यक त्या तरतूदीमध्ये वाढ करण्यांची शिफारस करण्यांत येत आहे. मनपाची आर्थिक स्थिती लक्षात घेता सद्यस्थितीत प्रभागातील विकास कामांसाठी प्रत्येकी ५ लक्ष मात्र याप्रमाणे तरतद करण्यात येत आहे. मालमत्ता करापासून येणारे उत्पन्न ७०टक्के प्रशासनाने दर्शविलेले आहे. तथापि सद्यस्थितीत मालमत्ता दरात वाढ करण्यांचा ठराव पारीत करण्यांत आला असून तसेच व्यापारी व व्यावसायीक मालमत्ता धारकांची मोजणी सुरु असून त्यांना त्याप्रमाणे मालमत्ता करआकारणी करण्यांत येणार आहे. याबाबत प्रभावीपणे अंमलबजावणी केल्यास सुमारे ८० टक्के पर्यत मालमत्ता कर वसुली होवू शकते. त्यामुळे सदर मालमत्ता कर वसुली ८०टक्के गृहित धरण्याबाबत शिफारस करण्यांत येत आहे. तसेच अनाधिकृत मोबाईल टॉवर दंड वसुली,अनाधिकृत बांधकाम दंड व विकास शुल्क वसुली करणे,अनाधिकृत नळ कनेक्शन, सुधारीत दराने दुकान भाडे वसुली, इत्यादी माध्यमाव्दारे सुमारे २३ कोटी मात्र उत्पन्न येण्याची शक्यता असल्याने त्याबाबत तरतूद करुन शिफारस करण्यांत येत आहे.

याबाबत प्रशासनाशी चर्चा करुन सन २०१५-१६ या वित्तीय वर्षाचे अंदाजपत्रकात खालील प्रमाणे उत्पन्न व खर्चात वाढ तथा घट अंतिम करुन मे. महासभेकडेस शिफारस करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

| अ.क्र. | लेखाशिर्षे | मे. आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| जमा बाजू | | | | | |
| १ | मालमत्ता कर | १२५५४२००० | १४३४७७००० | १७९३५००० | ० |
| २ | पाणीपटटी | ८९८३८००० | १०२६७२००० | १२८३४००० | ० |
| ३ | पायखाना पटटी | ८३३०५०० | ९५२१००० | ११९०५०० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | झाडकर | ४२७३००० | ४८८३००० | ६१०००० | ० |
| ५ | विशेष शिक्षण कर | १३३०००० | १५२०००० | १९०००० | ० |
| ६ | महाराष्ट्र शिक्षण कर | २६६५२००० | ३०४६०००० | ३८०८००० | ० |
| ७ | रोजगार हमी कर | २५४१००० | २९०४००० | ३६३००० | ० |
| ८ | मोठे निवासी कर | ५२३००० | ५९८००० | ७५००० | ० |
| ९ | अग्निशमन कर | ३८२९००० | ४३७६००० | ५४७००० | ० |
| १० | मलनिस्सारण लाभ कर | २२०६००० | ४५६३००० | २३५७००० | ० |
| ११ | पथकर (रस्ते) | २२०७००० | २५२२००० | ३१५००० | ० |
| १२ | जललाभ कर | २२०६००० | २५२१००० | ३१५००० | ० |
| १३ | मलनिस्सारण कर | २२०६००० | २५२१००० | ३१५००० | ० |
| १४ | दिवाबत्ती कर | २२०६००० | २५२१००० | ३१५००० | ० |
| १५ | अनधिकृत टॉवर दंड वसुली | ० | २००००००० | २००००००० | ० |
| १६ | टॉवर नुतनीकरण फी | ० | ६५०००००० | ६५०००००० | ० |
| १७ | अनधिकृत बांधकामे दंड व विकास शुल्क वसूल करणे | १००००००००० | १२०००००००० | २०००००००० | ० |
| १८ | अवैध नळ कनेक्शन | ० | १००००००० | १००००००० | ० |
| १९ | दुकान भाडयापासून | २९१७००० | १००००००० | ७०८३००० | ० |
| २० | महाराष्ट्र शिक्षण कर रिबेट | ४१३००० | ६०९००० | १९६००० | ० |
| २१ | रोजगार हमी कर रिबेट अनुदान | ४८५०० | ५८००० | ९५०० | ० |
| २२ | नागरी दलीत वस्ती इतरेतर (परिशिष्ट भाग २ अंदाजपत्रक अ भांडवली कामे मध्ये दर्शविलेली आहेत.) | ० | २३०००००० | २३०००००० | ० |
| २३ | विशेष अनुदान (२४१७) (परिशिष्ट भाग २अंदाजपत्रक अ भांडवली कामे मध्ये दर्शविलेली आहेत.) | ० | १२२०००००० | १२२०००००० | ० |
| | एकूण | ३७७२६८००० | ६०६५२६००० | २२९२५८००० | ० |

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मे. आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी | मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|

खर्च बाजू

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | संगणक खरेदी / दुरूस्ती | १०००००० | ५००००० | ० | ५००००० |
| २ | नियुक्ती अधिकारी मानधन | ० | ५००००० | ५००००० | ० |
| ३ | एल बी टी प्रशिक्षण | १००००० | ५०००० | ० | ५०००० |
| ४ | सॅप मशिन खरेदी करणे | २५००००० | १०००००० | ० | १५००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | एलबीटी परतावे | १०००००० | १००००००० | ९०००००० | ० |
| ६ | निवृत्तीवेतन,उपदाने अंशराशीकरण | १२०००००० | ११८५००००० | ० | १५००००० |
| ९ | अग्निशमन गाडयांसाठी डिझेल | २५००००० | १५००००० | ० | १०००००० |
| १० | सी सी टी व्ही कॅमेरे | ० | १०००००० | १०००००० | ० |
| ११ | मोकाट कुत्रे नियंत्रण | २००००० | १००००० | ० | १००००० |
| १२ | निरूपयोगी झाडे तोडणे | २००००० | १००००० | ० | १००००० |
| १३ | अतिक्रमण काढणेचा खर्च | २५००००० | ५००००० | ० | २०००००० |
| १४ | वराह पकडणे | २००००० | ५०००० | ० | १५०००० |
| १५ | मोकाट जनावरे पकडणे | २००००० | ५०००० | ० | १५०००० |
| १६ | सफाई कामगार गाडयांसाठी इंधन | ३५००००० | ३०००००० | ० | ५००००० |
| १७ | गाडयांची दुरूस्ती | २५००००० | १०००००० | ० | १५००००० |
| १८ | नवीन गाडी / जेसीबी | ६०००००० | ३५००००० | ० | २५००००० |
| १९ | सर्जिकल साहित्य / लस खरेदी | २५००००० | ५०००००० | २५००००० | ० |
| २० | महिला लैंगिक छळ निवारण समिती | ० | २००००० | २००००० | ० |
| २१ | प्रयोगशाळा उपकरणे/ साहित्य | ० | ५००००० | ५००००० | ० |
| २२ | औषधे खरेदी / उपकरणे | ७५००००० | ५०००००० | ० | २५००००० |
| २३ | इंधन | २५००००० | १०००००० | ० | १५००००० |
| २४ | झाडे लावणे | २५००००० | १५००००० | ० | १०००००० |
| २५ | शाळा इमारत दुरूस्ती | २५००००० | १०००००० | ० | १५००००० |
| २६ | रस्त्यांच्या दुरूस्त्या | ७५००००० | ६०००००० | ० | १५००००० |
| २७ | अमरधाम / कब्रस्तान दुरूस्ती | १०००००० | २०००००० | १०००००० | ० |
| २८ | शालेय विद्यार्थी गणवेश | २००००० | १०००००० | ८००००० | ० |
| २९ | शालेय साहित्य खरेदी | ० | २२००००० | २२००००० | ० |
| ३० | महापौर चषक व विविध क्रिडास्पर्धा | २५००००० | ३०००००० | ५००००० | ० |
| ३१ | सांस्कृतिक कार्यक्रम | ० | ५००००० | ५००००० | ० |
| ३२ | माग.दुर्बल घटक वर्गणी | ४६६७५०० | ४७२५००० | ५७५०० | ० |
| ३३ | महाराष्ट्र शिक्षण कर | २०६३२००० | २९८५१००० | ९२१९००० | ० |
| ३४ | रोजगार हमी कर | २४१३५०० | २८४६००० | ४३२५०० | ० |
| ३५ | महिला व बाल विकास | ४६६७५०० | ४७२५००० | ५७५०० | ० |
| ३६ | अपंगासाठी ३% राखीव | २८००५०० | २८३५००० | ३५४०० | ० |
| ३७ | म.न.पा.निधी विकास कामे (परिशिष्ट भाग २ अंदाजपत्रक अ भांडवली कामे मध्ये दर्शविलेली आहेत.) | ८०००००० | २०७२००००० | १२७२००००० | ० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३८ | नागरी दलीत वस्ती इतरेतर (परिशिष्ट भाग २ अंदाजपत्रक अ भांडवली कामे मध्ये दर्शविलेली आहेत.) | ० | २३०००००० | २३०००००० | ० |
| ३९ | विशेष अनुदान (परिशिष्ट भाग २ अंदाजपत्रक अ भांडवली कामे मध्ये दर्शविलेली आहेत.) | ४०००००००० | १६२००००००० | १२२००००००० | ० |
| ४० | पाणी पुरवठा | ३७५५००००० | ५३७५५००००० | ५०००००००० | ० |
| | **एकूण** | **३६३८३१०००** | **११२४२८२०००** | **७८०००१९००** | **१९५५००००** |

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक १६एप्रिल, २०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक १६/०४/२०१५रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार, सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्रीमती अजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ६ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ७ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ८ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| ९ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १० | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | प्र.उपायुक्त (कर) तथा सहा.आयुक्त |
| ३. | श्री.एम.आर. सरईत | मुख्य लेखापरीक्षक |
| ४. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त |
| ५. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी् अधिक्षक |
| ११. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १२. | श्री.एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३. | श्री. यु.आर. भोई | उप अभियंता पा.पु |
| १४. | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १५. | श्री.सी.सी.बागुल | ओव्हरसिअर |
| १६ | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| १७ | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १८ | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म. सभापती:- सन्मा.सदस्यअधिकारी गण,पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव:- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.**

यादी देण्यांत येते की, महाराष्ट्राचे भुषण तसेच प्रख्यात सामाजिक प्रबोधनकार डॉ.नानासाो. नारायण धर्माधिकारी यांच्या सुषशा तसेच तिर्थरुप डॉ.अप्पासाो. दत्तात्रय नारायण धर्माधिकारी यांच्या

धर्मपत्नी सौ. माईसाो.अनिताताई दत्रात्रय धर्माधिकारी यांचे काल दि.१५/४/२०१५ बुधवार रोजी दु:खद निधन झाले आहे.आदरणीय सौ.माईसाो. सामाजिक कार्यात सहभागी असत.तसेच त्यांचे कार्य रेवदंडा,अलिबाग ता.रायगड येथून चालत असे.यामुळे आजच्या सभेत श्रध्दांजली ठराव पारीत करण्यांत यावा.

**सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी**

**म. सभापती** सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार दोन मिनिटे मौन राहून श्रध्दांजली सर्मपित करण्यांत यावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३४ दिनांक १६/४/२०१५**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार महाराष्ट्राचे भुषण तसेच प्रख्यात सामाजिक प्रबोधनकार डॉ.नानासाो.नारायण धर्माधिकारी यांच्या सुषशा तसेच तिर्थरुप डॉ. अप्पासाो. दत्तात्रय नारायण धर्माधिकारी यांच्याधर्मपत्नी सौ. माईसाो. अनिताताई दत्रात्रय धर्माधिकारी यांचे काल दि. १५/४/२०१५ बुधवार रोजी दु:खद निधन झाले आहे.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांकडून आलेली अभिनंदनाची यादी**

धुळे महानगरपालिकेचे भांडार विभागातील कर्मचारी श्री.राजेंद्र माईनकर यांची धुळे ग.स. बॅक निवडणूकीत मताधिक्याने संचालकपदी निवड झाली.ग.स बॅकेज मानपाला प्रतिनिधीत्व मिळून शहराच्या महत्वपर्ण बॅकेचे संचालक पदी निवड झाल्याबद्दल श्री.राजेंद्र माईनकर यांचा अभिनंदनाचा ठराव आजच्या बैठकीत पारीत करण्यांत यावा ही विनंती.

सुचक सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी स्थायी समिती सदस्या मनपा धुळे

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार श्री. राजेंद्र माईनकर यांचा अभिंनदनाचा ठराव मंजूर करण्यांत यावा.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३५ दिनांक १६/४/२०१५**

सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार धुळे महानगरपालिकेचे भांडार विभागातील कर्मचारी श्री. राजेंद्र माईनकर यांची धुळे ग.स.बॅक निवडणूकीत मताधिक्याने संचालकपदी निवड झाली.ग.स बॅकेत मनपाला प्रतिनिधीत्व मिळून शहराच्या महत्वपर्ण बॅकेचे संचालक पदी निवड झाल्याबद्दल श्री.राजेंद्र माईनकर यांचा अभिनंदनाचा ठराव मंजूर केला. व त्यांना भावी वाटचालीस हार्दीक शुभेच्छा दिल्यात.

**सर्वानुमते मंजुर**
**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा.सदस्यांकडून आलेले रजेचे अर्ज**

सन्मा.सदस्य श्री.चंद्रकांत काशिनाथ केले, श्री. शरद एकनाथ वराडे इत्यादी सदस्यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३६ दिनांक १६/०४/२०१५**

सन्मा.सदस्य श्री.चंद्रकांत काशिनाथ केले, श्री. शरद एकनाथ वराडे इत्यादी सदस्यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**सही/-x x x**

**सभापती**

**स्थायी समिती**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

म. नरेंद्र परदेशी — मागील पंधरा वाडयात१३६ कोटी योजनेचे पाईप लाईनच्या बेकायदेशीर कामाबाबत सभापतींनी स्वत:पुढाकार घेऊन याबाबत कार्यवाही केलेली आहे. संबंधित ठेकेदाराला ७.५० कोटी रुपयांचे बील दिले गेले. ठेकेदाराने करारनाम्याचे उल्लंघन केलेले आहे. चारीचे काम तसेच वापरण्यांत आलेले पाईप निकृष्ठ दर्जाचे आहे.सदरचे पाईप काढून घेण्यांत यावे. बील फुगवून केलेले आहे. सदर बिलाची चौकशी करण्यांत यावी. तो पर्यत ठेकेदाराला कोणतेही बिल अदा करण्यांत येऊ नये. फक्त पाईप टाकून आलेली शासनाचे ५५ कोटी खर्च करावयाचे हा ठेकेदाराचा हेतु आहे. याबाबत चौकशी समिती नेमली आहे. त्यांचे काय झाले. श्री.पठारे सो.यांचेकडेस ते काम देण्यांत आले होते.आपण जलकुंभाचे उद्घाटन केले. ते काम सुरु झालेले नाही. आदेश डावलून काम सुरु आहे. कामाची पध्दत व क्वॉलिटी तीच आहे.या बाबत ठोस निर्णय होणे आवश्यक आहे. आपल्याला फौजदारी गुन्हा दाखल करण्यांचा अधिकार आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

म. सभापती — मी कामानिमित्त देवपूर भागात गेलो होतो. वलवाडी शिवारात काम सुरु होते. मी कामाची पहाणी केली व काम थांबविले.त्याठिकाणी आयुक्त व श्रीृ बागुल उपस्थित होते. तुम्ही मांडलेला विषय चांगला आहे. त्याही ठिकाणी गुणवत्तेप्रमाणे काम होत नव्हते. मी संबंधित ठेकेदाराला नोटीस देणेबाबत आदेशित केलेले आहे. मी आजच्या बैठकीत सदर विषय अजेंडयावर घेणार होतो. परंतु यासंदर्भातील कागदपत्रे अपूर्ण होते म्हणून विषय घेतला नाही. आपण ठेकेदारावर डायरेक्ट कार्यवाही केल्यास ते कायदेशीर दृष्टया अडचणीचे होऊ शकते त्यासाठी यासंदर्भातील आवश्यक ते रेकॉर्ड गोळा करण्यांत येत आहे.काल आमची बैठक झ ाली. यात पीएमसीचे म्हणणे होते की, ठेकेदार आमचे ऐकत नाही. याबाबत पीएमसीकडून लेखी घेण्यांचे आदेश दिलेले आहेत.आलेल्या शासन अनुदानातून प्रथम सात जलकुंभ एमबीआर व मुख्य वितरण वाहिनीचे काम करण्यांचे आदेश दिलेले आहे. याकामासाठी लागणारा निधी राखीव ठेवण्यांत यावा.

म. नरेंद्र परदेशी — या प्रकरणाचा शेवट केल्याशिवाय माघार घेऊ नये. मी उगाच आरोप करीत नाही. ठेकेदाराने करारनाम्यांचा भंग केलेला आहे. त्यावर प्रशासनाने कार्यवाही करावी. ठेकेदाराला नोटीस दिलेली आहे का?

म. सभापती — ठेकेदाराने कामासाठी जे मुरुम वापरले व ज्यांच्याकडून मुरुम घेतले त्यांच्या रॉयल्टीच्या पावत्या तपासणी करण्यांत येणार आहे.

म. नरेंद्र परदेशी — ठेकेदारानें केलेल्या संपूर्ण कामाचे छायाचित्र व व्हिडिओ रेकॉर्डींग मागविण्यांत यावे.

म. सभापती — काम नियमाप्रमाणे नसेल तर त्यांच्यावर कारवाई करण्यांत यंईल.ज्या पध्दतीने एम.बी. रेकॉर्ड करण्यांत आलेली आहे. त्याच पध्दतीचे काम ठेकेदाराकडून करुन घेण्यांत येईल अन्यथा त्यांचेवर कार्यवाही करु.

म. नरेंद्र परदेशी — वापरण्यांत येणारी पाईप लाईनच्या गुणवत्तेबाबत खात्री झाली आहे का?

म. सभापती — मनपाचा एकही अधिकारी सदर योजनेच्या कामावर नाही. फक्त दरेवार व पीएमसी मार्फत सदर कार्यवाही सुरु आहे. आता या कामासाठी श्री. भोई, श्री. पी.डी.चव्हाण, श्री. सी.सी. बागुल यांची नियुक्ती केलेली आहे.

म. नरेंद्र परदेशी — कोणत्या कंपनीचे पाईप टाकण्यांत येत आहेत. याबाबत माहिती अहवाल आहे का?

म. भोई सो. — बिलासोबत थर्ड पार्टी इन्स्पेक्शनचे रिपोर्ट जोडलेले आहेत.

| | |
|---|---|
| म. सभापती | सदर कामासाठी चौकशी समिती नेमलेली आहे. या चौकशी समितीत स्थायी समिती सदस्य व अधिकारी असणे आवश्यक आहे. सदर योजना ही शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण योजनाआहे.यात सर्व प्रथम ठरल्याप्रमाणे सात जलकुंभ एमबीआर व मुख्य वितरण वाहिनीचे काम करण्यांत यावे. |
| म. नरेंद्र परदेशी | यापुढे कोणत्याही पाईप लाईनचे काम व बिल स्विकारु नये. काम गुणवत्तापूर्ण नसल्याने दंडात्मक कार्यवाही करावी.याबाबत दबाव येऊ शकतो.तरी प्रामाणिकपणे कार्यवाही करण्यांत यावी. |
| म. सभापती | काम पारदर्शीपणे होईल व काम स्पेसिफिकेशनप्रमाणे होईल. तरच ते बील ग्राहय धरण्यांत येईल. आपण जी चौकशी समिती नेमली होती. त्याबाबत अहवाल दयावा. |
| म. प्रदीप पठारे | ज्यांच्या बिलावर स्वाक्ष-या आहेत त्यांना नोटीस देऊन यासंदर्भात लेखी खुलासा सादर करणेबाबत कळविले होतें. संबंधितांनी खुलासा सादर करणेसाठी कागदपत्राची मागणी केलेली आहे. याबाबत एम.जी.पी. कडून चौकशी करणेबाबत निर्णय झालेला आहे. |
| म. सभापती | आपण प्रथम प्राथमिक चाकशी करावी जे बील अदा केलेले ते मोजमापाप्रमाणे जागेवर झाले आहे का? याबाबत स्थायी समिती सदस्यांसह पाणी व चौकशी करावी. |
| म. नरेंद्र परदेशी | वापरण्यांत आलेल्या पाईप बाबत गुण नियंत्रण विभाग, नाशिक यांचेकडून तपासणी करणेत यावी. |
| म. प्रदीप पठारे | माझ्या मदतीतला ओव्हर सिअर दिलेले आहे. परंतु आपल्याकडे आवश्यक ती यंत्रणा नसल्याने चौकशीचे काम शक्य होत नाही. |
| म. नरेंद्र परदेशी | श्री. कैलास शिंदे यांचेकडेस याबाबत जबाबदारी देण्यांत यावी. |
| म.सभापती | श्री. शिंदे यांनी याबाबत माहिती द्यावी. |
| म.कैलास शिंदे | सदर कामाचे रेकॉर्डींग वरिष्ठ अधिका-यांनी केलेले आहे.त्यामुळे कनिष्ठ अधिका-यांनी केलेली तपासणी योग्य राहणार नाही. व ती कायदेशीरदृष्टया ग्राहय होणार नाही. |
| म. सभापती | मनपाच्या माध्यमातून प्रथम प्राथमीक तपासणी करणे आवश्यक आहे. त्यानंतर एमजीपी कडून व शासनाकडून तपासणी होणार आहे. या तिन्ही तपासणीत समतोल असणे आवश्यक आहे.श्री. कैलास शिंदे व ओव्हरसिअर यांनी पठारे सो. यांना प्राथमीक तपासणीसाठी सहकार्य करावे. मोजमापाप्रमाणे व स्पेसिफिक्शनप्रमाणे काम तपासावे. |
| म. प्रतिभाताई चौधरी | पठारे सो.यांनी काय चौकशी केली याचा अहवाल समितीच्या सदस्यांना देण्यांत यावा. |
| म. सभापती | सदर चौकशी आपल्या सदस्यांसमवेत केली जाईल. |
| म. प्रतिभाताई चौधरी | सेवानिवृत्त शिक्षक थकीत पेन्शनसाठी आपल्याकडे आलेले आहेत. याबाबत काय कार्यवाही केली त्यांना दरमहा पेन्शन देणेबाबत आयुक्तांना आदेश करावा. |
| म. सभापती | याबाबत पेन्शन धारकांशी मिटींग संपल्यानंतर चर्चा करण्यांत येणार आहे. |
| म. रमेश बोरसे | मी या आधी फिल्टर प्लँट बसविणेबाबत मागणी केलेली होती. त्यांची डिझाईन कधी येईल याबाबत खुलासा करावा. |
| म. यु.आर. भोई | फिल्टर प्लॅन पूर्वीच्या अंदाजपत्रकांत नव्हते.आपल्या आलेल्या अनुदानातून जी बचत होईल त्यातून सदर काम होणार आहे. याबाबत पीएमसीला आदेश दिलेले आहेत. येत्या आठवडा भरात सदर डिझाईन येणार आहे. |
| म. रमेश बोरसे | सदर काम तांतडीने करणे गरजेचे आहे. त्यामुळे तापी योजनेसाठी येणा-या विद्युत बिलात बचत होणार आहे. |
| म. संदीप पाटोळे | आपण मागे अंदोलनातील ९ कर्मचा-यांना निलंबीत करण्यांचा ठराव केला. या १३६ कोटी च्या कामात जे अधिकारी दोषी असतील त्यांना निलंबीत करावे. याकामाच्या चौकशीसाठी त्रिसदस्य समितीला मदतीला घ्यावे.आज संपूर्ण शहरात२०० ते २५० विद्युत पोल बंद आहेत.कर्मचारी लक्ष देत नाही. कामात कचुराई केली तर आंदोलन करतात. अग्रसेन पुतळा ते दसेरा मैदान तसेच फाशी पुल ऐंशीफुटी रोड येथील लाईट १२ तारखेपासून बंद आहेत. |

|  |  |
|---|---|
|  | सिताराम माळी चाळ येथील लाईट बंद आहेत तक्रार देऊनही कार्यवाही होत नाही. तसेच आमच्या प्रभागात पाणीपुरवठा अनियमित झालेला आहे. चौकशी केली असता पंपींग मशिनची वायर जळाली आहे असे सांगण्यांत आले मी याबाबत श्री. चव्हाण यांना फोन केला दोन दिवस कामाला विलंब झाला.भागात पाणीपुरवठा झाला नाही. याबाबत कार्यवाही करावी. |
| म. सभापती | आपण याबाबत लेखी स्वरुपात तक्रार दयावी. संबंधितांवर कार्यवाही केली जाईल. |
| म. विद्युत अभियंता | लाईट बंद बाबत भागातील वायरमन यांना सुचना दिलेली आहे.लाईन फॉल्ट झाल्यामुळे लाईट बंद झालेले आहेत. याबाबत एम.एस.ई.बी.ला कळविलेले आहे. आपल्या सुचनेनुसार कार्यवाही केली जाईल. |
| म.अमीन पटेल | शहरात साथीच्या रोगाची साथ सुरु आहे.डांस व मच्छरांचे प्रमाण वाढलेले आहे. फॉगींग व फवारणीचे काम करण्यांत येत नाही.भागातील पथदिवे रात्री १० वाजतां बंद होतात. आपण शहरात एल.ई.डी.बसविणेबाबत प्रस्ताव केलेला होता. यामुळे विद्युत बिलात बचत होणार आहे. |
| म. विद्युत अभियंता | विद्युत देखभाल दुरुस्तीसाठी ४थ्यादा निविदा काढलेली आहे. या महिनाअखेर पर्यत मुदत आहे.शहरात बी.ओ.टी.तत्वावर एल.ई.डी. दिवे बसविण्याबाबतचा प्रस्तावावर कार्यवाही सुरु आहे. सदर प्रस्ताव उपायुक्त सो. यांचेकडेस ठेवण्यांत आलेला आहे. |
| म. सभापती | सदर प्रस्तावाबाबत तांतडीने कार्यवाही करावी व अहवाल सादर करावा. |
| म. अमिन पटेल | माझ्या प्रभागातील १३६ कोटी रुपयांच्या कामाचा सर्व्हे करावा. ठेकेदार फोन उचलत नाही. फवारणी व फॉगींग बाबत खुलासा करावा. |
| म. सहा. आरोग्याधिकारी | फवारणीचे काम शहरात सुरु आहे. प्रत्येक भागात ८ ते १० दिवसात फवारणी करण्यांत येते. याबाबत नागरीकांच्या सहया घेण्यांत येतात. |
| म. सभापती | फवारणीबाबत गांभिर्याने कार्यवाही करावी. स्लम एरिया व दाट लोकवस्तीच्या भागाकडे लक्ष देण्यांत यावे. |
| म. अमोल मासुळे | पाणीपुरवठयाचा भोंगळ कारभार सुरु आहे. पाणीपुरवठा अनियमीत सुरु आहे. श्री. चव्हाण फोन उचलत नाही. एक पंप चालू एक पंप बंद असे नेहमीच उत्तर असते. यामुळे मानसिक त्रास होत आहे. याबाबत मिटींग घेऊन ठोस कार्यवाही करणे आवश्यक आहे. मिल परिसरात ५० ते ६० हजार लोकवस्ती आहे.भागात छगन नावाचा व्हालमन असून त्याचा फोन बंद असतो. याबाबत मी तक्रार केली परंतु काही कार्यवाही झालेली नाही. यावर ठोस कार्यवाही व खुलासा करावा. |
| म.पी.डी. चव्हाण | मागील आठवडयात पाणीपुरवठा बंद होता. मालेगांव टाकी येथे ४० एच.पी. कॅपेसिटीचा पंप बसविणे आवश्यक आहे.प्रत्येक टाकीला वेगवेगळे पंप बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल. |
| म. सभापती | पाणीपुरवठयाबाबत काटेकोर नियोजन व दक्षता घेण्यांत यावी. कामात कुचराई करणा-या कर्मचा-यांवर कारवाई करावी. |
| म. माधुरी अजळकर | आमच्या प्रभाग क्रं. ३२ येंथे सार्वजनिक शौचालय तयार आहे. परंतु ड्रेनेजचे काम अद्याप बाकी आहे. त्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा करावा. |
| म. पी.डी. चव्हाण | कामाचे अंदाजपत्रक तयार आहे. परंतु टी.एस. नसल्यामुळे काम प्रलंबीत आहे. श्री दरेवार साहेब रजेवर असल्याने टी.एस.चे काम झालेले नाही. |
| म. सभापती | आपण टी.एस.ची जबाबदारी कोणाला देऊ शकतो का?नसल्यास टी.एस.साठी प्रस्ताव एम.जी.पी. कडे प्रस्ताव पाठवावा. |
| म. माधुरी अजळकर | आमच्या प्रभागात फार मोठया प्रमाणत गरीब व दलित वस्ती आहे.या भागात दलित वस्तीसाठी असलेला निधी देण्यांत यावा.तसेच बजेट मध्ये माझ्या भागातील कामांचा समावेश करावा. मी याबाबत आपल्याकडेस पत्र सादर करीत आहे. |

| | |
|---|---|
| म.प्रतिभाताई चौधरी | शहरात खड्डे बुजविण्यांचे काम सुरु आहे. परंतु माझ्या प्रभागात खड्डे बुजविण्यांचे काम सुरु झालेले नाही.विनोद मोंराणकर यांच्या घराजवळील रस्त्यावरतसेच लॉ कॉलेज व सोना प्रोव्हीजन जवळील रस्ता अत्यंत खराब आहे.सदर काम अद्याप झालेले नाही. आमच्या भागातून जास्तीत जास्त कर भरण्यांत येतो.परंतु नागरी सुविधा नाही. |
| म. सभापती | अभियंता यांनी याबाबत तांतडीने कार्यवाही करावी त्वरीत टेंडर काढावे. |
| म. अमोल मासुळे | फाशीपुल ते चितोड रस्त्यावरील खड्डे बुजविणेबाबत काय कार्यवाही झाली याबाबत खुलासा करावा. |
| म. पी.डी. चव्हाण | एस्टीमेंट मंजूर आहे. टेंडर काढण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. |
| म. सभापती | आजच्या आज टेंडर काढण्याबाबत कार्यवाही करावी. |
| म. प्रतिभाताई चौधरी | पावसाळा सुरु होण्याच्या आधी खड्डें बुजविणेबाबत कार्यवाही करावी. |
| म. सोनल शिंदे | पाणीपुरवठा ठेकेदार व पी.एम.सी.हे महापालिकेची दिशाभूल करीत आहेत.फिल्टर प्लॅटबाबत अनिश्चितता आहे. |
| म. सभापती | पहिल्या प्रस्तावात फिल्टर प्लॅट नव्हता. उरलेल्या रकमेतून सदर काम करण्यांत येणार आहे. |
| म. सोनल शिंदे | राजवाडे बॅक ते शिवाजी पुतळा येथील रस्त्याचे काम विशेष निधीतून घेण्यांत आलेले आहे. सदर काम अर्धवट आहे. सदर काम तांतडीने करण्याबाबत कार्यवाही करावी. अन्यथा ठेकेदारावर कार्यवाही करावी. |
| म. संदीप पाटोळे | दरवेळेस ठेकेदारांवर कार्यवाही करण्याचे आदेश केले जातात. पण कार्यवाही होत नाही यावर तांतडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. |
| म. सभापती | अर्धवट काम केलेल्या ठेकेदारांना तांतडीने नोटीसा द्याव्यात व त्याबाबत आमच्याकडेस अहवाल समक्ष सादर करावा. |
| म. संदीप पाटोळे | आमच्या प्रभागात नवीन लेआऊट झालेले आहेत.तेथे नागरी वस्ती वाढलेली आहे. सदर भागात पाईप लाईन टाकण्यांत यावी.नळपट्टीव्दारे महानगरपालिकेलाही मोठयाप्रमाणावर फायदा होईल. सोन्या मारुती कॉलनी येथे पाईप लाईन टाकण्यांत यावी. |
| म. रमेश बोरसे | देवपूर भागात पाण्याची समस्या निर्माण झालेली आहे. नवरंग टाकी येथे व्हाल बसविण्यांची कार्यवाही झालेली नाही.पांझरा पंपींग येथून देवपूर भागाला देण्यांत येणारे पाणी मोगलाईकडे वळविण्यांत येते. यासाठी वाडीभोकर रोड जवळ व्हॉल बसविण्यांत यावा, दररोज पाणी वळविण्यांत येवू नये. आवश्यकता असल्यास सोडावे. |
| म. सभापती | संबधिंतांनी याबाबत नोंद घ्यावी. विषय पत्रिकेवरील विषयाला नगरसचिव यांनी सुरुवात करावी. |

**सही/-x x x**
**सभापती**
**स्थायी समिती**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-२४ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.(दि.१९/०३/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३७ दिनांक १६/०४/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती दिनांक १९/०३/२०१५ च्या सभेतील धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २० ते २४ दिनांक १९/३/२०१५ अखेर तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांकः-२५** मे. स्थायी समिती ठराव क्र.८४ दि.७/११/१४ अन्वये समिक्षा कं.कंपनी, ठाणे व आस्था स्वयं.सेवा सह.संस्था,धुळे यांना काळया यादीत टाकण्यात येऊन त्यांचे देय बिले

थांबवण्यात आलेले आहे.त्यासंदर्भात मनपा वकीलांचा अभिप्राय मागविण्यांत आलेला आहे. त्यासंदर्भात विचार विनिमय करुन निर्णय घेणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३८ दिनांक १६/४/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मे.स्थायी समिती ठराव क्र.८४ दि.७/११/१४ अन्वये समिक्षा कं. कंपनी, ठाणे व आस्था स्वयं.सेवा सह.संस्था, धुळे यांना काळ्या यादीत टाकण्यात येऊन त्यांचे देय बिले थांबवण्यात आलेले आहे.समिक्षा कंपनी यांच्यामार्फत शहरातील घनकचरा उचलण्याचे काम दि.१/१२/१४पासुन बंद केले आहे.आस्था स्वयं.सेवा सह.संस्था यांच्याकडील सुरु असलेले काम बंद करुन पर्यायी व्यवस्था करणे बाबत संदर्भीय दि.१७/११/१४ अहवाल सादर केला असता त्यावर मनपा विधीतज्ञ यांचे कायदेशीर मत मागवुन शासन निर्णयातील बाबी तपासुन फेर सादर करण्याबाबत आदेशीत केले आहे. तसेच उक्त विषय क्र.२ नुसार मनपा विधीतज्ञांचे मत मागवुन पुढील बैठकीत अहवाल सादर करणे बाबत आदेशीत केले आहे.

ॲड.श्री.समिर पंडीत यांनी दि.१४/१२/१४ रोजी कायदेशीर मत दिले असुन त्यात त्यांनी ठरावात कुठेही असे दिसुन आले नाही कि, संबंधीत ठेकेदारांनी नेमक्या कोणत्या अटी-शर्तीचे उल्लंघन केले आहे,ठेकेदार यांना नोटीस देऊन बाजु मांडण्याची संधी दिलेली नाही, एखादा करार मुदतपुर्व रद्द करावयाचा असला तर संबंधीतांना त्यांची बाजु मांडण्याची संधी दिली जाणे त्यास त्यावरील आरोप स्पष्ट करणे त्यांनी मांडलेली बाजु व त्यावरील आरोप यांची शहानीशा करणे आणि मगच योग्य तो निर्णय घेणे नैसर्गिक न्यायप्रक्रियेचा विचार करणे आवश्यक आहे.अन्यथा घाईघाईने घेतलेला एकतर्फी निर्णय न्यायालयीन प्रक्रियेत टिकु शकत नाही. आणि अशा वेळी मनपाचे नुकसान होऊ शकते. मुदतपुर्व ठेका रद्द करणे किंवा ठेकेदारास काळ्या यादीत टाकणे हा निर्णय ठेकेदारांच्या दृष्टीने आर्थिक नुकसान करणारा ठरु शकतो. त्यामुळे ठेकेदार जर न्यायालयात दाद मागण्यास गेले तर न्यायालय वरील प्रमाणे नमुद केलेल्या नैसर्गिक न्यायतत्वाच्या बाबींचे पालन झाले किंवा नाही या गोष्टी प्राधान्याने लक्षात घेण्याची दाट शक्यता आहे.त्यामुळे कोणताही निर्णय घाईघाईने घेणे हे मनपाच्या हिताचे नाही असा अभिप्राय सादर केलेला आहे.

महाराष्ट्र शासन सार्वजनीक बांधकाम विभाग शासन निर्णय क्र./संकीर्ण/०५ /०६/प्र.क्र.-५३/इमा-२ मंत्रालय दि.२८ सप्टें. २००६ च्या परिपत्रकानुसार कंत्राटदाराने निविदा करारातील अटी शर्तीचे पालन न केल्यास तसेच त्यांच्या कामात गुणात्मक दर्जा न राखल्यास कामात गैरप्रकार केल्यास कंत्राटदाराला पदावनत करणे, नोंदणी रद्द करणे, दंड लावणे किंवा काळ्या यादीत टाकण्याचे अधिकार नोंदणी प्राधिकाऱ्याला देण्याच्या दृष्टीने शिक्षेच्या तरतुदीची आवश्यकता निर्माण झाली आहे. व त्यात खालील प्रमाणे कार्यवाहीचे प्रकार नमुद केलेले आहे.

१) ताकीद २) पदावनती ३) नोदणी रद्द करणे ४) काळ्या यादीत टाकणे. अशा स्वरुपाची टप्प्या टप्प्याने कारवाई करणे नियमानुसार व शासन आदेशानुसार आवश्यक आहे.

मे.समिक्षा कंपनी ठाणे, यांना मे.स्थायी समिती ठराव नं.१४ दि.३०/३/२०१३ जा.क्र./धुमपा/आरोग्य/ १२० / १३-१४ दि.१४/५/१३ अन्वये दि.१/६/२०१३ पासुन १ वर्षे (सुरुवातीला १ वर्ष व काम समाधानकारक असल्यास पुढील ४ वर्ष) म.न.पा.कार्यक्षेत्रातील घनकचरा उचलण्याचा रुपये ७८०/- प्रती मेट्रीक टन प्रमाणे कार्यादेश दिलेले होते.

यांना त्यांनी काम सुरु केल्यापासुन जुन २०१३ पासुन ते ऑगस्ट २०१४ पर्यंत त्यांनी काही भागातील कचरा न उचलल्या गेल्यामुळे संबंधीत भागातील स्व.निरीक्षक यांच्या अहवालानुसार त्यांना एकुण रु.८,९९,५७८/- दंड करण्यात आला असुन त्यांच्या देय बिलातुन सदर रक्कम कपात करण्यात आली आहे.या बाबत त्यांनी कोणत्याही प्रकारची हरकत घेतलेली नाही व सुचनेप्रमाणे काम करुन दिलेले आहे. तसेच कार्यालयामार्फत त्यांनी

स्वच्छतेच्या व्यतिरीक्त इतरही कामे सांगितल्यास ते त्यांनी वेळेवर करुन दिलेले आहे. त्यांना शोकॉज किंवा कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली नाही. परंतु कामाबाबत जे जे आदेश दिलेले आहे त्याचे पालन केलेले आहे.

उक्त पुढील ४ वर्षाची मुदत संपलेली नाही. प्रशासनामार्फत शहराचे ४ झोन पाडुन एकत्रीत ठोक रकमेवर नवीन ठेकेदार नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे. या बाबत त्यांनी या पुर्वी हरकत घेतलेली नाही. त्यांना उक्त ठरावाने काळ्या यादीत टाकल्याने वकीलांच्या मते ते न्यायालयात गेल्यास अडचण येऊ शकते. तरी त्यांचे मुदतसंपेपर्यंत काम सुरु ठेवणे किंवा नविन निविदा प्रक्रिया सुरु ठेवणे याबाबत योग्य निर्णय होण्याबाबत अहवाल मे. स्थायीसमितीपुढे सादर करण्यात आलेला आहे.

तसेच मे.आस्था स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, धुळे यांना

१) **कामगार सेवा पुरविणे :-** जा.क्र./धुमपा/आरोग्य ९४ दि.६/११/२०१२ अन्वये मलेरीया विभागातील व आरोग्य विभागातील कामगार सेवा पुरविण्याचे एका कामगाराचे दर प्रती दिवस रु.१७१.१२/- प्रमाणे काम दिलेले आहे. त्यांची मुदत दि. ३०/०९/२०१३ रोजी संपली आहे. नविन ठेकेदार नेमण्याची प्रक्रिया सुरु आहे.

२) **सुलभ शौचालयः-**साफसफाई देखभाल करणे एकुण२४ युनिट कार्यरत आहे. साफसफाई बाबत तक्रार आल्यास त्यांच्या विरुध्द दंडात्मक कार्यवाही केली आहे. तसेच काही युनिट त्यांच्याकडुन काढुन अन्य संस्थेस देण्यात आलेले आहे. त्यांना ७ वर्षाच्या मुदतीसाठी देण्यात आले असुन सरासरी त्यांची १ वर्षाची मुदत बाकी आहे. मुदत संपल्यानंतर नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात येईल.

३) **गांडुळखत प्रकल्प देखभाल व खत तयार करणेः-** जा.क्र./धुमपा/आरोग्य/४१७ दि. २५/८/२०१४ अन्वये उक्त काम देण्यात आले असुन त्यांनी दि.१/९/१४ पासुन काम सुरु केलेले आहे.त्यांनी खत गाळणी, साफसफाई, मशिनरी दुरुस्ती, मोटार दुरुस्ती करुन मजुर लावलेले आहे. आतापर्यंत अंदाजे १८० ते २०० मे.टन खत गाळणे झालेले आहे. त्यांना अद्याप कोणत्याही प्रकारे देय बिल अदा केलेले नाही.

शासन निर्णय व मा.विधीतज्ञ यांच्या मतानुसार पुढील योग्य तो निर्णय घेण्यासाठी प्रस्ताव मे. स्थायी समितीसमोर सादर झालेलाआहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार उक्त दोन्ही संस्थांना काळया यादीत टाकणेबाबत स्थायी समिती ठराव क्र.८४ दि. ७/११/२०१४ अन्वये ठराव पारीत झालेला होता.तसेच पुनश्च स्थायी समिती ठराव क्र.१०६ दि.३१/१२/२०१४अन्वये उक्त संस्थांना ठरावानुसार कार्यवाही करणेबाबत मनपा वकिलांचे कायदेशीर अभिप्राय घेवुन कार्यालयीन अहवालासह पुढील बैठकीत याबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत ठराव पारीत झालेला होता.सदर ठरावानुसार सदर प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर सादर करण्यात आलेला आहे.मनपा वकिल श्री. समिर पंडीत यांच्या कायदेशीर अभिप्रायानुसार संबंधित ठेकेदारांवर प्रस्तावित होणारी कारवाई ही नैसर्गिक न्याय प्रक्रियेच्या तत्वानुसार नसल्याने याबाबत निर्णय घेणे मनपाच्या हिताचे नाही. तसेच सदर ठेकेदारांना काळया यादीत टाकण्यापुर्वी शासन परिपत्रकाप्रमाणे व नियमांप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु त्याप्रमाणे प्रशासनामार्फत कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे काळया यादीत टाकण्याची कारवाई झाल्यास ठेकेदार न्यायालयात गेल्यास अडचण निर्माण होवु शकते.असा अभिप्राय प्रशासनामार्फत सादर झालेला आहे.उक्त बाबींचा विचार करता संबंधित ठेकेदारांवर प्रस्तावित केलेली कार्यवाही ही नियमानुसार नसल्याने मे. समिक्षा कंपनी, ठाणे व आस्था स्वयंरोगार सेवा सहकारी संस्था, धुळे यांना काळया यादीत टाकणेबाबत प्रस्तावित केलेली कार्यवाही रद्द करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

तसेच त्यांनी यापुर्वी केलेल्या कामाचे नियमानुसार होणारे देयके अदा करण्यास मान्यता देण्यात येतआहे.याबाबत काही तक्रारी किंवा आक्षेप असल्यास नियमाप्रमाणे त्यांच्याकडुन दंडात्मक रक्कम वसुल करण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच उर्वरीत कालावधीसाठी करावयाच्या कामाबाबत प्रशासनाने पुढीलउचित निर्णय घ्यावा.

उक्त प्रस्ताव चर्चेस आला असता यांस सन्मा सदस्य श्री. नरेंद्र परदेशी यांचा प्रस्तावास विरोध दर्शविलेला असुन त्यांचा विरोध नोंदवुन सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यात येत आहे. **बहुमताने मंजुर**

**सही/-x x x**

**सभापती**

**स्थायी समिती**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांक:- २६** धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.५ मध्ये शिवराय नगर, रामनगर येथील रस्ते डांबरीकरण करणे व कॉक्रीट गटार करणेचे एस्टीमेट रु.४८,४८,७३६/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ३९ दिनांक १६/४/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपा हद्दीतील प्रभाग क्रं.५ मध्ये शिवराय नगर, रामनगर येथील रस्ते डांबरीकरण करणे व कॉक्रीट गटार करणेचे एस्टीमेट रु.४८,४८,७३६/-मात्र खर्चाची सन२०१५-१६ च्या अर्थसंकल्पात तरतूद करुन सदर खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर**

**सही/-x x x**

**सभापती**

**स्थायी समिती**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक ११ जून ,२०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक११/०६/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार,सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ६ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ७ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ८ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| ९ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ.श्री. नामदेव भोसले | आयुक्त |
| २. | श्री. डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त कर |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त कर |
| ४. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ५. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ६. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ७. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालयीन अधिक्षक |
| ८. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी्र अधिक्षक |
| ९. | श्री. के.जी. खंदरकर | वसुली अधिक्षक |
| १०. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| ११. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १२. | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १३. | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १४. | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |
| १५. | श्री.एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| १६ | श्री. संजय गुजर | भांडारपाल ( आरोग्य विभाग ) |
| १७ | श्री. तुषार ढाके | सहा. अग्नीशमन अधिकारी |
| १८ | श्री. बी.एस. रनाळकर | वरिष्ठ सहा.बांधकाम विभाग तथा प्र. लेखापाल |

म. सभापती:- सन्मा.सदस्य अधिकारी गण,पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यककोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव:- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म.सभापती आजच्या सभेस जे अधिकारी अनुपस्थितीत आहेत त्यांच्या रजेबाबत खात्री करुन अनुपस्थितीत अधिका-यांना तात्काळ नोटीस देणेबाबत आस्थापना विभागाने कार्यवाही करावी. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

यादी देण्यांत येते की, धुळे मनपाचे आरोग्याधिकारी डॉ. महेश मोरे यांचे वडील माधवराव बंडू मोरे यांचे तसेच सहा. आरोग्याधिकारी श्री. रत्नाकर माळी यांच्या मातोश्री स्व. जमुनाबाई धोंडू माळी यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे. त्यांना आजच्या बैठकीत श्रध्दांजली सर्मपित करुन तसा ठराव पारीत करावा.

सुचक :- श्री.अमोल मासुळे, सदस्य

अनुमोदकः- श्री. संदीप सुरेश पाटोळे सदस्य

म. सभापती — सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार श्रध्दाजली अर्पण करण्यांत यावी.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर४० दिनांक ११/०६/२०१५**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार धुळे मनपाचे आरोग्याधिकारी डॉ.महेश मोरे यांचे वडील माधवराव बंडू मोरे यांचे तसेच सहा. आरोग्याधिकारी श्री.रत्नाकर माळी यांच्या मातोश्री स्व. जमुनाबाई धोंडू माळी यांचे वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे.

मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे.ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**सन्मा. सदस्यांकडून आलेला रजेचा अर्ज.**

सन्मा.सदस्य श्री.गोविंद तुळशीराम साखला, श्री. शरद एकनाथ वराडे, सौ. माधुरी नंदलाल आजळकर, सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांनी आजच्या सभेत तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत यावी. अशी विनंती केली आहे.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४१ दिनांक ११/०६/२०१५**

सन्मा.सदस्य श्री.गोविंद तुळशीराम साखला, श्री. शरद एकनाथ वराडे, सौ. माधुरी नंदलाल आजळकर, सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी यांनी आजच्या सभेत तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत यावी. अशी विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार दि.११/०६/२०१५ च्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:-२७ — मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि२४/०३/२०१५,१६/४/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४२ दिनांक ११/०६/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती दिनांक २४/३/२०१५चे ठराव नं २६ते ३१ अखेर तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशःवाचून कायम करण्यांत येत आहे.तसेच स्थायी समिती सभा दिनांक १६/४/२०१५ चे ठराव नं ३४ ते ३९ अखेर तसेच स्थायी समिती सभेतील झालेले निर्णय क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- २८ धुळे म.न.पा.चे १२ दवाखान्यांसाठी सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात दैनंदिन लागणारे ॲलोपॅथी औषधे खरेदीसाठी शासकीय दर व ई-निविदा दरांनुसार तुलनात्मक कमी असलेल्या दरांना व रू.४०,५७,३६७/- मात्र खर्चास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४३ दिनांक ११/०६/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सन २०१५-१६ या वर्षासाठी म. न. पा. चे १२ दवाखान्यांसाठी दैनंदिन लागणारे ॲलोपॅथी औषधे खरेदीसाठी शासकीय दरांसोबत तुलना करण्यासाठी ई-निविदाप्रणालीव्दारे दर मागविणेसाठी वृत्तपत्रातुन फेर निविदा(४थ्या वेळा) प्रसिध्द करण्यास मान्यते प्रमाणे दि.२०/०३/२०१५ चे दै.लोकमत व दै. दिव्य मराठी व दै.राजरंग टाईम्स वृत्तपत्रात प्रसिध्द जाहिर फेर ई-निविदा सुचनेप्रमाणे अंतीम मुदत दिनांक १३/०४/२०१५ रोजी सायं. ५ वाजेपावेतो होती. निविदा समितीचे व म.आयुक्त साो यांचे मान्यतेने दि.०५/०५/२०१५ रोजी निविदा Technical Bid उघडण्यात आले.१) मे. सुर्या सर्जी फार्मा. नाशिक व२) मे.ए. एस डिस्ट्रीब्युटर,धुळे यांनी Online Payment व्दारे निविदा संच शुल्क रु १०००/- वबयाणा रक्कम रु. ५५०००/- जमा करुन निविदा सादर केली आहे. दोन्ही निविदाधारकरची Technical Bid मधील कागदपत्रे निविदा समितीने तपासुन योग्य असल्याने मा.आयुक्त साो.यांचे मान्यतेने दिनांक ०८/०५/२०१५ रोजी Commercial Bid उघडण्यात आले.

धुळे म.न.पा.स प्राप्त २ निविदाधारकांचे दर, शासकीय कंपनीचे दर, महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंन्झुमर्स फेडरेशन लि.दरकरार, स्थानिक बाजारभाव यांचे दरांचा तुलनात्मक दर तक्ता पृष्ठ क्रं.P-४३५ ते पृष्ठ क्रं.P-४४१ प्रमाणे असुन कमी असलेल्या दरांना अधोरेखीत केले आहे.तुलनात्मक कमी असलेल्या दरांप्रमाणे ॲलोपॅथी औषधे खरेदीसाठी पृष्ठ क्रं. P-४४३ ते पृष्ठ क्रं. P-४४५ प्रमाणे खर्च रु.४०,५७,३६७/- येणार आहे.

१)मे.हाफकीण अर्जीठा फार्मासेटयुकल्स लि. जळगाव यांचे शासकीय दरांप्रमाणेः-मुळ यादीतील अनु. क्रं.१,२,३,४,५,६,९,१०,११,१७,१८,२०,३२,३४,३७,५३,६५ या १७ प्रकारचे ॲलोपॅथी औषधांचे दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी खर्च रु.७,४४,२०९/- मात्र येणार आहे.

२)महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह कंन्झुमर्स फेडरेशन लि.दरकराराप्रमाणेः-यांचे मुळ यादीतील अनु.क्रं.५४,६२,६४,७१,८७,९१,९२ या ७ प्रकारचे ॲलोपॅथी औषधांचे दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी खर्च रू. ४०,६८२/-मात्र येणार आहे.

३)<u>मे. सुर्या सर्जि. फार्मा., नाशिक. (निविदाधारक)</u>यांचे मुळ यादीतील अनु.क्रं.७,८,१२, १३,१४,१५,१६,२१,२२,२४,२८,२९,३०,३१,३६,३८,४१,४३,४४,४६,४७,४८,४९,६३,६८ ७५,७६,८५,८६,९५,९६,१०१,१०४या३३ प्रकारचे ॲलोपॅथी औषधांचे दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी खर्च रू.२९,२७,५५६/- मात्र येणार आहे.

४)<u>मे.ए. एस. डिस्ट्रीब्युटर, धुळे. (निविदाधारक)</u> यांचे मुळ यादीतील अनु.क्रं.२७,३५, ५१,५७,५८,५९,६०,६१,६६,७०,७२,७३,७४,८१,८२,८८,८९,९३,९७,१०३,११७,११८,११९ १२०,१२१,१२२ या २६ प्रकारचे ॲलोपॅथी औषधांचे दर सर्वात कमी असुन उक्त खरेदीसाठी खर्च रू. ३,४४,९२०/-मात्र येणार आहे.

(अ)यादीमधील अनु.क्रं.२३,३३,४५,५०,६७या ५ प्रकारचे औषधांचे दर अंदाजीत खर्चापेक्षा जास्तीचे असल्याने विचारात घेतले नाही. तसेच अनु.क्रं.१९,२५,२६,३९,४०,४२,५२, ५५, ५६,६९,७७,७८,७९,८०,८३,८४,९०,९४,९८,९९,१००,१०२, १०५, १०६,१०७, १०८,१०९, ११०,१११,११२,११३,११४,११५,११६, १२३,१२४ या ३६ प्रकारचे औषधांचे दर प्राप्त झाले नाही. धुळे म.न.पा. स प्राप्त ई-निविदा दर हे योग्य व वाजवी आहेत.

सन२०१५-१६या वर्षात औषधे खरेदीसाठी बजेट तरतुद रु.७५,००,०००/-मात्र आहे.सन २०१५-१६ या वर्षासाठी धुळे म.न.पा. रूग्णालयाचे मागणी प्रमाणे वरील८३

प्रकारचे ॲलोपॅथी औषधांचे खरेदीसाठी पृष्ठ क्रं.p-४४३ ते पृष्ठ क्रं.p-४४५ प्रमाणे येणारा खर्च रू.४०,५७,३६७/-अंदाजितखर्चापेक्षा रू.२६,५३,२५५/- ने कमी येणार आहे. (३९.५३% ने कमी.)

उपरोक्त कार्यालयीन अहवालानुसार व सन्मा. सदस्यांच्या सुचनेनुसार उपरोक्त १ ते २ या शासकीय पुरवठादारांचे दर निविदा दरांपेक्षा कमी असल्याने उक्त दरांना व खर्चास तसेच ३ ते ४ या निविदाधारकांचे दर शासकीय दरांपेक्षा कमी असल्याने उक्त दरांना व खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

तसेचज्या औषधाचे दर प्राप्त झाले नाहीत अशी औषधे आवश्यकता भासल्यास स्थानिक दरानुसार खरेदीसाठी मान्यता देण्यांत येत आहे.ॲलोपॅथी औषधी प्राप्त करतांना mrp पेक्षा कमी दर असल्याची खात्री करण्यात यावी.तसेच म.न.पा. सर्व वैद्यकिय अधिकारी यांचा अभीप्राय घेण्यात यावा.औषधाचे गुणवत्तेबाबत शंका राहु नये यासाठी औषधांचे ॲनालीसीस टेस्ट रिपोर्ट घेण्यात यावा. तसेच औषधी साठा प्राप्त झाल्यानंतर म.सभापती स्थायी समिती यांच्या समक्ष तपासणी करुन अभिप्राय घेण्यांत यावे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- २९ सन२०१५-१६ या वर्षासाठी मलेरीया विभागासाठी आवश्यक अळीनाशके (लार्व्हीसाईड) खरेदी साठी M.R.P.पेक्षा कमी असलेल्या ई-निविदा प्रणालीव्दारे आलेल्या दर, निगोसिएशन अंती येणारा खर्च रू.४५,३७,५००/-मात्रला मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४४ दिनांक ११/०६/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मलेरीया विभागासाठी आवश्यक अळीनाशके (लार्व्हीसाईड) खरेदीसाठी व स्पर्धात्मक दरांचा फायदा मिळणेसाठी दिनांक २०/०३/२०१५ चे दै. लोकमत व दै.राजरंग टाईम्स वृत्तपत्रात ४ थ्या वेळा फेर ई-प्रणालीव्दारे निविदा मागवणेसाठी जाहिर निविदा प्रसिध्द करण्यात आली. निविदाची अंतीम मुदत दिनांक ०९/०४/२०१५ होती. ई-निविदाचे Technical-Bid निविदा समितीचे व म.आयुक्त साो. यांचे मान्यतेने दि.२४/०४/२०१५ रोजी उघडण्यात आले.१) मे. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन कल्याण २) मे. श्रीनाथजी एन्टरप्रायजेस, डहाणू या दोन निविदा प्राप्त झाल्या आहेत. प्राप्त दोन निविदाधारकांची Technical-Bid मधील कागदपत्रे निविदा समितीने तपासुनी केली. मे. श्रीनाथजी एन्टरप्रायजेस, डहाणू यांनी अळीनाशक/किटकनाशक विक्रीचा परवाणा व उत्पादक कंपणीचे Central Inseticide Board यांचे नोंदणी प्रमाणपत्र असे मुख्य कागदपत्रे सादर केलेले नसल्याने ते कोणत्या प्रकाराचे अळीनाशक/किटकनाशक पुरवठा करतील याबाबत शंका निर्माण होते सबब, निविदा समितीचे निर्णयानुसार त्यांचे Commercial Bid न उघडता मे. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन कल्याण यांनी सादर केलेली सर्व कागदपत्रे योग्य असल्याने निविदा समितीचे निर्णयानुसार दि. ०८ / ०५ /२०१५ रोजी मे. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन कल्याण यांचे Commercial Bid उघडण्यात आले आहे.

सदर पुरवठादारांनी सादर केलेले दर खालील प्रमाणे होते.

| अ.क्रं | अळीनाशक/किटकनाशकाचे नांव | एम. आर. पी. दर | मे. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन, कल्याण |
|---|---|---|---|
| १ | टेमोफॉस (ॲबेट) ५०% EC. | रु. १५५०/लिटर. | **रु. १५३९/लिटर.** |
| २ | पायरेथ्रम २% | **रु. २१५०/लिटर.** | रु. २२९०/लिटर. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | एम. एल. ओ. ऑईल. | रु. १६०/लिटर. | **रु. १५७/लिटर.** |
| ४ | बी. टी. आय. लिक्वीड १२ AS | रु. १५००/लिटर. | **रु. १५००/लिटर.** |

वरीलप्रमाणे मे. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन, कल्याण यांनी सादर केलेले ई निविदा दरांमध्ये पायरेथ्रम २% चे दर उत्पादक कंपनीचे mrp दरांपेक्षा जास्तीचे वाटत असल्याने व इतर दर उत्पादक कंपनीचे mrp दरांपेक्षा कमी असल्याने संबधीतास पायरेथ्रम २% चे दरांचे निगोशिएशन साठी दि. २१/५/२०१५ रोजी बोलविणेत आले.

म.आयुक्त सो.,म.आरोग्याधिकारी सो. यांचे समक्ष झालेल्या दरांचे वाटाघाटीमध्ये मे.डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन, कल्याण यांनी अळीनाशके(लार्व्हीसाईड) पुरवठा करणेबाबत खालीलप्रमाणे दर कमी करण्याबाबत म.आयुक्त सो.यांना सहमती दर्शवली व लेखी स्वरुपात लिहुन दिले आहे (पृष्ठ क्रं. p-१९९).

| अ.क्रं | अळीनाशकाचे नाव. | ई-निविदाचे दर | वाटाघाटीचे दर | तफावत. | मागणी. | एकुण तफावत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टेमोफॉस (ॲबेट) ५०% EC. | रु.१५३९/- | रु.१४७५/- | रु.६४/- | ९०० लि. | रु.५७६००/- |
| २ | पायरेथ्रम २% | रु.२२९०/- | रु.२१२५/- | रु.१६५/- | २०० लि. | रु.३३०००/- |
| ३ | एम.एल.ओ.ऑईल | रु.१५७/- | रु.१३०/- | रु.२७/- | १००००लि. | रु.२७००००/- |
| ४ | बी.टी.आय.१२ AS | रु.१५००/- | रु.१४८५/- | रु.१५/- | १००० लि. | रु.१५०००/- |

**एकुण तफावत रु. ३,७५,६००/-**

म.आयुक्त सो.यांनी मे.डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन,कल्याण यांचे दरांबाबत केलेल्या वाटाघाटीनुसार धुळे म.न.पा.चा एकुण आर्थीक फायदा रु.३,७५,६००/- मात्र होणार आहे. वाटाघाटीमध्ये मंजुर दरांप्रणाने येणारा एकुण खर्च खालीलप्रमाणे.

<u>१)मे. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन, कल्याण.:-</u>

a) टेमोफॉस (ॲबेट)५०% EC.दर१ लिटरसाठी रु.१४७५/- प्रमाणे ९००लिटरसाठी रु. १३,२७,५००/-
b) पायरेथ्रम २% दर १ लिटरसाठी रु. २१२५/- प्रमाणे २०० लिटरसाठी रु. ४,२५,०००/-
c) एम. एल. ओ. ऑईल. दर १ लिटरसाठी रु. १३०/- प्रमाणे १०००० लिटरसाठी रु.१३,००,०००/-
d)बी.टी.आय.लिक्वीड१२ AS दर १लिटरसाठी रु.१४८५/-प्रमाणे १०००लिटरसाठी रु. १४,८५,०००/-

एकुण खर्च :- रु. ४५,३७,५००/-

सदरचे अळीनाशके (लार्व्हीसाईड) खरेदीसाठी खर्च रु.४५,३७,५००/-मात्र येणार आहे.उक्त खर्च अंदाजित खर्चापेक्षा रु. ३,८७,५००/- मात्रने कमी आहे.(७.८६% ने कमी). सन२०१५-१६ या वर्षासाठी हिवताप योजना या लेखाशिर्षात औषधे व उपकरणे खरेदीसाठी रु.७५,००,०००/- मात्रची बजेट तरतुद आहे.उपरोक्त खर्चानंतर रू. २९,६२,५००/- मात्र तरतुद शिल्लक राहणार आहे.

सन २०१५-१६ या वर्षासाठी धुळे म.न.पा.मलेरीया विभागासाठी लागणारे अळीनाशके (लार्व्हीसाईड) मागणी प्रमाणे खरेदीसाठी दरांचे वाटाघाटीमध्ये कमी झालेल्या दरांना व खर्च रू४५,३७,५००मात्रला कार्यालयीन अहवालानुसार मान्यता देण्यांत येत आहे.

तसेच मे.श्रीनाथजी एन्टरप्रायजेस, डहाणू यांची निविदा नामंजुर असल्याने त्यांची बयाना रक्कम परत करणेस मान्यता देण्यांत येत आहे. मे. डॉल्फीन सेल्स कार्पोरेशन, कल्याण यांनी नमुद केलेले दर हे मल्टी नॅशनल व चांगल्या कंपनीचे आहेत. सदरची खरेदी एकाच वेळी न करताआवश्यकतेनुसार करण्यात यावी. तसेच अळी नाशक व किटक नाशक शिल्लक साठा संपूर्ण संपलेला असल्याने व पावसाळयात पारेषन काळ असल्याने मलेरिया डेग्यु,स्वाईन फ-लू सदृश्य साथ रोगाच्या नियंत्रणासाठी त्वरीत किटक नाशके खरेदी करण्यांत यावीत. औषधी गुणवत्तेबाबत शंका राहु नये म्हणुन शासकिय प्रयोगशाळेचे रिपोर्ट घेण्यात

यावेत.तसेच औषधी साठा प्राप्त झाल्यानंतर म.सभापती स्थायी समिती यांच्या समक्ष तपासणी करुन अभिप्राय घेण्यांत यावे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ३० सन २०१४-१५ नागरी दलित वस्तीसुधार योजनेअंतर्गत सिध्दार्थनगर मध्ये गटार बांधणे व विहिरीवर जाळी बसविणे या कामासाठी ई -निविदा दर मागविण्यांत आलेत. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४५ दिनांक ११/०६/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत सिध्दार्थ नगर मधील गटारी करणे व विहिरीवर जाळी बसविणेकामाबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव क्रं.३०(ब) दि. १५/५/२०१४ म. आयुक्त साो. महानगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दि.४/३/२०१५ व म.जिल्हाधिकारी साो.यांचे दिनांक १६/२/०१५ चे मंजुरी अन्वये उक्त कामाबाबत रक्कम रुपये २९,३१,१५३/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत म.कार्यकारी अभियंता,मनपा धुळे यांचे पत्र क्रं. १७८ व २८९ दि. १२/८/२०१४अन्वये रक्कम रुपये २४,२७,६५५/- + ५,०३,४९८/- मात्र खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं.धुमपा/पापुवि/१२१६ दि.४/३/२०१५ अन्वये ५/३/२०१५ रोजीच्या दै.दिव्य मराठी/ राजरंग टाईम्स I वृत्तपत्रातून ई निविदा प्रसिध्द करण्यांत येवून दि.८/४/२०१५ पर्यत निविदा मागविण्यांत आलेले आहेत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबतई.एम.डी.रक्कम भरुन निविदा दर सादर केलेले आहत.त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. अभिनव एन. गिते | शे.२.६५% जास्तीने | |
| २ | श्री.अ.एस. अग्रवाल | शे. ०.५% कमीने | |
| ३ | मे. वास्तुविश्व | शे.११.५२% कमीने | सर्वात कमी दर |
| ४ | श्री मिलींद पी. मुडावदकर | शे. ६.३० % कमीने | |

ठेकेदार श्री./मे.वास्तुविश्व यांचे दर शे.११.५२% कमीने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमानुसार बयाणा रक्कम भरलेली आहे. सबब कंत्राटदार श्री./मे वास्तुविश्व यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दराप्रमाणे शे.११.५२% कमीने दरानें आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदारांची बयाणा रक्कम परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३१ धुळे मनपा मालेगांवरोड पंपींग स्टेशन येथील १५०एच.पी. क्षमतेची स्टॅन्डबाय मोटार दुरुस्ती व स्टार्टर दुरुस्तीचे काम तांतडीने मे. वीज कामगार सह. सोसायटी धुळे यांचेकडून विना निविदा करुन घेण्यांत आले.तदर्थ झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४६ दिनांक ११/०६/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा मालेगांव पाणीपुरवठा केंद्र येथील १२५ एच.पी. पंपसेट दि.२१/७/२०१५ गुरुवार रोजी कार्यान्वीत असतांना बंद झाला. याबाबत समक्ष पाहणी

मनपा मेंटेनन्स कर्मचारी श्री.एकनाथ पाटील व शकील पठाण यांनी केली असता मोटार वायडिंग शॉर्ट झाल्याचे निदर्शनास आले. मालेगांवरोड पंपींग स्टेशन वरुन होत असलेला पाणीपुरवठा विस्कळीत होवू नये म्हणून येथील बंद असलेल्या व शॉर्ट झालेल्या मोटार्सची तात्काळ दुरुस्ती करणे आवश्यक आहे करिता दि.२२/५/२०१५ रोजी सकाळी श्री. कैलास शिंदे अभियंता सह सर्व ओव्हरसियर्स यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. सद्यस्थितीत मालेगांवरोड पंपींग स्टेशन येथे एकच पंपसेट कार्यान्वीत असून Stand bye च्या दोन्ही पंपसेटच्या मोटर्सची रिवायडींग करणे व पॅनल दुरुस्ती करणे आवश्यक आहे. पैकी तांतडीने व्यवस्था होणेसाठी एक Stand bye पंपसेटकार्यान्वीत ठेवणेकरिता १५० एच.पी. चीर मोटार रिवायडींग करणे बाबत निर्देशानुसार सदरील मोटार दुरुस्तीचे काम करवून घेण्यांत आले आहे. सदर पंपसेटच्या पॅनल स्टार्टर मध्येही बिघाड असल्याने त्यातील दुरुस्तीचे कामही करण्यांत आले आहे.

मालेगांवरोड पा.पु.केंद्रावरील उक्त प्रमाणे काम तांतडीने व आवश्यक गरजेचे असल्याने विना निविदा मे. वीज कामगार सह. सोसायटी धुळे यांचेकडून अंदापत्रकाप्रमाणे करवुन घेण्यांत आले आहे.याकामाकरिता महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडील देखभाल / दुरुस्ती दरसूची२०१२-१३च्या दरान्वये खर्च रु.१०२५४९/-आहे.सन२०१५-१६ च्या अर्थसंकल्प तरतूदीनुसार पाणीपुरवठा निगा व दुरुस्ती,व्यवस्थापन करिता रक्कम रु. २ कोटी २५ लाख तरतूद आहे. उक्त प्रमाणे प्रस्तावाप्रमाणे १५०एच.पी.मोटार सेट रिवायडींग दुरुस्ती, पॅनल स्टार्टर दुरुस्तीचे काम करवून घेण्यांत आले असल्याने याकरिता खर्च रु.१०२५४९/- मात्रला कार्योत्तर मंजुरीसाठी म.न.पा.अधिनियम १९४९चे कलम ७३ खंड क च्या तरतुदी नुसार प्रकरण ५ संविधा २(२) नुसार सदर कामास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,<br>
सही/-x x x<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३२ मनपा पाणीपुरवठा केंद्रावरील व्हॉल दुरुस्तीचे काम तांतडीने करुन घेण्यांत आलेत. तदर्थ झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४७ दिनांक ११/०६/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा पाणीपुरवठा केंद्रावरील खालील प्रमाणे असलेले व्हॉल्व नादुरुस्त असल्याचे आढळून आले आहेत.

१) बडगुजर जलकुंभ ( पंप हाऊस जवळ) मुख्य जलवाहिनी४५०m.m.sluice valve

२) बडगुजर जलकुंभ ( आवार) वितरण वाहिनी ३००m.m.sluice valve

३) दसेरा मैदान जलकूंभ मुख्य जलवाहिनी ३००m.m.sluice valve

सदरील व्हॉल्वचे नादुरुस्तीमुळे मोठया प्रमाणात गळती होत असल्याने तसेच कर्मचा-यांना दैनंदिन हाताळणी कामात गैरसुविधा होत असल्याने सदरील सर्व स्लिस व्हॉल्व म.उपअभियंता, पा.पु.विभाग यांचे सुचनेनुसार तात्काळ दुरुस्त करण्यांत आले आहेत. उक्त प्रमाणे व्हॉल्व दुरुस्ती कामामुळे गळती बंद झाली असून व्हॉल्व ऑपरेटींग मध्ये आहेत.१ ते ३ चे व्हॉल्व दुरुस्ती कामासाठी सोबत म.जि.प्रा. दरसूची/ सन २०१३ नुसार अंदाजपत्रकीय खर्च रुपये १२३५०/-मात्र आहे.सदरील काम तांतडीने व आवश्यक असल्याने करवून घेण्यांत आले आहेत. पाणीपुरवठा विभागाकडील दैनंदिन देखभाल दुरुस्ती कामासाठी सन २०१५-१६ नुसार तरतूद उपलब्ध आहे. पाण्याची मोठया प्रमाणावर गळती होत असल्याने सदरचे काम व झालेला खर्च म.जि.प्रा. दरसूची २०१३ प्रमाणे तांतडीनें करण्यांत आलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार दुरुस्ती कामे अत्यावश्यक व गरजेचे असल्याने विना कोटेशन करवून घेण्यांत आली आहेत तरी वरील कामासाठी झालेला र.रु.१२३५०/- खर्चास म.न.पा अधिनियम ७३ खंड क प्र.५ नुसार कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ३३ मा.सभापती स्थायी समिती मनपा धुळे यांचेकडील पत्र जा.क्रं.५० दि. ८/६/२०१५ नुसार पदाधिकारी /अधिकारी यांना वाहन भत्ता अदा करावा किंवा कसे याबाबत निर्णय घेणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४८ दिनांक ११/०६/२०१५**

मा.सभापती सो. स्थायी समिती, मनपा धुळे यांचे पत्र जा.क्रं.५०दिनांक ८/६/२०१५ अन्वये धुळे महानगरपालिकेतर्फे मनपा पदाधिकारी व अधिकारी यांना दरमहा वाहन भत्ता अदा केला जातो. मनपाची सद्यस्थितीची आर्थिक परिस्थिती लक्षांत घेता खर्चात बचत करण्याच्या दृष्टीकोनातून सदर वाहन भत्ता अदा करावा किंवा कसे याबाबत निर्णय घेणेसाठी सदर प्रस्ताव मे. स्थायी समिती पुढे आलेला होता.

उक्त बाबत सन्मा. पदाधिकारी व अधिकारी यांना शासन नियमानुसार वाहन भत्ता अदा केला जातो.तथापि मनपाची सध्याची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने सन्मा. पदाधिकारी तथा अधिकारी यांनी देखील वाहन भत्ता न घेण्याबाबत विनंती पत्र देण्यांत यावे. व त्यांचेकडून त्याबाबत लेखी सहमती घेण्यांत यावी.

सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक३० जुलै ,२०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक३०/०७/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.चंद्रकांत बापु सोनार, सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री.सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ६ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ७ | श्रीमती प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ८ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ९ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १० | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| ११ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ.श्री. नामदेव भोसले | आयुक्त |
| २. | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त कर |
| ३. | श्री.के.ना कुटे | मुख्य लेखा परीक्षक |
| ४. | श्री. एस.बी. विसपुते | प्र.नगररचनाकार |
| ५. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ६. | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| ७. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. एन.पी. सोनार | कार्यालयीन अधिक्षक |
| ११. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी़ अधिक्षक |
| १२. | श्री. जे.एम.पांडे | वसुली लिपीक |
| १३. | श्री. गणेश खोडे | सहा.प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री. एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| १६ | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १७ | श्री. गणेश मधुकर सुर्यवंशी | पर्यवेक्षक, मनपा शिक्षणमंडळ |
| १८ | श्री. बी. डी.जगदाळे | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| १९ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| २० | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर बांधकाम विभाग |
| २१ | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म. सभापती**:-** सन्मा.सदस्यअधिकारी गण, पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो.सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक कोरम झालेला आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव :-  वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा.सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी**

१) यादी देण्यांत येते की, आपल्या प्रेरक जीवनातून तरुणाईच्या स्वप्नांना उमेदीचे अग्नीपंख जोडणारे भारताचे माजी राष्ट्रपती तथा भारत रत्न मिसाईल मॅन प्रख्यात अणुशास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांचे दिनांक २७/०७/२०१५ रोजी दु:खद निधन झाले.

तसेच माजी राज्यपाल,आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नते भारतीय संविधानाचे भाष्यकार व सांसदीय लोकशाहीचे पहारेकरी असलेले मा.रा.सु.गवई उर्फ दादासाहेब गवई यांचे दिर्घ आजाराने दि.२५/७/२०१५ रोजी दु:खद निधन झाले.

अशा या महनीय व्यक्तीना आज रोजीच्या स्थायी समिती सभेमध्ये श्रध्दांजली वाहुन तसा ठराव पारीत करण्यांत यावा ही विनंती.

**सुचक :- श्री.अमोल मासुळे, सदस्य**

२) माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांना श्रध्दांजली अपर्ण करण्यांत यावी. कारण या मिसाईल मॅनने भारताची वयाच्या ८३ व्या वर्षापर्यत सेवा केली आहे व राष्ट्रपती बनण्याआधी त्यांना भारत रत्नानेही सन्मानीत करण्यांत आले अशा महान व्यक्तीना समाजवादी पार्टीतर्फे कोटी कोटी प्रणाम करण्यांत येत आहे.

**सुचक :- पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम**

म. सभापती   सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार माजी राष्ट्रपती डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना भावपूर्ण श्रध्दाजली अर्पण करण्यासाठी सर्वानी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४९ दिनांक ३०/०७/२०१५**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार आपल्या प्रेरक जीवनातून तरुणाईच्या स्वप्नांना उमेदीचे अग्नीपंख जोडणारे भारताचे माजी राष्ट्रपती तथा भारत रत्न मिसाईल मॅन प्रख्यात अणुशास्त्रज्ञ डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम यांचे दिनांक २७/०७/२०१५ रोजी दु:खद निधन झाले.

तसेच माजी राज्यपाल,आंबेडकरी चळवळीचे ज्येष्ठ नते भारतीय संविधानाचे भाष्यकार व सांसदीय लोकशाहीचे पहारेकरी असलेले मा. रा.सु.गवई उर्फ दादासाहेब गवई यांचे दिर्घ आजाराने दि. २५/७/२०१५ रोजी दु:खद निधन झाले.

वरील मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौन राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मर्पित करण्यांत येत आहे

सर्वानुमते मंजुर,<br>
सही/-x x x<br>
सभापती,स्थायी समिती,<br>
धुळे महानगरपालिका,धुळे

**सन्मा. सदस्यांकडून आलेला रजेचा अर्ज.**

सन्मा.सदस्य श्री. चंद्रकांत काशिनाथ केले ( केले काका) श्री.गोविंद तुळशीराम साखला, श्री. संदीप सुरेश पाटोळे यांनी आजच्या सभेत तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत यावी. अशी विनंती केली आहे.

म. सभापती   सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५० दिनांक३०/०७/२०१५**

सन्मा.सदस्य श्री.चंद्रकांत काशिनाथ केले(केले काका) श्री.गोविंद तुळशीराम साखला, श्री.संदीप सुरेश पाटोळे यांनी आजच्या सभेत तब्येत बरी नसल्याने उपस्थित राहू शकत नसल्याने आजच्या सभेस रजा मंजुर करण्यांत यावी.अशी विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार दि.३०/०७/२०१५ च्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,<br>
सही/-x x x<br>
सभापती,स्थायी समिती,<br>
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः-३४ मागील स्थायी समिती सभांचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (दि.११/६/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५१ दिनांक ३०/०७/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक ११/६/२०१५ चे ठराव नंबर ४० ते ४८ क्रमश वाचून कायम करण्यांत येत आहे. सही/-x x x

सभापती,स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ३५ नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत यशवंतनगर नाल्याकिनारी ते मोतीनाल्यापावेतो रस्ता डांबरीकरण करणेचे ई - निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५२ दिनांक ३०/०७/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत यशवंतनगर नाल्याकिनारी ते मोतीनाल्या पावेतो रस्ता डांबरीकरण करणेबाबत धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नं.३० (ब) दि.१५/५/२०१४ मा.आयुक्त धुळे नगरपालिका यांचे टिपणी मंजुरीने दि.४/३/२०१५व म.जिल्हाधिकारी सो.यांचे दिनांक१६/२/२०१५चे मंजुरी अन्वये उक्त कामा बाबत रक्कम रुपये४२,०९,३४९/-मात्र खर्चास आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देण्यांत आली आहे.

उक्त बाबत म.अधिक्षक अभियंता सा.बां.वि. धुळे याचे पत्र क्रं.३४९१ दि. १९/५/२०१४ अन्वये रक्कम रुपये ४२,०९,३४९/- मात्र खर्चास मंजुरी मिळालेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्रं. धुमपा/पापुवि/१२१६ दि. ४/३/२०१५ अन्वये दि. ५/३/२०१५ रोजीच्या दिव्य मराठी/ राजरंग टाईम्स या वृत्तपत्रातून ई निविदा प्रसिध्द करण्यांत येवून दि. ८/४/२०१५ पर्यत निविदा दर मागविण्यांत आलेले आहत. पात्र कंत्राटदार यांनी निविदेबाबतई.एम.डी.रक्कम भरुनप निविदा दर सादर केलेले आहेत. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. अभिनव एन. गिते | शे. २.५० टक्के जास्तीने | |
| २ | श्री. ए.एस. अग्रवाल | शे. ४.०१ टक्के कमीने | |
| ३ | श्री. वास्तुविश्व | शे. १०.९९ टक्के कमीने | सर्वात कमी दर |
| ४ | मे.रियालबल बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | शे. ४.६९ टक्के कमीने | |
| ५ | हरीछाया कंस्ट्रक्शन | शे. ३ टक्के कमीने | |

ठेकेदार मे.वास्तुविश्व यांचे दर शे.१०.९९ टक्के कमीने तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमानुसार बयाणा रक्कम भरलेली आहे.

उपरोक्त अहवालानुसार कंत्राटदार मे.वास्तुविश्व यांची सर्वात कमी अंदाजपत्रकीय दरापेक्षा शे.१०.९९ टक्के कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो करारनामा करुन घेण्यांत यावा. तसेच उर्वरीत निविदाधारकांचे अनामत परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे. सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ३६ प्रभाग क्रं.६ मध्ये आनंदनगर, नकाणेरोड लगत मुख्य गटारीवर रोडक्रास स्लॅब तांतडीने करणेत आले त्यास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५३ दिनांक ३०/०७/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे प्रभाग क्रं.६मध्ये आनंदनगर नकाणेरोड लगत जुन्या गटारीवरील जुना रोडक्रॉस स्लॅब जीर्ण झाल्यामुळे वाहतूकीमुळे नादुरुस्त झाल्याने सदर

भागातील नागरीकांची खूपच गैरसोय होत आहे.त्यामुळे सदरचे काम करणे अत्यंत गरजेचे आहे. सन२०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रस्ता दुरुस्ती करिता रक्कम रु.२० लक्ष मात्र प्रस्तावित आहे.

उक्त जागेवर समक्ष मोजमाप घेवून शासकीय दरसूची सन २०१४-१५ नुसार सदर कामाचेअंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे. सदरचेआर.सी.सी. रोडक्रॉस स्लॅब कामास अंदाजे प्रस्तावित अंदाजपत्रकीय रक्कम रुपये १,७२,४०७/- मात्र खर्च अपेक्षित आहे.

सदरचे काम नागरीकांची गैरसोय पाहता तांतडीने करणे गरजेचे आहे तरी सदर कामास प्रशासकीय व आर्थिक मंजुरी देण्यांत येत असून सदर काम तांतडीने श्री. श्रीराम धना अहिरे यांचेमार्फत करुन घेण्यांत आलेले आहे. त्यास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा ७३ खंड (क) अन्वये कार्योत्तर मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ३७ सुकवद पाणीपुरवठा केंद्र येथील ४७५एच.पी. पंपसेट क्रं.५ची दुरुस्ती तांतडीने मे.बिजासनी एंटर प्राईजेस यांचेकडून करुन घेण्यांत आले.त्यासाठी झालेला खर्च रुपये १,५१,६८५/- मात्रला कार्योत्तर आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५४ दिनांक ३०/०७/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा तापी पाणीपुरवठा योजनेवरील सुकवद पाणी पुरवठा केंद्र येथील ४७५ एच.पी. पंपसेट क्रं.५ दि.१९/६/२०१५ रोजी कार्यान्वीत असतांना रात्री बंद पडला याबाबत दि२०/६/२०१५ रोजी म.न.पा. मेंटेनन्स कर्मचारी श्री. एकनाथ पाटील, व शकील पठाण यांनी पहाणी केली असता सदर पंपाच्या कॉलम मध्ये व्हायबेशन झाल्याने व शॉप-ट सर्पोटर,रबर बुश इ.तुटल्याने नादुरुस्त झाल्याचे आढळून आले.याबाबत मी स्वतः पाहणी करुन पंपसेट बिघाडाबाबत खात्री केली आहे. सदरील पंपसेट नादुरुस्ती बाबत म.उपायुक्त(पा.पु.वि.) म.अभियंता श्री शिंदे सो.यांना अवगत केले. सुखवद पाणी पुरवठा केंद्रावर एकुण ६ पंपसेट असून चार पंपसेट कार्यान्वीत होते व त्यापैकी एक पंपसेट नादुरुस्त झाल्याने दैनंदिन पाणीपुरवठा विस्कळीत होवू नये म्हणून सदरील पंपसेट तात्काळ खोलून दुरुस्त करणे आवश्यक असल्याने सदर पंपसेट दुरुस्ती काम वरिष्ठांशी चर्चा करुन हाती घेण्यांत आले.

सदर पंपसेटचे १६ नग कॉलम पाईप काढणेत आलेत. सदर डिस्मेंटलींग दरम्यान चार नग शॉप-ट सर्पोटर ब्रेक झाल्याचे व रबर बुशही खराब झाल्याने बहुतांशी निखळलेल्या स्थितीत होते.सर्व रबर बुश नवीन टाकणे, शॉप-ट रि आऊइनमेंट करणे, सर्पोटर बसविणेसह नवीन एस.एस.किंवा टीहव्हीएस टाईप नटबोल्टसह इतर किरकोळ कामे करण्याची आवश्यकता असल्याने त्याप्रमाणे साहित्याची व्यवस्था करुन तांतडीने सदर पंपाची दुरुस्ती करणे अनिवार्यतेनुसार कंत्राटदार मे.बिजासनी एंटरप्राईजेस, धुळे यांचेकडून करवून घेण्यांत आले आहे. सदर पंपसेटची पूर्णतः दुरुस्ती करवून दि.२४/६/२०१५ रोजी पंपसेट कार्यान्वीत करण्यांत आला आहे.सदर पंपसेटसह चारही पंपसेट सुस्थितीत कार्यान्वीत आहे. सदर पंपसेट दुरुस्ती बाबत नव्याने बनविण्यांत आलेल्या हिस्ट्री शीट रजिस्टरला नोंद घेतली आहे.
History Register ला सविस्तर दुरुस्तीबाबत विवरण नोंदवले आहे. (दि. २४/६/२०१५ पान क्रं. ५३)

उक्त प्रमाणे सुकवद पंपींग स्टेशन येथील नादुरुस्त पंपसेट दुरुस्ती बाबत काम करवून घेण्यांत आले असून सोबत कामाबाबत मे. बिजासनी एंटरप्राईजेस यांचे बिल सादर

आहे. सदर तपशीलाप्रमाणे कंत्राटदाराने साहित्य पुरवठा करवून मजुरीसह काम पूर्ण केले आहे. सोबत सदरचे काम पूर्ण करणे व नादुरुस्त स्पेअर बाबत फोटो जोडले आहेत.

सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात तरतूद नुसार मनपा पाणीपुरवठा केंद्र व अन्य कामे देखभाल दुरुस्ती करिता रु.२.२५ कोटी रकमेंची तरतूद आहे.

सूखवद पा.पु. केंद्र येथील पंपसेट कं.५ च्या दुरुस्ती कामासाठी कंत्राटदार मे.बिजासनी एंटरप्राईजेस यांचे सोबत बिलाप्रमाणे खर्च रक्कम रु.१,५१,६८५/- आहे. सदरचे काम योग्य रितीने झाले आहे. दर व खर्च वाजवी व योग्य आहेत. सदरचे कामाकरिता झालेला खर्च रु. १५१६८५/- मात्रला महाराष्ट्र मनपा अधिनियम १९४९चे कलम७३ खंड(क) प्रकरण ५ संविदा २(२) नुसार कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३८

शाळा क्रं.२८ आवार राऊळवाडी, गुरुकृपा नगर, विखेनगर येथील प्रत्येकी १० सीट शौचालयांचे देखभाल दुरुस्तीचे काम श्रमीक सेवा सहकारी संस्था यांना मे. स्थायी समिती च्या मंजूर दरानुसार देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५५ दिनांक ३०/०७/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे पुर्वी बांधकाम विभागामार्फत एकुण १७ युिटसाठी साफ-सफाई व देखभालीसाठी जाहीर निविदाद्वारे दर मागविण्यात आले होते.त्याअनुषंगाने स्वयंरोजगार सेवा संस्था यांनी भाग घेतले असता मे.स्थायी समिती ठराव नं.४ दि. २०/१२/२००७ अन्वये मंजूर दराप्रमाणे सुरुवातीला १ वर्ष व काम समाधानकारक असल्यास पुढील ६ वर्षे या प्रमाणे संस्थांना काम देण्यात आले आहे.

तसेच उक्त ठरावान्वये मनपाने यापूर्वी काही शौचालये साफ-सफाईसाठी प्रत्येक कुटुंबाकडून दरमहा रु.३०/-ठेकेदाराने वसूल करुन देखभाल व दुरुस्तीसाठी व सफाई करावी यासाठी यापुर्वी ठराव करुन ठेका देण्यात आलेला होता.सदर ठेका रद्द करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने ज्या-ज्या भागात नविन शौचालय बांधले गेले त्या-त्या भागातील सन्माननीय नगरसेवकांचे शिफारस पत्र व संबंधीत संस्थेच्या विनंती अर्जावरुन मे.स्थायी समिती यांच्या मान्यतेने संबंधित संस्थेलाउक्त मंजूर दरानुसार साफ-सफाई व देखभालीसाठी देण्यात येत आहे.

१.शाळा नं.२८ आवार राऊळवाडी, २.गुरुकृपा नगर, ३.विखेनगर येथील प्रत्येकी १० शौचालये बांधून तयार होऊन अंदाजे २ महिने झालेले आहेत. सदर भागाची परिस्थिती पाहता उक्त शौचालय देखभालीसाठी कोणीही नसल्याने शौचालयाचे नुकसान होऊ शकते. त्यामुळे सदर शौचालय साफ-सफाई व देखभालीसाठी देणे आवश्यक आहे.

तरी पुढे नविन निविदा मागवून प्रक्रिया पूर्ण होईपावेतो सदर तीन शौचालय सन्मा. नगरसेवक श्री.अमोल मासुळे यांच्या शिफारस पत्रानुसार श्रमिक सेवा सहकारी संस्था यांना मे.स्थायी समितीने मंजूर केलेल्या दरानुसार तात्पुरत्या स्वरुपात अतिआवश्यक बाब म्हणून साफ-सफाई व देखभालीसाठी देण्यांस कार्यालयीन अहवालास अधीन राहून मंजुरी देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ३९

धुळे मनपा मालकीचे शहरातील सरदार पटेलउद्यान (टॉवर गार्डन) व राजे संभाजी उद्यान या बगीच्याची देखभाल दुरुस्तीसाठी ३ (तीन) वर्षाकरिता बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यास देणेसाठी जाहिर निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५६ दिनांक ३०/०७/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपा मालकीचे शहरातील सरदार पटेलउद्यान (टॉवर गार्डन)व राजे संभाजी उद्यान या बगीच्याची देखभाल दुरुस्तीसाठी ३(तीन) वर्षाकरिता बी.ओ.टी. तत्वावर चालविण्यास देणेसाठी मा.आयुक्त सो.धुळे मनपा यांचे मंजूर टिपणीने दिनांक २/६/२०१५ अन्वये निविदा काढण्यास मंजुरी दिल्याने उक्त कामास धुळे मनपा जा.क्रं. धुमपा/ बांवि/१०/२०१५-१६ दि. २०/६/२०१५ अन्वये दिनांक २१/६/२०१५ रोजीचे दैनिक देशोन्नती या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक ३०/६/२०१५ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत. प्राप्त संस्था/ ठेकेदार यांनी निविदेबाबत खालील प्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा सादर केलेली आहे.

| अ.क्र. | संस्थेचे/ ठेकेदारांचे नांव | रॉयल्टीची देकार रक्कम | | बयाणा रक्कम | पावती | दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | सरदार पटेलउद्यान | राजे संभाजी उद्यान | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | उज्वल बहुउद्देशीय स्वयं रोजगार सह. संस्था मर्या.धुळे | **७५१११/-** | १३३३३३/- | २५०००/- | ६१६३० | ३०/६/२०१६ |
| २ | व्दारकामाई स्वयंरोजगार सह. संस्था मर्या धुळे | ७१०००/- | २०४४४४/- | २५००० | ६१६२९ | ३०/६/२०१५ |
| ३ | इंजि.कोर गौरवसिंग रामचंद्र | २५०००/- | ९००००/- | २५००० | ६१६२८ | ३०/६/२०१५ |
| ४ | श्री. आदिशक्ती हिंगलाज माता चॅरिटेबल ट्रस्ट धुळे | ३००००/- | **२१२०००/-** | २५००० | ६१६१९ | २९/६/२०१५ |
| ५ | तिरुपती सेल्स,धुळे | २१०००/- | ८१०००/- | २५००० | ६१६२० | २९/६/२०१५ |
| ६ | ओमप्रकाश गुलाबचंद शर्मा संचालक आई एकविरा व्हिजन धुळे | - | - | बयाणा रकमेची पावती नाही | - | - |

वरील १ ते ५ संस्थांनी त्यांचे दर दिले असून त्यांनी रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.अ.क्रं.६ यांनी बयाणा रक्कमेची पावती सादर न केल्याने देकार रकमेचा लिफाफा उघडण्यांत आलेला नाही.

सबब उज्वल बहुउद्देशीय स्वयंरोजगार सह.संस्था धुळे यांनी सरदार पटेल उद्यान (टॉवर गार्डन) साठी रॉयल्टीची देकार रक्कम रुपये ७५१११/- असून सर्वात जास्त आहे.

तसेच श्री.आदिशक्ती हिंगलाज माता चॅरिटेबल ट्रस्ट धुळे यांनी राजे संभाजी उद्यान साठी रॉयल्टीची देकार रक्कम रुये २१२०००/- असून सर्वात जास्त आहे.

कार्यालयीन निवेदन व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार धुळे शहरात मनोरंजनाचे सद्यस्थितीत कोणतेही ठिकाण अथवा स्थळ उपलब्ध नाही.शहरातील नागरीकांच्या वअबाल वृधांच्या मनोरंजनासाठी बगीचे विकसीत करुन देखभाल दुरुस्तीवर देण्यांचा चांगला प्रस्ताव प्रशासनाकडून प्राप्त झालेला आहे.प्रस्तावात नमूद संभाजी गार्डन व टॉवर बगीचा हे शहरातील प्रमुख बगीचे असून नगरपालिका स्थापनेपासून अस्तित्वात आहेत.यासाठी सदर बगीच्यांचे योग्य तो विकास व देखभाल दुरुस्ती होणे आवश्यक व गरजेचे आहे.याठिकाणी माहिती घेतली असता संभाजी उद्यान विकसीत करण्यांसाठी श्री.आदिशक्ती हिंगलाज माता ट्रस्ट यांनी सर्वाधिक देकार रक्कम दिलेली असून बगीचा विकसीत करण्याबाबत व त्याठिकाणी करण्यांत येणा-या सुविधा व बसविण्यांत येणा-या खेळणी व इतर बाबींबाबत निविदेसोबत पत्र देऊन नमूद केलेले आहे. तसेच निविदेसोबत आवश्यक ते प्रस्तावित सुविधे बाबतचे छायाचित्र सोबत जोडलेले आहेत. श्री.आदिशक्ती

हिंगलाज माता ट्रस्ट हे शहरातील सामजिक क्षेत्रातील अग्रेसर संस्था असून त्यांना त्या कामाचा अनुभव देखील आहे.त्यामुळे संभाजी उद्यानाचे विकसन व देखभाल दुरुस्ती करणेकामी आलेले श्री.आदिशक्ती हिंगलाज माता ट्रस्ट यांची आलेली सर्वाधिक देकार रकमेस मान्यता देण्यांत येत आहे.

सदर देखभाल दुरुस्तीचा ठेका हा निविदेप्रमाणे ३ वर्ष मुदतीसाठी आहे तथापि संबंधित ट्रस्ट मार्फत त्याठिकाणी खेळणी तथा इतर सुविधा करणेसाठी सुमारे वर्ष भराचा कालावधी लागणार आहे.तदनंतर सदर ठिकाणी पूर्ण सुविधा युक्त बगीचा उपलब्ध होणार आहे. सदर ट्रस्ट याठिकाणी मोठया प्रमाणावर गुंतवणूक करणार असल्यामुळे निविदेतील देखभाल दुरुस्तीचा कालावधी वाढविण्याबाबत संबंधितसंस्थेने मागणी केलेली आहे. त्यामुळे मनपा अधिनियमातील तरतूद तपासून सदर संस्थेस सुमारे ५ वर्ष मुदतीकरिता देखभाल दुरुस्तीसाठी देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर संस्थेचे काम समाधानकारक असल्यास त्यांना दरवर्षी १० टक्के वाढ करुन मुदतवाढ देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर बगीच्यासाठी नागरीकांसाठी आकारण्यांत येणारे प्रवेश दर तसेच इतर सुविधाचे दर याबाबत मनपाची लेखी संमती घेऊनच आकारण्याबाबत संस्थेने कार्यवाही करावी. प्रशासनामार्फत संबंधित संस्थेकडून आवश्यकअटी शर्तीचा लेखी करारनामानियमाप्रमाणे करुन घेण्यांत यावा.

तसेच सदर प्रस्तावात सरदार पटेल उद्यान (टॉवर बगीचा) देखभाल दुरुस्तीसाठी उज्वल बहुउदेशिय संस्थेस देण्याबाबत प्रस्तावित करण्यांत आलेले आहे.सदर टॉवर बगीचा हा ब्रिटीशकालीन असून शहराचा केंद्र बिंदू आहे. सदर बगीचाचे विकसन व देखभाल दुरुस्ती ही दर्जेदारव दिर्घकालीन होणे आवश्यक आहे.तथापि संबंधित संस्थेने निविदेसोबत सदर बगीचाच्या विकसनाबाबत व देखभाल दुरुस्ती बाबत कोणतेही निश्चित स्वरुपाचे कार्यवाही बाबत कळविलेले नाही.तसेच सदर प्रस्तावाची छाननी केली असता सदर संस्थेमार्फत भरण्यांत आलेल्या निविदा फार्मवर संबंधितांची स्वाक्षरी देखील नाही. सदर बाब देखील अतिशय गंभीर व नियम बाहय आहे.सदर संस्थेकडे याबाबत अनुभव आहे किंवा नाही हे देखील निश्चित होत नाही. तसेच सदर बगीच्याचे क्षेत्रफळही मोठे असल्याने जास्त सुविधा देऊन त्याव्दारे जास्त उत्पन्न महानगरपालिकेस प्राप्त होऊ शकते. क्षेत्रफळाच्या मानाने आलेली देकार रक्कमही कमी असल्याने सदर कामी आलेली निविदा रद्द करण्यांस मान्यता देण्यांत येत असून तांतडीने याकामी फेर निविदा काढण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

प्रशासनाने निविदा स्विकारल्यानंतर स्वाक्षरी बाबत तथा आवश्यक त्या कागद पत्राबाबत शहानिशा करुन मगच परिपूर्ण प्रस्ताव सादर करणे अपेक्षित आहे. मा.आयुक्त सो. यांनी याबाबत दक्षता घेऊन कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**शनिवार दिनांक १९ सप्टेंबर ,२०१५**
**वेळ:- दुपारी ४-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज शनिवार दिनांक १९/०९/२०१५ रोजी दुपारी ४-०० वाजतां धुळे महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| २ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ३ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ४ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ५ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ६ | श्री. डियालाणी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ७ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चाधरी | सदस्या |
| ८ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ९ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १० | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| ११ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १२ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | उपायुक्त तथा सहा. आयुक्त |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त (कर) |
| ४. | श्री. बी.बी. गिते | सहा. आयुक्त ( अति.) |
| ५. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ६. | श्री. एम.आर. सराई | मुख्य लेखाधिकारी |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ.श्री. महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. आर.डी. माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| १२. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी. अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १३. | श्री. गणेश खोडे | सहा. प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री. एस.आर.बावीस्कर | भांडारपाल |
| १६ | श्री.आर.व्ही.पाटील | अभिलेखापाल |
| १७ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |
| १८ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| १९ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| २० | श्री. सी.सी.बागुल | ओव्हरसिअर |
| २१ | श्री.सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| २२ | श्री. एस. एन. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ, धुळे |

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म. नगरसचिव — आजच्या सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम झालेला आहे.आजच्या सभेस श्री. चंद्रकांत बापू सोनार सभापती हे अनुपस्थित आहे. तरी सभेचे कामकाज उपस्थित सदस्यांमधून एका सदस्यांची सभापती पदावर निवड करणेसाठी सदस्यांनी नांव सुचवावे किंवा तशी यादी दयावी.

**प्रति,**

**मा. आयुक्त साो.**

**धुळे महानगरपालिका धुळे**

विषय :- महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३ (ई) नुसार सभापती निवड करणेबाबत.

**महोदय,**

आज दिनांक १९/०९/२०१५ रोजी मे.स्थायी समितीची सभा आयोजित करण्यांत आलेली आहे. तथापि सदर बैठकीस विद्यमान सभापती श्री.चंद्रकांत सोनार हे अनुपस्थित आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३ (ई) नुसार विद्यमान सभापतीच्या अनुपस्थितीमुळे आजच्या सभेच्या सभापती पदी श्री.अमोल पावबा मासुळे यांची नियुक्ती करण्याबाबत विनंती आहे.

सुचक :- श्री. अमीन पटेल

अनुमोदकः:- श्री. सोनल दिलीप शिंदे

म. नगरसचिव — श्री.अमोल पावबा मासुळे यांनी सभापती पदी विराजमान व्हावे ही विनंती.

म.सभापती — सन्मा.सदस्यानी माझे सभापती पदासाठी नाव सुचविले त्याबद्दल सर्वाचे आभार मानतो.उपस्थित सदस्य अधिकारी गण, पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

**सभेच्या सुरुवातीस सन्मा.सदस्य श्री. नरेंद्र गोटू परदेशी यांनी मा. सभापती यांच्या परवानगीने लक्षवेधी मांडली.**

म. नरेंद्र परदेशी — सभापती महोदय, विषयामध्य दोन तीन गोष्टी आहेत. १३६ कोटी रुपयांची पाणीपुरवठा योजनेअंतर्गत शांतीनगर येथे जलकुंभाचे काम चालू आहे. त्याठिकाणी वापरण्यात येणारे सिमेंट, स्टील स्टँडर्ड प्रमाणे आहे का? त्याठिकाणी जो एरिया आहे टाकीच्या फाऊडेशनचे कामात १ मिटर कॉक्रीटची भर केलीा पाहिजे होती. प्रत्यक्षात दीड फूटावर कॉक्रीट ओतले आहे भराव जर व्यवस्थित केला नाही तर काहीही घटना घडू शकते.ठेकेदार हा मनपाचे वाटोळे करावयला निघाला आहे. एकदम बेजबाबदारपणे काम करीत आहे. ठेकेदार त्याठिकाणी जे काम करीत आहे याची प्रशासनाला माहिती आहे का?

म. सभापती — सन्मा.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला आहे त्याबाबत अभियंता यांनी खुलासा करावा.

म. अभियंता — चक्करबर्डी येथे जलकुंभाचे फूटींगचे काम सुरु असून कॉक्रीट ओतून फूटींगचे काम करणेत येत असून चौकशी समिती पाहणी करतांना ठेकेदार यांना समक्ष सुचना केल्या आहेत. काम एकजीव नाही. सेक्शनप्रमाणे आलेले नाही. ते काढावे लागतील तसे पत्रही ठेकेदाराला दिले होते. परंतु ते काम तोडण्यांचे अवगत केले नाही.

म. नरेंद्र परदेशी — जलकुंभाच्या फूटींगचे झालेले काम तोडण्यांची प्रक्रिया सुरु असतांना तेथे मनपा अधिकारी का उपस्थित नव्हता.आपण सदरचे काम गुणवत्तापूर्वकएस्टीमेट प्रमाणे काम पूर्ण करणेसाठी पी.एम.सी. ची नेमणूक केली आहे.असे असतांना तेथे कोणीही उपस्थित नव्हतें का नव्हते. जे नुकसान झाले आहे त्याची भरपाई कोण करणार आहे. त्याठिकाणी अधिक्षक अभियंता, ठेकेदाराचे लोक तसेच स्वतः अभियंता शिंदे साहेब उपस्थित होते त्यांना कळाले नाही का? जे काय एस्टीमेट आहे स्टील कोणते वापरावयाचे ते दिले आहे. त्याची खातरजमा का केली नाही. नुकसानीस जबाबदार कोण ठेकेदाराचे बील निघाले आहे का?

म. अभियंता — जर काही काम खराब झाले तर ते ठेकेदार बेअर करतो.

म. नरेंद्र परदेशी — त्याठिकाणी आपण उपस्थित होते तर तुम्ही का नोटीस दिली नाही.

म. अभियंता — समितीच्या श्रमती पलांदे मॅडम यांनी सुचना केल्या आहे.त्या गोष्टीची चौकशी होऊन स्पष्ट होणार आहे.

म. नरेंद्र परदेशी — मे. सुप्रीम कोर्टाचा निर्णय आहे. नगरसेवक हा कुठलीही फाईल पाहू शकतो. आपल्या आयुक्तांनी पराचा कावळा केला आहे.जलकुंभाचे २० लाखाचे काम निकृष्ट झाले आहे. म्हणून तोडावे लागले मग त्याचे बील देऊ नये. याची इतिवृत्तांत नोंद घ्यावी.त्या ठेकेदारावर आयुक्त यांनी काय कारवाई केली आहे.आजपर्यंत झालेल्या कामास आयुक्त जबाबदार आहे. लोकांना दिशाभूल करावयाचा प्रकार आहे.आज सर्वानी वर्तमानपत्रात वाचले आहे ठेकेदार निकृष्ट काम करीत आहे.आपल्या वतीने गुन्हा दाखल करणेचा आदेश करावा.पालिकेचे नुकसान केले आहे.आज योजना त्यांच्यामुळे बंद पडली आहे. वृत्तपत्रात येते एवढी मोठी योजना येथे कोणीही उपस्थित नव्हते. या आयुक्तावर आणि ठेकेदारावर कारवाई झाली पाहिजे.आज योजना बंद पडली आहे. राज्य शासनाने म.जि.प्रा.कडे योजना वर्ग करावी म्हणून प्रस्ताव आहे ती वर्ग झाली का?उत्तर पाहिजे.

म. अभियंता — योजना हस्तांतर करणेबाबत शासन निर्णय झाला आहे. सर्व कागदपत्रे घेणेसाठी मजिप्राला पत्र दिले आहे मनपाकडून योजना कशी घ्यावी याबाबत मजिप्राने शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. योजना हस्तांतर करणेसाठी समितीकडे ठेवू.

म. नरेंद्रपरदेशी — मनपाने काररनामा केला आहे. अशी योजना ताब्यात घेणार आहे का? १५४ कोटी रुपयांची योजनेबाबत आयुक्त ठरविणार आहे का? हा विषय स्थायी समिती समोर आला पाहिजे. मजिप्राकडे वर्ग करणेसाठी ठराव करतांना हा विषय स्थायी समितीमध्ये ठेवला पाहिजे. मजिप्राचे पत्र नाही. कोणाचेही पत्र येते. ठेकेदार नालायक माणूस आहे भ्रष्ट आहे. या ठेकेदाराचा ५५ कोटी रुपयावर डोळा आहे अव्वाच्या सव्वा बील भरावयाचे त्याची टाक्या करणेची दानत नव्हती. तरी मनपाने २५ कोटी रुपये ठेकेदाराला दिले आहे.म्हणून ही योजना बाबत सभापती यांनी असा आदेश पारीत करा निविदेचा भंग केला म्हणून आयुक्त यांचेवर देखील जबाबदारी निश्चित करणेत यावी मिलीभगत आहे ठराव करणेत यावा हा असे मी सन्मा. सभापती यांना विनंती आहे.

म. सभापती — पाणीपुरवठा योजनेअंतर्गत जलकुंभाचे संदर्भात लक्षवेधीवर चर्चा केली आहे. समितीने संपूर्ण कामाची पाहणी केली आहे.समितीच्या श्रीमती पलांडे मॅडम यांनी पाहणी केली आहे.त्यांचा अहवाल आल्यानंतर दोषी असणा-यावर कारवाई करणेत येईल. नगरसचिव यांनी विषय पत्रिकेवरील विषयास सुरुवात करावी.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४० — धुळे मनपा दवाखान्यात श्वानदंश रुग्णांना देण्यांत येणारी लस द्रारिद्र रेषेखालील रुग्णांना मोफत व इतर रुग्णांना ना नफा ना तोटा या तत्वावर खरेदी मुल्य आकारुन देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५७ दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सभापती मे.स्थायी समिती यांचे दि.४/१/२००८ चे पत्रानुसार शासकीय दर कराराशी तुलना करण्यासाठी जाहीर निविदा प्रसिध्द करुन दर मागविण्यांत आले.धुळे मनपा मे. स्थायी समिती ठराव नंबर३२ दि.१७/०१/२००८ चे मंजुरी प्रमाणे धुळे शहरातील बी.पी.एल.कार्डधारकांना विनामुल्य.तसेच धुळे शहर मतदार संघातील यादीत नाव असलेल्या नागरीकांकडून रु.५०/-मात्र तसेच बाहेरील पाहुणे आलेल्या व्यक्तींला त्या भागातील नगरसेवकांच्या शिफारसीनुसार रु.५०/- मात्र लसीपोटी फी आकारण्यांत येवून लस उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही सुरु करण्यांत आली.

मा.म.दि.आडिवरेकर,उपसचिव,महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग मंत्रालय मुंबई यांचे पत्र क्रं.संकीर्ण/१०२००४/प्र.क्र.४२/नवि२०दि.२८/८/२००८ चे पत्रानुसार महानगरपालिकेच्या रुग्णालया मध्ये येणा-या श्वानदंशाच्या सर्व रुग्णांना लस मोफत देण्यांचे निर्देशानुसार धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रं.५ दि.२४/०२/२००९ व धुळे मनपा स्थायी समिती ठराव क्रं.७५ दि.२५/६/२००९ नुसार धुळे मनपा हद्दीतील रहिवासी असल्याचा कुठल्याही प्रकारचा पुरावा असल्यास तो ग्राहय धरुन श्वानदंशाचे सर्व रुग्णाना लस मोफत देण्यांत येत आहे. व या कार्यवाहीमुळेधुळे महानगरपालिकेस वार्षिक सरासरी १० लाख रुपयांचा अतिरिक्त खर्च होत आहे.

धुळे शहराच्या हद्दीमध्ये सिव्हील हॉस्पीटल आहे.त्यांना शासन अनुदान मिळत असते असे असतांनाही धुळे शहरातील सर्व श्वानदंश रुग्णांना धुळे मनपात लस घेण्यांसाठी पाठविण्यांत येत आहे.त्यामुळे अतिरिक्त खर्चात वाढ झालेली आहे.

धुळे मनपाची आर्थिक परिस्थिती पाहता सदरचा वाढीव अतिरिक्त खर्च कमी करण्यांसाठी धुळे शहरातील बी.पी.एल.धारकांना त्यांचे फोटो ओळखपत्र घेवून मोफत व धुळे शहरातील इतर रुग्णांना लस खरेदीची रक्कम आकारुन श्वानदंश लस उपलब्ध करुन दिल्यास धुळे मनपाचा वाढीव अतिरिक्त खर्च कमी होईल.

सबब धुळे मनपा दवाखान्यात श्वानदंश रुग्णांना देण्यांत येणारी लस द्रारिद्रय रेषेखालील रुग्णांनामोफत व इतर रुग्णांना ना नफा ना तोटा या तत्वावर खरेदी मुल्य आकारुन देणेबाबत (म.आरोग्याधिकारी यांचे कडील जा.क्रं.धुमपा/आरोग्य/३४/२०१५-१६दि.१/०८/२०१५ नुसार स्थानिक बाजारात श्वानदंश लस रु.३५०/-ला मिळत असते परंतु धुळे मनपा शासकीय दरकरारानुसार रुपये १३२/-,रु.१३६-४९,रु.१४२/-या त्या त्या वेळेच्या अस्तित्वात असलेल्या शासकीय कमी दरकरारा प्रमाणे खरेदी करत असते.) निर्णय घेणेसाठी प्रस्ताव मे.स्थायी समितीपुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व प्रशासनाची आलेली टिपणीचे अवलोकन करता नफा तोटा हा विचार न करता धुळे शहरातील स्थानिक नागरीकांना आवश्यक ती आरोग्य सेवाउपलब्ध करुन देणे हे मनपाचे कर्तव्य आहे.त्याअनुषंगाने श्वानदंशावरील लस धुळे शहरातील द्रारिदय रेषेखालील रुग्णांना मोफत व शहरातील इतर रुग्णांना रुपये ५०/- मात्र मुल्य आकारुन देणेबाबत मान्यता देण्यांत येत आहे.तसेच याबाबत संबंधित भागातील नगरसेवकांचे लेखी पत्र घेण्यांत यावे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४१ धुळे मनपा मार्फत मनपा कार्यक्षेत्रात करण्यांत येणारे विवाह नोंदणी शुल्कात वाढ करणे, तसेच विवाह नोंदणी फार्म धुळे मनपा मार्फत विक्री करणे याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५८ दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपा अंतर्गत सन २००८ पासून विवाह नोंदणीचे काम करण्यांत येत आहे.यासाठी शासनाने दिलेले दराप्रमाणे विवाह नोंदणी शुल्क आकारण्यांत येत आहे. ते खालील प्रमाणे-

१) विवाह दिनांक पासून ९० दिवस पर्यत -रुपये ५०/- मात्र
२) विवाह दिनांक पासून ६ महिने - रुपये १५०/- मात्र
३) विवाह दिनांक पासून एका वर्षाच्या वर - रुपये २५०/- मात्र
४) छायांकित प्रत ( १ प्रत) - रुपये २०/- मात्र

वरील नुसार शुल्क आकारण्यांत येत आहे.सदरचे शुल्क शासनाकडे जमा करावयाची असते.यात मनपाचा कुठलाही भाग नाही. साधारण:१ वर्षात ५००ते ५५०विवाह नोंदणी करण्यांत येते.

वरील नुसार विवाह नोंदणी दाखला देतांना मनपाला कुठलाही आथिक लाभ नाही जर खालील नुसार शुल्क लावल्यास मनपाला आर्थीक लाभ होऊ शकतो.

१) विवाह दिनांक पासून ९० दिवस पर्यत -रुपये ५०/- + १०००/- मात्र

२) विवाह दिनांक पासून ६ महिने - रुपये १५०/-+ १०००/- मात्र

३) विवाह दिनांक पासून एका वर्षाच्या वर- रुपये २५०/-+ १०००/- मात्र

४) छायांकित प्रत ( १ प्रत) - रुपये २०/- + २००/- मात्र

वरील नुसार विवाह नोंदणी शुल्क आकारणी केल्यावर मनपाला वर्षाला ५,००,०००/- ते ५,५०,०००/- रुपयाचा आर्थिक लाभ मिळू शकतो.

सदर शुल्क नियमित नोंदणी करिता योग्य आहे तसेच तात्काळ (Urgent) २४ तासात दाखला हवा असल्यास नोंदणी शुल्क दुप्पट करावे असे आरोग्याधिकारी यांनी शिफारस केलेली आहे.

२) तसेच धुळे मनपा अंतर्गत विवाह नोंदणी करण्यांत येते यासाठी लागणारा अर्ज ( फार्म) एकुण ८ पाने असतो. त्याची विक्री विशाल झेरॉक्स यांचेकडून रु. ३०/- मध्ये नागरीक विकत घेत आहेत. सदरचा अर्ज धुळे महानगरपालिकेचा नावाने आहे.

सदर विवाह नोंदणीचा अर्ज खाजगी दुकानांकडून न घेता नागरीकांनी धुळे महानगरपालिके कडून विकत घ्यावा.सदर अर्ज रेकॉर्ड विभाग मनपा मार्फत छापून त्या अर्जाची किंमत १००/- रुपये मात्र असावी.

सदर अर्जाची किंमत १००/- रु.केल्यास मनपाला वर्षाला अंदाजे ५००००/- ते ५५,०००/- रुपयांपर्यत व त्यापेक्षा अधिक आर्थिक लाभ मिळू शकतो.

उक्त नुसार विवाह नोंदणीसाठीचा फॉर्म मनपामार्फत वितरीत केल्यास मनपाचा आर्थिक फायदा होऊ शकतो.

वरील प्रमाणे आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करुन विवाह नोंदणीपासून मनपास कोणतेही उत्पन्न प्राप्त होत नाही. तथापि याकामी मनपाची यंत्रणा व कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन द्यावा लागतो. तसेच विवाह नोंदणीसाठी येणारे नागरीक हे बहुतांशी सधन कुटुंबातील असल्यामुळे व शासन योजना व पर्यटन याचा लाभ घेण्यासाठी विवाह नोंदणी करतात. त्यामुळे मनपाच्या आर्थिक उत्पन्नाच्या दृष्टीने सदर प्रस्ताव महत्वाचा असून श्री. नरेंद्र परदेशी यांचा विरोध नोंदवून सदर प्रस्तावास कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे.तसेच सामुदायीक विवाह सोहळयांत होणा-या विवाह नोंदणीसाठी व द्रारिदय रेषेखालील नागरीकांच्या विवाह नोंदणीसाठी फक्त नियमाप्रमाणे शासकीय शुल्क आकारण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. **बहुमताने मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:- ४२ आरोग्य विभागाकडील गलीमॅन व्हॅक्युम एम्टीयरएमएच१८ G१०१७चा व्हॅक्युम पंप नादुरुस्त झाल्याने नवीन व्हॅक्युम पंप खरेदीसाठी निविदा दर मागविण्यांतआलेत.त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५९ दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा आरोग्य विभागाकडील गलीमॅन व्हॅक्युम एम्टीयर एमएच १८जी १०१७ या व्हॅक्युम पंप हा मैला घाण व्यवस्थित खेचत नसलेने सा.शौचालयाचे

सेप्टीक टूक सफाई करणेस अडचण निर्माण होत आहे व्हॅक्युम पंप अभावी वहान बंद असलेने कामात अडचण होत आहे.त्यामुळे ड्रायव्हर मॅकेनिक यांनी सहा. आरोग्याधिकारी यांचे मार्फत नवीन व्हॅक्युम पंप मिळणे बाबत रिपोर्ट सादर केला. त्यावर मा. आयुक्त सो. यांचे मंजुरीने दै. वार्ता व आपल नवराज्य हया दोन वृत्तपत्रात टेंडर नोटीस प्रसिध्द करणेत आली. मुदतीत आलेल्या निविदा दरामध्ये मणियार ॲण्ड कंपनी अहमदाबाद यांचे व्हॅक्युम पंप मॉडेल पी.एन.३३ हौसपाईप संपूर्ण फिटींगसहचे दर प्रती रु.१,६०,०००/- कमी आहेत.सदर व्हॅक्युम पंपाची यापूर्वीही ४ ते ५ वेळा दुरुस्ती करणेत आली. परंतु वारंवार दुरुस्ती कामे निघत असलेने कामात अडचण निर्माण होत आहे. तसेच सद्यस्थितीतही सदर व्हॅक्युम पंप हा राज्य मार्ग परिवहन महामंडळ तसेच शासकीय तंत्रनिकेतन कार्यालयाकडून तपासणीसाठी पाठविला असता त्यांचेकडेस व्हॅक्युम पंप दुरुस्ती बाबत कुठलेही तज्ञ अधिव्याख्याता व यंत्रणा नसलेमुळे सदरचा पंप या विभागाकडून दुरुस्त करणे शक्य नाही असे कळविले आहे.शासन निर्णय निर्देशानुसार प्रतिवर्षी डिझेल वाहनावर रु.५० हजार पर्यत दुरुस्ती खर्च मर्यादा आहे. परंतु सदर वाहनावर व्हॅक्युम पंपाचा हा खर्च रु.५०,०००/-वर होणारअसून त्यामुळे लेखा परीक्षणात आक्षेपार्ह रक्कम निघणेची शक्यता आहे. तसेच सदर व्हॅक्युम पंप हा नवीन सार्वजनिक शौचालय सफाई खाली करणेसाठी घेणे आवश्यक असलेने स्थायी समितीची मंजुरी असलेस आक्षेपार्ह रक्कम निघणार नाही.त्यावर मुलेप यांनी नवीन पंप खरेदी करणेस हरकत नाही असे नमूद केलेले आहे.

उक्त कार्यालयीन अहवालानुसार तसेच सदर व्हॅक्युम पंप हा नवीन सार्वजनिक शौचालय सफाई खाली करणेसाठी घेणे आवश्यक असलेने मणियार ॲण्ड कंपनी अहमदाबाद यांचे आलेल्या सर्वात कमी दरांना व खर्च रु.१,६०,०००/- मात्रला मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

सही/-x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४३ आरोग्य विभागाकडील जे.सी.बी.१००७ मशिन नादुरुस्त असल्याने त्यांचे दुरुस्तीचे कामे तांतडीने करणेत येत असून तदर्थ होणारा खर्च १,८४,८४३/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६० दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मनपा आरोग्य विभागाकडील J.C.B.१००७(४DX) मशिनाचा बुम लॉक धडीला गाळा पडलेने त्यसाची पिन पूर्णपणे घासली गेली व पूर्ण निकामी झाल्या असून बकेट उचलतांना लोड घेत नाही.पिना बुशींगा नवीन टाकणे,कंट्रोल वॉल ब्लाक लिकेज आहे. त्योचही कीट टाकणे गरजेचे आहे.व इतरही बरेच दुरुस्तीह कामे असलेने J.C.B. चे अधिकृत डिलर मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि.धुळे यांचे इजिनिअर कडून तपासणी करुन दुरुस्ती करुन मिळणेबाबतचा रिपोर्ट मॅकेनिक ड्रायव्हर यांनी मा.आरोग्याधिकारी सो. यांचे मार्फत रिपोर्ट सादर केला.त्यावर सदर कंपनीस भांडार जा.क्रं.३९ दि. ६/७/२०१५ ने पत्र देणेत आले त्यांचे कडून दि.९/७/१५ने कंपनीचे पत्र प्राप्त झाले सोबत कोटेशन नं.३००३७ दि. ९/७/२०१५ ने त्यामध्ये अ.नं.१ सिल बुश वगैरे ते ४६ स्पेअरपार्ट नवीन टाकणे व मजुरी खर्च असा एकुण खर्च रु. १,८४,८४३/- मात्र दर्शविला आहे.तसेच मनपा कडेस एकच जे.सी.बी.असलेने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.सदर जे.सी.बी. मशिन सन २००८ मध्ये खरेदी करणेत आले असून दुरुस्ती खर्च आज अखेर रु.६,२३,०६२/-मात्र झालेला आहे.शासन निर्णय निर्देशानुसार डिझेल वाहनावर प्रति वर्षी ५० हजार पर्यत दुरुस्ती खर्च मर्यादा आहे.त्र तसेच सदर दुरुस्ती ही करणे आवश्यक असून

कंपनीने दर्शविलेला दुरुस्ती खर्च रु.५०,०००/- चे वर असलेने लेखापरीक्षणात आक्षेपार्ह रक्कम निघणेची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे सदर दुरुस्ती खर्च स्थायी मंजूर झालेस आक्षेपार्ह रक्कम निघणार नाही.तरी सदर जे.सी.बी.दुरुस्ती अत्यावश्यक असलेने मा.आयुक्त साो.यांनी सदर कामे तात्काळ करावे असे आदेशित केले आहे.त्यानुसार दुरुस्ती कामे होत आहे.

कार्यालयीन निवेदनानुसार सदर दुरुस्ती कामे अधिकृत डिलर मे.सुयान इन्फ्रास्ट्रक्चर धुळे यांचेकडून करणेस येणारा खर्च रुपये १,८४,८४३/- मात्रला मनपा अधिनियम१९४९चे प्रकरण ५संविदा ७३खंड (क) अन्वये कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
सही/-x x x
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ४४ धुळे मनपाच्या मालकीचे रस्ते, गटारी(खुल्या) मोठेपुल,छोटे पुल( पाईप मोरीसह) खुल्या जागा, व नपा इमारती (खुल्या जागेसह) इ. बाबतचे रेडीरेकनरनुसार घसारासहीत मुल्यांकन करुन देणेकामी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६१ दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपाच्या मालकीचे रस्ते, गटारी(खुल्या) मोठेपुल, छोटे पुल(पाईप मोरीसह)खुल्या जागा,मनपा इमारती (खुल्या जागेसह) इ.बाबतचे रेडीरेकनरनुसार घसारासहीत मुल्यांकन करुन देणेकामी धुळे शहरातील तमाम मुल्यांकन करणारे (व्हॅल्युअर) अभियंते यांचेकडून निविदा मागविणेसाठी मा. आयुक्त साो. मनपा धुळे यांचे दिनांक १३ जानेवारी २०१५ च्या मान्यतेने धुळे मनपा जा.क्रं.धुमपा/ बांध.वि/६२ दि.२०/१/२०१५अन्वये दि.२१/०१/२०१५ रोजीहचे दैनिक आपले नवराज्य व दै. रोजी आपल्या स्वतःच्या लेटरहेडवर स्वच्छ अक्षरात खाडाखोंड विरहीत दर मागविणेत आले आहेत.प्राप्त मूल्यांकन करणारे अभियंते यांनी निविदेबरोबर रोखीने बयाणा रक्कम भरुन निविदा सादर केलेली आहेत.

| अ.क्रं. | बाब | | दर ( रक्कम रुपये ) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | मे.उमेर.आर. अग्रवाल ॲण्ड असो. धुळे | रमेश आर. सिंधवी सिंधवी असो. धुळे | इंजि.जयंत आर.चादंसरकर, धुळे |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | रस्ते | प्रति कि.मी. दर | १२००० | ११००० | १०००० |
| २ | गटारी (खुल्या) | प्रति कि.मी. दर | ३५०० | ३००० | २५०० |
| ३ | पुल,छोटे पुल व मोठे पुल (पाईप मोरीसह) | प्रति मिटर | ६००० | ५५०० | ५००० |
| ४ | खुल्या जागा | प्रति. चौ. मी. | ३५ | ३० | २५ |
| ५ | मनपा इमारती खुल्या जागेसह | प्रति चौ.मी. | ६५ | ६० | ५० |

उक्त कामाबाबत इंजि.जयंत आर.चांदसरकर,धुळे यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून नियमाप्रमाणे बयाणा रक्कम रोखीने भरलेली आहे.

मुल्यांकन करणारे (व्हॅल्युअर)इंजि.जयंत चांदसरकर धुळे यांची सर्वात कमी दराने आलेली निविदा बाबत त्यांना निगोसिएशनसाठी बोलविले असता त्यांनी दिनांक १२/६/२०१५ रोजी पत्र देवून खालील प्रमाणे दर दिलेले आहे.

१) ५ लक्ष पर्यत - ०.५० % मूल्य
२) १० लक्ष पर्यत - ०.२०% मुल्य
३) ४० लक्ष पर्यत - ०.१० % मूल्य
४) ४० लक्षच्या पुढे - ०.०५ % मूल्य

उक्त प्रमाणे आलेले दर हे बाजार भावाशी सुसंगत असल्याने मान्य करण्याबाबत कार्यालयीन अहवाल सादर झालेला आहे.मे.स्थायी समिती समोर सादर करण्यांत आलेला कार्यालयीन अहवालानुसार श्री. जयंत चांदसरकर यांनी वाटाघाटी अंती सादर केलेल्या दरांना मान्यता देण्यांत येत आहे.तसेच संबंधित निविदाधारकास अग्रीम देणेबाबत प्रशासनाने कायदेशीर बाबी तपासून उचित निर्णय घेण्यांत यावा.तसेच निविदाधारकांनी दिलेल्या अटी शर्तीबाबतही मनपा अधिनियमानुसार तसेच लेखा संहितेनुसार आवश्यक बाबी तपासून कार्यालयीन अहवालानुसार उचित निर्णय घेण्यांत यावा. सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ४५ मुलभूत सुविधाच्या विकास कार्यक्रमांतर्गत धुळे शहरातील अल्पसंख्याक समाजासाठी जामचा मळा भागात उच्च नवीन १०लक्ष लिटर क्षमतेचा आर.सी.सी. जलकुंभ बांधणे व ५ लक्ष लिटर क्षमतेची साठवण टाकी बांधणे गुरुत्व वाहिनी, अग्रसेर वाहिनी टाकणे इ. कामासाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६२ दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मुलभूत सुविधाच्या विकास कार्यक्रमांतर्गत धुळे शहरातील अल्पसंख्याक समाजासाठी जामचा मळा भागात उच्च नवीन १० लक्ष लिटर क्षमतेचा आर.सी.सी. जलकुंभ बांधणे व ५ लक्ष लिटर क्षमतेची साठवण टाकी बांधणे गुरुत्व वाहिनी, अग्रसेर वाहिनी टाकणे इ. कामाचे खर्चास म. जिल्हा स्तरीय समिती तथा विभागीय आयुक्त नाशिक प्रशासकीय मान्यता क्रं.नपा/२/२/जा.कं.६५०३दि.६/८/२०१४अन्वये रु.२,०७,९९,८५७/- आर्थिक व प्रशासकीय नासिक यांचेकडील पत्र क्रं.मजिप्रा /नाव ग्रामयोयना /ताशा/१२९२ दि.२१/५/२०१४अन्वये रक्कम रुपये २,०७,९९,८५७/- मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र.धुमपा/१५२/२०१४-१५ फेर ई निविदा सुचना क्रं.५१सन२०१४-१५ दिनांक ५/०२/२०१५ अन्वये दिनांक०६/०२/२०१५ रोजीचे दै. पुण्यनगरी या वृत्तपत्रात खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक १/०३/२०१५ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत. प्राप्त कंत्राटदार/ ठेकेदार यांनी निविदेबाबत रोखीने बयाणा रक्कम भरु निविदा सादर केलेली आहेत.

| अ.नं. | कंत्राटदाराचे / ठेकेदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री. आर.अे.घुले | २४% जास्तीने | |
| २ | श्री. जे.आर. फड | ३१% जास्तीने | |
| ३ | श्री.एम.टी. फड | २८% जास्तीने | |
| ४ | सनराईज कन्स्ट्रक्शन | १८.९९% जास्तीने | |

कंत्राटदार/ठेकेदार सनराईज कन्स्ट्रक्शन यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी नियमाप्रमाणे रोखीने बयाणा रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्राटदार श्री.सनराईज कन्स्ट्रक्शन यांची सर्वात कमी १८.९९% जास्त दराने आलेली निविदा बाबत ठेकेदारास निगोसिएशनसाठी बोलविणेबाबत इकडील कार्यालयीन पत्र जा.क्रं.पा.पु. /२५/ दि.१२/५/२०१५ अन्वये बोलविण्यांत आलेले होते. त्यानुसार त्यांनी दि. ३०/५/२०१५ रोजी पत्र देवून योजनेचे काम १८.९९% जास्तीने करण्याची तयारी दर्शविली आहे ( पा.नं. ११४)त्यात त्यांनी दराचे पृथ्थकरण करुन पत्र सादर केले आहे ( पा.नं. ११४ ते १३४) त्यात त्यांनी निविदेच्या दरांच्या १०.९४% हिशोब दिला आहे त्यांनी ( १८.९९ - १०.९४) = ८.०५% चा हिशोब दिलेला नाही.

सदर दराचे पृथ्थकरण केले असता त्यात Vat४% व इन्शोरन्स १% वजा करुन त्यांना फक्त ६.६८% जादा दराने निविदा मंजूर करता येवू शकते. तरी उक्त बाबत ठेकेदार यांना मा. आयुक्त साो. यांचेकडेस निगोसिएशनसाठी बोलविणे उचित होईल असे वाटते.

त्यावर म.अभियंता यांनी खालील प्रमाणे खुलासा सादर करणेबाबत सूचित केले आहे.

१. अंदाजपत्रक कोणत्या विभागाचे दरसूचीनुसार आहे.
२. अंदाजपत्रक कोणत्या वर्षाचे दरसूचीनुसार आहे.
३. सद्यस्थितीत सन २०१५-१६चे शासकीय दर सूचीनुसार कामाची अंदाजपत्रकीय किंमत काय आहे.
४. शासकीय दरसूची तथा अंदाजपत्रकातील दर १)इन्शोरन्स २) वॅट ३) एलबीटी ४) लेबर सेस अंतर्गत करुन घेण्यांत आले आहेत काय?
५. वरील प्रमाणे तपासणी करुन ठेकेदाराने वाटाघाटी अंती दिलेले दर १८.९९% जास्तीने सन.२०१५-१६ शासकीय दरसूची नुसार किती % जास्तीने आहेत.

यावर ओव्हरसिअर यांनी खालील प्रमाणे अहवाल सादर केला आहे.

१. कामाचे अंदाजपत्रक महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाची दरसूचीप्रमाणे आहे.
२. प्रस्तावाचे अंदाजपत्रक चालू दरसूची सन २०१३-१४ नुसार आहे तीच दरसुची पुढील वर्षासाठी चालू आहे.
३. Current दरसूचीनुसार व दर पृथ्थीकरणानुसार कामाची किंमत रु. २,०८,७५,३३१/- मात्र आहे.
४. शासकीय दरसूचीमध्ये १.इन्शोरन्स व वॅट अंतर्गत आहे. परंतु LBT व Labor सेस अंतर्भूत नाही.
५. वरील प्रमाणे ठेकेदाराचे १८.९९% दर सन२०१५-१६ च्या (Current C.S.R.) व सोबत जोडलेल्या दरपृथ्थीकरणानुसार८.०५% दर जास्तीने आहेत.त्याबाबत त्यांनी हिशोब दिलेला नाही.

त्यावर म.अभियंता यांनी वरील प्रमाणे अवलोकन होऊन शासकीय मु.ले.प यांचे अभिप्राय घेऊन मंजुरीसाठी स्थायी समितीपुढे सादर असे अभिप्राय नोंदविले आहे.

त्यावर मुख्य लेखा परीक्षक यांनी सनराईज कन्स्ट्रक्शन यांनी सदरची निविदा १८.९९% जास्तीने सादर केलेली आहे. त्यांना कार्यकारी अभियंता यांनी वाटाघाटीसाठी बोलविले असता त्यांनी दर कमी केलेले नाही.तथापि ओव्हरसिअर यांनी दराचे पृथ्थःकरण केले असता त्यात वॅट व इन्शोरन्स १% वजा जाता त्यांना ६.६८% जादा दराने निविदा मंजूर करता येवू शकते. असा अभिप्राय दिलेला आहे. मनपाचे आर्थिक परिस्थिती खराब असल्याने संबंधित ठेकेदार यांना पुन्हा मा. आयुक्त साो.यांच्याकडे वाटाघाटीसाठी बोलविणे उचित राहील असे मत आहे असे अभिप्राय नोंदविले आहे.

त्यानुसार म.उपायुक्त व आयुक्त साो. यांचे मंजुर टिपणीप्रमाणे ठेकेदारास इकडील कार्यालयीन पत्र क्रं.बांवि/८५ दि.२१/७/२०१५रोजी मा.आयुक्त साो. दालनात वाटाघाटीसाठी बोलविले होते.

त्यानुसार त्यांनी दि. ३/८/२०१५ रोजी पत्र देवून देकार रक्कम १८.९९% जास्तीने ऐवजी १७.७५% प्रमाणे जास्तीने काम करण्यांस इच्छुक आहे तरी कामाची लवकरात लवकर कार्यादेश देण्यांत यावा असे पत्र दिले आहे. पत्रात त्यांनी १ ते ८ मुद्दे बाबत माहिती दिलेली आहे.

१) सदर काम हे कुशल वर्क व आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर असल्यामुळे कुशल कामागरांनी काम करावे लागते व त्यासाठी जादा दर लागतात.
२) सदर कामासाठी सेट्रींगचा पुरवठा मोठया प्रमाणात करावा लागतो.
३) सदर कामासाठी लागणारी वाळू ही साधारण ८० कि.मी. वरुन वहातूक करावी लागते.
४) सदर कामासाठी लागणारे स्टील (लोखंड) उच्च प्रतिचे व आय.एस.आय.ग्रेडचे वापर करावी लागते.
५) सदर कामासाठी लागणारे सिमेट हे ओ.पी.सी. ग्रेडचे वापरावे लागतात.
६) सदर काम हे सन १३-१४ च्या जिल्हा दर सुचीनुसार बनवलेले आहे व आम्हाला हे काम सन १५-१६ व १६-१७ या वर्षात करावे लागणार आहे त्यासाठी बाजारात होणारी भाव वाढ विचारात घेतली आहे.
७) सदर कामासाठी आर.सी.सी. कन्सलटंट कडून आर.सी.सी. डिझाईन करुन थर्डपार्टी चेकींग करुन ध्यावी लागते त्यासाठी येणारा जादा खर्च
८) सध्या महसूल विभागातील गौन खनिज विभागाने रॉयल्टी २०० रु. ब्रास वरुन ४०० ब्रास रुपये ब्रास केंलेली आहे.

सोबत पत्र अवलोकनार्थ सादर.

त्यावर म.अभियंता यांनी सदरचे काम सन२०१३-१४ वर्षाचे शासकीय दर सूचीनुसारा प्रस्तावित आहे. वाटाघाटीअंती आलेले निविदा दर १७.७५% जास्तीने आहेत. तथापि सदरचे काम आर.सी.सी. (सिमेट कॉंक्रीट)उंचावरील टाकीचे E.S.R.चे कुशल काम आहे. प्रत्यक्षात काम २०१५-१६ वर्षात होणारआहे.यापूर्वी सुध्दा निविदा काढली असता शे.२०.९३%जास्तीनी निर्णयासाठी आलेली होती. ठेकेदाराने वाटाघाटी केल्या नसल्याने फेर टेंडर काढले आहे.

सदरचे कामावर शासकीय अनुदान प्राप्त झाले आहे. वाटाघाटी अंती आलेले दर१७.७५% जास्तीने दर वरील प्रमाणे अवलोकन करुन तसेच वाढीव रकमेची तरतूद सन २०१५-१६च्या अंदाजपत्रकामध्ये करण्यांत आली आहे.

उक्त अहवालाप्रमाणे निगोसिएशन अंती आलेले १७.७५% जास्तीचे दर निर्णयार्थ मे. स्थायी समितीपुढे प्रस्ताव सादर झालेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर प्रस्तावाबाबत व वाढीव दराबाबत प्रशासनाने सुस्पष्ट व सविस्तर टिपणी तांतडीने पुढील बैठकीपावेतो सादर करावी. तो पर्यत सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ४६ धुळे म.न.पा. क्षेत्रात लावण्यात येणारे कापडी फलक, बॅनर, होर्डींग व पोस्टर इ. जाहिरात कराचे दर /जागा भाडे /अनामत दर वाढ करणे बाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६३ दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे २००३ अन्वये शासन निर्णय क्रमांक जीईएन१०९७/ १६ प्र.क्र. -३८/९७नवि-२७दि.९ जुन २००३ मनपा अधिनियम १९४९ चे कलम ४५६ अ च्या

पोट कलम (१)यासह आणि कलम २४४, २४५ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून महानगरपालिका क्षेत्रातील जाहिराती आणि फलक (होर्डीग) यांच्या नियंत्रणा संबंधी दिलेल्या नियमानुसार नियम ३ नुसार म.न.पाच्या जमीनी वरील जाहिरात फलकांना परवानगी देवू शकते. नियम (४) परवानगी मिळण्या बाबत व तिच्या नुतणीकरणाच्या कार्यपध्दती तसेच नियम ७) कंत्राटाचा कालावधी सर्व साधारण ३ वर्ष किंवा पुढील वित्त्ीय वर्षाच्या ३१ मार्च हा दिनांक या पैकी जे अगोदर येईल तो असेल. म.न.पा.च्या जागेचा बाबतीत विर्निदीष्ट स्यळी जाहीरात लावण्याकरीता आयुक्तां कडुन लेखी परवानगी मिळाल्यानंतर अभिकरण आयुक्तां बरोबर १ करार (२ प्रतीत ) करील. जाहीरात स्यळाचे नुतणीकरण करण्यासाठी अभिकरणाकडुन त्याबाबतविचार करता येईल. नियम (८) जाहीरातीचे भाडे आणी फी महानगर पालीकेने वेळोवेळी मान्य केलेल्या दरानुसार अभिकरणाकडुन म.न.पाला अग्रीम म्हणुन सहामाही भाडे/किंवा फी देइल असे नमुद आहे.

उक्त नुसार धुळे महानगरपालिका हद्दीत लावण्यात येणा-या बॅनर/होर्डीगवर मनपा मार्फत कर आकारणी करून कर वसुल करण्यात येतो. धुळे महानगरपालिका हद्दीत जाहिरात फलक डिजीटल बोर्ड, बॅनर,हार्दीक शुभेच्छा फलक, वाढदिवस, स्वागतम कमानी लावणेसाठी धुळे महानगरपालिका ठराव क्र. १० दि.३१/१/१४ अन्वये खालील प्रमाणे दर आकारण्यात येत आहेत.

**अल्प मुदतीसाठी (सद्यस्थितीतील) जाहिरात कराचे दर**

| अ.क्र. | जाहीरात कापडी फलक/बॅनर आकारमान | सद्यस्थितीतील दर | अनामत रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ५० चौरस फुटास | एक रुपया दर चौरस फुट प्रति दिवस | रु. १००/- |
| २ | १०० चौरस फुटास | एक रुपया दर चौरस फुट प्रति दिवस | रु. ३००/- |
| ३ | २०० चौरस फुटास | एक रुपया दर चौरस फुट प्रति दिवस | रु. ६००/- |

**दिर्घ मुदतीसाठी जाहिरात कराचे दर**

| अ.नं. | जाहिरातीचा प्रकार | मागिल दर | सद्यस्थितीतील दर |
|---|---|---|---|
| १ | **रोषनाई**<br>केलेल्या किंवा इलेक्ट्रॉनिक जाहिरात | रु. ६/- चौ. फुट | **रु. १८/- चौ. फुट** |
| २ | वॉलपेंटींग,संरक्षक कठडे, रस्त्याचे मध्यम, पदपथ,वृक्ष संरक्षण जाळयावरील जाहिरात (मनपाची जागा असल्यास अनामत) | २.२५/- चौ.फुट<br><br>रु. १५०मात्र प्रति जाहिरात | रु.७/- चौ.फुट<br><br>रु. ४५०मात्र प्रति जाहिरात |
| ३ | **होल्डींग बोर्ड**<br>**जागा भाडे**<br>अनामत रक्कम (मनपा जागेवर) | र.३/-चौ.फुट (१ वर्ष)<br>रु. ३००/-प्रति बोर्ड<br>रु.३००/-जाहिरात असे पावेतो पटीने प्रति बोर्ड | **रु.१०/-चौ.फुट** (१ वर्ष)<br>**रु. ४००/-प्रति बोर्ड**<br>सुधारीत जाहिरात दराच्या दोन पटीने प्रति बोर्ड. |
| ४ | जाहिरात कर परवानगी नुतणीकरण अर्ज | रु.२५/- मात्र प्रती अर्ज | रु.१००/- मात्र प्रती अर्ज |
| ५ | उभे कट आऊट/बॅनर | रू.२/-मात्र प्रती तिन दिवस या प्रमाणे मंजुर | रु.२/- चौ.फुट प्रती दिवस. |

धुळे महानगरपालिकेने जाहिरात कराचे दरासंदर्भात जळगांव व मालेगांव महानगरपालिकांचे दर मागविले असता जळगांव महानगरपालिकेचे **होल्डींग बोर्डचे दर हे रु.३०/-** मात्र चौ. फुट (वार्षिक) आहे. तसेच मालेगांव महानगरपालिकाचे **होल्डींग बोर्डचे दर हे १७.५०/- चौ.फु.** ठरविलेले आहेत.

उक्त नुसार धुळे महानगरपालिका जाहिरात कराचे दर हे जळगांव व मालेगांव महानगरपालिकांचे जाहिरात कराच्या दरापेक्षा तुलनेने फारच अत्यल्प प्रमाणात आहेत. धुळे म.न.पा.चे मुलभत सोयी सुविधांवर होणारा वाढता खर्च व इतर बाबीतुन मिळणारे उत्पन्नाचे

मर्यादीत स्तोत्र असले कारणाने सदर जाहीरात कराचे आकारणीत/दर वाढ करणे धुळे महानगरपालिकेच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने आवश्यक आहे.

धुळे म.न.पा जाहीरात फलक, बॅनर,होल्डींग व पोटर इ. दर ठरविणेसाठी मा.आयुक्त सो. यांनी दिलेल्या निर्देशाप्रमाणे शहर अभियंता बांधकाम विभाग तसेच नगर रचनाकार याचे कार्यालाकडुन जा.क. धु.म.पा. /न.र./६०/दि.३/७/१५ अन्वये धुळे शहराचे भाग निहाय वर्गीकरण करण्यात येऊन खालील प्रमाणे वर्गनिहाय भाग ठरवण्यात आले आहेत.

| अ.नं. | भागाचे नाव | वर्गवारी |
|---|---|---|
| १ | आग्रारोड, आग्रारोड डायव्हर्शन, पारोळा रोड, चाळीसगांव रोड, साक्रीरोड, पांझरा नदी किनारी, | अ |
| २ | एस.टी.स्टॅण्ड , वाडीभोकर रोड, नकाणे रोड, जेल रोड, ग.नं. १ ते ७पेठ भागा (आग्रारोड सोडुन) | ब |
| ३ | इतर सर्व रस्ते. | क |

उक्त दिलेल्या तक्त्यातील भाग निहाय वर्गवारी नुसार अल्प व दिर्घ मुदतीच्या कापडी फलक,बॅनर होल्डींग व पोस्टर इ. जाहिरात दर खालील प्रमाणे.

**अल्प मुदतीसाठी जाहिरात कराचे (वाढीव) दर**

| अ. क्र. | जाहीरात फलक आकारमान | भाग निहाय वर्गवारी | भागाचे नांव | सद्याचे दर | वाढीव दर | अनामत रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ५० चौरस फुटास पर्यंत | अ | आग्रारोड,आग्रारोड डायव्हर्शन पारोळा रोड,चाळीसगांव रोड, साक्री रोड, पांझरा नदी किनारी | १ रु. दर चौरस फुट प्रति दिवस | रु.९/- चौ.फु.प्रति दिवस | रु. १०००/- |
| २ | ५१ ते १०० चौरस फुटास | ब | एस.टी. स्टॅण्ड, वाडीभोकर रोड, नकाणे रोड, जेल रोड, ग.नं. १ ते ७ पेठ भाग (आग्रारोड सोडून) | १ रु. दर चौरस फुट प्रति दिवस | रु.७/- चौ.फु.प्रति दिवस | रु. ७००/- |
| ३ | १०१ ते २०० चौरस फुटास | क | इतर सर्व रस्ते. | १ रु. दर चौरस फुट प्रति दिवस | रु.५/- चौ.फु.प्रति दिवस | रु. ५००/- |

**दिर्घ मुदतीसाठी सद्यस्थितीतील जाहिरात कराचे दर**

| अ.नं. | जाहिरातीचा प्रकार | सद्यस्थितीतील दर | वाढीव दर |
|---|---|---|---|
| १ | रोषनाई केलेल्या किंवा इलेक्ट्रॉनिक जाहिरात | रु. १८/- चौ. फुट | रु.२५/- चौ.फुट |
| २ | वॉल पेंटींग, संरक्षक कठडे, वृक्ष संरक्षण जाळयावरील(झाडावर अथवा झाडाच्या फांदीवर वगळून) (मनपाची जागा असल्यास अनामत) | २.२५/- चौ.फुट<br>रु. १५०मात्र प्रति जाहिरात | रु.७/- चौ.फुट<br>रु. ४५०/- प्रति जाहिरात |
| ३ | i) होल्डींग बोर्ड<br>ii) जागा भाडे | र.१०/-चौ.फुट (१ वर्ष)<br>रु. ४००/-प्रति बोर्ड | होल्डींग बोर्डाचे दर खालील दिलेल्या **(अ )** तक्त्या प्रमाणे. |
| | iii) अनामत रक्कम (मनपा जागेवर) | सुधारीत जाहिरात दराच्या दोन पटीने प्रति बोर्ड | सुधारीत जाहिरात दराच्या दोन पटीने प्रति बोर्ड |
| ४ | जाहिरात कर परवानगी नुतणीकरण अर्ज | रु.१००/- मात्र प्रती अर्ज | रु.१५०/- चौ.फुट |
| ५ | उभे व कट आऊट बोर्डसाठी | रू.२/- मात्र चौ. फुट प्रती दिवस या प्रमाणे मंजुर | रु.५/- चौ.फुट प्रति दिवस. |

**तक्ता अ :- होल्डींग बोर्ड व जागा भाडे संदर्भात** धुळे शहराचे तीन भागात वर्गीकरण करुन त्याचे नवीन दर खालीलप्रमाणे ठरविण्यात यावेत.

| अ.नं. | भागाचे नाव | वर्गवारी | होल्डींग जाहिरात कराचे दर | जागा भाडे |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | आग्रारोड, आग्रारोड डायव्हर्शन, पारोळा रोड, चाळीसगांव रोड, साक्रीरोड, पांझरा नदी किनारी, | **अ** | रु. ५०/- मात्र चौ.फुट प्रति वर्ष | रु.१५००/-मात्र प्रति वर्ष. |
| २ | एस.टी.स्टॅण्ड , वाडीभोकर रोड, नकाणे रोड, जेल रोड, ग.नं. १ ते ७पेठ भागा (आग्रारोड सोडुन) | **ब** | रु. ३०/- मात्र चौ.फुट प्रति वर्ष | रु.१२००/-मात्र प्रति वर्ष. |
| ३ | इतर सर्व रस्ते. | **क** | रु.२०/- मात्र चौ.फुट प्रति वर्ष | रु.१०००/-मात्र प्रति वर्ष. |

तरी वरील प्रमाणे धुळे म.न.पा क्षेत्रात लावण्यात येणारे कापडी फलक, बॅनर, होर्डींग व पोस्टर इ.जाहिरात कराचे दर/जागा भाडे/अनामत दर वाढ करण्यासाठी मे. स्थायी समितीकडे आलेला प्रस्ताव हा धोरणत्मक स्वरुपाचा असल्याने मे.महासभेपुढे सदर प्रस्ताव पुढील उचित निर्णयासाठी शिफारस करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय कमांकः- ४७ धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे बिल्चींग पावडर पुरवठा करणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६४दिनांक १९/९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे रसायने बिल्चींग पावडर पुरवठा करणे करिता फेर निविदा दिनांक १८/६/२०१५ रोजी प्रसिध्द केली होती. त्यानुसार निविदेच्या शेवटची मुदत दिनांक१५/७/२०१५रोजी होती. त्यानुसार त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला आहे.

१. यश केमिकल्स नगांव
२. देवेश इंटरप्रायजेस, जळगांव
३. तिरुपती केमिकल्स, पिंपळकोठा

यांनी भाग घेतलेला आहे. त्यांचे तांत्रिक व व्यापारी बीड उघडण्यांत येवून सर्वात कमी दराची निविदा यश केमिकल्स यांचे रु. १५,५५०/- मे. टन असे होते. त्यानुसार सदरचे दर हे सन २०१३-१४ च्या मागील वर्षाचे मंजूर दर रु. १२,५९९/- पेक्षा रु. २९५१/- मात्रने जास्त होते. त्यानुसार म. आयुक्त साो.यांनी सदरच्या दराबाबत संबंधित ठेकेदारांना वाटाघाटी साठी बोलविण्यास सांगितल होते.

त्यानुसार संबंधित ठेकेदारांना सदरचे रु.१५,५५०/- च्या दरासाठी वाटाघाटी दि. ६/८/२०१५ ला बोलविण्यांत आले त्यानुसार म अभियंता साो.यांच्या दालनात झालेल्या चर्चेनुसार संबंधित ठेकेदाराने रु.१४,९९७/- प्रति मे.टन दराने मालाचा पुरवठा करण्यास सहमती दर्शविली आहे.

सन २०१३-१४च्या रु.१२,५९९/-या दराचे व सन २०१४-१५ च्या यश केमिकल्स नगांव यांनी वाटाघाटी नंतरचे दर रु. १४,९९७/- प्रति मे. टन या दरामध्ये रु. २३९८/- मात्रने दर जास्त आहेत तसेच कोपरगांव नगरपालिकेने दर रु.१८,२५०/- जळगांव मनपाचे दर १६४००/- अशा दराप्रमाणे ते मालाचे पुरवठा करीत आहे.

तरी उक्त बाबत रु.१४,९९७/- प्रति मे.टन दरास मंजुरीबाबतचा प्रस्ताव मे.स्थायी समितीकडे सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर विषया बाबत प्रशासनाने सुस्पष्ट व सविस्तर टिपणी तांतडीने पुढील बैठकीपावेतो सादर करावी. तो पर्यत सदर प्रस्ताव तहकूब ठेवण्यांत येत आहे. सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

**दिनांक १९/९/२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेनुसार घेण्यांत आलेले निर्णय.**

१) स्थायी समिती सभेपुढे सादर होणारे प्रस्ताव व कार्यालयीन टिपणी ही सुस्पष्ट नसल्याने सदस्यांना योग्य ती माहिती वेळीच अवगत होत नाही. त्यामुळे सदस्यांमध्ये गैरसमज व दिशाभूल होण्याचा प्रकार निर्माण होतो. प्रशासनामार्फत यापुढे प्रस्ताव सादर करतांना सुस्पष्ट व सविस्तर रित्या प्रस्ताव सादर करण्याबाबत दक्षता घ्यावी. तसेच सभेपुढे आवश्यक ती माहिती अभ्यासपूर्वक सादर करणेबाबत कार्यवाही करावी. असे म. हंगामी सभापती श्री. अमोल मासुळे यांनी आदेशित केले.

२) सन्मा. सदस्य श्री. अमिन पटेल यांनी त्यांचे प्रभागात झालेल्या पर्जन्यवृष्टीमुळे पाणी सांचून झोपडपट्टी भागात घरात पाणी साचून सर्व सामान्य नागरीकांचे जिवन अस्ताव्यस्त झाले . सदर भागात गटारीचे एस्टीमेट तयार असून ठेकेदार काम करत नसल्यामुळे सदर समस्या निर्माण झालेली आहे. याबाबत तांतडीने प्रशासनामार्फत दखल घेऊन कार्यवाही करावी अशी मागणी केली. याबाबत म. हंगामी सभापती श्री.अमोल मासुळे यांनी संबंधित भागातील ओव्हरसिअर यांनी त्यांचे भागात जावून समक्ष पहाणी करुन याबाबत पुढील उचित कार्यवाही तांतडीने युध्दपातळीवर करावी. म.आयुक्त यांनी याबाबत दखल घेऊन काम पूर्ण करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन आदेशित करावे.

३) सन्मा.सदस्य श्री.सोनल शिंदे यांनी त्यांचे प्रभागातील ऐंशी फूटी रस्त्यावरील एल.ई.डी.पथदिवे अनेक दिवसापासून लावण्यांत आलेले असून सदर पथदिवे अद्याप सुरु करण्यांत आलेले नसल्याची तक्रार उपस्थित केली. याबाबत म. हंगामी सभापती श्री.अमोल मासुळे यांनी सद्यस्थितीत गणेश उत्सव व बकरी ईद हे उत्सव असल्याने संबंधित ओव्हरसिअर यांनी दोन दिवसाचे आंत सदर पथदिवे सुरु करण्याबाबत कार्यवाही करण्यांचे आदेशित केले.

४) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी त्यांच्या भागात मुलभूत सुविधांची कामे तक्रार करुनही होत नसल्याबाबत बैठकीत मुद्दा उपस्थित केला.त्यांच्या प्रभागातील विष्णूनगर येथील बोअरींगवरील मोटारी, तसेच सार्वजनिक शौचालयांची दुरुस्ती व गणेश उत्सव असल्यामुळे ओपन स्पेस व चौकातील हायमाक्स सुरु करण्याबाबत मागणी केली आहे. याबाबत म. हंगामी सभापती श्री. अमोल मासुळे यांनी सन्मा. सदस्यांच्या तक्रारी संबंधित अधिका-यांनी जातीने दखल घेऊन त्याबाबत कार्यवाही करुन अहवाल सादर करणेबाबत आदेशित केले.

५) सन्मा.सदस्य श्री. अमिन पटेल यांनी शहरातील जुना वडजाई रस्ता, ऐंशी फूटी रोड व श्रीराम पेट्रोल पंपा जवळील रस्ताचे काम हे नगरोत्थान योजने मधील असुन ठेकेदाराने अधर्वट सोडलेले आहे. तसेच सदरची कामे निकृष्ठ दर्जाचे झालेले आहे. सदरचे काम ठेकेदाराने फक्त ५० टक्के शासन निधीचे काम करुन उर्वरीत काम अपूर्ण सोडलेले आहे. तसेच अल्प संख्याक भागातील कामे करणेस भेदभाव करतात. याबाबत त्यांचेवर कार्यवाही करावी अशी तक्रार केली आहे. यावर म.हंगामी सभापती श्री.अमोल मासुळे यांनी प्रशासनाने तांतडीने सदर कामाची पहाणी करुन संबंधित ठेकेदाराकडून कामे पूर्ण घेण्याबाबत तसेच अल्पसंख्याक भागातील कामे तांतडीने करणेबाबत संबंधितांना नोटीस देण्याचे आदेशित केले. सही/-x x x

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक२४, सप्टेंबर ,२०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक२४/०९/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां धुळे महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| २ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ३ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ४ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ५ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चाधरी | सदस्या |
| ६ | श्री.अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ७ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ८ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| ९ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १० | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | उपायुक्त कर |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त कर |
| ४. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ५. | श्री. एम.आर. सराई | मुख्य लेखाधिकारी |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८. | डॉ.श्री. अविनाश पाटील | वैद्यकीय अधिकारी |
| ९. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| १०. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी. अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| ११. | श्री. गणेश खोडे | सहा. प्रकल्प अधिकारी |
| १२. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १३. | श्री. सी.सी. बागुल | ओव्हरसिअर |
| १४. | श्री.सी.एम. उगले | ओव्हरसिअर |
| १५. | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १६ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |
| १७ | श्री. एस.एम. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म. नगरसचिव आजच्या सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक तो कोरम झालेला आहे.आजच्या सभेस श्री. चंद्रकांत बापू सोनार सभापती हे अनुपस्थित आहे.तरी सभेचे कामकाज उपस्थित सदस्यांमधून एका सदस्यांची सभापती पदावर निवड करणेसाठी सदस्यांनी नांव सुचवावे किंवा तरी यादी दयावी.

प्रति,

मा. आयुक्त सो. धुळे महानगरपालिका धुळे

विषय :-महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण २ नियम ३(ई) नुसार सभापती निवड करणेबाबत.

महोदय,

आज दिनांक२४/०९/२०१५रोजी मे.स्थायी समितीची सभा आयोजित करण्यांत आलेली आहे. तथापि सदर बैठकीस विद्यमान सभापती श्री. चंद्रकांत सोनार हेअनुपस्थित आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण २ नियम ३(ई)नुसार विद्यमान सभापतीच्या अनुपस्थिती मुळे आजच्या सभेच्या सभापती पदी श्री.अमोल पावबा मासुळे यांची नियुक्ती करण्याबाबत विनंती आहे.

सुचक :- श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम

अनुमोदक:-श्री. रमेश महादू बोरसे , श्री. शरद एकनाथ वराडे

म. नगरसचिव श्री.अमोल पावबा मासुळे यांनी सभापती पदी विराजमान व्हावे ही विनंती.

म.सभापती सन्मा.सदस्यानी माझे सभापती पदासाठी नाव सुचविले त्याबद्दल सर्वाचे आभार मानतो. उपस्थित सदस्य अधिकारी गण,पत्रकार बांधवयांचे स्वागत करतो.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

**सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज**

सन्मा. सदस्य श्री. चंद्रकांत काशिनाथ केले यांनी लेखी अर्ज देऊन आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म. सभापती सन्मा. सदस्याच्या विनंती अर्जानुसार रजा मंजुर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६५ दिनांक २४/०९/२०१५**

सन्मा. सदस्य श्री. कुमार नरोत्तम डियालानी यांनी लेखी अर्ज देऊन आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजुर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ४८ मुलभूत सुविधाच्या विकास कार्यक्रमांतर्गत धुळे शहरातील अल्पसंख्याक समाजासाठी जामचा मळा भागात उच्च नवीन १०लक्ष लिटर क्षमतेचा आर.सी.सी. जलकुंभ बांधणे व ५ लक्ष लिटर क्षमतेची साठवण टाकी बांधणे गुरुत्व वाहिनी,अग्रसेर वाहिनी टाकणे इ. कामासाठी निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या सुधारीत कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६६ दिनांक २४/०९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मुलभूत सुविधाच्या विकास कार्यक्रमांतर्गत धुळे शहरातील अल्पसंख्याक समाजासाठी जामचा मळा भागात उच्च नवीन १० लक्ष लिटर क्षमतेचा आर.सी.सी. जलकुंभ बांधणे व ५ लक्ष लिटर क्षमतेची साठवण टाकी बांधणे गुरुत्व वाहिनी, अग्रसेर वाहिनी टाकणे इ. कामाचे खर्चास म. जिल्हा स्तरीय समिती तथा विभागीय आयुक्त नाशिक प्रशासकीय मान्यता क्रं. नपा/२/२/जा.कं.६५०३ दि. ६/८/२०१४अन्वये रु.२,०७,९९,८५७/-आर्थिक व प्रशासकीय मान्यता देण्यांत आली आहे.तसेच अधिक्षक अभियंता म.जि.प्रा. नासिक यांचेकडील पत्र क्रं. मजिप्रा/नाव ग्रामयोयना /ताशा/१२९२ दि. २१/५/२०१४अन्वये रक्कम रुपये २,०७,९९,८५७/-मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी दिलेली आहे.

उक्त कामाबाबत धुळे महानगरपालिका जा.क्र.धुमपा/१५२/२०१४-१५फेर ई निविदा सुचना क्रं.५१ सन२०१४-१५दिनांक ५/०२/२०१५ अन्वये दिनांक ०६/०२/२०१५ रोजीचे दै.

पुण्यनगरी या वृत्तपत्रात खुल्या निविदा प्रसिध्द करणेत येवून दिनांक १/०३/२०१५ रोजी निविदा दर मागविणेत आले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | कामाची अंदाजित रक्कम (म.जि.प्रा. सन २०१३-१४ च्या दरसूचीनुसार) | रु. १,९५,६३,४३६/- |
| २ | शासनाकडून प्राप्त होणारे अनुदान | रु. १,६०,००,०००/- |
| ३ | सन राईज कन्स्ट्रक्शन नाशिक यांची सर्वात कमी बोलीची निविदा (निगोसिएशन नुसार) | १७.७५% जास्तीने |
| ४ | निविदा बोलीनुसार कामाची अंदाजित किंमत (१७.७५% जास्तीने) | रु. २,३०,३५,९४६/- |
| ५ | मनपा व्दारे दराचे पृथक्करण केल्यानुसार येणारी किंमत(६.६८% जास्तीने ) | रु. २,०८,७०,२७४/- |

उक्त बाबत कामाचे अंदाजपत्रक म.जि.प्रा.मार्फत सन२०१३-१४च्या दरसूची नुसार करण्यांत आले असून सन २०१४-१५ ला म.जि.प्रा विभागाने तीच दरसूची कायम ठेवलेली आहे.

ठेकेदाराने दिनांक ३/०८/२०१५ रोजी पत्र देऊन निगोसिएशन अंती १७.७५ टक्के जास्तीने काम करण्यांची तयारी दर्शविली आहे. त्यात खालील १ ते ८ बाबींचा विचार करुन जादा दराने निविदा मंजुर करावी अशी विनंती केली आहे.

१) सदर काम हे कुशल वर्क व आर.सी.सी. फ्रेम स्ट्रक्चर असल्यामुळे कुशल कामागरांनी काम करावे लागते व त्यासाठी जादा दर लागतात.

२) सदर कामासाठी सेट्रींगचा पुरवठा मोठया प्रमाणात करावा लागतो.

३) सदर कामासाठी लागणारी वाळू ही साधारण ८० कि.मी. वरुन वहातूक करावी लागते.

४) सदर कामासाठी लागणारे स्टील(लोखंड) उच्च प्रतिचे व आय.एस.आय.ग्रेडचे वापर करावी लागते.

५) सदर कामासाठी लागणारे सिमेट हे ओ.पी.सी. ग्रेडचे वापरावे लागतात.

६) सदर काम हे सन १३-१४ च्या जिल्हा दर सुचीनुसार बनवलेले आहे व आम्हाला हे काम सन १५-१६ व १६-१७ या वर्षात करावे लागणार आहे त्यासाठी बाजारात होणारी भाव वाढ विचारात घेतली आहे.

७) सदर कामासाठी आर.सी.सी. कन्सलटंट कडून आर.सी.सी. डिझाईन करुन थर्डपार्टी चेकींग करुन ध्यावी लागते त्यासाठी येणारा जादा खर्च

८) सध्या महसूल विभागातील गौन खनिज विभागाने रॉयल्टी २०० रु. ब्रास वरुन ४०० रुपये ब्रास केलेली आहे.

उक्त नुसार सन २०१५-२०१६ या वर्षाची दरसूची २०१५च्या अखेरीस लागू होण्याची शक्यता आहे. त्यात साधारण अंदाजे १० ते १२ टक्क्यांची वाढ होण्याची शक्यता आहे. असा सुधारीत अहवाल प्रशासनामार्फत मे. स्थायी समितीसमोर सादर झालेला आहे.

वरील प्रमाणे आलेल्या कार्यालयीन निवेदन, लेखापरीक्षक याचाअहवालाचा विचार करता व सन्मा. सदस्यांनी चर्चेत भाग घेऊन सूचित केल्यानुसार प्रशासनाकडून सादर पुरक सुधारीत अहवालात मनपा व्दारे दराचे पृथकरण करुन आलेले ६.६८ टक्के जास्तीचे दराने सदर निविदा मंजूर करता येऊ शकतेअसा अभिप्राय दिलेला आहे. तसेच सदर कामाची निविदा रक्कम ही सन २०१३-१४ च्या शासकीय दरसूचीनुसार प्रस्तावित आहे. सदर निविदा ही यापूर्वी दोन वेळा प्रसिध्द करण्यांत आलेली असून यापूर्वी सदर निविदेसाठी जादा दर प्राप्त झाल्याने पुनश्च फेर निविदा काढण्यांत आलेली आहे. सदर प्रस्तावासाठी राज्य शासनामार्फत ९० टक्के अनुदान प्राप्त होणार आहे. सदर काम हे ई.एस.आर. चे कुशल काम आहे. व प्रत्यक्षात सदर काम हे सन २०१५-१६ या वर्षात पूर्ण होणार आहे. धुळे मनपा मार्फत प्रस्तावित पाणीपुरवठा योजनेत सदर भागासाठी जलकुंभ नसल्याने सदरचे काम

प्राप्त परिस्थितीत अत्यंत आवश्यक व महत्वाचे आहे. सदर प्रस्ताव तांतडीने मंजूर न केल्यास सुधारीत दरसूची लागू झाल्यानंतर सदर योजनेच्या किंमतीत वाढ होण्याचा संभव आहे. उक्त परिस्थितीचा व सदर भागाचा संभाव्य पाणी प्रश्नाचा विचार करता मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने व वस्तुस्थितीचा विचार करुन प्रशासनाने सादर केलेला कार्यालयीन अहवाल व सुधारीत अभिप्रायाच्या अधिन राहून सर्वात कमी दराचे निविदाधारक मे. सनराईज कन्स्ट्रक्शन यांचे सन २०१३-१४ च्या दरसुचीनुसार आलेले १७.७५ टक्के जास्तीने दरांस मान्यता देण्यांत येत आहे. सदर बाबतीत श्री. रमेश बोरसे यांनी विरोध नोंदविला असल्याने त्याचा विरोध नोंदवून सदर प्रस्तावास बहुमताने मान्यता देण्यांत येत आहे.

सदर काम हे अल्पसंख्याक भागातील अत्यंत महत्वपूर्ण काम आहे. सदर कामांस ९० % शासन अनुदान असुन १० % मनपा हिस्सा अदा करावा लागणार आहे. सदर काम मुदतीत पूर्ण होणे आवश्यक आहे. सदर काम मुदतीत पूर्ण व्हावे म्हणुन मनपा हिस्स्यापोटी मनपाच्या दैनंदिन भरण्यातून सदर कामासाठी स्वतंत्र खाते करुन दररोज वीस हजार रुपये मात्र जमा करण्यात यावे.

बहुमताने मंजुर,
सही-x x x
सभापती, स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय कमांकः- ४९ धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे बिल्चींग पावडर पुरवठा करणेसाठी निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या सुधारीत कार्यालयीन निवेदनाचा विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६७ दिनांक २४/०९/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे मनपा जलशुध्दीकरण केंद्रावर लागणारे रसायने ॲलम क्लोरीन टनर,बिलीचींग पावडर पुरवठा करणे करिता दि.१९/६/२०१४ रोजी दै.लाकमत मध्ये वार्षिक निविदा प्रसिध्द करण्यात आली होती.त्यात शेवटच्या दिवशी दि.२४/७/१४ रोजी ॲलमसाठी २ निविदा धारकांनी भाग घेतलेला होता क्लोरीन टनररसाठी २ निविदा धारकांनी भाग घेतलेला होता व ब्लीचींगसाठी एकही निविदा धारकाने भाग न घेतल्याने पुन्हा १ली फेर निविदा प्रसिध्द दि.१९/८/१४ रोजी दै.लोकमतमध्ये प्रसिध्द केली होती.दि.८/९/१४ रोजी शेवटच्या दिवशी ॲलमसाठी ३ निविदाधारकांनी भाग घेतला तसेच क्लोरीन टनरसाठी ५ निविदाधरकांनी भाग घेतला व ब्लिचींग पावडरसाठी १ निविदाधारकने भाग घेतला त्यामुळे ॲलम,क्लोरीन टनरसाठी दि.२४/१२/१४रोजी कार्यादेश करारनामा करण्यात आला व ब्लिचींग पावडर करिता धुळे मनपा मे.स्थायी समिती ठराव नं.२७दि.१९/५/२०१४अन्वये २५०मे.टनास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे दुसरी फेर निविदा दि. १८/६/२०१५रोजी प्रसिध्द केली होती.त्यानुसार निविदेची शेवटची मुदत दि.१५/७/२०१५ रोजी होती. त्यानुसार त्यात ३ निविदाधारकांनी भाग घेतला.

१) यश केमिकल्स नगांव - रू. १५,५५०/-मे.टन.
२) देवेश एन्टरप्राईजेस जळगांव - रू.१७,५००/-मे.टन.
३) तिरूपती केमिकल्स पिंपळगांव -रू. १६,५००/-मे.टन.

या निविदाधारकांनी भाग घेतलेला होता.त्यांचे तांत्रिक व व्यापारी लिफाफा उघण्यात येवून सर्वात कमी दराची निविदा यश केमिकल्स नगांव यांचे रू.१५,५५०/-मे.टन असे होते.त्यानुसार सदरचे दर हे सन २०१३-१४च्या मागील वर्षाचे मंजुर दर १२,५९९/-पेक्षा रू.२९५१/-मात्रने जास्त होते.

त्यानुसार म.आयुक्त सो. यांनी सदरच्या दराबाबत संबंधीत ठेकेदारास वाटाघाटीस आदेशीत केले असता त्यानुसार संबंधीत ठेकेदारास दि.६/८/२०१५ रोजी बोलविण्यात आले असता त्यानुसार म.अभियंता सो. यांचे दालनात झालेल्या वाटाघाटीअंती संबंधीत ठेकेदाराने

रू.१५,५५०/-एवजी रू.१४,९९७/-प्रति मे.टन.या दराने ब्लिचींग पावडरचा पुरवठा करण्यास सहमती दर्शवली आहे.त्याचा तुलनान्मक तक्ता खालील प्रमाणे.

| मजीप्रा चे मंजुर दर (DSR दर) (सन२०१३-१४) | धुळे मनपाचे २०१३-१४ चे दर (मंजुर दर) | मनपा व नपाचे दर | धुळे मनपाचे २०१५-१६चे निविदेतील वाटाघाटीअंती आलेले दर |
|---|---|---|---|
| प्रति मे.टन रू.२५,००० /-मात्र | प्रति मे.टन रू. १२,५९९/-मात्र | १.जळगांव मनपा मंजुर दरापेक्षा रू.१४०३/-मात्र कमी | प्रति मे.टन रू.१४,९९७/-मात्र |
| | | २. कोपरगांव नगरपालिका रू.३२५३/-मात्र कमी | |

वरील प्रमाणे तुलनात्मक तक्ता पाहता म.जि.प्राच्या दरसुची नुसार निविदेतील सर्वात कमी आलेले दर हे प्रति मे.टन रू.१०,१०३/-मात्रने कमी आलेला आहे.तसेच जळगांव महानगरपालिकेच्या मंजुर दरापेक्षा रू.१४०३/- मात्रने कमी आहे.तसेच कोपरगांव नगरपालिकेचे मंजुर दरापेक्षा रू.३२५३/- मात्रने कमी आहेत. तसेच मजीप्रा यांचे दरसुची व इतर महानगरपालिका व नगरपालिकेच्या दराची तुलना केली असता निविदेतील आलेले दर हे शासकीय दरसुची पेक्षा कमीचे आहेत.

धुळे महानगरपालिका जलशुध्दीकरण केंद्रावर अल्पशा प्रमाणात ब्लिचींग पावडरचा साठा असल्याने व पावसाळयाचे दिवस असल्यामुळे जलशुध्दीकरण केंद्रावर तातडीने ब्लिचींग पावडर खरेदी करणेची आवश्यकता असल्याने उक्त बाबत रू.१४,९९७/-प्रति मे.टन दर मे.स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर केले आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व कार्यालयीन अहवाल व सुधारीत पुरक टिपणीस अधिन राहून धुळे शहराच्या पाणीपुरवठयांच्या दृष्टीने सदर विषय अत्यंत महत्वपूर्ण असल्याने व धुळे महानगरपालिका जलशुध्दीकरण केंद्रावर अल्पशा प्रमाणात ब्लिचींग पावडरचा साठा असल्याने व पावसाळयाचे दिवस असल्यामुळे जलशुध्दीकरण केंद्रावर तातडीने ब्लिचींग पावडर खरेदी करणेची आवश्यकता असल्याने सर्वात कमी दराची निविदा धारक मे. यश केमिकल्स नगांव यांचे वाटाघाटी अंती आलेले दर रू.१४,९९७/-मे.टन यास मान्यता देण्यांत येत आहे.नियमानुसार संबंधितांकडून योग्य तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यांत यावा.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

दिनांक २४/९/२०१५ रोजी झालेल्या स्थायी समिती सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेनुसार घेण्यांत आलेले निर्णय.

६) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभा शिवाजीराव चौधरी यांनी भागातील मुलभूत सुविधाच्या कामाबाबत स्वतंत्र खाते उघडून त्यात दैनंदिन भरण्यातून रक्कम जमा करण्यांत यावी अशी मागणी केलेली आहे. तसेच भागातील रस्ते दुरुस्ती बाबत तक्रार करुन लॉ कॉलेज जवळील तसेच जयहिंद चौकातील असलेल्या खड्डे दुरुस्तीबाबत तक्रार केलेली आहे.विष्णूनगर येथील शौचालयाच्या दुरावस्थेबाबतही तांतडीने कार्यवाही करण्यांची मागणी केलेली आहे. याबाबत म. हंगामी सभापती श्री.अमोल मासुळे यांनी नगरसेवकांच्या मुलभूत विकास कामांसाठी स्वतंत्र खाते उघडून त्यांत दैनंदिन भरण्यातून ठरावीक रक्कम जमा करण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करण्यांचे आदेशित केले. तसेच सन्मा. सदस्यांच्या भागातील कामाबाबत तांतडीने पुर्तता करुन याबाबत अहवाल सादर करण्यांचे आदेशित केले आहे.

७) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभा शिवाजीराव चौधरी यांनी भागातील कायम सफाई कामगारांच्या जागेवर रजेच्या कालावधीत बदली कामगार उपलब्ध न करुन दिल्याबाबत तक्रार केली तसेच आजच्या बैठकीत आरोग्याधिकारी तसेच सहा. आरोग्याधिकारी उपस्थित नसल्याने याबाबत चौकशी करुन कार्यवाही करण्यांची

मागणी केली. तसेच भागात गणपती उत्सवामुळे घंटागाडया व्यस्त असल्याने भागात घंटा गाडया उपलब्ध होत नसल्याबाबत मुद्दा उपस्थित केला. याबाबत हंगामी सभापती श्री. अमोल मासुळे यांनी संबंधित भागात तांतडीने सफाई उपलब्ध करुन देण्याबाबत आदेशित केलेले असून अधिका-यांच्या अनुपस्थितीबाबत प्रशासनाने तांतडीने चौकशी करुन याबाबत अहवाल सादर करण्यांचे आदेशित केले.

८) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभा शिवाजीराव चौधरी यांनी स्थायी समितीच्या बैठकीस आयुक्त साो. उपस्थित नसल्याने मुलभूत सुविधाचे व प्रभागातील छोटया छोटया प्रश्नावर कार्यवाही होत नसल्याने प्रभागातील समस्यासाठी आयुक्त साहेब यांच्या उपस्थितीत स्वतंत्र बैठक बोलविण्याची मागणी केली. यावर हंगामी सभापती श्री. अमोल मासुळे यांनी आयुक्त साो. यांच्या उपलब्धतेनुसार स्वतंत्र बैठक आयोजित करण्यांचे आदेशित केले.

९) सन्मा.सदस्य श्री.शरद एकनाथ वराडे यांनी त्यांच्या प्रभागातील ऐशी फूटी रोड ते वरखेडी रोड पावेतो असलेल्या रस्तावर एल.ई.डी. लाईट बसविण्यांचे कार्यादेश देऊनही अद्याप पावेतो लावले नसल्याची तक्रार उपस्थित केली.यावर म. हंगामी सभापती श्री.अमोल मासुळे यांनी संबंधित ठेकेदारास अंतिम नोटीस देऊन कार्यवाही करावी तसेच काम मुदतीत न केल्यास संबंधित ठेकेदारास काळया यादीत टाकण्यांत यावे असे आदेशित केले.

१०) सन्मा.सदस्य श्री.सोनल शिंदे यांनी त्याच्या प्रभागातील ऐंशी फूटी रस्त्यावरील एल.ई.डी.लाईट तांतडीने सुरु करुन याप्रकरणी सन्मा.सभापती यांनी आदेशित करुन सहकार्य केल्याबद्दल आभार व अभिनंदन व्यक्त केले.

११) सन्मा. सदस्य श्री.अमिन पटेल यांनी त्यांचे प्रभागातील व इतर परिसरातील पथदिव्याबाबत तक्रार करुन संबंधित ठेकेदार हा कामात कुचराई करतो. व कर्मचारी लक्ष देत नाही याबाबत मुद्दा उपस्थित केला. व ठेकेदाराला ५००० रुपये दंड करावा अशी मागणी केली. यावर म.हंगामी सभापती श्री. अमोल मासुळे यांनी संबंधित ठेकेदारावर नोटीस देऊन तसेच चौकशी करुन त्यांच्यावर नियमाप्रमाणे दंडात्मक कार्यवाही करावी असे आदेशित केले.

१२) सन्मा.सदस्य श्री.अमिन पटेल यांनी धुळे शहरात एल.ई.डी. पथदिवे बसविण्याबाबतची कार्यवाही अद्याप झाली नसून सदर बाब ही मनपाच्या आर्थिक हिताच्या दृष्टीने अत्यंत आवश्यक असल्याने याबाबत तांतडीने कार्यवाही करावी अशी मागणी केली.यावर विद्युत अभियंता श्री.एन.के.बागुल यांनी याबाबत होत असलेल्या कार्यवाहीची संपूर्ण माहिती सभागृहाला दिली. यावर म. हंगामी सभापती श्री. अमोल मासुळे यांनी याबाबतची कार्यवाही जलद गतीने येत्या महिना भरात पूर्ण करुन त्याबाबत अहवाल दयावा असे आदेशित केले.

१३) सन्मा. सदस्य श्री. रमेश महादू बोरसे यांनी शहरासाठी राबविण्यांत येणारे विंडमिल प्रस्तावाबाबत झालेल्या कार्यवाहीचा अहवाल सभागृहासमोर सादर करण्याबाबत मागणी केली.यावर म. नगररचनाकार श्री. विसपुते यांनी याबाबत माहिती दिली सदर बाबत कार्यवाही सुरु असल्याचे सांगितले.

सही/-x x x

सभापती,स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**
**गुरुवार दिनांक २९ ऑक्टोबर, २०१५**
**वेळ:- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक२९/१०/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा. श्री. चंद्रकांत बापु सोनार,सभापती,स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| **अ.नं.** | **सदस्यांचे नांव** | **हुद्दा** |
|---|---|---|
| १ | श्री. सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. साखला गोविंद तुळशीराम | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ६ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ७ | श्री. डियालानी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ८ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चाधरी | सदस्या |
| ९ | श्री.खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| १० | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ११ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| १२ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एच. पी. कवठळकर | उपायुक्त |
| २. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहाय्यक आयुक्त |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त कर |
| ४. | श्री.बी.बी. गिते | सहा. आयुक्त. ( अति.) |
| ५. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ८. | डॉ.श्री महेश मोरे | आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| ११. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी. अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १२. | श्री. गणेश खोडे | सहा. प्रकल्प अधिकारी |
| १३. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४. | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १५. | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १६ | श्री. बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १८ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| १९ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |
| २० | श्री. एस.एम. देसले | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| २१ | श्री. तुषार ढाके | सहा. अग्निशन अधिकारी |

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म.सभापती सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक ती गणपूर्ती झालेली आहे. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.**

यादी देण्यांत येते की, आमच्या मिल परिसरातील लाडके व्यक्तीमत्व व माजी महापौर श्री. मोहनभाऊ नवले यांचे नातु चि.जयेश नवले यांचे आकस्मीक दुखःद निधन झाले. लहान वयात त्यांच्यावर निर्माण झालेल्या संकटामुळे त्यांचा परिवारावर दुखाःचा आघात निर्माण झालेला आहे. चि. जयेश नवले यांना आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करुन ठराव पारीत करावा ही विनंती.

सुचक :- श्री. अमोल पावबा मासुळे

अनुमोदक :- श्री. संदीप सुरेश पाटोळे

म. सभापती — सर्व सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली अर्पण करणेसाठी २ मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६८ दिनांक २९/१०/२०१५**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार मिल परिसरातील लाडके व्यक्तीमत्व व माजी महापौर श्री. मोहनभाऊ नवले यांचे नातु चि.जयेश नवले यांचे आकस्मीक दुखःद निधन झाले.लहान वयात त्यांच्यावर निर्माण झालेल्या संकटामुळे त्यांचा परिवारावर दुखाःचा आघात निर्माण झालेला आहे.

चि.जयेश नवले यांचे दुःखद निधनामुळे या सभेस आतीव दुःख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दुःखात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ २ मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

मा. सभापती — सर्व उपस्थितांचे स्वागत आहे. मा.आयुक्त सो. हे न्यायालयीन कामकाजासाठी औरंगाबाद खंडपिठ येथे गेलेले असल्याने आजच्या सभेचे कामकाज चालविणेसाठी श्री. कवठळकर सो.उपायुक्त यांनी मा.आयुक्त यांचे वतीने कामकाज पहावे.

म. नरेंद्र परदेशी — मा.सभापती महोदय,या संदर्भात आयुक्तांच्या अनुपस्थितीबाबत माझी हरकत असून यापूर्वी सातत्याने आयुक्त सो.मागील बैठकांना गैरहजर होते.आज अजेडयावर व शहरात अत्यंत महत्वाचे प्रश्न आहेत.यासंदर्भात आयुक्त यांना विचारणा करावयाची आहे.न्यायालयांत मनपाचे वकील नियुक्त असतात.प्रतिज्ञापत्रावर स्वाक्षरीसाठी समक्ष न्यायालयांत उपस्थित राहणे गरजेचे नसते. मनपा दवाखान्यात औषधाचा तुटवडा आहे. रुग्णांना वा-यावर सोडले जात आहे. आज अजेंडयावर बजेट संदर्भात महत्वाचे विषय आहे आम्हा सदस्यांना त्यासंदर्भात प्रश्न विचारावयचे आहे.आयुक्त सो.२ महिन्यातून १५ दिवस हजर राहतात. मुलभूत सेवा सुविधांचे प्रश्न सुटत नाही. याबाबत निषेध म्हणून आजची सभा तहकूब करावी ही विनंती.

म. अमीन पटेल — दवाखान्यात औषधाचा तुटवडा आहे. वर्तमान पत्रातून याबाबत सातत्याने वृत्त प्रसिध्दीस येते. नागरीकांचे मुलभूत सेवा सुविधाचे प्रश्न सुटत नाही.नागरीकांना मुलभूत सुविधा देणे हे मनपाचे कर्तव्य आहे.मुलभूत सुविधाबाबतही कार्यवाही मनपा मार्फत होत नाही.आज सिव्हील हॉस्पीटल मध्येही औषधे नाहीत.आणि मनपा दवाखान्यातही औषध शिल्लक नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. आयुक्त नसल्याने महत्वाच्या प्रश्नाबाबत निर्णय होऊ शकत नाही. त्यामुळे आजची बैठक तहकूब करण्यांत यावी.

म.प्रतिभाताई चौधरी — सभापती महोदय, आजच्या अजेंडयावरील विषय महत्वाचे आहे.आयुक्तांना मिटींगला यायला वेळ नाही. तसेच त्यांना मनपा कामकाजात अनुभव नाही. ते समाधानकारक काम करु शकत नाही. आयुक्त यांना मिटींगचे गांभिर्य नसेल तर त्यांनी बदली करुन घ्यावी. आमच्या स्टेट बॅक कॉलनी, एस.टी कॉलनी या परिसरात लोकांना पिण्यासाठी पाणी नाही आपण पाणीपट्टी आकारतो. त्यांना आपण पाणीपट्टी माफ करणार आहांत का?आयुक्तांच्या अनुपस्थितीमुळे आजची बैठक तहकूब करण्यांत यावी. व पुढील बैठक आयुक्तांच्या उपस्थितीतच आयोजित करण्यांत यावी.

म.कुमार डियालानी — आयुक्त सो. आज उपस्थित नसल्याने आजची मिटींग तहकूब करण्यांत यावी.

म. सभापती — मा.आयुक्त सो.यांना उच्च न्यायालय औरंगाबाद येथे न्यायालयीन कामकाज असल्याने तेथे उपस्थित रहाणे आवश्यक असल्याने त्यांनी याबाबत माझ्याशी संपर्क करुन माहिती दिलेली होती. तथापि याबाबतउपस्थित सदस्यांच्या तीव्र भावना लक्षांत घेता आजच्या स्थायी समितीची बैठक तहकूब करण्यांत येत आहे.

सही/- x x x

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे**

**मंगळवार दिनांक २४ नोव्हेबर,२०१५**

**वेळ:- सकाळी ११-०० वाजता**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची दिनांक २९/१०/२०१५ रोजीची सभा तहकूब करण्यांत आली होती.तीच तहकूब सभा आज मंगळवार दिनांक२४/११/२०१५ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री. चंद्रकांत बापु सोनार,सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा,धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ३ | श्री. शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ४ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ५ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ६ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चाधरी | सदस्या |
| ७ | श्री.खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ८ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ९ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १० | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. श्री. नामदेव भोसले | आयुक्त |
| २. | श्री. एच. पी. कवठळकर | उपायुक्त |
| ३. | डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त (स.प्र.) |
| ४. | श्री.एम.आर. सरईत | मुख्य लेखा परीक्षक |
| ५. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त कर |
| ६. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री.के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक तथा प्र.नगरसचिव |
| ८. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ.श्री. बी.बी. माळी | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. सी. एन. जाधव | प्रभारी सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी. अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १२. | श्री. गणेश खोडे | सहा. प्रकल्प अधिकारी |
| १३. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १४. | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १५. | श्री. आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १६ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| १८ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |
| १९ | श्री. अरुण बी. चौधरी | लिपीक मनपा शिक्षण मंडळ धुळे |
| २० | श्री. तुषार ढाके | सहा. अग्निशमन अधिकारी |

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म.सभापती सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक ती गणपूर्ती झालेली आहे. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.

यादी देण्यांत येते की, विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष मा. अशोकजी सिंघल यांचे दिनांक २१/११/२०१५ रोजी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे.त्यांना आजच्या बैठकीत भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत यावी ही विनंती.

**सुचक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी, भाजप गटनेत्या मनपा धुळे**

**म. सभापती** सन्मा. सदस्यांच्या यादीनुसार मान्यवरांना श्रध्दांजली अर्पण करणेसाठी दोन मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६८(१) दिनांक २४/११/२०१५**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार,विश्व हिंदू परिषदेचे अध्यक्ष मा.अशोकजी सिंघल यांचे दिनांक २१/११/२०१५ रोजी वृध्दापकाळाने दु:खद निधन झाले आहे.

मान्यवरांचे दु:खद निधनामुळे या सभेस आतीव दु:ख होत आहे. ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दु:खात सहभागी असून मृतआत्म्यांस चिरशांती प्रदानार्थ दोन मिनिटे मौनउभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली सर्मपित करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज

सन्मा.सदस्य श्री.साखला गोविंद तुळशीराम, सौ.माधुरी नंदलाल आजळकर यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहणे शक्य होणार नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

म.सभापती सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आज दि.२४/११/२०१५ च्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६९ दिनांक २४/११/२०१५**

सन्मा.सदस्य श्री.साखला गोविंद तुळशीराम,सौ.माधुरी नंदलाल आजळकर यांनी आजच्या सभेस अर्जात नमूद केलेल्या कारणामुळे उपस्थित राहणे शक्य होणार नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती केली आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आज दि.२४/११/२०१५च्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/- x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

**विषय क्रमांक:- ५०** मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. (३०/७/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर७०दिनांक २४/११/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक ३०/७/२०१५ चे ठराव नंबर ४९ ते ५६ अखेर क्रमश: वाचून कायम करण्यांत येत आहे.

तसेच सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेच्या अनुषंगाने उपस्थित केलेल्या मुद्दया संदर्भात संबंधित विभाग प्रमुखांनी उचित कार्यवाही करावी.

सही-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांक:- ५१ अग्नीशमन वाहन वॉटर बाऊझर खरेदी करणेसाठी प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. यांचेकडेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरीसाठी सादर करणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७१ दिनांक २४/११/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका अग्नीशमन विभागाकडे सद्यस्थितीत एकुण ०३अग्नीशमन वाहने असून धुळे शहराचा वाढता विस्तार व लोकसंख्या पहाता अथवा लक्षांत घेता अग्नीशमन विभागासाठी ०१ नवीन अग्नीशमन वाहन वॉटर बाऊझ ार घेणे आवश्यक आहे.

सदर अग्नीशमन वाहन वॉटर बाऊझर बांधणी कामी DHS&D दर करार नुसार (D.G.S.&D.CHMLVEHICL/AM२/RC-२F०१००००/०३१५ /७२/ ०५७६७ /६७३/२) टाटा मोटर्स लि. मॉडल एल.नह.टी. १६१३/४२ ४४२५ एम.एम. व्हील बेस ट्रक चेसीस विथ काऊल ६९७ इंजिन बी.एस. III (हेव्ही चेसीस) खरेदी करावयाची आहे. तसेच उक्त चेसीस वर अग्नीशमन वाहन वॉटर बाऊझर बांधणी ई - निविदा प्रक्रियाव्दारे निविदा प्रसिध्द करुन करावयाची आहे. एक वाहन चेसीस खरेदी करणे व अग्नीशमन वाहन वॉटर बाऊझर बांधणी करिता रु.५०,७७,५०८/- खर्च येणार आहे.

| अ.क्र. | तपशील | प्रति नग किंमत | नग | एकुण किमंत |
|---|---|---|---|---|
| १ | टाटा १६१३/४२ चेसीसय खरेदी | १२,१६,८६० | १ | १२,१६,८६० |
| २ | अग्नीशमन वाहन वॉटर बाऊझर बांधणी | ३८,६०,६४८ | १ | ३८,६०,६४८ |
| एकुण | | | | ५०,७७,५०८ |

उक्त वाहनाचे स्पेसिफिकेशन कार्यालयीन टिपणी मध्ये नमूद केलेले आहे.

तरी अग्नीशमन सेवांचे बळकटीकरण करणे सन २०१५-१६ योजने अंतर्गत नवीन अग्नीशमन वाहन वॉटर बाऊझर खरेदी करणेस आर्थिक व प्रशासकीय मंजुरी करिता प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी सो. यांचेकडेस सादर करणेस मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,<br>
सही/-x x x<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ५२ प्रभाग क्रं.१५ मध्ये नागरी दलित वस्ती सुधार योजनेअंतर्गत मोगलाई भागात भूमीगत गटार योजनेची अंमलबजावणीसाठी प्रस्ताव म.जि.प्रा.विभागाकडेस सादर करणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७२ दिनांक २४/११/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहरातील प्रभाग क्रं.१५मोगलाई भागात भूमीगत गटार योजना करणेबाबत उपरोक्त संदर्भानुसार श्री.विश्वनाथ खरात यांनी पत्राव्दारें मागणी केलेली आहे.

धुळे शहरातील अस्तित्वातील भुयारी गटार योजना ही महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग धुळे यांच्यामार्फत राबविण्यात आली आहे. उक्त योजनेअंतर्गत धुळे शहराचे एकुण ७ झोन करण्यांत आली आहे. पैकी मोगलाई भागात योजना करण्यांत आली होती. सदरचे काम सन १९७५-७६मध्ये झालेले आहे.तसेच मोतीनाल्याकिनारी पंपीग स्टेशनही बांधण्यांत आलेले आहे. सदरची अस्तित्वातील भुयारी गटार योजना ही त्या प्रमाणातील लोकसंख्येचे प्रमाणात झाली होती.सद्यस्थितीत लोकसंख्येत वाढ झाल्याने योजना अपूर्ण पडत आहे.

धुळे शहरात UIDSSMT अंतर्गत भुयारी गटार योजना राबविणेबाबत प्रस्ताव तयार करणेसाठी कन्सल्टंट श्री.अविनाश पाटील यांना देण्यांत आले होते. त्यानुसार त्यांनी सन २०१३-१४ च्या दरसुचीप्रमाणे रु.२०१ कोटी मात्रचा प्रस्ताव तयार केला होता. उक्त प्रस्तावास मा. मुख्य अभियंता, मजिप्रा. पुणे यांनी तांत्रिक मंजुरी प्रदान केली असून प्रस्ताव सद्यस्थितीत आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद संचालनालय मुंबई येथे प्रलंबीत आहे.

श्री.खरात यांनी मोगलाई भागात भुयारी गटार योजना नागरी दलित वस्ती सुधार योजने अंतर्गत राबविणेबाबत मागणी केली आहे.त्यात १००% निधी प्राप्त होत असतो. सदर ठिकाणी योजना राबविणेसाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागमार्फत योजनेचे अंदाजपत्रक तयार करावे लागेल.त्यासाठी लागणारी आवश्यक ती फी मजिप्रा विभागाकडे भरावी लागेल तो खर्च नागरी दलित वस्ती अंतर्गत कामाच्या अंदाजपत्रकात गृहीत धरण्यांत येईल.

सदरचे प्रस्तावित काम सन २०१५-१६ या आर्थिक वर्षात घेण्यांचे प्रस्तावित आहे सन २०१४-१५ या वर्षात तसा ठरावात सदरचे काम नमूद केले आहे.

यापूर्वी सदरचे योजनेत त्या प्रभागातील मोहन मेडिकल ते महाले नगर पर्यंतचा रस्ता, महालेनगर भागात १० सीट शौचालय बांधणे व गटार बांधणे इ. कामे प्रस्तावित आहेत.

शासन निकर्षानुसार सदरचे काम घेता येवू शकते.तसेच सहा.आरोग्य अधिकारी यांचे पत्र क्रं.१८५दि.७/७/१५ नुसार टी.व्ही.सेंटर पासून ते पंपींग स्टेशन पर्यत नवीन ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी मागणी केली आहे.

उक्त बाबतचा प्रस्ताव तांत्रिकदृष्टया एम.जी.पी.मार्फत सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मंजुरी घेऊन करणे योग्य राहील.

उक्त प्रमाणे आलेल्या अहवालाचा विचार करुन सदर कामासाठीएम.जी.पी. मार्फत सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करुन तांत्रिक मंजुरी घेणेस व उक्त बाबत लागणा-या संभाव्य खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- ५३ सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे वार्षिक लेख्यास मे.स्थायी समितीपुढे मंजुरीस्तव सादर.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७३ दिनांक २४/११/२०१५**

कार्यालयीन निवेदनोप्रमाणे सन २०१४-१५ या वित्तीय वर्षाचे लेखे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९४ अ नुसार व लेखा संहिता १९७१ नियम ६० व नमुना क्रं.२८ नुसार तयार केलेले असून सदर लेख्यांचा सारांशाला मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः-५४ सन२०१२-१३ अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रक्कमा प्रधान लेखा शिर्षातून दुस-या प्रधान लेखा शिर्षात वर्ग करणेस मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७४ दिनांक २४/११/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सन २०१२-१३ चे वार्षिक लेखे तयार करुन मे. स्थायी समितीकडून ठराव क्रं.७० दिनांक १०/१०/२०१३ अन्वये मंजुरी देण्यांत आलेली होती.सदर वार्षिक लेखे सोबत जोडलेला तक्ता नमुना क्रं.१० मध्ये दर्शविल्यानुसार विविध लेखाशिर्षात एकुण रक्कम रुपये १६,५६,७१,२९६/- चे तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९कलम १०३ अन्वये मंजूर झालेल्या अर्थसंल्कपात प्रधान लेखा शिर्षाखाली व एका उपशिर्षातून व दुस-या गौण शिर्षाखाली अथवा एका गौण शिर्षातून दुस-या गौण शिर्षकाखाली पुढील कमाल मर्यादेच्या अधिन पूर्ननियोजन बदल करावयाच्या रकमा बदल करता येतील. त्यानुसार प्रधान लेखाशिर्षात राहिलेल्या तक्त्यानुसार शिल्लक रक्कम रुपये २०,२३,३९,४६७/-मधून भागविण्यांत आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.सोबत महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ नियम ३० अन्वये नमुना क्रं.१० पुर्न नियोजनाचा तक्ता सोबत सादर केला आहे.त्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः-५५ सन२०१३-१४अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रक्कमा प्रधान लेखा शिर्षातून दुस-या प्रधान लेखा शिर्षात वर्ग करणेस मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७५ दिनांक २४/११/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सन २०१३-१४ चे वार्षिक लेखे तयार करुन मे. स्थायी समितीकडून ठराव क्रं. ५० दिनांक १२/८/२०१४ अन्वयें मंजुरी देण्यांत आलेली होती. सदर वार्षिक लेखे सोबत जोडलेला तक्ता नमुना क्रं.१० मध्ये दर्शविल्यानुसार विविध लेखाशिर्षात एकुण रक्कम रुपये २१,०४,९०,३६७/- चे तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये मंजूर झालेला अर्थसंकल्पात प्रधान लेखाशिर्षाखाली व एका उपशिर्षातून व दुस-या गौण शिर्षाखाली अथवा एका गौण शिर्षातून दुस-या गौणशिर्षकाखाली पुढील कमाल मर्यादेच्या अधिन पूर्ननियोजन बदल करावयाच्या रकमा बदल करता येतील.त्यानुसार प्रधान लेखाशिर्षात राहिलेल्या तक्त्या नुसार शिल्लक रक्कम रुपये ८०,०८,३५,६२५/- भागविण्यांत आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.सोबत महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ नियम ३० अन्वये नमुना क्रं.१० पुर्न नियोजनाचा तक्ता सोबत सादर केला आहे.त्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः-५६ सन २०१४-१५अंदाजपत्रकातील खर्चाबाबत रकमा प्रधान लेखाशिर्षातून दुस-या प्रधान लेखा शिर्षात वर्ग करणेस मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७६ दिनांक २४/११/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सन २०१४-१५ चे वार्षिक लेखे तयार करुन मे. स्थायी समिती पुढे मंजुरी कार्यालयीन अहवालानुसार मंजुरीसाठी सादर करणेत आलेले आहे. सदर वार्षिक लेखे सोबत जोडलेला तक्ता नमुना क्रं.१० मध्ये दर्शविल्यानुसार विविध लेखाशिर्षात एकुण रक्कम रुपये ७,५०,९०,५६०/- चे तरतुदीपेक्षा जास्तीचा खर्च झालेला आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १०३ अन्वये मंजूर झालेला अर्थसंकल्पात प्रधान लेखाशिर्षाखाली व एका उपशिर्षातून व दुस-या गौण शिर्षाखाली अथवा एका गौण शिर्षातून दुस-या गौणशिर्षकाखाली पुढील कमाल मर्यादेच्या अधिन पूर्ननियोजन बदल करावयाच्या रकमा बदल करता येतील.त्यानुसार प्रधान लेखाशिर्षात राहिलेल्या तक्त्या नुसार शिल्लक रक्कम रुपये २३,७०,५८,४४४/- भागविण्यांत आलेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देण्यांत येत आहे.सोबत महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ नियम ३० अन्वये नमुना क्रं.१० पुर्न नियोजनाचा तक्ता सोबत सादर केला आहे.त्यास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

धुळे महानगरपालिका सभागृह,धुळे
गुरुवार दिनांक ३१ डिसेंबर, २०१५
वेळ :- सकाळी ११-०० वाजता

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज गुरुवार दिनांक ३१/१२/२०१५रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री. चंद्रकांत बापु सोनार, सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा, धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली. स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. सोनार चंद्रकांत बापू | सभापती |
| २ | श्री. केले चंद्रकांत काशिनाथ ( केले काका) | सदस्य |
| ३ | श्री. मासुळे अमोल पावबा | सदस्य |
| ४ | श्री.शेख अरशद अहमद फरीद अहमद | सदस्य |
| ५ | श्री. पटेल मोहम्मद अमीन अब्दुल करीम | सदस्य |
| ६ | श्रीमती आजळकर माधुरी नंदलाल | सदस्या |
| ७ | श्री. परदेशी नरेंद्र गोटू | सदस्य |
| ८ | श्री. डियालानी कुमार नरोत्तम | सदस्य |
| ९ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चाधरी | सदस्या |
| १० | श्री.खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ११ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| १२ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| १३ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| १४ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| १५ | श्री.पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |

**उपस्थित अधिकारी गण**

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एच. पी. कवठळकर | उपायुक्त |
| २. | डॉ. प्रदीप पठारे | उपायुक्त |
| ३. | श्री.एम.आर.सराई | मुख्य लेखा परीक्षक |
| ४. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहाय्यक आयुक्त |
| ५. | श्री. एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ६. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ७. | श्री. के. एन. शिंदे | अभियंता |
| ८. | डॉ.श्री. बी.बी. माळी | आरोग्याधिकारी |
| ९. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| ११. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी. अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १२. | श्री. गणेश खोडे | सहा. प्रकल्प अधिकारी |
| १३. | श्री. एन.के.बागुल | विद्युत अभियंता |
| १४. | श्री. राजू माईनकर | भांडार लिपीक |
| १५. | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १६ | श्री. बी.डी. जगदाळे | ओव्हरसिअर |
| १७ | श्री. पी.डी. चव्हाण | ओव्हरसिअर |
| १८ | श्री. बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| १९ | श्रीमती मिना सातभाई | महिला बालकल्याण विभाग |
| २० | श्री. तुषार ढाके | सहा. अग्निशन अधिकारी |
| २१ | श्री. दिलीप कलाल | बाजार विभाग प्रमुख |
| २२ | श्री. संजय गुजर | औषध निर्माता |

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

म.सभापती सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक ती गणपूर्ती झालेली आहे. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

**सन्मा. सदस्यांकडून आलेली श्रध्दांजलीची यादी.**

यादी देण्यांत येते की, मा. स्थायी समिती सभापती श्री. विलासभाऊ खोपडे यांची आई गं.भा. राधाबाई रतन खोपडे यांचे दिनांक २९/१२/२०१५ रोजी दुःखद निधन झाले त्यांना श्रध्दांजली वाहून ठराव करण्यांत यावा.

सुचक :- सौ. माधुरी नंदलाल अजळकर
श्री. अमोल पावबा मासुळे
अनुमोदक :- सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी
श्री. संदीप सुरेश पाटोळे

म. सभापती सर्व सन्मा. सदस्यांनी श्रध्दांजली अर्पण करणेसाठी २ मिनिटे मौन उभे रहावे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७७ दिनांक ३१/१२/२०१५**

सन्मा.सदस्यांच्या यादीनुसार माजी स्थायी समिती सभापती श्री. विलासभाऊ रतन खोपडे यांच्या मातोश्री गं.भा. राधाबाई रतन खोपडे यांचे दिनांक २९/१२/२०१५ रोजी दुःखद निधन झाले आहे. त्यांचे दुःखद निधनामुळे या सभेस आतीव दुःख होत आहे ही सभा त्यांचे कुटुंबियांचे दुःखात सहभागी असून मृतआत्म्यास चिरशांती प्रदानार्थ २ मिनिटे मौन उभे राहून भावपूर्ण श्रध्दांजली समर्पित करण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ५७ मागील स्थायी समिती सभाचे इतिवृत्त वाचून कायम करणे (दि.१९/९/२०१५,२४/९/२०१५)

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७८ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक १९/९/२०१५चे स्थायी समिती ठराव नंबर ५७ ते ६४ अखेर तसेच सभेत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेनुसार घेण्यांल आलेलें निर्णय वाचून कायम करण्यांत येत आहे. तसेच दिनांक २४/९/२०१५ चे स्थायी समिती ठराव नंबर ६५ ते ६७अखेर तसेच सभेत सन्मा. सदस्यांनी उपस्थित केलेल्या चर्चेनुसार घेण्यांल आलेलें निर्णय वाचून कायम करण्यांत येत आहे. **सही/-x x x**

**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-५८ मालेगांवरोड जी.एस.आर. टाकी येथील पंपींग स्टेशनच्या इमारतीचे रुम नं. १ दुरुस्तीचे काम तांतडीने विना निविदा मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ७ संविदा ७३ खंड (क) नुसार ठेकेदार मे.श्रीनिवास कन्स्ट्रक्शन धुळे प्रो.संजय गायकवाड यांचेकडून करुन घेण्यांत आले. सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७९ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपाच्या मालकीचे मालेगांवरोड जी.एस.आर. टाकी वरील रुम नं.१ हा जास्त प्रमाणात खराब झालेला आहे.त्यास प्लास्टर,दरवाजे,खिडक्या,बाथरुम मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेले होते.सदर इमारतीचे बांधकाम साधारणतः२० वर्षापूर्वीचे होते त्या दरम्यान दुरुस्तीसाठी आज पावेतो खर्च करण्यांत आलेला नव्हता.ते दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजपत्रकीय रु.४८,८०५/- मात्र खर्च येणार आहे.

मा.आयुक्त सो.यांनी तोंडी सूचित केल्यानुसार सदर रुम मध्ये श्री.सरई मु.ले.पा.यांना राहण्यासाठी घराची आवश्यकता असल्याने सदरचे काम तात्काळ ठेकेदार मे.श्री. निवास कन्स्ट्रक्शन धुळे प्रो.संजय गायकवाड यांचेकडून विना निविदा करुन घेण्यांत आले आहे. सदर दुरुस्तीसाठी रु.४८,८०५/-चे अंदाजपत्रक तयार करुन त्या मध्ये नमूद दर हे बाजार भावाप्रमाणे व डी.एस.आर.२०१४-१५ या प्रमाणे योग्य आहेत. तरी सदर झालेल्या खर्चास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९नुसार संविदा प्रकरण ७ संविदा ३ खंड (क) नुसार कार्योत्तर मान्यता कार्यालयीन अहवालास अधिन राहुन देण्यात येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती, स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ५९ मालेगांवरोड जी.एस.आर. टाकी येथील पंपींग स्टेशनच्या इमारतीचे रुम नं.२ दुरुस्तीचे काम तांतडीने विना निविदा मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ७ संविदा ७३ खंड (क) नुसार ठेकेदार मे.श्रीनिवास कन्स्ट्रक्शन धुळे प्रो.संजय गायकवाड यांचेकडून करुन घेण्यांत आले .सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे

म.नगरसचिव नगरसचिव यांनी विषयांचे वाचन केले.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८० दिनांक ३१/१२/२०१५**

धुळे मनपाच्या मालकीचे मालेगांवरोड जी.एस.आर. टाकी वरील रुम नं.२ हा जास्त प्रमाणात खराब झालेला आहे.त्यास प्लास्टर,दरवाजे,खिडक्या,बाथरुम मोठया प्रमाणात नादुरुस्त झालेले होते.सदर इमारतीचे बांधकाम साधारणतः२० वर्षापूर्वीचे होते त्या दरम्यान दुरुस्तीसाठी आज पावेतो खर्च करण्यांत आलेला नव्हता. ते दुरुस्त करणे आवश्यक आहे. त्यासाठी अंदाजपत्रकीय रु.४८,८७१/- मात्र खर्च येणार आहे.

मा.आयुक्त सो.यांनी तोंडी सूचित केल्यानुसार सदर रुम मध्ये श्री.सरई मु.ले.पा.यांना राहण्यासाठी घराची आवश्यकता असल्याने सदरचे काम तात्काळ ठेकेदार मे.श्री. निवास कन्स्ट्रक्शन धुळे प्रो.संजय गायकवाड यांचेकडून विना निविदा करुन घेण्यांत आले आहे. सदर दुरुस्तीसाठी रु.४८,८७१/-चे अंदाजपत्रक तयार करुन त्या मध्ये नमूद दर हे बाजार भावाप्रमाणे व डी.एस.आर.२०१४-१५ या प्रमाणे योग्य आहेत. तरी सदर झालेल्या खर्चास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९नुसार संविदा प्रकरण ७ संविदा ३ खंड (क) नुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६० मालेगांवरोड जी.एस.आर. टाकी येथील पंपींग स्टेशनच्या इमारतीचे रुम नं.२ दुरुस्तीचे काम तांतडीने विना निविदा मनपा अधिनियम १९४९ प्रकरण ७ संविदा ७३ खंड (क) नुसार ठेकेदार मे.श्रीनिवास कन्स्ट्रक्शन धुळे प्रो.संजय गायकवाड यांचेकडून करुन घेण्यांत आले .सदर प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८१ दिनांक ३१/१२/२०१५**

धुळे मनपाच्या मालकीचे मालेगांवरोड जी.एस.आर. टाकी वरील रुम नं. ३ हा जास्त प्रमाणात खराब झालेला आहे.त्यास प्लास्टर,दरवाजे,खिडक्या, बाथरुम मोठया प्रमाणात नादुरुस्त झ ालेले होते.सदर इमारतीचे बांधकाम साधारणतः२० वर्षापूर्वीचे होते त्या दरम्यान दुरुस्तीसाठी आज पावेतो खर्च करण्यांत आलेला नव्हता.ते दुरुस्त करणे आवश्यक आहे.त्यासाठी अंदाजपत्रकीय रु.४९,७३२/- मात्र खर्च येणार आहे.

मा.आयुक्तसो.यांनी तोंडी सूचित केल्यानुसार सदर रुम मध्ये श्री.सरई मु.ले.पा. यांना राहण्यासाठी घराची आवश्यकता असल्याने सदरचे काम तात्काळ ठेकेदार मे. श्री. निवास कन्स्ट्रक्शन धुळे प्रो. संजय गायकवाड यांचेकडून विना निविदा करुन घेण्यांत आले आहे.सदर दुरुस्तीसाठी रु.४९,७३२/-चे अंदाजपत्रक तयार करुन त्या मध्ये नमूद दर हे बाजार भावाप्रमाणे व डी.एस.आर. २०१४-१५ या प्रमाणे योग्य आहेत.

तरी सदर झालेल्या खर्चास मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९नुसार संविदा प्रकरण ७ संविदा ३ खंड (क) नुसार कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६१ म.अमिन पटेल सदस्य स्थायी समिती यांच्या पत्रानुसार वडजाईरोड भागात धामिक इस्तेमासाठी बसविणंत आलेल्या पथदिव्यासाठी झालेला खर्च रु.४९,७८२/-मात्रला मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८२ दिनांक ३१/१२/२०१५**

वडजाईरोड चौफुली लगत एप्रिलच्या पहिल्या आठवडयात धार्मिक इस्तिमा कार्यक्रम असल्याने वडजाई रस्त्यावरील पोलवर पथदिवे बसविणे बाबत सन्मा. सदस्य अमिन पटेल यांनी स्थायी समिती सभेत मागणी केलीआहे.दिनांक १९/३/२०१५च्यास्थायी समिती सभेत म.सभापती सो.यांनी सदर काम तात्काळ करणेबाबत मौखीक आदेश केले आहेत. वडजाई रस्त्यावर स्लॉटर हाऊस ते गिता हॉटेल पर्यतच्या पोलवर टयूब फिक्चरर्स पथदिवे बसविणेसाठी शासन दरसूचीनुसार रु.४९,७८२/- मात्र अंदाजपत्रकीय खर्च अपेक्षित आहे.

सन२०१४-१५च्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून उपलब्ध तरतूद नुसार सदर काम प्रस्तावित आहे. यावर मुख्य लेखापरीक्षक यांनी सन २०१५-१६ च्या तरतुदी प्रमाणे सादर करावे असे अभिप्राय नोंदविले आहे.

वडजाईरोड चौफुली येथे मुस्लीम बांधवांचा इस्तेमा धार्मिक संमेलन असल्याने वडजाई रोड येथील रस्त्यावर पथदिवे सुविधा नसल्याने त्वरीत कार्यवाही करणेबाबत अमिन पटेल नगरसेवक यांनी दि. १९/३/२०१५ च्या स्थायी समिती सभेत लक्षवेधी तक्रार केली होती. सदरचा इस्तेमा हा लगेचच दोन दिवसांचे कालावधीत होता. मा.सभापती सो.स्थायी समिती यांनी याविषयी चर्चा करुन आवश्यक कार्यवाही करणेबाबत आदेशित केले होते.वडजाई रस्त्यावर स्लॉटर हाऊस पासून चौफुली दरम्यानच्या नवीन पोलवर (सा.बां.विभागाकडून विज वाहिनी व पोल स्थलांतरीत करुन नवीन पोल टाकण्यांत आले)स्थलांरीत पोलवर प्रत्यक्षात पथदिवे नसल्याने म. स्थायी समितीतील निर्देशाप्रमाणे तात्काळ कार्यवाही करणे आवश्यक असल्याने सदरचे काम करुन घेण्यांत आले तथापि उक्त प्रमाणे याबाबतची संभाव्य खर्च रु. ४९,७८२/- मात्रच्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यतेसाठी टिपणी सादर करण्यांत आलेली होती. तथापि अर्थसंकल्प तरतूद उपलब्ध नसल्याने सदरची मान्यता ही वेळेत झालेली नाही. परंतु उक्त नमूद केल्याप्रमाणे सदरचे मा.सभापती सो. स्थायी समितीयांचे निर्देशानुसार व सन्मा.नगरसेवक अमिन पटेल यांचे मागणीप्रमाणे कंत्राटदार मे. पंडीत इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अंदाजपत्रकाप्रमाणे करुन घेण्यांत आलेले आहे. करिता सदरच्या प्रस्तावाप्रमाणे खर्चास व झालेल्या कामास कार्योत्तर मंजुरी होणेची आवश्यकता आहे. असा कार्यालयीन अहवाल सादर झालेला आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन माहे मार्च महिन्यामध्ये झालेल्या मुस्लीम बांधवाच्या इस्तेमा संमेलनाकरिता तांतडीचे व वेळीच पूर्ण केले असल्याने प्रस्तावाप्रमाणे सदरचे कामास व खर्च रुपये४९,७८२/- करिता व प्रस्तावित काम विना निविदा करुन घेण्यांत आल्याने सदरच्या प्रस्तावास कार्योत्तर मंजुरी होणेसाठी मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड क प्रकरण ५संविदा २(२) नुसार कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६२ आरोग्य विभागाकडील जे.सी.बी. ४D **x** MH १८ G १००७ चे दुरुस्तीचे कामे मे.सेंट्रल इंजिनिअरींग धुळे यांचेकडून तांतडीने कोटेशन दर मागवून करुन घेण्यांत आली तदर्थ झालेला खर्च रुपये २९६००/-मात्रला कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८३दिनांक ३१/१२/२०१५**

मनपा आरोग्य विभागाकडील जे.सी.बी.४ D x MH १८G १००७ ची सद्यस्थितीत कंपनीचे अधिकृत डिलर सुयान इन्फोन्टक्चर यांचेकडेस दुरुस्ती काम करणे चालू आहे. मशिन मध्ये मंजूर झालेल्या कामा व्यतिरिक्त स्टबलायझर मध्ये दोन्ही साईडचे बॉस निकामी झाले असून मेन बॉस प्लेटला पीनगाळे पडले असून आऊट काढणे जरुरीचे आहे. वाढीव दुरुस्ती कामे करुन मिळणेबाबत ड्रायव्हर मॅकनिक यांनी दिलेल्या रिपोर्टनुसार मा.आयुक्त सो.यांचे मंजूरीने कोंटेशन दर मागविणेत आले. आलेल्या कोटेशन दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला आहे.

| अ.नं. | दुरुस्ती तपशील | सेंट्रल इंजि. | मनोज इंजि. वर्क्स | रॉयल इंजि. वर्क्स |
|---|---|---|---|---|

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | स्टॅप लायझर ८ PCन्यू बॉस बनवून कीट वेल्डींग रिपेअरींग करणे | ९६०० | १०२०० | ११८०० |
| २ | मेन बॉस मोठा बनवून कीट वेल्डींग रिपेअरींग करणे | ३८०० | ४४०० | ४२०० |
| ३ | फूटलेअर ४ कान बॉस नवीन किट वेल्डींग रिपेअरींग करणे | ४८०० | ४८०० | ५२०० |
| ४ | चेसीस स्टपलायझर ८ PCन्यू क्रास बनवून किट वेल्डींग रिपेअरींग करणे | ९६०० | १०२०० | ५२०० |
| ५ | बॉडी प्लेट बोअर ( पिन) गाळा भरुन ग्रा रिपेअरींग ४ सा. प्लेट आऊट काढून थ्रु करुन किट वेल्डींग रिपेअर करणे | १८०० | २८०० | २२०० |
| | | २९६०० | ३२४०० | ३१४०० |

वरील आलेल्या कोटेशन दरामध्ये सेंट्रल इंजिअरींग धुळे यांचे दर कमी असून त्यानुसार रु. २९६००/- मात्र खर्च येईल. सदर खर्च सन २०१५-१६ चे आरोग्य वहान दुरुस्ती लेखाशिर्ष २५ लाखातून करात येईल. सदर दुरुस्ती काम हे करणे आवश्यक आहे. तसेच शासन निर्णय वित्त विभाग क्रं. विअप्र/१०-०८/प्र.क्र.७०/२००८ विनियम दि. १५ मे २००९ नुसार डिझेल वहानावर प्रतिवर्षी दुरुस्ती खर्च रुपये ५० हजार पर्यत मर्यादा आहे. सन २०१५-१६ या वर्षात आज अखेर ४७६००/- खर्च झाला आहे. त्यामुळे सदर वाढीव खर्च कोटेशन दरातील रु. २९,६००/-असून आलेले कोटेशन सेंट्रल इंजिनिअरींग यांचे दरांना व खर्चास कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६३ शहर क्षयरोग अधिकारी यांना क्षयरोग विभागाच्या कामकाजासाठी स्वतःच्या मालकीचे चारचाकी वाहन लावण्यास मंजुरी मिळणे बाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे .

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८४ दिनांक ३१/१२/२०१५**

कायार्लयीन अहवालानुसार सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम, धुळे महानगरपालिका धुळे अंतर्गत शहर क्षयरोग अधिकारी (CTO) यांना क्षयरोग विभागाच्या कामकाजासाठी शहरी भागात आरएनटीसीपी मार्गदर्शक सुचनांप्रमाणे स्थानिक भागात भेटी देणेसाठी चारचाकी वाहन आवश्यक आहे. परंतु शहर क्षयरोग अधिकारी यांना शासनाकडून किंवा महानगरपालिका तर्फे वाहन उपलब्ध नाही. सदर फिरस्तीसाठी आरएनटीसीपी मार्गदर्शक सुचनेप्रमाणे vehicle Hiring या लेखाशिर्षा अंतर्गत शहर क्षयरोग अधिकारी यांना महिन्यातून २५ दिवस स्थानिक भागात भेटीदेणेसाठी प्रतिदिन रु.११००/- याप्रमाणे भाडेतत्तावर वाहन लावणेस अनुज्ञेय आहे. सध्या कार्यरत असलेले क्षयरोग अधिकारी हे स्वतःचे वाहन वापरणार असून सदर वाहन मंजुरीसाठी खालील प्रमाणे ४ दर शासन नियमानुसार मंजुर आहेत.

| अ.क्र | मंजुरी | दर (प्रतिदिन) |
|---|---|---|
| १ | धुळे महानगरपालिका धुळे (निविदा दर मंजुरीनुसार) | रु.८००/- ड्रायव्हर + इंधन + देखभाल दुरुस्ती सह |
| २ | शहरी नागरी आरोग्य अभियान अंतर्गत मंजुर दर | रु.९००/- ड्रायव्हर + इंधन + देखभाल दुरुस्ती सह (रु.२७०००/- . प्रतिमाह) |
| ३ | आरएनटीसीपी अंतर्गत मंजुर दर | रु.११००/- ड्रायव्हर + इंधन + देखभाल दुरुस्ती सह (२५ दिवसांसाठी) |
| ४ | प्रादेशिक परिवहन अधिकारी धुळे (आरटीओ) यांचे मंजुर दर | रु.१२००/- ड्रायव्हर + इंधनव्यतिरिक्त |

तरी सदरील दर तक्त्यामध्ये सर्वात कमी दर धुळे मनपाचे रु.८००/- प्रतिदिन (ड्रायव्हर + इंधन + देखभाल दुरुस्ती सह) इतके असून आरएनटीसीपी मार्गदर्शक सुचनेप्रमाणे vehicle Hiring या

लेखाशिर्षा अंतर्गत शहर क्षयरोग अधिकारी यांना महिन्यातून २५ दिवस स्थानिक भागात भेटी देणेसाठी प्रतिदिन रु.११००/- याप्रमाणे भाडेतत्तावर वाहन लावणेस अनुज्ञेय आहे. सदरचे दर हे धुळे मनपाच्या मंजुर दरांपेक्षा जास्त आहे. सबब क्षयरोग विभागाच्या कामकाजासाठी शहरी भागात भेटी देण्यासाठी शहर क्षयरोग अधिकारी यांच्या स्वतःच्या मालकीचे वाहन लावण्याबाबतचे मनपा निविदानुसार धुळे मनपाचे रु.८००/- प्रतिदिन (ड्रायव्हर + इंधन + देखभालदुरुस्ती सह) प्रमाणे २५ दिवस लावणेस मान्यतेसाठी विषय मे.स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यासाठी सादर करण्यात आलेला आहे. तसेच आरएनटीसीपी मार्गदर्शकसुचनेप्रमाणे सदर वाहनासाठी येणारा खर्च आरएनटीसीपीच्या Vehicle Hiring या लेखाशिर्षकात शासन अनुदान मंजुर असल्याने त्यातुन अदा करणेत येणार आहे.कार्यालयीन अहवालानुसार उक्त प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६४

धुळे मनपा हद्दीतील खाजगी वैद्यकीय रुग्णालय,उदा.रुग्णालय क्लिनीक,पॅथॉलॉजिकल, लॅब्रोरेटरीज, जनरल प्रॅक्टीश्नर,आयुर्वेदीक दवाखाने,होमिओपॅथी दवाखाने इत्यादीची नोंदणी करणे बाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८५ दिनांक ३१/१२/२०१५**

मुं.न.हो.ॲक्ट १९४९व सुधारीत २००६ नुसार नाशिक मनपा कार्यक्षेत्रातील खाजगी वैद्यकीय व्यवसाय करणारे डॉक्टरांचे दवाखान्यात नुतनीकरण संदर्भात धुमपा/ जा.क्रं. ०९/१५-१६ दि. २०/७/१५ रोजी पत्र देऊन मार्गदर्शन मागविले होते.

म.वैद्यकीय अधिक्षक नाशिक महानगरपालिका यांनी जा.क्रं. वैद्य/नाशिक/डेस्क-६/२३१४ /२०१५ दि.५/९/१५ च्या पत्रात नमूद नुसार मनपा नाशिक कार्यक्षेत्रात मुंबई सुश्रृषागृहे अधिनियम १९४९ व सुधारीत २००६अंतर्गत मनपा हद्दीतील उदा.रुग्णालय क्लिनीक, पॅथॉलॉजिकल, लॅब्रोरेटरीज, जनरल प्रॅक्टीश्नर,आयुर्वेदीक दवाखाने,होमिओपॅथी दवाखाने इत्यादीची नोंदणी करण्यांत येते.सद्यस्थितीत धुळे मनपा कार्यक्षेत्रात वैद्यकीय व्यवसाय करणारे डॉक्टर यांच्या दवाखान्यत रुग्ण दाखल करण्यांत येतात.अशाच दवाखान्यांची मुं.न.हो.ॲक्ट नुसार नोंद करण्यांत येते व त्यानुसार व्यावसायीकांना नुतनीकरण प्रमाणपत्र दिले जाते. सद्यस्थितीत धुळे मनपा हद्दीतील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यांत आलेले रुग्णांना सेवा दिली जाते.अशा हॉस्पीटलचे ० ते १० खाटा पर्यत फी रु.३००/-तीन वर्षासाठी आकारण्यात येत आहे.व १०च्या पुढील खाटांसाठी रु.७५०/- मात्र आकारण्यांत येत आहे.

नाशिक महानगरपालिका वैद्यकीय अधिक्षक यांच्या मार्गदर्शन पत्रात नमूद नुसार धुळे मनपा कार्यक्षेत्रातरुग्णालय क्लिनीक,पॅथॉलॉजिकल लॅबोरेटरीज,जनरल प्रॅक्टीश्नर,आयुवेदीक दवाखाने, होमिओपॅथी दवाखाने इत्यादींना फी लागू केल्यास मनपाच्या उत्पन्नात वाढ होऊ शकते. मुंबई नर्सिंग होम ॲक्ट १९४९ मधील तरतूद २(४)नुसार सर्व ठिकाणी जिथे कोणत्याही प्रकारचा आजार असलेल्या व्यक्तीला वैद्यकीय सेवा दिली जाते अशा सर्व ठिकाणांना रुग्णालय किंवा सुश्रुषागृह म्हटले पाहिजे असे नमूद केले आहे.

उक्त नुसार शहरातील सर्व बाहय रुग्ण दवाखाने क्लिनीक पॅथॉलॉजी लॅब,आयुर्वेदीक दवाखाने, होमिओपॅथी दवाखाने इ.सुध्दा सदर कायदयाअंतर्गत नोंदणी करणे गरजेचे आहे.अशा नोंदणी करीता सर्व वरील दवाखान्यधकडून मुं.न.हो.ॲक्ट मधील तरतुदीनुसार प्रतिवर्ष रु. ५००/- फी वसूल करण्यांत यावी व सर्व कागदपत्रांची पुर्तता मुं.न.हो.ॲक्ट मधील तरतुदीनुसार करणेस सदर विषय मे. स्थायी समितीकडे निर्णयास्तव सादर करण्यात आलेला आहे.

सदर दवाखान्यांमधील निर्माण होणा-या जैवीक घनकच-यांची विल्हेवाट योग्य पध्दतीने लवण्याकरिता उक्त दवाखान्याची नोंदणी आवश्यक आहे. जेणेकरुन त्याच्या कडून निर्मण होणारा इतर कचा-याचे विल्हेवाटी बाबत त्यांच्यावर मनपाचे नियंत्रण राहील.तसेच अशा दवाखान्यामध्ये किंवा प्रयोग शाळांमध्ये येणा-या रुग्णबाबत /Nofilhable आजारांबाबत मनपास वेळोवेळी

माहिती देणे बंधनकारक करण्यासाठी सुध्दा मनपा कडेस नोंदणी असणे आवश्यक आहे.यासोबतच मनपाचे आर्थिक उत्पन्न वाढीसाठी सदर सर्व प्रकारच्या आरोग्य सुविधा पुरविणा-या सर्व संस्थाची मनपाकडे नोंदणी करण्यांस व वरील प्रमाणे फी आकारणी करण्याकरिता मे.स्थायी समितीपुढे उक्त प्रस्ताव सादर करण्यात आला असता उपस्थित सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर विषय हा मे.महासभेच्या कक्षेतील असल्याने सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या शिफारशीसह मे.महासभेपुढे सादर करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६५ RNTCP धुळे मनपा अंतर्गत सुपरवायझर्स यांना इंधन भत्ता पगारा सोबत देणे बाबतआलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८६ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे सुधारीत राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत सुपरवायझर्स यांची नेमणुक झालेली असुन त्यांना क्षयरोग विभागाच्या पर्यवेक्षणासाठी शहरी भागात गृहभेटी, आरोग्य संस्था, प्रायव्हेट डॉक्टर्स यांना भेटी द्याव्या लागतात. त्या करीता दरमहा प्रत्येक पर्यवेक्षकांची सरासरी ८०० ते ८५० किलोमिटर फिरस्ती होते.असा त्यांचा अर्ज इकडील कार्यालयाकडे त्यांनी दिला आहे सदर सुपरवायझर्स यांना शासनाकडून वाहन प्राप्त आहे. तसेच STS या पदासाठी वार्षिक रु.४५०००/- प्रतिसुपरव्हायझर्स व इतर सुपरवायझर्स यांचे वाहनासाठी ३५०००/- रु. प्रतिसुपरव्हायझर्स खर्च करण्याचे RNTCP मार्गदर्शक सुचनांमध्ये vehicle maintainance या लेखाशिर्षकाखाली नमुद केले आहे. सदर सुपरव्हायझर्स दरमहा इंधन देयके सादर करतात व त्यात बऱ्याचवेळा देयकांसंदर्भात शंका निर्माण होतात. व ती देयके तपासून देयक देण्यास कार्यालयीन कामाचा बराच वेळ खर्च होतो. तसेच भविष्यात सदर देयकांमध्ये लेखापरिक्षणावेळी आक्षेप येण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच पेट्रोल पंपावर इंधन भरल्यानंतर बऱ्याच वेळा देयके प्राप्त होत नाही व विसर पडतो. किंवा तारखा ह्या व्यवस्थित टाकल्या जात नसल्याने ते तपासणी कामी अडचणी निर्माण होतात. इंधन दरात दरमहा भाव कमी जास्त होत असल्याने देयके काढत्यावेळी प्रशासकीय आक्षेप नोंदविले जातात. आरएनटीसीपी अंतर्गत काम करणारे टीबीएचव्ही या पदासाठी इंधनभत्ता हा रु.१५००/- पगारात लागू असून तो टीबीएचव्ही यांना पगारासोबतच देण्यात येतो. त्याच धर्तीवर सदर सुपरव्हायझर यांना त्यांचा मागील वार्षिक इंधनावर झालेल्या खर्चाचे सरासरी काढून व त्यात नैसर्गिक १०% वाढ करुन खालील तक्त्याप्रमाणे इंधन देयके पगारासोबत देणे योग्य होईल असा अहवाल आरोग्याधिकारी यांनी सादर केला आहे.

| अ.क्र | मागील वार्षिक इंधनावरील खर्च | मासिक सरासरी | प्रति सुपरव्हाझर मासिक खर्च | १०% नैसर्गिक वाढ करुन दरमहा इंधन भत्त्यासाठी द्यावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | रु.३२४०० (वार्षिक ३ सुपर व्हायझर) | २७०० रु. | ९०० रु. | ९९० रु. |

तरी वरील तक्त्याप्रमाणे प्रति सुपरव्हायझ रु.९९०/- मासिक इंधन भत्ता होतो. सदर मासिक इंधन भत्ता वेतनासोबत लागू करणे बाबत मान्यतेसाठी विषय मे.स्थायी समिती सभेपुढे ठेवण्यास मंजुरी आदेशास्तव सादर.सद्यस्थितीत चार सुपरव्हायझर कार्यरत आहेत. वरील खर्च हा आरएनटीसीपी vehicle maintainance या लेखाशिर्षकातून अदा करावयाचा आहे. त्यासाठी अनुदान मंजुर असल्याने त्यातुन अदा करणेत येईल.

याबाबत लेखापरीक्षक यांनी शहर क्षयरोग अधिकारी यांनी RNTCP अंतर्गत सुपर वायझ ार यांना इंधन भत्ता पगारासोबत देणेबाबत अहवाल सादर केला आहे. त्या अहवालात पर्यवेक्षक यांना सरासरी ते ८०० ते ८५० कि.मी. दरमहा फिरती असते असे नमूद आहे महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्रं. प्रवास -१०१० प्र.क्र. २ सेवा प्र. मंत्रालय मुंबई दिनांक ३ मार्च २०१० अन्वये परिपत्रकात नमूद नुसार वाहन भत्ता मुंबई नागरी सेवा नियम १९५९ मधील नियम ३८८

अन्वये मोटार सायकल स्कूटर बाबत वाहन भत्त्याचे दर ८०१ वर पाहुन अधिक यासाठी रु. ९६० असा नमूद आाहे व सदरचा खर्च हा सदर निधीतून होणार असल्याने वाहन भत्ता पगारासोबत देणेबाबत अभिप्राय सादर केलेला आहे.

उक्त कार्यालयीन अहवाल व आरोग्याधिकारी यांनी केलेल्या निवेदनानुसार सदर प्रस्तावास सर्व सन्मा. सदस्यांच्या सहमतीने मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ६६ धुळे मनपा मालकीच्या हद्दीतील (क्षेत्रात) रस्त्यावर उतारुंची किंवा मालाची ने-आण करण्यासाठी होणा-या वर्दळीमुळे वाहनावर कर बसविणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८७ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मा. आयुक्त सो. यांचेशी झालेल्या चर्चेनुसार धुळे मनपाची सद्यास्थितील असलेले मर्यादित आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत व धुळे शहराचा वाढलेला विस्तार मुलभुत व पायाभुत सुविधांसाठी होणारा खर्च तसेच वेतन, विदयुत देयके निगा व दुरूस्ती खर्च तसेच इतर दैनंदिन खर्च भागविण्याकरिता आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत वाढविणे गरजेचे आहे.

महाराष्ट्र प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १४२ मधील तरतुदीनुसार विनिर्दिष्ट केलेल्या वर्णनाचे वाहन यांच्या बाबतीत उतारूंची किंवा मालाची ने आण करण्यासाठी आणि थांबण्यासाठी त्यांचा उपयोग करण्यासाठी किंवा त्यामुळे होणारी वाहनांची वदर्ळ तसेच ती शहरात ठेवली असतील तेव्हा कर बसविण्यात येईल तसेच शहरातील हद्दीबाहेर ठेवलेली परंतु अशा हद्दीच्या आंत नियमितपण वापर करण्याते येत असलेले वाहन शहरात उपयोग करण्यासाठी ठेवलेले आहे असे मानले जाईल.

मा.आयुक्त सो. यांनी मनपाच्या आर्थिक उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने विभाग प्रमुखांच्या (HOD) बैठकीत केलेल्या चर्चेनुसार २ चाकी, ३ चाकी वाहने वगळुन इतर सर्व वाहनांवर खालील प्रमाणे कराचे दर सुचविले आहे.

| अ. क्र. | वाहनांचा प्रकार | कराचे दर / प्रति दिवस |
|---|---|---|
| १ | जीप, कार, व्हॅन तत्सम प्रकारचे चारचाकी वाहन इ. | २५/- |
| २ | मिनिबस, मिनीट्रक, टेम्पो तत्सम प्रकारचे इतर वाहन | ४०/- |
| ३ | ट्रक, बसेस, टॅक्ट्रर, टॅकर इ. | ५०/- |
| ४ | लक्झरीबस, कॉक्रिट मिक्सर, कंटेनर ट्रेलर, हेवी डंपर्स इ. | १००/- |
| ५ | हेवीअर्थ मुव्हींग मशिनरी, बोरींग मशिनरी इ. | १५० |
| ६ | इतर | |

उक्त तक्त्यात दर्शविलेल्या वाहनाची संख्या गेल्या १० वर्षतील उपप्रादेशिक परिवाहन आधिकारी धुळे यांच्या कार्यालयाकडुन MH-१८ या क्रमांकाच्या नोंदणी झालेल्या वाहन संख्येवरून व इतर क्रमांकाच्या परवानाधारक वाहनांच्या संख्येचा आढावा घेता येईल असा प्रस्ताव मे. स्थायी समिती समोर निर्णयार्थ सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर विषय प्रशासनामार्फत सादर झालेला आहे. त्याबाबत आपण निर्णय घ्यावयाचा आहे. मनपाच्या उत्पन्न वाढीच्या दृष्टीने सदर आवश्यक आहे. तथापि याबाबत परिपूर्ण टिपणी व माहिती नसल्याने याबाबत अन्य मनपाकडून माहिती घेऊन सविस्तर टिपणी सादर करण्यांत यावी. तसेच सदर विषय धोरणात्मक स्वरुपाचा असल्याने मे. महासभेपुढे सादर करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांक:-६७ मे.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश साो.धुळे यांनी कौटुंबिक न्यायालयासाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देणेबाबत पत्र सादर केले आहे. त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८८ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मे.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश साो, धुळे यांनी संदर्भीय पत्र देवून महानगरपालिकेस कळविले की, धुळे शहरात कौटूंबीक न्यायालय स्थापनेच्या दृष्टीने कौटूंबीक न्यायालयासाठी सुमारे २००० स्क्वे.फुट जागा भाडयाने उपलब्ध करण्या बाबत मे.ना.उच्च न्यायालय मुंबई यांचे मार्फत कळविण्यात आले आहे.

धुळे शहरातील फाशीपुलाजवळ महानगरपालिकेच्या ताब्यातील बांधीव गाळयांमधील कौटूंबीक न्यायालय स्थापनेच्या दृष्टीने सुमारे २००० स्क्वे.फुट जागा रु.१०/- प्रती स्क्वे.फुट या दराने ५ वर्षाच्या कालावधीसाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देणे बाबत आपणा मार्फत योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे पत्रात नमुद आहे.

धुळे महानगरपालिकेच्या उपलब्ध्द अभिलेखेवरुन खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात आलेला आहे.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील एकात्मीक शहर विकास योजना अंतर्गत आरक्षण क्र. १६१ येथील गाळयांचे बांधकाम पुर्ण झाल्याने बांधकाम विभागाकडून जा.क्र.३९ दि.०९/१०/२०१२ रोजी उक्त व्यापारी संकुलातील गाळे वितरित करण्याबाबतचे पत्र बाजार विभागाकडे प्राप्त झाल्याने उक्त पत्रानुसार दैनिक आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात उक्त गाळे जाहीर लिलावाने देणे बाबत जाहीरात प्रसिध्द करण्यात आली व त्यानुसार दि. ३०/१०/२०१२ रोजी सदर गाळयांचा जाहिर लिलाव ठेवण्यात आला असता सदर गाळयांच्या लिलावाच्या वेळी नागरिकांनी गाळे आरक्षणाबाबत अनेक मुद्दे उपस्थित केल्यामुळे सदरचा लिलाव तहकुब ठेवण्यात आला.गाळे आरक्षणाबाबत शासनाचे निर्देशाप्रमाणे गाळे आरक्षित करून तसेच सदर गाळयांचे नगरचनाकार यांचेकडून रेडिरेक्नरच्या दरानुसार भाडे व ना परतावा अनामत रक्कम ठरवुन घेऊन त्याप्रमाणे महासभेपुढे सदर विषय मंजुरीसाठी ठेवण्यात आला त्यास धुळे मनपा ठराव क्र. २०७ दि. २८/०८/२०१३ अन्वये गाळे आरक्षणाबाबत तसेच नगररचनाकार यांनी ठरवुन दिलेल्या भाडयास व ना परतावा रक्कम घेणेस व उक्त गाळे २० वर्ष मुद्दतीसाठी देणेस तसेच दै. वृत्तपत्रात जाहिर टेंडर नोटीस देऊन ना परतावा रक्कमेच्या बंद पाकीटाव्दारे निविदा दर मागविणेस सर्वानुमते मंजुरी देण्यात आलेली आहे.

धुळे मनपा ठराव क्र. २०७ दि. २८/०८/२०१३ च्या मंजुरी नुसार जा.क्र./ वसुली/२४३ दि. १७/०१/२०१४ अन्वये जाहिर टेंडर मागविणे बाबत दै.आपला महाराष्ट्र या वृत्तपत्रात जाहिरात देऊन त्यानुसार दि. १८/०१/२०१४ ते दि. ०७/०२/२०१४ पावेतो ना परतावा अनामत रक्कमेचे बंद पाकिटाव्दारे निविदा मागविण्यात आल्या सदरच्या टेंडर निविदा दि. ०३/०३/२०१४ रोजी मनपा सभागृहात सर्व निविदाधारक व मनपा अधिकारी, कर्मचारी यांचे समक्ष उघडण्यात आल्या व सरकारी दरापेक्षा सर्वाधिक जास्त ना परतावा अनामत रक्कम भरणा-या निविदाधारकास मा.आयुक्त साो.यांची तीन वार मंजुरी घेऊन गाळे वारंवार वितरित करण्यात आले आहेत.

लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व्यापारी संकुलातील मटन विक्रेत्यांसाठी आरक्षीत असलेले गाळे भाडेतत्वावर देण्यासाठी वारंवार निविदा काढण्यात आल्या मात्र त्यामध्ये कोणीही अद्यापपावेतो सहभाग नोंदविलेला नसल्याने महानगरपालिकेचे सन.२०१३ पासून मोठया प्रमाणत आर्थिक नुकसान होत आहे.

सदरच्या गाळयांमध्ये जवळच रहात असलेल्या परिसरातील रहिवासी रिकाम्या असलेल्या गाळयांमध्ये व जवळ असलेल्या परिसरात मोकळया जागेत व व्हरांडयात रात्री बेरात्री,दिवसा शौचालयास व प्रत्याविधीस बसतात तसेच तेथे अवैध धंदे करित असतात त्यांना मज्जाव केल्यास तेथिल नागरीक धावून येतात व ॲक्ट्रॉसिटी दाखल करु अश्या प्रकारच्या दमदाटया करित असतात. त्यामुळे नागरीक निविदा प्रक्रियेत भाग घेत नाही. त्यामुळे सदरचे गाळे पडुन आहेत.

मे.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश सो.,धुळे यांचे पत्रानुसार व त्यांनी पत्रासोबत जोडलेल्या फायनान्स व मा.उच्च न्यायालयाचे पत्रात नमुद दरानुसार म्हणजे प्रति स्क्वे. फुट रू. १०/- मात्र दरा प्रमाणे मागणी केली असल्याने दुकान नं. २ ते १० चे दुकानांचे क्षेत्रफळ ९११.४८ स्के. फुट जागा येते. उक्त पत्रातील रू. १०/- मात्र दरा प्रमाणे गाळयांचे दरमहा भाडे रू.९११५/- होते.

धुळे मनपा नगररचना विभागाने रेडिरेक्नरच्या दरानुसार प्रति चौरस मिटरला रू. २९१/- मात्र मटन मार्केटमधील दुकानांना दर ठरवुन दिलेले आहेत. त्यास मनपा ठराव नं. २०७ दि. २८/०८/२०१३ मंजुरी देण्यात आलेली आहे. त्यानुसार मटन मार्केटमधील दुकान नं. २ ते १० चे क्षेत्रफळ ८४.७१ चौ.मि. येत असुन ठरवुन दिलेल्या रेडिरेक्नरच्या दरानुसार त्याचे रू.२४६५१/- मात्र दरमहा दुकानाचे भाडे होते.रु.२४६५१ मधुन रु.९११५मात्र वजा केल्यास रु.१५५३६/- ने भाडे दरमहा कमी येईल.

जरी मे.न्यायालयाचे दर कमी असले तरी मे. न्यायालयास उक्त मटन मार्केटमधील दुकान नं. २ ते १० देणे सयुक्तीक वाटते कारण उक्त व्यापारी संकुलातील मटन मार्केटमधील गाळा क्र. २ ते १० दिल्यास उक्त व्यापारी संकुलातील शिल्लक असलेल्या गाळयांना मागणी वाढेल व न्यायालयांच्या कामकाजामुळे तेथील व्यापारी संकुलातील परिसर गजबजुन जाईल व मे. कौटुंविक न्यायालयामुळे व्यापारी संकुलातील गाळे/परिसर स्वच्छ राहिल व त्यामुळे कदाचीत उक्त व्यापारी संकुलातील शिल्लक असलेल्या गाळयांना मागणी वाढेल व कदाचीत तेथील गाळे जादा ना परतावा अनामत रक्कमेने जातील.तरी याबाबत दुकाने भाडयाने व विना डिपॉजीट रक्कमेने_द्यावी किंवा कसे याबाबत मनपाचे मुख्य लेखापरिक यांचा अभिप्राय मागविला असता ब नुसार त्यांनी मनपा मालकीचे आर्थिक नुकसान होत आहे व क नुसार उपरोक्त टिपणीचे अवलोकन होऊन मे.कौटुंबिक न्यायालयास अटी शर्तीस अधिन राहुन विना डिपॉझिटने जागा /गाळे/ मे. स्थायी समितीपुढे निर्णयास्तव ठेवण्यास मंजुरीस्तव सादर असा अभिप्राय दिलेला असून मा.आयुक्त सो. यांच्या दिनांक २१/१२/२०१५ च्या कार्यालयीन टिपणीच्या मंजुरीने मे.कौटुंबिक न्यायालयाने मागणी केलेल्या दरानुसार पाच वर्षासाठी कोटूंबीक न्यायालयास अटी व शर्तीस अधिन राहून व विना डिपॉझीटने जागा /गाळे देण्याबाबत चा प्रस्ताव स्थायी समिती पुढे सादर करण्यांत आलेला आहे.

सन्मा. सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार व कार्यालयीन अहवालास अधिन राहून मे.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश सो.धुळे यांना कौटुंबिक न्यायालयासाठी भाडेतत्वावर जागा उपलब्ध करुन देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६८ स्थानिक संस्था कर विभागाकडील सन २०१३-१४,२०१४-१५ व २०१५-१६ या वर्षातील वार्षिक विवरणपत्र तपासणीचे कामासाठी निविदा दर मागविण्यांत आली, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८९दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन अहवालानुसार धुळे मनपा स्था. सं. कर विभागाकडील विवरण तपासणी कामी स्था सं. कर जा.क्रं. ३४८ दि. २६/१०/२०१५ चे जाहिर निविदा सुचना अन्वये दिनांक १०/११/२०१५ अन्वये चार निविदा धारकांनी निविदा सादर केलेल्या होत्या. प्राप्त निविदा मधील कामाचे दर समाधानकारक नसल्यामुळे संबंधितांना वाटाघाटीसाठी बोलविण्यांत येवून नवीन दर घेणेबाबत म.आयुक्त सो. यांनी आदेशित केले होते. त्यानुसार दि. २६/११/२०१५ रोजी सायं. ४-०० वाजतां म.उपायुक्त सो. यांचे दालनात निगोसिएशन करण्यांत आले त्यावेळी फक्त एकमेव मे. के.के. चनानी ॲण्ड असोसिएशन चार्टस अकौ. चे पतिनिधी कृष्णा चनानी हे हजर झाले. त्यांनी सदर विवरण तपासणीसाठी निगोसिएशन ( वाटाघाटी) नुसार प्रती विवरण प्रती वर्ष रु.२००/-मात्र तपासणी फी व विवरण पत्र तपासणी मध्ये जास्तीची निघत असलेली देय रक्कम रु. १ लाख पर्यत शें.८% व रु. १ लाखापासून पुढील रकमेवर ६% प्रमाणे इतकी रक्कम नुसार

विवरण तपासणीचे काम आमचे तर्फे करुन देण्यास तयार आहोत असे सवतः समक्ष दि.३०/११/२०१५ व दि.ज ५/१२/२०१५ चे ईमेलव्दारे कळविलेले आहे.

तरी त्यानुसार धुळे मनपा स्था.सं. कर विभाग कडेस व्यापारी / संस्था/ कंपनी यांनी सन २०१३-१४,२०१४- १५,२०१५-१६ या कालावधीतील सादर केलेली विवरण पत्र तपासणीचे काम निगोसिएशन अंती कमीत कमी दरामध्ये करण्यास तयार असणारे मे.के.के. चनानी ॲण्ड असोसिएटस चार्टड अकौंटड, मुंबई यांची नेमणूक करणेस कार्यालयीन अहवालास अधिन राहुन मान्यता देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६९ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत मालेगांवरोड ते आग्रारोड, चाळीसगांवरोड रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९० दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत मालेगांवरोड ते आग्रारोड , चाळीसगांवरोड रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.५९,९१,८६५/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.अे.बी.वाघ,धुळे | १५% कमीने | |
| २ | श्री.अे.पी.तनेजा,धुळे | ११% कमी ने | |
| **३** | **मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** | **१७.५०% कमी ने** | **सर्वात कमी दर** |
| ४ | मे.गायत्री कन्सट्रक्शन,धुळे | १५.०१ % कमीने | |
| ५ | श्री.प्रकाश जे.पांडव,धुळे | ११.३७ % कमी ने | |
| ६ | मे.महेश इन्फ्रास्ट्रक्चर,नंदुरबार | ८.५२% कमीने | |
| ७ | मे.समीर इन्टरप्राईजेस,धुळे | ८.८८% कमी ने | |
| ८ | मे.सुंदर माधव कन्सट्रक्शन,धुळे | ११.९९% कमी ने | |

ठेकेदार श्री./**मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्रातदार श्री./**मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** यांची सर्वात कमी **१७.५०%** कमी दराने आलेले निविदा दर मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-७० महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नवनाथनगर ते कबीरगंज पोवतोच रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९१ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत नवनाथनगर ते कबीरगंज पोवतोच रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.९२,८४,१५१/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.अे.बी.वाघ,धुळे | ७.११ % कमी ने | |
| २ | श्री.अे.पी.तनेजा,धुळे | १४.९% कमी ने | |
| **३** | **मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** | **१६.५०% कमी ने** | **सर्वात कमी दराने** |
| ४ | मे.गायत्री कन्सट्रक्शन,धुळे | १५.०१% कमी ने | |
| ५ | श्री.प्रकाश जे.पांडव,धुळे | ११.३७% कमी ने | |
| ६ | मे.महेश इन्फ्रास्ट्रक्चर,नंदुरबार | ९.५२% कमी ने | |
| ७ | मे.समीर इन्टरप्राईजेस,धुळे | ९.२८% कमी ने | |
| ८ | मे.सुंदर माधव कन्सट्रक्शन,धुळे | १४.१४% कमी ने | |

ठेकेदार श्री./**मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्रातदार श्री./**मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** यांची सर्वात कमी **१६.५०** % कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यांत यावा. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-७१ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत सुशीनाला ते वाडीभोकररोड पोवतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण व दोन्ही बाजूस गटार करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९२ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत सुशीनाला ते वाडीभोकररोड पोवतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण व दोन्ही बाजूस गटार करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.५७,६८,३२९/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | श्री.अे.बी.वाघ,धुळे | १५ % कमी ने | |
| २ | श्री.अे.पी.तनेजा,धुळे | ७.८६% कमी ने | |
| **३** | **मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** | **१५.५०% कमी ने** | **सर्वात कमी दराने** |
| ४ | मे.गायत्री कन्सट्रक्शन,धुळे | १५.०१% कमी ने | |
| ५ | मे.समीर इन्टरप्राईजेस,धुळे | ८.२८% कमी ने | |
| ६ | मे.सुंदर माधव कन्सट्रक्शन,धुळे | ९.९९% कमी ने | |

ठेकेदार श्री./**मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्रातदार श्री./**मे.स्मित कन्सट्रक्शन्स,धुळे** यांची सर्वात कमी **१५.५०** % कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरीदेण्यांत येत आहे. .तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७२ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत तहसील कार्यालय ते संतोषी माता मंदीर पावेतोचा रस्ता डांबरीकरण व दोन्ही बाजूस गटार करणे कामाबाबतनिविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९३ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत तहसील कार्यलय ते संतोषी माता मंदीर पावेतोचा रस्ता डांबरीकरण व दोन्ही बाजूस गटार करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र/३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-, (रू.१,८७,९०,६४०/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | **भूमी कन्सट्रक्शन** | **१९.२७ % कमीने** | **सर्वात कमी दर** |
| २ | बोरसे ब्रदर्स | १०.१२ % कमीने | |
| ३ | शितल नवले | ४.९७ % कमीने | |
| ४ | सुंदर माधव कन्सट्रक्शन | ९ % कमीने | |

ठेकेदार **भूमी कन्सट्रक्शन** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कंत्रातदार श्री **भूमी कन्सट्रक्शन** यांची सर्वात कमी **१९.२७** % कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य

काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा सदर प्रस्ताव स्थायी समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७३ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत मालेगाव रोड ते चाळीसगांव रोड रस्ता पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९४ दिनांक ३१/१२/२०१५**

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत मालेगाव रोड ते चाळीसगांव रोड रस्ता पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.१,७३,६३,८८४/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | समीर एंन्टरप्रायजेस | १६ % कमी ने | |
| २ | बोरसे ब्रदर्स | ९.७१ % कमी ने | |
| **३** | **ए.बी. वाघ** | **१६.५१ % कमी ने** | सर्वात कमी दर |
| ४ | सुंदर माधव कन्सट्रक्शन | १२.१२ % कमी ने | |
| ५ | एस.बी.देशमुख | १४.९९ % कमी ने | |
| ६ | अभिनव गिते | १५.५१ % कमी ने | |
| ७ | ए.पी.तनेजा | १०.११ % कमी ने | |

ठेकेदार **ए.बी. वाघ** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कंत्रातदार श्री **ए.बी. वाघ** यांची सर्वात कमी **१६.५१** % कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७४ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत महत्मा गांधी पुतळा ते गणपती मंदीर ते संतोषी माता मंदीर पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९५दिनांक ३१/१२/२०१५**

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत महत्मा गांधी पुतळा ते गणपती मंदीर ते संतोषी माता मंदीर पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका

महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र/३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.१,१९,२०,८८४/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | पृथ्वी डेव्हलपर्स | ७.८९ % कमी ने | |
| २ | शितलकुमार नवले | ९.९७ % कमी ने | |
| ३ | बोरसे ब्रदर्स | १४.७१ % कमी ने | |
| **४** | **समीर एंन्टरप्रायजेस** | **१७.२८ % कमी ने** | **सर्वात कमी दर** |
| ५ | सुंदर माधव कन्सट्रक्शन | ९.१२ % कमी ने | |
| ६ | अभिनव गिते | १५.३३ % कमी ने | |
| ७ | | | |

ठेकेदार **समीर एंन्टरप्रायजेस** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कंत्रातदार **श्री. समीर एंन्टरप्रायजेस** यांची सर्वात कमी **१७.२८** % कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७५ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत विनोद नगर ते वाडीभोकर रोड पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९६ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत विनोद नगर ते वाडीभोकर रोड पावेतोचा रस्ता डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३०(च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र/३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-, (रू.१,३६,५७,४९४/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | पृथ्वी डेव्हलपर्स | १२.१२ % कमी ने | |
| २ | बोरसे ब्रदर्स | १४.७१ % कमी ने | |

| | | | |
|---|---|---|---|
| **३** | **स्मित कन्सट्रक्शन** | **२२ % कमी ने** | **सर्वात कमी दर** |
| ४ | सुंदर माधव कन्सट्रक्शन | १०. १२ % कमी ने | |
| ५ | अभिनव गिते | १६.३३ % कमी ने | |

ठेकेदार **स्मित कन्सट्रक्शन** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहून कंत्रातदार **श्री स्मित कन्सट्रक्शन** यांची सर्वात कमी **२२ %** कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यांत येत आहे तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्यास मान्यता देण्यांत येत आहे. नियमानुसार त्यांचेकडून योग्य तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७६ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत भरत नगर ते मोतीराम नगर पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९७ दिनांक ३१/१२/२०१५**

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत भरत नगर ते मोतीराम नगर पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.१,७६,३७,५५५/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबतधुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | पृथ्वी डेव्हलपर्स | ११.८९ % कमी ने | |
| २ | बोरसे ब्रदर्स | १३.७१ % कमी ने | |
| **३** | **सुप्रभा कन्सट्रक्शन** | **२२ % कमी ने** | **सर्वात कमी दर** |
| **४** | **भुमी कन्सट्रक्शन** | १९.२७ % कमी ने | |
| ५ | सुंदर माधव कन्सट्रक्शन | १०.१२ % कमी ने | |
| ६ | अभिनव गिते | १५.५१ % कमी ने | |

ठेकेदार **सुप्रभा कन्सट्रक्शन** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन **श्री सुप्रभा कन्सट्रक्शन** यांची सर्वात कमी **२२ %** कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७७ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत साक्री रोड स.न. ४० ते सुरत बायपास हायवे पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९८ दिनांक ३१/१२/२०१५**

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत साक्री रोड स.न. ४० ते सुरत बायपास हायवे पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.१,५५,३१,७४३/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | बोरसे ब्रदर्स | १४.७१ % कमी ने | |
| **२** | **समिर एंटरप्रायजेस** | **१७.२८ % कमी ने** | **सर्वात कमी दर** |
| **३** | अभिनव गिते | १५.३३ % कमी ने | |

ठेकेदार **समिर एंटरप्रायजेस** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कंत्राटदार **श्री समिर एंटरप्रायजेस** यांची सर्वात कमी **१७.२८ %** कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७८ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत साक्री रोड स.नं. ४९ पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे .

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९९ दिनांक ३१/१२/२०१५**

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत साक्री रोड स.नं. ४९ पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.१,५३,५१,८६०/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | अभिनव गिते | १५.३३ % कमी ने | |
| २ | सुंदर माधव कन्सट्रक्शन | १२.११ % कमी ने | |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | ए.पी. तनेजा | १३.१३ % कमी ने | |
| **४** | **समीर एंन्टरप्रायजेस** | **१६.२८% कमी ने** | **सर्वात कमी दर** |

ठेकेदार **समीर एंन्टरप्रायजेस** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कंत्राटदार **श्री समीर एंन्टरप्रायजेस** यांची सर्वात कमी **१६.२८ %** कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७९ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत दत्त मंदीर जुना आग्रा रोड ते स्वामी नारायण मंदीर पावेतोचा रस्ता रुंदीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत,त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०० दिनांक ३१/१२/२०१५**

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत दत्त मंदीर जुना आग्रा रोड ते स्वामी नारायन मंदीर पावेतोचा रस्ता रुं दीकरण व डांबरीकरण करणे कामाबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.१,८३,१०,३५३/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि. २१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| **१** | बोरसे ब्रदर्स | १२.१२ % कमी ने | |
| **२** | **एस.बी.देशमुख** | **१४.९९ % कमी ने** | **सर्वात कमी दर** |
| **३** | पृथ्वी डेव्हलपर्स | ९.८९ % कमी ने | |

ठेकेदार **एस.बी.देशमुख** यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कंत्रातदार **श्री.एस.बी.देशमुख** यांची सर्वात कमी **१४.९९ %** कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८० महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत साक्री रोड स.न. ४९ ते ८१ पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुस गटार करणे कामाबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०१ दिनांक ३१/१२/२०१५**

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत साक्री रोड स.न. ४९ ते ८१ पावेतोचा रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणे व दोन्ही बाजुस गटार करणे कामाबाबत धुळे

महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-,(रू.१,२५,७०,२४२/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/०९ दि.२०/६/२०१५ अन्वये दि.२१/६/२०१५ रोजीचे दै.पुण्यनगरी आणि गांवकरी या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.२७/७/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बोरसे ब्रदर्स | १२.१२ % कमी ने | |
| २ | सुंदर माधव कन्सट्रक्शन | १०.९२ % कमी ने | |
| **३** | **अभिनव गिते** | **१५.७१ % कमी ने** | **सर्वात कमी दर** |

ठेकेदार अभिनव गिते यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

कार्यालयीन अहवालास अधिन राहुन कंत्राटदार श्री अभिनव गिते यांची सर्वात कमी १५.७१ % कमी दराने आलेले निविदा दरास मंजुरी देण्यात येत आहे. तसेच अन्य काम न मिळालेल्या ठेकेदार यांची बयाना रक्कम परताव्याच्या मान्यता देण्यात येत आहे. नियमानुसार त्याच्या कडुन योग्य तो अटी व शर्तीचा करारनामा करुन घेण्यात यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८१ महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत शहरातील मान्यता प्राप्त १ ते १६ रस्त्यावर नवीन पोलसह पथदिवे सुविधा करणेबाबत निविदा दर मागविण्यांत आलेत त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०२ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान योजनेअंतर्गत मंजुरी मिळालेल्या १ ते १६ रस्त्यावर पोल बसवून पथदिवे बसविणे या अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ४,६१,२४,४३८/- मात्रच्या कामासाठी ई निविदा व्दारे क्रं.४१४ दिनांक २४/६/२०१५ अन्वये निविदादर मागविण्यांत आले. सदर निविदेत एकुण ४ निविदा धारकांनी सहभाग घेतला पैकी असाटी इलेक्ट्रीकल्स सर्व्हीसेस भंडारा यांनी बयाणा रक्कम भरलेली नसल्याचे निदर्शनास आले करिता त्यांची निविदा अपात्र करण्यांत आली. उर्वरीत ३ निविदाधारक यांचे निविदा दर उघण्यांत आलेत. पात्र निविदा दरांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.क्रं. | निविदाधारकांचे नांव | आलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | बी.जे. इलेक्ट्रीकल्स, नासिक | १२.५० %जास्त | |
| २ | बडगुजर ॲण्ड कंपनी, नासिक | ४.३५%जास्त | सर्वात कमी दराची निविदा |
| ३ | स्वामी सर्व्हीसेस, | १०.२५ %जास्त | |

वरील तुलनेत मे. बडगुजर ॲण्ड कंपनी, नासिक यांचे दर कमी असल्याने परंतु अंदाज पत्रकापेक्षा ४.३५% जास्त असल्याने त्यांना धुळे मनपा/वि./१०३ दि. २३/१२/२०१५नुसार दर वाटाघाटी करिता इमेल व्दारे कळविण्यांत आलेत. त्यांचे प्राप्त ईमेल पत्राव्दारे त्यांनी सदरचे दर कमी करुन ३% जास्त असे दिले आहे. व सदरच्या दराबाबत अंदाजपत्रकात म.रा.वि. कंपनीचे पोल स्थलांतरीत करण्यांचे काम अंतर्भूत असून सदरचे अंदाजपत्रक सा.बां. विभागाच्या दरसूचीप्रमाणे २५% कमीने असून तशी तफावत असल्याचे नमूद केले आहे. सदरील १ ते १६ रस्त्यांचे पोल उभारणी कामात लघुदाब वाहिनी उच्च दाब वाहिनी व पोल स्थलांतरीत करण्यांचे काम गरजेनुसार करावयाचे आहे. अंदाजपत्रकातील बाब क्रं. ३० मध्ये या कामासाठी रु. १.२०

कोटी मात्र रक्कम नमूद आहे. या कामाच्या प्रिबीड मिटींग दरम्यान कंत्राटदार बडगुजर ॲण्ड कंपनी व इतर कंत्राटदारांनी याबाबतचे दर व बील सा.बां. विभागाच्या दरसूचीप्रमाणे ग्राहय करणेबाबत मागणी केली होती. तथापि सदर मागणी अमान्य करण्यांत आली होती. व या मुद्दयानुसार तसे कळविण्यांत आले होते.

सार्व. बांधकाम विभाग विद्युत खाते यांचेकडील दरसूची व म.रा.वि. कंपनीच्या दरसूचीत काही बाब निहाय दरात तफावत आहे. परंतु सदरची तफावत २५% इतकी कमी नसून साधारणत:१० ते १५% कमी आहे. उक्त मुद्दयानुसार तुलनेत जे दर व बील कमी असेल त्या दराप्रमाणे बिलाची अंदायगी करण्यांत येणार आहे ही बाब प्रिबीड मिटींगमध्ये स्पष्ट करण्यांत आली.

तसेच सदर अंदाजपत्रकातील उर्वरीत अन्य बाबी सा.बां. विभ्ंागाच्या दरसूची प्रमाणेच आहेत. करीता कंत्राटदार यांना समक्ष चर्चेस बोलवून दर अजून कमी होणे अपेक्षित असल्याने निगोसिएशनसाठी धुळे मनपा/वि./१०४दि.२३/१२/२०१५नुसार पुन्हा पत्र देण्यांत आले होते. कंत्राटदार बडगुजर ॲण्ड कंपनी यांनी दिनांक २८/१२/२०१५ रोजी ई -मेलव्दारे निविदा दर कमी करुन प्राकलन दराप्रमाणे (अंदाजपत्रकीय दराने )असे दर दिलेले आहेत.

तरी वाटाघाटी अंती आलेले मे.बडगुजर ॲण्ड कंपनी यांचे अंदाजपत्रकीय दरास कार्यालयीन अहवालास अधिन राहून मंजुरी देण्यांत येत आहे. नियमानुसार त्यांचे कडून योग्य तो अटी शर्तीचा करारनामा करुन घेण्यांत यावा.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ८२

महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत ३० मीटर डी.पी. रोड रुंदीकरण व डांबरीकरण करण्यांचे निविदा दर मागविण्यांत आलेत, त्याबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १०३ दिनांक ३१/१२/२०१५**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे महाराष्ट्र स्वर्णजयंती नगरोत्थान अभियान अंतर्गत ३० मीटर डी.पी रोड रूंदीकरण व डांबरीकरण करणेबाबत धुळे महानगरपालिका महासभा ठराव क्र.३० (च) दि.१५/५/२०१५ अन्वये व महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. बैठक २०१५ /प्र.क्र /३८(३)/नवि-३३ दि.३०/३/२०१५ अन्वये प्रशासकीय मान्यतेनुसार उक्त बाबत मुख्य अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग नाशिक यांचे पत्र क्र.४८६८ दि.२१/८/२०१५ अन्वये रक्कम रू.६९,६८,२०,९००/-, (रू.१६,४९,५३,१३४/-) मात्र खर्चास तांत्रिक मंजुरी मिळालेली आहे.

उक्त बाबत धुळे महानगरपालिका जा.क्र./बां.वि/१० दि.२३/६/२०१५ अन्वये दि.२४/६/२०१५ रोजीचे दिव्य मराठी व लोकमत या वृत्तपत्रात ई-निविदा प्रसिध्द करण्यात येवून दि.१२/८/२०१५ रोजी पावेतो निविदा दर मागविण्यात आले आहेत.पात्र कंत्राटदार यांनी ई-निविदा सुचना अटी शर्ती नुसार बयाना रक्कम निविदा दर सादर केले आहेत.

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नांव | दिलेले निविदा दर | शेरा |
|---|---|---|---|
| १ | मे.बोरसे ब्रदर्स | १३.७१ % कमी ने | |
| २ | श्री.एस.बी.देशमुख | १४.९९ % कमी ने | |
| ३ | श्री.ए.बी.वाघ | २०.५१ % कमी ने | सर्वात कमी दर |
| ४ | श्री.शितलकुमार एम.नवले | ११.९७% कमी ने | |

उक्त कामाबाबत अभिनव गिते, कटारीया आणि गिते ज्वाईन्ट वेन्चर,बोरसे ब्रदर्स,शितलकुमार मोहन नवले, कृष्णा इन्टर प्राईजेस यांनी दि.२१/१२/२०१५ रोजी व दि.२२/१२/२०१५ रोजी दिलेल्या अर्जात क्र.१ चे ठेकेदार मे.अे.बी.वाघ यांनी निविदेसाठी आवश्यक असलेले उष्ण मिश्रीत डांबर कामाचे व तत्सम काम यापूर्वी मागील ३ वर्षात केलेले असल्याचे अनुभवाचे दाखले सादर केलेले नाहीत, जे महाराष्ट्र शासन सा.बां.विभाग परिपत्रक क्र.निविदा

१०/२०००/प्र.क्र.५०२/इमारत-२/मंत्रलय,मुंबई-३२ दि.२५/१०/२००० अन्वये सादर करणे अनिवार्य आहे.त्यामुळे त्यांच्याकडे सदर प्रकारचे काम करण्याचा अनुभव नाही असे सिध्द होते.

मे.अे.बी.वाघ यांनी निविदेसोबत जोडलेल्या कागदपत्रांतील Form २-A मध्ये Hot Mix Plant हा ६० ते ९ TPH क्षमतेचा असल्याचे म्हटले आहे,परंतु Hot Mix Plant हा DM-४५ असून त्याची क्षमता ही फक्त ४५ to ६५ TPH आहे.यावरून असा नित्कर्ष निघतो की,त्यांनी Form २-A मध्ये दिलेली माहिती व त्यासोबत जोडलेली कागदपत्रे यात तफावत आहे.

मे.अे.बी.वाघ यांनी Form २-A मध्ये दिलेल्या माहितीत, Paver Finishher, Vibratory Roller,Mechanical Spray,Roller इ. मशिनरी मे.स्मित कन्स्ट्रक्शन यांचेकडून विकत घेतलेली मशिनरी मे.स्मित कन्सट्रक्शन यांचेकडून विकत घेतली असल्याचे कागदपत्र सादर केलेले आहेत.परंतु त्यांनी विकत घेतलेली मशिनरी मे.स्मित कन्सट्रक्शन यांनी या बागोदरच मे.सुप्रभा कन्सट्रक्शन यांना देखील विक्री केलेली आहे.हे याच निविदा सुचनेतील इतर कामांमध्ये मे.अे.बी.वाघ,मे.स्मित कन्सट्रक्शन,मे.सुप्रभा कन्सट्रक्शन व मे.भूमी कन्सट्रक्शन या चारही ठेकेदारांनी जी कागदपत्रे सादर केलेली आहेत त्यावरून दिसते.

यावरूनअसा नित्कर्ष निघतो की, मे.अे.बी.वाघ,मे.स्मित कन्सट्रक्शन, मे.सुप्रभा कन्सट्रक्शन व मे.भूमी कन्सट्रक्शन या चारही ठेकेदारी कंपनी एकच मशिनरी घेवून या चारही कंपन्यामध्ये आवश्यकतेनुसार ती मशिनरी एकमेकास विक्री केल्याची कागदपत्रे तयार करतात व ती निविदेसोबत जोडतात.

मे.अे.बी.वाघ यांनी मे.स्मित कन्सट्रक्शनकडून ट्रकवर बसविण्यात येणारे Mechanical Sprayer विकत घेतल्याचे दाखविले आहे.परंतु सदर ट्रकचे R.T.O प्रमाणीत कागदपत्रे सादर केलेली नाहीत.

मे.जय कन्सट्रक्शन,धुळे यांनी मे.स्मित कन्सट्रक्शन व मे.अे.बी.वाघ यांचे विरूध्द Public Works Dept.Online E-Tender No.३२७५७,E-Tender Notice No.६ या निविदे सोबत खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रे जोडल्याने त्यांना कंत्राटदारांच्या काळया यादीत टाकणेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ,औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेली आहे.

तसेच मे.जय कन्सट्रक्शन,धुळे यांनी सा.बां.विभागाच्या मा.मुख्य अभियंता, सा.बां.प्रादेशिक विभाग नाशिक,मा.सहा.मुख्य अभियंता,(यांत्रिकी) सा.बां. प्रादेशिक विभाग नाशिक,मा.अधिक्षक अभियंता, सा. बां. मंडळ,धुळे तसेच मा.कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग,धुळे यांच्याकडे मे.अे.बी.वाघ व मे.स्मित कन्सट्रक्शन यांनी निविदेसोबत खोटी व दिशाभूल करणारी कागदपत्रे जोडल्याने त्यांना कंत्राटदारांच्या काळया यादीतटाकणेची मागणी केलेली आहे.सदर पत्रव्यवहाराच्या प्रती आपल्या माहितीसाठी सादर करित आहोत.

महोदय वरील मुद्दा क्र.१ ते ५ मध्ये नमूद केलेल्या गोष्टीचा/बाबींचा व निघत असलेल्या नित्कर्षाचा विचार केला असता,करता मे.अे.बी.वाघ,मे.स्मित कन्सट्रक्शन,मे.सुप्रभा कन्सट्रक्शन व मे.भूमी कन्सट्रक्शन या चारही ठेकेदारांनी एकच मशिनरी परस्परात विक्री केल्याचे दाखविलेले आहे असे वरील पत्रात नमुद आहे.त्यानुसार खालीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

उक्त बाबत मा.आयुक्त मनपा धुळे दि.२/९/१५ रोजी कार्यालयीन आदेश काढून ई-निविदा बाबतची अटी शर्ती नियम इ.बाबतची तपासणी करून निर्णय घेण्याचे अधिकार अभियंता यांना दिलेले आहे सोबत आदेशाची प्रत जोडलेली आहे.कटारीया-गिते ज्वाईन्ट वेन्चर कामच्या निविदेबाबत यापूर्वी दि.१९/१२/१५ रोजी निविदा निवेदेतील पृ.क्र.२८ बाब क्र.२१ व २२ प्रमाणे निकषात बसत नसल्याने अपात्र ठरविण्यात आलेले आहे.सदरच्या ज्वाईन्ट वेन्चर यांनी ऑनलाईन सबमिशन नंतर (after thought) नविन भागीदारी पत्रक सादर कले आहे ते दि.२१/१२/२०१५ रोजी सादर केले असून ग्राहय धरता येणार नाही.तसेच गिते यांची नोंदणी प्रमाणपत्राची प्रत आपल्या टेंडरमधील अटी शर्ती पेक्षा कमी असल्याने निविदा अपात्र ठरविण्यात आलेली आहे.तसचे श्री.कटारीया-गिते यांनी तक्रारपत्रात मे.अे.बी.वाघ,धुळे,मे.स्मित कन्सट्रक्शन,धुळे, मे सुप्रभा कन्सट्रक्शन, नाशिक,मे.भूमी कन्सट्रक्शन तळोदायांच्या निविदा अपात्र ठरविण्याबाबत कळविले आहे.परंतु श्री.अे.बी.वाघ यांनी टेंडर शर्तीनुसार जास्तीची अनामत रक्कम १,३२,००,०००/- याबाबतची बँक गॅरेन्टी निविदेसोबत जोडलेली आहे.उर्वरीत ठेकेदारांचे

स्वमालकीचे मशिनरी असल्याबाबत कागदपत्र सादर केले आहे.त्यामुळे ठेकेदार श्री.ए.बी.वाघ यांचे दर तुलनेने सर्वात कमी असून त्यांनी अटी शर्तीनुसार बयाना रक्कम भरलेली आहे.

सबब कंत्रातदार श्री.ए.बी.वाघ यांची सर्वात कमी २०.५१ % कमी दराने आलेले निविदा दर आलेले आहेत सदरच्या निवदेबाबत स्पर्धेतील इतर ठेकेदारांनी आक्षेप नोंदविला आहे त्याबाबतची लेखी आक्षेपाची प्रत सोबत सादर केलेली आहे सदर निविदेबाबत निविदा स्विकारावी तथा अपात्र केलेली निविदा दर विचारत घ्यावे तथा सदर कामाची निविदा प्रकिया पुन्हा नव्याने राबवावी याबाबत सर्व कागदपत्राचे अवलोकन होऊन मे. स्थायी समितीपुढे निर्णयासाठी सादर करण्यांत आलेला आहे.

उपस्थित सदस्यांनी व्यक्त केलेल्या मतानुसार व मुद्दयानुसार तसेच उपस्थित सदस्यांच्या चर्चेअंती व प्रशासनाच्या खुलाश्यानुसार कामाच्या निविदा प्रक्रियेमध्ये सर्वात कमी दर असलेले निविदा धारक श्री. ए.बी. वाघ यांनी अटी शर्तीचा भंग केला असल्याचे प्रथम दर्शनी निदर्शनास येत आहे. व त्याची शासकीय नियमाप्रमाणे पात्रता नसल्याने त्यांच्या विरुध्द गंभीर तक्रारी आहेत. त्यामुळे व प्रशासनाने केलेल्या निवेदनानुसार व स्थायी समितीच्या निर्णयानुसार श्री. ए.बी. वाघ यांची आलेली निविदा अपात्र करण्यांत येत आहे.

तसेच सदर प्रस्तावासाठी राज्य शासनाने निधीची उपलब्धता केलेली आहे व त्याचा हप्ताही महानगरपालिकेस प्राप्त झालेला आहे. सदर निधीचा वापर मुदतीत न झाल्यास निधी परत जाण्याची तथा व्यपगत होण्याची शक्यता आहे.यापूर्वीही मुदतीत निधीचा वापर न झाल्याने महानगरपालिका व नगरपालिकाचा निधी परत गेल्याची उदाहरणे आहेत. व सदर काम धुळे शहराच्या दृष्टीने अत्यंत महत्वपूर्ण काम असून शहराच्या सुमारे ४ ते ५ प्रभागाच्या विकास सदर कामावर अवलंबून आहे. रहदारीच्या दृष्टीने हा शहरातीलअत्यंत महत्वपूर्ण रस्ता आहे. याआधिच या कामाच्या मान्यतेसाठी ४ ते ५ महिने कालावधी गेलेला आहे. याकामी फेर निविदा प्रक्रिया केल्यास त्यास कालावधी लागण्याची शक्यता असून काम मुदतीत व तांतडीने पूर्ण होण्याच्या दृष्टीने सदर निविदा प्रक्रियेतील दुसरे व तिसरे निविदाधारक यांच्याशी निगोसिएशन करुन त्यापैकी जे निविदाधारक या निविदा प्रकियेत आलेल्या निविदा दरांत काम करण्यांस तयार असल्यास त्यांना प्रशासनाच्या निवेदनानुसार व सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर काम देण्यांस मान्यता देण्यांत येत आहे. व त्याकरिता चर्चेचा व पुढील सर्व कार्यवाही करण्यांचा अधिकार उपस्थित सन्मा.सदस्यांनी सुचित केल्यानुसार मा.सभापती यांना देण्यांत येत आहे. याबाबत तातडीने आजच कार्यवाही करण्यात यावी.

या प्रस्तावास श्री. चंद्रकांत केले यांनी विराध नोंदविला असल्याने त्यांचा विरोध नोंदवून सदर प्रस्ताव बहुमताने मंजुर करण्यांत येत आहे.

**बहुमताने मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

धुळे महानगरपालिका धुळे
स्थायी समिती
सभा क्रं.१ दिनांक २२ /०१/२०१६ चे इतिवृत्त

धुळे महानगरपालिकेच्या स्थायी समितीची विशेष सभा आज शुक्रवार दिनांक२२ /०१/२०१६ रोजी सकाळी ११-०० वाजतां धुळे महानगरपालिकेच्या सभागृहात मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग नाशिक यांचे प्रतिनिधी मा.जिल्हाधिकारी साो.धुळे तथा पिठासीन अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली आयोजित करण्यांत आली. या सभेचे इतिवृत्त.

सदर सभेस खालील प्रमाणे मा.सदस्य उपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. सोनार चंद्रकांत बापू | सदस्य |
| २ | श्री.अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ३ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ४ | श्री. बोरसे रमेश महादू | सदस्य |
| ५ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सदस्य |
| ६ | श्री. पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |
| ७ | श्री.पठाण इस्माईल खां हाजी लुकमान खां | सदस्य |
| ८ | श्री.सैय्यद साबीर अली मोतेबर | सदस्य |
| ९ | श्रीमती दुसाने चित्रा चंद्रशेखर | सदस्य |
| १० | श्रीमती परदेशी मायादेवी महादेव | सदस्य |
| ११ | श्रीमती आघाव ललिता रविंद्र | सदस्य |
| १२ | श्रीमती पठाण जैबुन्निसा अशरफ खां | सदस्य |
| १३ | श्री. मोरे नानाभाऊ गजमल | सदस्य |

उपस्थितीबाबत स्वाक्ष-या स्वतंत्र रजिष्टरमध्ये घेण्यात आल्या.

खालील सदस्य अनुपस्थित होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | सौ.प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्य |
| २ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ३ | श्री गुजराथी संजय नारायण | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. अण्णासाहेब मिसाळ | पिठासीन अधिकारी तथा जिल्हाधिकारी धुळे |
| २ | श्री.प्रकाश वायचळ | प्र.आयुक्त, मनपा धुळे |
| ३ | श्री. एच.पी. कवठळकर | उपायुक्त, मनपा धुळे |
| ४ | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त (स.प्र), मनपा धुळे |
| ५ | श्री.बी.बी. गिते | सहा.आयुक्त ( अति.), मनपा धुळे |
| ६ | श्री. मनोज अरविंद वाघ | नगरसचिव, मनपा धुळे |
| ७ | श्री. जे.आर. वळवी | उपजिल्हा निवडणूक अधिकारी (जि.का.) |
| ८ | श्री. पी.जी.कुलकर्णी | नायब तहसिलदार ( जि.का.) |

सभेच्या सुरुवातीस वंदे मातरम या राष्ट्रवंदनचे गायन झाले.

म. नगरसचिव — मा.विभागीय आयुक्त,नाशिक विभाग यांचेकडील क्रं.नपा-२/२/जा. क्रं. ७९३ /२०१६ दिनांक १६/१/२०१६ च्या आदेशानुसार मा. जिल्हाधिकारी,धुळे यांची आजच्या दिनांक २२/०१/२०१६ स्थायी समिती सभापती निवडणूकीसाठी

पिठासीनअधिकारी म्हणून नियुक्ती केली होती. त्यानुसार ते सभेचे कामकाज पार पाडणेसाठी उपस्थित आहेत. त्यांचे महानगरपालिकेच्या वतीने स्वागत करणेत आले.

विषय क्रमांकः-१ स्थायी समिती सभापती महानगरपालिका धुळे यांची निवड करणे.

म. नगरसचिव मुंबई प्रांतिक मनपा (स्थायी समिती ,परिवहन समिती, प्रभाग समित्या व इतर समित्यांचे सभापती यांची निवडणूक घेणे)सन २००७ ची महाराष्ट्र शासन अधिसुचना १७ फेब्रुवारी २००७ चे नियम क्रमांक ५ (१)अन्वये दिनांक२२/०१/२०१६रोजी स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणूकीसाठी दाखल झालेले नामनिर्देशन पत्र मा.पिठासीन अधिकारी यांचेकडेस सुपुर्द करणेत आले.

म.पिठासीन अधिकारी दिनांक२१/०१/२०१६ रोजी पावेतो नगरसचिव मनपा धुळे यांचेकडेस विहीत वेळेत स्थायी समिती सभापती पदासाठी एकाच उमेदवाराचे चारनामनिर्देशन पत्रे प्राप्त झालेली होती. त्यांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | उमेदवारांचे संपूर्ण नांव | उमेदवाराचा टपालाचा संपूर्ण पत्ता | उमेदवार हा नगरसेवक म्हणून जेथून निवडून आला त्या प्रभागाचे/ पॅनलचे नांव/ क्रमांक | सुचकाचे संपूर्ण नांव | अनुमोदक संपूर्ण नांव |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शिंदे सोनल दिलीप | प्लॉट नं २३३क नूतन पाडवी हायस्कुल समोर स्टेशन रोड धुळ | २० अ | श्री. पठाण ईस्माईल खॉ हाजी लुकमान खॉं | श्री. पाटोळे संदीप सुरेश |
| २ | श्री. शिंदे सोनल दिलीप | प्लॉट नं.२३३क नूतन पाडवी हायस्कुल समोर स्टेशन रोड धुळ | २० अ | श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर | श्रीमती पठाण जैबुन्नीसा अशरफ खा |
| ३ | श्री. शिंदे सोनल दिलीप | प्लॉट नं २३३क नूतन पाडवी हायस्कुल समोर स्टेशन रोड धुळ | २० अ | श्रीमती आघाव ललीता रविंद्र | श्रीमती दुसाने चित्रा चंद्रशेखर |
| ४ | श्री. शिंदे सोनल दिलीप | प्लॉट नं २३३क नूतन पाडवी हायस्कुल समोर स्टेशन रोड धुळ | २० अ | श्री. अन्सारी अकील अहमद महमद सादीक | श्री.मोरे नानाभाऊ गजमल |

म.पिठासीन अधिकारी : स्थायी समिती सभापती पदासाठी विहीत मुदतीत प्राप्त एका (१) उमेदवाराची ४ नामनिर्देशन पत्र प्राप्त आहेत.नामनिर्देशन पत्राची छाननी करण्यांत येत आहे.

म.पिठासीन अधिकारी : स्थायी समिती धुळे महानगरपालिकेच्या सदस्यांना नामनिर्देशन पत्र पाहण्यासाठी उपलब्ध आहे.कोणाही सदस्यांस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी लेखी / तोंडी हरकत पुराव्यासह दाखल करावी.

कोणत्याही सदस्यांने नामनिर्देशन पत्रावर हरकत घेतली नाही.

म.पिठासीन अधिकारी : छाननी अंती सभापती पदासाठी श्री. शिंदे सोनल दिलीप यांचे प्राप्त नामनिर्देशन पत्र वैध असल्याचे घोषित करण्यांत येत आहे.

म.पिठासीन अधिकारी : महाराष्ट्र शासन १७ फेब्रुवारी २००७ चे अधिसुचनेतील नियम ५ (३) नुसार वैधरित्या नामनिर्दिष्ठ उमेदवारास आपली उमेदवारी मागे घ्यावयाची असल्यास त्यांनी ठिक ११-२५ वाजेपावेतो माझ्याकडेस माघारीचा अर्ज सुपुर्द करावा.

विहीत मुदतीत श्री.शिंदे सोनल दिलीप यांनी माघारीसाठी अर्ज सादर केला नाही.

म.पिठासीन अधिकारी : धुळे महानगरपालिकेच्या सभापती स्थायी समिती पदासाठी श्री. शिंदे सोनल दिलीप या एकाच उमेदवाराचे नामनिर्देशन पत्र प्राप्त असून ते वैध असल्याने महाराष्ट्र

शासन १७ फेब्रुवारी २००७ चे अधि सुचनेतील नियम ६(१) नुसार श्री. शिंदे सोनल दिलीप हेस्थायी समिती सभापती पदी रितसर निवडून आल्याचे घोषित करीत आहे.

सभेचे कामकाज शांततेने पार पाडणेस उपस्थितांनी सहकार्य केल्याबद्दल उपस्थितांचे आभार मानून राष्ट्रगितानंतर सभेचे कामकाज संपल्याचे जाहीर केले.

सही/-x x x

दिनांक :- २२ /०१/२०१६

पिठासीन अधिकारी

धुळे मनपा स्थायी समिती सभापती निवडणूक सभा,

तथा

जिल्हाधिकारी,धुळे

**धूळे महानगरपालिका सभागृह, धुळे**
**मंगळवार दिनांक २ फेब्रुवारी २०१६**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज मंगळवार दिनांक ०२/०२/२०१६ रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री. सोनल दिलीप शिंदे, सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सभापती |
| २ | सौ. चौधरी प्रतिभाताई शिवाजीराव | सदस्या |
| ३ | श्री.अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ४ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ५ | श्री. पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |
| ६ | श्री गुजराथी संजय नारायण | सदस्य |
| ७ | श्री. पठाण इस्माईल खां हाजी लुकमान खां | सदस्य |
| ८ | श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर | सदस्य |
| ९ | श्रीमती दुसाने चित्रा चंद्रशेखर | सदस्या |
| १० | श्रीमती परदेशी मायादेवी महादेव | सदस्या |
| ११ | श्रीमती पठाण जैबुन्निसा अशरफ खां | सदस्या |

**उपस्थित अधिकारी गण**

| अ.नं. | अधिका-यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| | डॉ. नामदेव भोसले | आयुक्त |
| १. | श्री. डी.एच. कदम | अतिरिक्त आयुक्त |
| २. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त |
| ३. | श्री. एम.आर. सराई | मुख्य लेखा परीक्षक |
| ४. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त ( कर) |
| ६. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ.श्री. बी.बी. माळी | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| १२. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| १३. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १४. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १५. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. राजेश गायकवाड | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १७ | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १८ | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १९ | श्री. सी. सी. बागुल | ओव्हरसिअर |
| २० | श्री. सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| २१ | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म.सभापती — सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक ती गणपूर्ती झालेली आहे. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

सभेच्या सुरुवातीस नुतन सभापती श्री. सोनल शिंदे यांची पहिलीच सभा असल्याने प्रशासनाच्या वतीने मा. आयुक्त सो. यांनी सभापती यांचे गुलाब बुके देवून स्वागत करण्यांत आले तसेच स्थायी

समिती सदस्या सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी देखील स्थायी सर्व सन्मा.सदस्यांसमवेत विद्यमान सभापती यांचे बुके देऊन सत्कार केलो.

तसेच आजच्या स्थायी समिती सभेत मनपा सेवेत हजर झालेले अतिरिक्त आयुक्त श्री. कदम साहेब यांचे बुके देऊन स्वागत करण्यांत आले. त्यानंतर त्यांनी त्यांचा थोडक्यात स्थायी समितीस परिचय करुन दिला.

मा. सभापती — सर्व जेष्ठ, श्रेष्ठ सदस्यांचे मार्गदर्शन घेऊन स्थायी समितीचे सर्व सदस्यांचे सहकार्याने शहराचा विकास करावयाचा आहे. त्यासाठी सर्वाचे सहकार्याची मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. नगरसचिव यांनी पुढील कामकाजास सुरुवात करावी.

विषय क्रमांकः- ०१ — स्थायी समितीच्या साप्ताहिक सभेचा वार व वेळ निश्चित करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १ दिनांक २/०२/२०१६**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे स्थायी समितीच्या साप्ताहीक सभेचा वार व वेळ ठरविणे संदर्भातील विषयावर उपस्थित सदस्यांनी चर्चा करुन चर्चेअंती स्थायी समितीच्या साप्ताहिक सभा गुरुवारी सकाळी ११-०० वाजता आयोजित करण्यांत सर्वानुमते मंजुरी देण्यांत येत आहे.तसेच मा.सभापती स्थायी समिती यांना आवश्यक वाटल्यास इतर वेळी देखील स्थायी समिती सभा घेण्यांचे अधिकार मा.सभापती यांना देण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**धुळे महानगरपालिका सभागृह, धुळे**
**बुधवार दिनांक १० फेब्रुवारी २०१६**
**वेळ सकाळी ११-३० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची सभा आज बुधवार दिनांक १०/०२/२०१६ रोजी सकाळी ११-३० वाजतां मा.श्री.सोनल दिलीप शिंदे,सभापती,स्थायी समिती,धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेच्या सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सभापती |
| २ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ३ | श्री.अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ४ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ५ | श्री. पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |
| ६ | श्री गुजराथी संजय नारायण | सदस्य |
| ७ | श्री. पठाण इस्माईल खां हाजी लुकमान खां | सदस्य |
| ८ | श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर | सदस्य |
| ९ | श्रीमती दुसाने चित्रा चंद्रशेखर | सदस्या |
| १० | श्रीमती पठाण जैबुन्निसा अशरफ खां | सदस्या |
| ११ | श्री.मोरे नानाभाऊ गजमल | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.नं. | अधिका-यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री. डी.एच. कदम | अतिरिक्त आयुक्त |
| २. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त |
| ३. | श्री. एम.आर. सराई | मुख्य लेखा परीक्षक |
| ४. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त ( कर) |
| ६. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ.श्री. बी.बी. माळी | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| १२. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| १३. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टीृ अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १४. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १५. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १६ | श्री. राजेश गायकवाड | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १७ | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १८ | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १९ | श्री. सी. सी. बागुल | ओव्हरसिअर |
| २० | श्री. सी.एम.उगले | ओव्हरसिअर |
| २१ | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म.सभापती सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक ती गणपूर्ती झालेली आहे. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज**

| | |
|---|---|
| | सन्मा. सदस्या सौ. मायादेवी महादेव परदेशी , सौ. ललिता रविंद्र आघाव यांनी आजच्या सभेस उपस्थत राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहेत. |
| म. सभापती | सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर २ दिनांक १०/०२/२०१६**

सन्मा. सदस्या सौ.मायादेवी महादेव परदेशी , सौ. ललिता रविंद्र आघाव यांनी आजच्या सभेस उपस्थत राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केलेले आहेत.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

| | |
|---|---|
| म.सभापती | आजच्या सभेसाठी आयुक्त साो. यांनी उपस्थित राहणे आवश्यक होते ते का हजर नाही यांचे कारण काय आहे. |
| म. अति. आयुक्त | आज मुंबई येथे मुख्य सचिवांनी स्कीमसंबंधी आढावा बैठक आयोजित केली आहे. सदर बैठकीत उपस्थित राहणेसाठी मुंबई येथे गेले आहे त्यांनी मला सभेचे कामकाज बघावे असे सांगितले आहे. |
| म. आय.एल. पठाण | आयुक्त हे कालही गैरहजर होते आजही गैरहजर आहेत. |
| म.सैय्यद साबीरअली मोतेबर | पहिल्या सभेमध्ये रविवारी मिटींग घ्यावी असे सदस्यांनी म्हटले होते. दर वेळेलाआयुक्त हे शासकीय कामासाठी मुंबईला जात असतात सभेमध्ये हजर नसतात. यामुळे प्रभागातील समस्यांचे निवारण कसे होईल आयुक्त साहेबांना इतर ठिकाणी वेळ असतो परंतु मिटींगला वेळ नसतो. |
| म. संजय गुजराथी | मागील वेळी सुध्दा निदर्शनास आणून दिले होते आयुक्त यांनी प्रत्येक मिटींगला हजर राहिले पाहिजे.स्थायी समिती म्हणजे आर्थिक कणा आहे. परंतु आजच्या सभेत आयुक्त हे उपस्थित नाही. आजच्या सभेत महत्वाचा विषय आहे तरी आजची सभा तहकूब करावी. |
| म. संदीप पाटोळे | सभापती महोदय, स्थयी समितीच्या पहिल्या सभेत वेळ आणि सभेचा दिवस ठरविणेबाबतचा विषय आला होता त्यावेळी सन्मा.सदस्यांनी रविवार स्थायी समितीची सभा घेणेचे सूचित केले होते.कारण आयुक्त हे वारंवार सभेला अनुपस्थित रहातात. आजच्या सभेत धुळे शहरातील नागरीकांचा महत्वाचा विषय आहे.सभेची पुढील तारीख घ्यावी नागरीक आमच्याकडे समस्या बाबत वांरवार निवेदन द्यायलायेतात आज आयुक्त नसल्याने त्रास होतो.आजच्या सभेत आयुक्त उपस्थित नसल्याने निषेध करीत आहे. |
| म. सभापती | सन्मा. सदस्यांनी असे करु नये तुमच्या भावना मी समजू शकतो. सभेला उपस्थित राहू शकत नसेल तर सभापतीची पूर्वपरवानगी घेण्यांत यावी. महत्वाचे विषय आहे शहराचे दृष्टीने चर्चा करु सभा तहकूब करु नये. |
| म. संजय गुजराथी | मी पहिल्या मिटींगमध्ये बोललो होतो विकास कामासाठी आम्ही तुमच्या बरोबर आहे. सत्तेचा गैरवापर होत असेल तर तुमच्याकडून अपेक्ष आहे फक्त चर्चा करुन उपयोग नाही पाणीपुरवठा योजनेचा विषय आहे. आपण चूकीच्या पध्दतीने जात असेल ५ लाख नागरकांचा प्रश्न आहे. त्याचा रोख फक्त नगरसेवकांवर येतो ही सभा तहकूब करावी शासनाकडे पहिलीच मिटींग आहे त्याठिकाणी श्री. कदम साहेबांही जाऊ शकत होते. आयुक्त यांचे समकक्ष अधिकारीही उपस्थित राहू शकतो. आयुक्त हे काल धुळयातच होते काल वृक्ष प्राधिकरणाचे सभेसही उपस्थित नाही विषयावर परत परत चर्चा होईल ही सभा तहकूब करावी. |
| म. सभापती | शहराचे विकासाची कामे करावयाची आहे. सकारात्मक दृष्टीकोन ठवून आजची सभा चालू द्यावी शहराचा पिण्याचे पाण्याचा प्रश्न आहे. महत्वाचा विषय आहे निदर्शनास आणू देत आहे सर्व मिळून आपल्याला निर्णय घ्यावयाचा आहे आपल्या लेखी सुचना आयुक्तांना कळविणेत येईल तरी सभा तहकूब करु नये. |
| म. साबीर मोतेबर अली | तत्कालीन अभियंता श्री. दरेवार साहेबांनी पाणीपुरवठा योजनेचे बील काढले आहे महासभेच्या आधी त्यांना सोडणेत आले याची उत्तरे आपण देणार आहांत का? |

म. सभापती सदर पाणीपुरवठा योजनेचा विषय प्रलंबीत ठेवून अजेंडयावरील इतर विषयबाबत कामकाज चालवावे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- २ मागील स्थायी समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे ( दि.२९/१०/१५ व २४/११/१५)

**धुळे महानगरपालिका स्थायी समिती ठराव नंबर ३ दिनांक १०/०२/२०१६**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे मागील स्थायी समिती सभा दिनांक २९/१०/२०१५चे ठराव क्रं. ६८अखेर तसेच दिनांक २४/११/२०१५ चे ठराव क्रं.६८(१) ते ७६ अखेर क्रमशः वाचून कायम करण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ३ धुळे शहरासाठी UIDSSMT या योजने अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेली पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक धुमपा /२०१५ /प्र.क्र.२१०/ नवि २५ दि.२७ ऑगस्ट २०१५ अन्वये झालेला आहे.सदर बाबत मे.स्थायी समितीपुढे माहितीस्तव सविनय सादर.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ४ दिनांक १०/०२/२०१६**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहरासाठी UIDSSMT या योजने अंतर्गत केंद्र शासनाने मंजूर केलेली पाणीपुरवठा योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांच्याकडे हस्तांतरीत करण्याबाबत शासन निर्णय क्रमांक धुमपा /२०१५ /प्र.क्र.२१०/ नवि २५ दि.२७ ऑगस्ट २०१५ अन्वये झालेला आहे.सदर बाबत मे.स्थायी समितीपुढे माहितीस्तव सविनय सादर केला असता उपस्थित सदस्यांनी सदर विषयाबाबत मा. आयुक्त सो. यांचेकडून माहिती आवश्यक आहे. आणि आयुक्त आज सभेला उपस्थित नसल्याने सदर विषय तूर्त तहकूब ठेवून आयुक्तांच्या उपस्थित सदर विषय पुन्हा घेण्यांत यावा अशी सुचना केली असल्याने सदर विषय तूर्त तहकूब ठेवण्यांत येत आहे.

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांकः- ४** धुळे मनपाचे सर्वर रुम मध्ये ई गर्व्हनन्र्स सिस्टीम करिता फायर वॉल इन्स्टॉलेशन करणेचे कामास व झालेल्या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ५ दिनांक १०/०२/२०१६**

कार्यालयीन निवेदनानुसार सर्वर रुम मध्ये नवीन आपल सरकार पोर्टल यंत्रणा कार्यान्वीत करणेकरिता नवीन २ नग सर्वर आस्थपित करावयाचे आहे. सदर नवीन व जुने सर्वर यत्रणा व लॅन जोडणी सुरक्षित असणे (Virus Free) साठी फायर वॉलची आवश्यकता आहे. सदर व्यवस्था करणेबाबत एबीएम कंपनीने सुचित केले आहे.

Cyber cam / Sing 3 x10 100/100 rather nab port 750 mbs firewall / 80 mbps UTM, ( 1 year Subscription module) installation करणेत आले आहे. सदर कामासाठी मे. ट्रिनिटी टेक्नालॉजी अहमदनगर यांनी टॅक्सेससह रु.५००००/- चे बिल सादर केले आहे. सदर कंपनीने KDMC Software प्रमाणे मान्यतेप्रमाणे दर्जाप्रमाणे काम केले आहे. याप्रमाणे कंत्राटदाराने पुणे व नगर येथे काम केले आहे. उक्त कामासाठी मे. ट्रिनिटी टेक्नॉलॉजी, अहमदनगर यांचे बिल रु. ५००००/- मात्र आहे. सदर बिलाप्रमाणे करण्यांत आलेल्या कामासाठी कंत्राटदारास सदर बिल लगेचच देणे आवश्यक आहे. करिता सदरचे खर्चास व कामाकरिता मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड क (५) परंतुका २(२) नुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय क्रमांकः- ५** नागरी सुविधा केंद्राकरिता ३ केव्हीए ऑनलॉईन युपीएस बसविणेकामी होणा-या खर्चास कार्योत्तर मंजुरी देणेबाबत विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ६ दिनांक १०/०२/२०१६**

कार्यालयीन निवेदनानुसार मनपा नागरी सुविधा केंद्र येथील सर्वर रुम चे वापरात असलेले ३ kva युपीएस शॉर्टसर्किट झाल्याने जळाले आहे.तसेच शासनाच्या परिपत्रका प्रमाणे आपल सरकार पोर्टल कार्यान्वीत करावयाचे असल्याने सर्व्हरसाठी ऑन लाईन युपीएस अत्यंत तांतडीने बसविणे आवश्यक आहे. सद्यस्थितीत वीना युपीएस सर्व्हर जोडणी कार्यान्वीत असल्याने सदर बाब अत्यंत गरजेची आहे.

शासन दरसूची/सा.बं./विद्युत /२०१३-१४ च्या दरसूचीप्रमाणे खर्च रुपये ६८४१९/- मात्र आहे. सदर बाब तांतडीचे असल्योन ३ KVA UPS विना निविदा मे. क्वीक इलेक्ट्रीकल्स धुळे यांचेकडून खरेदी करण्यांत आले आहे. सदर ३ KVA UPSहे SMF बॅटरी ८ नगसह आहे. पुरवठादार यांचे बिलाप्रमाणे खर्च रक्कम रु.६८४१४/- (टॅक्सेससह) करिता व विना निविदा खरेदी करीता मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ७३ खंड क प्रकरण ५ सेंविदा २ (२) नुसार कार्योत्तर मंजुरी देण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः-६ धुळे मनपा क्षेत्रात संपूर्णतः एलईडी पथदिवे बसविणेबाबतच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ७ दिनांक १०/०२/२०१६**

कार्यालयीन निवेदनानुसार धुळे मनपा क्षेत्रातील पथदिव्याचा वार्षिक वीजबीलाचा खर्च सुमारे ३.७५ कोटी मात्र आहे.(प्रतिमाह रु. २९ लक्ष) धुळे शहरातील संपूर्णतः पथदिवे बदलवून नवीन एल.ई.डी.पथदिवे बसविलेनंतर सदर खर्च किमान ५०% कमी होणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे जुने पथदिवे ऐवजी एलईडी पथदिवे बसविणेचा प्रस्ताव आहे.

याबाबत केंद्रशासन अंतर्भूत EES (Enety Efficiency services limited) या कंपनीकडून ESCO Mode प्रमाणे प्रस्ताव करणे बाबत कागदपत्र मागणी प्रमाणे शहरातील १२७४२ पथदिवे एलईडी स्वरुपात बसविणे त्याबाबत परतावा ७ वर्षात करणेसाठी खर्च रु.१३.२८ कोटी मात्र देण्यांत आला आहे.याव्यतिरिक्त ३%P.M.C. चार्जेस व ४% A.M.C.चार्जेस (Annual Manintance Charges) खर्चअतिरिक्त असणार आहे.सदर खर्च प्रती वर्ष रु.९३ लक्ष अपेक्षित आहे. याप्रमाणे ७ वर्षातील खर्च रु.६.५१ कोटी आहे. एकत्रित खर्च रु. १३.२८+ ६.५१ = रु. १९.८० कोटी (Say२० कोटी ) अपेक्षित आहे. प्रत्यक्ष बचतीपेक्षा जास्त आहे.

सादर टिपणी मध्ये सा.बां. विभाग विद्युत यांचे नवीन सुधारीत दरसूची प्रमाणे प्रत्यक्ष कामाचा अंदाजपत्रकीय खर्च रु.१०.२५कोटी आहे. जो तुलनेत वरील खर्चापेक्षा कमी आहे.सदर प्रस्तावाप्रमाणे निविदा कार्यवाही प्रस्तावित केल्यास स्पर्धात्मक निविदेत अंदाजपत्रकापेक्षा दर कमी जातील असे मत आहे. म.न.पा.ची आर्थिक स्थिती नुसार सदर काम सद्यस्थितीत पूर्णतः होणे शक्य नसले तरी ही निविदा कार्यवाही नंतर टप्प्याने काम करता येईल.

तथापि सन२०१५-१६च्या तरतुदीनुसार रु.३५लक्ष तरतूद असून या कामासाठी सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पातही तरतूद करणे आवश्यक राहील.असा प्रस्ताव प्रशासनामार्फत मे.स्थायी समितीपुढे विचारार्थ सादर झालेला आहे.

उक्त प्रस्तावावर सन्मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव हा मनपासाठी अत्यंत महत्वपुर्णअसुन मनपाच्या आर्थिक फायद्याचा आहे. सदर प्रस्ताव हा कार्यान्वीत झाल्यास धुळे शहराच्या विकासावरही सकारात्मक परिणाम होणार आहे. यापूर्वी ईईएसएल कंपनीकडून २० कोटी रुपयांचा एकत्रित प्रस्ताव तयार केला होता. आता नवीन डी.एस.आर. रेटनुसार अंदाजपत्रकीय खर्च रुपये १०.२५ कोटी आहे.त्यामुळे तुलनेने १० कोटी रुपये खर्च कमी होणार आहे.प्रशासनाच्या अहवालानुसार नवीन डीएसआर रेटनुसार अंदाजित खर्च रक्कम रुपये १०.२५ कोटी मात्रच्या

प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्यांत येत आहे. तसेच याकामी निविदा प्रक्रिया व पुढील अनुंषंगिक कार्यवाही करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

तसेचविद्युत अभियंता यांच्या निवेदनानुसार इस्को मोड प्रमाणे कंपनी कडून दर मागविणेचा पर्याय खुला ठेवल्यास मनपाला सुरुवातीच्या कोणत्याही खर्चाची जबाबदारी असणार नाही प्रतिमाह होणा-या विद्युत बिलाच्या बचतीतून संबंधित कंपनीला रक्कम अदा करता येईल त्यामुळे यामध्ये मनपाला कोणताही भांडवली खर्च होणार नाही सदर पर्याय हा मनपाच्या दृष्टीने व्यवहार्य स्वरुपाचा ठरु शकेल.त्यामुळे निविदा कार्यवाही करतांना इस्कोमोड प्रमाणेही दर मागवून पडताळणी करणेस मान्यता देणेत येत आहे.

सद्यस्थितीत मनपाची आर्थीक परिस्थिती खराब असून सदरचा प्रस्ताव पाठपुरावा करुन लवकरात अंमलबजावणी करण्यांत यावी.तसेच सदरच्या कामासाठी शासनाकडून निधी उपलब्ध होऊ शकतो का याबाबतची तपासणी करणेत यावी व शासनस्तरावर निधी उपलब्ध होणेसाठी त्यानुसार प्रस्ताव सादर करावा.

सद्यस्थितीत या योजनेसाठी लागणारा निधी उपलब्ध व्हावा यासाठी मनपामार्फत नवीन खाते निर्माण करुन त्यामध्ये नियमित रक्कम जमा करण्यांत यावी. याकामासाठी निविदा प्रक्रिया करतांना तांत्रिक त्रुटी राहू नये यासाठी त्या क्षेत्रातील तज्ञ व्यक्ती /संस्था यांच्याकडून मदत घेऊन निविदा कार्यवाही तांत्रिकदृष्टया व कायदेशीरदृष्टया योग्य रितीने हाताळणे बाबतची कार्यवाही प्रशासनाने करावी.तसेच चांगल्या मान्यताप्राप्त व नामांकित उत्पादक कंपनीचे एलईडीना प्राधान्य देण्यांत यावे.सदर प्रस्तावास सर्वानुमते मान्यता देण्यांत येत आहे. **सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

विषय क्रमांकः- ७ प्रभाग क्रं.१४ भागात जिल्हाधिकारी निवासस्थान ते पांझरा नदी पावेतो ची ड्रेनेज लाईन दुरुती करणे व वडजाईरोड येथे मुख्य पाईपलाईन वरील ३ व्हॉल (तापी योजना) साठी चेंबर दुरुस्त करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ८ दिनांक १०/०२/२०१६**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे शहरातील प्रभाग क्रं. १४ भागात जिल्हाधिकारी निवास स्थान ते पांझरा नदी पावेतोची ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व वडजाईड येथे मुख्य पाईप लाईन वरील ३ व्हॉल ( तापी योजना) साठी चेंबर दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

सदर ड्रेनेज लाईनची लांबी ६० मिटर आहे व चेंबरसाईज ४x४ मिटर सद्यस्थितीत सदर ठिकाणी ड्रेनेज लाईन छोटया स्वरुपाची असल्याने सांडपाण्याचा निचरा होत नसल्याने पाणी रस्त्यावरुन वाहते त्याकरिता दुरुस्ती करणे आवश्यक आहे. तसेच तापी योजनेच्या मुख्य लाईनीवर वडजाईरोड येथे लिकेज झाल्यामुळे चेंबर तोडावे लागले होते.परंतु पाणीपुरवठा सुरळीत होण्यासाठी चेंबर बांधणे आवश्यक होते. सदरचे काम अर्थसंकल्प २०१५-१६ या आर्थिक वर्षात निधीतून प्रस्तावित केले आहे. त्यामुळे सदर कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

**प्राधिकरण :-** सदर कामास म. आयुक्त सो. यांचे मंजुरीस अधिन राहून

**तरतूद** **:-** सदर अंदाजपत्रकात खालील तरतुदी करण्यांत आलेल्या आहेत.

१) अस्तित्वातील ड्रेनेज लाईन दुरुस्ती करणे व चेंबर दुरुस्ती करणे
२) संपूर्ण ड्रेनेज लाईन लांबी ६० मिटर व चेंबर साईज ४X ४ मिटर
३) PVCPIPE, CHAIMBER
४) विटकाम प्लॅस्टर स्लॅप छापे तयार करणे व फिटींग करणे.
५) व इतर अनुषंगिक बाबी.

**दरसूची :-**सदर अंदाजपत्रका सन २०१५ - १६ च्या दरसूचीवर आधारीत करण्यांत आले आहे.

**अंदाजित किंमत :-** सदर अंदाजपत्रकीय किंमत रु. २०२६९२४२/- मात्र इतकी येते.

तरी उक्त काम हे तांतडीने करणे आवश्यक असल्याने सदरकाम हे मे. श्रीनिवास कंस्ट्रक्शन धुळे यांचेकडून तांतडीने विना निविदा करुन घेण्यांत आलेले असल्याने सदर कामास मनपा अधिनियम १९४९ चे प्रकरण ५ संविदा ७३ खंड (क) च्या तरतुदीनुसार कार्योत्तर मंजुरी

देण्यांत येत आहे.तसेच सन्मा.सदस्यांमांडलेल्या सुचना नुसार शहरातील सर्व शौचालयांचे रिपेअरींग कामे तांतडीने करणेत यावी.

**सर्वानुमते मंजुर,**

**सही/-x x x**

**सभापती,**

**स्थायी समिती,**

**धुळे महानगरपालिका,धुळे**

**मा.आयुक्त दालनाजवळील सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक १० मार्च २०१६**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची अर्थसंकल्पीय विशेष सभा आज गुरुवार दिनांक १०/०३/२०१६ रोजी सकाळी ११-०० वाजतां **मा.श्री.सोनल दिलीप शिंदे,सभापती, स्थायी समिती, धुळे मनपा धुळे** यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेचे आयुक्त साो. यांचे दालनाजवळील सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सभापती |
| २ | सौ़ प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ३ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ४ | श्री.अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ५ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ६ | श्री़ बोरसे रमेश महादू | सदस्य |
| ७ | श्री. पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |
| ८ | श्री गुजराथी संजय नारायण | सदस्य |
| ९ | श्री. पठाण इस्माईल खां हाजी लुकमान खां | सदस्य |
| १० | श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर | सदस्य |
| ११ | श्रीमती आघाव ललिता रविंद्र | सदस्या |
| १२ | श्रीमती पठाण जैबुन्निसा अशरफ खां | सदस्या |
| १३ | श्री.मोरे नानाभाऊ गजमल | सदस्य |

उपस्थित अधिकारी गण

| अ.नं. | अधिका-यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | डॉ़.नामदेव कोंडिबा भोसले | आयुक्त |
| २. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा. आयुक्त ( कर) |
| ४. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. पगार | कार्यकारी अभियंता |
| ६. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ.श्री. बी.बी. माळी | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री.बी.एस. रनाळकर | प्र. लेखापाल |
| ११. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| १२. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी़ अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १३. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री. राजेश गायकवाड | लिपीक मनपा शिक्षण मंडळ |
| १६ | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १७ | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १८ | श्री तुषार ढाके | सहा़ अग्नीशमन अधिकारी |
| १९ | श्री़ दिलीप कलाल | बाजार विभाग |
| २० | श्रीमती मिना सातभाई | महिलाबालकल्याण विभाग |

म.सभापती — सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक ती गणपूर्ती झालेली आहे. नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

म.नगरसचिव :- वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे.

**सन्मा. सदस्यांचे आलेले रजेचे अर्ज**

सन्मा.सदस्या सौ.दुसाने चित्रा चंद्रशेखर व सौ. मायादेवी महादेव परदेशी यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केले आहेत.

म. सभापती — सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ९ दिनांक १०/०३/२०१६**

सन्मा.सदस्या सौ.दुसाने चित्रा चंद्रशेखर व सौ.मायादेवी महादेव परदेशी यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत विनंती अर्ज सादर केले आहेत. सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार आजच्या सभेस त्यांची रजा मंजूर करण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

**विषय क्रमांकः-०८** — म.आयुक्त सो.महानगरपालिका धुळे यांनी सन२०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक सादर केले आहेत.त्यानुसार स्थायी समितीने अर्थसंकल्प अंदाजपत्रक तयार करुन त्यास मंजुरी देणेबाबत विचार विनिमय करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १० दिनांक १०/०३/२०१६**

म.आयुक्त सो.महानगरपालिका धुळे यांनी सन २०१५-२०१६ चे सुधारीत व सन २०१६-२०१७ चे अंदाजपत्रक सादर केले आहेत.

सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना तसेच प्रशासनाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव याबाबत विचार केला असता सुचविण्यांत आलेल्या तरतूदी व मनपाचे उत्पन्न यांचा ताळमेळ घेणे अत्यंत आवश्यकआहे. तसेच सन्मा.नगरसेवकांच्या प्रभागात विकास कामांचीही आवश्यकता आहे. या सर्व बाबींचा विचार करुन प्रशासनामार्फत सुचविलेल्या काही तरतूदी खालील लेखा शिर्षाप्रमाणे कमी करण्यांत येत आहेत. तसेच आवश्यक त्या तरतूदीमध्ये वाढ करण्यांची शिफारस करण्यांत येत आहे.

मनपा प्रशासनाने आर्थिक परिस्थितीचा अंदाज घेवून वास्तववादी अंदाजपत्रक स्थायी समितीपुढे सादर केलेले आहे महासभेमार्फत करण्यांत येणारी संभाव्य दरवाढ लक्षात घेवून त्याप्रमाणे अंदाजपत्रकात तरतूद केलेली आहे. तथापि सदरअंदाजपत्रकात नगरसेवक निधीची तरतूद नाही. प्रत्येक प्रभागात सुमारे २ वर्षापासून विकास कामे झालेली नाहीत. नागरीकांच्या अपेक्षा व अडचणी लक्षात घेता या वर्षी तरतूद होणे आवश्यक आहे. तसेच महानगरपालिकेच्या ब-याच मोकळया जागा आय उपलब्ध आहेत. त्यात बीओटी तत्वावर व्यापारी संकुलाची निर्मिती केल्यास मनपास आवश्यक ते उत्पन्न प्राप्त होणार आहे. तसेच नवीन रोजगार उपलब्ध होणार आहेत.देवपूरात आयटीआय शेजारी सावता माळी मार्केट या सारख्या जागावर बीओटी मार्फत संकुलाचा प्रस्ताव तांतडीने कार्यान्वीत करुन उत्पन्न वाढीसाठी प्रशासनाने प्रयत्न करावेत.तसेच मोबाईल टॉवरवरील दंडात्मक आकारणी, अवैध नळ कनेक्शन वरील आकारणी यामुळेही मनपास उत्पन्न प्राप्त होईल. तसेच ज्या घरावर मोबाईल टॉवर आहे त्यांना कमर्शियल कर आकारणी व हॉकर्स झोनमुळे उत्पन्न वाढ अपेक्षित आहे.सदरची वाढखालील तक्त्यांत दर्शविण्यांत आलेली आहे.

तसेच महानगरपालिकेमार्फत घंटागाडी भाडे गांडूळ खत प्रकल्प निगा व दुरुस्ती इंधन खर्च या तरतुदीबाबत विचार करता त्यामध्ये घट होणे आवश्यक आहे. घरपट्टी करामार्फत प्राप्त होणारे उत्पन्न मागणी रु.११.१८कोटी व थकबाकी रु.७.८८कोटी दर्शविलेले आहे. तथापि यावर्षी आपण नवीन बांधकामे मोजमाप, व्यापारी प्रतिष्ठाने कर आकारणी नवीन बांधकामे व ११ कलमी कार्यक्रम व्दारे घेतलेली मोजमापे, रिव्हीजन यामुळे यात निश्चितच वाढ होणार आहे.

शहराच्या दृष्टीने सदर अंदाजपत्रकात नागरीकांसाठी काही महत्वपूर्ण तरतुद करणे आवश्यक होत्या त्यानुसार खालील प्रमाणे तरतुदी करणेची शिफारस करणेत येत आहे.

१) नगरसेवक निधी प्रत्येकी २५ लाख तरतूद करणे

२) रु. १५ लाख प्रथम टप्प्यात

३) डिसेंबर मध्ये होणा-या सुधारीत बजेट मध्ये उत्पन्नाचा आढावा घेवून दुस-या टप्प्यात रु. १० लाख तरतूद करणे

४) धुळे महानगरात प्रवेश करणा-या चारही महामार्गावर नवीन प्रवेशव्दार बसविणेसाठी रु. १ कोटी तरतूद करणे

५) ज्या नागरीकांनी मनपाची घरपट्टी कर नियमित भरलेले आहे अशा नागरीकांसाठी विमा योजना नागरीकांच्या विम्यासाठी २५ लाखाची टोकन तरतूद करणे

६) स्त्री भ्रुण हत्या रोखण्यासाठी तसेच मुलीच्या उच्च शिक्षणासाठी क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या ११९ व्या स्मृती दिनाचे औचित्य साधून मा.महापौर सौ.जयश्रीताई अहिरराव यांचे मार्गदर्शनाने तसेच महिला बालकल्याण समिती सभापती सौ.जुलाहा रश्मीबानो अकील अहमद, उपसभापती सौ. कल्पनाताई बोरसे व सौ. कशीश जी. उदासी यांच्या पत्रानुसार तसेच सन्मा.सदस्य श्री. संजयजी गुजराथी यांनी सुचविलेल्या पत्रानुसार व सर्व सन्मा. स्थायी समिती सदस्यांनी दिलेल्या सहमतीनुसार सावित्रीबाई फुले सुकन्या योजना (धुळे शहर हद्दीत रोज जन्माला येणा-या पहिल्या मुलीच्या नांवे रु.१०,०००/-फिक्स डिपॉझीट मुलीच्या १८ वर्ष वयापर्यत) त्यासाठी ३६ लाखाची तरतूद करणे

७) स्वच्छ धुळे सुंदर धुळे या संकल्पनेनुसार स्वच्छ सुंदर व कचराकुंडी विरहीत प्रभागासाठी बक्षिस योजनेसाठी रु. १५ लाखाची तरतूद करणे

८) धुळे शहराचा कुस्ती बाबत ऐतिहासिक वारसा लक्षात घेवून कुस्ती प्रेमीसाठी व कुस्ती खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी महापौर केसरीकुस्ती स्पर्धेसाठी करण्यात आलेल्या तरतुदीसाठी रु. १५ लाखाची अतिरिक्त वाढीव तरतूद तसेच राष्ट्रीय पातळीवर खेळणा-या प्राविण्य मिळवलेल्या सर्व खेळातील खेळांडूचा करणार सत्कार तसेच महाराष्ट्र केसरी विजय चौधरी यांचा करणार सत्कार करणे

९) हुशार व गरजू विद्यार्थ्यांसाठी आएएस या सारख्या स्पर्धा परीक्षांचे प्रशिक्षण शिबीरे आयोजित करण्यासाठी रु. १० लाख मात्रची तरतूद करणे

१०) छत्रपती संभाजी राजे यांचा पुतळा व संत गाडगे महाराज यांचा पुतळा नुतनीकरण व सुशोभिकरणासाठी तसेच संत रविदास महाराज यांचा पुतळयासाठी प्रत्येकी रु.२५लाख मात्र तरतूद करणे

११) मनपा निधी मधील या आर्थिक वर्षात प्रस्तावित केलेली विकास कामे परिशिष्ट भाग २ अंदाजपत्रक अ भांडवली कामे मध्ये दर्शविलेली आहेत.

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मे.आयुक्त साो यांनी केलेल्या तरतूदी | मे.स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|
| **जमा बाजू** | | | | | |
| १ | मालमत्ता कर | १५२५९८००० | १७३५९८००० | २१०००००० | |
| २ | स्वच्छता कर | ७७५३००० | ८२५३००० | ५००००० | |
| ३ | झाडकर | ४६४३००० | ५२२६३३३ | ५८३३३३ | |
| ४ | विशेष शिक्षण कर | १५७४००० | १७८४००० | २१०००० | |
| ५ | महाराष्ट्र शिक्षण कर | ३१६०६००० | ३५१०६००० | ३५००००० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | रोजगार हमी कर | ३५२२००० | ३६९७००० | १७५००० | |
| ७ | अगिशमन कर | ४५४५००० | ५१२८३३३ | ५८३३३३ | |
| ८ | मलनिस्सारण लाभ कर | ३६२६५०० | ४१२६५०० | ५००००० | |
| ९ | जलला भ कर | २२७८००० | २५६९६६७ | २९१६६७ | |
| १० | मलनिस्सारण कर | २२७७००० | २५६८६६७ | २९१६६७ | |
| ११ | दिवाबत्ती कर | २२९१००० | २५८२६६७ | २९१६६७ | |
| १२ | पथकर | २२८०००० | २५७१६६७ | २९१६६७ | |
| १३ | मोबाईल टॉवर दंडात्मक आकारणी | ३००००००० | ५००००००० | २००००००० | |
| १४ | बीओटी व्दारे येणारे उत्पन्न | १०००००००० | १५५०००००० | ५५०००००० | |
| १५ | हॉकर्स झोनव्दारे मिळणारे उत्पन्न | ० | ५००००००० | ५००००००० | |
| | **एकूण** | **३४८९९३५००** | **५०२२११८३४** | **१५३२१८३३४** | |

| अ.क्र. | लेखाशिर्ष | मे. आयुक्त सो यांनी केलेल्या तरतूदी | मे. स्थायी समितीने सुचविलेल्या शिफारशी | वाढ | घट |
|---|---|---|---|---|---|

**खर्च बाजू**

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १ | सन्मा. नगरसेवक विकास निधी (प्रत्येकी १५ लक्ष प्रथम टप्पा) | ० | ११२५००००० | ११२५००००० | |
| २ | मनपा हद्दीत प्रवेश होणा-या महामार्गावर प्रवेश व्दार उभारणे | ० | १००००००० | १००००००० | |
| ३ | नागरीकांचा विमा | ० | २५००००० | २५००००० | |
| ४ | सावित्रीबाई फुले सुकन्या योजना | ० | ३६००००० | ३६००००० | |
| ५ | स्वच्छ धुळे सुंदर धुळे प्रभाग निहाय बक्षिस योजना | ० | १५००००० | १५००००० | |
| ६ | महापौर केसरी कुस्ती स्पर्धा | १०००००० | २०००००० | १०००००० | |
| ७ | स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण योजना | ० | १०००००० | १०००००० | |
| ८ | राष्ट्रीय खेळाडू व कलावंत सत्कार | ० | ५००००० | ५००००० | |
| ९ | छत्रपती संभाजी राजे पुतळा व संत गाडगे महाराज पुतळासुशोभिकरण व संत रविदास महाराज पुतळा बसविणे | ० | ७५००००० | ७५००००० | |
| १० | घंटागाडी भाडे | ५००००००० | ४००००००० | | १००००००० |
| ११ | गांडूळ खत प्रकल्प निगा व दुरुस्ती | १००००००० | २५००००० | | ७५००००० |
| १२ | मलेरिया इंधन खर्च | ४०००००० | २०००००० | | २०००००० |
| १३ | राजेगार हमी कर | ३४५२००० | ३६२३५०० | १७१५०० | |
| १४ | महाराष्ट्र शिक्षण कर | ३०९७४००० | ३४४०४००० | ३४३०००० | |
| १५ | म.न.पा.निधी विकास कामे (परिशिष्ट भाग २ अंदाजपत्रक अ भांडवली | ० | २३५०००००० | २३५०००००० | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | कामे मध्ये दर्शविलेली आहेत.) | | | | |
| | **एकूण** | **९९४२६०००** | **२४७१२७५००** | **१६७२०१५००** | **१९५००००००** |

उक्त प्रमाणे सर्व सन्मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व प्रशासनाशी चर्चा करुन सन २०१५-१६चे सुधारीत व सन २०१६-१७ चे अंदाजपत्रक योग्य त्या फेरबदलासह अंतिम करुन मे.महासभेपुढे सादर करण्याबाबत शिफारस करण्यांस मान्यता देण्यांत येत आहे.

मनपा निधी तसेच शासन निधीतील विकास कामाची देयके अदा करणेपूर्वी त्रिसदस्यीय समिती मार्फततपासणी करुन त्यांच्या अभिप्रायानंतरच देयके अदा करणेबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.

सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x

सभापती,

स्थायी समिती,

धुळे महानगरपालिका,धुळे

**मा.आयुक्त दालना जवळील सभागृह, धुळे**
**गुरुवार दिनांक १७ मार्च २०१६**
**वेळ सकाळी ११-०० वाजतां**

धुळे महानगरपालिका स्थायी समितीची साप्ताहिक सभा आज गुरुवार दिनांक१७/०३/२०१६रोजी सकाळी ११-०० वाजतां मा.श्री.सोनल दिलीप शिंदे,सभापती,स्थायी समिती,धुळे मनपा धुळे यांच्या अध्यक्षतेखाली मा.आयुक्त दालनाजवळील सभागृहात भरली.

स्वाक्षरी बुकावर सही करुन खालील सन्मा.सदस्य सभागृहात हजर होते.

| अ.नं. | सदस्यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १ | श्री. शिंदे सोनल दिलीप | सभापती |
| २ | सौ. प्रतिभाताई शिवाजीराव चौधरी | सदस्या |
| ३ | श्री. खरात विश्वनाथ प्रेमदास | सदस्य |
| ४ | श्री.अन्सारी अकील अहमद महमद सादीक | सदस्य |
| ५ | श्री. वराडे शरद एकनाथ | सदस्य |
| ६ | श्री. पाटोळे संदीप सुरेश | सदस्य |
| ७ | श्री. पठाण इस्माईल खां हाजी लुकमान खां | सदस्य |
| ८ | श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर | सदस्य |
| ९ | श्रीमतीदुसाने चित्र चंद्रशेखर | सदस्या |
| १० | श्रीमती परदेशी मायादेवी महादेव | सदस्या |
| ११ | श्रीमती पठाण जैबुन्निसा अशरफ खां | सदस्या |

उपस्थित अधिकारी गण

| अ.नं. | अधिका-यांचे नांव | हुद्दा |
|---|---|---|
| १. | श्री. बी.एच. कदम | अति. आयुक्त |
| २. | श्री.एच.पी. कवठळकर | उपायुक्त |
| ३. | श्रीमती हेमलता डगळे | सहा.आयुक्त ( कर) |
| ४. | श्री. त्र्यंबक कांबळे | सहा. आयुक्त |
| ५. | श्री. ए. वाय. पगार | कार्यकारी अभियंता |
| ६. | श्री.एस.बी. विसपुते | प्र. नगररचनाकार |
| ७. | श्री. मनोज ए. वाघ | प्र.नगरसचिव तथा स्वीय सहाय्यक |
| ८. | श्री. के.एन. शिंदे | अभियंता |
| ९. | डॉ.श्री. बी.बी. माळी | आरोग्याधिकारी |
| १०. | श्री. रत्नाकर माळी | सहा. आरोग्याधिकारी |
| ११. | श्री. के.जी. खंदरकर | कार्यालयीन अधिक्षक |
| १२. | श्री. किशोर सुडके | एल.बी.टी़ अधिक्षक तथा वसुली अधिक्षक |
| १३. | श्री. गणेश खोडे | प्रकल्प अधिकारी |
| १४. | श्री. एन.के. बागुल | विद्युत अभियंता |
| १५. | श्री. महेंद्र जोशी | प्रशासन अधिकारी मनपा शिक्षण मंडळ |
| १६ | श्री. एस.आर. बावीस्कर | भांडारपाल |
| १७ | श्री.आर.व्ही. पाटील | अभिलेखापाल |
| १८ | श्री. तुषार ढाके | सहा. अग्नीशमन अधिकारी |
| १९ | श्री दिलीप कलाल | बाजार विभाग |

म.सभापती — सभेचे कामकाज चालविणेसाठी आवश्यक ती गणपूर्ती झालेली आहे.नगरसचिव यांनी कामकाजास सुरुवात करावी.

| | |
|---|---|
| म.नगरसचिव :- | वंदे मारतम या राष्ट्रवंदनेसाठी सर्वानी उभे रहावे. |
| म.सभापती | मा.आयुक्त साो.हे प्रवासातून येत आहे.तोपर्यतअति.आयुक्त कदम साो.यांनी प्रभारी आयुक्त म्हणून कामकाज पहावे. |

**सभेच्या सुरुवातीस सन्मा. सदस्यांचा आलेला रजेचा अर्ज**

| | |
|---|---|
| | सन्मा. सदस्य श्री. संजय नारायण गुजराथी यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत अर्ज सादर केलेला आहे. |
| म.सभापती | सन्मा. सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे. |

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर ११ दिनांक १७/३/२०१६**

सन्मा. सदस्य श्री.संजय नारायण गुजराथी यांनी आजच्या सभेस उपस्थित राहू शकत नसल्याने रजा मंजूर करणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.

सन्मा.सदस्यांच्या विनंती अर्जानुसार त्यांची आजच्या सभेस रजा मंजूर करण्यांत येत आहे.

**सर्वानुमते मंजुर,**
**सही/- x x x**
**सभापती,**
**स्थायी समिती,**
**धुळे महानगरपालिका,धुळे**

**विषय पत्रिकेवरील विषयास सुरुवात करणे पूर्वी**

| | |
|---|---|
| म. मायादेवी परदेशी | सभापती महोदय, आज पाण्याची समस्या फार बिकट आहे, यासाठी आम्ही संघर्ष करीत आहोत, आम्हाला सांगण्यात आले की पाण्याचे मीटर बसविण्यात येईल ,ठिक आहे आम्हीही त्याला मान्यता दिली लोकांचे काही म्हणणे नाही. पाण्याची समस्या असल्याने भागामध्ये टँकरने पाणीपूरवठा करण्यात आला परंतू आजही परिस्थीती तशीच आहे, याठिकाणी मला सांगावयासे वाटते की आम्ही महिला नगरसेवक घरची जबाबदारी पार पाडू आम्ही भागातील नागरिकांचे प्रतिनिधित्व करीत आहोत परंतू याठिकाणी काम होत नाही. आम्ही नगरसेवक बंधू-भगिनी कामासाठी त्याठिकाणी चकरा मारीत आहोत हे योग्य आहे का, याठिकाणी यावे तर अधिकारी भेटत नाही यामुळे याठिकाणी आमचे पती याठिकाणी आले असतांना मनपाच्या गेटवर रोखण्यात आले हा नियम कुणी काढला आहे आणि हे उचित आहे का? या झालेल्या प्रकाराबदद्ल आम्ही महिला निषेध करीत आहोत. |
| म. सभापती | पार्किंगची असुविधा असल्याने हा प्रकार घडलेला आहे. तसेच आपल्या भागातील पाण्याच्या प्रश्नाबदद्ल अभियंता श्री. कैलास शिंदे कार्यवाही करावी. |
| म. प्रतिभाताई चौधरी | सभापती महोदय, सन्मा.सदस्या श्रीमती मायादेवी परदेशी यांनी त्यांच्या वार्डातील पाण्याची समस्या मांडली आहे त्याच पध्दतीने माझ्या भागातही पाण्याची समस्या आहे, मोठा प्रभाग आहे त्यात मयूर कॉलनी, जयहिंद कॉलनी, इंदिरा गार्डन, स्टेट बँक कॉलनी, प्रमोद नगर इत्यादी भाग आहेत या भागात १९७५ सालापासून तीन इंची पाईप लाईन टाकण्यात आली आहे त्यावेळी लोकसंख्या कमी होती आता लोकसंख्या वाढली आहे पाण्याचे कनेक्शन वाढले आहे परंतू पाईप लाईन तीच आहे जर पाणी सकाळी दहा वाजता कमी प्रेशरने सोडले तर ते रात्री दहा वाजेपर्यंत नागरिकांना मिळते. १३६ कोटी रुपयाच्या पाणीपूरवठा योजनेत पाण्यासाठी पाठपूरावा करुनही आमच्या भागात पाईपलाईन टाकली नाही आमच्या भागातील नागरीक १००टक्के कर भरतात तरी सुविधा मिळत नाही. आणि जेथे कर भरत नाही त्या ठिकाणी सुविधा दिल्या जातात. पाणी पुरवठा योजना जीवन प्राधिकरण हस्तांतरीत झाली आहे त्यात काय अडचणी आहे. |
| म. अभियंता | यामध्ये प्रश्न असा आहे पाणी पुरवठा योजनमध्ये पाण्याच्या टाकीच्या जागा या जीवन प्राधिकरण कडे हस्तांतरीत करणेस सांगितले आहे. मेन रायझिंगचे कामाबाबत काही अडचण नाही. आम्ही पत्र व्यवहार केला आहे परंतू काम सुरु झाले नाही. ठेकेदाराने पहील्या टाकीचे |

काम सुरु केले होते त्याचे मोजमाप करण्याचे ठेकेदार आणि जीवनप्राधिकरण यांनी एकत्रीतपणे करावयाचे आहे यासाठी काम थांबले आहे. जीवनप्राधिकरणचे अधिक्षक अभियंता आणि इतर लोकांना या ठिकाणी बोलावले तर कामाला चालणा मिळेल यासाठी मी त्यांच्याशी आजच्या आज पत्र व्यवहार करीत आहे.

म. प्रतिभाताई चौधरी — प्राधान्य क्रमाने पाईपलाईन टाकनेबाबत पाठपूरावा करीत आहे, भागातील लोक १०० टक्के कर भरतात परंतू त्यांना पाणी मिळत नाही त्यांच्या विरुध्द हा अन्याय आहे.तसेच आमच्या भागातील नागरिकांना २०१२ मध्ये बांधकाम परवानगी साठी अर्ज दिला होता,परंतू त्याची दखल घेतली गेली नाही परंतू त्यांना आता सहा वर्षाची घरपटट्री आली आहे हा त्यांच्यावर अन्याय आहे.ते दोन वर्षाची घरपटट्री भरायला तयार आहे. तसेच नागरिक टॅक्स भरण्यासाठी मनपामध्ये येवून लाईनीत उभे आहेत आणि आता उन्हाळयाला सुरवात झाली आहे. म्हातारी माणसेही कर भरण्यासाठी लाईनीत उभी राहातात तर यासाठी दोन वेगवेगळया लाईनी कराव्यात एक नियमित कर भरणाऱ्यांची वेगळी लाईन दुसरी शास्ती भरणाऱ्यांची वेगळी लाईन करण्यात यावी अशी माझी सुचना आहे.

म.सहा.आयुक्त(कर) — मनपा अधिनियम कलम १५० नुसार ज्या मालमत्तांची आकारणी झाली नाही त्या मालमत्ता धारकांना नोटीसा दिल्या आहे त्यांना बांधकाम परवानगी बाबतचे कागदपत्र सादर करावे कागदपत्र जर सादर केले नाही तर बांधकाम परवानगी नाही म्हणून घोषित करु.

म. प्रतिभाताई चौधरी — २०१२ मध्ये बांधकाम परवानगीसाठी अर्ज दिला आहे आणि घरपटट्रीची रक्कम भरली आहे ती पावती सुध्दा आहे.

म.सहा.आयुक्त(कर) — तीजी घरपटटीची पावती आहे ती जुन्या बांधकामाची घरपटटीची पावती आहे जर आपल्याला कर आकारणी मान्य नसेल तर ती व्यक्ती अपीलात जावू शकते.

म.सभापती — संबंधीत व्यक्तीच्या घराच्या बांधकामाबाबतच्या कागदपत्रांचे पडताळणी करुन कार्यवाही करण्यात यावी.

म.आय.एल. पठाण — ज्या ठिकाणी पूर्ण अतिक्रमण आहे त्याचे काय करणार आहे.

म.सहा.आयुक्त(कर) — अतिक्रमित घराबाबत मनपा अधिनियमानुसार आकारणीबाबत कार्यवाही करण्यांत येईल.

म.सभापती — सन्मा. सदस्या श्रीमती मायादेवी परदेशी यांनी उपस्थीत केलेल्या प्रश्नाबाबत अभियंता श्री उगले यांनी माहिती दयावी.

म. मायादेवी परदेशी — भागातील पाईपलाईन जोडलेली नाही त्यावर खर्च करुन पाईपलाईनचे काम करण्यात यावे.

म. सी.एम.उगले — महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग व मनपाचे अधिकारी यांची संयुक्तीक बैठक घेवून शहरात ज्या भागात दुषित पाणी पुरवठा होत आहे व आवश्यक ठिकाणी पाईपलाइन टाकण्यासाठी बैठक घेणे आवश्यक आहे.

म.अभियंता — आपण अशा किती पाईपलाईन जोडू शकतो त्याची यादी व नकाशे ठेवण्यात यावे.

म. सभापती — संपूर्ण शहरातील पाईपलाइनीची दुरुस्तीची कामे करण्यात यावी, आता उन्हाळा लवकरच सुरु होत आहे शहरातील आपल्या विहिरी स्वच्छ करण्यात याव्यात त्यावरील मोटार दुरुस्तीची कामे असतील तर ती तात्काळ दुरुस्ती करण्यात यावी याबाबतचा झालेला कामा बाबतचा अहवाल सादर करण्यात यावा.

म. सैय्यद साबीर अली मोतेबर — सभापती महोदय,मी प्रश्न उपस्थीत करीत आहे की अधिकारी सभेमध्ये उपस्थीत राहून त्यांच्या डायरी मध्ये सभेतील महत्वाच्या गोष्टींबाबत नोंदी करतात त्यावर त्यांनी काही कारवाई केली आहे का, याचा ते खुलासा करतील का?अधिकारी फक्त डायरीमध्ये लिहून घेता परंतू त्यावर काही करत नाही. मी अंदाजपत्रकात तरतूद करुनही कामे होत नसल्याने बजेटच्या मिटींगमधून सभात्याग केला. त्याअनुषंगाने आपण काय कारवाई केली आहे आम्ही फक्त सभेमध्ये बोलायचे आणि निघून जावयाचे असे नाही. आम्हाला समस्या मांडण्याचा पुर्ण अधिकार आहे. माझे वार्डात एका नागरीकाच्या घरपटट्रीत ५०० रुपये पाणीपटट्रीचे

अतिरिक्त लावले आहे. घरातील नवरा आणि बायको यांना बिले येत आहे तेव्हा पासून हा भुर्दंड येत आहे ते का कमी होत नाही याचा खूलासा करावा.

म.सहा.आयुक्त(कर) ठरावा नुसार आपण ज्यांच्याकडे नळकनेक्शन नाही त्यांच्याकडून ५०० रुपये पाणीपटट्‌ीचे वसूल करीत आहोत.५०० रुपये कमी करण्यासाठी सन्मा.सदस्य आणि आयुक्त साहेब यांच्याकडे चर्चा होवून त्यांची जी ३५ ते ३७ घरे आहेत

म. सैय्यद साबीर अली मोतेबर २०१३ मध्ये मी पत्र दिले आहे ती कागदपत्र आपल्याकडे आहेत का, मी गेल्या पाच वर्षापासून पाठपूरावा करीत आहे. २५सन्मा.सदस्यांच्या सहया घेवून पत्र दिले आहे परंतू सदरचा विषय महासभेत घेतला नाही. वॉटर चार्जेसची टिपणी महासभेच्या मंजूरीसाठी देण्यासाठी ठेवली आहे. त्या लोकांचे रेशनकार्ड एकच आहे अधिकृत नळ आहेत वर्षाला १२०६ रुपये भरीत आहे. त्यांच्याकडे कनेक्शन असतांना ते दुसऱ्याच्या नळावर पाणी भरतात म्हणून त्यांना आपण ५०० रुपये चार्जेस लावले आहे, आपण त्यांना ५०० रुपये रिफंड करणार आहे का? याचा खुलासा करावा.

म. सभापती याबाबत टिपणी सादर करुन लवकरात लवकर कारवाई करण्यात यावी. सही/-x x x

सभापती,<br>स्थायी समिती,<br>धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः-०९ दैनंदिन बाजार फी वसुली मक्ता करिता सरकारी अंक ठरवून दैनंदिन बाजार फी चा लिलाव करणेस मंजुरी देणेबाबत आलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १२ दिनांक १७/३/२०१६**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे धुळे महानगरपालिका हद्दीतील दैनंदिन बाजार फी मनपा स्थायी समिती ठराव क्रं.१४०दि.३०/१२/२०११अन्वये वसुली जा.क्रं.१६४दि.२५/१/२०१२नुसार दि.१/२/२०१२ पासून दैनंदिन बाजार फी रु.१०/- मात्र याप्रमाणे वसुल करण्यांत येत आहे.

कार्यालयीन टिपणी दि.५/६/२०१५नुसार मनपा हद्दीतील सर्व फेरीवाल्यांचे नोंदणीकरण होण्याच्या दृष्टीने दररोजची दैनंदिन बाजार फी ची पावती रु.१०/- मात्र दराची बंद करुन दरमहा रु.३००/- मात्र प्रमाणे प्रत्येक फेरीवाला व्यावसायिकांकडून वसूल करणेत येत आहे.

दि.१८/५/२०१५पासून दि.२१/१२/२०१५ अखेर १३७७ फेरीवाला व्यावसायिकांची नोंदणी झालेली आहे. नोंदणी फी रु.१३,७७,०००/- व दैनंदिन बाजार फी रु. १९,९८,६५६/-मात्र असे एकुण रक्कम रुपये ३३,७५,६५६/-मात्र वसुल करण्यांत आलेले आहेत. दि. ३१/३/२०१६ अखेर संभाव्य वसूल रुपये १३,७७,०००/-मात्र दैनंदिन बाजार फी वसुल येऊ शकते वर्षाअखेररुपये ४७,५२,६५६/- मात्र वसुली होईल.

धुळे मनपाचे उत्पन्न वाढीबाबत विभागप्रमुखांची घेतलेल्या बैठकीत केलेल्या चर्चेनुसार धुळे शहरात स्थिर व अस्थिर फेरीवाल्यांची साधारणतःअंदाजे संख्या ५००० असतील असे मत व्यक्त केले त्यामुळे फेरीवाले व्यावसायिकांकडून अंदाजित रक्कम रुपये १,८२,५०,०००/- मात्र दैनंदिन बाजार फी पासून उत्पन्न मिळू शकते.

त्यामुळे दैनंदिन बाजार फी अंक रुपये १,८२,५०,०००/-मात्र सरकारी अंक ठरवून मिळणेस तसेच उक्त रक्कमेत जाहीर लिलाव काढणेस व वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करणेस तसेचे महाराष्ट्र प्रातिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३३२ (ब) मा.आयुक्त साो. यांचे मंजुरीने १ वर्ष कालावधी करिता दैनंदिन बाजार फीचा मक्ता (ठेका) देता येईल. सदर विषय स्थायी समितीपुढे निर्णयासाठीआला असता उपस्थित सदस्यांनी त्यावर चर्चा केली व चर्चेअंती प्रशासनाकडून सादर करण्यांत आलेली टिपणी सुस्पष्ट नाही. धुळे शहरातील स्थिर व अस्थिर फेरीवाल्याची संख्या अंदाजे ५००० दर्शविलेली आहे.तसेच

मनपाकडेस नोंदणी असलेल्या फेरीवाल्याची संख्या १३७७ दर्शविलेली आहे.यासंदर्भात प्रशासनाने तांतडीने बायोमॅट्रीक पध्दतीने सर्व्हे करण्यांचे काम करण्यांत यावे व सर्व्हेनुसार संख्या निश्चित करुन पुढील सभेपुढे सविस्तर विगतवारीसह अहवाल सादर करावा.म्हणजे समितीस योग्य तो निर्णय घेणे सोयीचे होईल म्हणून तूर्त सदर विषय तहकूब ठेवण्यांत येत आहे. तसेच उर्वरीत कालावधीत नोंदणी न झालेल्या फेरीवाल्यांची नोंदणी करुन त्यांचेकडून नियमानुसार नोंदणी शुल्क व अनुषंगिक फी वसुली बाबत काटेकोर कार्यवाही करुन मनपाचे उत्पन्न बुडणार नाही यांची देखील दक्षता घ्यावी. सर्वानुमते मंजुर,

सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

विषय क्रमांकः- १० धुळे मनपा फायर फायटर एमएच १८/८२८४ हया वाहनाचे इंजिन दुरुस्ती करणेसाठी येणारा रु.१,२७,३८९/-मात्र खर्चास मंजुरी देणेबाबतआलेल्या कार्यालयीन निवेदनावर विचार करणे.

**धुळे मनपा स्थायी समिती ठराव नंबर १३ दिनांक १७/३/२०१६**

कार्यालयीन निवेदनाप्रमाणे अग्नीशमन वाहन एमएच१८/M ८२८४ हे MIDC येथे दि.२/१२/१५रोजी आग लागली असता तेव्हा आग विझवतांना रेडिएटर हौस पाईप फाटल्याने इंजिनमधील कुलंट निघाल्याने वाहनाचे इंजिन जास्त प्रमाणात गरम होऊन वाहन बंद पडले सदर वाहन टोइंग करुन सदर वाहनाचे अधिकृत डिलर उज्वल ॲटो प्रा.लि. यांचेकडून तपासणी करुन दुरुस्ती एस्टीमेट काढून मिळणेबाबत मा.उपायुक्त सो.यांचे मान्यतेने पत्र जा.क्रं.१०९ दि.४/१२/२०१५ रोजी देणेत आले. त्यानुसार इंजिन दुरुस्ती खर्च स्पेअर व दुरुस्ती लेबर चार्जसह रु.१०९८३५/- सर्व टॅक्सेससह एस्टीमेट दिले.सदर एस्टीमेट सह महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ यांचेकडून इंजिन तपासणी खर्च जादा मुळे करणे ऑडीटच्या दृष्टीने आवश्यक असलेने टिपणी सादर केली असता सदर टिपणीवर मुख्य लेखापरीक्षक यांनी सदर तपासणी प्रादेशिक परिवहन कार्यालयाकडून करणे उचित राहील असे नमूद केले त्यास म.आयुक्त सो.यांनी मान्यता दिली त्यानुसारR.T.O.कार्यालयास अग्नी वि.जा.नं.२४दि.२२/१२/१५ने पत्र देणेत आले. त्यांचेकडील पत्र क्रं.परिवहन /प्रापका / धुळे जा.क्रं.५८४ दि.५/२/१६ ने इंजिन दुरुस्ती एस्टीमेट रु.१,२७,३८९/- मात्र रिकॉन एक्सचेंज बाबत दिले आहे.

सदर वाहनावर या आर्थिक वर्षात रु.३१०००/- दुरुस्तीवर खर्च झाला आहे.सदर वाहन १४/९/२००७ रोजी घेतले असून सन२०१४-१५ अखेररु.३,७९,९९६/- मात्र दुरुस्तीवर खर्च झाला आहे. शासन निर्णय वित्त विभाग कं. निअप्र/ १००८/प्र.क्र.७०/२००८ विनियम १५ मे२००९ नुसार सदर इंजिन रिकॉन एक्सचेंज बाबतआर.टी.ओ.कार्यालया कडील एस्टीमेट आहे. सदर कंपनीत समक्ष मॅकेनिक व सहा.अग्नीशमन अधिकारी हे इंजिन दुरुस्ती एस्टीमेट बाबत माहिती विचारणेस गेले असता कंपनी धारकांनी सांगितले की,इंजिन दुरुस्ती बाबत रु.१,०९,८३५/- चे एस्टीमेट दिले त्यानुसार जरी दुरुस्ती झाली तरी त्यांची वारंटी आम्ही देत नाही.व इंजिन रिकॉन एक्सचेंज बाबत आर.टी.ओ.कार्यालयाकडील व आम्ही दिलेले दर रु.१,२७,३८९/-नुसार केलेस त्यांची वारंटी १००००० कि.मी.पर्यत किंवा १२ महिन्याची वारंटी देत आहोत. त्यामुळे वारंटीच्या दृष्टीने आर.टी.ओ. कार्यालयाकडील एस्टीमेट प्रमाणे रिकॉन इंजिन घेतलेस मॅकेनिक यांचे मत आहे.तसेच सदर वाहनावर चालू वर्षात रु.३१०००/- खर्च झाला असून नियमानुसार५०,०००/- पावेतोच दुरुस्ती खर्च करता येतो. परंतु सदर वाहन हे अग्नीशमन असून आग विझविणेकामी अत्यावश्यक आहे. व सदर इंजिन रिकॉन एक्सचेंजचा खर्च हा ५० हजार पावेतोच दुरुस्ती खर्च करता येतो. परंतु सदर वाहने हे अग्नीशमन असून आग विझविणेकामी अत्यावश्यक आहे. व सदर इंजिन रिकॉन

एक्सचेजचा खर्च हा ५०हजार पेक्षा जास्त आहे.त्यामुळे जादा होणारा खर्चाची लेखापरीक्षणात आक्षेपार्ह एक्सचेंज बाबत अधिकृत डिलर उज्वन ॲटो प्रा.लि. धुळे यांचेकडून घेणेस व येणारा खर्च रु.१,२७,३८९/- मात्रला मंजुरी आदेशार्थ मे.स्थायी समितीपुढे ठेवणेबाबत भांडारपाल,मॅकेनिक व सहा.अग्नीशमन अधिकारी यांनी प्रस्ताव सादर केला असता त्यावर म.अभियंता यावर यापूर्वी सदर वाहनावर दुरुस्तीपासून आज पावेतो झालेल्या खर्च तसेच याबाबत शासन निर्णय मार्गदर्शक तत्वे तपासून शासकीय मुलेप यांचेमार्फत तपासून अभिप्राय घेंवून निर्णयार्थ सादर असे मत नोंदलेले असून म. सहा.आयुक्त यांनी त्याप्रमाणे मुलेप यांचे कडेस प्रस्ताव अग्रेषित केलेला आहे.

भांडार विभागाकडील अहवालानुसार अग्नीशमन वाहन एमएच १८ ए ८२८४ या वाहनाचीह दुरुस्तीसाठी येणारा खर्च हा जास्तीचा असल्याने तांत्रिक तपासणीकरुन त्याबाबतचा अहवाल मिळणेबाबत पत्र देण्यांत आलेले होते. त्यानुसार परिवहन प्रा.प.का./ धुळे २०१६ जा.कं.५८४ दि.५/२/२०१६ चे पत्र प्राप्त झाले असून त्यानुसार त्यांनी सदर बाबतचा खर्च १,२७,३८९/-मात्र बाबतचे दुरुस्ती अंदाजपत्रक सादर केलेले आहे.

परंतु वित्तविभाग क्रं.वि.अ.प्र.१००८/प्र.क्रं.७०/२००८ विनिमय १५ मे २००९ नुसार डिझेल वाहनावर दुरुस्ती साठीचा खर्च हा रु ५००००/-पर्यत प्रतिवर्षी करता येईल असे नमूद आहे. टिपणीत नमूद नुसार सदर वाहनावर या आर्थिक वर्षात रु.३१०००/- खर्च झ ालेला आहे. तरी सदर वाहनावर येणारा खर्च हा १२७३८९/- मात्र हा जास्तीचा असल्याने करता येणार नाही. सदरचे वाहन हे अग्नीशमक असून आग विझविणे कामी आवश्यक असल्याने नमूद नुसार स्थायी समिती समोर ठेवण्यांस मंजुरीस्तव सादर असे अभिप्राय मुलेप यांनी नोंदविलेले आहे.

कार्यालयीन अहवाल व झालेल्या चर्चेनुसार सदरचे वाहन हे अग्नीशमक वाहन असूनआग विझविणे कामी आवश्यक असल्याने सदर वाहनाचे इंजिन दुरुस्तीचे (रिकॉल) एस्टीमेट रु.१,२७,३८९/- मात्र आर.टी.ओ.कार्यालयाकडून आलेले असल्याने सदर खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

सर्वानुमते मंजुर,
सही/-x x x
सभापती,
स्थायी समिती,
धुळे महानगरपालिका,धुळे

मा. सभापती सो. यांच्या परवानगीने दि.१७/३/२०१६रोजीच्या बैठकीत सन्मा.सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न व त्यावर सभापती घेतलेला निर्णय.

१) सन्मा. सदस्य श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर यांनी त्याच्या भागातील कामगार हौसींग सोसायटीमधील एकाच कुटुंबातील व्यक्तींना वेगवेगळी पाणीपट्टी आकारल्यामुळे त्याबाबत सुमारे२०१३ पासून पाठ पुरावा सुरु असूनही अद्याप कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे सदर बाबतीत तांतडीने निर्णय घेणेबाबत सुचित केले असता यावर तांतडीने याबाबत प्रस्तावाची पडताळणी करुन निर्णय घेणेबाबत म. सहा.आयुक्त (कर) यांना मा. सभापती यांनी आदेशित केले.

२) सन्मा. सदस्य श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर यांनी मनपा मार्फत घरपट्टी शास्ती व वसुलीसाठी मोठयाप्रमाणावर मोहीम सुरु केलेली आहे. नागरीक त्याप्रमाणे प्रामणिकपणे कर भरीत आहेत. परंतु शहरात २ - ३ मजली इमारती उभ्या आहेत. परंतु त्यांना अद्याप घरपट्टीची आकारणीच करण्यांत आलेली नाही. या आर्थिक नुकसानीस जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित केलेला आहे. तसेच वडजाईरोड मेन लाईन वरुन परस्पर नळ कनेक्शन देण्यांत येत आहे. अशा अनधिकृत नळ कनेक्शन देणा-या लोकांवरही कार्यवाही करण्यांत यावी अशी मागणी केलेली आहे. याबाबत मा. सभापती यांनी संबंधित तक्रारी

बाबत तांतडीने चौकशी करुन  कार्यवाही करण्यांचे  आदेशित केलेले आहे. व याबाबत पुढील बैठकीत अहवाल  सादर करण्याबाबत आदेशित केलेले आहे.

३) सन्मा.सदस्य श्री.विश्वनाथ खरात यांनी त्यांच्या भागातील शौचालय निगा व दुरुस्तीचे  टेंडर काढलेले नाही याबाबत तक्रार  केलेंली आहे.  यासंदर्भात मा. सभापती यांनी याबाबत  अन्य प्रभागातही शौचालय दुरुस्तीच्या तक्रारी असून प्रशासनाने निगा व दुरुस्ती बाबत सक्षम संस्थेला ठेका देणेबाबत तांतडीने कार्यवाही करावी  असे आदेशित केलेले आहे.

४) सन्मा. इस्माईल पठाण  यांनी  मलेरिया कर्मचा-यांचा ठेकाची मुदत संपूनही अद्याप नवीन निविदा प्रसिध्द झालेली नसल्याची तक्रारी केलेली असून याबाबत मा. सभापती यांनी त्वरीत ठेका काढणेबाबत आदेशित केलेले आहे.

५) सन्मा. सदस्य श्री.संदीप पाटोळे यांनी श्रीराम नगर व त्यांच्या प्रभागातील अन्य परिसरातील सार्वजनिक शौचालयांचे दुरावस्थेबाबत तसेच सन्मा. सदस्य श्री. शरद वराडे यांनी ताशागल्लीतील शौचालय दुरुस्ती बाबतही तक्रारी केलेली आहे. यावर मा. सभापती यांनी म. अभियंता यांनी तांतडीने कार्यवाही करण्यांचे आदेशित केलेले आहे.

६) सन्मा. सदस्य श्री. सैय्यद साबीर अली मोतेबर यांनी  मनपा नगरसेवक निधीमधून करावयाच्या कामाची  निविदा अद्याप निघालेल्या नसल्याचे निदर्शनास आणून  मार्च महिना संपत असून  प्रस्तावावर  स्वाक्षरी  होत नसल्याने  व जाणून बुजुन  सदस्यांना त्रास होत असल्याने याबाबत  तक्रार केलेली आहे.  यावर मा. सभापती यांनी  मा. अतिरिक्त आयुक्त यांनी याबाबत समक्ष  लक्ष देऊन मुदतीत  सदर कामाच्या निविदा  प्रसिध्द होतील याबाबत कार्यवाही करण्यांचे आदेशित केलेले आहे.

७) सन्मा. सदस्या सौ. प्रतिभाताई चौधरी यांनी  सद्यस्थितीत उन्हाळयाचे दिवस असून नागरीकांना  मोफत पाणी वाटपाची व्यवस्था सेवाभावी संस्थांमार्फत केली जाते.  अशा ठिकाणी मनपामार्फत मोफत पाणी पुरविण्यांची व्यवस्था करण्यांत यावी अशी मागणी केलेली आहे. यावर मा. सभापती यांनी  सदर ठिकाणी  धुळे महानगरपालिकेचे संयुक्तीक रित्या नांव  देण्यांस आल्यास त्याठिकाणी पाणी वाटपाची व्यवस्था करण्यांत यावी असे आदेशित केले आहे.

८) मा. सभापती यांनी व मनपाकडेस सद्यस्थितीत असलेल्या मानधनावरील ओव्हरसिअर यांना कमी प्रमाणात मानधन असल्याने  त्यांच्या कामाचे स्वरुप व सद्यस्थिती लक्षांत घेता  सदर मानधन वाढविणेबाबतचा प्रस्ताव पुढील बैठकीत आस्थापना तथा संबंधित विभागामार्फत सादर करणेबाबत आदेशित केलेले आहे.

९) सद्यस्थितीत उन्हाळयाची परिस्थिती  व उपलब्ध पाण्याचा साठा लक्षात घेता पाण्याची बचत करण्यांची गरज असून  पाण्याचा अपव्यय करणा-यावर कडक कारवाई करणेबाबत सन्मा. सदस्य श्री. संदीप पाटोळे यांनी सुचित केलेले आहे यावर मा. सभापती यांनी याबाबत कार्यवाही करण्यांचे आदेशित केलेले आहे. तसेच बंद असलेल्या विंधन विहीरी तांतडीने दुरुस्तीबाबत कार्यवाही करण्यांचे तसेच मनपाच्या मालकीच्या व अन्य खाजगी विहीरीचे गाळ काढून पर्यायी व्यवस्था करण्याबाबत म.सभापती यांनी आदेशित केलेले आहे.

सही/-x x x<br>
सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
धुळे महानगरपालिका,धुळे